मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

निबंध - ९२ - सन १८९५

ले. महादेव शिवराम गोळे

ब्राह्मण आणि त्यांची विद्या.

(श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे)

ग्र.सं.ठा.२५१७

ब्राह्मण आणि त्यांची विद्या.

निबंध





ब्राह्मण आणि त्यांची विद्या.

BRAHMINS & THEIR EDUCATION.

BEING

A REVIEW OF THE PROGRESS, DURING THE LAST TWENTY YEARS,

OF THE INTELLECTUAL ACTIVITIES

OF THE RACE.

BY

MAHADEV SHIVRAM GOLE, M. A.

PRINCIPAL, FERGUSSON COLLEGE, POONA.

POONA.

1895.

(*All rights reserved.*)

Printed at

the Arya Bhushana Press Poona, and the Nirnaya Sagar Press, Bombay.

ह थ बं ध
नं.
रद्दी नि ५३

ब्राह्मण आणि त्यांची विद्या.

ब्राह्मण.

हा ग्रंथ

महादेव शिवराम गोळे, एम्.ए.,
प्रिन्सिपाल, फर्ग्युसन कालेज, पुणें,
यांनीं

तयार केला.

पुणें:

१८९५.

(ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क राखून ठेविले आहेत.)

पुणें, आर्यभूषण आणि मुंबई, निर्णयसागर छापखान्यांत छापिला.



प्रस्तावना.

हें पुस्तक दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाच्या आधारें लिहिलेलें नाहीं. यांत जे दुसऱ्यांचे अनुभव, अभिप्राय किंवा सिद्धांत सांगितलेले आहेत, ते या पुस्तकाच्या तयारीकरितां तूर्तातूर्त गोळा केलेले नाहींत, तर व्यासंगानुरूप वाचनांत आलेले व गेल्या कित्येक वर्षांच्या अवलोकनानें अनुभवासही उतरलेले असे ते आहेत. ते या देशास लागू करितांना येथील सर्व स्थिति डोळ्यापुढें बाळगिली होती, व जेवढेजेवढे फेरफार करावेसे वाटले तेवढे करूनच ते वाचकांच्या माहितीकरितां व त्यांनीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहावा ह्मणून येथें सादर केलेले आहेत. हे दुसऱ्यांचे सिद्धांत इतके स्थूल आहेत कीं ते वाचकांस बहुधा मान्य होतीलच; वादविवाद जो उत्पन्न व्हावयाचा तो माझे स्वतःचे जे अनुभव, अभिप्राय व सिद्धांत आहेत त्यांसंबंधानें; परंतु त्यांसंबंधानेंही सुज्ञ वाचकांच्या असें लक्षांत येईल कीं कोणतीही गोष्ट निराधार किंवा अतिशयोक्तीनें लिहिण्याचा प्रयत्न नाहीं. कोणती गोष्ट कोठें दृष्टीस पडते, कोणता अनुभव कोठें कसा येतो, हें जागोजाग सांगितलें आहे, व त्यावरून अभिप्राय किंवा सिद्धांत स्थापित केलेले आहेत. अनुभवाच्या व अवलोकनाच्या गोष्टी येतांच वाचकास अडखळल्यासारखें होईल, व क्षणभर डोळे मिटून विचार केल्यावर पुढें जावेंसें वाटेल; व अशा रीतीनेंच वाचकांनीं हा ग्रंथ वाचावा, तो भरंकन् एकदां वाचून टाकून देऊं नये, अशी त्यांस माझी प्रार्थना आहे.

कारण पुस्तकांत ज्या प्रश्नांचें विवेचन केलेलें आहे ते प्रश्न ब्राह्मणज्ञातीस फारच महत्वाचे, किंबहुना तिच्या अगदीं वर्मीचे आहेत. त्या प्रश्नांच्या निर्णयार्थ जीं अवलोकनें व जे अनुभव प्रमाणास आणायाचे ते व्यापक असले पाहिजेत व त्यांवरून योग्य तेवढेच सिद्धांत स्थापित केले पाहिजेत. सुज्ञ वाचकांनीं ग्रंथांत वर्णिलेलीं अवलोकनें व अनुभव आपल्या स्वतःच्यांशीं ताडून पहावे व जर ते जुळले तर पुढें त्यांवरून योग्य अनुमानें केलेलीं आहेत कीं नाहीं हें ठरवावें. जर सांगितलेल्या गोष्टी, सर्वांशीं नाहीं तर नाहीं, परंतु बहुतांशीं वाचकांस पटल्या, तर त्यांनीं 'पटल्या' एवढेंच ह्मणून स्वस्थ राहूं नये, तर योग्य कर्तव्यास प्रवृत्त व्हावें. उत्तम कर्तृत्व अंगीं नसल्यास उत्तम विचारांचा काय उपयोग ! जें स्वतःस शक्य

तें तत्काळ आरंभावें, जें अल्प समुदायास शक्य तें आरंभण्याच्या उद्देशानें अल्प-समुदाय मिळवावा, व एकंदरीनें कर्तव्याचा निश्चय झाल्यावर मग तटस्थ राहूं नये. ही गोष्ट ध्यानांत आणून देण्याकरितांच हा ग्रंथ लिहिण्याचें साहस केलें. सर्व ग्रंथ उपदेशपर व्हावा, जेथें तो उघडावा तेथें कांहीं तरी उपयुक्त गोष्ट वाचण्यांत यावी, जें वाचून जाईल त्याचा संस्कार मनावर रहावा, नित्यच्या अनुभवांत त्याची सत्यता पुनःपुनः लक्षांत यावी, व या क्रमानें वाचकामध्यें संततीच्या शिक्षणासंबंधानें स्वकर्तव्यांचा निश्चय होत जावा,–अशा निदान मनीषेनें ग्रंथ लिहिण्यास आरंभ केला. जर ही मनीषा सिद्धीस गेली असें वाचकांस वाटलें तर सर्व श्रमांचें सार्थक्य झालें.

पुस्तक वाचून संपल्यावर व ज्या गोष्टींचा विशेष विचार करावासा वाटेल त्यांचा विचार झाल्यावर, सर्वांनीं आपआपले अभिप्राय मला कळविण्याची तसदी घ्यावी; कोणीही उतावीळपणें किंवा आवेशांत हे अभिप्राय लिहूं नयेत; स्वस्थपणें व शांतपणें मनाचा निश्चय झाल्यावर ते लिहावे; अशी सर्वांस विनंति आहे. शिक्षणाच्या महत्वाच्या विषयावर बहुमत ठरणें अवश्य आहे. तसेंच तें शिक्षणाच्या परिणामांविषयीं व हेतूंविषयीं ठरलें पाहिजे. विचारी पुरुषांचे अभिप्राय इंग्रजींत किंवा मराठींत जसे येतील तसे छापण्याचा माझा उद्देश आहे; व ज्यांस आपलें नांव प्रसिद्ध होऊं नये असें वाटेल, त्यांनीं तसें लिहिल्यास तसें करितां येईल. जेथें पुस्तकांतील मतें ग्राह्य होतील तेथें विस्तारानें लिहिण्याचें कारण नाहीं, केवळ तीं ग्राह्य आहेत असें सांगितलें म्हणजे झालें; परंतु जेथें कोणतेंही अवलोकन, अनुभव किंवा सिद्धांत चुकीचा आहे असें दाखवायाचें असेल तेथें मात्र वाचकांनीं सप्रमाण, शिस्तवार आपलें मत सांगावें. या प्रकारें या ग्रंथांस विचारी पुरुषांच्या साहाय्यानें एक भावंड निपजावें अशी माझी फारच इच्छा आहे. हरतऱ्हेचे **पालक, शिक्षक, विद्याखात्याचे नौकर, डाक्टर, एंजिनियर, स्त्रिया, विद्यार्थी, सुधारक, असुधारक** आणि **कारस्थानी**, या सर्वांनीं तसदी घेऊन मेहरबानीनें ही इच्छा परिपूर्ण करावी. पुस्तकांत अनेक विषयांचें विवेचन आहे; या सर्व विषयांवर मतवैचित्र्य असण्याचा संभव आहे, व भिन्न लोकांचे अनुभव भिन्न असूं शकतील; एकास एका गोष्टीची अधिक माहिती तर दुसऱ्यास दुसरीची अशी साहजिक स्थिति असणार; व म्हणूनच वर निर्दिष्ट केलेल्या सर्व वर्गांनीं, निदान आपआपल्या माहितीच्या किंवा अनुभवाच्या विषयांत तरी, आपले अभिप्राय लिहून पाठविल्यास फार फायदा होईल.

शिक्षणक्रमासंबंधानें पुष्कळच फेरफार सुचविलेले आहेत व इंग्रजी मुलखांतले सुरू होण्यास ब्राह्मणांत कायतें **स्वावलंबन** पाहिजे आहे. इतर मुलखांत आपला आपण राज्यकारभार पाहणाऱ्या श्रीमंत सरदारांनीं व राजेरजवाड्यांनीं शिक्षणास उत्तम स्वरूप देण्याचें मनांत आणिल्यास, त्यांस स्वतः लोक सावध व

म्हावलंबी होण्याचीहीं वाट पहायास नको. म्हणून सर्व उदार व विवेकी लोकहितकर्त्या **महाराजांस** माझी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं येथें सुचविलेले फेरफार केल्यानें अधिक इष्ट परिणाम होतात कीं नाहीं याविषयीं निदान योग्य प्रयोग तरी करून पहावे. चालू विद्यादानपद्धतीचे जे ब्राह्मणांवर तेच सर्व इतर जातींवरही दुष्परिणाम घडत आहेत; त्यांचें प्रमाण मात्र भिन्न जातींच्या विद्येविषयींच्या ओढीच्या प्रमाणावर अवलंबून राहतें. ही गोष्ट पुस्तकांत पुष्कळ ठिकाणीं दाखविलेली आहे. याकरितां शिक्षणपद्धति सुधारण्याचें काम सर्वांचेंच आहे व सर्व ठिकाणचे **विद्याधिकारी** व स्वतंत्र **राज्यकर्ते** या महत्वाच्या बाबतींत आपलें लक्ष घालतील अशी आशा आहे.

कदाचित् कोणी येथें असा प्रश्न करील कीं पुस्तक वाचतांना ब्राह्मण म्हणजे कोण समजावे व अन्यजातीय कोण समजावे. या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. तथापि साधारणपणें ब्राह्मण हा शब्द सर्व पांढरपेशे लोकांचा थोडक्यांत उल्लेख व्हावा म्हणून योजिला आहे. देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे आणि सारस्वत ब्राह्मण, कायस्थ आणि पाठारे परभू व ज्या दुसऱ्या शुद्ध विद्याव्यासंगी जाती असतील, त्या सर्वांचा ब्राह्मण या शब्दांत समाहार केलेला आहे असें समजून पुस्तक वाचावें.

आतां कित्येक सुज्ञ वाचकांस कांहीं ठिकाणची भाषा फार कडक वाटेल; परंतु हा ग्रंथ जर केवळ सुज्ञ विचारी वाचकांच्याच हातीं देण्याची इच्छा असती तर तो फार संक्षेपानें लिहितां आला असता. परंतु पुष्कळ वाचकांच्या सामान्य बुद्धीवर घणाचें घाव मारावे तेव्हां तींत कोठें थोडें ज्ञान शिरतें, व अशाकरितां कडक व पाल्हाळीक लिहिणें भाग आहे. या अवांतर वाचक मंडळीच्या स्वभावांत इतके भिन्न प्रकार आहेत कीं त्यांची कल्पना आणून देण्यास कोणकोणत्या उपमा द्याव्या हें समजत नाहीं. कांहीं शुद्ध अजगरवृत्ति आहेत, त्यांस स्वतःच्या हिताची गोष्ट ऐकून घेण्याचाही कंटाळा असतो, मग ते ऐकून, ध्यानांत ठेवून विचार कशाचे करितात ! कांहींचें चैतन्य इतकें लुप्त झालेलें आहे कीं त्यांस जागजागीं टोंचतां टोंचतां क्वचित् थोडी हालचाल होते व त्यांस धुगधुगी आहे असें ध्यानांत येतें. उलट, कांहीं **पेनीलोप** राणीच्या पाणिग्रहणार्थ जमलेल्या राजपुत्रांप्रमाणें घमेंडानंदन आहेत. त्यांस या भरतभूमीनें मिजासीनें वागवून, त्यांच्या अप्रयोजक हेतूंचा भंग न करितां मोठ्या खुबींत ठेविलें पाहिजे. त्यांचा अविचार, त्यांचीं नीच कृत्यें, त्यांचें औद्धत्य, त्यांचा अप्रामाणिकपणा व त्यांचा भेकडपणा यांपैकीं कोणा एकाचेंहि आविष्करण केल्यास ते तत्काळ भरतभूमीचे प्रचंड शत्रु होण्याचा आंव घालतात. कोणास अशी मिजास व प्रसिद्धि नको असते खरी; परंतु ते दुसऱ्याच्या आश्रयानें कृष्णसर्पाप्रमाणें राहिलेले असतात व त्यांच्या शेपटीवर पाय पडतांच ते फों फों करीत बाहेर पडून जो पुढें दिसेल त्याचा चावा

घेतात. परंतु सर्वांत अधिक संख्या ह्मटली ह्मणजे अजागळांची आहे. पोटाकरितां ते आर्जवाचें तोंड दाखवून स्ववृत्तीच्या अतिनिंद्य प्रकारांचेंही अवलंबन करितील; परंतु घरीं आल्यावर लागलींच चेहेरा बदलून आपल्या स्ववृत्तीकरितां अन्नोदक देणाऱ्या धन्यांची जो यथेच्छ निंदा करील त्यास ते गुरु करितात; करमणुकीच्या वेळीं व वरच्या घरीं बहुमताचा अंदाज करण्याच्या वेळीं, गुरूस त्यांचें पाठबळ मिळतें. याप्रमाणें हा अवांतर ब्राह्मण समाज बहुरूप आहे. तो अहंकाराच्या किल्ल्यांत, उपोषित पण सुरक्षित, बसलेला आहे. त्यास सावध करण्यास भयंकर तोफखाना सुरू केला पाहिजे, व या दृष्टीनें पाहतां या ग्रंथांतील कडक वाटणारे लेख अगदींच निरुपयोगी होतील अशी मला भीति वाटते, व मजहून फार सामर्थ्यवान् गोलंदाजांनीं हे लेख लिहिण्याचें हातीं घ्यावयास पाहिजे होतें; तथापि अशा बलाढ्य पुरुषांनीं त्वरित हें काम हातीं घ्यावें, असा त्यांस या ग्रंथावरून नुसता इषारा मिळाला तरी पुष्कळ काम होईल.

एका विचारी मित्रानें हा ग्रंथ लिहीत असतांच तो वाचून पाहिला, तेव्हां तो ह्मणाला: "अहो, हें सर्व खरें आहे; सगळ्यांच्या अनुभवासही येईल, परंतु त्यापासून कांहीं फायदा होईल ह्मणून तुह्मांस वाटतें काय! मला वाटतें फायदा व्हायचा लांबच राहिला, परंतु स्वतःवर कडक टीका करून घेण्याचा मात्र हा तुमचा प्रयत्न झाला!" कदाचित् हें त्याचें भविष्य खरें ठरेल. कारण, मला वाटतें आधुनिक सुशिक्षितांस ग्रंथाच्या द्वारें **अप्रिय** परंतु **पथ्य** सांगण्याचा फारा वर्षांनीं हा पहिलाच प्रयत्न आहे. **निबंधमालाकारांनीं** पुष्कळ ब्राह्मण तरुणांच्या विचारांस जी पद्धत कांहीं वर्षांपूर्वी एकदा लावून दिली तीमुळें, (ब्राह्मणांत कांहीं दोष आहेत असें परस्थ लोक खुशाल समजोत,) स्वतः ब्राह्मण आपणांत कांहीं दोष असतील असें मनांत आणण्यास देखील नाकबूल झालें आहेत; परंतु अशा तरुणांसच त्यांच्या चालू वर्तनामुळें पुढें जी निश्चितपणें विपत्ति येणार तिचें चित्र हुबेहुब दाखविण्याच्या हेतूनें हा ग्रंथ लिहिला आहे. या चित्रांतील कोणते भाग ते खोडून टाकितात व कोणत्या सयुक्तिक प्रमाणांनीं टाकतात हें मला कळल्यास त्यापासून समाधानच वाटेल. कारण ब्राह्मणांचा चालू क्रम पुढेंही सुरू राहिल्यास मला तरी त्यांची धडगत दिसत नाहीं; भावी विपत्तीचें स्वरूप डोळ्यापुढें येऊन ग्रंथ लिहीत असतां अंगावर वारंवार शहारे यावे, डोळ्यांस टिपें यावीं व मनास विलक्षण ग्लानि यावी. जर कोणी कडक टीका करणारा, **ब्राह्मण जातीच्या चालू क्रमाचें पर्यवसान सुंदर व सर्वथैव इष्ट असें होणार**, असें सिद्ध करून देईल तर त्याचे मी आभारच मानीन.

असो; ब्राह्मण ह्मणून, शिक्षक ह्मणून, पालक ह्मणून, जें जें माझ्या अनुभवास आलें व त्यापैकीं जें जें विशेष सांगण्यासारखें वाटलें, तें तें खऱ्या कळवळ्यानें व शुद्ध सात्विक भावानें आपल्या ब्राह्मण व अन्यजातीय सर्व बांधवांस येथें सादर केलेलें

आहे. त्यांचा सर्वांनींच स्वीकार करावा. कदाचित् ब्राह्मण बांधवांपेक्षां अन्यजातीय बांधवांस ही सेवा लौकर मान्य होईल; व जर त्यांस ती पूर्ण हितावह झाली तर मला साऱ्याच संतोष होईल. तथापि येथें ऐवढें सांगणें अवश्य आहे कीं **डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा** एक मेंबर या नात्यानें मीं हा ग्रंथ प्रसिद्ध केलेला नाहीं; व सोसायटीच्या इतर सभासदांस या ग्रंथांतील मतें कितपत मान्य होतील हें मला मुळींच सांगतां येत नाहीं. सबब टीका करणारांनीं ग्रंथांतील मतांबद्दल मला स्वतःला जबाबदार धरावें, इतरांस धरूं नये.

हें पुस्तक जसें लवकर लिहून झालें तसें छापून होण्याची मुष्किल होती. परंतु आरंभापासून **आर्यभूषण** छापखान्याचे मालक, रा० ह० ना० गोखले, यांची मदत म्हणून, व अखेरीस वाढल्या मजकुरापुरती **निर्णयसागर** छापखान्याच्या मालकांची शिवाय मदत म्हणून. हें पुस्तक इतक्या लवकर बाहेर पडलें. या उभयतांचाही मी आभारी आहें.

पुणें, फर्ग्युसन कालेज
ता० २३ नोवेंबर १८९५.

म० शि० गोळे.



अनुक्रमणिका.

भाग		पृष्ठ
१.	विद्यार्थ्यांच्या शरीराचा ऱ्हास.	१
२.	विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींचा ऱ्हास.	१०
३.	सांप्रतच्या शिक्षणक्रमाचें स्वरूप.	१९
४.	अभ्यासाचा, शिक्षणाचा व विश्रांतीचा काळ.	४३
५.	व्यायाम.	६३
६.	ब्राह्मण विद्यार्थी आणि युनिव्हर्सिटी.	७८
७.	शारीरिक आणि मानसिक ऱ्हासाविषयीं आणखी थोडा विचार.	९८
८.	ब्राह्मण समाजाची वृद्धावस्था.	१११
९.	शरीरसामर्थ्याचें महत्व.	१३२
१०.	ब्राह्मणांच्या कर्तव्यांचें दिग्दर्शन.	१४६
११.	नवीन शिक्षणक्रमाचे हेतु व दिशा.	१६८
१२.	नवीन शिक्षणपद्धति.	१९७
१३.	विशेष कर्तव्यांविषयीं सूचना.	२३७

रां/ति ~ ३

ब्राह्मण विद्यार्थी, व त्यांचे शिक्षक आणि पालक.

भाग १ ला.

विद्यार्थ्यांच्या शरीराचा ऱ्हास.

१. हल्लीं जी पिढी चाळीस पंचेचाळिशीच्या सुमारास येऊन ठेपली आहे तिजमध्यें व जी पंचविशीच्या किंवा तिशीच्या बेतास आली आहे तिजमध्यें महदंतर दिसतें; व जी पिढी हिच्याही मागून येत आहे तिजमध्यें व पूर्वीच्या पिढीमध्यें फारच ढळढळीत अंतर पडत चाललें आहे. हें अंतर शरीराच्या वृद्धींत, शरीरसामर्थ्यांत व शीतवातादिकांच्या सहनक्षमतेंत विशेषेंकरून आढळतें. कालेजांत व शाळांच्या वरच्या वर्गांवर ज्यांनीं अठरा वीस वर्षें काम केलेलें आहे त्यांनीं विद्यार्थ्यांच्या शरीरस्थितीकडे अल्पही लक्ष दिलेलें असल्यास ते पुढील कित्येक गोष्टींची साक्ष देतील. तसेंच ज्या कुटुंबांत दहा दहा वर्षांच्या अंतराच्या पिढीचीं माणसें आहेत त्या कुटुंबांच्या अवलोकनानेंही या गोष्टींचा प्रत्यय येईल. पुरुषाची वाढ सरासरीनें वीस वर्षेंपर्यंत चालू असते; या वीस वर्षांच्या वयाच्या कांहीं एका भागांत ती अधिक असते, कांहींत ती मंद असते व व्यक्तिपरत्वें हे भाग भिन्न असतात. गेल्या वीस वर्षांपूर्वी या सामान्य नियमाअन्वयें मुलांची वाढ होत होती. परंतु हल्लीं साधारणपणें असें दिसतें कीं मुलांची वाढ सरासरीनें सोळावे वर्षींच खुंटते. वाढ खुंटण्याच्या वयाची इयत्ता गेल्या वीस वर्षांत उतरत उतरत आली आहे, व तिचे परिणाम प्रत्येक कुटुंबांत दृष्टीस पडत आहेत. चौदावे किंवा सोळावे वर्षीं वाढ खुंटणें या शब्दांचा अर्थ असा समजायाचा कीं त्या वयापुढील वर्षांत जी वाढ व्हावयाची ती मुळींच होण्याची राहिली व त्या मानानें मनुष्याचें शरीर लहानचें लहान राहिलें.

२. वाढ अकालीं खुंटल्यामुळें शरीराच्या पोषणावर जे परिणाम झाले आहेत ते असे कीं मुलें खुजीं होत चाललीं आहेत, तीं आपल्या मातापितरांच्या उंचीस येऊन मिळत नाहींत. शरीराच्या उंचीसंबंधीं जी ही गोष्ट सांगितली तीच

रुंदीसंबंधींही लागू आहे. छातीच्या घेराच्या संबंधानें पाहिलें असतां नवी पिढी पूर्वीच्या पिढीहून फार हीन दिसते. कुटुंबांत वारंवार असें दिसतें कीं कोठें बाप उंच व आई ठेंगणी परंतु जाड बांध्याची, कोठें याच्याविरुद्ध, व कोठें कोठें मात्र उभयतांही समसमान आकाराचीं. अशा मातापितरांपासून जी संतति होते ती क्वचित् बापाच्या वळणावर जाते, क्वचित् आईच्या वळणावर जाते, परंतु जर संततीची पुरी वाढ झाली तर उंचीनें किंवा रुंदीनें किंवा स्नायूंच्या सामर्थ्यानें ती मातापितरांहून कमी प्रतीची असत नाहीं. परंतु गेल्या दहा पंधरा वर्षांपासून ब्राह्मणजातींत अशी पुरी वाढ होईनाशी झाली आहे. **मातापितरांची उंची आणि रुंदी, यांपैकीं निदान एक तरी संततीस प्राप्त व्हावी तशी होत नाहीं व स्नायुसामर्थ्यानें संततीचा कमीपणा उघड उघड दिसतो.**

३. या खुरट्या वाढीचे दुसरे अनेक भयंकर परिणाम घडत आहेत. मोठ्यानें क्षणक्षणांत आवाजानें बोलण्याची शक्ति बहुतांशीं छातीच्या वाढीवर अवलंबून असते. छाती कोंवळी राहिल्यानें हल्लीं पुष्कळ तरुण मुलांस व गृहस्थांस सारखें दहा पंधरा मिनिटें मोठ्यानें बोलतां किंवा वाचतां येत नाहीं; तसेंच जें काम करण्यास बराच वेळ धिम्मेपणानें शक्तीचा उपयोग करावा लागतो तें काम त्यांच्यानें होत नाहीं. दहा पांच शब्दही आरडून सांगण्यास किंवा एखादी धांव मारण्यास किती तयारी लागते व मनाचा किती निरुत्साह असतो हें पाहिल्यास या गोष्टींचा प्रत्यय येईल.

अल्पवयांत कोंवळेपणीं शरीराची वाढ अपुरी राहिल्यामुळें अवयवांस जें दार्ढ्य यावें तें येत नाहीं, व त्यामुळें स्वतःच्या आचरणांत किंवा सृष्टीच्या बाह्यस्थितींत थोडाही फरक होतांच शारीरिक क्रियांच्या समतोलनास धक्का बसून प्रकृति नादुरुस्त होते. परीक्षेच्या अभ्यासाचा कांच थोडा अधिक झाला म्हणून, एकादे दिवशीं अन्न किंवा पाणी अधिक झालें म्हणून, हवा थोडी अधिक सर्द किंवा उष्ण झाली म्हणून, कोठें थोडा वेळ अधिक जोराचा वारा अंगास लागला म्हणून, अजारी पडणाऱ्या विद्यार्थ्यांची व तरुण गृहस्थांची संख्या पाहिल्यास या गोष्टीचा अनुभव येईल. डाक्तरांच्या येथें औषध घेणारांचे वृद्ध व तरुण असे दोन भाग केल्यास तरुणांचीच संख्या दिवसानुदिवस वाढत आहे असें आढळतें. पुष्कळ कुटुंबांत वृद्ध माणसांस तरुणांच्या औषधपाण्याची खस्त सोसावी लागत आहे, व त्यांस स्वतःपेक्षां तरुणांच्याच आरोग्याविषयीं अधिक काळजी वहावी लागत आहे. अल्पायुष व अकालमृत्यु यांसंबंधानें विद्वान् ब्राह्मणांची जी ख्याति होत आहे तिचें बीज हेंच आहे.

या अपुऱ्या वाढीचे परिणाम पुढें तरुणांपासून होणाऱ्या संततीवर घडून येऊं लागले आहेत. त्यांच्या संततीस तान्हेपणांतून पार पडून चालत्यावस्थेस येऊन

पोहोंचत असतां वाटेंत किती जिवापाड विघ्नें येतात हें बापडया आईस व डाक्तरांसच माहीत, व सरासरीनें पाहतां तान्हेपणांतून पार पडणारांचें प्रमाण पूर्वीपेक्षां बरेंच कमी झालें आहे. ही गोष्ट डाक्तरांच्या अनुभवावरून घेतलेली आहे, व जर कोणी उद्योगी पुरुष कांहीं कुटुंबें घेऊन त्यांत एका मागच्या एक तीन पिढ्यांत निपजलेल्या व त्यांमधून वाचलेल्या व्यक्तींचें सरासरी प्रमाण काढील तर त्यास या गोष्टीचा अनुभव येईल.

याप्रमाणें वास्तविक स्थिति आहे असें बहुधा सर्व विचारी व अवलोकनशील मनुष्यांस कबूल करावें लागेल; व निबंधाचा ओघ जसजसा पुढें जाईल तसतशी अधिकाधिक प्रत्यंतरें वाचकांच्या लक्षांत येतील. आतां ही स्थिति ज्यांच्या आधींच लक्षांत आलेली आहे ते तिचीं कोणतीं कारणें सांगतात व तीं दूर करण्याचे कोणते उपाय सुचवितात हें पाहूं.

शारीरिक ऱ्हासाचीं वरवर दिसणारीं कारणें.

४. बहुतेक शिक्षकांच्या मतें शारीरिक ऱ्हासाचें मुख्य कारण दारिद्र्य हें आहे; मुलांस पुरतें खायला मिळत नाहीं व परीक्षेची मजल केव्हां मारूं व एकदांचे स्वतः पोट केव्हां भरायास लागूं ही विवंचना त्यांच्या मागें निरंतर लागलेली असते. या प्रकारचे त्यांनीं दिलेले अभिप्राय त्यांच्या रिपोर्टांत, व्याख्यानांत व लेखांत पुष्कळ ठिकाणीं सांपडतील. डाक्तरांच्या मतें ऱ्हासाचें मुख्य कारण मुलांस व्यायाम नाहीं हें आहे. सुधारकांच्या मतें हिंदुसमाजांतील बालविवाहादि रूढि या ऱ्हासाचीं कारणें होत. व कित्येक जुनाट माणसें मात्र असें ह्मणत आहेत कीं अभ्यास फार वाढला, अभ्यासाखालीं मुलांचें पीठ पडत आहे. याशिवाय दुसरीं कित्येक मतें आहेत; परंतु तीं येथें देण्यासारखीं सयुक्तिक नाहींत.

(अ) प्रथमदृश्या शिक्षकांचें मत खरें दिसतें व हल्लीं विद्याखात्यानेंही त्याचा अंगीकार केला आहे; परंतु हें मत अगदीं पोकळ आहे. कारण असें पहा कीं **शारीरिक ऱ्हास केवळ गरीब विद्यार्थ्यांमध्यें मात्र दिसतो असें नाहीं, तो सर्वत्र आढळतो**. शिवाय जीं चार मुलें सारख्याच गृहस्थितींत वाढलीं आहेत त्यांत उत्तरोत्तर पिढीच्या मानानें ऱ्हासाचें मान अधिकाधिक झालेलें दिसतें. ज्या हिंदु जातींत हा ऱ्हास फारसा दिसत नाहीं त्या वाणी, उदमी, व्यापारी, कारखानदार, मजूर यांच्या होत; व सामान्यतः असें ह्मटल्यास चालेल कीं शाळांतील शिक्षणाचा ज्या मानानें मनुष्यास गंध कमी त्या मानानें त्याच्या शरीराचाही ऱ्हास कमी. विशेष अवलोकन केलें असतां असें दिसून येतें कीं अत्यंत गरीबांपेक्षां सामान्य सुखवस्तु लोकांच्या मुलांमध्यें हा ऱ्हास अधिक वेगानें चालला आहे. जीं मुलें माधुकरी मागतात तीं जितकीं बळकट व वाढ-

लेलीं असतात तितकीं ज्यांच्या घरीं तीं माधुकरी मागतात त्यांचीं मुलें बहुधा नसतात. लोकांच्या येथें काम करून, शिकवून, वार लावून जीं मुलें अभ्यास करीत आहेत तीं इतरांपेक्षां वाढीनें कमी नाहींत. सरदारघराण्यांतील मुलें व पिढीजात श्रीमंतांचीं मुलें, तशींच डाक्तर, एंजिनीअर, वकील, शिक्षक, व सामान्य आणि वरिष्ट सरकारी आफिसर यांचीं मुलें, या सर्वांमध्यें शारीरिक ऱ्हास सारख्या वेगानें सुरू आहे. ज्या घराण्यांतील धिप्पाड पुरुष आज आपल्या नजरेपुढें आहेत त्याच घराण्याच्या नवीन प्रजेंत वाढीचें चिन्ह नाहीं किंवा शरीरसामर्थ्य नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. आतां एकाच कुटुंबांत ऱ्हासाचें प्रमाण कसें असतें तें पहा. कुटुंब श्रीमंत असो वा गरीब असो, त्यांतील पुरुष पाहिल्यास जे सुमारें वीस वर्षांपूर्वी विद्येच्या क्रमांतून सुटले ते बहुधा पुऱ्या वाढीचे आहेत असें दिसेल. त्यांच्या मागून त्यांचेच सख्खे बंधु दोन तीन, दोन तीन वर्षांच्या अंतरानें विद्याव्यासंगांतून सुटलेले असल्यास ते शरीरानें कमी कमी होत गेलेले दिसतील. शंभर कुटुंबांपैकीं निदान पंचाण्णव कुटुंबांत असें दिसून येईल कीं दोन किंवा चार सख्ख्या भावांपैकीं जो वयपरत्वें मागून विद्याभ्यासास लागला तो शरीराच्या मानानें अधिकच खालावला. या नियमास अपवाद थोडेंच आहेत, परंतु ते कित्येक प्रसंगीं या नियमाचेंच पुष्टीकरण करितात. उदाहरणार्थ, पांच भावांपैकीं एकादा मंद किंवा स्वैर वृत्तीचा निघतो. त्याची शाळा लवकरच सुटते व तो पुढें शरीरानें चांगला बळावतो. खेडयापाडयांत राहणें भाग पडल्यामुळें कोणी एखादा बंधु कांहीं वर्षें शाळेस मुकतो; तो शरीरानें सहजगत्या वाढतो; इत्यादि.*

याप्रमाणें एकाच कुटुंबांतील, एकाच मातापितरांचीं चार मुलें भिन्न प्रमाणानें वाढलेलीं दिसतात; जो मागून येतो तो पूर्वीच्यासच बरा ह्मणवितो, अशी हल्लीं स्थिति झाली आहे. तीवरून जो सिद्धांत निघतो तो हा कीं ऱ्हासाचें जें कोणतें कारण असेल तें वर्षानुवर्ष बळावत आहे. तें कारण दारिद्र्य नव्हे किंवा मानसिक विवंचना हें नव्हे, असें वरील प्रमाणांवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

(ब) व्यायामाच्या अभावाविषयीं डाक्तर लोकांचें जें मत आहे तें कांहीं अंशीं खरें आहे; परंतु डाक्तर लोकांनींही या बाबतींत फारसा विचार केल्याचें, किंवा आपले विचार प्रसिद्ध केल्याचें, किंवा आपल्या कुटुंबांत ते अमलांत आणल्याचें नजरेस येत नाहीं. मानसिक श्रम किती असावे, शारीरिक श्रम किती असावे, मानसिक व शारीरिक विश्रांतीस किती वेळ द्यावा, वगैरे गोष्टींविषयीं डाक्तरांचें निश्चित मत आहे असें मुळींच दिसत नाहीं, व जेथें विद्येच्या संस्थांस डाक्तर लोक जोडलेले आहेत तेथें त्यांनीं शारीरशास्त्रदृष्ट्या शिक्षणाच्या काळाचें

---

* पूर्वीच्या पिढींतील बंधुवर्गाचा वाढ पाहिल्यास, पहिला सर्वांत जाड, दुसरा सर्वांत उंच, व तिसरा, चवथा, वगैरे मध्यम वाढीचे असें पुष्कळ ठिकाणीं आढळतें,

नियमन अमुक प्रकारें केलें पाहिजे असा शिक्षकांस सल्ला दिल्याचेंही आढळत नाहीं. असो; व्यायामासंबंधीं विशेष विवेचन पुढें करणें आहे; सबब हा विषय तूर्त येथेंच थांबवितों.

(क) बालविवाहादि रूढींसंबंधीं पूर्णपणें विचार करणें अप्रासंगिक होईल, सबब प्रस्तुत विषयासंबंधानें विचार करितां या रूढींचा परिणाम काय होतो एवढेंच पाहिलें असतां बस्स आहे. बालविवाहाची चाल ब्राह्मणलोकांत किती दिवसांपासून चालू आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं, तथापि ही चाल निदान गेल्या पांचचारशें वर्षें तरी अप्रतिहत चालू आहे यांत शंका नाहीं. या चालीपासून जे अनिष्ट परिणाम व्हावयाचे ते पूर्णपणें होऊन अंगवळणीं पडून गेल्यास, याच कारणानें, पुष्कळ दिवस झालेले असले पाहिजेत. व अलीकडील पिढ्यांवरच या चालीचे विशेष अनिष्ट परिणाम होण्याचें कारण नाहीं. जेव्हां भाविक वृद्ध लोकांस बालविवाहादि रूढींच्या अनिष्ट परिणामांविषयीं आपण गोष्टी सांगतों, तेव्हां ते साहजिकच आपणांस प्रश्न करितात कीं " आमचीं लहानपणींच लग्नें झालीं नाहींत काय ? व आमच्या पूर्वी आमच्या वाडवडिलांचींही तशींच झालीं नाहींत काय ? आमच्यांत काय उणीव दिसत आहे, व आमच्या वाडवडिलांहून तुम्ही कोणते अधिक पराक्रम केले आहेत ? त्या त्या काळच्या विद्येप्रमाणें तेही विद्वान् होते, व तेव्हांच्या दशग्रंथ्यांइतकें पारायण इंग्रजींत तरी केलेले हल्लीं कितीक लोक सांपडतील ? त्यांच्या शरीरसामर्थ्याच्या व वार्धक्यांतील प्रवासांच्या त्या काळच्या गोष्टी सांगितल्यास तुम्हांस खऱ्याही वाटणार नाहींत. " हें वृद्धांचें म्हणणें अक्षरशः खरें आहे व सांप्रतच्या शारीरिक ऱ्हासाचें कारण केवळ बालविवाहादि रूढी आहेत असें म्हणणें अप्रयोजक दिसतें. **प्रत्येकाची वाढ पूर्वीप्रमाणें स्वतःच्या मातापितरांइतकी कां असूं नये या गोष्टीचीं कारणें जीं कोणतीं असतील त्यांचा पूर्वीच्या पिढ्यांत अभाव किंवा कमजोर व हल्लींच्या पिढींत प्रादुर्भाव किंवा प्राबल्य असलें पाहिजे.** हा नियम प्रस्तुत विषयासंबंधानें पाहतां बालविवाह व अशाच प्रकारच्या दुसऱ्या चाली (मांसाशनापासून निवृत्ति, वगैरे) यांस लागू पडत नाहीं.

५. बालविवाहास जेव्हां आपण दूषण देतों तेव्हां आपण वास्तविकपणें जी मुख्य गोष्ट प्रतिपादन करितों ती ही कीं जोंवर स्त्रीपुरुषांची पूर्ण वाढ झाली नाहीं तोंवर त्यांचा संयोग होऊं नये. पुरुषाची वाढ विसावे वर्षीं पुरी होते, परंतु त्याच्या स्नायूंस पूर्णपणें दाढर्य येण्यास आणखी पांच वर्षें लागतात. स्त्रियांची वाढ सोळावे वर्षीं पुरी होते, परंतु सर्व स्नायूंस पूर्णावस्था येण्यास त्यांसही पुढं तीन चार वर्षें लागतात. या प्रकारच्या पूर्ण वाढीच्या स्त्रीपुरुषांचा समागम हितकारी व उत्तम संततीस कारण होतो असा बालविवाहनिषेधकांच्या म्हणण्याचा अर्थ असतो; व हें त्यांचें म्हणणें अगदीं खरें व निरपवाद आहे. आतां शरीर

व स्नायू यांच्या पूर्णावस्थेनंतर स्त्रीपुरुषांचा समागम होणें हा अत्युत्तम मार्ग होय; तसेंच स्त्रीपुरुषें अत्यंत कोंवळीं आहेत तोंच त्यांचा समागम होणें हा अत्यंत निंद्य मार्ग होय. या निंद्य मार्गापासून जितकें दूर जाववेल व उत्तम मार्गाची जितकी अधिक प्राप्ति होईल तितकें झटणें हें सर्वांचें आद्य कर्तव्य आहे यांत संशय नाहीं. परंतु बालविवाहाच्या प्रतिषेधानें हा उद्दिष्ट हेतु कितपत साध्य होतो हा प्रश्न पुनः राहिलाच.

बालविवाहाच्या रूढीमुळें ब्राह्मण जातीचें मागील पिढ्यांत जेवढें नुकसान झालें पाहिजे होतें तितकें किंवा त्याचा दशांशही झालेलें दिसत नाहीं, ही गोष्ट मान्य करणें भाग पडतें, व यासंबंधानें कारणें शोधतां दोन गोष्टी मुख्यत्वेंकरून लक्षांत येतात. एक ही कीं शरीराच्या वाढीस अनुकूल असे श्रम आतांपेक्षां पूर्वी स्त्रियांस अधिक पडत असत. गरीबगुरीबांच्या घरांत दळण, कांडण, पाणी भरणें, धोतरें धुणें, वगैरे कामांचा सर्व भार स्त्रियांवर असे, व तो मुख्यत्वेंकरून सुनांवर. पूर्वीच्या ब्राह्मणांच्या सोंवळ्याओंवळ्याच्या विशेष चिकित्सकतेमुळें जीं कामें हल्लीं मोलानें केलीं जातात तीं सामान्य श्रीमंताच्या घरांतही स्त्रिया करीत असत. गेल्या पंधरावीस वर्षांपूर्वी कोणी पाहिलें असतें तर हातांत गोठतोडे व अंगावर ठळक डागिने असलेल्या अनेक ब्राह्मणस्त्रिया हौदावरून घागरकळशी भरून घेऊन येतांना सकाळसंध्याकाळ दिसल्या असत्या; मोठमोठ्या प्रयोजनांत वाढण्याचें काम स्त्रिया हौसेनें आपणांकडे घेतांना दिसल्या असत्या. अल्पवयाच्या स्त्रियांचे खेळही सर्व धांगडधिंग्याचे (म्हणजे व्यायामाचे) होते; व वृद्धांच्या दक्षतेमुळें व स्त्रियांच्या अज्ञानामुळें त्यांचीं मनें मोठ्या वयापर्यंत शुद्ध व विकारहीन रहात होतीं. अल्पवयस्क स्त्रीपुरुषांची नजरानजरही होणें वृद्धांस खपत नसे. सासूच्यामागें खालीं मान घालून चालणें, तिच्या सहवासानें निजणें बसणें, वगैरे अनेक निर्बंधांखालीं मुली वाढत होत्या. त्यामुळें सासुरवास कसा तो जाणवत होता, व मग माहेरवास अंगीं लागत होता. अशा काळीं रजोदर्शनाचें वयही बरेंच प्रौढ असे, व ही गोष्ट कोणीही आपापल्या घरीं वृद्धमाणसांस विचारल्यास सिद्ध होणारी आहे. पुरुषांवर त्या वेळीं अशाच प्रकारचे बरेच निर्बंध होते असें विचार करतां ध्यानांत येतें.

बाळपणीं विवाह झाल्यानें जे अनिष्ट परिणाम व्हावयाचे त्यांचा या कारणांनीं बहुतेक अंशीं प्रतीकार होत असावा, हें पूर्वीचीं माणसें पाहूनच सिद्ध होतें. आतां सांप्रतची स्थिति पाहूं. सासुरवास व माहेरवास यांमध्यें फारसा फरक राहिला नाहीं असें सामान्यतः दिसतें. अगदीं अल्पप्राप्तीच्या कुटुंबांतही दळण, कांडण, भांडीं घासणें हें मोलानें केलें जातें. पाणी भरणें व धोतरें लुगडीं धुणें हें गरीब कुटुंबांत मात्र स्त्रियांकडे अद्याप चालत आहे. उद्योगधंदा व नौकरी यांसंबंधानें कुटुंबें विभागून लवकर स्वतंत्र होतात, व वृद्धांचा त्यांवर दाब राहिलेला नसतो.

सागरगोटे व फुगड्याझिम्मा जाऊन हल्लीं लहान मुलें व मुलीं यांमध्यें पत्त्यांच्या डावाचा किती प्रवेश झाला आहे, गळपट्टे विणण्याचें काम किती ठिकाणीं सुरू आहे, हें पाहिल्यास, पूर्वीचे व्यायामरूप खेळही लुप्त होत आहेत असें दिसून येतें. तसेंच देवास जाणें, प्रदक्षिणा घालणें वगैरे व्यायामरूप धर्मही बंद पडत आहेत. मुलांच्या शाळांचें पुढें वर्णन येणारच आहे, तेंच वर्णन मुलींच्या शाळांसही सर्व प्रकारें लागतें; व त्यावरून लक्षांत येईल कीं तेथील शिक्षणपद्धतीचे मुलींच्या शरीरांवर व मनांवर सारखेच अनिष्ट परिणाम घडतात; व मुलांप्रमाणेंच मुलींच्या बाल्यावस्थेचा काळ शरीराच्या पोषणास व सुदृढतेस निरुपयोगी होईल अशा रीतीनें जातो. त्यांची अल्पविद्या घरचे प्रतिबंध दूर झाल्यानें केव्हां केव्हां अकालीं दुर्विकारांस कारणीभूत होते, व कुटुंबांत तिजमुळें आळसाचें बीज शिरतें, असें अनुभवानें दिसून येईल. याच जातीच्या आणखी पुष्कळ अनिष्ट गोष्टी ब्राह्मणांच्या घरांत शिरलेल्या आहेत, परंतु त्या सर्व येथें सांगण्याची गरज नाहीं. कोणाही शोधक माणसाच्या त्या सहज लक्षांत येण्यासारख्या आहेत.

प्रौढ वयांत स्त्रीपुरुषांचा समागम होणें फार इष्ट आहे, कारण त्या वयांत उभयतांच्या शरीराची वाढ पुरी झालेली असते. परंतु ही शरीराची वाढ पुरी होण्यास बाल्यावस्थेंत शरीरास कांहीं एका इयत्तेपर्यंत नित्य शारीरिक श्रम झाले पाहिजेत, व मनास अविचाराचा किंवा अयोग्य मनोवृत्तींचा स्पर्श होतां कामा नये. जर शरीरास आवश्यक श्रम न होतील तर अल्पवयांतच शरीराची वाढ खुंटेल, प्रौढ वयांतील मनोविकार अल्पवयांतच प्रादुर्भाव पावतील, व अशा स्त्रीपुरुषांचा समागम अल्पवयांत झाला किंवा प्रौढवयांत झाला तथापि सारखेच अनिष्ट परिणाम घडतील. पत्ते खेळण्यांत, नाव्हलें वाचण्यांत, गळपट्टे विणण्यांत, शिवणकाम करण्यांत व बसल्या बसल्या लहान मुलें खेळविण्यांत किंवा अशाच दुसऱ्या विनाश्रमाच्या कामांत स्त्रिया बारा वर्षांच्या झाल्या काय किंवा वीस वर्षांच्या झाल्या काय, त्यांचीं शरीरें खुरटीं व्हावयाचींच, त्यांस अल्पवयांत वृद्धत्व यावयाचेंच; व तारुण्याची कांति सरासरी वीस बावीस वर्षांचे सुमारास नाहींशी होऊन तोंडावर पांढुरकेपणा, गाल बसलेले, डोक्यास बहुधा थोडें तरी टक्कल, डोळ्यांत पाणी नाहीं, मुलास दूध नाहीं, अशी त्यांची सामान्यतः स्थिति व्हावयाचीच. हा प्रकार नवीन चालीनें वागणाऱ्या बहुतेक कुटुंबांत हल्लीं दिसूं लागला आहे. बालविवाह किंवा प्रौढविवाह यांचा या स्थितीशीं प्रत्यक्ष किंवा परोक्ष संबंध दिसत नाहीं.

स्त्रियांची वाढ अपुरी राहण्याचें एक कारण व्यायामाचा अभाव हें होय, तें सर्व कुटुंबांत असतेंच असें नाहीं; परंतु याहून प्रबळ दुसरें जें कारण आहे त्याची व्यापकता मोठी आहे. तें आतां सांगतों.

६. मुलांच्या वाढीच्या खुरटेपणाविषयीं सामान्य स्थिति पूर्वी सांगितलीच. आतां ज्या गृहस्थांस मुलींचीं लग्नें करावयाचीं असतात त्यांस अनेक प्रकारचे विचार करावे लागतात. तूर्तच्या काळीं सामान्य स्थितींतील कुटुंबवत्सल मनुष्यास मुलीचें लग्न फार झालें तर रजोदर्शनाच्या काळापर्यंत लांबवितां येतें. परंतु घरच्या स्थितीमुळें याप्रमाणें विवाहकाळ लांबविण्याचा चांगलाच परिणाम घडतो असें नाहीं; कारण मुलीस स्वतःस एक प्रकारची काळजी लागून तिच्या साहजिक वाढीस धक्का बसतो; तसेंच मुलगी एवढी वाढल्यानंतर तिला योग्य वर शोधण्याचें काम अधिक अवघड होतें; व प्रसंगीं जेथें जुळेल तेथें मुलीस ढकलून द्यावी असा प्रकार घडतो. ब्राह्मण कुटुंबांत मुलींच्या विवाहकालासंबंधानें स्त्रीपुरुषांचें किंवा वृद्धतरुणांचें अद्याप एकमत नाहीं. त्या उभयतांमध्यें विवाहापूर्वी जो वादविवाद चालतो, तो प्रत्यहीं ऐकून मुलीचा अल्लडपणा नाहींसा होत जातो व तीस अकालीं प्रौढ विचारांची स्फूर्ति होते. मातापितरांच्या दोषानें असें जरी क्वचित् घडलें नाहीं, तरी दुसऱ्या एका गोष्टीपासून असा अनिष्ट परिणाम त्वरित घडतो. ती गोष्ट ही कीं, हल्लीं मुलांच्या विवाहाच्या वयाची अवधि बरीच, म्हणजे सतरा, अठरा किंवा वीस वर्षांपर्यंत वाढली आहे; त्यामुळें आणि त्यांचीं मनें अल्पवयांतच अधिक प्रौढ झाल्यामुळें, त्यांमध्यें भिन्न मनोविकार अकालीं जागृत होतात. तीं बहुधा क्षीण असल्यामुळें किंवा आत्मघातक अशा कांहीं व्यसनास लागल्यामुळें, त्यांस विवाहानंतर मुलीची पुरी वाढ होईपर्यंत ब्रह्मचर्यव्रतानें ठेवणें अशक्य किंवा अपायकारक होतें. या कारणानें विवाहानंतर अल्पकालांतच, विवाहित मुलीच्या सुमारें तेरावे वर्षीं, घरच्या मूर्ख स्त्रियांच्या साह्यानें किंवा आग्रहानें स्त्रीपुरुषांचा समागम होऊं लागतो. या कारणानें द्वितीय विवाह व प्रौढवयांतील पुरुषांचे विवाह यांपासून स्त्रियांच्या वाढीवर झालेले कांहीं कांहीं दुष्ट परिणाम शेंकडा पन्नास घरांत तरी हल्लीं दिसूं लागले आहेत. स्त्रीची वाढ सुमारें तेराव्या वर्षींच अगदीं बंद होणें, तीस मातृत्व येणें, अवयव, विशेषतः पाय, क्षीण होणें, मुलें न जगणें, किंवा तीं अत्यंत आकुंचित आकाराचीं निपजणें आणि क्षीण असणें, आईस किंवा मुलास अपस्मार होणें, बालंतरोग वगैरे रोगांनीं अल्पवयांत मृत्यु येणें, हे त्या दुष्ट परिणामांपैकीं प्रमुख होत.

आतां मुलींचीं आठव्या, नवव्या, किंवा दहाव्या वर्षीं लग्नें झालेलीं व लग्नसमर्थ वरांचें वय बारा, तेरा किंवा चौदा असलेलें,--म्हणजे वधुवरांच्या वयांत सुमारें चार वर्षांचें अंतर आहे-असे पूर्वी झालेले विवाह बरेच पाहण्यांत येतील. हे विवाह बालविवाहाच्या सदराखालीं येतात हें उघड आहे. अशा विवाहानंतर मुलगा सतरा, अठरा किंवा वीस वर्षांचा होईपर्यंत विद्याभ्यासांत गर्क असतो; या अभ्यासांत त्यानें शरीराची काळजी घेऊन तो धष्टपुष्ट

झाला असो किंवा खुरट्या वाढीचा व क्षीण झाला असो, मुलींची वाढ सारखी सुरू राहते, तिचा अल्लडपणा कमी होत नाही व कुटुंब कांहीं थोडें जुन्या चालींचें असल्यास वडिलांचे प्रतिबंधही तिच्या वाढीस व मुग्धावस्थेस पुष्कळ अनुकूल होतात. त्यामुळें रजोदर्शनाचा काळ वर्ष दोन वर्षांनीं पुढें जातो. अशा जोड्यांच्या संयोगानंतर त्यांवर वर सांगितल्या प्रकारचे दुष्ट परिणाम बहुधा घडत नाहींत, कारण स्त्रीची तरी वाढ बरी झालेली असते. कित्येक कुटुंबांत बालविवाहानंतर स्त्रिया झपाट्यानें वाढलेल्या व नवऱ्यापेक्षांही उंच, सदृढ व तेजस्वी असलेल्या पाहण्यांत येतील. अशा स्त्रियांची संतति बहुधा निरोगी असते. कारण गर्भाचें व पुढें संततीचें पोषण हा केवळ मातृधर्म आहे. स्त्रीपुरुषांपैकीं स्त्री जितकी प्रौढ व सशक्त असेल तितकी संतति चांगली असते. परंतु उलट स्थिति घेतल्यास, ह्मणजे पुरुष सशक्त आणि प्रौढ व स्त्रीची बाल्यावस्थाही पुरी झालेली नाहीं–असा प्रकार असल्यास संतति सुदृढ व दीर्घायुषी होण्याचा फारच थोडा संभव असतो. उदाहरणार्थ, स्त्री व पुरुष उभयतांही सोळा सतरा वर्षांचीं असतां जशी संतति होईल, तशी स्त्री तेरा वर्षांची व पुरुष वीस वर्षांचा असतां होणार नाहीं. ही गोष्ट मनांत आणिली असतां, जोंपर्यंत मुलांच्या पुढील वाढीचा, वागणुकीचा किंवा सुस्थितीचा कांहींच नियम सांगवत नाहीं, तोंवर मुलींचीं लग्नें अल्पवयांतच वयाचें अंतर कमी ठेवून करून टाकणें हेंच एकंदरींत अधिक श्रेयस्कर आहे असें दृष्टोत्पत्तीस येतें.

या गोष्टीचें प्रत्यंतर पाहणें झाल्यास उत्तरोत्तर सुधारत गेलेल्या पुष्कळ कुटुंबांत सांपडेल. एकाच घरांत जेथें तीन किंवा चार बंधू आहेत तेथें पहिल्याचा विवाह बहुधा अल्पवयांत झालेला असतो व विवाहकालीं वधू आठ नऊ वर्षांची असते; दुसऱ्याचा विवाह त्याहून प्रौढ वयांत झालेला असतो व वधू दहा अकरा वर्षांची असते; याप्रमाणें उभयतां वधूवरांचें विवाहसमयींचें वय वाढत गेलेलें असतें. अशा कुटुंबांत शरीराच्या वाढीसंबंधानें व सुदृढतेसंबंधानें सर्व जातींचा अनुक्रम लाविल्यास जिचें लग्न अत्यंत मोठ्या वयांत झालें ती सर्वांत खुरटी आहे असें बहुधा आढळेल. तसेंच चार बहिणी उत्तरोत्तर अधिक वयांत लग्न झालेल्या व अधिक वयस्क पुरुषांस दिलेल्या असल्यास त्यांच्या वाढींतही हाच भेद दिसून येईल. विद्येच्या संबंधानें खेडयापाडयांतील मुलें हल्लीं शहरांत राहतात. त्यांपैकीं कांहीं अल्पवयांत विवाह होऊन शहरांत येतात; कांहीं अविवाहित येतात. शहरांत मोठ्या झालेल्या मुलींचे पालक या अविवाहितांस गांठून द्रव्यादिद्वारा लग्नें आटोपून घेतात. शोधक वाचकानें या प्रकारें झालेल्या बाल व प्रौढ विवाहांमध्यें रजोदर्शनाच्या कालाच्या वयांत भेद असतो कीं नाहीं हें पहावें, व त्याचा संततीवर होणारा परिणामही निश्चित करावा. प्रौढ विवाहार्थी फलें अनिष्ट दिसतील. याप्रमाणें सांप्रतची स्थिति आहे, ही गोष्ट पूर्णपणें निर्विवाद

आहे, व ती बहुतेक घरीं हल्लीं दिसते. ह्मणून सद्यः स्थितींत बालविवाहच एकंदरीनें कमी अनिष्ट गणिला पाहिजे. कांहीं स्थित्यंतर झाल्यास कोणत्या रूढीचा काय परिणाम होईल ही गोष्ट निराळी.

असो. या विवेचनावरून निदान एक गोष्ट सिद्ध होते तीं ही कीं मुलांच्या शरीराच्या वाढींत जो फेर पडत चालला आहे, तो बालविवाहादि रूढींचा परिणाम नव्हे, असलाच तर फारच अल्पांशानें आहे. आतां शरीराच्या ऱ्हासाचें वृद्धांच्या मतें जें कारण आहे तें विद्याभ्यासाची जीवापाड मेहनत हें होय. या त्यांच्या ह्मणण्यांत पुष्कळ तथ्य आहे, परंतु हा विद्याभ्यास केव्हां, कोठें, कसा बाधक होतो, याविषयीं त्यांनीं मुळींच विचार केलेला नसतो; तो बाधक न होईल अशाविषयींही त्यांस कांहीं उपाय सुचत नाहींत. उलट, दुसऱ्या कांहीं कोत्या समजुतींमुळें जे दुष्ट परिणाम कांहीं अवकाशानें व्हावयाचे ते हीं वृद्ध माणसें चळें लौकर अंगावर ओढून घेतात व या रीतीनें एक अनर्थपरंपरा सुरू होते. या विषयाचें पुढें तिसऱ्या भागांत विवेचन केलेलें आहे.

भाग २ रा.

विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींचा ऱ्हास.

७. शारीरिक ऱ्हासाबरोबरच जो दुसरा अत्यंत मोठा दुष्ट परिणाम हल्लीं घडत आहे तो मानसिक शक्तींचा ऱ्हास हा होय. हा ऱ्हास दोन प्रकारचा आहे; एक प्रकार असा कीं वर्षानुवर्ष विद्यार्थ्यांची सरासरी बुद्धिमत्ता कमी होत आहे व दुसरा प्रकार हा कीं धैर्य, आवेश, निर्धार, दीर्घ उद्योग, महत्वाकांक्षा, वगैरे महत्वाचे मानसिक गुण दिवसानुदिवस कमी कमी होत आहेत; व अशा दोन्ही प्रकारांमुळें ब्राह्मणांच्या अंगची कर्तबगारी नाहींशी होत आहे.

बुद्धिमत्तेच्या सरासरीचा विचार केला असतां असें दिसतें कीं प्रतिवर्षी इंग्रजी शाळांच्या वरच्या वरच्या इयत्तांत जे विद्यार्थी चढून येतात ते शरीरानेंच नव्हे, तर बुद्धीच्या मानानेंही कमी प्रतीचे असतात. चार किंवा पांच वर्षांच्या अंतरानें त्याच इयत्तेचे वर्ग पाहिल्यास पुष्कळच तफावत दिसते. गणितादि विषयांत कमी गम्य असणें व त्यांचा स्वाभाविकपणें कंटाळा असणें, नवीन विषयासंबंधानें कमी ग्राहकता असणें, व समजो वा न समजो, घोकून तयार करणें– या गोष्टी कमी बुद्धीच्या द्योतक आहेत. विद्यार्थी जितका शिक्षकावर व घोकंपट्टीवर अधिक अवलंबून असतो, तितका तो कमी योग्यतेचा असतो हें स्पष्ट आहे; व वर्षानुवर्ष ही स्थिति वाढत चालली आहे. कालेजांतील विद्यार्थ्यांसंबंधानेंही याच प्रकारचा अनुभव आहे.

परीक्षेच्या निकालांवरून पाहतां हाच प्रकार दिसून येतो. आधीं नापास होणारांची संख्या फार मोठी, परंतु तिचा विचार न करितां पास झालेल्यांच्या मार्कांवरून त्यांची योग्यता पाहिल्यास ब्राह्मणांचें पारडें दिवसानुदिवस कमी होत आहे असेंच दिसतें. ही स्थिति एकाच जिल्ह्याची नव्हे, तर सर्वच जिल्ह्यांची आहे असें कालेजांत सर्व ठिकाणांहून आलेल्या विद्यार्थ्यांच्या सरासरी बुद्धिमत्तेवरून सिद्ध होतें. कालेज आफ् सायन्स किंवा एंजिनियरिंग कालेजांत पहिल्या वर्गांत पास होऊं अशा उमेदीनें जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिल्यास ती हल्लीं शून्य आहे असें म्हटल्यास चालेल. बुद्धि, उद्योग व महत्त्वाकांक्षा या तिन्ही गुणांचा लोप ही एकच गोष्ट दाखविते. मेडिकल कालेजांतून दिवसानुदिवस ब्राह्मणांची पिच्छेहाट होत चालली आहे व गेल्या दहा पंधरा वर्षांत तिकडे पहिल्या वर्गांत किती पास झाले आहेत हें पाहिल्यास त्यांचें इतरांच्या मानानें फारच सूक्ष्म प्रमाण दिसतें. हीच गोष्ट पुष्कळ अंशीं बी. ए., एम्. ए. व एलएल्. बी. या परीक्षांसंबंधानेंही खरी आहे. आतां जर कोणीं असा विचार केला कीं प्रत्येक जातींतील शिकणारे विद्यार्थी किती व त्यांमधून परीक्षांत नांवलौकिक मिळविणारे किती, तर त्यास ब्राह्मणांस शेवटचा नंबर द्यावा लागेल. अशी सांप्रतची स्थिति आहे. शाळेंतून बाहेर पडतां पडतांच पुष्कळांची बुद्धि थकते, कंबर मोडल्यासारखी होते, व महत्त्वाकांक्षा लुप्त होते. मग कालेजांतून कोणत्या तरी द्वारानें कसें तरी बाहेर पडावें, एवढाच विचार शिलक राहतो, असें पुष्कळ विद्यार्थ्यांच्या स्थितीवरून दिसून येतें.

८. परंतु परीक्षा हें विद्वत्ता व बुद्धिमत्ता यांचें एक बाह्य द्योतक आहे. विद्वत्तेची व बुद्धिमत्तेची अखेरची परीक्षा पुढील आयुष्यक्रमांत व कर्तबगारींत दिसून येते. या दृष्टीनें पूर्वीच्या व अलीकडच्या ब्राह्मणजातीय विद्वानांत कांहीं अंतर पडलें आहे काय हें पाहूं. युनिव्हर्सिटींतून शोध व विचारपूर्वक विवक्षित विषयावर निबंध लिहिणारांस सुमारें दहा बक्षिसें आहेत. या बक्षिसांकरितां ब्राह्मणविद्वानांकडून अलीकडे पुष्कळ वर्षांत महत्त्वाचे निबंध गेल्याचें दिसून येत नाहीं. हायकोर्टांत गेलें असतां जुने व नवे एलएल्. बी. कोणते हें बहुधा केवळ आकारावरूनच लक्षांत येतें. तसेंच नवीन वकील, मुन्सफ, मामलेदार, शिक्षक, व इतर नोकर केवळ आकारानें अलीकडील असे ओळखितां येतात. अशा लोकांची परीक्षा " आकारसदृशी प्रज्ञा " या न्यायानें करणें रास्त नाहीं; सबब त्यांचें आचरण कसें असतें हें पाहिलें पाहिजे. धिम्मा, विचारी व आपल्या विद्वत्तेस अनुरूप अशा व्यासंगांतच वेळ घालविणारा,–अशा जातीचे विद्वान् किती, व कृतकृत्यपणें निव्वळ गप्पा ठोकीत बसणारे, किंवा लोकांची चेष्टा, निंदा व खोड्या करणारे, किंवा व्यसनांत, आळसांत व झोंपेंत दिवस काढणारे किती, त्यांचें प्रमाण पाहिल्यास विचार करणारास हल्लीं मोठी खेदकारक स्थिति दिसून येते.

डा० भांडारकर यांनीं कांहीं दिवसांपूर्वी विद्वानांवर केलेल्या आरोपांमुळें पुष्कळांनीं आपलीं मनें खवळून गेलीं आहेत असें दाखविलें; व डाक्तरसाहेबांनीं केलेल्या आरोपांस आपण पात्र नाहीं अशीं पत्रें त्यांपैकीं कांहीं गृहस्थांनीं रा० ब० रानडे यांस लिहिलीं. या पत्रांसंबंधानें शोध करितां त्यांपैकीं पुष्कळ शुद्ध गमतीनें लिहिलीं असावीं असें अनुमान होतें; व डा० भांडारकर यांनीं केलेलें आरोप हल्लीं ब्राह्मणज्ञातींतून डिग्री घेऊन बाहेर पडणाऱ्या बहुतेक विद्वानांस लागूं पडतील असा माझा समज आहे, व ते ज्यांस लागू पडणार नाहींत त्यांची संख्या अत्यल्प आहे, व ती कदाचित् बोटांवर मोजितां येईल.

इंग्रजी चांगलें बोलणारा व लिहिणारा मनुष्य विरळा सांपडतो. ज्याच्या सुज्ञतेवर, उद्योगावर व विचारशक्तीवर विश्वासानें लिहिण्याबोलण्याचें काम सोंपवितां येईल असा विद्वान् त्याहूनही विरळा. ज्यांस सभांचें काम चालविण्याचा प्रसंग येतो, चांगला अर्ज किंवा निबंध लिहून पाहिजे असतो, किंवा उत्तम शिक्षक निवडायाचा असतो, किंवा विचारपूर्वक कोणतीही जबाबदारीची गोष्ट करणारा माणूस पाहिजे असतो, त्यांस अशा कामांस लागणाऱ्या माणसांची किती दुर्मिळता आहे, हें प्रत्यहीं कळून येतें. घरें थोडीं वर्षें गेल्यावर अनुभवानें तरी अशा कामांस माणसें तयार व्हावीं; परंतु तसेंही घडलेलें दिसून येत नाहीं. चांगल्या माणसांवांचून मंद पडलेल्या किंवा वाढ खुंटलेल्या संस्था ठिकठिकाणीं नजरेस येतात, ही किती शोचनीय स्थिति होय ! जबाबदारीचें व परिश्रमाचें काम पतकरावें म्हणून कोणास सुचविल्यास तें उल्हासानें घेणें एकीकडेच राहिलें, परंतु " माझ्याच्यानें तें कशाचें होतें आहे, मला पहिल्यापासून सगळा अभ्यास केला पाहिजे, माझ्यानें इतकें विचाराचें काम होणें नाहीं, तुम्हीं कोणी दुसरा माणूस पहा, " असें सांगणारेच बहुतेक सांपडतील. आतां कोणी असें म्हणेल कीं आज असे गृहस्थ कोणी दिसत नाहींत म्हणून काय झालें; कांहीं दिवसांनीं यांतूनच ते तयार होतील. या प्रकारची आशा बाळगणें एवढेंच आतां उरलें आहे. जेव्हां ब्राह्मणसमाजापैकीं कोणीएक धुरंधर माणूस कमी होतो, तेव्हां त्याची जागा भरून काढण्यास दुसरा मनुष्य मिळत नाहीं, दुसरा कोणी तसाच होईल असेंही दुरून दिसत नाहीं, अशी स्थिति जेव्हां आपण पहातों तेव्हां आपली आशा दुराशा होय असा साहजिक ग्रह होतो. बरें या आशेस कांहीं थोडा पाया तरी आहे काय ? शेवटची परीक्षा पास झाल्यावर ज्यांनीं आपल्या आवडत्या विषयाचीं पुस्तकें तरी जवळ ठेविलीं आहेत असे लोक प्रथम फारच थोडे; सर्वच विषय अल्पकाळांत विसरून गेल्याबद्दल बोलण्याचालण्यांत फुशारकी मारणारेच चाकी बहुतेक सारे. करमणुकीकरितां नव्हे, तर बुद्धिप्रभाव वाढावा म्हणून ज्ञानाचा व्यासंग कायम ठेवणारे फारच विरळा; त्यांतूनही आळसानें, रोगानें व इतर कांहीं अशाच कारणांनीं ज्यांस सोडिलें आहे असे अधिक विरळा; व अशा संकटां-

तून ज्यांच्या कर्तबगारींचें चीज बाहेर पडून सर्वमान्य होत आहे अशांची संख्या जवळ जवळ शून्यच ह्मटल्यास चालेल. या प्रकारें आरोचाही तंतु सूक्ष्म व संशयात्मकच आहे.

आणि आपण जेव्हां विचार करितों कीं नुसती डिग्री तरी मिळविलेले गृहस्थ केवढ्या मोठ्या विद्यार्थीवर्गांतून निवडले जातात, (ह्मणजे एकंदर विद्यार्थीवर्गाशीं त्यांचें प्रमाण शेंकडा तीनही पडत नाहीं) तेव्हां मोठें आश्चर्य वाटतें, व साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो कीं या वरिष्ट गणिलेल्या जातीच्या बुद्धीचा ऱ्हास होत आहे किंवा हींस मूळचीच बुद्धि फार कमी !

९. या प्रश्नासंबंधानें विद्याखात्यांतील कित्येक विद्वान् गृहस्थांशीं माझें बोलणें झालें आहे. त्यांपैकीं दोन तीन गृहस्थांचीं मतें विचार करण्यासारखीं आहेत तीं येथें थोडक्यांत सांगतों. दिवसानुदिवस विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचें सरासरी प्रमाण कमी होत आहे ही गोष्ट एकानें मान्य केली. परंतु त्याचें असें ह्मणणें पडलें कीं यावरून बुद्धीचा ऱ्हास होत आहे असें अनुमान करितां येत नाहीं. कारण कदाचित् वास्तविक स्थिति अशी असेल कीं, इंग्रजी विद्याभ्यासास जे प्रथम पुढें सरसावले ते जीं कुटुंबें विद्येकरितां व बुद्धिमत्तेकरितां पिढीजात नांवाजलेलीं होतीं त्यांमधून आले; त्यांच्या मागून जे आले ते मध्यम प्रतीच्या बुद्धीचे आले. त्यांच्या मिश्रणानें बुद्धिमत्तेचें सरासरी प्रमाण पूर्वीपेक्षां कमी झालें, हें स्वाभाविकच होय. आतां दिवसानुदिवस विद्या अधिक सुलभ झाली आहे, तिजवांचून ब्राह्मणादि वर्गांस तरणोपायच नाहींसा झाला आहे. त्यामुळें बुद्धिमान् व निर्बुद्ध सर्वच कुटुंबें आपल्या मुलांस इंग्रजी शाळांतून पाठवीत आहेत. या कारणानें निर्बुद्ध मुलांची संख्या वाढून विद्यार्थ्यांच्या सरासरी बुद्धिमत्तेचें प्रमाण कमी झालेलें आहे; व ही स्थिति विद्येचा प्रसार कोठवर जाऊन पोहोंचला आहे व तिची आवश्यकता किती मोठ्या समाजास वाटायास लागली आहे या गोष्टींची केवळ निदर्शक गणिली पाहिजे.

वास्तविक स्थिति जर अशीच असती तर ती आनंदाचीच गोष्ट गणितां आली असती; परंतु प्रश्न असा उत्पन्न होतो कीं ज्या घराण्यांतील पुरुष पूर्वीपासून बुद्धिमान् व जे विद्यासाधन करून आज नांवलौकिकास आले आहेत त्यांचीं बुद्धिमान् मुलें कोठें आहेत ? विद्याखात्यांत शिक्षकाचें काम करितां करितां ज्यांचा जन्म गेला व ज्यांनीं लौकिकही मिळविला, त्यांचीं मुलें केव्हां परीक्षांतून पार पडूं अशा विवंचनेंत कां असावीं ? हाच प्रश्न डाक्तर, मुन्सफ, वकील, एंजिनीयर व इतर हरएक प्रकारच्या लौकिकवान् पुरुषांसंबंधानें विचारतां येईल. व शरीरानें, बुद्धीनें व कर्तबगारीनें बापाचें नांव पुढें चालविणारे मुलगे अगदीं निवडक कुटुंबांत पाहिल्यास शेंकडा दहा पांच सांपडणें कठीण ! शिक्ष-

काचें काम करणारा आपल्या स्वतःच्या मुलांस तरी विद्यार्जनाचे उत्तम मार्ग दाखवील; डाक्तराचें काम करणारा तरी आपल्या कुटुंबांतील मुलांच्या शरीरप्रकृतीस जपून त्यांस धष्टपुष्ट व निरोगी करील; एंजिनीयर मनुष्य तरी आपल्या मुलांस यंत्रशास्त्राचा नाद लावील; असें प्रथमदर्शनीं वाटतें. परंतु ब्राह्मणजातीय समंजस गणिलेल्या अशा मातापितरांचा देखील स्वसंततीच्या सुस्थितीविषयींचा बेफिकीरपणा पाहिल्यास अत्यंत आश्चर्य वाटतें. बुद्धीच्या ऱ्हासाविषयीं येथवर जें विवेचन केलें तें आर्धीच्याच निर्बुद्ध मुलांसंबंधानें नव्हे; तर ज्या विद्यार्थ्यांस वंशपरंपरेनें बुद्धीची देणगी आहे, ज्यांचे वडील समंजस व विचारी माणसांत गणिले जात आहेत, व ज्यांस उद्दिष्ट विद्येच्या तडीस नेऊन पोहोंचविण्याचा त्यांच्या वडिलांचा उद्देश आहे, परंतु जे पायरीपायरीनें क्षीण व शुष्क बुद्धींचे होत गेल्यानें वडिलांचा हिरमोड होत आहे, अशा विद्यार्थ्यांसंबंधानें विशेषेंकरून तें विवेचन आहे.

१०. दुसऱ्या विद्वान् गृहस्थाचें असें मत पडलें कीं ब्राह्मणजात एकंदरीनें बुद्धिहीनच होय. बुद्धिमत्तेविषयींचा लौकिक जो तीस प्राप्त झाला आहे तो कित्येक शतकें अज्ञान दशेंत राहिलेल्या इतर जातींच्या तुलनेनें प्राप्त झालेला आहे. हल्लीं या जातीच्या बुद्धिमत्तेची खरी पारख होत आहे. कारण वरिष्ट प्रतीच्या लोकांच्या सहवासास आपण आलों आहों. त्यांच्या अनंत ज्ञानसमुद्रांत आपणांस सोडून दिलेलें आहे, व आपण त्यांत अल्पांतरही तरून जाण्यास असमर्थ झालों आहों. तेव्हां यावरूनच आपल्या बुद्धिमत्तेची पारख होत नाहीं काय ? ज्या इतर जाती आज आपआपले उद्योगधंदे चालवून अज्ञानांतच राहण्यास खुषी आहेत, त्याही जर या प्रसंगीं वरिष्ट वर्गाशीं विद्येच्या बाबतींत सामन्यास येतील, तर त्या बुद्धीनें कमी प्रतीच्या आहेत असें दिसणार नाहीं. ब्राह्मणांचा बुद्धीविषयीं गर्व निराधार आहे, व शिवाय त्यांमध्यें जे कित्येक विशेष दोष आहेत ते असलेल्या बुद्धीसही विलुप्त करीत आहेत. आळस, निरुद्योग, अल्पायासानें महत्कार्य होईल तर तें करण्याची इच्छा, नाहीं तर थोडयांत समाधान मानून राहण्यास तयारी, हे व असेच दुसरे अनेक दोष ब्राह्मणवर्गांत परिपूर्ण भरलेले आहेत; या दोषांच्या भोंवऱ्यांतून सुटून ज्यानें बुद्धिमत्तेचा कांहीं खरा उपयोग केला, असा मनुष्य ब्राह्मणांमध्यें, ह्मणूनच, फार विरळा सांपडतो.

" ब्राह्मणास नवीन कल्पना येणें कठीण, एखादी आली ह्मणजे ती फिरायाची कठीण, जिकडे तिकडे तिचे अनुवादक व्हावयाचे व त्या कल्पनेचें पिढ्यानपिढ्या साम्राज्य चालायाचें; परंतु ती कल्पना स्वतःच्या किंवा देशाच्या फायद्याची होती किंवा तूर्त आहे, या गोष्टीचा विचार करणारा माणूस मिळणें मुष्कील. विद्येंत आपली बुद्धि समग्र खर्च करायाची ह्मणून कल्पना साल्या-

पासून सर्वांनीं हें एकच काम आरंभिलें आहे. हें आतां या जातीचा अस्त हो-ईपर्यंत चालणार कीं काय कोण जाणें ! या कारणामुळें वस्तुतः पाहतां ब्राह्मण कोणत्याही दुसऱ्या जातीच्या उन्नतीस मदत करीत नाहीं, व ह्मणूनच कोण-त्याही जातीची ब्राह्मणांबद्दल असावी तशी पूज्यबुद्धि नाहीं. हिंदुस्थानांतील शेंकडों धंदे आज बुडत आहेत, त्यांचा पुनरुद्धार करणें किंवा त्यांच्या ऐवजीं नवीन धंदे लोकांस शिकविणें, हें बुद्धीचें एक काम आहे. परंतु तेल्यास, घि-साडयास, सोनारास, रंगाऱ्यास किंवा इतर कोणत्याही जातीस कोणत्या ब्रा-ह्मणानें मदत केली आहे ? उलट त्यांस तुच्छ मानून त्यांपासून ब्राह्मण दूर दूर रहात आहे. ब्राह्मणाची जी काय प्रौढी ती राजकीय बाबतींत चळवळ करून रयतेचें आह्मीं हित करीत आहों ही एक आहे. परंतु या बाबतींत त्यांस इतर सर्व वजनदार जातींचें साहाय्य आहे ह्मणून कांहीं तरी फलप्राप्ति होण्याचा संभव आहे; • जर एकटेच ब्राह्मण या कामीं लागले असते, तर त्यांनीं लौकरच आपली फटफजिती करून घेतली असती व राजकीय प्रक्रमास नवीं विघ्नें उत्पन्न केलीं असतीं. परंतु या एका बाब-तींत देखील खुद्द ब्राह्मणांस प्रौढी मिळविण्यास फार थोडी जागा आहे. कारण राजकीय खटपटींत आपलें अंग घालणारे कोण ? जे उद्योग-धंद्यानें सरकारच्या पाशांतून मुक्त आहेत ते; अशांची संख्या सरकारी नौकरींत असलेल्यांच्या शतांशही नाहीं. इकडे एका स्वतंत्र ब्राह्मणानें " हा कर फार जुल-माचा आहे " असें रयतेस सांगावें व तिकडे त्याच्याच नोकरबंधूनें " हा कर माफक आहे, तो देण्यास रयत खुषी आहे, व तो वसूल करून देण्याचें मीं आ-पल्या अंगावर घेतों " असा सरकारांत रिपोर्ट करावा ! अशी जेथें स्थिति आहे, तेथें ब्राह्मणावर विश्वास ठेवण्यास रयतेस योग्य कारण आहे काय ? प्रत्येक खा-त्यांत उत्तम विद्वान् ब्राह्मणलोकांस सरकारानें जागा दिल्या आहेत; प्रत्येक खा-त्यांत रयतेस सुखानें नांदविण्याचें ब्राह्मणांच्या हातीं ठेविलें आहे; रयतेस ज्ञान, उद्योग, न्याय, नीति यांची गोडी लावणारे तालुक्याचे सर्व आफिसर असल्यास त्यांस सरकार आड येणार नाहीं. परंतु या स्वल्प कामांत ज्यांनीं नांवलौकिक मिळविला आहे असे किती सांपडतील ? व या उलट रयतेवर भलत्या कामीं जु-लूम करून किंवा अन्यायाचीं व स्वार्थाचीं कृत्यें करून रयतेस उपद्रव देणारे कि-ती सांपडतील ? बरें कदाचित् सरकारचा जुलूम होतो असें समजल्यास तो एक जमाबंदीसंबंधीं व्हावयाचा; परंतु त्यांतही, सरकारास निःस्पृहतेनें खरी स्थिति कळविणें किंवा जो जुलूम अनिवार आहे तो होईल तितक्या कमी प्रकारें रयतेस भोगवेल असें करणें, व सामान्यतः आपण स्वतः तरी त्या जुलमास कोणत्याही प्रकारें कारणीभूत न होणें, हें कितीकांच्या हातून घडत आहे ? किंवा घडलें आहे ? वास्तविक स्थिति अशी आहे कीं वरील आफिसरांनीं कांहीं प्रश्न विचारल्यास

त्यांचें धोरण काय हें विद्वान् ब्राह्मण आफिसरांस कळत नाहीं; ते गेरसावधपणें साहेब खुष होईल अशा प्रकारचा पाहिजे तसा रिपोर्ट करितात, त्यांच्या त्या लेखांवरून सरकार कांहीं नवीन बोजा रयतेवर लादतें; मग सरकारांतून हुकूम आल्यावर, ब्राह्मणाचीं धांदल उडते, त्याचें धैर्य खचतें, व जें थोडेंबहुत त्याच्या हातून होण्यासारखें असतें तेंही पुढें होत नाहीं. तो पाहिजे तें करण्यास तयार होतो. विद्वान् व अविद्वान् सर्वच ब्राह्मण अधिकाऱ्यांची जोंवर या प्रकारची स्थिति आहे, तोंवर त्यांच्या स्वतंत्र बंधूंस देशसेवेचें फुकाचें सर्टिफिकेट कोण देईल ? व ही स्थिति बुद्धिमत्तेची, दीर्घदर्शित्वाची किंवा थोरवीची निदर्शक आहे काय ? ”

११. तिसऱ्या विद्वान् गृहस्थाचें असें मत पडलें कीं “ बुद्धि हा गुण कांहीं थोडया अंशानें मनुष्यास उपजत प्राप्त होतो, व त्यायोगें आरंभींच व्यक्तिमात्रांच्या ग्रहणशक्तींत फेरफार दिसून येतो. परंतु या गुणाचें कमी अधिक पोषण होणें हें सर्वस्वी पुढील अभ्यासावर, व्यासंगांवर व परिश्रमांवर अवलंबून राहतें. ब्राह्मणजातींतील व्यक्तींस बुद्धीच्या कामांत आरंभीं इतरांपेक्षां कांहीं थोडें श्रेष्टत्व देतां येईल, परंतु त्यावरून पुढें या व्यक्ति विद्वान् निघतील किंवा मूर्ख निघतील, त्यांच्या हातून सत्कार्यें घडतील किंवा दुष्कृत्यें घडतील, हें त्यांच्या त्यांच्या स्थितीवर अवलंबून राहील. ब्राह्मणांच्या अंगीं बुद्धीचें बीज आहे; व जर त्याच्या पोषणास उत्तरोत्तर योग्य साधनें मिळत जातील तर त्याचा प्रचंड वृक्ष होईल. कांहीं थोडया ठिकाणीं असें घडून आलें आहे, व त्या व्यक्ति सर्वांच्या डोळ्यांपुढें आहेतच. परंतु बहुधा असें घडतें कीं बुद्धीचा अंकुर कांहीं काळपर्यंत वाढतो, परंतु पुढें अनेक कारणांनीं त्याची वाढ खुंटते, व क्रमानें तो इतका जीर्ण होतो कीं “ अहो, या मनुष्यास पूर्वी तरी कांहीं बुद्धि होती काय ? ” असा संशय उत्पन्न होतो. बुद्धीची वाढ खुंटण्याचीं व ती जीर्ण दशेस येण्याचीं इतकीं अगणित कारणें आहेत कीं त्यांची संख्या कदाचित् व्यक्तिमात्राइतकी होईल. उदाहरणार्थ, कोणी कुटुंबाच्या काळजीनें व्यग्र होतो, कोणी व्यसनांच्या नादीं लागतो, कोणी अशा ठिकाणीं किंवा अशा कामावर जातो कीं तेथें बुद्धीस साहजिकच जीर्णता यावी, किंवा तिचा ओघ क्षुल्लक गोष्टींकडे वळावा. बऱ्याच लोकांच्या संबंधानें असें दिसून येतें कीं त्यांचीं मनें अखेरपर्यंत अपरिपक्व राहतात, व ते जेव्हां सामान्य जनांत जाऊन पडतात तेव्हां त्यांस आपणच मोठे, आपणच ज्ञानी, आपणच बुद्धिमान् असें होऊन त्या उन्मादावस्थेंत त्यांच्या मानसिक शक्तींचा ऱ्हास होण्यास आरंभ होतो. कित्येकांच्या संबंधानें असेंही दिसतें कीं त्यांमध्यें आळसाचें प्राचल्य अधिक, महत्वाकांक्षा नाहींच; त्यामुळें, आपलें काम करून मोकळें व्हावें, आहे तसें चालवावें, होतां होईल तो फेरफार होऊं देऊं नये, डोक्यास श्रम पडतील किंवा शरीरास कष्ट होतील अशा वाटेस जाऊं नये, व आहे

तें उत्तम आहे असें दाखविण्याची सतत तयारी ठेवावी, असा त्यांचा पूर्ण निर्धार झालेला दिसतो. या प्रकारच्या लोकांचा भरणा विद्याखात्यांत फार आहे, इतर खात्यांत इतक्या आळसास जागा नाहीं ह्मणूनच नाहीं, नाहीं तर त्यांमध्येंही असायाचाच; व देशी संस्थानांत तो आहेच.

" परंतु विद्याखात्याची स्थिति पहा; त्यास जणूं काय पूर्णावस्था येऊन मन्वंतर झालें आहे ! नवीन सुधारणांचा इतःपर विचार करावयास नको, शिक्षणसंबंधीं नवीन प्रयोग करून पाहण्याची गरज उरली नाहीं, शिक्षणाच्या साहित्यांत कोणत्याही नव्या प्रकाराची आवश्यकता नाहीं, अशी सर्वत्र समजूत दिसेल ! ज्या खात्यांत नेटिव्हांच्या मतांस पुष्कळ मान दिला जातो, नेटिव्हांचा अभिमान बाळगणारे व त्यांस विशेष स्वातंत्र्य देणारे ज्या खात्याचे मुख्य अधिकारी आहेत, त्या खात्याची ही स्थिति ! ज्या गलिच्छ घरांत दहा वर्षांपूर्वी कित्येक लहान मुलांच्या शाळा होत्या त्याच घरांत त्या अद्यापपर्यंत भरत आहेत. मुलें बसविण्याचे जे अमंगळ प्रकार पूर्वी होते तेच अद्यापि रूढ आहेत; मुलांस द्यावयाच्या शिक्षाही बहुतांशीं पूर्ववत् चालू आहेत. हल्लीं शाळा मुनिसिपालिटींच्या ताब्यांत आहेत, तेव्हां त्यांकडून नवीन शालागृहें बांधविणें, नवीन सामान घेवविणें, खेळायास पटांगणें ठेवविणें, वगैरे सामान्य गोष्टींबद्दलही विद्याखात्याची कोठेंही सक्ति दिसत नाहीं. अनेक वर्षें तींच क्रमिक पुस्तकें, त्याच इयत्ता, तेच व तितकेच शाळा भरण्याचे तास, तींच वेळापत्रकें व त्याच शिक्षणपद्धति सुरू आहेत; परंतु कोणाची त्याबद्दल तक्रार ह्मणून नाहीं व जे कोणतेही शिक्षणाचे उत्तम परिणाम व्हावयाचे ते याच सर्व प्रकारांनीं व्हावयाचे असें जाणून सर्व थंडगार आहेत ! प्रथम जिल्ह्याचा भूगोल तोंडपाठ करून त्यांतून खेडींपाडीं कोणत्या ओढ्याचे कांठीं आहेत, त्यांची लोकसंख्या किती आहे, व त्यांत कोणते रहदारीचे रस्ते आहेत, कोणत्या अंमलदारांच्या मुक्कामाच्या जागा आहेत, हें समजावून घेऊन, नंतर याच धर्तीवर इलाख्याचा भूगोल, हिंदुस्थानचा भूगोल, इत्यादि क्रमानें भूगोल शिकावा. मोडी क्रमिक पुस्तकांतील गाईह्मशींच्या दूधदुपत्यासंबंधीं मनोरंजक प्रश्नोत्तरें वाचावीं, व्याकरण न समजतां पाठ करावें, इ० इत्यादि. हा असा प्राथमिक शिक्षणाचा राजमार्ग झाला आहे. या खात्याच्या द्वारें शिक्षकाच्या कामास जे लोक तयार केले जातात त्यांचें ज्ञान, त्यांस शिकविलेल्या शिक्षणपद्धति, व त्यांच्या घोकण्याकरितां लिहिलेलीं पुस्तकें व टिप्पणें हीं बहुधा सुमारें अर्ध्या शतकानें जीर्ण झालेलीं आहेत. त्यामुळें कोणत्याही प्राथमिक शाळेंत नव्यापूर्वनेस किंचितूही धक्का बसत नाहीं. याप्रमाणें हा प्रकार कोठवर वर्णन करावा !

" एकंदरींत असें दिसतें कीं, सांप्रतच्या स्थितींत ब्राह्मणांमध्यें निपजणारा बुद्धीचा अंकुर कांहीं नियमित मर्यादेपर्यंत वाढतो, पुढें त्याचें अनेक कारणांमुळें पोषण होत नाहीं, व पुष्कळ वेळां भोंवतालची अज्ञानमय स्थिति व स्वतः

ब्राह्मणांचा आळस, यामुळें त्याची वाढ खुंटून त्यास क्रमाक्रमानें जीर्णता येते; व त्याचें फळ दिसत नाहीं. तथापि एवढें खरें कीं, स्वतः ब्राह्मणांस आपण बुद्धिमान् आहों ही समजूत कधींही सोडीत नाहीं. कोणा ब्राह्मणास इंग्रजलोकांविषयीं अभिप्राय विचारल्यास तो बहुधा म्हणेल कीं, " ते फार दीर्घप्रयत्नी व अत्यंत धोरणी; " अमेरिकन लोकांविषयीं " ते फारच कल्पक व नानाप्रकारच्या युक्त्या काढणारे; " फ्रेंच लोकांविषयीं " ते अचाट कल्पनेचे व अत्यंत अस्थिर मनाचे, " जर्मन लोकांविषयीं " अत्यंत अभ्यासी व अत्यंत परिश्रमी " इत्यादि. परंतु स्वतः तुम्ही कसे असें विचारल्यास मात्र " आम्ही केवळ बुद्धिमान् " याप्रमाणें सारांशानें उत्तर येईल. परंतु इतर लोकांसंबंधानें जे गुण सांगितले त्यांच्या मुळाशीं विलक्षण बुद्धिमत्ता आहे, हें सहसा कोणा ब्राह्मणाच्या मनांत वागत असलेलें दिसणार नाहीं. जेव्हां स्वतः बुद्धिमान् असा कोणत्याही मोठ्या वर्गाचा साहजिक ग्रह असतो; परंतु बुद्धीची साक्ष देणारीं कृत्यें मात्र हातून घडलेलीं त्यास दाखवितां येत नाहींत, तेव्हां त्या वर्गाच्या त्या ग्रहासंबंधानें फारच झालें तर असें म्हणतां येईल कीं, जी बुद्धि आहे ती सामान्य प्रतीची असल्यामुळें महत्कार्यास अपुरी आहे; व तीस पूर्णावस्थेस नेण्यास कोणास अनुकूलता नाहीं, किंवा तीस अकालीं जीर्णता आणणारीं प्रबल कारणें आहेत त्यांतून कोणाची सुटका होत नाहीं. "

याप्रमाणें ब्राह्मणजातीच्या सामान्य बुद्धिमत्तेबद्दल किंवा तिजमध्यें दिसत असलेल्या ऱ्हासाबद्दल तीन विद्वानांचीं तीन भिन्न मतें सांगितलीं. या तिन्ही मतांमध्यें बरेंच तथ्य आहे असें प्रांजलपणें कबूल करावें लागतें. पाश्चात्य राष्ट्रें बुद्धिमत्तेनें, उद्योगानें, कल्पकतेनें, नीतीनें, व सर्वच गुणांनीं आपणांहून कमी जास्ती प्रमाणानें वरिष्ट आहेत ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. कारण पाश्चात्यांनीं निर्मिलेल्या ज्ञानतरूच्या एक एका शाखेच्याही शेवटास जाण्याइतकी योग्यता आपणांपैकीं कोणीही अद्याप दाखविलेली नाहीं. शिवाय हरएक बाबतींत आपणांस त्यांवर अवलंबिल्याखेरीज चालत नाहीं. ही स्थितीच त्यांच्या वरिष्टत्वाची साक्ष देते. वर्तमानपत्रें वाचायाचीं तर तीं इंग्रजी असावीं; करमणुकीकरितां कविता, नाटकें, नाव्हलें व चुटके पाहिजे असल्यास ते पाश्चात्य ग्रंथांतून वाचावे; कोणत्याही गहन विषयाची तयारी करणें झाल्यास पाश्चात्य ग्रंथकारांचे ग्रंथ पुढें पाहिजेत; व स्वतःचे विचार सुलभपणें प्रकट करण्यासही त्यांचीच भाषा पाहिजे. या सर्व बाबतींत एतद्देशीय काम सर्वच फार कमी दर्ज्याचें, व बहुधा निरुपयोगी, असें जें आपण क्षणोक्षणीं आचरणानें दाखवितों, त्यांतच आपला सांप्रतचा कर्मीपणा आपण व्यक्त करितों. परंतु तूर्त या स्थळीं आपल्या व इतरांच्या बुद्धीचा विचार करायाचा नाहीं. जी थोडी किंवा फार बुद्धीची देणगी ब्राह्मणांस आहे तिचा महत्तम उपयोग करून घेण्यास कोणतीं विघ्नें येतात, तीं

मंद पडत जाण्याचीं कोणतीं कारणें आहेत व तीं विघ्नें व कारणें कशीं दूर करावीं एवढ्याच गोष्टीचा विचार आपणांस येथें कर्तव्य आहे. आतां माझें असें म्हणणें आहे कीं, आयुष्याच्या पहिल्या भागांत ज्या शिक्षणपद्धतीनें हल्लीं विद्यार्थी परीक्षांस तयार केले जातात व त्या परीक्षांकरितां अभ्यासांचा जो क्रम नेमला गेला आहे, तो विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींच्या पोषणास प्रतिकूल आहे इतकेंच नव्हे, तर त्यायोगें बुद्धीची वाढ अकालीं खुंटून ती क्षीण होत जाते, दुसऱ्या कित्येक मानसिक शक्तींस धक्का बसतो, व सर्वप्रकारें मनुष्य कमी योग्यतेचा होऊन बाहेर पडतो. या मानसिक ऱ्हासाबरोबरच शारीरिक ऱ्हासही सुरू असतो; व म्हणून शिक्षणाचे व परीक्षणाचे दुष्परिणाम द्विगुणित होतात. ब्राह्मणवर्गाची अशा कारणांनीं फार मोठी हानि होत आहे. या हानीची परमावधि कोठें आहे ती आज दिसत नाहीं, परंतु ही हानि अशीच होत राहिल्यास अल्प काळांतच ब्राह्मणवर्गाचें महत्व नाहींसें होईल, व त्यास भयंकर विपत्ति व अपमान सोसून रहावें लागेल. याकरितां बुद्धीच्या ऱ्हासाचीं जेवढीं प्रतिकार्य कारणें आहेत तेवढीं दूर करण्याचें प्रत्येकानें आपलें पहिलें कर्तव्य समजलें पाहिजे, व सर्व वाचकांस अशी प्रार्थना आहे कीं, कोणीही भलत्याच अभिमानास चढून, भलतेच दुराग्रह मनांत बाळगून किंवा मिथ्या लोकापवादास भिऊन सत्याचा अवमर्द करूं नये किंवा जाणूनबुजून आत्मनाशास व ज्ञातिविनाशास कारणीभूत होऊं नये.

भाग ३ रा.

सांप्रतच्या शिक्षणक्रमाचें स्वरूप.

१२. मुलांस पांचवे किंवा सहावे वर्षीं शाळेंत घालण्याचा प्रघात सर्व ब्राह्मण कुटुंबांत दिसतो. शाळेंत जाण्यापूर्वी मुलें बरींच सशक्त, चलाख व हुषार दिसतात. त्यांच्या वाढीस या वयापर्यंत धक्का बसलेला नसतो, व त्यांमध्यें वाढीचा जोर कमी आहे असेंही दिसत नाहीं. जेथें मातापितर क्षीण व खुरट्या वाढीचे असतील तेथें मात्र संततीमध्यें आरंभींच खुरटेपणाचीं चिन्हें दिसूं लागतात, व जेथें आई अपूर्ण वाढीची असते तेथें हा परिणाम विशेष दृष्टीस पडतो; परंतु सरासरीनें पाहतां विद्याभ्यासास लागण्याच्या आरंभीं बहुतेक मुलें होतकरू असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१३. परंतु शाळेंत घातल्या दिवसापासून मुलाच्या मागें घरीं व शाळेंत सारखा जाच सुरू होतो. अत्यंत अल्पवयस्क व शरीरानें दुर्बळ अशीं मुलें आईबापांनीं शाळेंत घातल्याचीं घरोघर उदाहरणें सांपडतात. मग त्यांस प्रत्यहीं शाळेंत घालविण्याकरितां आईबाप मोठ्या क्रूरतेनें वागलेलेही आढळतात. असें करितां

करितां सर्व मुलांस नित्य शाळेस जाण्याची संवय लागते. यानंतर आईबापांस पुनः प्रयास पडत नाहींत. परंतु पुढें शाळेंत काय व्यवस्था असते ? ब्राह्मणांचीं बहुतेक मुलें मराठी अभ्यास झाल्यावर पुढें इंग्रजी शिकतात. हा मराठी अभ्यास प्राथमिक शाळेंत सुमारें तीन किंवा चार वर्षें चालतो. हीं तीन किंवा चार वर्षें बऱ्याच अंशीं घोकंपट्टींत जातात, असें मुलांच्या व पालकांच्या अनुभवानें सिद्ध करितां येईल, व जर कोणी प्राथमिक शाळेंतील शिक्षक पुढें येऊन निःस्पृहपणें शिक्षणक्रमाची खरी स्थिति सांगतील तर तिजवरूनही ही गोष्ट निश्चयात्मक ठरेल. प्राथमिक शिक्षणाच्या या तीन चार वर्षांत जो एकंदर अभ्यास होतो तो येणेंप्रमाणें:—(१) उजळणी, कांहीं प्रकारचे तोंडचे हिशेब व त्रैराशिक, पंचराशिकापर्यंत अंकगणित; (२) चार क्रमिक बालबोध पुस्तकें व दोन तीन मांडी, आणि मध्यम आकाराचें मांडी व बालबोध अक्षर; (३) स्वल्प व्याकरण; (४) महाराष्ट्रदेशाचा व थोडा हिंदुस्थानचा इतिहास; (५) जिल्ह्याचे भूगोलापासून हिंदुस्थानचे भूगोलापर्यंत अनुक्रमें भूगोल. या अभ्यासांपैकीं उजळणी व तोंडच्या हिशेबाचे नियम घोकावे लागतातच, परंतु अंकगणितांतील उदाहरणें व त्यांचीं उत्तरें पाठ करून घेणारेही शिक्षक आहेत. क्रमिक पुस्तकें शिकविलांना शब्दार्थांवर शिक्षकांची विशेष भिस्त दिसते. मुलांनीं पदार्थ पाहिलेले असोत वा नसोत, शब्द उच्चारितांच त्यांच्या डोळ्यांपुढें पदार्थांची प्रतिमा उभी गहो वा नराहो, शब्दास प्रतिशब्द, अर्थास प्रत्यर्थ त्यांनीं खडाखड सांगितलाच पाहिजे; ' घोडा ह्मणजे अश्व; ' ' कांच ह्म० अमुक पदार्थांपासून अमुक कृतीनें केलेला पदार्थ ' याप्रमाणें मुलांकडून उत्तम घोकून घेतलें जातें. कवितांसंबंधानें पाहतां मुलांस तिचा बोध होऊन कांहीं आनंद होवो वा न होवो, ती कविता, तिजमधील पृथक् कठीण शब्दांचे अर्थ, व संबंध कवितेचा अन्वय व अर्थ, हीं सर्वच मुलांकडून पाठ करून घेतलीं जातात. या पाठांतराच्या साधनाकरितां प्राथमिक शिक्षकांनीं लहान लहान पुस्तकेंही पुष्कळ तयार करून ठेविलीं आहेत, तीं मुलांस विकत घेणें इष्ट होतें. अक्षर लिहिणें हें जुन्यापद्धतीनें भुईवर वाकून बसून होतें. अशा बसण्याचा कोंवळ्या शरीरावर अनिष्ट परिणाम होतो. परंतु मुलांस सरळ बसवून त्यांकडून लिहून घेणें विशेष चांगलें हें कोणाही शिक्षकास माहीत असेलसें वाटत नाहीं. खालीं मान घातल्यावर मुलें वेडींवाकडीं तोंडें करूं लागतात, कोणी जांभ्या पुढें काढतो, कोणी फार तिरपें बघत असतो, कोणी दुसरी कांहीं कुचेष्टा करितो; व या संवयीं मुलांस जडल्यानें त्यांचा परिणाम बऱ्याच मोठ्या वयापर्यंत दिसत असतो; इंग्रजी व मराठी शाळांतील मुलें अक्षर लिहीत असतां तीं पाहिल्यास ही गोष्ट सर्वांच्या सहज ध्यानांत येईल. मुलगा लिहित असतां त्याच्या कागदावर कोणीकडून उजेड पडावा, या गोष्टीचें शिक्षकांस महत्व कळत नाहीं किंवा ते तिची फिकीर करीत नाहींत, या बाबतींत बहुतेक शाळा दोषी

आहेत व जोंवर लिहिण्याकरितां विशेष जागा किंवा सोयी केलेल्या नाहींत तोंपर्यंत या कामीं सुधारणाही होणें शक्य नाहीं. व्याकरण, इतिहास व भूगोल, हे सर्व विषय मुलें शुद्ध घोकून तयार करितात, ही गोष्ट इतकी प्रसिद्ध आहे कीं तिजबद्दल विशेष कांहीं सांगावयास नको. मुलें शाळेस जात असतां कोणी वाटेंत उभा असेल तर त्यासही या गोष्टीचा प्रत्यय येईल. यावरूनच मराठी शाळांतील शिक्षणाची स्थिति आहे. **एक तास समजावून देण्यास तर दहा तास घोकवून तयार करून घेण्यास, असा सरासरी क्रम आहे.**

१४. सर्व शाळांची शिक्षणपद्धति एकच; भेद जो पडतो तो ती पद्धति किती जारीनें व कौशल्यानें चालविली जाते तीमध्यें. पुढील सदरांत या शिक्षणपद्धतीच्या व इतर कांहीं गोष्टींच्या संबंधानें जे दोष दाखविले आहेत ते इंग्रजी व मराठी दोन्ही प्रकारच्या शाळांस सारखेच लागू पडतात. ह्मणून त्यांचें एकेच ठिकाणीं विवेचन केलें आहे.

बहुतेक सर्व हिंदू शाळांत मुलें एका वाटोळ्या ओळींत बसविण्याची चाल आहे. या चालीचा फायदा हा कीं मुलांस अनुक्रमानें प्रश्न विचारितां येतात व त्यांस नंबर देतांना इतर मुलांस खालींवर सरण्यास सोपें पडतें. सर्व मुलें शिक्षकाच्या समोर नसल्यामुळें व कित्येक त्याच्या मागेंही गेल्यामुळें त्याची सर्वांवर सारखी नजर रहात नाहीं हा या रीतीनें वर्ग मांडण्याचा दोष आहे; व असेच दुसरेही कित्येक दोष दाखवितां येतील. परंतु त्या गौण गुणदोषांचा येथें विचार करावयाचा नाहीं. शिक्षक लोकांच्या मतें या व्यवस्थेचा जो मुख्य गुण तो हा कीं प्रश्न विचारण्यास व नंबर देण्यास ही व्यवस्था अत्यंत सोयीची असते; व **प्रश्न विचारून व नंबर देऊन मुलांत जशी चलाखी ठेवितां येते तशी दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठेवितां येणार नाहीं. सबब या कामास जी वर्गाची मांडणी उत्तमतीच शिक्षणाच्या कामास सर्वोत्तम असें हल्लीं शिक्षकांचें सामान्यतः मत आहे.**

वर्ग मांडण्याच्या या व्यवस्थेचा व इंग्रजी आणि मराठी शाळांतून सुरू असलेल्या शिक्षणपद्धतीचा फार निकट संबंध आहे, ह्मणून या व्यवस्थेचा येथें उल्लेख केला. कोणताही विषय शिकवावयास घेतला ह्मणजे शिक्षक त्या विषयांतील प्रश्न विचारावयास आरंभ करितो. मुलांनीं वाचन स्वतः घरीं तयार करून आलें पाहिजे, शिक्षक कायतें वाचून घेऊन नंबर लावतो; वाचन झाल्यानंतर शिक्षक शब्दार्थ विचारण्यास आरंभ करितो व त्याचे नंबर देतो; ह्मणजे विद्यार्थ्यानें घरून शब्दार्थ शिकून तयार होऊनच आलें पाहिजे; हीच स्थिति पुढें वाक्यांचा अर्थ लावितांना; किंवा गणितार्चीं उदाहरणें करितांना, इतिहासाचा विषय शिक-

वितांना, भूगोलाची माहिती करून देतांना व नकाशावर स्थलें दाखवितांना-- किंबहुना हरएक विषय शिकवितांना.

या हल्लीं चालू असलेल्या पद्धतीचा विचार करितां असें दिसतें कीं **शिक्षकांचें मुख्य काम प्रश्न विचारणें हें होय; मुलांस आपल्या चुका समजावून घेण्याची जी मुख्य संधी ती खालचा मुलगा बरोबर उत्तर देऊन वर जातो तेव्हांची; व जेव्हां कोणाच मुलास बराबर उत्तर देतां येत नाहीं तेव्हां मात्र शिक्षकास स्वतः शिकविण्याचें काम पडतें.** या कारणामुळें वारंवार मुलें आपआपसांतही शिक्षकाची गरज भागवून घेतात; ह्मणजे एकमेकांस प्रश्न विचारून आपले नंबर तीं लावून घेऊं शकतात. ही शिक्षणपद्धति येथें सांगितल्याप्रमाणें सर्वत्र सुरू आहे असा ज्यांस प्रत्यय पहायाचा असेल त्यांनीं केव्हांही कोणत्याही मराठी किंवा इंग्रजी शाळेंत जाऊन शिक्षक काय करीत आहे हें पहावें; तो प्रश्न विचारीत आहे असें दिसेल; शिक्षकास अमुक विषय शिकवा ह्मणून सांगितल्यास तो त्या विषयाचें पुस्तक घेऊन त्या विषयांतील प्रश्न विचारण्यास आरंभ करितो, असें अनुभवास येईल; व या स्थितीस अपवाद असा क्वचितच सांपडेल. शिक्षणपद्धतीचें विशेष ज्ञान संपादून व ट्रेनिंग कालेजाचें सर्टिफिकेट मिळवून शिक्षक बनलेल्या लोकांची व तशीच इंग्रजी शाळांतील सर्व शिक्षकांची जेव्हां आपण अशी ही स्थिति पाहतों,--जेव्हां इन्स्पेक्टर किंवा डेप्युटी यांजकडून या पद्धतींत फरक होण्याबद्दल कांहींही सुचना, प्रयत्न किंवा सक्ती झालेली दिसत नाहीं--तेव्हां हीच पद्धति विद्याखात्यानें उत्तम ठरविली आहे असें मानणें भाग पडतें. किंवा कदाचित् असेंही असेल कीं या प्रकारची पद्धति सर्वत्र सुरू आहे ही गोष्टच विद्याखात्यांतील वरिष्ट अधिकाऱ्यांस अद्यापि माहीत नसावी; व खालच्या प्रतीच्या अधिकाऱ्यांस ह्मणजे इंग्रजी शाळांचे हेडमास्तर व मराठी शाळांवरील डेप्युटी इन्स्पेक्टर यांस तिजमधील दोष दिसत नसावे; किंवा ते दिसत असूनही त्यांस ती पद्धति बदलून टाकण्याचें धैर्य नसावें. कसेंही असो, आज नित्तीस वस्तुस्थिति कशी आहे तें वर सांगितलेंच.

१५. माझ्या मतें ही पद्धति सर्व प्रकारें दोषी आहे, व तिचे दुष्ट परिणाम कोणाच्या लक्षांत आलेले नाहींत हेंच मोठें आश्चर्य होय. **मुलांस प्रश्न विचारूं नये असें माझें मत नाहीं, परंतु हे प्रश्न केव्हां विचारावे ? जेव्हां शिक्षकानें जें आधीं शिकवायाचें तें शिकविल्यावर. शिक्षकानें प्रथम नेमिलेला धडा घेऊन त्याचें समग्र विवरण केलें पाहिजे, व तेंही अशा रीतीनें कीं धड्यांत ध्यानांत ठेवण्यासारख्या जितक्या गोष्टी असतील तितक्या मुलांच्या मनांवर उत्तम प्रकारें बिंबाव्या; याप्रमाणें घडण्यास त्यानें निरनिराळीं उदाहरणें घेतलीं पाहिजेत, अनेक दृष्टांत दिले पाहिजेत, पुस्तकांत दिलेली नाहीं अशी महत्वाची माहिती सांगितली पाहिजे, व आपल्या अंगचें सर्व पांडित्य**

या कामीं त्यानें प्रथम खर्च केलें पाहिजे. याप्रमाणें करून जेव्हां त्यास स्वतःस समाधान वाटेल कीं, आतां मुलांस हा विषय समजलाच पाहिजे, तेव्हां त्यानें प्रश्न विचारण्यास आरंभ करावा; व ज्यांनीं आपल्या सांगण्याकडे चांगलें लक्ष पुरविलें असेल व जे आपल्या बुद्धीची विशेष ग्राहकता दाखवितील त्यांस वर नंबर द्यावा; वर नंबर देणें हें एवढें बक्षीस मुलांस बस्स होतें. परंतु असा शिक्षणाचा प्रघात फारच क्वचित् आढळतो; त्यामुळें शिक्षकांस घरीं बहुधा मुळींच तयारी करावी लागत नाहीं; मुलांत आपली फजिती होऊं नये म्हणून जी थोडी करावी लागत असेल तेवढी केल्यास त्यांचें काम भागतें. वर्षेंचीं वर्षें कित्येक शिक्षक एकच विषय शिकवीत आले आहेत, परंतु त्यांजवळ त्या विषयाची कांहीं विशेष माहिती सांचली असेल असें बहुधा दृष्टीस पडत नाहीं. वर्षानुवर्ष त्याच त्याच प्रश्नांचा ते तसाचा तसाच पुनरुच्चार करीत असतात; व मुलांमध्यें त्यांचें अनुकरण सुरू होऊन मोठी गम्मत चालते. नवीन पुस्तक नेमिलें म्हणजे त्यांस जो मोठा जुलूम झालासा वाटतो त्याचें कारण हें कीं त्यांची एकदा बसलेली घडी मोडते !

मराठी किंवा इंग्रजी शाळेंत जाऊन कोणी शिक्षकास असें विचारिलें कीं तुम्हीं आज जे विषय शिकवावयाचे ठरविले आहेत त्यांची काय तयारी केली आहे, तर ते 'तयारी कशास करावयास पाहिजे?' असेंच उत्तर देतील. आज अमुक गोष्टीचें विवरण करण्याकरितां अमुक उदाहरणें देऊं, अमुक दृष्टांत देऊं, अमुक नवीन शोध लागले आहेत त्यांची माहिती देऊं, अमुक गणितविषयक उदाहरणें समजावून देऊं, अशाविषयीं कोणाजवळ टिप्पणें बिलकुल मिळावयाचीं नाहींत; व ज्यांस विषय पुढें येतांच सर्व प्रकारची एकदम स्फूर्ति होईल असे सर्व बृहस्पति आहेत असेंही संभवत नाहीं. तेव्हां पुढें वर्ग शिकवीत असतां कसें होतें ? बहुधा प्रश्न विचारतां विचारतांच वेळ जातो व माराकुटीनें कांहीं वरच्या मुलांस केवळ पुस्तकाचा बोध झाला म्हणजे शिक्षक आपणांस कृतकृत्य मानितो. पुस्तकापलीकडे मुलांस बहुधा कांहीं येत नाहीं, व शाळांचे व्यवस्थापक तें न आल्याबद्दल फिकीरही करीत नाहींत.

१६. मुलांस घरीं अभ्यासाचे अत्यायास पडण्यास, त्यांमध्यें घोकंपट्टी सुरू होण्यास, त्यांच्या शरीरांस व बुद्धीस वैकुण्य आणण्यास ही शिक्षणपद्धति पुष्कळअंशीं कारण होते, अशी माझी खात्री झाली आहे. शिक्षकांनीं केवळ प्रश्न विचारून नंबर लावण्याचें काम पतकरल्यामुळें, मुलांस सर्व तयारी घरून करून यावी लागते; वाचावें कसें, शब्दांचा अर्थ काय, इतिहासांत काय सांगितलें आहे, उदाहरणें कशीं सोडवावीं, इत्यादि सर्वच गोष्टी घरीं तयार झाल्या पाहिजेत. या कामीं मुलांस अत्यंत प्रयास पडतात हें सांगावयास नकोच; व जेव्हां

बुद्धीच्या जोरानें कित्येक विषय समजेनासे होतात, तेव्हां ते घोकण्यावांचून दुसरा उपाय काय ? शाळा हें शिक्षणाचें स्थळ नव्हे, तर प्रत्यहीं परीक्षा घेण्याचें स्थळ आहे, अशी वास्तविक स्थिति झाली आहे; व जीं ब्राह्मणांचीं मुलें आपल्या प्रथम वयाचीं बारा वर्षें शाळेंत घालवितात, तीं दररोज दररोज परीक्षाच देत आहेत, व परीक्षेचीच तयारी करीत आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जे श्रीमंत गृहस्थ आहेत ते या कारणानें शाळेंतील अभ्यास मुलांस शिकविण्यास घरीं निराळा शिक्षक ठेवितात; जे गरीब आहेत त्यांचीं मुलें वडील बंधु किंवा शेजारीपाजारी किंवा वरच्या इयत्तेंतील मुलगा पाहून त्यास आपल्या अडचणी विचारून तयारी करितात; ज्यांमध्यें इतका उद्योग नाहीं किंवा ज्यांस हीं साधनें नाहींत, तीं कनिष्ट जातीचीं कुणबी, मुसलमान वगैरेंचीं मुलें, वर्गांत मट्ठचीं मट्ठ राहतात. ब्राह्मणांच्या शाळांत त्यांस उपयुक्त असें कांहींच मिळत नाहीं, व तीं लवकरच विद्येचा नाद सोडून शाळेंतून पळ काढतात. एक तास शिकविण्यास, तर दहा तास घोकवून तयार करून घेण्यास, याप्रमाणें शाळांतील शिक्षणाची स्थिति आहे असें जें मागें सांगितलें त्याचा प्रत्यय ही वस्तुस्थिति पाहिली ह्मणजे प्रत्येकास येईल.

१७. शिक्षकाची आकृति भव्य असावी, त्याची मुद्रा प्रसन्न असावी, वाणी रसाळ असावी, बुद्धि तीव्र असावी व त्याच्या अंगीं समयस्फूर्ति असावी; त्याबद्दल प्रेम व पूज्यता साहजिकपणें उत्पन्न व्हावी, इत्यादि गोष्टी इष्ट होत; परंतु त्या आवश्यकच आहेत असें ह्मणतां येणार नाहीं. परंतु शिक्षक उद्योगी, शोधक व बहुश्रुत असावा, त्यास विद्येचा व्यासंग असावा, व आपलें काम हौसेनें करण्याची नित्य उमेद असावी, या गोष्टी आवश्यकच आहेत; परंतु सांप्रतच्या शिक्षणपद्धतीमुळें याही गोष्टी अनावश्यक झाल्या आहेत. ज्यांचे अंगीं पाणी नाहीं किंवा कर्तबगारी नाहीं, जे अवयवांनीं किंवा इंद्रियांनीं किंवा शक्तीनें विकल झाले आहेत, विद्याभ्यास खुंटून जे अगतिक झाले आहेत, अशा अनेक गृहस्थांनीं विद्यादानाचा धंदा पतकरिला आहे. पुष्कळ पालकांचाही असाच समज दिसतो कीं शिकविणारा मनुष्य विद्यार्थ्यांपेक्षां थोडें अधिक जाणणारा असला ह्मणजे बस्स आहे. 'या कामास हो तुमचं येमंय आणि बिय्ये काय करावयाचे आहेत ?' असे उद्गार पुष्कळांच्या तोंडून ऐकूं येतात. वास्तविक पाहतां शिक्षकाचें काम प्रश्न विचारणें एवढेंच जोंवर समजलें जात आहे तोंवर हे उद्गार यथार्थ आहेत असें ह्मणणें भाग पडतें; व या पद्धतीनें शिकवीत असतां कमी व अधिक योग्यतेच्या माणसांच्या कामांत फारसें अंतरही पडत नाहीं, असा अनुभव आहे. वास्तविक पाहतां मनुष्य थोडा किंवा फार विद्वान् असो, तो शिक्षकाचे कामास लायक आहे कीं नाहीं, हें ठरविणें फार

विचाराचें काम आहे, परंतु सांप्रत स्थितींत प्रत्येक मनुष्य या कामास लायक आहे असें समजलें पाहिजे.

१८. मराठी व इंग्रजी शाळांत चार वर्षें अध्ययन केल्यावरें विद्यार्थ्यांच्या एकंदर ज्ञानाची परीक्षा केल्यास, त्यास फारच थोडें येत आहे असें दिसून येतें. शिकलेल्या पुस्तकांपलीकडे त्यास फार्च थोडी माहिती असते;' शिकलेल्या पुस्तकांपैकींही पुष्कळ भाग केवळ घोकून तयार केलेला असल्यामुळें अल्पकाळांत तो नष्ट होतो, व अवशेष राहिलेल्या ज्ञानाची पुंजी पाहतां ती केलेल्या परिश्रमांच्या मानानें अत्यल्प आहे असें आढळतें. याप्रमाणें वास्तविक स्थिति आहे, ही गोष्ट बहुधा सर्व लोक मान्य करितील. तसेंच या इतक्या वर्षांत मुलांची अवलोकनशक्ति पूर्णपणें वाढावी, त्यांस ज्या गोष्टी शिकविण्याचें कारण नाहीं त्या आपोआप समजून याव्या, ज्या शिकविल्या त्या ठिकठिकाणीं कशा लागू पडतात हें ध्यानांत यावें, व एकंदरींत त्यांची बुद्धि प्रौढ व्हावी. परंतु चांगल्या बुद्धिमान् मुलांच्या अंगींही हे गुण आलेले हल्लीं दिसत नाहींत. उलट मुलांची अवलोकनशक्ति नाहींशी होते, त्यांच्या अंगची साहजिक जिज्ञासाही नष्ट होते, तीं अत्यंत परतंत्र बुद्धीचीं होतात, असा सर्वत्र अनुभव आहे. व हे त्यांचे दोष जेव्हां सहजगत्या दिसून येतात तेव्हां आपणांस आश्चर्य वाटतें.

याप्रमाणें स्थिति होण्याचें कारण शिक्षकांस विचारतां ते बहुधा उत्तर देतील कीं परकीय भाषेंतून ज्ञान संपादन करण्याचे श्रम मुलांस होत नाहींत, त्यांतच त्यांचा सर्व वेळ जातो; त्यांस दुसरीकडे लक्ष देण्यास फुरसत तरी कोठें आहे. वास्तविक पाहतां बहुतेक इंग्रजी शाळांतून आरंभीं प्रत्येक विषय मराठींतच शिकविला जातो, व मागून त्याची इंग्रजींत घोटणी होते. ही गोष्ट ध्यानांत आणिली ह्मणजे या त्यांच्या उत्तराची निर्म्मी सयुक्तिकता कमी होते. कारण मराठींत विषयाची जी समजूत आधीं दिली तिचें काय सार्थक्य झालें ? चरें केवळ इंग्रजीवरच सात आठ वर्षें विशेष परिश्रम होतात असें समजल्यास, मुलांचें इंग्रजीचें ज्ञानही फारच कोतें आहे असें पाहून चमत्कार वाटतो.

१९. माझ्या मतें वरील दुष्परिणाम हल्लींच्या शिक्षणपद्धतीमुळें उत्पन्न होतात. इंग्रजी शाळेंत गेल्यावर जितकें इंग्रजी बोललेलें कानांवरून जाईल तितकें तें मुलांस फायद्याचेंच होईल; तसेंच अगदीं पहिल्या इयत्तेपासून सोप्या सोप्या प्रश्नांचीं सबंध उत्तरें जितकीं इंग्रजींतून मुलांस देतां येतील, तितका त्यांचा त्या भाषेशीं परिचय वाढेल. परंतु सांप्रत स्थिति अशी आहे कीं, मुलांस इंग्रजींत चांगलें बोलतां येत नाहीं, किंवा सामान्य प्रश्नांचीं उत्तरें देतांनाही आधीं बराच विचार करावा लागतो, व नंतर तीं उत्तरें चुकत माकत येतात. ही उणीव शिक्षकांतही बरीच दिसते. एकवार मराठींतून किंवा मराठीमिश्रित इंग्रजींतून मुलांस विषय समजावून दिल्यानंतर तो पुनः शुद्ध इंग्रजींतून समग्र समजावून

देण्याची पद्धति फारच थोडें ठिकाणीं आहे. सामान्य विषयांवर मुलांशीं इंग्रजींत बोलण्याचाही प्रघात फारसा कोठें नाहीं. मुलांस प्रश्न विचारायाचे तेही शुद्ध इंग्रजींतच विचारतील अशी हमी थोड्याच शिक्षकांसंबंधानें देतां येईल; व त्यामुळें सर्व शाळांतून अशी स्थिति आढळते कीं, शिक्षकानें केवळ प्रश्न विचारण्याचें काम पतकरल्यामुळें त्यास इंग्रजींत आपले विचार अस्खलितपणें प्रकट करण्यास मोठी मारामार पडते; विषयाचें विवेचन करूं लागतांच, मध्यें प्रश्न केव्हां विचारीन असें होतें; उदाहरणें देऊन, दृष्टांत देऊन, बाहेरील माहिती देऊन, प्रश्न न विचारतां मुलांस आतां चांगलें समजलें असावें असें आपलें स्वतःचें समाधान होईपर्यंत कांहीं थोडा विषय केवळ इंग्रजींत सांगायाचा प्रसंग आल्यास शेंकडा किती शिक्षक पसार होतील याची मला शंकाच आहे. ही गोष्ट त्यांस असाध्य आहे असें नव्हे, तर ती त्यांनीं कधीं केलेलीच नाहीं तेव्हां त्यांस कशी येणार ? या कारणानें मुलांचा इंग्रजी भाषेशीं जेवढा परिचय व्हावा तेवढा होत नाहीं व या एका विषयांत पुष्कळ परिश्रम करूनही अत्यल्प कार्यसिद्धि होते.

२०. परंतु इंग्रजीच्या ज्ञानाचा विचार एकीकडे ठेविला, तथापि जेथें शिक्षकाकडून विषयांचें स्वतंत्र विवेचनच होत नाहीं तेथें त्या विषयांवर अवांतर अनेक गोष्टींमुळें जो प्रकाश पडायाचा तो कसा पडणार ? भूगोलाचा विषय निघतांच नकाशा टांगून प्रश्नोत्तराचें काम सुरू होतें; मग भूभागांची सामान्य मांडणी कशी असते, नद्या पर्वतांपासूनच कां निघतात, त्या समुद्राकडेच कां जातात, त्या कोणतीं कार्यें करितात, इत्यादि अनेक विषय शिक्षकास अवगत आहेत असें समजलें तरी तो केव्हां सांगणार ? व विद्यार्थ्यांची जिज्ञासा व अवलोकनेच्छा कशी जागृत करणार ? इतिहासांतील मनोरंजक गोष्टी, लोकाचार, उद्योगधंद्यासंबंधानें व धर्मासंबंधानें राष्ट्रांची स्थिति, त्या त्या ऐतिहासिक कालाचें महत्व, वगैरे गोष्टी मुलांस कशा कळणार ? हीच सर्व विषयांची स्थिति. " घरून पाठ करून या ह्मणजे मी प्रश्न विचारतों; वर्गांतील कोणा एकाही मुलास जेवढें अगदीं न समजेल तेवढें मात्र मी सांगेन; परंतु तें सांगण्यापूर्वी घरीं काय तयार केलें आहे त्याची परीक्षा घेऊन नंबर लावीन; " असा जेथें शिक्षकवर्गाचा बाणा, तेथें विद्यार्थ्यांस त्याकडून कोणती महत्वाची प्राप्ति होणार ? याप्रमाणें या पद्धतीमुळें मुलांचें जें नुकसान होतें तें होतेंच, परंतु शिक्षकलोकही आळशी, निरुद्योगी किंवा अन्यव्यासंगी व वक्तृत्वहीन होतात. त्यांमध्यें दिवसगतीनें व अनुभवानें जी सुधारणा व्हावी ती होत नाहीं, उलट रहाटाच्या कण्याप्रमाणें जागच्या जागीं फिरून फिरून त्यांची बुद्धि झिजून निरुपयोगी होते. जुना अनुभविक शिक्षक बदलून जातो, तेव्हां सर्वांस आनंद होतो याचें कारण हेंच होय.

२१. आतां विद्यार्थ्यांच्या संबंधानें याच पद्धतीचा विशेष विचार करितां असें दिसून येतें कीं, त्यांचा शाळेंत जो वेळ जातो तो जातोच; परंतु घरीं करायाच्या

अभ्यासाचें प्रमाण अत्यंत वाढतें. जर शिक्षकानें सांगितलेल्या गोष्टी ध्यानांत धरून त्यांचें यथावत् मनन करणें एवढेंच मुलांचें काम असतें तर तें त्यांच्या जिवापाड आहे असें ह्मणतां आलें नसतें; परंतु जें पुढें शिकावयाचें त्याचें बहुतेकांशीं घरींच ज्ञान करून घेऊन शाळेस जावयाचें ह्मटल्यास, हें त्यांच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. मुलांच्या अंगच्या बुद्धींत व स्मरणशक्तींत पुष्कळ अंतर असतें; कोणाची बुद्धि कोणत्या तरी एक दोन विषयांत चालते; कांहींएक प्रकारच्या गोष्टी कोणाच्या विशेष ध्यानांत राहतात. हा भेद साहजिक असो किंवा कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेला असो, तो मुलांमध्यें दृष्टीस पडतो ही गोष्ट मान्य केली पाहिजे. या भेदामुळें असें घडतें कीं, कांहीं विषय मुलें घरींही तयार करूं शकतात, परंतु दुसरे विषय त्यांस तसे तयार करितां येत नाहींत. अशा स्थितींत शाळेंतील फजीतीच्या व माराच्या भयानें साहजिकपणें न येणारे विषय मुलें घोकण्यास आरंभ करितात. या घोकंपट्टीची शाळेंत तेव्हांच वाहवा होते व मुलांस उत्तेजन मिळतें. मग पुढें वाहवा मिळविण्याचा हा घोकंपट्टीचा सुलभ मार्ग हळूहळू सर्व विषयांस लागू होतो. मुलें मराठी दुसऱ्या किंवा तिसऱ्या इयत्तेंत आल्यापासून जर हा याप्रमाणें क्रम सुरू झाला, तर त्याचा अखेरीस काय परिणाम घडेल ! माझा असा अनुभव आहे कीं चांगलीं बुद्धिमान् मुलेंही क्रमाक्रमानें मंद होत जाऊन अखेरीस पुष्कळ अगदीं कुचकामाचीं ठरतात; व मध्यंतरीं त्यांची जी शरीरहानि होते ती चुकत नाहींच.

२२. या घरच्या अभ्यासासंबंधानें पालक व शिक्षक यांनीं मनःपूर्वक विचार केला पाहिजे. मुलगा मराठी पहिल्या इयत्तेंत जाऊन थोडे दिवस झाले नाहींत तोंच घरून पाटीवर उजळणी काढून आणण्याचें काम त्याच्या मागें लागतें. पांच किंवा सहा वर्षांच्या मुलाचे शाळेंत सहा किंवा सात तास आडवून आणखी त्यास घरीं उपद्रव देण्यांत, व घरचें काम चराचर न झाल्यास त्यास शिक्षा करण्यांत शिक्षकांस कोणती कार्यसिद्धि वाटत असेल ती असो ! यापुढें जों जों वरच्या इयत्तांत मुलाचा प्रवेश होतो, व पुढें इंग्रजी इयत्तांची मालिका लागते, तों तों हा घरचा अभ्यास अस्खलितपणें वाढतच जातो. घरून लिहून आणण्याचें काम तर चालू असतेंच; त्याशिवाय इतिहास, भूगोल, शब्दार्थ, गणिताचीं उदाहरणें, व्याकरणाचे नियम, व इतर जे विषय क्रमानें वाढत जातात, त्यांचा अभ्यास घरीं झाला पाहिजे. प्रत्येक विषयास अर्धा तास ह्मटल्यास निदान चार तास घरीं मोडले पाहिजेत, परंतु तेवढ्यांनीं बहुधा शाळेंत नंबर राखणाऱ्या मुलाचें भागत नाहीं. लिहिण्याचें काम सरासरी अर्धा तास व वाचनाचें अर्धा तास ह्मटल्यास एक तास होतो. गणिताचीं नवी पांच सात उदाहरणें करण्यास निदान एक तास मोडला पाहिजे, व ज्यास या विषयाची विशेष तयारी करावयाची असेल, व बीजगणित, भूमिति वगैरे

विषयांचा जेव्हां गणितांत समावेश होतो, तेव्हां आठवड्यांतील कित्येक तास या एका विषयास देणें भाग पडतें. वाचनपुस्तकांतील शब्द कोशांतून काढणें, ते लिहिणें व पाठ करणें, वाक्यांचा अर्थ बसविणें, वगैरे जें महत्वाचें काम त्यांत तास दीडतास तरी मोडला पाहिजे. याशिवाय राहिलेले विषय घोकून तयार होण्यास जो वेळ लागेल तो लागेल. जेव्हां क्रमानें भाषाविषयांत संस्कृताची भर पडते, शास्त्रीय विषयांत रसायन, ज्योतिष वगैरेंची भर पडते, अभ्यास पुढें पुढें गेल्यानें झालेल्या विषयांची उजळणी करण्याचें काम वाढत जातें, तेव्हां घरचा अभ्यास मनःपूर्वक करणाऱ्यास रोज चार तास पुरत नाहींत; पांच किंवा सहा किंवा अधिकच तासांचें तें काम होतें; व जों जों बुद्धि जड तों तों अभ्यास अनावर होत जातो. कोणी पहाटेस उठून बसतो, कोणी रात्रीं जागतो, कोणी सर्व सुट्टींचे दिवस खर्ची घालतो, व हळूहळू प्रत्येकामध्यें शारीरिक व्यायामाची अनास्था उत्पन्न होत जाते. या अनास्थेचेंच अखेरीस सर्वप्रकारें प्राबल्य होतें. घरोघर मुलें आहेतच, तेव्हां वर्गांत निम्मेच्या आंत नंबर टेवणारास घरीं किती वेळ खर्चावा लागतो हें पाहण्यास कोणाही पालकास लांच जावयास नको; व ह्मणून या गोष्टीविषयीं प्रत्यंतरें सांगण्याची गरज नाहीं. मूळ शिक्षणपद्धतीच सर्वतोपरी दोषी आहे; तीमुळें मुलगा घरीं जितकी तयारी करील तितकी शिक्षकास मदतच होते; प्रत्यहीं शिक्षक उत्तेजन देऊन मुलांकडून घरच्या घरींच तयारी करवीत आहेत. या गोष्टींचा हा अनिष्ट परिणाम होय.

२३. वर्षारंभीं इयत्तेचे सर्व विषय डोळ्यापुढें ठेवून व त्यांपैकीं एक एक विषय घेऊन त्यांत महत्वाचें काय आहे, त्याच्या कोणत्या भागांचा पुढील इयत्तांत केव्हां व किती उपयोग होणार आहे, कोणता भाग सर्व आयुष्यक्रमांत उपयोगी पडणार आहे, व कोणता सर्वप्रकारें निरुपयोगी आहे, किंवा प्रसंगविशेषीं गरज लागल्यास पुस्तक आणून त्यांतून कोणासही पाहून घेण्यासारखा आहे— इत्यादि गोष्टी शिक्षकांनीं विचारपूर्वक ठरविल्या पाहिजेत. मग कोणता भाग एक दोन वेळां मुलांच्या कानावरून गेला म्हणजे बस्स आहे, कोणत्या भागाचें पुष्कळ विवरण करून तो पुनः पुनः मुलांच्या लक्षांत आणून दिला पाहिजे, कोणता भाग इतक्या महत्वाचा आहे कीं पुस्तकांत दिलेल्या शब्दांनींच तो मुलांस सांगतां आला पाहिजे व तेच शब्द योजण्याचें विशेष प्रयोजन काय हें मुलांस समजलेंच पाहिजे--इत्यादि गोष्टींचा त्यांस निर्णय करितां येईल. असें झाल्यावर मुलांकडून चालू वर्षांत कोणत्या गोष्टी समजावून घोकून घेतल्या पाहिजेत, कोणत्या त्यांस चांगल्या समजावून दिल्या म्हणजे झालें, व कोणत्या त्यांच्या कानांवरून गेलेल्या असल्या म्हणजे पुरे, इत्यादि स्वकर्तव्यांची व्यवहाररीत्या शिक्षकांस सीमा घालतां येईल. असें शिक्षकांनीं केल्यास मुलांचा श्रम किती हलका होईल हें

कोणाही सुज्ञ वाचकाच्या लक्षांत येईल. उदाहरणार्थ, प्रथम गणित विषय घेऊं. या विषयांत घोकंपट्टी कांहीं कमी आहे, कारण गणिताच्या भिन्न भिन्न भागांतील पाहिजे तेथील उदाहरणें मुलांस सोडवितां आलीं पाहिजेत; तेव्हां त्यांस उदाहरणें करण्याच्या रीतींचा चांगला बोध झालाच पाहिजे. व शिक्षक हा बोध करून देण्याकरितां जितकी मेहनत घेईल, जितकीं भिन्न प्रकारचीं उदाहरणें सांगेल तितकें इष्ट असतें. परंतु पुस्तक नेमून दिलें कीं शिक्षकास तत्क्षणीं जोर येतो. ज्यांस रीति समजलेल्या नाहींत त्यांकडूनही उदाहरणें करवून, लिहवून, पाठ करवून घेण्याचा त्याचा क्रम सुरू होतो, व स्वतःची मेहनत टाळण्यास त्यास फुरसत सांपडते. नेमलेलें पुस्तक तयार करविणें हें त्याचें काम होतें; मुलांस विषयाची समजूत पाडून देणें, हें एक गौणकर्तव्य असल्याप्रमाणें त्यास भासतें. भूमिति आणि बीजगणित यांच्या शिक्षणांत असा प्रकार विशेष घडतो.

परंतु दुसरा विषय इतिहास हा घेऊं. मुलें अल्पवयस्क आहेत तोंपर्यंत त्यांस इतिहास शिकविण्याचा हेतु काय असावा, याविषयीं इंग्लंडांत व युरोपिय देशांत पुष्कळांनीं मोठा वादविवाद केला आहे, व तदनुरूप शिक्षणपद्धति सुधारावी ह्मणून नवीन पुस्तकमालाही प्रसिद्ध केल्या आहेत. बहुतेक विद्वानांचें असें मत झालें आहे कीं, जोंवर मुलें बाल्यावस्थेंत आहेत,–ह्मणजे जोंवर तीं अनेक राजकारणी प्रश्नांचा स्वतः विचार करून दूरवर दृष्टी देऊन कोणतें चांगलें व कोणतें वाईट या गोष्टींची पारख करूं लागलीं नाहींत, जोंवर दुष्ट मनोवृत्ति व दुष्ट साधनें यांचा उपयोग करून अखेरीस चांगलेच परिणाम झाले, तेव्हां त्या मनोवृत्ति व तीं साधनें जरी व्यक्तिपरत्वें प्रशंसनीय नसलीं तरी राष्ट्रदृष्ट्या हितावह गणिलीं पाहिजेत, इत्यादि कोट्या त्यांच्या मनावर बिंबविणें इष्ट नसतें–तोंवर मुलांस देशांत निपजलेल्या थोर पुरुषांचीं चरित्रें वाचावयास लावणें, त्यांचीं अनुकरणीय कृत्यें, उत्कृष्ट विचार व उत्तम मनोवृत्ति एवढ्यांचाच निर्देश करून मुलांच्या मनांत उदात्त मनोवृत्ति व थोर कृत्यें करण्याची महत्वाकांक्षा व निश्चय उत्पन्न करणें, याहून विशेष उद्देश इतिहासाच्या शिक्षकानें मनांत बाळगण्याची गरज नाहीं. इतिहासाचीं पुस्तकें याच उद्देशानें लिहिलेलीं असावीं, व असा इतिहास शिक्षकानें सांगून सांगून मुलांच्या मनावर बिंबवावा, तो त्यांकडून वाचवावा, परंतु तो शुद्ध पाठ करविण्यांत जो मुख्य उद्दिष्ट हेतु तोच नष्ट होतो, तेव्हां तसें कदापि करवूं नये. असें हें तिकडील विद्वानांचें मत आहे, परंतु इकडे आमच्या शाळांत पहावें तों कांहीं विलक्षण स्थिति आढळते. प्रत्येक वर्षीं कोणता तरी एक इतिहासाचा भाग शिकविला जातो; तत्संबंधीं नेमलेल्या पुस्तकांत मुलाच्या मानसिक शिक्षणास उपयोगी असें कांहींच नसतें, व तें वाचल्यावर पुढें त्याचा आजन्म उपयोग होण्याचा संभव नसतो. (अशा

उपयोगाच्या दृष्टीनें तो कालेजांत किंवा अन्यत्र पुनः वाचणें भाग पडतेंच.) ज्ञान, उद्योग आणि सदाचार या सुधारणामूलक त्रयींचा देशाच्या सुस्थितीवर झालेला परिणाम कोठेंही मुलांच्या मनावर बिंबेल अशा तऱ्हेनें त्यांत सांगितलेला नसतो. अशा इतिहासाच्या पुस्तकाच्या द्वारें मी काय शिकवूं असें शिक्षकास होतें, व तो शुद्ध घोकून घेण्यास आरंभ करितो ! मग या इतिहासाच्या पाठांतरापासून फायदा होणें तो एकीकडेच राहिला, केवळ मानसिक शक्तींस क्षीणता आणण्याच्या कामीं हा वृथाश्रम साहाय्यभूत होतो. जे कोणी इतिहासाचे कट्टे भोक्ते असतील त्यांनीं या स्थितीचा विचार करावा. फौजदारी खटल्यांत जेव्हां दोन्हीं बाजूंनीं पांच पंचवीस साक्षीदार असतात, तेव्हां तो खटला सेशनांत चालवायास जाणारा हुषार वकील जशी खटल्याची तयारी करून जातो, त्याप्रमाणें वर्षभर घोकून घोकून मुलांनीं इतिहासाची तयारी करावी कीं काय ? व ज्याप्रमाणें खटला संपतांच वकील त्याविषयीं माहिती विसरून जातो, तसेंच प्रतिवर्षीं वरच्या इयत्तेंत जातांच पूर्वी केलेला सर्व इतिहास मुलांनीं विसरून जावा काय ? न विसरून जावा तर करावें तरी कसें ? इतिहासाचें ज्यास मुळींच ज्ञान नाहीं असा मुज्ञ तरुण मनुष्य मुलांच्या जागीं आहे असें समजून या वार्षिक शिक्षणानें त्यावर कोणते हितकारक परिमाण होतील, या गोष्टीचा तरी कोणी कां विचार करीत नाहीं ? या विषयाचीं पुस्तकें तयार करण्याची व तीं शिकविण्याचीही कोण विलक्षण पद्धति होय ! मुलांस जें ज्ञान द्यावयाचें त्याचा मनावर झालेला संस्कार पुढें आयुष्यक्रमांत, व्यवहारांत, संभाषणांत किंवा नवीन ज्ञान संपादन करण्याच्या कामीं उपयोग होईल असें तें ज्ञान असलें पाहिजे. मुलांनीं वर्षभराच्या श्रमानें प्राप्त करून घेतलेलें घोकंपट्टीचें ज्ञान पुढें दोन चार महिनेही टिकत नाहीं व जन्मांत त्याचा त्यांस उपयोग होत नाहीं, असें जर धडधडीत दिसत आहे तर त्याकरितां मुलांस क्षीण व निर्बुद्ध करणें हें किती अविचाराचें काम होय !

भूगोलाची हीच स्थिति. मराठी तिसऱ्या इयत्तेंतील मुलगा जणूं काय चेलिफाच्या किंवा तालुका पोस्टांतील कारकुनाच्या जागेस तयार केला जात आहे ! चौथ्या इयत्तेंत तो गेल्यावर मागचें सर्व शिकलेलें फुकट; मग तो इलाख्याच्या पोस्टल इन्स्पेक्टरच्या जागेस तयार केला जातो; इत्यादि. कालेजांतून बाहेर पडल्यावर जो चांगला माहितगार मनुष्य म्हणून समजला जातो, त्याजवळ भूगोलाची किती पुंजी शिलक असते, व ती तेवढी राखून ठेवण्यास त्यानें भूगोल घोकण्यांत किती वेळ घालविला असतो या गोष्टीचें प्रमाण पाहिल्यास आमच्या निरर्थक श्रमांचें आश्चर्य वाटतें. वास्तविक पाहतां हें अवशिष्ट भूगोल विद्येचें ज्ञान पूर्वीच्या पाठांतराचा परिणाम असेंच केवळ म्हणतां येत नाहीं. कारण मध्यंतरीं इतिहासांतील प्रसिद्ध स्थळांविषयीं माहिती होते; कांहीं प्रवास घडतो;

कोठें दंगा धोपा होनो; व्यापाराच्या वस्तूंचीं कांहीं ठिकाणें कारणपरत्वें लक्षांत राहतात; वर्तमानपत्रांत कित्येकांचा उल्लेख येऊं लागतो; क्वचित् ज्योतिषशास्त्राच्या माहितीकरितां भूगोलाकडे पुनः लक्ष जातें; इत्यादि अनेक गोष्टी त्या अवशिष्ट ज्ञानास कारणीभूत होतात. भूगोलांतून स्थलें केवळ घोकून घेतल्यावर तीं पुढें ध्यानांत राहतील व प्रसंगीं तें ज्ञान कामीं येईल असें समजणें ह्मणजे स्मरणशक्तीच्या अंतर्गत क्रियेसंबंधीं अज्ञान प्रकट करणें होय. स्मरणशक्तीकडून ज्या गोष्टीचें चांगलें ग्रहण होतें ती क्वचित्च शुद्ध एकाकी असते, ती स्मरणांत राहण्यास इतर गोष्टींशीं तिचा निकट संबंध जडला पाहिजे, मग त्या सर्व गोष्टी मनांत एकत्र गुंफिल्या जातात, व त्यांच्या परस्पर सहवासानें एक दुसरीची आठवण करून देते. मुलांस ज्ञानप्राप्ती करून देतांना जुन्या व नव्या ज्ञानाचें याप्रमाणें गुंफन करीत गेलें पाहिजे. कोणासही मानसिक शक्तींची अपार देणगी नाहीं हें जाणून, शुष्क व निरुपयोगी ज्ञान रगड सांठविण्याचा कोणींही आरंभीं तरी प्रयत्न करूं नये. मौल्यवान् रत्नें, वस्त्रालंकार, सोनें नाणें, व दाम दुप्पट करून देणारे दस्तायवज भरून झाल्यानंतर, मग जागा राहिल्यास खजिन्याचे पेटींत जुनीं पानीं दप्तरें व रद्दीचे रुमाल देखील भरल्यास हरकत नाहीं. परंतु रद्दीचे रुमाल हाताशीं आहेत ह्मणून तेच आधीं भरून टाकून मौल्यवान् पदार्थांस जागा न ठेवणें किंवा ते वरच्यावर कसे तरी कोंबून त्यांची घाण करणें अशा वर्तनास कोण समंजसपणाचें समजेल ? (भूगोलाच्या शिक्षणासंबंधानें हल्लीं युरोपीय विद्वानांचें अगदीं निराळें मत झालेलें आहे, व त्या मतास अनुसरून नवीन भूगोलविषयक क्रमिक पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं आहेत.)

याप्रमाणें या गोष्टी कित्येक शिक्षकांच्याही लक्षांत आलेल्या आहेत. परंतु त्यांचें ह्मणणें असें पडतें कीं " जर चालू रीतींनीं भूगोल व इतिहास आह्मीं तयार करून घेतला नाहीं तर वर्ष अखेरीं इन्स्पेक्टर, डेप्युटी व त्यांच्या हाता सालची सेना जेव्हां शाळेवर हल्ला करायास येते तेव्हां आह्मांजवळ आत्मसंरक्षणाकरितां दारूगोळ्याची व शुद्ध धुराळ्याची यथेष्ट सामग्री असायास नको काय ! प्रश्नास उत्तर खडाखड, नाहीं तर डोळ्यांत टाकण्यास धूळ, अशा तयारीनें जेव्हां आह्मी बसतों, तेव्हां आमचा बचाव होतो. वर्षांत आह्मीं रोजच्या रोज ज्यांशें दोनशें शाम्फाइटी करितों त्यांचें चीज वर्षअखेरच्या पांच चार दिवसांच्या खऱ्या लढाईंत होतें. परीक्षक उंच डोंगरमाथ्यावरून दणादण पावलें टाकीत वेगानें अंगावर येतात, आह्मी खालीं कोंडवाडयांत बसलेले असतों. फार झालें तर आह्मी आपला बचाव करूं शकतों, परंतु आमची सरशी होण्याचा मुळींच संभव नसतो; याकरितां आपली अगदींच धुळधाण न उडे इतका बंदोबस्त करणें, एवढेंच आमचें काम असतें. "

ज्या कोणा शिक्षक व परीक्षक यांमधील ही लढाई प्रत्यक्ष पाहिली असेल व

ज्यांनीं घायाळ होऊन परत आलेल्या आपल्या मुलांचें कसें तरी समाधान केलेलें असेल, त्यांस या वरील वर्णनाचें आश्चर्य वाटणार नाहीं. विद्यालयांत नेमिलेले शिक्षक आणि परीक्षक यांमध्यें अहिनकुलयोग कां असावा हें समजत नाहीं. या गोष्टीस कांहीं थोड्या सुज्ञ लोकांचे अपवाद आहेत हें खरें, परंतु त्यांच्या सुज्ञतेचा उपयोग काय ? शिक्षण कसें असावें, व परीक्षेंत काय विचारावें याविषयीं सर्वत्र सारखाच अंधार आहे. विचाऱ्या मुलांचा या स्थितीमुळें " जे वुको हुडुवुद्धेन " या न्यायानें चुराडा उडत आहे !

सारांश हा कीं, मुलांनीं घोकावें काय, समजून काय घ्यावें, व ऐकून काय ठेवावें, इत्यादि गोष्टींचा शिक्षकवर्गानें व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं विचार केलेला नसतो. शिक्षण व परीक्षण, दोन्हीही सांप्रतच्या विद्वज्जन मतास विरुद्ध अशा प्रकारें चालत आहेत. ही स्थिति प्राथमिक शाळेंत विशेष दिसते; इंग्रजी शाळांमध्येंही तिचा बराच अम्मल आहे, व ती अजीबात नाहीं असा शिक्षणक्रमाचा फार थोडा भाग उरला आहे. पाठ येणें ह्मणजेच समजणें असा अर्थ तूर्त मान्य झालेला दिसतो, व ह्मणून पाठ करून घेण्यास विलक्षण महत्व आलेलें आहे. इंग्रजी भाषेंत सर्व प्रश्नांचीं उत्तरें देणें कठीण आहे, यांत संशय नाहीं; व तीं सुलभपणें देतां यावीं ह्मणून घोकंपट्टीस विशेष उत्तेजन आलें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु इंग्रजी भाषेंत उत्तरें देण्याचें सुलभ करण्याचा हा एकच मार्ग आहे काय ? व तो श्रेयस्कर आहे काय ? या गोष्टींचा विचार समंजस शिक्षकांनीं करायास नको काय ? जर ही अडचण दूर करण्याचे दुसरे कांहीं विचार सुचतील तर ते वरिष्ठ अधिकाऱ्यांस सुचविणें, त्यांचा ऊहापोह करणें, त्यांविषयीं प्रयोग करून पाहणें, हें इंग्रजी शाळांच्या हेडमास्तरांचें काम नव्हे काय ? परंतु या बाबतींत मनःपूर्वक प्रयत्न कोणीं केल्याचें पाहण्यांत नाहीं. प्रत्येकास आपण एकाकी अरण्यांत पडल्यासारखें वाटत आहे, व वरिष्ठ अधिकारी अनुकूल होण्यासारखे असूनही या व्यक्ति हताश असल्याप्रमाणें दिसत आहेत. कित्येकांस ही निरुद्वेग अरण्यवृत्तिच प्रिय झालेली आहे, व ह्मणून हें शिक्षणाचें रहाटगाडगें आहे तसेंच फिरत राहील तर त्रासावांचून पेन्शनचीं वर्षें भरतील, अशा स्थिर विचारानें हल्लींच्या सर्व व्यवस्थांचें हे वृद्धकपि मंडन करीत आहेत !

२४. वृद्धतरुण शिक्षकांनीं शिक्षणाच्या कामीं जे विद्यार्थ्यांवर उपकार केले आहेत ते पद्धति सुधारण्याचे नव्हेत, तर ते निराळ्या प्रकारचे आहेत. अनेक शिक्षकांनीं आपआपल्या योग्यतेप्रमाणें घोकण्याच्या विषयांचीं रीतसर पुस्तकें लिहिलीं आहेत. मराठी पहिल्या पुस्तकाच्या अर्थान्वयापासून तों माक्मार्डी व शेफर्ड यांच्या इंग्रजी इडियमांच्या पुस्तकांपर्यंत अनेक पुस्तकांची मालिका उत्पन्न झालेली आहे, व विद्यार्थी तिचा सर्वत्र उपयोग करूं लागले आहेत. अखेरीस परिणाम असा दिसतो कीं मुलांचें वाचन अत्यंत कमी, त्यांस व्यावहारिक कामांत

इंग्रजी बोलतां येण्याची मुष्कील; परंतु नुसत्या इंग्रजी इडियमा वगैरे तय्यार ! ज्यांनीं हीं इडियमांचीं पुस्तकें पाहिलीं देखील नाहींत त्यांइतपतही मुलांस चांगलें इंग्रजी सहजगत्या लिहितां न येवो, वाक्यांतील शुद्धाशुद्धें पाठ झाल्यावर त्यांचा लेखनवाचनावर कांहींही इष्ट परिणाम न होवो, हीं इतकीं पुस्तकें घोकून झालींच पाहिजेत ! या सर्व पुस्तकांचा चाह्यात्कारी दिसणारा मुख्य उद्देश **मुलांस विषय सोपा करण्याचा** असतो; परंतु खरोखर पाहिलें असतां **शिक्षकांचा मार्ग सोपा करून त्यांस आळशी करणें,** याहून अधिक उपयोग त्यांपासून होत नाहीं. ह्मणूनच हीं पुस्तकें नेमण्याविषयीं शिक्षकांची जितकी आतुरता दिसते तितकी मुलांची कधींही नसते. या गोष्टीचा प्रत्यय कोणासही सहज घेतां येईल.

मुलांचा व शिक्षकांचा याप्रमाणें हा निष्फळ प्रयास अतिदीर्घ काळ चालू राहिल्यामुळें अशी एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते कीं **मुलें निर्बुद्ध व जिज्ञासाहीन होऊन त्यांची शिक्षणाच्या विषयांतील गोडी नाहींशी होते.** इंग्रजी शाळांतील वरच्या इयत्तांत शिक्षकानें मनःपूर्वक विषय समजावून देण्यास आरंभ केल्यावर अखेरीस त्यास मुलांकडून जो प्रश्न येतो तो हा कीं, " मास्तर यांतलें पाठ कोणतें करायाचें तें सांगा. " या अशा प्रश्नानें चांगल्याही शिक्षकाची उमेद खचते असें माझ्या पाहण्यांत आहे. " नंबर दिले नाहींत तर तें शिकविणें कशाचें हो? लेक्चरें देऊन मुलांस काय फायदा? " असें ह्मणून या उमेदवार शिक्षकास खालीं पहायास लावणारे दुसरे अनुभविक शिक्षक असतातच ! यामुळें कोणताही नवीन विषय शिकविण्यास आरंभ करितांच मुलांची बुद्धि जणूं काय त्याचें उत्सारण करिते; व त्या विषयाची खरी समजूत करून घेण्याविषयीं फार थोड्यांमध्यें उत्साह दिसतो. समजूत करून घेण्यांत गेलेला वेळ फुकट असें जुने मठ्ठ विद्यार्थी प्रतिपादीत असतात, व हा विषय कशाचा समजतो असा ते नव्या मुलांचा ग्रह करून देतात. शिक्षक जुना असल्यास त्याचेंही बहुधा तसेंच मत असतें. त्यामुळें काय स्थिति होते ? प्रयोगावांचून रसायनादि शास्त्रें शिकविणें; दुर्बिणीवांचून व साध्या डोळ्यांनीं आकाशाकडे एकवारही पाहिल्यावांचून ज्योतिषाचीं मूलतत्त्वें समजावून देणें, या गोष्टी कोणास अशक्य वाटतील; परंतु पुष्कळ शिक्षक व त्यांनीं तयार केलेलीं मुलें या गोष्टी पूर्णपणें शक्य आहेत अशी साक्ष देतील ! जर शिक्षकानें काय पाठ करायाचें हें स्वतः सांगितलें नाहीं, तर तें दाखविणारीं प्रश्नोत्तररूप पुस्तकें मुलांस उपलब्ध असतातच; व त्यांचा जारीनें खप सुरू आहे. या रीतीनें वरच्या इयत्तांतील मुलें आपापलें काम करून घेतात, व शाळेंतील शिक्षणासंबंधानें हळू हळू बेफिकीर होतात, ही गोष्ट सर्वांस माहित असावी. कोणी ह्मणेल दिलेल्या शिक्षणापेक्षां परीक्षा पास कशी होईल हा विचार मुलांस अधिक महत्वाचा वाटतो, त्यामुळें अशी त्यांची स्थिति होते. ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे; परंतु विषयांतील गम्य व गोडी नाहींशी होणें हा परिणाम परीक्षा दूर

असतांच दिसून येतो; व तो बुद्धि व जिज्ञासा यांच्या ऱ्हासाचा निदर्शक आहे. बारा वर्षांच्या अभ्यासानंतर म्याट्रिक्युलेशन किंवा यू. एम्. एफ्. सारख्या परीक्षेच्या वेळीं मुलांची त्रेधा उडून जावी, व शाळेंत आरंभापासून शिकलेल्या विद्यार्थ्यांपैकीं सरासरी तृतीयांशासही परीक्षेंत यश येऊं नये, व परीक्षेंतून पास होणाऱ्यांचेंही ज्ञान अत्यल्प, जिज्ञासा नष्ट झालेली, अवलोकनशक्ति मुळींच नाहीं, अशी स्थिति असावी, ही गोष्ट शिक्षणक्रमांत मुळापासून दोष असल्याखेरीज संभवत नाहीं. सर्व हिंदुज्ञातींमध्यें जो वर्ग बुद्धिमान् ह्मणून गणिला जातो, व ज्याची बुद्धि अल्पवयांत मोठी होतकरू दिसते, त्या वर्गाची परीक्षेंत, व तशीच परीक्षेच्या आधीं व मागून अशी निकृष्टता पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं ?

२५. म्याट्रिक. परीक्षेंत पास झालेले हे असे विद्यार्थी जेव्हां पुढें कालेजांत येतात, तेव्हां पूर्वशिक्षणपद्धतीचे अनेक दोष त्यांच्या अंगीं व्यक्त होतात. गणितांत ज्यांची बुद्धि चालते अशांची संख्या फारच कमी, त्यामुळें गणित विषयांतील भिन्न भागांची निव्वळ घोकून तयारी करणारेच फार; या बाबतींत विद्यार्थ्यांची निकृष्ट स्थिति पाहवतही नाहीं. संस्कृतासारख्या सुगम विषयांतही मुलांस भाषांतर सांगितलें पाहिजे; मग तें घोकून मुलें परीक्षेस तयार होतात. इंग्रजी व इतिहास या विषयांची तयारी होण्यास शिक्षकानें अथपासून इतिपर्यंत ' नोटा ' व सारांश काढून ते वर्गांत सांगत बसलें पाहिजे. हींच सर्व विषयांची स्थिति. नवीन विषयांत साहजिक गोडी नाहीं, विषय समजावून घेण्यापेक्षां 'पाठ काय करायाचें' हें समजावून घेण्याविषयीं अधिक उत्सुकता. व या अशा कामीं जो विद्यार्थ्यांस उत्तम मदत करील तो उत्तम शिक्षक ! ज्यांची स्मरणशक्ति बरी आहे ते बुद्धीचा अत्यल्प उपयोग करितात व पाठांतरांतच विशेष वेळ घालवितात असें दिसतें. गणिताचीं उदाहरणें देखील घोकणारे विद्यार्थी आहेत. शिक्षणाच्या विषयावरील भिन्न ग्रंथ हौसेनें वाचायाचे सोडून, वर्तमानपत्रें वाचण्यांत पुष्कळ वेळ घालविणारे व अखेरीस केवळ नोटांच्या घोटणीवर परीक्षेंत अवलंबून राहणारे विद्यार्थी थोडे नाहींत. या रीतीनें परीक्षेंतून पार पडणारे कितपत विद्वान् निघतात हें सांगावयास नको. प्रत्येक परीक्षेंत ब्राह्मण विद्यार्थ्यांसंबंधानें बुद्धीचा ऱ्हास कसा व्यक्त होतो हें पूर्वी सांगितलेंच. व हींच स्थिति जर अखंडपणें पुढें चालणार असेल तर ब्राह्मणज्ञातीच्या समूळ ऱ्हासाचा काळ दूर नाहीं असें ह्मटलें पाहिजे.

पंधरावीस वर्षांपूर्वी या ज्ञातीची अशी स्थिति नव्हती. 'ब्राह्मण बुद्धिहीन' असें त्यावेळीं कोणी ह्मणण्यास धजला नसता. संस्कृतासारखा सोपा विषय देखील जो घोकून तयार करी तो त्यावेळीं मोठ्या उपहासास पात्र होत असे; परंतु क्रमाक्रमानें ही उपहास्यतेची स्थिति सर्वसाधारण होत आहे, व ब्राह्मणांच्या बुद्धीच्या संबंधानें सुजाण लोकांसही शंका येऊं लागली आहे. हा प्रकार कोणास इष्ट वाटेल ? याकरितां या शिक्षणपद्धतीच्या संबंधानें कोणीही स्तब्ध

राहणें उचित नाहीं. ज्यास जो उपाय सुचेल, जेथें जो दोष दिसेल, तो व्यक्त करून एकदिलानें या कामीं सुधारणेस आरंभ केला पाहिजे; केवल दुराग्रह, दुरभिमान व आळस यांस बिलकुल थारा देतां कामां नये.

२६. माझ्या मतें सांप्रतच्या शिक्षणपद्धतीचे हे दुष्परिणाम होत. ही शिक्षणपद्धति जों जों अधिक अमलांत येत आहे तों तों हे दुष्परिणाम बळावत आहेत. हल्लीं शाळांची कमी अधिक उत्कृष्ट स्थिति या पद्धतीच्या कमी अधिक पूर्णतेवरून मोजली जाते; त्यामुळें ज्या शाळा अत्यंत उत्कृष्ट गणिलेल्या आहेत, त्यांत हा बुद्धीच्या ऱ्हासाचा परिणाम विशेषंकरून घडलेला दिसतो. उत्कृष्ट शाळेंत जे उत्तम ठरलेले विद्यार्थी ते कालेजांत असतां व त्यांतून बाहेर पडतांना फार खालीं गेलेले दिसतात; जे शाळेंत मंद ठरलेले किंवा कमी प्रतीच्या शाळांतून आलेले, ते त्यांच्यापुढें जातात. मराठी शाळांतून इंग्रजी शाळेंत मुलें येतात, तेव्हां त्यांमध्येंही हाच विपरीत परिणाम झालेला आढळतो. शर्यतींतील घोड्याप्रमाणें जो आधीं पुढें तो सरशेवटीं मागें, अशी विद्यार्थ्यांची स्थिति आहे. परंतु कमी प्रतीच्या गणलेल्या शाळाही हळूहळू दुसऱ्यांच्या अनुकरणानें पुढें येण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याही चालू पद्धति बऱ्याच अंशीं अमलांत आणीत आहेत; व त्यायोगें मानसिक हानि करण्याच्या कामीं त्यांचेंही पाऊल पुढें पुढें पडत आहे. कोठेंही समाधान वाटण्यासारखी आतां जागा राहिलेली नाहीं.

शाळांच्या बऱ्यावाईट स्थितीचा निर्णय करणारे सर्व पालकजन एखाद्या विस्तीर्ण नदीमुखाशीं बसलेल्या प्रेक्षकांप्रमाणें आहेत. अनेक लहानमोठी मंडळी नदीमुखाशीं पोहून येत आहेत व खुशाल समुद्रांत शिरत आहेत असें पाहून ते थक्क होतात. त्यांस वाटतें या जोरदार गड्यांनीं नदीच्या उगमाशीं उड्या टाकिल्या असाव्या व हे आतां समुद्राच्या पैलतिरीं खास जाणार ! परंतु उगमापाशीं निघालेल्यांपैकीं कितीक गाळांत रुतले, कितीक डोहांत बुडाले, व कितीक थकून मध्येंच किनाऱ्यास लागले, हें त्या प्रेक्षकांस माहीत नसतें. व तसेंच जे मोठ्या हिमतीनें समुद्रांत शिरत आहेत, त्यांपैकीं वादळांच्या जोरानें खडकांवर आपटून कितीकांच्या हाडांचा चुराडा होईल, कितीकांस नक्रादि प्राणी वाटेंतच गिळून टाकतील, व कितीक 'हा किनारा दिसूं लागला' असें म्हणतां म्हणतां हातपाय थकून गटांगळ्या खाऊं लागतील, हें त्यांस समजत नाहीं. या मुखावाटें पुष्कळ येतात व पुष्कळ जातात एवढें पाहूनच ते संतुष्ट होतात. निघाले कोण व पोंहोंचले कोण हें पहाण्याइतकी दूरदृष्टि त्यांस नसते.

२७. आतां या अशा पालकांच्या संबंधानें विशेष विचार करितां असें दिसून येतें कीं, पहिल्यापासूनच ते अल्पदृष्टि; त्यांमध्यें दूरवर विचार व संततीची खरी काळजी मुळींच नाहीं. मुलाच्या शारीरिक व मानसिक सुस्थितीची, त्याच्या अभ्यासाची व त्यास मिळत असलेल्या शिक्षणाची ज्यानें सतत काळजी

वाळगिली असा पालक हजारांत एकादा सांपडेल ! श्रीमंत व गरीब, विद्वान् व अविद्वान्, शिक्षक, डाक्तर, वकील किंवा शुद्ध मजूर, कोणत्याही वर्गांतील पालकांमध्यें विचारपूर्वक व काळजीपूर्वक मुलांचें संगोपन करणारा असा मनुष्य फारच विरळा ! पालकांनीं सर्व भिस्त शिक्षकांवर टाकिलेली असते व शिक्षकांकडून फार मोठी तक्रार आली नाहीं किंवा मुलगा अगदींच अजारी पडून अंथरुणास खिळला नाहीं, तोंवर त्या बापड्याची कोणी काळजी करीत नाहीं. सर्व हेडमास्तरांचा याप्रमाणें अनुभव आहे, व त्यामुळेंच शाळेच्या बाहेर मुलांवर कोणाचाच दाब नाहीं अशी सर्वत्र स्थिति आहे. ज्या शिक्षणबाह्य गोष्टींविषयीं स्वतः पालक काळजी करीत नाहींत, त्यांची जबाबदारी आपण कशास घ्यावी असा शिक्षक विचार करितो; परंतु घराबाहेर मुलानें केलेल्या गैरवर्तणुकीचा दोष पालकाकडे न जातां तो शिक्षकाकडे जातो, असा हल्लीं अन्याय चालू आहे ! मुलांनीं अमुक प्रकारच्या सभांस जावें किंवा न जावें, गेलें तर तेथें वर्तन कसें ठेवावें, वगैरे गोष्टींचें शिक्षण पालकांकडून मिळालें पाहिजे व या बाबतींत पालकांचा निर्बंधच मुलांवर चालेल. जेथें मुलांची गैरवर्तणूक दिसते तेथें त्यांपैकीं कित्येकांचे पालकही असतात व शिक्षकही असतात. परंतु पालक नांवानिराळे राहून शिक्षकांवर दोषांचा भडीमार होतो ! वास्तविक पहातां मुलांकडून जी गैरवर्तणूक होते ती पालकांच्या दोषामुळें होतें. मुलें शाळेंत एकत्र झालीं असतां कोणत्याही प्रकारचें गैरवर्तन करा असा कोणीही शिक्षक उपदेश करीत नाहीं; किंवा अप्रयोजक मतांचें वर्गांत प्रतिपादन करीत नाहीं. परंतु मुलें घरीं गेल्यावर त्यांचे पालक काय करीत असतात ? वर्तमानपत्रांतील लेख वाचून, नंतर एकाची वाहवा व दुसऱ्याची निंदा, असा प्रकार मुलांदेखत ते चालवितात. अमक्याची भली फजिती उडाली, अमक्याची मुलांनीं भली टर केली, इत्यादि गोष्टी पाहून, वाचून किंवा ऐकून पालक आपला आनंद आपल्या मुलांदेखत प्रदर्शित करीत असतात. याप्रमाणें घरोघर होतें. ही गोष्ट जेव्हां कोणाच्या ध्यानांत येईल तेव्हां मुलांस घरचें शिक्षण कसें असतें याची त्यास कल्पना येईल. या प्रकारचें घरचें शिक्षणं व उत्तेजन असतां, मुलें टवाळ व दुर्वर्तनी झाल्यास नवल तें काय ? व त्याबद्दल शिक्षकांस दोष कां द्यावा ? या बाबतींत पुष्कळ अविचारी पुरुषांनीं शिक्षकांस दूषण दिलेलें त्यांनीं ऐकून घेतलेलें पाहून मला आश्चर्य वाटतें. जो कोणी याबद्दल बारीक विचार करील त्यास असें दिसून येईल कीं, सभेंत दुर्वर्तन करावें इतकें धैर्य फारच थोड्या मुलांमध्यें असतें; परंतु त्यांमध्यें जीं दोनचार मुलें फार टवाळ व धीट असतात त्यांनीं कांहीं कुचेष्टा केली कीं हंशा उत्पन्न करण्यास बाकीच्या मुलांचा मोठा जमाव कारण होतो. जरी मुलें सामान्यतः चांगल्या वर्तनाचीं असलीं, तथापि हा प्रकार घडणें अत्यंत साहजिक आहे; व या रीतीनेंच बहुधा थोडीं मुलें पुष्कळांची बेअब्रू करण्यास कारण होतात. अशा प्रसंगीं चांगल्या मुलांनीं

पुढें होऊन दुष्ट मुलांस दाबून टाकावें असें कोणी ह्मणेल, परंतु ही गोष्ट मोठ्या धैर्यवान् मुलांस किंवा थोरांसही साधण्यासारखी नाहीं. कारण जो दुर्वर्तनास आरंभ करितो, त्याच्या बाजूस केवळ गम्मत पाहणारांची संख्या प्रथमच जाऊन मिळते; त्यांची दंगल चालली असतां इतरांस सद्वर्तन दाखविण्यास अवकाशही मिळणें कठीण. जेव्हां मुलांच्या पालकांचीं मतें व नवीन प्रतिपादिलेलीं मतें यांमध्यें मोठें अंतर असतें, तेव्हां हा गैरवर्तणुकीचा प्रकार विशेष दृष्टीस पडतो. ही एकच गोष्ट देखील शिक्षकांचा निर्दोषीपणा दाखविण्यास पुरी आहे. या कामीं सर्व दोष पालकांचा व त्या पालकांच्या नायकांचा आहे असें सिद्ध करण्याची जरूर पडावी, हें मुद्दा ह्मणविणाऱ्या लोकांच्या संकुचित अवलोकनाचें फळ होय ! हें मुलांचें दुर्वर्तन वारंवार देशाभिमान व धर्माभिमान या सदराखालीं घातलें जाऊन अज्ञान लोकांकडून त्याचें मंडनही केलें जातें. तसेंच ज्या गोष्टी पालकांस संभावितपणें करितां येत नाहींत त्या मुलांनीं केल्याचा त्यांस आनंदच असतो. **सामान्यतः असें ह्मटल्यास चालेल कीं ज्या दुर्वर्तनानें पालकांच्या पदरास खार लागत नाहीं किंवा त्यांच्या धंद्यास अथवा प्रतिष्ठेस प्रत्यक्ष बाध येत नाहीं, त्या दुर्वर्तनाबद्दल ते हल्लीं पूर्णपणें बेफिकीर आहेत.** परंतु ही मुलांच्या वर्तनासंबंधानें त्यांची अनास्था एकीकडे ठेवून, मुलांच्या विद्याभ्यासासंबंधानें त्यांच्या अविचाराचे काय परिणाम होत आहेत तें पाहूं.

२८. मुलांस फार लहानपणीं शाळेंत घालायाचें, ही पालकांची पहिली चूक होय. लहान मुलांस घटका दोन घटका मौजेनें शिकवून आनंदी ठेवणाऱ्या शाळा या देशांत नाहींत; ज्या शाळा आहेत त्यांचें व त्यांमध्यें जी शिक्षणपद्धति चालत आहे, तिचें वर्णन पूर्वी दिलेंच. अशा शाळांत मुलें घालणें तीं थोडीं मोठ्या वयाचीं झाल्यावरच घातलीं पाहिजेत. शिवाय; लहान मुलांस शिकविणारे पुष्कळ शिक्षक अविचारी असतात व त्यांनीं मुलांस क्रूरतेनें वागविल्याचीं उदाहरणें प्रत्येकाच्या लक्षांत येण्याजोगीं आहेत, तेव्हां अशा माणसांच्या ताब्यांत कोंवळीं मुलें देणें फारच अविचाराचें होतें. परंतु इकडे फार. थोड्या पालकांनीं लक्ष दिलेलें आढळतें. मुलगा शाळेंत गेल्यावर पुढें त्यास कोणत्या रीतीनें वागवितात, कोणत्या पद्धतीनें शिकवितात, किंवा त्याकडून किती अभ्यास करवून घेतात, किंवा ते अभ्यास तो कसे, केव्हां व किती वेळ करीत असतो, या गोष्टींचा विचार करणारा पालक क्वचितच मिळेल. परंतु या अभ्यासक्रमांत मुलांच्या शरीराची हानि होत आहे, तीं वाढावीं तशीं वाढत नाहींत, व त्यांच्या तोंडावरील व डोळ्यांतील तेज कमी होत असतें या गोष्टीही नित्यावलोकनानें पालकांच्या लक्षांत येऊं नयेत, हें मोठें आश्चर्य नव्हे काय ! वार्षिक परीक्षेच्या सुमारास अत्यंत अभ्यास करून मुलें अजारी पडतात व पुढें तीं परीक्षेंत नापास होतात किंवा मुळींच परीक्षेस बसूं शकत नाहींत, अशा प्रकारची क्षीणता मुलांस आलेली पहात

असतां, ' मुलांस वरच्या इयत्तेंत कसेंही करून घालाच; नाहींतर तो काय करील तें सांगवत नाहीं ! ' असा शिक्षकांस आग्रह करणारे शेंकडों पालक आहेत; व जरी मुलाचा दुसऱ्या कोणत्याही बाबतींत त्यांनीं आग्रह चालूं दिला नाहीं, तथापि या एका बाबतींत मात्र मुलांचें व पालकांचें अगदीं एकमत दिसतें. विद्येच्या कामांत घाई केल्यानें फायदा होत नाहीं, सर्वप्रकारें नुकसानच होतें–म्हणजे मुलांच्या शरीराचें, त्यांच्या बुद्धीचें, त्यांच्या पुढील कर्तबगारीचें व अखेरीस त्यांच्या आयुष्याचें या रीतीनें नुकसान होतें व तें हल्लीं हरएक ठिकाणीं होत आहे– ही गोष्ट पालकांस केव्हां समजेल ती समजो. व ती पालकांच्या व शिक्षकांच्या द्वारें मुलांसही केव्हां कळेल ती कळो. हल्लीं या एका गोष्टीच्या अज्ञानानें सर्व ब्राह्मणजातीचा अस्खलितपणें ऱ्हास चालू आहे.

२९. गेल्या वीस वर्षांत शिक्षणपद्धतींत म्हणण्यासारखा फेर पडलेला नाहीं, जो फेर पडला आहे तो एवढाच कीं ती दुष्ट पद्धति विशेष जोरानें व क्रौर्यानें अमलांत आणिली जात आहे, व तीसच उपयुक्त अशीं साधनें उत्तरोत्तर वाढत चाललीं आहेत. याच पद्धतीनें जे लोक वीस वर्षांपूर्वीं शिकले त्यांच्या शरीराच्या वाढीस फारसा धक्का बसला नाहीं, कारण तेव्हां ही पद्धति इतकी प्रबळ नव्हती हें एक, व दुसरें हें कीं त्या वेळीं मुलें बरींच प्रौढ व समंजस झाल्यावर इंग्रजीच्या अभ्यासास लागत. परंतु उत्तरोत्तर शिक्षणपद्धति बळावत चालली व मुलें अधिकाधिक कोंवळ्या वयाचीं त्या पद्धतीखालीं येऊं लागलीं. या गोष्टीचा परिणाम असा घडलेला दिसत आहे कीं जो मागून येतो तो अधिकच खचतो, शरीरानें व तसाच बुद्धीनें. पूर्वी चार भावांत कशी आकाराची उतरण लागते ती सांगितलीच. या उतरणीचें कारण शोधणारानें ते चार बंधु कोणत्या वयांत इंग्रजी सहाव्या इयत्तेस येऊन पोहोंचले हें पहावें. अन्नवस्त्र, घरदार, पालक व दुसरी सर्व व्यवस्था एकच असतां, जेव्हां असें दिसतें कीं जो मुलगा अठरावे किंवा एकुणिसावे वर्षीं सहाव्या इयत्तेंत आला तो पुरा वाढलेला आहे; त्याचा धाकटा बंधु सोळावे किंवा सतरावे वर्षीं त्याच इयत्तेस येऊन पोहोंचला, तो शरीरानें पहिल्याहून कमी; त्याहून धाकटा तेरावे किंवा चौदावे वर्षीं त्याच इयत्तेस येऊन पोहोंचला, तो त्याहून कमी, इत्यादि. याप्रमाणें स्थिति घरोघर धडधडीत दिसत असतां विद्वान् पालकांचेंही तिकडे लक्ष जाऊं नये हें आश्चर्य होय ! सामान्यतः असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, मुलें एकाच कुटुंबांतील असोत किंवा भिन्न कुटुंबांतील असोत, तीं गरीब स्थितींतील असोत किंवा जहागिरदार असोत, त्यांची काळजी घेणारे मूर्ख असोत वा विद्वान् असोत, जीं फार अल्पवयांत विद्याभ्यासास लागलीं, व एकामागून एक इयत्ता चढत जाऊन इतरांच्या पुढें गेलीं तीं शरीरानें क्षीण झालेलीं, वाढीनें खुरटलेलीं, व अखेरीस बुद्धीनें व कर्तबगारीनें मंद पडलेलीं असायाचीं. या गोष्टीस अपवाद सांपडलाच तर

तो फार विरळा व अत्यंत बुद्धिमान् मुलांचा. एकाच वर्गीं शाळेंत असलेल्या मुलांची या बाबतींत तुलना करा, किंवा भिन्न भिन्न पिढ्यांतील मुलांची तुलना करा, या सिद्धांतास बाध येत नाहीं. असें असून जेव्हां मुलांस उत्तेजन देऊन पालक त्यांस शाळेंत पुढें पुढें ढकलतांना दिसतात, जेव्हां तीं क्षीण होवोत, अजारी होवोत, मंद होवोत, त्यांस जाचणी लावून पुढें ढकलण्याचा पालकांचा क्रम सुरू असतोच,–जेव्हां मुलें पुढें गेलीं ह्मणजे त्याविषयीं पालकांस मोठें कौतुक वाटतें,–परंतु ' हा इतक्या वयाचा असून एवढासाहो कां दिसतो ' असें पालकांस विचारतां ' त्याची चणच लहान, ' ' त्याची वाढच खुरटी ' असें मोठ्या समाधानानें ते उत्तर देतात,–तेव्हां त्यांच्या अविचाराचें मोठें आश्चर्य वाटतें ! परंतु या अविचाराची कमाल अद्याप सांगायाचीच आहे.

३०. या शहरांत हल्लीं अनेक लहान लहान इंग्रजी शाळा उत्पन्न झाल्या आहेत व प्रतिवर्षीं आणखी नव्या उत्पन्न होत आहेत; तसेंच प्रतिवर्षीं या शाळांतून दिलें जात असलेल्या शिक्षणास एक एक इयत्ता अधिक जोडली जात आहे. जी या शहरची स्थिति तीच क्रमेंकरून इतर शहरांसही यावयाचीच, व कदाचित् थोड्या अधिक प्रमाणानें आलेलीही आहे. या शाळांचे व्यवस्थापक ह्मरस्त्यावर मोठ्या जाहिराती लावून पालकांस कळवितात कीं ' एक वर्षांत तीन इयत्ता ' ' दोन वर्षांत पांच इयत्ता ' इत्यादि. अशा जाहिरातींस भुलून व वारंवार केवळ मुलांचा हेका पुरविण्याकरितां, पालक त्यांस त्या शाळांतून घालतात. त्यांस दुसरें आमिष असतें तें फीचें. फी काय ती ' चार आणे, ' ' सहा आणे, ' इत्यादि. पालक आपल्या मनाशीं विचार करितो कीं, " हे नवीन शाळा काढणारे इतके अभ्यास एवढ्या थोड्या दिवसांत संपवून देणार, आं ! जेथें दुसरे पांच तास शिकवितात तेथें हे कदाचित् सहा किंवा सात तास शिकविणार असतील, असें असून फी कायती चार आणे किंवा सहा आणे. इकडेच मुलास घालूं या. कोणत्याही योग्यतेच्या मुलास कांहींही शिकवायास सांगा, या व्यवस्थापकांची तयारी दिसते,–हा यांचा दुसऱ्यांपेक्षां विशेष गुण समजला पाहिजे, व मुलगा वरच्या इयत्तेंत चढविण्याबद्दल फार झालें तर प्रसंगीं थोडी विशेष फी मात्र मागतील, परंतु मग त्यांची बिलकुल खळखळ नाहीं ! "

अशा विचारांनीं दोन चार आणे फीचा फायदा पाहून, मुलगा मटासट वर जात आहे या गोष्टींत समाधान मानून, अखेरीस फसणारे शेंकडों सांपडतील. व त्यांमध्यें पहिल्या भागाच्या शेवटीं सांगितलेल्या जुन्या वृद्ध माणसांचा भरणा मोठा आहे. कोणी असा विचार करीत नाहीं कीं विद्या ही नुसती ठोकठोकून डोक्यांत भरण्याचा पदार्थ नाहीं व मुलें ह्मणजे केवळ घाण्याचे बैल नाहींत. आपणांस कोणीं सांगितलें कीं, "अहो तुमच्या या एवढ्याशा अंगणांत मी पांच खंडी दाणे उत्पन्न करून देतों, मला पोटापुरती मजुरी मात्र आगाऊ द्या ह्मणजे झालें, मी

दुसरें कांहीं मागत नाहीं." तर आपण छदामही आगाऊ देणार नाहीं, उलट असें सुचाविणारास मूर्ख ह्मणूं. परंतु " अहो तुमच्या या मुलाच्या डोक्यांत मी पंचवीस पुस्तकें एका वर्षांत घालून देतों, फी थोडीच, परंतु ती आगाऊ द्या ह्मणजे झालें." असें सांगतांच पुष्कळ पालकांस भुरळ पडते, व " हीं घ्या मुलें, करा काय पाहिजे तें, " असें ह्मणण्यास ते तयार होतात. पुढें जेव्हां याप्रमाणें या शाळांतून मुलें तयार होऊन दुसऱ्या वरिष्ट शाळेंत जातात, तेव्हां त्यांचे जे हाल होतात, परीक्षेंत त्यांस जे धक्के बसतात, ते पाहूनही पालकांचे डोळे उघडत नाहींत. व दुसऱ्या मुलांसंबंधानेंही त्यांचें तसेंच वर्तन सुरू असतें. शिकवायाचें किती वेळ व घरीं अभ्यास तरी किती वेळ करावयाचा, या विषयासंबंधानें शिक्षकांत किंवा पालकांत कांहीं विचार असेल असें कोठें दिसत नाहीं. शिक्षणाच्या काळासंबंधानें पुढें निराळा विचार केला आहे, ह्मणून तूर्त येथें शिक्षक व पालक यांच्या दृष्टीनें शिक्षणास कोणतीं साधनें आवश्यक आहेत या गोष्टीचा थोडा विचार करूं.

३१. मुलगा इंग्रजी सातवे इयत्तेंत येईपर्यंत पुस्तकावांचून दुसरें कोणतेंही साधन शिक्षणास अवश्यक नाहीं, असा सर्वसामान्य समज आहे; व कोणत्याही इतर साधनावांचूनच येथपर्यंत मुलाची विद्या होते. सातवे इयत्तेंत आल्यावरही शास्त्रशिक्षणास जीं उपकरणें लागतात तीं असलीं तर बरीं, परंतु नसलींच तर आडत नाहीं, असें बहुतेक शिक्षकांचें मत आहे; व पुष्कळ शाळांत हीं उपकरणें फारसा उपयोग होईल अशा स्थितींत नाहींत, व शिक्षकही त्यांचा उपयोग करण्याइतके हुषार नेमिलेले नाहींत. कोणताही विषय असो, शिक्षणपद्धति कोणत्या प्रकारची असते हें पूर्वी सांगितलेंच, व त्या पद्धतीच्या अनुरोधानें पाहतां ही सर्वसाधारण स्थिति पाहून कोणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं! शिक्षक, पुस्तकें व मुलें किंवा मुलांचीं तोंडें, इतकीं एकत्र होतांच विद्यावृद्धीस आरंभ होतो. मुलांस ईश्वरानें जीं ज्ञानसंग्रहाचीं साधनें दिलीं आहेत, त्यांपेकीं सर्वांत अमोलिक देणगी ह्मटली ह्मणजे घोकण्यास तोंडें दिलीं आहेत ही, व हिच्या खालोखाल त्यांस जी थोडीबहुत स्मरणशक्ति दिलेली असेल ती. मुलांनीं विषय मनःपूर्वक घोकल्यावर त्यांच्या तो ध्यानांत राहूं नये याविषयीं पुष्कळ शिक्षकांस आश्चर्य वाटतें ! व ते त्यांस कडक शिक्षा करितात. मुलांच्या स्मरणशक्तींत अंतर असेल, किंवा स्मरणशक्ति जागृत होण्यास घोकण्यावांचून दुसरें कांहीं साधन असेल, ही कल्पना फार थोड्यांस असावी. विद्यादानाच्या कामीं कोणत्या ज्ञानेंद्रियाचा कसा उपयोग करावा या गोष्टीचा ज्यानें विचार केला आहे व तदनुरूप आपली शिक्षणपद्धति ठेविली आहे, व शिक्षणसाधनें जुळविलीं आहेत, असा शिक्षक सांपडणें कठीण. पूर्वशिक्षणाचा मुलांवर बहुधा असा परिणाम झालेला असतो कीं त्यांस असा शिक्षक मिळाला तथापि त्याचे गुण व योग्यता हीं समजणार नाहींत. या बाबतींत जर शिक्षकांत एवढा अंधार, तर पालकांत ——

अधिक असल्यास आश्चर्य तें काय ? पालकांस सर्व शाळा सारख्याच झाल्या आहेत; मग मुलें खुरटीं, अजागळ, मंद बुद्धीचीं व कुचकामाचीं निघाल्यास त्यांत नवल तें कोणतें ?

३२. मुलांस शिकवितांना त्यांच्या सर्व ज्ञानेंद्रियांचाच केवळ नव्हे, तर सर्व अवयवांचाही साधेल तर उपयोग करून घेतला पाहिजे, व विशेषतः त्यांची कल्पनाशक्ति नित्य जागृत राहील अशा तऱ्हेनें शिकविलें पाहिजे, हें तत्त्वही पुष्कळ, किंबहुना बहुतेक शिक्षकांस, माहित नाहीं. शिक्षणविषयासंबंधानें नवीन नवीन कोणते अनुभव येत आहेत, कोणत्या नवीन कल्पना निघत आहेत, इत्यादि गोष्टींचें अवलोकन ठेवणारा कोठें क्वचित् एखादा आढळेल. भाषेचें ज्ञान पक्कें होण्यास तें कानावरून पुष्कळ वेळां गेलें पाहिजे, हें तत्त्व हल्लीं सर्वत्र ग्राह्य झालें आहे, परंतु त्याचा इकडील शिक्षक लोकांस पत्ताही नाहीं. पुष्कळांचा असा अनुभव आहे कीं, गुजराथेंत कांहीं दिवस मुलें राहिलीं तर त्यांस आपोआप गुजराथी बोलायास येऊं लागतें; कर्नाटकांत राहिल्यास कानडी येऊं लागतें, परंतु असें कां होतें याचा फारच थोडयांनीं विचार केलेला आहे. वास्तविक पाहतां मराठी भाषा जितकी कानडीहून निराळी आहे तितकीच ती इंग्रजीहून निराळी आहे. परंतु कानडीचें ज्ञान कोणी न शिकवितां अल्पवयस्क मुलांस होतें व इंग्रजीचें करून देण्यास महत्प्रयास पडतात, या गोष्टीचा कोणीं विचारच केलेला नाहीं; तेव्हां ज्या रीतीनें मुलें कानडी शिकतात त्याच रीतीनें इंग्रजी शिकविण्याचा कांहीं थोडाही प्रयत्न ते कोठून करणार ! स्टेशनावर सिग्नलरचें काम करणारे व गार्ड, ड्रायव्हर, वगैरेशीं मात्र बोलण्याचा प्रसंग असलेले लोक आपले विचार पटापट इंग्रजींत बोलण्यास जसे तयार होतात, तितपतच बोलण्यास मुलगा सात वर्षें इंग्रजीचा यथास्थित अभ्यास करून तयार होत नाहीं. याचें कारण हेंच कीं केवळ स्मरणशक्तीच्या जोरानें भाषेचें चांगलें ज्ञान होत नाहीं व घोकंपट्टी या कामास फारशी फायद्याची होत नाहीं. मुलांस जसें येईल तसेंच इंग्रजी बोलायास लावणें व त्यांचें मनोरंजन होईल असें त्यांशीं इंग्रजींत बोलणें, हा भाषाज्ञान करून देण्याचा मुख्य मार्ग इंग्रजी शाळांतून जेव्हां सुरू होईल, तेव्हां इंग्रजी शिकविण्याचे पुष्कळ श्रम कमी होतील. कांहीं गोष्टींत मुलांस गम्मत वाटत आहे, त्यांची ती लवकर ऐकण्याची उत्सुकता आहे, अशा वेळीं ती गोष्ट इंग्रजींत सांगितल्यास, मुलें कल्पनेनें तेव्हांच अर्थ काढतील; अशा प्रसंगीं बोललेले शब्द आवेशाचे असल्यास ते कांहीं थोडे दिवसच नव्हे, तर कित्येक वर्षें त्यांच्या ध्यानांत राहतील, तीं आपापल्या मनाशीं त्या शब्दांचा वारंवार उच्चार करितील, ते शब्द आपल्या खेळांत काढतील, घरींदारीं बोलतील, त्यांस ते पाठ करण्याची जरूरच राहणार नाहीं.

पदार्थांचीं व क्रियांचीं नांवें ध्यानांत राहण्यास ते डोळ्यांपुढें असतां व त्यांकडे लक्ष गेलेलें असतां, त्यांचा स्पष्टपणें उच्चार होणें, हें जसें साधन आहे तसें भाषांतर पाठ करणें हें नाहीं. मुलांस घेऊन कोणीं प्रवास केला असल्यास त्यास असें आढळून येईल कीं, नवें स्टेशन किंवा गांव येतांच त्याच्या नांवाचा उच्चार झाल्यावर तें जसें मुलांच्या लक्षांत राहतें, व अशीं कित्येक गांवें एकामागून एक आल्यावर त्यांचीं नांवें जशीं अनुक्रमानें मुलांच्या ध्यानांत राहतात, तशीं तीं त्यांस पाठ करावयास देऊन राहवयाचीं नाहींत. तसेंच इकडे गडगडाट होत आहे व मुलांचें लक्ष तिकडे गेलें आहे अशा वेळीं शिक्षकानें 'थंडर, थंडर' असे शब्द मोठ्यानें उच्चारिल्यास, त्यांचा अर्थ न सांगतांही तो कळून ते शब्द त्यांच्या सहज ध्यानांत राहतील; जोंपर्यंत गडगडाटाचा ध्वनि कानांत घुमत आहे तोंपर्यंत 'थंडर, थंडर' हे शब्द त्यांच्या मनांतून जावयाचे नाहींत. पुढें विजेचा लखलखाट होतांच त्यानें 'लाइट्निंग्, लाइट्निंग्' ह्मणून शब्द उच्चारिल्यास हे शब्द सार्थ मुलांच्या ध्यानांत राहतील; नंतर पावसाची सर येतांच 'रेन, रेन' ह्मणून तो ओरडल्यास, तेही शब्द त्यांच्या स्मरणशक्तीवर पक्के खोदले जातील. याप्रमाणें पदार्थांचीं ध्यानांत राहिलेलीं नांवें जेव्हां जेव्हां त्यांची आठवण होते किंवा ते दृष्टीस पडतात तेव्हां तेव्हां स्मरणांत येतात. घोकलेल्या शब्दांची बहुधा याच्या उलट स्थिति असते. पदार्थ पाहिला असतां 'यास इंग्रजींत काय ह्मणतात बरें?' असा प्रश्न उत्पन्न होतो, व जेव्हां आकस्मिकपणें शब्द आठवतो तेव्हां 'या शब्दाचा अर्थ काय बरें?' असा संदेह उत्पन्न होतो. या गोष्टी सांगतांच त्या खऱ्या आहेत असें सर्व शिक्षक ह्मणतील, परंतु त्यांचा शिक्षणक्रमांत तुर्ता कांहीं उपयोग करितां काय, असें विचारल्यास मात्र 'नाहीं' असें, किंवा उगाच 'हो हो!' असें उत्तर मिळेल.

भाषेचें ज्ञान करून देण्यास याप्रमाणें पदार्थ ढळढळीतपणें नजरेस आणणें, निदान कल्पनाशक्ति जागृत करून नंतर शब्दांचा उच्चार करणें हें अत्यंत आवश्यक आहे. या कामास पदार्थांचा, चित्रांचा वगैरे संग्रह पाहिजे, त्या त्या क्रिया मुलांकडून करवून किंवा स्वतः करून दाखविल्या पाहिजेत; मुलांनीं प्रश्न विचारावे व उत्तर ऐकण्यास उत्सुक व्हावें, असा विषय संभाषणास किंवा शिक्षणास काढला पाहिजे; मुलांस बरोबर घेऊन हिंडलेंही पाहिजे. व आपल्या अंगची सर्व कल्पकता या कामीं शिक्षकानें खर्च केली पाहिजे. असें केल्यावर मठ्ठ मुलेंही फार कमी प्रयासानें भाषाविषय शिकतील व त्यांचें ज्ञान नित्य वाढत जाईल. परंतु कल्पक, बहुश्रुत, व प्रसंगावधानी शिक्षक, आणि पदार्थांचा चांगला संग्रह हे फुकाचे मिळत नाहींत. 'जशी फी तसें शिक्षण' हें प्रमाण आपोआप लागू व्हावयाचेंच.

आतां भाषाविषयासंबंधानें ज्या ज्या गोष्टी सांगितल्या, त्याच इतिहास, भूगोल, व विशेषतः शास्त्रें यांच्याही संबंधानें लागू आहेत. जर मुलांचें ज्ञान त्यांच्या मनांत पक्कें चिंचलेलें असावें; मुलांची जिज्ञासा कायम राहून त्यांच्या अंगचा उद्योग वाढावा; त्यांची ज्ञानप्राप्तीविषयींची उत्सुकता उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावी, व शरीरानें आणि मेंदूनें त्यांनीं निर्जीव होऊं नये; असें पालकांस वाटत असेल तर त्यांनीं थोडयाबहुत अधिक खर्चाकडे पहाणें अगदीं अविचाराचें होईल. विद्वान् शिक्षक व विपुल साधनें ज्या शाळेंत आहेत, तेथें मिळविलेलें ज्ञानच अखेरीस कामीं येतें हें त्यांनीं पूर्णपणें जाणलें पाहिजे. आतां जरी शुद्ध व निर्दोष अशा पद्धतीनें हल्लीं फारच थोडया ठिकाणीं शिक्षण दिलें जात आहे, तथापि जीं ठिकाणें आहेत त्यांपैकीं उत्तम कोणतें हें पालकांनीं विचारपूर्वक ठरविलें पाहिजे. तसेंच शिक्षणपद्धतींत सुधारणा होण्याकरितां जेवढी म्हणून खटपट होईल तेवढी त्यांनीं केली पाहिजे. या कामीं त्यांनीं आळस केल्यास त्यांच्या केवळ संततीचेंच नव्हे, तर सर्व ज्ञातीचें निरंतरचें नुकसान होईल, हें त्यांपैकीं जे समंजस आहेत त्यांनीं नित्य नित्य मनांत बाळगिलें पाहिजे. म्युनिसिपालिट्यांचे मेंबर म्हणून किंवा इतर कोणत्याही कारणानें ज्यांचा शिक्षणाशीं संबंध येईल, त्यांनीं या शिक्षणविषयाचा विचार केला पाहिजे, व आपलें कर्तव्य आपल्या समजुतीप्रमाणें तरी चांगलें बजावण्याची खटपट केली पाहिजे.

भाग ४ था.

अभ्यासाचा, शिक्षणाचा व विश्रांतीचा काळ.

३३. शाळा किती तास भरवावी याविषयीं सर्व हिंदु शाळांत एकच नियम ठरलेला दिसतो. शाळा मुलांची असो वा मुलींची असो, ती लहान मुलांची असो किंवा मोठ्या मुलांची असो, इंग्रजी असो वा मराठी असो, ती सहा तास म्हणजे सुमारें ११ पासून ५ पर्यंत भरली पाहिजे. या सहा तासांपैकीं पहिले तीन तास सारखें शिक्षण झाल्यानंतर चौथ्या तासास एक तासभर सुट्टी असते, व पुढें आणखी दोन तासपर्यंत सारखें शिक्षण चालतें. याप्रमाणें हें इतके तासपर्यंत मराठी किंवा इंग्रजी शिकणाऱ्या मुलांस गुंतवून ठेवणें योग्य आहे काय, या प्रश्नाचा आतां विचार करायाचा. या प्रश्नाचा व्यायामाच्या काळाशीं पुष्कळ संबंध आहे, म्हणून तो आधीं विचारास घेतला आहे.

लहान मुलांस दिवसांतून किती तासपर्यंत शिक्षण द्यावें, व तें एकसारखें किती वेळ द्यावें म्हणजे मुलांस विशेष ताण पडत नाहीं व शिक्षणाचा त्यांस पुरा फायदा होतो, या गोष्टींचा अनेक विद्वान् शिक्षणशास्त्रकारांनीं व डाक्तरांनीं विचार केलेला आहे, व या विषयावर अनेक प्रयोगही करून पाहिलेले आहेत,

या प्रयोगांवरून व दुसऱ्या अनेक अवलोकनांवरून बहुतेकांचा असा सिद्धांत झालेला आहे कीं, (१) लहान मुलांस एकसारखें पाऊण तासाहून अधिक वेळपर्यंत केव्हांही शिक्षण देऊं नये; तें दिल्यास फुकट जातें एवढेंच नव्हे, तर मुलांच्या बुद्धीस त्यामुळें कष्ट होतात, व त्यांवर दुसरे अनिष्ट परिणाम घडतात; (२) लहान मुलांस; प्रत्येक पाऊण तासानंतर हातपाय हालवून उड्या मारून मेंदूस झालेला श्रम घालविण्यास दहा पंधरा मिनिटें मोकळें सोडून नंतर दुसऱ्या व निराळ्या प्रकारच्या विषयास शिक्षकानें आरंभ करावा; नाहीं तर त्यांचें त्या विषयाकडे लक्ष लागावयाचें नाहीं; व (३) एकंदरीनें चार तासांहून मुलांस अधिक वेळ शाळेंत गुंतवून ठेवूं नये. सारांश, शाळा चार तास भरावी व त्यांपैकीं तीन तास शुद्ध शिक्षणांत जावे. याप्रमाणें बहुतेक युरोपीय विद्वानांचें मत आहे. अत्यंत अभ्यास करणारे ह्मणून ज्यांची प्रसिद्धि आहे त्या जर्मन लोकांचाही असाच सिद्धांत झाला आहे. ज्या ठिकाणीं याहून अधिक शिक्षण देण्याचा क्रम दिसतो तेथें, बहुधा असा एखादा विषय शिक्षणक्रमास जोडलेला असतो कीं त्यामुळें बुद्धीस मुळींच आयास पडूं नयेत, व केवळ इंद्रियांस अवलोकनाचा, व अवयवांस लाघवाचीं कृत्यें करण्याचा, व्यायाम व्हावा. अशा प्रकारचे विषय ह्मटले ह्मणजे चित्रकला, शिवणकाम, सुतारी काम, झाडांचें, पशूंचें व पदार्थांचें अवलोकन, इत्यादि हे होत. याप्रमाणें प्राथमिक शिक्षणाचा मार्ग युरोपांत सर्वमान्य झालेला आहे व तें शिक्षण देण्याची तिकडची पद्धति एथल्यापेक्षां फारच भिन्न आहे हें सांगायास नकोच. लहान वय ह्मणजे बारा किंवा तेरा वर्षेंपर्यंत असें येथें समजायाचें. यापुढील वर्षांत एकंदर मानसिक शिक्षण क्रमेंकरून चार तासपर्यंत वाढवावें व शाळेंत जाणारा वेळ पांच तासपर्यंत असावा असें मत आहे. व जीं अत्यंत लहान मुलें आहेत त्यांस मानसिक शिक्षण दोन तासांहून अधिक नसावें, एका खेपेस तें फार तर अर्धा तास द्यावें व त्यांस शाळेंत अगदीं बसवून ठेवणें तें तीन तासांहून अधिक [illegible]

या युरोपीय मतास विरुद्ध असा अभिप्राय एतद्देशीय कोणीही डाक्तर किंवा विचारी पुरुष देईल असें मला वाटत नाहीं. परंतु आश्चर्य हें कीं, सर्वजण डोळे झांकून जें चाललें आहे तें चालूं द्या असें ह्मणून स्वस्थ राहिले आहेत. जें चाललें आहे त्यामुळें स्वतःच्या संततीचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं. युरोपांत वर सांगितल्याप्रमाणें मत होण्याचीं कारणें सामान्यजनांच्या माहितीकरितां पुढें थोडीं संक्षेपानें देतों; कारण या विषयावर एकंदर पुष्कळच लिहिलेलें आहे. जें युरोपीय सुधारलेल्या राष्ट्रांस लागू तें इकडील अशक्त प्रजेस विशेष प्रकारें लागू होतें, ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत येईलच.

३४. मनुष्याच्या आयुष्याचे सामान्यतः चार भाग करितात—बाल्य, यौवन, मध्यमावस्था आणि वार्धक्य. या चार भागांमध्यें शास्त्रदृष्ट्या जे पुष्कळ भेद आहेत त्या सर्वांचा येथें विचार करणें आवश्यक नाहीं, परंतु प्रस्तुत विषयासंबंधानें पाहतां या चार भागांत जो मोठा भेद आहे तो येणेंप्रमाणें:—**बाल्यावस्थेंत मानसिक व शारीरिक चांचल्य अथवा चापल्य अधिक असतें, परंतु श्रम आणि विश्रांति यांमध्यें वेळेचें समसमान प्रमाण असावें लागतें** व त्या दोहोंमध्यें वरचेवर विपर्यास झाला पाहिजे. वार्धक्य स्थितींत मनाचें व शरीराचें सर्व चापल्य नाहींसें होतें, ह्मणजे त्या दोहोंसही अत्यंत स्थैर्य अथवा मांद्य येतें, आणि विश्रांति जणूं काय श्रमाशींच मिळून गेल्यानें शुद्ध विश्रांतीचा काळ कमी असल्यास चालतो. वाढीचा व पोषणाचा काळ ह्मटला ह्मणजे तो बाल्यावस्थेचा काळ होय. यौवनदशेंत ही वाढ पूर्णत्वास येते, व स्नायूंस पूर्ण काठिन्य प्राप्त होतें. यौवनदशेंत शरीराचें चापल्य कमी होतें व धिम्मेपणानें एकच श्रम बराच वेळपर्यंत करितां येतो. परंतु श्रम आणि विश्रांति यांमध्यें पुनः पुनः विपर्यय होणें आवश्यक असतें. बाल्य आणि तारुण्य मिळून आयुष्याचा पूर्वार्ध होतो, व या पूर्वार्धांत जी शरीरसंपत्ति मिळावि-ली असेल तीच उत्तरार्धाची तर्तूद असें समजावें. जेव्हां शरीराचे सर्व व्यापार धिम्मेपणानें चालू लागतात, तेव्हां मध्यमावस्थेस आरंभ होतो, व या धिम्मेपणास शुद्ध मांद्याचें स्वरूप आलें ह्मणजे त्यासच वृद्धत्व ह्मणावयाचें.

याप्रमाणें चांचल्य (अथवा चापल्य) आणि मांद्य यांच्या प्रमाणावरून आयुष्याच्या बाल्यादि अवस्था निश्चित होतात. व्यक्तिपरत्वें प्रत्येक अवस्थेच्या वयाचें प्रमाण भिन्न असतें. परिपूर्ण वाढीच्या माणसामध्यें १६ वे वर्षापर्यंत बाल्य असतें; यापुढें ३२ वे वर्षापावेतों यौवन असतें; व नंतर मध्यमावस्था आणि वार्धक्य . शरीराप्रमाणेंच मनासही या चार अवस्था आहेत असें समजावें, व मनोरूप प्रधान इंद्रियाचा मेंदू हा शारीरिक अवयव होय. मनाचें चांचल्य किंवा मांद्य पाहून त्याचीही अवस्था ओळखतां येते. शरीर आणि मन यांच्या भिन्न भागांस एकाच कालीं भिन्न भिन्न दशा येऊं शकतात, ही अत्यंत महत्वाची गोष्ट पुढें सांगावयाची आहे; वर सर्वसाधारण शारीरिक अवस्थांचीं चिन्हें मात्र सांगितलीं.

आतां या सामान्य नियमांचीं उदाहरणें देतों व त्यांचा प्रस्तुत विषयाशीं संबंध सांगतों. अगदीं तान्हें मूल घेतल्यास असें दिसून येईल कीं त्याचा निदान निम्मे वेळ झोंपेंत जातो. त्याचा व्यायाम ह्मटला ह्मणजे जागृतपणीं हातपाय हालविणें, लोळणें, आरडणें व दूध पिणें हा होय. विश्रांति ह्मणजे झोंप. एका खेपेस तास दोन तास त्यास झोंप येते; पुढें जागेपणीं व्यायास व खेळायास हवें असतें, व हा अनुक्रम सर्व दिवसभर चालतो. असें न घडेल तर तें सुस्थितींत नाहीं असें समजावें. यानंतर मूल तीनपासून पांच वर्षांचें होईपर्यंत त्याची स्थिति पाहि-

ल्यास असें दिसून येईल कीं, त्यास मुमारें तास दोन तास पुष्कळ खेळविल्यास फार भूक लागेल; भूक निवाल्यावर झोंप येईल, झोंपेतून जागे होतांच पुनः सर्व अवयव ताजे होऊन तें खेळायास लागेल. थोडा खेळ होतांच ' आई भूक ' म्हणून मागें लागेल. एका खेपेसच पुष्कळ श्रम करणें किंवा पुष्कळ विश्रांति घेणें त्यास नको असतें व तसें त्याकडून घडनही नाहीं. त्याच्या मानसिक श्रमांची हीच स्थिति. कांहीं नवीन गोष्ट पाहिली कीं तीविषयीं अत्यंत आश्चर्य वाटतें व मोठी हौस उत्पन्न होते, त्यास त्या गोष्टीचा छंद लागतो, ती तें म्हणत बसेल, ऐकून घेईल, करील, विचारील, व मोठ्या माणसास कंटाळा आणील. याप्रमाणें थोडा वेळ (सुमारें दहा मिनिटांपासून अर्धा तास) गेल्यावर त्याच गोष्टीचा त्यास वीट येईल, तिचा नाद तें सांडून देईल व तिजविषयीं सर्व कांहीं विसरून जाईल. मग मुलास ती आवडते म्हणून तुम्हीं ती पुढें केली तरी त्यास मौज वाटणार नाहीं. आठ दहा वर्षांचें मूल घेतल्यास त्याची स्थिति कांहींशी याप्रमाणेंच असते, व या सर्व गोष्टींवरून असें दिसून येतें कीं, **बाल्यावस्थेंत असतां मानसिक श्रम, शारीरिक श्रम, अन्नपान व विश्रांति हीं सर्व अनुक्रमानें, वेतावेतानें एकामागून एक प्राप्त झालीं तरच त्यांचें मुलांकडून ग्रहण होतें. एकच गोष्ट फार वेळ करणें किंवा एकदम पुष्कळ करणें त्यांकडून होत नाहीं ; व ती तशी करविल्यास त्यांस कष्ट होतात व तीं क्षीण किंवा अजारी होतात. बाल्यावस्थेच्या अखेरीस व पुढील यौवनदशेमध्यें मानसिक श्रम, शारीरिक श्रम, अन्नग्रहण व विश्रांति यांच्या दरम्यान एकाच खेपेस क्रमेंकरून अधिकाधिक वेळ गेल्यास तें सह्य होतें. परंतु सर्व बाल्यावस्थेंत मानसिक व शारीरिक विश्रांतींत जाणारा काळ अर्ध्या दिवसाइतका असलाच पाहिजे.** बाकी राहिलेल्या दिवसाच्या चारा तासांपैकीं दोन तास खाण्यापिण्यांत व शरीरसंस्कियेंत जातील; व राहिलेले दहा तास शारीरिक व मानसिक श्रमांकडे मुलांस लावितां येतील. अगदीं बालपणीं एकंदर मानसिक श्रम तीन किंवा चार तास असावे व बाकी वेळ सौम्य शारीरिक श्रमांत जावा. बाल्यावस्थेच्या अखेरीस मानसिक श्रमांची सामान्य इयत्ता सहा तासांपर्यंत वाढविण्यास हरकत नाहीं, परंतु चार तास तरी व्यायामांत गेलेच पाहिजेत; व त्यांशिवाय विश्रांतीचे चारा तास असलेच पाहिजेत. सुदृढ मुलानें क्वचित् प्रसंगीं कांहीं दिवस मानसिक श्रमांची इयत्ता वर सांगितल्याहून अधिक वाढविल्यास चालेल, परंतु तो वाढलेला वेळ थोडा विश्रांतीच्या काळांतून व थोडा शारीरिक श्रमाच्या काळांतून घेतला पाहिजे; व पुढें तो सुट्टीच्या दिवसांत परत केला पाहिजे. यावरून असें समजावें कीं **बाल्यावस्थेंत सहा, फारच झालें तर सात, तासांहून अधिक वेळ मानसिक श्रमांत निरंतर घालविल्यास तो श्रम अपायकारक झालाच पाहिजे. त्यायोगें शरीरास व मनास जो अपाय होतो तो कदाचित् एक-**

दम दिसणार नाहीं, परंतु वर्षानुवर्ष त्याचे दुष्परिणाम अधिकाधिक व्यक्त होत जातील.

३५. हल्लीं हरएक ठिकाणीं हे दुष्परिणाम दिसूं लागले आहेत. कारण, शिक्षकांच्या मतें निवळ शिक्षणास पांच तास पाहिजेतच, व ते अधिक असतील तर उत्तम असें सांगणारे शिक्षक थोडे नाहींत. तेव्हां जर शिक्षणच पांच तास झालें, तर तें मिळविण्याकरितां जो घरीं अभ्यास करायाचा त्यास आणखी चार किंवा पांच तास नकोत काय ? इतक्या वेळाची आवश्यकता असते हें पूर्वी दाखविलेंच. मानसिक श्रमांची इयत्ता दिवसांतून सहा तास ठरविल्यास ती हल्लींच्या शिक्षणपद्धतीनें शिकविणारांस बिलकुल मान्य होणार नाहीं हें उघड आहे. व इतक्या थोड्या अभ्यासानें सर्व मुलें मट्ट राहतील असें ते प्रतिज्ञापूर्वक सांगतील, यांत संशय नाहीं. परंतु या बाबतींत माझा अनुभव अगदीं विरुद्ध आहे, व सामान्यतः सहा तासांची इयत्ता विद्याप्राप्तीच्या सर्व कार्यांस पुरे आहे अशी माझी खात्री झाली आहे.

परंतु हल्लींच्या शिक्षणपद्धतीस अनुसरून प्रत्येक सामान्य बुद्धीच्या मुलास मानसिक श्रमाकडे निदान आठ, नऊ किंवा दहा तास द्यावे लागतात व हा फाजील लागणारा वेळ बहुधा शारीरिक श्रमाच्या वेळांतून घेतला जातो. शिवाय असा हा एकाच प्रकारचा श्रम दीर्घ काळ झाल्यानें विश्रांतिही जशी फलद्रूप व्हावी तशी होत नाहीं, त्यामुळें शरीराच्या वाढीस धक्का बसतो व बुद्धीस क्षीणता येत जाते. **हे दुष्परिणाम इतके निश्चित आहेत कीं नित्याच्या दिनचर्येंत ज्या मुलानें वर सांगितलेल्या योग्य प्रमाणानें आपला वेळ खर्चिला नाहीं, तो खुरटा, दुर्बळ व क्रमानें मंदबुद्धि होत आहे असें अनुमान करावें; तें खरें ठरेल; व हल्लींच्या शिक्षणपद्धतीखालीं चांगला होतकरू मुलगा देऊन त्याकडून शिक्षकाचें समाधान होईल इतक्याच वेताचा अभ्यास दर इयत्तेंत करविल्यास तो मुलगा या अनिष्ट स्थितीस येईल, (मग तो कशाही सुदृढ मातापितरांपासून झालेला असो) अशी माझी खात्री आहे.** या गोष्टीस अपवाद हजारांत पांचचार सांपडल्यास सांपडतील. ही गोष्ट केवळ ब्राह्मणज्ञातीसंबंधानेंच खरी आहे असें नाहीं, तर ब्राह्मण, शूद्र, मुसलमान, पार्शी, व इतर एतद्देशीय सर्व ज्ञातींसंबंधानें खरी आहे; व या सर्व ज्ञातींतून या प्रकारचें दुष्परिणाम घडल्याचीं हवीं तितकीं उदाहरणें दाखविता येतील. याकरितां शिक्षणपद्धति सुधारण्याची आवश्यकता सर्व ज्ञातींस सारखीच उत्पन्न झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याच्या उलट म्हणजे **जेव्हां बाल्यावस्थेंत दीर्घ शारीरिक श्रम मनुष्यास पडतात, म्हणजे या श्रमांची इयत्ता प्रत्यहीं दहा तासांपर्यंत जाते, तेव्हांही मनुष्याची पूर्ण वाढ होऊं शकत नाहीं.** या गोष्टीचा प्रत्यय पाहणें झाल्यास

तो सोनार, सुतार, जिनगर, वगैरे कारागीर ज्ञातींत पहावा. जेव्हां कित्येक प्रसंगीं या कारागिरांचीं मुलें घरच्या गरिबीमुळें लहानपणापासूनच दीर्घश्रमास लाविलीं जातात, तेव्हां त्यांची पुरी वाढ होत नाहीं, व तीं कांहीं अवयवांनीं सुदृढ व कांहींनीं दुर्बळ असलेलीं आढळतात. याशिवाय या ज्ञातींपैकीं ज्यांस दुर्व्यसनें जडतात त्यांची तर अशी स्थिति होतेच होते. श्रम हा कीं, श्रम मानासिक असोत वा शारीरिक असोत, एकाच प्रकारचे श्रम बाल्यावस्थेंत अतिदीर्घ कालपर्यंत केल्यानें मनुष्याची वाढ खुंटते, तो विश्रांति घेण्यासही अपात्र होतो, व त्याच्या शारीरिक आणि मानासिक शक्तींस त्यायोगें निरंतरची क्षीणता आणि अकाल वार्धक्य येतें.

बाल्यावस्थेंत जे श्रम करायाचे ते उभयविध असल्यास फारच उत्तम, परंतु ते नुसतेच मानसिक असतां कामा नये; व जोंवर शरीराची वाढ होत आहे तोंवर श्रम आणि विश्रांति यांचा वरचेवर विपर्यास झाला पाहिजे. धिम्मेपणानें पुष्कळ वेळ काम करीत राहणें हें यौवनदशेच्या उत्तरार्धांत मात्र शक्य असतें.

३६. विश्रांति दोन प्रकारची होय; एक श्रमविरहित स्वस्थ बसणें व दुसरी निद्रा. बाल्यावस्थेंत असतां निद्रेंत आरंभीं दहा बारा तास, मध्यंतरीं नऊ दहा तास व शेवटीं निदान आठ तास गेलेच पाहिजेत. याशिवाय तटस्थपणें केवळ सौम्य इंद्रियव्यापारांत व अतिमंद अवयवचालनांत तीन चार तास गेले पाहिजेत.

या विश्रांतीच्या काळाचा शरीराच्या व मनाच्या वृद्धीशीं कसा संबंध असतो हें सांगितलें पाहिजे. **बाल्यावस्थेंत अन्नापासून जीं कार्यें होतात तीं येणेंप्रमाणें: (१) शरीराची व मेंदूची व्यायामानें किंवा परिश्रमानें झालेली झीज भरून काढणें; (२) शरीरभागांस वृद्धिंगत करणें; आणि (३) बाहेरील हवामानामुळें शरीरावर जे परिणाम घडतात त्यांचा प्रतीकार करणें.** यांपैकीं अन्नद्वारा तिसरें कार्य सर्व आयुष्यभर घडलेंच पाहिजे व तें अंशतः कपड्यांनीं व गृहादि बाह्याच्छादनांनीं होतें. दुसरें कार्य बाल्यावस्थेंत मात्र घडावें लागतें; तें वृद्धीच्या आयुष्यभागांत घडत नाहीं, व वृद्धावस्थेंत त्याचा वेग कमी कमी होत जाऊन शरीरास क्षीणता येत जाते. बाकी राहिलेलें पहिलें व मुख्य कार्य सर्व आयुष्यभर सुरू असतेंच, व ज्या प्रमाणानें शरीरास कष्ट कमी किंवा अधिक त्या मानानें अन्नाचें प्रमाण कमी किंवा अधिक करावें लागतें; व ज्या प्रकारची शरीराची झीज असेल त्या प्रकारास योग्य अशा अन्नाची योजना केल्यास अधिकच इष्ट परिणाम घडतात.

३७. शरीराच्या वाढीचा असा एक विशेष नियम आहे कीं, ज्या अवयवास किंवा इंद्रियास श्रम अधिक त्याकडे अन्नापासून उत्पन्न झालेल्या रक्तरसाचा अधिक वेगानें ओघ वाहतो; व त्याचें विशेष पोषण होऊन तो

अधिक दृढ होतो; परंतु याप्रमाणें कोणत्याही अवयवाकडून किंवा इंद्रियाकडून जे श्रम करवून घ्यावयाचे त्यांस सीमा आहे, त्या सीमेपलीकडे श्रम झाले तर त्यांमुळें त्या अवयवास किंवा त्या इंद्रियास इजा होते, व तें क्षीण होत जातें. एकदां या प्रकारें अतिश्रमानें कोणत्याही शरीरभागास इजा झाल्यास ती पुढें कधींही भरून येत नाहीं असा सामान्य अनुभव आहे. गाणाऱ्यांचे गळे, वाचणाऱ्यांचे डोळे, अत्यंत मोठीं ओझीं उचलणाऱ्यांचे हात, पाठ किंवा छाती या प्रकारें अतिश्रमानें क्षीण झाल्याचीं उदाहरणें अनेक सांपडतील. अतिश्रमाचे हे अनिष्ट परिणाम ज्ञानेंद्रियावर किंवा मेंदूवरही घडतात, हें विशेष सांगावयास नकोच. व्यायामाची आवश्यकता मनुष्यास कोणत्या कारणानें उत्पन्न होते तें पुढें सांगायाचें आहे, त्या प्रसंगीं या विषयाची आणखी थोडी माहिती देण्यांत येईल.

आतां वाढीच्या दिवसांत, ह्मणजे बाल्यावस्थेंत सर्वच अवयवांची, इंद्रियांची व मेंदूची वाढ सारखी सुरू रहावी, हें इष्ट आहे; व ह्मणून सर्वांसच यथायोग्य श्रम दिले पाहिजेत; परंतु ते देतांना कोणत्याही एका शरीरभागास अतिश्रम न होतील अशाविषयीं फार मोठी काळजी बाळगली पाहिजे. सर्व शरीरभागांस नित्य श्रम द्यावयाचे असा नियम केल्यास वेळेचा व्ययही योग्य प्रमाणानेंच होईल, व मग एकाच भागास अतिरिक्त श्रम होण्याची भीति उरणार नाहीं; परंतु जेव्हां कांहीं शरीरभागांकडे अधिक लक्ष व कांहींकडे मुळींच दुर्लक्ष असें होतें, तेव्हां श्रमांच्या इयत्तेंत प्रमाण राहण्याचा नेम नसतो, व अतिश्रमाच्या दुष्परिणामांचा संभव उत्पन्न होतो. सर्व शरीरभागांच्या पोषणाचा काळ ह्मणजे बाल्यावस्था. या काळांत आरंभीं सर्व भाग लहान अंकुराप्रमाणें असतात. त्यांस क्रमानें वाढत जाण्याची शक्ति असते; परंतु बाल्यावस्थेच्या अखेरीसही कोणत्याही भागास पूर्णता व दृढता आलेली नसते, त्यामुळें कोणत्याही भागास दीर्घ श्रम सोसत नाहींत व विश्रांतीची जी पुनः पुनः जरूर लागते ती यामुळेंच.

३८. विश्रांतीचा काळ हा शरीराची झीज दूर करण्याचा व पुढील श्रमांस लागणारी सामग्री अवयवांस व इंद्रियांस पुरविण्याचा काळ होय. ही विश्रांति दोन प्रकारची असते, जागृतावस्थेंतील व निद्रावस्थेंतील. "*विश्रांतीच्या सर्व प्रकारांत निद्रा ही श्रेष्ठ गणिली पाहिजे. जागृतावस्थेंत शरीराच्या बडया कारखान्यांतील कामगार मंडळी आळीपाळीनें काम करून परस्परांस विसांवा देत असतात; परंतु फार वेळ काम झाल्यावर त्या सर्वांसच कांहीं वेळ परिपूर्ण विश्रांति आवश्यक होते. अशा वेळीं

---

* या भागांतील उतारे मीं आपल्या दुसऱ्या एका निबंधांतून घेतले आहेत, हा निबंध संबंध छापलेला नाहीं, परंतु त्याचा सारांश मराठी सहाव्या पुस्तकांत 'विश्रांति' या विषयावर जो मीं धडा लिहिला आहे त्यांत दिला आहे. म० ६ वें पु. पृ० १६९.

इंद्रियें व्यग्र होऊन स्वाधीन रहात नाहींत व गात्रेंही स्वस्थपणें आपलीं कामें करूं शकत नाहींत. सर्वांवर देखरेख ठेवणारें मनोरूप इंद्रियही निरवधान होतें. अशा वेळीं या जागृतावस्थेंत काम करणाऱ्या मंडळीस शांतपणें निद्रेच्या स्वाधीन होऊं देणेंच श्रेयस्कर आहे. इंद्रियांस व अवयवांस गाढ निद्रा लागली एवढ्यावरूनच सर्व शरीर स्वस्थ झालें असें समजूं नये. जे अंतर्गत अवयव अदृश्यपणें शरीरांत काम करीत असतात, व ज्यांचे व्यापार ईश्वरानें आपल्या इच्छेवर अवलंबून ठेविलेले नाहींत, त्यांच्या उद्योगास निद्रावस्थेंत जोर येतो. सर्व शरीराची मोडतोड दुरुस्त करणें, सर्व सांध्यांस वंगण लावणें, मेंदू व स्नायू यांमध्यें नवे रसधातु भरून त्यांस परिपुष्ट करणें, इंद्रियांस पुनः तीव्रता आणणें, इत्यादि अनेक अंतर्गत व्यापार निद्रावस्थेंत सुरू होतात; व निरोगी मनुष्यामध्यें ते किती पूर्णत्वानें घडतात हें त्याच्या दुसरे दिवशींच्या हुशारीवरून दिसून येतें. सर्व प्राण्यांस श्रमानंतर शरीराच्या दुरुस्तीकरितां निद्रा आवश्यक आहे. वनस्पतींसही तिजवांचून चैन पडत नसावें. जर मनुष्यानें निद्रेची काळजी घेतली नाहीं, तर गात्रें शिथिल व अशक्त होतात, रुधिराभिसरण नीट चालत नाहीं, बुद्धि व इंद्रियें मंद होत जातात व तोंडावरचा तजेला जाऊन मनुष्यास भ्रांतिष्टाप्रमाणें होतें. निद्राहीनता हें अनेक भयंकर शारीरिक व मानसिक व्याधींचें बीज होय. अन्नाचें अपचन व मस्तकशूलादि व्यथा हे व्याधि अनिद्राजन्य व्याधींपैकीं अग्रेसर होत. भयंकर स्वप्नें, प्राणत्यागाची इच्छा, क्रूर वासना, आजन्म असमाधान, इत्यादि अनेक मनोविकार अनिद्रामूलकच आहेत. ज्यानें कोणत्याही कारणानें आपली निद्रा गमावली त्यानें आपणावर दुःखपरंपराच ओढून घेतली असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

निद्रारूप विश्रांतीखेरीज जागृतावस्थेंतही विश्रांति आवश्यक असते. ही विश्रांति बाल्यावस्थेंत अधिक लागते, कारण शरीरभागांस सारखें पुष्कळ वेळ श्रम करण्याचें सामर्थ्य नसतें. यौवन दशेंतही अशा विश्रांतीची गरज असते, परंतु ती कमी प्रमाणानें मिळाल्यास हरकत नसते. एवढ्यावरून ज्यास ती योग्य श्रमानंतर घेतां येईल त्यानें तिचा अनादर करूं नये. ही विश्रांति घेण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. " शिणलेल्या गात्रांस व व्यग्र झालेल्या चित्तास अनेक करमणुकींच्या खेळांपासून आनंद व विश्रांति मिळते. गाणेंबजावणें, चित्रें काढणें, बाग करणें, मुलांस कौतुकानें खेळविणें, व त्यांशीं आपणही बालक्रीडा करणें, घरांतील पदार्थांची सुरेख मांडणी करणें, मित्रमंडळींत बसून सुखदुःखाच्या किंवा परिहासाच्या गोष्टी सांगणें, इत्यादि अनेक गोष्टींपासून जागृतावस्थेंत विश्रांति मिळते. यांपैकीं कोणतीही गोष्ट श्रमकारक मात्र नसली पाहिजे, व ती अभ्यास किंवा बोजा म्हणून करितां कामा नये. मंद श्रम, मंद अवलोकन व साहजिक प्रवृत्ति या गोष्टी विश्रांतीस आवश्यक आहेत. विश्रांतीकरितां गाणेंबजा-

जावणें, किंवा चित्रें काढणें ह्मणजे या कलांचा लक्षपूर्वक अभ्यास करणें असा मात्र कोणी अर्थ करूं नये. अशा अर्थानें या कलांचा अभ्यास परिश्रमांखालीं येतो. प्रत्येक मनुष्य आपापल्यारीतीं साहजिकपणें जे आलाप काढीत असतो व वसल्या वसल्या ज्या आकृति काढून आपलें दिल खुष करीत असतो, त्या आलापांचा, चित्रांचा, वगैरे विश्रांतीमध्यें समावेश होतो. **पूर्वीच्या श्रमांमुळें संपत आलेली पोषक रसांची सामग्री पुनः नव्यानें भरून घेण्याचा जो काळ त्यास विश्रांति ही संज्ञा आहे, ही गोष्ट केव्हांही विसरतां कामां नये.** "

३९. आतां पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, जेव्हां मन विचाराचें काम करीत असतें तेव्हां शरीरास विश्रांति असतेच व जेव्हां शारीरिक श्रम मनुष्य करितो तेव्हां मनास विश्रांति असतेच; त्या अर्थीं जागृतावस्थेंत शरीरास आणि मनास दोहोंसही एकदम वर सांगितल्या प्रकारची विश्रांति असण्याची गरज नाहीं. अतिप्रमाण मानसिक व शारीरिक श्रम करणारांनीं याप्रमाणें आपली समजूत घालून घेतली आहे. वास्तविक पहातां असें दिसतें कीं, जेव्हां कोणतेंही इंद्रिय किंवा अवयव वेगानें काम करीत असतो तेव्हां रक्ताचा मोठा ओघ त्याकडे वळतो, व इतर इंद्रियांत व अवयवांत तो मंद होतो. हातानें काम करीत असतां दंड रक्तानें भरून येतात, पायानें चालत असतां मांड्या भरून येतात, इत्यादि. आतां हात काम करीत आहेत, ह्मणून पायांस विश्रांति आहे असें मानणें चुकीचें होईल. त्यांस मांद्य आलेलें असतें, ती विश्रांति नव्हे. हातानें पुष्कळ वेळ काम करून मनुष्य थकल्यावर, तो हात स्थिर ठेवून पायानें पुष्कळ वेळ चालेल, असें समजणें चुकीचें होईल. तसेंच मानसिक श्रमाचे वेळीं शरीरास मांद्य येतें, ती शरीराची विश्रांति नव्हे. जेव्हां रक्ताचा प्रवाह एकाच इंद्रियाकडे किंवा अवयवाकडे वळविला जाऊन त्याच्या द्वारें काम करून घेतलें जातें, तेव्हां बाकीच्या अवयवांची जी स्थिति असते तीस विश्रांति असें नांव देणें रास्त नाहीं, व ह्मणून जागृतावस्थेंत असतां सर्व स्नायूंस व सर्व मज्जातंतूंस जेव्हां समवेगाचा रक्तप्रवाह मिळतो व त्यांस स्थिरपणें इष्ट रसाचें शोषण करितां येतें, तेव्हां त्यांच्या त्या स्थितीस सौम्य विश्रांति असें ह्मणतां येतें.

बाल्यावस्थेंत राहून राहून पुनः पुनः मनुष्यास या प्रकारची विश्रांति मिळाली पाहिजे तर त्याची वाढ कायम रहाते. अशी विश्रांति जागृतावस्थेंत मिळून शिवाय परिपूर्ण निद्ारूप विश्रांति मुलांस आवश्यक असते; व या दोन प्रकारच्या विश्रांतींत निदान त्यांचे दिवसाचे बारा तास गेले पाहिजेत. याप्रमाणें षोडशपर्यंत बाल्यावस्थेंत मनुष्य असतां त्याच्या वाढीस योग्य असें त्याच्या दिनचर्येचें नियमन कसें करावें या गोष्टीचा थोडा विचार केला. आतां शिक्षण किती वेळ द्यावें, वगैरेविषयीं युरोपीय विद्वानांनीं जे प्रयोग केले आहेत त्यांची केवळ

दिशा दाखविण्याकरितां एक उदाहरण घेतों. या दिशेनें कोणाही शिक्षकास स्वतः प्रयोग योजून करून पहातां येतील व युरोपीय शास्त्रकारांचे सिद्धांत खरे आहेत अशाविषयीं आपली खात्री करून घेतां येईल.

४०. असें समजूं कीं दहा अकरा वर्षांचे मुलास एका खेपेस किती मिनिटें शिकवावें, व अशा एकामागून एक किती खेपा कराव्या (ह्मणजे दिवसांतून त्यास एकंदर किती वेळ शिकवावें), जेणेंकरून त्यास अतिश्रम होणार नाहींत त्याच्या बुद्धीस ताण पडणार नाहीं व दिलेलें शिक्षण पूर्णपणें फलद्रूप होईल—या प्रश्नाचा आपणांस निर्णय करणें आहे. या विषयाचा प्रयोग करणारानें दहा अकरा वर्षांचीं पांच किंवा दहा मुलें घ्यावीं. त्यांस गणितापैकीं त्रैराशिकाचा भाग नवीनच चांगला समजावून दिलेला असल्यास, निरनिराळ्या प्रकारचीं परंतु सारखींच कठीण अशीं त्रैराशिकाचीं दहा किंवा पंधरा उदाहरणें काढावीं. उदाहरणें बाह्यात्कारी एकासारखीं एक असूं नयेत किंवा तीं फार अवघड असूं नयेत व मुलांस तीं सर्व नवीं वाटावीं. नंतर घड्याळ लावून पहिलें उदाहरण मुलांस सांगावें. तें कोणीं किती मिनिटांत केलें व कोणाचें बराबर आलें हें त्याच्या नांवापुढें मांडावें; मग दुसरें उदाहरण घालावें; तें झाल्यावर त्याविषयींही असेंच टिप्पण करावें; व याप्रमाणें सुमारें दहा उदाहरणें घातल्यावर वर्ग सोडून द्यावा. व केलेल्या टिप्पणांची तुलना करावी. त्या तुलनेवरून असें दिसून येईल कीं, मुलांस उदाहरण करण्यास लागणारा वेळ क्रमानें वाढत जातो व अखेरीस तो पहिल्या उदाहरणास लागलेल्या वेळाच्या दुप्पट किंवा तिप्पटही होतो. तसेंच पहिलें उदाहरण जितक्यांचें बराबर आलें, तितक्यांचें तिसरें बराबर येत नाहीं; तें जितक्यांचें बराबर आलें, तितक्यांचें पांचवें बराबर येत नाहीं; व या अनुक्रमानें पुढें पुढें फारच थोड्यांचीं उदाहरणें बराबर येतात. या प्रयोगावरून असें दिसून येईल कीं, आरंभींचा कांहीं वेळ असा असतो कीं त्या वेळांत मुलांची बुद्धि व लक्ष हीं चरींच त्यांच्या स्वाधीन राहिल्यामुळें, त्यांस तेवढ्या वेळांत पुष्कळ उदाहरणें बराबर सोडवितां येतात. यानंतरच्या तेवढ्याच वेळांत चित्त व्यग्र होत गेल्यानें कोठें बेरजेंत, कोठें वजाबाकींत, कोठें गुणाकारांत चुका होऊं लागून बराबर येणाऱ्या उदाहरणांची संख्या कमी होते. याच्याही पुढचा तेवढाच वेळ घेतल्यास त्यांस उदाहरणांचा अर्थच समजेनासा होतो व त्यांचे गुणाकार भागाकारच चुकूं लागतात असें नाहीं, तर रीतही चुकूं लागते. अशा या प्रयोगावरून दहा अकरा वर्षांच्या मुलांस गणित विषय एका खेपेस सरासरीनें किती वेळ शिकवावा एवढेंच ठरवितां येतें असें नाहीं, तर घेतलेल्या मुलांपैकीं प्रत्येकाच्या बुद्धीचें प्रमाण व ती किती दमदार आहे हेंही स्थूलपणें ओळखितां येतें. या प्रकारचाच दुसरा प्रयोग योजून, मुलांस एका खेपेस शिकविल्यानंतर दुसऱ्या खेपेस तो करावा; नंतर दोन खेपेस शिकवून तिसऱ्या खेपेस करावा, इत्यादि. असें करितां करितां

चौथ्या किंवा पांचव्या खेपेस असें दिसून येईल कीं, मुलांस आपली बुद्धि चालविण्यास व आपलें लक्ष स्वाधीन ठेवण्यास फार कष्ट पडत आहेत. या खेपेस शिक्षण बंद केलें पाहिजे.

शिक्षणसंबंधीं प्रयोगांचें हें येथें केवळ दिग्दर्शन केलें आहे. चतुर व कल्पक शिक्षकांस एवढें बस्स आहे. युरोपीय शिक्षणशास्त्रकारांनीं शारीरशास्त्रांच्या नियमांवरून, प्रयोगांवरून व भिन्न भिन्न अवलोकनांवरून शिक्षणाच्या काळासंबंधानें कोणते सिद्धांत ठरविले आहेत हें पूर्वी सांगितलेंच. आतां त्या सिद्धांतांशीं आमच्या शाळांतील शिक्षणक्रम कितपत जुळतो हें पाहूं.

४१. प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी शाळेच्या शेवटच्या इयत्तेपर्यंत शिक्षणाचा काळ एकच, म्हणजे पुरे पांच तास. ही स्थिति पाहून कोणास आश्चर्य वाटेल. या स्थितीवरून असें दिसतें कीं, मुलांस शिकवायाचे विषय अत्यंत सुगम असोत वा गहन असोत, त्यांचीं शुद्ध मूलतत्वें शिकवायाचीं असोत किंवा कांहीं अधिक अवघड भाग शिकवायाचा असो, शिक्षकांस ते शिकविण्यास सारखाच वेळ पाहिजे असतो. जर आरंभींच्या इयत्तांमध्यें इतका वेळ शिक्षणास लागत नसेल, तर वाजवीपेक्षां अधिक वेळ मुलांस बसवून ठेवणें इष्ट नाहीं हें उघड आहे. जर मराठी पहिल्या दोन तीन इयत्तांत खरोखरच मुलांना पांच तास शिक्षण दिलें जात असेल, तर हा केवळ मुलांवर जुलूम आहे, व जर या वेळापैकीं बराच वेळ मुलें केवळ बसवून ठेवण्याचा प्रघात असेल तर त्यांतही मुलांचें नुकसानच आहे. माझ्या मतें हल्लींची प्राथमिक शाळेची जी शिक्षणपद्धति आहे ती सर्वस्वी दोषी आहे. पहिल्या एक दोन इयत्तांत मुलांस धडे देऊन 'घोकत बसा' असें सांगून शिक्षक स्वस्थ आळसानें वेळ काढितो; किंवा एकामागून एक मुलें घेऊन शिकवीत बसतो; किंवा अशाच दुसऱ्या कांहीं रीतीनें पांच तास शिक्षण सुरू ठेवितो. यानंतर शेवटच्या तासास कांहीं वेळ सर्व मुलें मिळून पर्वाचा म्हणण्यास आरंभ होतो. कित्येक वेळां माझ्या असें पाहण्यांत आलें आहे कीं, शाळेंतील इतर मुलें सुटून गेलीं, तथापि पुढें अर्धा तासपर्यंत खालच्या इयत्तांतील मुलांचा पर्वाचा सुरू असतोच. म्हणजे इतर मुलांस जर पांच तास शिक्षण तर या सर्वांत अगदीं लहान मुलांस साडेपांच तास ! शाळेच्या शेवटच्या तासांत पर्वाचा म्हणून घेतल्यास त्याच्या ओरडाआरडीनें इतर वर्गांच्या शिक्षणास व्यत्यय येईल या कारणानें, पर्वाचा घेऊन शाळा लांबविण्याची ही युक्ति निघाली आहे. एक एका धड्यास बहुधा तासाहून कमी वेळ दिला जात नाहीं. एक धडा संपवून दुसऱ्यास आरंभ करण्यापूर्वी मध्यें मुलांस हुषारी येण्याकरितां मोकळें सोडलें जात नाहीं. तींच होऊन कांहीं निमित्त काढून बाहेर गेल्यास गेलीं, परंतु याप्रमाणें त्यांस बाहेर सोडण्यास शिक्षक नाखुष असतो व नंबरांची पर्वा करणारीं मुलें वर्ग सोडून बहुधा बाहेर जात नाहींत. अशा प्रामाणिक मुलांस सबंध पांच तासांत

कायतो एक तास किंवा अर्धाच तास सुटी मिळते, व तीही आधीं तीन तास शिक्षण झाल्यानंतर. याप्रमाणें ही प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या दोन किंवा तीन इयत्तांची स्थिति पाहिली ह्मणजे अत्यल्प वयाच्या मुलांवर शाळेच्या पहिल्या दिवसापासून केवढा जुलूम होत आहे या गोष्टीची कल्पना येईल. सर्वच जेथें अशास्त्र चालले आहे तेथें सुधारणा तरी कोणती म्हणून करायास सांगावी ? या पांच तास शिक्षणानंतर घरून लिहून आणण्याकरितां किंवा तयार करून आणण्याकरितां मुलांस शिक्षक अभ्यास नेमून देतोच. व अत्यल्प वयाच्या मुलांचीही घरच्या अभ्यासापासून सुटका नाहीं ! जणूं काय शाळेंत घातल्यानंतर पाटीपेन्सिल, कागद, दौत-लेखणी, पुस्तकें, शाळा व शिक्षक यांच्या विचारासेरीज इतर कामांत मुलांचा वेळ गेला तर त्यांच्या हातून महापातकच घडेल ! अशा मुलांमधून अवलोकनशक्ति व जिज्ञासा लवकरच पळ काढतात यांत नवल तें काय ?

४२. यानंतर मराठी वरच्या इयत्तांची व इंग्रजी इयत्तांची स्थिति पाहिल्यास ती उत्तरोत्तर कडकच होत जाते. शाळांतील शिक्षणपद्धतीचें स्वरूप पूर्वी सांगितलेंच. हें शिक्षण तीन तास व दोन तास अशा हप्त्यांनीं होतें हेंही सांगितलेंच. परंतु वरच्या इयत्तांतील मुलें मधल्या सुटींत काय करीत असतात, हें कोणीही इंग्रजी शाळेंत जाऊन पहावें. पुष्कळ मुलें, ह्मणजे निदान निम्मीं तरी, पुस्तकें घेऊन पुढील तासाची तयारी करितांना दिसतील. त्यांस घरीं अभ्यासास पुरता वेळ मिळाला नसावा, किंवा स्मरणशक्ति मंद झाल्यामुळें केलेल्या अभ्यासाची पुनः उजळणी करणें भाग पडत असावें, असें साहजिक अनुमान होतें. या मुलांस मध्यें खाण्यापिण्याची गरज उरलेली नसते ! दुसरीं कित्येक मुलें कांहीं खाऊन व पाणी पिऊन किंवा खाण्यापिण्यावांचूनच स्वस्थ बसलेलीं दिसतील; व ज्यांमध्यें हिंडण्याफिरण्याची हौस उरली आहे, इकडून तिकडून जाऊन येऊन जीं धामधूम करीत आहेत, अशांची संख्या शेंकडा दहापर्यंत सांपडल्यास सांपडेल. इतर मुलें फार झालें तर तटस्थ बसून किंवा उभीं राहून किंवा भिंतीशीं रेलून या दहांचा दंगा पहात असतील. या स्थितीवरून असें ध्यानांत येतें कीं, तीन तास सारखें शिक्षण झाल्यानंतर ज्यांच्या अवयवांत थोडें चापल्य उरलें आहे अशीं मुलें शेंकडा दहाही नसतात; व तीं दहा शिक्षकाच्या मनासारखा अभ्यास करणारांपैकीं क्वचितच असतात. मुलांस तीन तासपर्यंत दिलेलें पूर्वीचें शिक्षण त्यांच्या *मज्जातंतुसमुदायास ग्लानि आणण्यास पुरे इतकें तें होतें असें मुलांच्या या स्थितीवरून सहज दिसतें. परंतु यानंतर आणखी दोन तास शिक्षण द्यावयाचेंच असतें व तें झाल्यानंतर मुलें निरुत्साह होऊन घरीं जातात. त्यांस व्यायाम करण्याची किंवा खेळण्याच्या जागेकडे जाण्याचीही हौस उरत नाहीं. या गोष्टीविषयीं शिक्षकांस मोठें आश्चर्य व खेद वाटतो ! वास्तविक पाहतां हा परिणाम इतका साहजिक

* Sufficient to cause a depression of the nervous system.

आहे कीं, कोणीही शारीरशास्त्रवेत्ता या परिणामाचें आधीं भविष्य करूं शकेल. वरें याप्रमाणें शिक्षकांनीं शुष्क करून सोडलेलीं मुलें घरीं गेल्यावर काय करितात हें पाहिल्यास असें दिसून येतें कीं, तीं थोडें खाऊन पिऊन स्वस्थ दारांत, खिडकींत किंवा रस्त्यावर उभीं रहातात किंवा बसतात. ह्मणजे जागृतावस्थेंतील विश्रांतीचे जे थोडे प्रकार त्यांस अनुकूल असतात त्यांचा ते उपभोग घेतात. नंतर रात्रीच्या जेवणानंतर पुनः तास दोन तास शाळेचा अभ्यास सुरू होतो, व त्यापुढें झोंप. ही झोंप गाढ येणें त्या दिवशींच्या एकंदर दिनचर्येवर अवलंबून असतें; व दुसरे दिवशीं शाळेंत मार मिळेल कीं काय, आपले सर्व अभ्यास होतील कीं नाहीं, आपला नंबर वर राह्मिल कीं खालीं जाईल, इत्यादि चिंता ज्यांच्या मनावर अंमल करीत असतात त्यांस स्वस्थ व गाढ झोंप येत नसावी, शिवाय **केवळ मानसिक शक्तींस अतिमात्र श्रम होऊन जो थकवा येतो तो गाढ झोंप येण्यास फारसा अनुकूल नसतो, व ती तशी येण्यास शरीरास योग्य व्यायाम होणें अवश्यच असतें.** दुसरे दिवशीं निजून उठल्यावर, स्नानसंध्या आटोपल्यावर किंवा आधींच, मुलाच्या अभ्यासास पुनः सुरुवात होते. व तो अभ्यास जेवणाच्या वेळेपर्यंत चालतो. याप्रमाणें मुलांची दिनचर्या आहे. इजमध्यें निद्रा व जागृतावस्थेंतील विश्रांति घेण्यास मुलांस वेळ आहे, असें गृहीत केलें; तथापि इजमध्यें व्यायामास वेळ नाहीं व शिक्षणानंतर व्यायाम करण्याइतकी मज्जातंतूंमध्यें ताकद उरत नाहीं असें स्पष्ट सिद्ध होतें. शाळा सहा तास भरायाची हें तत्त्व इतकें ठाम झालें आहें कीं त्यामध्यें ऋतुपरत्वें फेरफार करण्याचाही फार थोडया सरकारी शाळांच्या अधिकाऱ्यांनीं प्रयत्न केलेला दिसतो. नोवेंबरपासून मार्चपर्यंत दिवस लहान असतात, त्यामुळें पांच वाजल्यानंतर मुलांनीं खेळायाचें झटलें तरी पुढें रात्र पडण्यास फार थोडा अवकाश उरलेला असतो; व त्या वेळांत घरून कांहीं खाऊन येऊन खेळण्याचे ठिकाणीं जाणें अशक्य असतें. परंतु या अशा महिन्यांत देखील शाळा सहा तास भरलीच पाहिजे. व मुलांस सकाळीं अभ्यासास वेळ नसला व संध्याकाळीं खेळायास वेळ नसला, व रात्रीं जागण्याचा प्रसंग आला, तथापि शिक्षकांस त्या गोष्टीची फिकीर नसते. तसेंच वाढत्या मुलांनीं शाळा सुटल्यावर खेळायाच्या जागीं जायापूर्वी उपाहार करून येणें व नंतर व्यायाम करणें हें तत्त्वच शिक्षकांस मान्य नाहीं असें दिसतें. आहार व उपाहार यांसंबंधानें मुलांची व्यवस्था थोरांप्रमाणें असल्यावर मग आणखी काय पाहिजे असें त्यांस वाटत असावें.

४३. शिक्षणपद्धतीचें स्वरूप मनांत आणून नंतर शिक्षक घरीं करण्यास किती अभ्यास देत असतील या गोष्टीचा विचार केल्यास व वस्तुस्थितिही पाहिल्यास असें दिसतें कीं, एक तासांत जितका विषय शिकवून होईल तितका प्रत्येक दिव-

कायतो एक तास किंवा अर्धाच तास सुटी मिळते, व तीही आधीं तीन तास शिक्षण झाल्यानंतर. याप्रमाणें ही प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या दोन किंवा तीन इयत्तांची स्थिति पाहिली ह्मणजे अत्यल्प वयाच्या मुलांवर शाळेच्या पहिल्या दिवसापासून केवढा जुलूम होत आहे या गोष्टीची कल्पना येईल. सर्वच जेथें अशास्त्र चालले आहे तेथें सुधारणा तरी कोणती म्हणून करायास सांगावी ! या पांच तास शिक्षणानंतर घरून लिहून आणण्याकरितां किंवा तयार करून आणण्याकरितां मुलांस शिक्षक अभ्यास नेमून देतोच. व अत्यल्प वयाच्या मुलांचीही घरच्या अभ्यासापासून सुटका नाहीं ! जणूं काय शाळेंत घातल्यानंतर पाटीपेन्सिल, कागद, दौत-लेखणी, पुस्तकें, शाळा व शिक्षक यांच्या विचाराखेरीज इतर कामांत मुलांचा वेळ गेला तर त्यांच्या हातून महापातकच घडेल ! अशा मुलांमधून अवलोकनशक्ति व जिज्ञासा लवकरच पळ काढतात यांत नवल तें काय ?

४२. यानंतर मराठी वरच्या इयत्तांची व इंग्रजी इयत्तांची स्थिति पाहिल्यास ती उत्तरोत्तर कडकच होत जाते. शाळांतील शिक्षणपद्धतीचें स्वरूप पूर्वी सांगितलेंच. हें शिक्षण तीन तास व दोन तास अशा ह्मण्यांनीं होतें हेंही सांगितलेंच. परंतु वरच्या इयत्तांतील मुलें मधल्या सुटींत काय करीत असतात, हें कोणीही इंग्रजी शाळेंत जाऊन पहावें. पुष्कळ मुलें, ह्मणजे निदान निम्मीं तरी, पुस्तकें घेऊन पुढील तासाची तयारी करितांना दिसतील. त्यांस घरीं अभ्यासास पुरता वेळ मिळाला नसावा, किंवा स्मरणशक्ति मंद झाल्यामुळें केलेल्या अभ्यासाची पुनः उजळणी करणें भाग पडत असावें, असें साहजिक अनुमान होतें. या मुलांस मध्यें खाण्यापिण्याची गरज उरलेली नसते ! दुसरीं कित्येक मुलें कांहीं खाऊन व पाणी पिऊन किंवा खाण्यापिण्यावांचूनच स्वस्थ बसलेलीं दिसतील; व ज्यांमध्यें हिंडण्याफिरण्याची हौस उरली आहे, इकडून तिकडून जाऊन येऊन जीं धामधूम करीत आहेत, अशांची संख्या शेंकडा दहापर्यंत सांपडल्यास सांपडेल. इतर मुलें फार झालें तर तटस्थ बसून किंवा उभीं राहून किंवा भितीशीं रेलून या दहांचा दंगा पहात असतील. या स्थितीवरून असें ध्यानांत येतें कीं, तीन तास सारखें शिक्षण झाल्यानंतर ज्यांच्या अवयवांत थोडें चापल्य उरलें आहे अशीं मुलें शेंकडा दहाही नसतात; व तीं दहा शिक्षकाच्या मनासारखा अभ्यास करणारांपैकीं क्वचितच असतात. मुलांस तीन तासपर्यंत दिलेलें पूर्वीचें शिक्षण त्यांच्या *मज्जातंतुसमुदायास ग्लानि आणण्यास पुरे इतकें तें होतें असें मुलांच्या या स्थितीवरून सहज दिसतें. परंतु यानंतर आणखी दोन तास शिक्षण द्यावयाचेंच असतें व तें झाल्यानंतर मुलें निरुत्साह होऊन घरीं जातात. त्यांस व्यायाम करण्याची किंवा खेळण्याच्या जागेकडे जाण्याचीही हौस उरत नाहीं. या गोष्टीविषयीं शिक्षकांस मोठें आश्चर्य व खेद वाटतो ! वास्तविक पाहतां हा परिणाम इतका साहजिक

* Sufficient to cause a depression of the nervous system.

आहे कीं, कोणीही शारीरशास्त्रवेत्ता या परिणामाचें आधीं भविष्य करूं शकेल. वरें याप्रमाणें शिक्षकांनीं शुष्क करून सोडलेलीं मुलें घरीं गेल्यावर काय करितात हें पाहिल्यास असें दिसून येतें कीं, तीं थोडें खाऊन पिऊन स्वस्थ दारांत, खिडकींत किंवा रस्त्यावर उभीं रहातात किंवा बसतात. ह्मणजे जागृतावस्थेंतील विश्रांतीचे जे थोडे प्रकार त्यांस अनुकूल असतात त्यांचा ते उपभोग घेतात. नंतर रात्रीच्या जेवणानंतर पुनः तास दोन तास शाळेचा अभ्यास सुरू होतो, व त्यापुढें झोंप. ही झोंप गाढ येणें त्या दिवशींच्या एकंदर दिनचर्येवर अवलंबून असतें; व दुसरे दिवशीं शाळेंत मार मिळेल कीं काय, आपले सर्व अभ्यास होतील कीं नाहीं, आपला नंबर वर राह्मिल कीं खालीं जाईल, इत्यादि चिंता ज्यांच्या मनावर अंमल करीत असतात त्यांस स्वस्थ व गाढ झोंप येत नसावी, शिवाय **केवळ मानसिक शक्तींस अतिमात्र श्रम होऊन जो थकवा येतो तो गाढ झोंप येण्यास फारसा अनुकूल नसतो, व ती तशी येण्यास शरीरास योग्य व्यायाम होणें अवश्यच असतें.** दुसरे दिवशीं निजून उठल्यावर, स्नानसंध्या आटोपल्यावर किंवा आधींच, मुलाच्या अभ्यासास पुनः सुरुवात होते. व तो अभ्यास जेवणाच्या वेळेपर्यंत चालतो. याप्रमाणें मुलांची दिनचर्या आहे. इजमध्यें निद्रा व जागृतावस्थेंतील विश्रांति घेण्यास मुलांस वेळ आहे, असें गृहीत केलें; तथापि इजमध्यें व्यायामास वेळ नाहीं व शिक्षणानंतर व्यायाम करण्याइतकी मज्जातंतूंमध्यें ताकद उरत नाहीं असें स्पष्ट सिद्ध होतें. शाळा सहा तास भरायाची हें तत्त्व इतकें ठाम झालें आहें कीं त्यामध्यें ऋतुपरत्वें फेरफार करण्याचाही फार थोडया सरकारी शाळांच्या अधिकाऱ्यांनीं प्रयत्न केलेला दिसतो. नोवेंबरपासून मार्चपर्यंत दिवस लहान असतात, त्यामुळें पांच वाजल्यानंतर मुलांनीं खेळायाचें झटलें तरी पुढें रात्र पडण्यास फार थोडा अवकाश उरलेला असतो; व त्या वेळांत घरून कांहीं खाऊन येऊन खेळण्याचे ठिकाणीं जाणें अशक्य असतें. परंतु या अशा महिन्यांत देखील शाळा सहा तास भरलींच पाहिजे. व मुलांस सकाळीं अभ्यासास वेळ नसला व संध्याकाळीं खेळायास वेळ नसला, व रात्रीं जागण्याचा प्रसंग आला, तथापि शिक्षकांस त्या गोष्टीची फिकीर नसते. नसेंच वाढत्या मुलांनीं शाळा सुटल्यावर खेळायाच्या जागीं जायापूर्वी उपाहार करून येणें व नंतर व्यायाम करणें हें तत्त्वच शिक्षकांस मान्य नाहीं असें दिसतें. आहार व उपाहार यांसंबंधानें मुलांची व्यवस्था थोरांप्रमाणें असल्यावर मग आणखी काय पाहिजे असें त्यांस वाटत असावें.

४३. शिक्षणपद्धतीचें स्वरूप मनांत आणून नंतर शिक्षक घरीं करण्यास किती अभ्यास देत असतील या गोष्टीचा विचार केल्यास व वस्तुस्थितिही पाहिल्यास असें दिसतें कीं, एक तासांत जितका विषय शिकवून होईल तितका प्रत्येक दिव-

शींच्या अभ्यासांसि नेमिला जातो. आतां एक तासांत शिक्षक नेमिलेल्या विषयांतील जितकें प्रश्न विचारील तितक्यांचीं उत्तरें तयार करण्याच्या कामास निदान एक तास तरी पाहिजे, असें कोणाच्याही लक्षांत येईल; व ह्मणून जितके तास शिक्षणाचे तितकेच घरच्या अभ्यासास सर्व मुलांस लागतात. जीं मुलें लहान त्यांस त्यांच्या कोंवळ्या बुद्धीच्या मानानें त्यांचा अभ्यास अतिप्रमाण होतो; व जीं अधिक प्रगल्भ बुद्धीचीं, त्यांचीही तीच दशा. कारण त्यांचे शिकण्याचे विषय अधिक अवघड होत जातात. एक तासास पुरे इतका अभ्यास नेमून न दिला, तर शिक्षकास प्रश्न विचारून संपल्यावर आतां काय करावें असें होतें. अशा प्रसंगीं कित्येक शिक्षक वर्गांत स्वस्थ बसलेले, किंवा वर्गांतून उठून आलेले किंवा कागद वगैरे तपासण्याचें आपलें दुसरें कांहीं काम करूं लागलेले माझ्या पाहण्यांत आहेत. ह्मणून तासास भरपूर पुरेल इतका अभ्यास तर मुलांस दिलाच पाहिजे. जेव्हां मुलें वरच्या वरच्या इयत्तांत येतात तेव्हां त्यांचे अभ्यास या कारणानें फारच वाढत जातात; व जे विषय मुलांस केवळ पाठ करून यावयाचें असतें ते नेमितांना शिक्षक बरेच उदार असतात.

जेव्हां इंग्रजी शाळेंत प्रत्येक विषयास निराळा शिक्षक असतो, तेव्हां प्रत्येकास आपला विषय होईल तितका पुढें न्यावयाचा असतो; त्यास इतर शिक्षकांनीं नेमिलेल्या अभ्यासांची माहिती नसते; व तो यथेच्छ अभ्यास नेमितो व ते न झाल्याबद्दल कडक शिक्षाही करितो. अशा प्रसंगीं मुलांनीं केंविलवाणें तोंड करून "मास्तर, इतके अभ्यास कसे होतील!" ह्मणून त्याची आर्जव केल्याचें पाहण्यांत येतें. याशिवाय विषयपरत्वें निरनिराळे शिक्षक नेमण्याचा अभ्यास देण्याच्या कामीं दुसऱ्या एका प्रकारें परिणाम घडतो. तो असा कीं, बहुधा एकाच विषयभागावर एकामागून एका वर्गावर जाऊन प्रश्न विचारण्याचा शिक्षकास नित्य प्रसंग येतो. पहिल्या वर्गावर जाऊन मुलांस विषय समजावून देण्याकरितां तो कांहीं उदाहरणें घेतो, दृष्टांत देतो, विशेष विवरण करितो. पुढें दुसऱ्या वर्गावर गेल्यावर साहजिकपणें तितकींच उदाहरणें, दृष्टांत व विवरण देऊन आपण पूर्वी बोललेल्या सर्व गोष्टींची पुनरुक्ति करणें त्याकडून होत नाहीं. त्यामुळें सारांश सांगून किंवा बेताचें विवरण करून तो बाकी वेळ प्रश्न विचारण्यांत घालवितो. त्यामुळें दुसऱ्या वर्गांत पहिल्यापेक्षां अधिक विषय होतो. यापुढें तिसऱ्या वर्गांत त्याहून थोडा अधिक, व चवथ्या वर्गांत शिक्षकानें पहिल्या हुरुपानें शिकविल्यास दिलेला धडा संपून बराच वेळ शिलक राहतो. मग त्या वेळाच्या मानानें दुसरे दिवशींचा धडा नेमिला जातो. या सर्व गोष्टींचा अनुभव ज्या कोणांस याप्रमाणें एकच विषय शिकविण्याचें काम पडलें असेल त्यांस आला असला पाहिजे; व सर्व वर्ग सारख्या योग्यतेचे असतील, तर असा परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं.

मराठी दुसऱ्या तिसऱ्या इयत्तांतील सात आठ वर्षांच्या मुलांस शाळेंतील शिक्षण व घरचा अभ्यास मिळून दिवसांतून कमींत कमी आठ तास मानसिक श्रम पडतो; व या उपर इंग्रजी शाळेच्या वरच्या (ह्मणजे ७ व्या) इयत्तेस येऊन पोहोंचेपर्यंत मानसिक श्रमाची इयत्ता वाढत वाढत कमींत कमी ह्मटली तर दहा तासांपर्यंत जाते; व मुलांचें वय वाढत वाढत सोळा सतरा किंवा अठरा वर्षांचें होतें. याप्रमाणें सामान्य मुलांच्याही मानसिक श्रमाचें व वयाचें प्रमाण आहे. ही गोष्ट कोणा शिक्षकास नाकबूल करितां येऊं नये व पालकांस तिचा पूर्ण प्रत्यय यावा, ह्मणून आतांपर्यंत तिचें निरनिराळ्या रीतींनीं पुनः पुनः उद्घाटन केलें. ही एक गोष्ट पालकांच्या मनावर पक्की बिंबून ती त्यांच्या हृदयांस झोंबूं लागल्यासेरीज शिक्षणाच्या कामांत सुधारणा होणें कठीण, ह्मणून तिची पुनरुक्ति करणें भाग पडत आहे. मुलांच्या वयाच्या मानानें पाहतां त्यांस पडणारा हा इतका मानसिक श्रम शास्त्रदृष्ट्या अतिप्रमाण आहे, असें ह्मटलेंच पाहिजे. असा अतिप्रमाण श्रम आठवडयांतून सहा दिवस करणाऱ्या मुलांची मज्जातंतुगत शक्ति (energy of the nervous system) एवढ्याच श्रमानें त्या त्या दिवशीं पूर्णपणें खलास होईल, व त्यांस शारीरिक श्रम करण्याची उमेद उरणार नाहीं, हें कोणीही डाक्तर किंवा शारीरशास्त्रवेत्ता निःसंदेहपणें सांगेल. तेव्हां मुलें शाळा संपल्यावर व्यायामास कंटाळतात याविषयीं आश्चर्य कां मानावें !

४४. हा इतका नित्य श्रम वयाच्या व मेंदूच्या मानानें पाहतां अतिप्रमाण होतो, व त्यायोगें मुलांच्या मानसिक शक्ति जशा वाढाव्या तशा वाढत नाहींत, उलट त्या क्षीण होत जातात यांत संशय नाहीं. अतिश्रम करणें हें कोणासही साहजिकपणें आवडत नाहीं; त्यामुळें मुलें तो करण्याचें आपल्याकडून टाळीत असतातच; परंतु तो अजीबात टळत नाहीं; व सर्व मुलांवर त्याचा क्रमाक्रमानें कमी अधिक वेगानें, कमी अधिक वयांत पगडा बसतोच. असें होण्यास प्रश्न विचारण्याची शिक्षणपद्धति, मंदत्वाबद्दल शारीरिक शिक्षा व घरीं व शाळेंत अपमान किंवा उत्तेजन या गोष्टी कारण होतात. ज्यास थोडी तरी बुद्धि आहे तो अशा उत्तेजनांनीं व टोंचण्यांनीं केव्हां तरी वेधला जातो, व आपलें बुद्धिसामर्थ्य पूर्णपणें खर्चण्यास तयार होतो. या कारणानें ज्या प्रमाणानें मुलगा कमी अधिक तापट असतो त्या प्रमाणानें त्याच्या बुद्धीस आधीं किंवा मागून भरती येते, व तो वर्गांत पहिला, दुसरा किंवा साधेल तितका वरचा नंबर ठेवितो. वर नंबर ठेवणारीं, विशेषतः पहिला दुसरा नंबर ठेवून बक्षिसें व स्कालर्शिपा मारणारीं मुलें शिक्षकांच्या बरींच लक्षांत राहतात; तेव्हां त्यांस पुढील गोष्टींचा तेव्हांच प्रत्यय येईल. मुलांकडून अभ्यास करवून घेण्याविषयीं ज्या शाळांची प्रसिद्धि आहे व या कामीं शिक्षकही जेथें विशेष दक्ष आहेत तेथें पुढें सांगितल्याप्रमाणें स्थिति आढळेल. सर्वच

शाळा हळू हळू या प्रकारच्या होत आहेत, तेव्हां ही स्थिति सर्वत्र देखील दिसण्यासारखी आहे. तीस अपवाद झटले तर जीं मुलें जात्याच अत्यंत बुद्धिमान् व ज्यांस समजायास व पाठ करण्यास फारच थोडे श्रम पडतात त्या मुलांचे व तेही कांहीं अंशांनीं. असे अपवाद हजारांत दहा पांच सांपडायाचे, तेव्हां त्यांमुळें सामान्यत्वानें वर्णिलेल्या पुढील स्थितीस बाध यावयाचा नाहीं.

ही स्थिति अशी कीं मुलांच्या बुद्धीस कोणत्या तरी एका इयत्तेंत भरती येते. या भरतीचीं कारणें पूर्वी सांगितलींच; ही भरती साहजिक नसते, तीं केवळ कृत्रिम रीत्या आणलेली असते, त्यामुळें ती जितक्या अल्पवयांत येते तितकी कमी टिकते, जितकी अधिक वयांत येते तितकी अधिक वेळ टिकते. उदाहरणार्थ, जीं मुलें मराठी शाळांतून उत्तम उत्तम ठरून इंग्रजी शाळेंत येतात, म्हणजे ज्यांच्या बुद्धीस मराठी शाळेंतच भरती येते, तीं मुलें इंग्रजी एक दोन इयत्ता चढलीं नाहींत तोंच बुद्धीनें मंद होतात व शरीरानें दुर्बळ होत जातात. तीं पुढें कमी अभ्यास करितात असें नव्हे, तर अभ्यास करायाची घोंकपट्टीची दुष्ट संवय त्यांस फार लवकर जडते, बुद्धीस अतिश्रम होतात, व ती निरंतरची क्षीण होते. इंग्रजी तिसऱ्या किंवा चौथ्या इयत्तेंत ज्या मुलांच्या बुद्धीस भरती येते, तीं सहाव्या किंवा सातव्या इयत्तेंत मंद होतात; व पुढें परीक्षेंत नापास होऊन बरेच गोते खातात; व कालेजांत तीं पहिल्या नंबरचीं मंद गणिलीं जातात. ज्यांच्या बुद्धीस अगदीं वरच्या इयत्तेंत भरती येते, तीं जर पूर्वीचीं निरोगी व सशक्त अशीं वाढलेलीं असलीं तर लवकर पास होऊन कालेजांत एक दोन वर्षें जाईपर्यंत थकत नाहींत, परंतु पुढें कदाचित् थकतात. सामान्यतः पुष्कळ मुलांच्या बुद्धीची भरती शाळेंत असतांच होऊन जाते, व त्यामुळें कालेजांत मंद मुलांचाच विशेष भरणा असलेला दिसतो. शाळेंत लौकिक मिळविलेल्या मुलांनीं कालेजांतही एक दोन वर्षें आपला लौकिक राखिला, अशीं उदाहरणें फार थोडीं आहेत. आपण उत्तम म्हणून पाठविलेल्या मुलांस कालेजांत स्कालर्शिपा किंवा बक्षिसें बहुधा मिळत नाहींत, किंवा तीं युनिव्हर्सिटीतून बाहेर पडतांना शुद्ध तिसरा क्लास घेऊन रडतखडत बाहेर पडतात, हें पाहून शाळामास्तरांस मोठें आश्चर्य वाटतें; परंतु शाळेंतील शिक्षणपद्धतीचा हा तर विशेष गुण समजला पाहिजे ! पुष्कळ वेळां हीं पूर्वीचीं उत्तम मुलें कालेजांतून युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस पाठविण्यासही नालायक ठरतात, तेव्हां ' हीं फार बुद्धिमान् व परिश्रमी होतीं, यांस पाठवाच, ' अशी पूर्वीच्या शिक्षकांकडून शिफारस येते. हीं उत्तम मुलें परीक्षेंत गोते खात असतात, व दुसरीं, ज्यांनीं शाळेंत कधींच नांव मिळविलें नाहीं किंवा तेज दाखविलें नाहीं, तीं कालेजांत हुषार ठरतात, पटापट परीक्षा पास होतात, व स्कालर्शिपा, बक्षिसें व विद्येचे मान मिळवून जातात. या विपरीत स्थितीचें कारण शाळेंतील अतिरिक्त मानसिक

श्रम हें एकच आहे. त्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही सयुक्तिक कारणानें तिचें विवरण करितां येत नाहीं. ज्यांच्या बुद्धीस कालेजांतील पहिल्या एक दोन वर्षांत भरती येते, ते जर शरीरानें आधींच क्षीण झालेले असले व वयानें वाढलेले नसले तर त्यांची मदार फार झालें तर शेवटची परीक्षा पास होईपर्यंत टिकते. पुढें एल्एल्. बी.च्या वेळीं किंवा नौकरीवर असतां त्यांच्या बुद्धींत फारसा जोम राहिलेला असतो असें दिसत नाहीं. सर्व विद्याक्रमांतून जे मध्यम म्हणूनच पार पडले, त्यांपैकींच बरेच लोक पुढील वयांत उद्यास येतात, आपलें तेज पाडितात व समाजाचे हिंमतदार नायक होतात,, इत्यादि गोष्टी हल्लीं सर्वत्र अनुभवास येतील. आरंभींची सदोष शिक्षणपद्धति व तिजमुळें अभ्यासाच्यासंबंधानें झालेले मुलांचे दुष्ट ग्रह व त्यांस जडलेल्या दुष्ट संवयी यांचा हा परिणाम होय. जाणत्या विद्यार्थ्यांनीं आपापल्या संबंधानें या बुद्धीच्या भरतीच्या काळांची आठवण करून आपला पुढील अभ्यासक्रम पाहिल्यास अनेकांस वर सांगितलेल्या सर्व गोष्टींचा प्रत्यय येईल. व मानसिक अतिश्रमानें आणि योग्य शारीरिक श्रमांच्या अभावानें जन्माचें शरीराचें व बुद्धीचें नुकसान होतें, असें त्यांच्या लक्षांत येईल. शर्यतीच्या घोड्यांप्रमाणें मुलांस शाळेच्या इयत्तांतून पिटणाऱ्या पालकांनीं व शिक्षकांनीं हें तत्त्व निरंतर मनांत बाळगलें पाहिजे.

४५. शाळेंत लौकिकास चढलेलीं मुलें कालेजांत मागें मागें पडत जातात, या गोष्टीचें शिक्षकांस आश्चर्य वाटतें म्हणून सांगितलें, परंतु हाच प्रकार शाळेंत सालदरसाल घडत असतो. जो मुलगा चांगला होतकरू आहे म्हणून वर्षाच्या आरंभीं शिक्षक म्हणत असतात, तोच वर्ष अखेरीस वार्षिक परीक्षेंत दोन विषयांतही पास होत नाहीं, व त्यास वरच्या इयत्तेंत घातलें नाहीं असें पाहून त्याच्या पालकास आश्चर्य वाटतें व राग येतो. जो मुलगा चार विषयांत पास व्हावा अशी पालकाची उमेद असते तो रडतखडत दोन तीन विषयांत पास होतो, हें पाहूनही त्याची चित्तवृत्ति अस्वस्थ होते: मग शिक्षक विद्यार्थ्यास व पालक शिक्षकास दोष देतो. आपला मुलगा मंद आहे असें पालक वेळेस कबूल करील, परंतु शिक्षकांनीं त्यास अमुक इयत्तेस चालेल म्हणून त्या इयत्तेंत बसविल्यावर, त्यांनीं त्यास काय शिकविलें व त्या शिक्षणाचा काय परिणाम झाला, हें विचारण्याचा त्यास हक्क येतो. म्हणूनच तो शिक्षकांस दोष देतो. इकडे शिक्षकांनीं आपल्या मतें बिलकुल कसूर केलेली नसते व सर्व दोष ते मुलाच्या आळशीपणावर घालितात. परंतु या एका वर्षाच्या अंतरांत मुलाच्या बुद्धीस, स्मरणशक्तीस व शरीरास क्षीणता आलेली असते, ही गोष्ट उभयतांच्याही ध्यानींमनीं नसते. अखेरीस परिणाम असा होतो कीं दुसऱ्या शाळेंतील शिक्षक अधिक इमानी असतील म्हणून पालक मुलास दुसऱ्या शाळेंत घालितो तेथील शिक्षक मुलास

ज्या इयत्तेंत बसावेंसें वाटत असेल तेथें त्यास बहुधा बसवितात, क्वचित् पूर्वीच्याच इयत्तेंत बसवितात. दुसरें वर्ष जातें, व मुलाची स्थिति फारशी सुधारत नाहीं, व तो वरच्या इयत्तेंत हक्कानें जाऊं शकत नाहीं. कदाचित् जुना विद्यार्थी ह्मणून किंवा दोन विषयांत पास झाला ह्मणून तो वर जातो. पालक पुनः फिकिरींत पडतो, पुनः शाळा बदलतो, व हा क्रम मुलगा अगदीं थकेपर्यंत किंवा तो म्याट्रिक. परीक्षेंत पास होईपर्यंत चालतो. शाळा बदलून पाहण्यास मुलाचा हेका हें एक कारण असतेंच, परंतु त्यास पुष्कळ वेळां वर सांगितलेलें दुसरें कारणही असतें; व पुष्कळ पालक उदासीन होऊन किंवा रागावून मुलांस दुसऱ्या शाळेंत घेऊन जातांना माझ्या पाहण्यांत आहेत. शाळा बदलण्याच्या कामीं या कारणानें मुलांस पालकांचें सहाय्य मिळतें व शहरांतील सर्व शाळा हिंडून आलेलीं मुलें प्रत्येक शाळेंत थोडीं नसतात, व पुष्कळ कालेजें पाहून आलेले विद्यार्थीही हल्लीं थोडे नाहींत.

दरवर्षीं सुमारें निम्मी शाळा बदलून जाते, ही गोष्ट पाहून स्थूलदृष्टीचे विद्याखात्याचे अधिकारी चकित होतात. ते शिक्षकांस दोष देऊं पाहतात, परंतु शिक्षकांजवळ पालकांचे लेखी अर्ज असतात त्यामुळें त्यांस हा दोष, मनांत असलें तरी, सर्वस्वी शिक्षकांवर लादतां येत नाहीं. हल्लीं मुलांस हवें तेव्हां शाळा सोडून जातां येऊं नये ह्मणून व शिक्षकांस पाहिजे तेव्हां त्यांस शाळेंत घेतां येऊं नये ह्मणून, विद्याखात्यानें सक्तीचे नियम फर्मावले आहेत. परंतु विद्यार्थी व त्यांचे पालक एकाच अभिप्रायाचे असल्यास विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांचें काय चालणार ? ज्या शाळांस विद्याखात्याकडून मदत नाहीं त्या अशा प्रसंगीं विद्यार्थ्यांच्या मदतीस येतात; किंवा विद्यार्थी नांवें बदलतात व बाहेरगांवाहून आल्याचा बहाणा करितात; किंवा पालक देखील बाहेरगांवच्या नांवाजलेल्या शाळेंत आपलीं मट्ट मुलें पाठविण्याचा हिय्या करितात. म्याट्रिक. परीक्षेचे अभ्यास तेकीति, व त्यांकरितां दूरच्या गांवीं मुलांस खाणावळींत ठेवणें पालकांस इष्ट वाटावें, हा चमत्कार नव्हे कायं ? परंतु या गोष्टीचें विद्याखात्यास बिलकुल आश्चर्य वाटत नाहीं, किंवा इंग्रजी विद्येच्या प्रसाराकरितां ज्या ठिकठिकाणीं मोठ्या खर्चानें सरकारानें शाळा ठेविल्या आहेत त्यांत कोठें मोठें व्यंग आहे, अशी शंका त्यास येत नाहीं. आश्चर्य जें वाटतें व शंका जी येते ती एवढीच कीं, पालक मुलांस कसे वश होतात ! शिक्षकांचे पैसे बुडविण्याचा किंवा आपलें कृत्य झांकून ठेवण्याचाही त्यांचा इरादा नसतो, तेव्हां अर्थात् पूर्वीच्या शाळेचा कांहीं तरी दोष असला पाहिजे, किंवा नव्या शाळेंत कांहीं अंदाधुंदी असली पाहिजे, अशी त्यांची समजूत होते. या कारणानें विद्याधिकारी शिक्षकांस व्यर्थ श्रम व उपद्रव देत आहेत. त्यांनीं अंतःस्थ स्थिति समजून घेतल्यास व कालेजच्या पी. इ. च्या वर्गांतही अशीच स्थिति कांहीं अंशीं आढळते

ही गोष्ट लक्षांत आणिल्यास, शिक्षणपद्धतीचा दोष मुळाशीं आहे, मुलांच्या बुद्धीचा दिवसानुदिवस ऱ्हास होत गेल्याचें हें फळ आहे, या ऱ्हासाचें शिक्षकांस व पालकांस ज्ञान नाहीं ह्मणून त्यांमध्यें असा बेचनाव होतो, इत्यादि अनेक गोष्टी त्यांच्या ध्यानांत येतील, व इतःपर त्यांच्या परिश्रमांस नवीन योग्य दिशा लागेल.

४६. शारीरिक व मानसिक शास्त्राच्या दृष्टीनें शिक्षणपद्धतीचा विचार करणारे शिक्षक, किंवा शिक्षकांचे शिक्षक, किंवा त्यांवर देखरेख करणारे अधिकारी नाहींत, या गोष्टींचीं ग्रंथवर कांहीं प्रत्यंतरें दिलीं, व पुढें आणखीं देण्यांत येतीलच. शाळेचे तास कमी करण्याचें कोणाच्या ध्यानींमनींही नाहीं; परंतु उलट ते युक्तिप्रयुक्तीनें कसे वाढवावे याच विचारांत शिक्षकवर्ग गुंतलेला आहे. व पालकवर्ग त्यांची ही उमेद पाहून व फीचेंही मान कमी पाहून आश्चर्य व वाहवा करीत आहे! वर्षानुवर्ष आळशी व उनाड मुलें कमी होत आहेत, आळशी व उनाड मुलांसच शाळेंत वर वर जाण्याची विशेष आवड उत्पन्न झालेली आहे, हें पाहून सर्व ब्राह्मणसमाजास समाधान वाटत आहे; व या प्रकारें विद्येचा प्रक्रम पाहून विद्याखातेंही स्वतःस कृतार्थ मानीत आहे. परंतु आळशी व उनाड मुलें जशीं कमी होत आहेत त्याप्रमाणेंच दांडगीं व तेजस्वी मुलेंही कोठें दिसेनाशीं झालीं आहेत; पुऱ्या वाढीचीं व साहजिक प्रतिभेचीं मुलें सांपडेनाशीं झालीं आहेत; व प्रश्न करण्याचा मार्ग थोडासा बदलतांच किंवा परीक्षकाची डुरकणी ऐकतांच, मेंढरांप्रमाणें कासावीस होणाऱ्या मुलांनीं शाळा व कालेजें भरत आहेत; ही दुःस्थिति कशी कोणाच्या लक्षांत येत नाहीं! मुलें आळशी व उनाड आहेत किंवा ती मानसिक अतिश्रमापासून परावृत्त होत आहेत हें ओळखणें कठीण नाहीं, परंतु तें पालकांस व शिक्षकांस केव्हां साधेल तें साधो. वास्तविक पाहिलें तर आळशी व उनाड मुलें नाहींशीं करण्याचा उभयतांचाही प्रयत्न नाहीं; कारण त्या प्रयत्नाचे मार्ग अगदीं निराळे आहेत. हल्लीं जो प्रयत्न जारीनें सुरू आहे तो मानसिक अतिश्रमापासून साहजिकपणें निवृत्त होणारांस चरकांतून पिळून काढून त्यांचा स्वाभाविक आडदांडपणा घालविण्याचा प्रयत्न आहे. ज्याप्रमाणें हात भाजतांच तो आपण मागें घेतो, जिभेवर ठेवलेला पदार्थ कडू लागतांच तो थुंकून टाकितों, त्याप्रमाणेंच जिवापाड श्रम पाहतांच आपलें मन पराङ्मुख होतें. हा साहजिक मनोधर्म होय; व इतर शारीरधर्मांप्रमाणें मनुष्याच्या संरक्षणार्थच ईश्वरानें त्याची योजना केलेली आहे. या मनोधर्माचा संवयीनें किंवा उत्तेजनानें व टोंचणीनें कृत्रिमरीत्या मोड करून किंवा विसर पाडून मुलांस अल्पवयांत अतिप्रमाण मानसिक श्रमांस लावणें, हें अत्यंत हानिकारक आहे. या रीतीनें ब्राह्मण लोकांनीं स्वतःच्या संततीस व तिच्या द्वारें ज्ञातीस सर्व प्रकारची निकृष्टता आणण्याचा क्रम चालवावा ही मोठी शोचनीय गोष्ट होय, ब्राह्मण ज्ञातीची हानि करणाऱ्या दुसऱ्या अनेक गोष्टी आहेतच; परंतु

त्यांस या प्रबळ सर्वस्वहानिकारक गोष्टीची भर पडल्यानें या ज्ञातीचें अपरिमित नुकसान होत आहे.

४७. आतां शाळेच्या वेळेसंबंधानें एक गोष्ट सांगून पुढें व्यायामासंबंधानें विचार करूं. शाळा अकरापासून पांचपर्यंत भरविणें, ह्मणजे अकरा वाजल्यानंतरचा सर्व वेळ शाळेच्या कामीं घेण्यासारखें आहे. कारण नवंबरपासून पुढें चार महिने दिवस लहान असतात त्यामुळें व पावसाळ्यांत पाऊस येण्याची वेळ संध्याकाळीं असते, जिकडे तिकडे ओलें असतें व गार वारा सुटतो, त्यामुळे घरीं येऊन खाऊन पिऊन हुषार होऊन व्यायामास जाण्यास मुलांस पांच वाजल्यावर फुरसत उरत नाहीं, किंवा सोसत नाहीं; शिवाय पांच वाजल्यानंतर तीं शारीरिक व्यायामास लागल्यास जागृतावस्थेंतील विश्रांतीस त्यांस मुळींच वेळ रहात नाहीं. सकाळीं व्यायाम करावा ह्मटलें तर घरच्या अभ्यासास वेळ सांपडत नाहीं. वास्तविक पहातां जो शरीराची योग्य काळजी घेतो त्यास हल्लीं सकाळीं दोन तास व रात्रीं एक तास, एकंदर तीन तास अभ्यासाकडे देतां येतील, याहून अधिक वेळ देतां येण्यासारखा नाहीं व एवढा वेळ अभ्यासास पुरत नाहीं ही गोष्ट मुलांच्या अनुभवावरून निःसंशयपणें सिद्ध होते. त्यामुळें रात्रीं जागलें तरी पाहिजे किंवा सकाळचे सर्व चार तास अभ्यासांत घालविले पाहिजेत अशी मुलांची स्थिति आहे. जर शाळा सकाळीं नऊ वाजतां भरविली तर हल्लींच्या रीतीनें मुलें तीन वाजतां मोकळीं होतील व त्यांस पुढें व्यायामास योग्य वेळ मिळेल. परंतु मुलांच्या घरची सर्व व्यवस्था गैरसोयीची होईल; व त्यांस सकाळीं अभ्यासास वेळ सांपडतो तो मिळायाचा नाहीं. इंग्लंडांतील मुख्य मुख्य शाळा सकाळीं ९॥ किंवा १० वाजतां भरतात; मुलांस मध्यें बहुधा जेवणापुरता वेळ मिळतो; व तीनपासून चारपर्यंत तीं शाळेंतून सुटतात. परंतु हल्लींच्या घरच्या स्थितींत व घरच्या अभ्यासांत जोंवर फेर झाला नाहीं, तोंवर ही व्यवस्था कोणासही सोयीची होणार नाहीं. तिकडील शाळेंत दुपारच्या जेवणाची व्यवस्था बहुधा शाळेंत व शिक्षकांकडेच असते, व खेळण्याची जागा शाळेसभोंवतींच असते, त्यामुळें ही व्यवस्था तिकडे सोयीची पडते, व मध्यें अर्धा तास सांपडला तर तेवढ्यांतच मुलें खेळून पुनः वर्गांत येऊं शकनात; पंधरा मिनिटें दिलीं तर तेवढ्यांतच चार उड्या मारून येतात. या बाबतींत इकडील शाळागृहें व खेळाच्या जागा यांचा जेव्हां कांहीं संबंध जडेल तेव्हां मात्र सुधारणा होऊं शकेल. परंतु या दोहोंमध्यें संबंध नसल्याचे व शाळेचे आणि अभ्यासाचे तास यथेष्ट वाढवून ठेविल्याचे दुष्ट परिणाम मात्र हल्लीं सर्वत्र दिसत आहेत.

कांहीं दिवसांपूर्वी मुलांकडून शारीरिक व्यायाम करून घेणें हें शिक्षकांचें काम नव्हे अशीच सर्वांची समजूत होती. या समजुतीमुळें शिक्षणाचा काळ फार

अधिक नेमिला गेला; व व्यायामासंबंधानें शिक्षकांस शास्त्रीय माहिती कांहींच नाहीं अशी स्थिति झाली व ती अद्यापि आहेच. कोणीही उमेदवार व उत्साही शिक्षक पाहिल्यास त्यास असें होतें कीं शिकवावें तितकें थोडेंच; व शिक्षणक्रम मश्वरूप असल्यामुळें शिक्षकास त्यापासून कष्टही थोडेच पडतात. सुट्टीच्या वेळेंत वर्ग लांचविणारे, सुट्टीच्या दिवसांत वर्ग बोलावणारे, व सुट्टीच्या दिवसाकरितां विशेष अभ्यास नेमणारे, शिक्षक सर्वत्र आहेत. जों जों शिक्षणासंबंधीं उत्साह अधिक, तों तों **शिकव, शिकव, शिकव** असें शिक्षकास होतें; शिकविण्यावांचून कांहीं यावयाचें नाहीं; मुलाच्या अवलोकनशक्तीवर व जिज्ञासेवर कोणत्याही कामांत अवलंबून रहाणें योग्य नाहीं; जें जें इष्ट ज्ञान तें तें शिकवीत बसावें, असा त्याचा ग्रह होतो. परंतु बाल्यावस्थेंत हें सर्व शिक्षण फाजील झाल्यास मुलाचें जन्माचें नुकसान होतें, हें कोणाच्याही लक्षांत येत नाहीं. फार मोठें वजन उचलल्यानें जशी उसण भरते, फार मोठें वजन फेंकिल्यानें जसा हात लचकतो, फार पळाल्यानें जसा माणूस छातींत फुटतो, त्याप्रमाणेंच शिक्षणाचा अतिप्रसंग केल्यानें बुद्धीस अकालीं क्षीणता येते व शिक्षणाचा जो उद्देश तोच समूळ फसतो, ही गोष्ट उत्साहवंत शिक्षकांस, डाक्तर वगैरे शारीरशास्त्रज्ञांनीं नीट समजावून दिली पाहिजे. मुलांचा मज्जातंतुसमुदाय निःसत्व होईपर्यंत किंवा त्याहून अधिकच शिक्षण देणें, म्हणजे लहान गोऱ्यास नांगरास जुपण्यासारखें आहे; त्यायोगें गोऱ्याची वाढ खुंटून तो दुर्बळ होतो हें अज्ञान शेतकऱ्यासही माहित असतें. लोकांचीं मुलें ताब्यांत घेणाऱ्या शिक्षकांनीं आत्मोत्कर्षाकरितां किंवा पालकांचें हित करण्याच्या बुद्धीनें मुलांकडून अकालीं मानसिक अतिश्रम करविणें म्हणजे अज्ञान कुणब्याहून अधिक अविचार दाखविण्याप्रमाणें आहे !

भाग ५ वा.

व्यायाम.

४८. व्यायामाच्या आवश्यकतेसंबंधानें ज्यांची समजूत पाडिली पाहिजे असे लोक आतां फारच थोडे उरले असतील; मुलांस (व थोरांसही) व्यायाम आवश्यक आहे, असें सर्व जण, शिक्षक व पालक, कबूल करितील. परंतु ही आवश्यकता मान्य असणें व तिचा मुलांस प्रसंगीं उपदेश करणें, यापलीकडे या विषयासंबंधानें कोणास विशेष माहिती आहे असें दिसत नाहीं; व म्हणूनच व्यायामसंबंधी नियम, त्याचा काल, त्याचे हितकारक प्रकार, इत्यादिविषयीं पुष्कळांमध्यें पूर्ण अज्ञान दिसतें, आणि त्यामुळें केलेला व्यायामही फुकट जातो. जीं मुलें व्यायाम करितात व जीं करीत नाहींत त्यांमध्यें हल्लीं म्हणण्यासारखा फेर दिसत नाहीं;

व कित्येक ठिकाणीं व्यायाम न करणारीं मुलेंच अधिक निरोगी असा विपरीत प्रकार आढळतो. याकरितां सॉमान्य जनांस उपयोगी अशी व्यायामासंबंधीं कांहीं थोडी शास्त्रीय माहिती पुढें देतों.

" *शरीरांतील सर्व भागांची अशी स्थिति आहे कीं त्यांस जोंवर चलन आहे तोंवर ते निरोगी राहतात; त्यांकडून जें काम व्हावयाचें तें जोंपर्यंत ते नियमितपणें करीत असतात तोंवर त्यांमध्यें रक्ताचा प्रवाह जोरानें वहातो, ते सुदृढ असतात, आणि बाल्यावस्थेंत त्यांची वाढ होते. परंतु ज्या भागास आपलें काम करण्यास अवकाश मिळत नाहीं व त्यामुळें जो आळशी रहातो, त्यांत रक्तप्रवाह मंद होतो, तो दुर्बळ होत जातो, व प्रथम वयांत असें घडलें तर त्याची वाढ होत नाहीं. मनुष्याचे नित्याचे उद्योग असे असतात कीं त्यांपासून कांहीं अवयवांस मात्र श्रम पडतात व बाकीचे बहुतांशीं स्थिर रहातात. योग्य श्रम करणाऱ्या अवयवांस पुष्टि येत जाते, परंतु इतरांची ती नष्ट होते.

" लहानपणीं शाळेंत व घरीं स्वस्थ बसून राहण्याची ज्या मुलांस संवय लागते त्यांवर हे परिणाम घडलेले सर्वत्र आढळतात. केवळ शारीरिक श्रम करणाराच्या मेंदूवरही असेच परिणाम घडतात; परंतु मेंदूची विकलता बाह्य आकारावरून एकदम कदाचित् दिसून येत नाहीं, परंतु शरीराची विकलता तशी झांकून राहत नाहीं. घरीं स्वस्थ बसून केवळ मानसिक श्रम करणारीं मुलें (व मोठीं माणसेंही) अल्पाहारी होतात, व सर्व गात्रांनीं क्षीण होतात. शारीरिक श्रम करणाराइतकें जरी क्वचित् त्यांनीं अन्नग्रहण केलें तथापि त्यांस त्या फाजील अन्नाचा उपयोग होत नाहीं; तें केवळ आमाशय व पक्वाशय मोठा करितें; व शरीरास उपयुक्त असे जे कित्येक रस त्यापासून उत्पन्न व्हावयाचे ते उत्पन्न केल्यावांचूनच शरीरांतून बाहेर जातें. अन्न कितीही उत्तम असो, त्याचा पूर्ण उपयोग घडण्यास प्रत्येक अवयवानें आपणांस पुष्टि देणाऱ्या रसधातूंची शरीरांत आवश्यकता उत्पन्न केली पाहिजे; मग ते रसधातु जेव्हां अन्नापासून उत्पन्न होऊन रक्तांत येतात व त्या रक्ताचा प्रवाह वेगानें वाहतो तेव्हां त्यांचें अवयवांकडून ग्रहण होतें. शरीरांत व्यर्थ अन्न गेल्यानें जे अनर्थावह परिणाम होतात ते हे कीं, अपचन होण्याची नित्य भीति असते व तें क्षुल्लक कारणांनींही होतें; अन्नांतून सर्व उपयुक्त रस शोषून घेण्याची पक्वाशयास संवय उरत नाहीं, व जेव्हां नित्य आळशी राहणाऱ्या अवयवांस एखादे वेळीं थोडेंही विशेष काम पडतें, तेव्हां त्यांस योग्य पुष्टि व दुरुस्ती न मिळून अतिश्रम होतात, आणि ते दुखावतात किंवा रोगी होतात. जो मनुष्य एखादेच वेळीं मोठें वजन उचलतो,

* हा उतारा मीं आपल्या दुसऱ्या एका अप्रसिद्ध निबंधांतून घेतला आहे; त्याचा सारांश सहावे पुस्तकांत 'व्यायाम' या धड्यांत दिला आहे. स. पु. पृ. १६३ पहा.

किंवा पुष्कळ चालतो, किंवा फार विचार करितो, त्याची मागून जी अवस्था होते तिजवरून या गोष्टीचा प्रत्यय येईल. अत्यशनानें कित्येकांच्या शरीरावर पुष्कळ मेद चढतो, परंतु स्नायु क्षीणचे क्षीण राहतात, व केव्हां केव्हां रुधिरातिशय होऊन व रक्ताचा भलत्याच ठिकाणीं तुंबारा होऊन त्यामुळेंच ते मृत्यु पावतात. सामान्यतः पाहतां आहार कमी होणें हा शारीरिक श्रमांच्या अभावाचा परिणाम होय, परंतु तो जर कमी न होईल तर हे दुसरे अनिष्ट परिणाम घडण्याचा संभव असतो.

" ऐन वाढीच्या दिवसांत ह्मणजे वयाच्या पहिल्या अठरा वर्षांत ज्याच्या प्रत्येक शरीरभागास योग्य श्रम घडले नाहींत त्याच्या शरीराचे भिन्न भाग भिन्न प्रमाणानें वाढतातं; त्याची आकृति बेढब होते, व उत्तर वयांत कित्येक कामांस तो अगदीं नालायक होतो. ज्यानें सर्वच अवयवांची या रीतीनें उपेक्षा केली तो सर्वच अवयवांनीं क्षीण होतो, शरीराची वाढ खुंटून तो खुजा व सडपातळ होतो, व त्याच्या अन्नपचनादि शरीरव्यापारांस मांद्य येऊन मानसिक श्रमही त्याकडून होईनातसे होतात. तो स्वतः दुर्बळ व अल्पायुषी होतो, एवढेंच नव्हे तर संततीसही हे दोष संक्रमित करितो.

४९. " **शरीराची व मेंदूची पूर्ण वाढ होण्यास सर्व अवयवांस नित्य योग्य चलन मिळालें पाहिजे. नित्य व्यासंगानेंच ज्या अवयवांस श्रम होतात, त्यांहून इतर अवयवांस चलन देण्याकरितां आपण जे विशेष श्रम करितों त्या श्रमांस व्यायाम ही संज्ञा दिली आहे. पुरुषांस व स्त्रियांस, श्रीमंतांस व दरिद्र्यांस, आबालवृद्धांस या कारणानें व्यायामाची आवश्यकता उत्पन्न होते.** व्यायामाच्या संबंधानें पुढें दिलेले नियम मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेविले पाहिजेत.

(१) **कोणत्याही अवयवास ग्लानि येईपर्यंत त्याकडून कधींही श्रम घेऊं नये.** त्या अवयवाचा व्यापार किंचित् मंद पडत आहे व त्याच्या चलनवलनानें मज्जातंतूंस व मनास थोडेही कष्ट वाटत आहेत, अशी वेळ येतांच त्यास विश्रांति दिली पाहिजे. चढाओढीस लागून किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें कोणत्याही अवयवास अतिरिक्त श्रम देणें शेवटीं अहितकारक असतें.

" ईश्वरानें शरीराच्या दोन भागांचें चलनवलन आपल्या स्वाधीन ठेवलेलें नाहीं. ते दोन भाग फुप्फूस व काळीज हे होत. जन्मापासून मरणापर्यंत या भागांस विसावा नसतो, त्यांस पूर्ण विसावा मिळणें ह्मणजेच मृत्यु. परंतु वाढीच्या व जोराच्या संबंधानें जो नियम इतरांस लागू तोच याही अवयवांस लागू आहे; व त्यांस जोरदार करणें किंवा क्षीण करणें आपल्या स्वाधीन असतें. या अवयवांस जोरदार केल्यास जितका फायदा होतो, तितका इतर कोणापासूनही होत नाहीं, सबब (२) **ज्या व्यायामांनीं छातींत पुष्कळ**

शुद्ध हवा भरेल, छातीस पुष्टि येऊन ती उचलून रुंदावून पुढें येईल, व कांळजाचे ठोके फार वेगानें न पडतां किंवा त्यास कष्ट न होतां धिम्मेपणानें श्वास पुनः पुनः भरपूर आंत घेतां येईल त्या व्यायामांची विशेष संवय करावी. ज्याची छाती याप्रमाणें भरेल त्यास रोगाची सहसा बाधा होत नाहीं, शीतोष्णवातांमध्यें फेरफार होतांच त्यांची बाधा न होईल अशा तऱ्हेनें त्याच्या रुधिराभिसरणाचें आपोआप नियमन होतें; व स्वस्थपणींही रक्तप्रवाह जोरानें वाहून बळ व आयुष्य यांची वृद्धि होते. या अवयवांच्या पुष्टीकडे लक्ष देऊन व्यायामाची योजना करणें हा दुसरा नियम होय.

(३) **शरीराच्या कोणत्याही भागाचें सामर्थ्य वाढविणें झाल्यास ही गोष्ट सावकाशीनें व क्रमानें साध्य करून घेतली पाहिजे, घाई करितां कामां नये.** हा व्यायामासंबंधीं तिसरा नियम होय. चालण्याची किंवा पळण्याची किंवा अशीच दुसरी कोणतीही संवय करणें झाल्यास, तत्संबंधी श्रम वाढवीत वाढवीत गेलें पाहिजे; नाहींतर उद्दिष्ट हेतु कधींच सिद्धीस जात नाहीं, उलट अवयवांस अपकार होतो. ज्यांनीं अल्पवयांतच पुष्कळ खाऊन व पुष्कळ श्रम करून शरीरास पुष्टि आणण्याची घाई केली आहे असे तालीमबाज लोक पुरे वाढत नाहींत किंवा दीर्घायुषी होत नाहींत असा अनुभव आहे, व श्रमाची संवय सुटतांच त्यांस अत्यंत क्षीणता किंवा अत्यंत स्थौल्य प्राप्त होतें. या नियमाचीं अनेक दुसरीं उदाहरणें, मनुष्यांमध्येंच नव्हे, तर जनावरांमध्येंही शोधक वाचकास आढळतील. ”

५०. वयाची कांहीं एक विशेष इयत्ता झाली म्हणजे वृद्धावस्था आली असें व्यवहारांत आपण मानितों व व्यक्तिपरत्वें ती इयत्ता शरीरावरील कित्येक बाह्य चिन्हांनीं ठरवितों, तथापि **शास्त्रदृष्ट्या वृद्धत्वाचा काळ प्रत्येक अवयवासंबंधानें निरनिराळा असतो** असें समजलें पाहिजे. एकाच व्यक्तींत एकाच वयाच्या काळांत एक अवयव बाल्यावस्थेंत असल्याप्रमाणें वाढत राहील; दुसऱ्याची वाढ पुरी होऊन तो तारुण्य दशेस येऊन पोहोंचला असेल; तिसरा मध्यम वयास येऊन ठेपला असेल व चवथा वृद्धत्वाचीं सर्व चिन्हें प्रकट करील. **अवयवांची किंवा इंद्रियांची जी बाल्यादि अवस्था ठरवायाची ती त्यांमधील शुद्धरक्तवाहिनी शिरांची स्थिति व शक्ति पाहून ठरविली पाहिजे.** काबाडकष्ट करणाऱ्या लोकांचा मेंदू मध्यम वयांतच पूर्णपणें वृद्धत्वास येतो, असें त्यांच्या बुद्धीच्या अतिमंद ग्रहणशक्तीवरून दिसतें; परंतु त्यांचें हात पाय अगदीं तरुण असतात; व या अवयवांची वाढ इतर अवयवांहून अधिक वयापर्यंत चालूं राहते. या लोकांच्या मेंदूची जी ही स्थिति सांगितली तशीच इतरांच्या अन्य शरीरभागांची होते. व्यासंगानुरूप, इतर गात्रांच्या आधीं कोणाचे हात, कोणाचे पाय, कोणाचें एखादें इंद्रिय, व कोणाचा आमाशय व पक्वाशय वार्ध-

क्यास येऊन पोहोंचतो. या आणि पूर्वी सांगितलेल्या कित्येक गोष्टींवरून वाचकाच्या लक्षांत येईल कीं (४) कोणत्याही एक किंवा अधिक गात्रांस अकालीं वृद्धत्व येण्यास त्यांजकडून मुळींच श्रम न करविणें किंवा वाजवीपेक्षां फाजील श्रम करविणें, या दोन्ही गोटी सारख्याच कारणीभूत होतात; व ह्मणून या दोन्ही टाळण्याकरितां मनुष्यानें प्रत्येक गात्रास योग्य व्यायाम दिला पाहिजे.

५१. (५) मुलांच्या वाढीच्या दिवसांत त्यांची ती वाढ पूर्ण होण्यास त्यांस निदान चार तास व्यायाम केला पाहिजे. हा इतका व्यायाम एकदमच करून उपयोगी नाहीं, तर तो दरखेपेस एक, दीड किंवा दोन तास, अशा दोन तीन खेपामिळून केला पाहिजे. असें करण्यास सकाळीं व संध्याकाळीं दोन्ही वेळां व्यायामाकडे वेळ घालविला पाहिजे. शिक्षकांस जरी व्यायामाची आवश्यकता कबूल आहे, तथापि त्याकडे इतका वेळ जावा हें बहुधा कबूल होणार नाहीं; कारण असें केल्यास त्यांनीं घरच्या अभ्यासाचा ह्मणून जो वेळ ठरविला तो या भलत्याच कामाकडे जाणार ! परंतु पुष्कळ शारीरशास्त्रकारांनीं व व्यायामशास्त्रकारांनीं ही एवढी काळाची इयत्ता आवश्यक असें ठरविलें आहे, व युरोपीय आणि इंग्लिश शाळांतून इतका वेळ व्यायामाकडे जावा अशी बहुधा योजना केलेली असते. व्यायाम असें ह्मणतांच निरानिराळ्या लोकांच्या मनांत निरानिराळी कल्पना येते. कोणास इतका वेळ क्रिकेट खेळलें ह्मणजे झालें असें वाटेल; कोणास इतका वेळ तालीम होईल तरी कशी असें वाटेल; व इतका वेळ चालून कंटाळा मात्र येईल, असें कोणी ह्मणेल. ह्मणजे ज्याच्या जो व्यायाम मुख्यत्वेंकरून डोळ्यासमोर येईल त्या व्यायामास किती वेळ लागणें योग्य आहे हें तो मनांत आणून व्यायामाच्या काळाची इयत्ता ठरवूं पाहील. परंतु कोणताही एकच एक व्यायाम नित्य करीत राहणें फारसें फायद्याचें नाहीं. पूर्वी व्यायामाची जी व्याख्या दिली व त्याविषयीं एथवर जे नियम सांगितले ते सर्व ध्यानांत धरून त्याअन्वयें मुलांच्या नित्याच्या व्यायामांची व्यवस्था होणें आवश्यक आहे. तसें करणें जर सुलभ नसेल, तर उद्दिष्ट हेतु साधेल अशा प्रकारें कधीं एका प्रकारचे व कधीं दुसऱ्या प्रकारचे व्यायाम योजित गेलें पाहिजे.

प्रथम शाळेस इंग्रजी व देशी तऱ्हेचे तालीमखाने जोडलेले आहेत असें समजूं व तेथील व्यायामांची कशी व्यवस्था असावी हें पाहूं. या तालीमखान्यांत पुष्कळ प्रकारच्या व्यायामांचें सामान असलें तर चांगलें, परंतु येथें तूर्त कमींत कमी व अगदीं अल्प मोलाचें सामान आहे असें समजून विचार करूं. मुलांचे जे अवयव मुख्यत्वेंकरून पुष्ट करायाचे ते हात, पाय व छाती हे होत; परंतु या अवयवांस ज्या प्रकारचा श्रम द्यावयाचा त्यायोगें ते तेवढ्याच

एका श्रमास उपयोगी, बाकी सर्व कामांस निरुपयोगी असें मात्र न झालें पाहिजे. ह्मणून तालमींत ज्या कसरती शिकविल्या जातात, त्या व्यवहारांत, किंवा प्रसंग-विशेषीं, पडणाऱ्या श्रमांच्या जातीच्या असाव्या; ह्मणजे त्यांमुळें तालीम सुटल्यावर-ही मनुष्यास व्यायाम राखितां येईल किंवा उपयुक्त कामें करितां येतील. या दृष्टीनें पहातां पहिली काळजी छातीची; व ती भरण्याचे व्यायाम सकाळीं करावे. डंब-बेल व पारलल बार (किंवा हारिझांटल बार) यासंबंधी सर्व सोपे खेळ छातीस व दंडांस शक्ति देणारे व व्यवहारोपयोगी आहेत. ते कोणीही करण्यास चुकूं नये. नमस्कार घालणें व जोर काढणें हे याच जातीचे दुसरे व्यायाम आ-हेत; परंतु त्यांची योग्यता फार कमी असें पुढें लक्षांत येईल. परंतु ज्यास बार करावयास मिळत नाहीं, त्यानें हे दुसरे कनिष्ट प्रतीचे व्यायाम केल्यास चालेल. व्यायामशास्त्रकारांनीं डंबबेल, पारलल बार व हारिझांटल बार यांसंबंधीं खेळ क्रमाक्रमानें कसकसे करीत जावें हें व्यवस्थितपणें सांगितलें आहे, तें वाचकानें पहावें. या व्यायामांत सुमारें अर्धा किंवा पाऊण तास गेल्यास पुरें आहे. आतां (६) व्यायामाची योजना करितांना हळू हळू थकवा आण-णारे आणि लवकर थकवा आणणारे अशा दोन्ही प्रकारांचा मेळ घातला पाहिजे; कारण शरीरास थोडासा वेळ अत्यंत कष्ट देऊन पुढें अगदीं स्वस्थ ठेवणें हें एकंदरींत फायद्याचें होत नाहीं. रक्तवाहिन्यांमध्यें रक्ताचा प्रवाह अधिकाधिक जोरदार होत जाऊन पुढें तो तसाच मंद पडत आला पाहिजे. याकरितां चालणें, मग मंद मंद धांवणें हे पायाचे श्रम करून अंगांत स्फुरण चढल्यावर बारचे अधिक कष्टदायक श्रम करावे, व नंतर थांबून थांबून सा-ध्या उड्या मारणें वगैरे कांहीं गोष्टी करून विश्रांति घ्यावी असा क्रम ठेवावा. सर्व व्यायाम शरीरांत ताकत आहे, आणखी खेळूं या असें वाटत आहे तोंच आटपले पाहिजेत. एका खेपेस एक तासपासून दोन तासपर्यंत अशा रीतीनें व्यायाम होऊं शकेल. असें समजूं कीं, घरापासून मैलावर एका मोठ्या सुंदर बा-गेंत तालीम आहे व तेथें जाऊन तालीम करून बागेभोंवतीं एखादी धांव मारून दोन तासांत मुलास परत यावयाचें आहे. ही व्यवस्था फारच उत्तम होईल. या पुढें खाऊन विश्रांति घेऊन पुनः हुषार होऊन मुलगा अभ्यासास लागेल. पुढें दुपारीं साडेतीन वाजतां मुलगा शाळेंतून सुटल्यावर घरीं येऊन फराळ करून तो बाहेर पडल्यास गांवाबाहेर जाऊन क्रिकेट, फूटबाल किंवा इतर कोणताही असाच खेळ खेळून संध्याकाळीं योग्य वेळीं घरीं येईल.

(७) मुलांच्या अंगीं चपळाई येईल, त्यांचीं इंद्रियें तीव्र व दक्ष राहतील व अमुक गोष्ट करायाची असें मनांत येतांच अवयवांस तशीच स्फूर्ति होईल, अशा प्रकारचे खेळ त्यांस खेळायास लावावें; कोणतीही अमाची गोष्ट निवळ शक्तीनें स्वस्थपणें करीत बसण्याचे, किंवा ज्यायोगें

इंद्रियें मंद होतील अशा जातीचे खेळ मुलांस योग्य नव्हेत. ते तारुण्यांत किंवा मध्यम वयांत पाहिजे तर करावे. क्रिकेट, चेंडूदांडू वगैरे खेळ खेळणाराच्या पायाचे स्नायु पुष्ट होतात व इंद्रियांस दक्षता येते. फुटबालनें अंगांत चलाखी येते व तसेंच थोडा वेळ हौसेनें व धिम्मेपणानें ढकलणें, दाबणें वगैरे गोष्टी करण्याचें सामर्थ्य येतें, इत्यादि. याप्रमाणें हे नित्याचे व्यायाम झाले. यांस केव्हां केव्हां म्हणजे सुटीच्या दिवशीं फांटा देऊन शरीरास कंटकता व सहनशीलता येण्याचे व्यायाम आठवड्यांनून एक दोन दिवस करावे. तीन, चार, पांच मैल चालत जाऊन तेथें फराळ व विश्रांति घेऊन परत येणें; व क्रमानें ही चालण्याची इयत्ता वाढविणें, कांहीं अंतर चालून डोंगर चढणें, उतरणें, व परत येणें; कुस्ती करणें, पट्टा खेळणें, मुष्टियुद्ध करणें, इत्यादि, हे या जातीचे व्यायाम होत. याप्रमाणें हे तालीमखान्यांतील व उघड्या पटांगणांतील व्यायाम होत. आतां जेथें तालीमखाने नाहींत तेथें उघड्या पटांगणांत जाऊन कोणत्याही प्रकारचा धुमाकुळीचा खेळ खेळणें प्रत्येकास सुलभ आहेच. परंतु त्याशिवाय सोप्या व अवघड झाडांवर निरनिराळ्या प्रकारें चढण्याचा श्रम करावा, त्यामुळें बारच्या सर्व सोप्या खेळांसारखाच व्यायाम होतो, व हें सर्वांस सुलभ आहे. घरीं देखील खांबावर, उंच वासा पुरून त्यावर, व दोरी टांगून तिजवर चढणें फायद्याचें होईल. पोहणें व वल्हविणें हे एकाच प्रकारचा श्रम देतात. छाती व दंड यांस त्यामुळें विशेष व्यायाम होतो. घरचें नानाप्रकारचें काम, जिने चढणें उतरणें, व बाजार करणें वगैरेमध्यें गेलेला वेळ व्यायामांतच गणिल्यास हरकत नाहीं. तो प्रत्येक वेळीं अगदीं थोडा मात्र असतां कामां नये.

● कोणासही या रीतीनें व्यायामाची अडचण पडण्याचें कारण नाहीं, व वेळ असेल तर मुलें शारीरिक श्रमांस निरंतर राजी असतात असें दिसून येईल. घरच्या अभ्यासाचा कांच कमी झाल्यास मुलांच्या नुसत्या हिंडण्याफिरण्यानें व रस्त्यांतील दांडगाईनेंही त्यांचीं शरीरें सुधारतील. परंतु व्यायामाच्या योग्य वेळीं शाळा भरली न पाहिजे, व मनावर ओझें राहील किंवा नंबराची महत्वाकांक्षा अहोरात्र मागें लागेल, अशी त्यांची स्थिति होतां कामां नये. विश्रांतीनंतर सर्व स्नायूंस साहजिकपणें श्रमाची हौस उत्पन्न होते, ती मारून टाकावी अशी वासना उत्पन्न होणें हेंच सृष्टिक्रमाविरुद्ध होय. ज्यानें कधीं तालीम केली नाहीं असा ताकदवाला मुलगा तालीमखान्यांत नुसता नेऊन बसविला, तर तो तेथील खेळ पहात असतां हें आपण करूं, असें मनांत येऊन त्याचे स्नायु स्फुरण पावतात; तो कल्पनेनें जणूं काय त्या त्या क्रिया करीत असतो, व घरीं गेल्यावर एकांतांत किंवा सोबत्यांसमवेत साहजिक उल्हासानें त्या करूं लागतो. मुलास कसरतीच्या ठिकाणीं नेऊन परत आणल्यावर कोणीही पालकानें त्याची अशी स्थिति होते कीं नाहीं याविषयीं प्रश्न करून पाहिल्यास ही गोष्ट त्याच्या ध्यानांत येईल. स्नायूंस

नव्या नव्या तऱ्हेनें चलन देऊन थकवावें ही हौस अल्पवयांतच मुलांमध्यें दिसूं लागते; जी नवी क्रिया पाहतील ती करून पाहण्यांत त्यांस गम्मत वाटते; या साहजिक प्रवृत्तीस उत्तेजन देणें व ती कायम ठेवणें एवढेंच शिक्षकांचें व पालकांचें कर्तव्य असतें.

५२. मुलांचे व्यायाम ठरवितांना कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावें याविषयीं येथें केवळ दिग्दर्शन केलें आहे. शरीरास केवळ श्रम व्हावे एवढाच व्यायामांचा उद्देश समजल्यास इतकेंच विवेचन बस्स होईल. परंतु व्यायामशास्त्रकारांनीं शरीराचीं व्यंगें दूर करणें व त्यास होईल तितकें ढबदार करणें हेंही कार्य साहजिकपणें व्यायामानें करून घेतां येतें, म्हणून त्याचाही व्यायामाच्या उद्देशांतच समावेश केला आहे. या विषयाची येथें अधिक माहिती देणें अशक्य आहे, म्हणून इतकेंच सांगतों कीं, छातीचा एकच भाग भरणें, भलत्या जागीं शरीरास पोंग येणें, घांलण्याची ढब वेडीवांकडी असणें, वगैरे अनेक दोष व्यायामांच्या योग्य व्यवस्थेनें दूर करितां येतात. याशिवाय वाढीच्या दिवसांत कोणी उंचच उंच होतो, कोणी नुसता रुंदावत किंवा फुगतच जातो, कोणाचे भिन्न अवयव भिन्न प्रमाणानें वाढतात; वगैरे हे दोषही पुष्कळ अंशीं दुरुस्त करणें व्यायामाच्या नियमनानें शक्य असतें. कित्येक खेळांच्या नादीं मुलें लागल्यानें त्यांचे कांहीं अवयव फार सशक्त होतात, व दुसरे अपूर्ण वाढीचे राहतात. उदाहरणार्थ, निव्वळ चालणें, धांवणें, क्रिकेट खेळणें, वगैरे केवळ पायाच्या श्रमांमुळें पाय व मांड्या भरतात, व छाती आणि दंड किरकोळ राहतात, व आकृति दिसावी तशी ढबदार दिसत नाहीं. अशा प्रसंगीं जे अवयव नित्य कामीं यावयाचे तेच दुर्बळ राहिल्यानें मनुष्यास व्यायामापासून व्हावा तितका फायदा होत नाहीं. तेव्हां अशा लोकांनीं छाती व दंड भरण्याकरितां निराळे व्यायाम घेणें अत्यावश्यक असतें. मध्यम वयांत हरएक बाबतींत उपयोगीं पडणारे, धैर्य, बळ आणि टिकाऊपणा देणारे, आणि दीर्घायुष्य व आरोग्य यांच्या मुळाशीं असणारे जे प्रमुख अवयव, दंड आणि छाती (फुप्फूस आणि काळीज यांची जागा), ते ज्यानें पूर्णावस्थेस आणिले नाहींत, त्यानें व्यायामांचें अर्धेच चीज केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिक्षकांनीं व पालकांनीं मुलांचे व्यायाम ठरवितांना या गोष्टीकडे कदापि दुर्लक्ष करूं नये.

५३. व्यायामासंबंधानें आतां दोन गोष्टी मात्र सांगायाच्या राहिल्या. त्या फारच महत्वाच्या आहेत व शिक्षणक्रमाशीं त्यांचा निकटसंबंध आहे, म्हणून त्यांचा शेवटीं उल्लेख करण्याचें योजिलें. (८) मुलांकडून जो व्यायाम करवायाचा तो असा नसावा कीं तो करीत असतां शरीर केवळ यंत्रवत् त्या त्या क्रिया करील व मन किंवा लक्ष पाहिजे तिकडे भटकत राहील. जो व्यायाम करायाचा त्यांतच चित्त गर्क झालें पाहिजे, व मनास कंटाळा येतांच तो सोडून दिला पाहिजे. असें करण्याचा एक फायदा हा कीं अति-

श्रम होण्याची भीति नसते. दुसरा असा आहे कीं जेव्हां मनुष्य व्यायामरूप क्रिया यंत्राप्रमाणें करूं लागतो तेव्हां त्या अंगवळणीं पडतात व त्यायोगें श्रम होईनासे होतात, परंतु त्यांसारख्याच दुसऱ्या क्रिया करूं जातांच तें अवघड वाटतें. व्यायामांतच सर्वदा लक्ष असल्यास असें घडत नाहीं. परंतु या इतर फायद्यांहून श्रेष्ठ असा जो फायदा होतो तो हा कीं, शरीराच्या क्रियांवर जेव्हां सारखें लक्ष ठेवावें लागतें तेव्हां इच्छाशक्तीच्या (Will) द्वारें प्रत्येक स्नायु क्रमानें हालतो, व केवळ स्नायूंतच कौशल्य येतें असें नाहीं, तर इच्छाशक्तीनें मज्जातंतूंच्या द्वारें स्नायूंकडून त्या त्या क्रिया पाहिजे तेव्हां घडवितां येतात. त्यायोगानें अवयवांवर मनाचा व इच्छेचा अधिक अंमल चालतो, व अशा प्रकारचें स्नायूंचें व मज्जातंतूंचें शिक्षण हरएक कामांत फार उपयोगीं पडतें. रक्तवाहिन्याही कांहीं अंशीं त्यायोगें ताब्यांत येतात, व ह्मणूनच इच्छा होतांच अवयवांस स्फुरण चढतें. या दृष्टीनें पाहतां नमस्कार, जोर, जोडी, बैठका वगैरे कित्येक व्यायाम फारसे इष्ट नाहींत असें दिसतें. कारण डोळे मिटून किंवा झोंपीं गेल्याप्रमाणें मन निरवधान ठेवून किंवा मनांत पाहिजे तो विचार करीत राहून हे व्यायाम शरीराकडून करून घेतां येतात. त्यांची संवय होतांच त्यांपासून श्रमही होतनासे होतात; व मग शरीरास श्रम व्हावे ह्मणून त्यांचें प्रमाण व काळ वाढवीत जाणें भाग पडतें. इतकें करूनही हे श्रम करणाराच्या तोंडावर मंदत्वाची झांक येते, व त्याचें इतर शिक्षण किंवा व्यासंग तसेच मांद्य आणणारे असले तर तो खराच मट्ठ होतो. इंग्रजी तालमींतील कोणतेही खेळ या दोपास पात्र नाहींत, व ह्मणूनच इंग्रजी तालमीचा असा दुष्परिणाम दिसत नाहीं. या गोष्टीकडे विचारी पालक व शिक्षक लक्ष देतील तर फार फायदा होईल. चांगल्या सरळ सडकेवर नुस्त्या चालण्याचा व्यायाम मुलांकडून करविणें हें वर सांगितलेल्या दोपास पात्र होतें, ह्मणून रानांत खालवर जमिनींत, डोंगरांत, चढणीउतरणीवर चालणें इष्ट आहे. सारखाच वेळ दोन्ही प्रकारांनीं चालल्यास श्रमांत पडणारा भेद तेव्हांच लक्षांत येईल; व चढणीउतरणीवर चालत असतां पायांचे स्नायु किती भिन्न प्रकारांनीं आपण इच्छेनें हालवितों, त्यांवर केव्हां कसा जोर पडतो, वगैरे गोष्टीही ध्यानांत येतील. स्नायूंच्या शिक्षणास व त्यांस सर्वप्रकारें इच्छेच्या ताब्यांत आणण्यास जो व्यायाम उपयोगी तोच मुलांकडून करून घेतला पाहिजे; नाहीं तर घाण्याच्या बैलाप्रमाणें त्यांची अवस्था व्हावयाची. शक्ति आणि मांद्य या दोहोंचीही जोड (व्यायामद्वारा) एकदम करून घेणें ह्मणजे शक्तिमान् पुरुषानें गव्यांत मोठा धोंडा बांधून आपलें क्रियास्वातंत्र्य गमावण्यासारखें आहे ! पुष्कळ नामांकित तालिमबाजांची देशी व्यायामांनीं अशी स्थिति झालेली दिसते.

५४. याच बाबतींत दुसरी अत्यंत महत्वाची जी गोष्ट ध्यानांत ठेवायाची ती ही कीं, शारीरिक श्रम हौसेनें होण्यास त्यांस आरंभ करण्यापूर्वीच मज्जातंतुमंड-

लांचीं सर्व शक्ति जाऊन तीं विश्रांतीकरितां तळमळूं लागतां कामां नये. (१) **मज्जातंतु शुष्क होईपर्यंत मानसिक श्रम केल्यावर शारीरिक श्रम उत्साहानें होणें अशक्य आहे, व ते वळें केल्यास त्यांपासून फायदा होणें शक्य नाहीं.** पुऱ्या वाढीच्या मनुष्यासही अशा स्थितींत घटका दोन घटका चालण्या-पलीकडे श्रम व्हावयाचे नाहींत, व त्यांपासून हातपाय मोकळे होणें व अर्धवट लागलेली क्षुधा विशेष जागृत होणें याहून अधिक फायदा होणें नाहीं. परंतु जीं मुलें वाढत आहेत, ज्यांस श्रम व विश्रांति यांचा वारंवार विपर्यास होणें अधिक आवश्यक असतें, त्यांस तर अशा स्थितींत श्रम करायास लावणें अत्यंत अनिष्ट होय. त्यांस हे अतिश्रम होतात; अशा श्रमांपासून फायदा होत नाहीं; त्यांची वाढ खुंटते; इतकेंच नव्हे, तर प्रकृति क्षीण होऊन तीं केव्हां क्षुल्लक कारणांनीं अजारी पडतील याचा भरंवसा नसतो.

पूर्वीं सहा तास शाळेंत शिक्षण दिल्यावर मुलांचीं मज्जातंतुमंडलें पूर्णपणें थकून जातात असें दाखविलेंच. अशा मुलांस भूक लागली असतां, " बाबानों आतां हौसेनें व मजेनें व्यायामशाळेंत जाऊं या, तेथें तिनसांज होईपर्यंत तुह्मी यथेष्ट व्यायाम घ्या, मग ताजेतवाने, हुषार होऊन घरीं जा " असें ह्मणणें अविचाराचें होय. दिवसभर शारीरिक कष्ट करून दमूनभागून घरीं येणाऱ्या मजुरास " बाबारे, आतांपर्यंत त्वां पुष्कळ शारीरिक श्रम केलेस, परंतु तुझा मेंदू अगदीं आळशी राहिला, याकरितां रात्रीच्या शाळेस चल, व तेथें कांहीं थोडे हिशेब शिकून मेंदूस हुषार करून मग विश्रांति घे, " असें ह्मणणाराचा अविचार याहून निराळ्या प्रकारचा नाहीं. मज्जातंतूंची शक्ति मुलांत वयपरत्वें वाढत जातें, तीस सीमा असते, व तिजवांचून मानसिक किंवा शारीरिक कोणतेच श्रम होत नाहींत, हें शारीरशास्त्राचें तत्त्व पालकांच्या व शिक्षकांच्या लक्षांत केव्हां येईल तें येवो. मज्जातंतूंस जों जों थकवा येतो तों तों मन, इंद्रियें व स्नायु हीं सर्व इच्छाशक्तीच्या ताब्यांतून बाहेर जातात; त्यांवर तिचा अम्मल चालेनासा होतो, व या स्थितींतून बाहेर पडण्यास विश्रांतीखेरीज दुसरें साधनच नाहीं. जर कोणी शाळेंतून पांच वाजतां घरीं आलेल्या मुलांस " बाबानों, आतां जेवूनखाऊन खुशाल निजा कसे," असें ह्मटलें तर कोणी एकही मुलगा नाराजी होईल असें वाटत नाहीं; व पांच पुरे तास शिक्षणांत गेल्यावर मुलांस केव्हां घरीं जाऊन स्वस्थ बसूं असें होतें यांत नवल तें काय ? यानंतर मुलें व्यायाम करण्याच्या स्थितींत नसतात ही गोष्ट जीं कोणी पुढें व्यायाम करितात त्यांस होणाऱ्या फलप्राप्तीवरूनच दिसून येते. पांच वाजल्यावर देशी किंवा इंग्रजी तऱ्हेच्या तालमींत तासदीडतास व्यायाम करून घरीं जाणारीं मुलें माझ्या पुष्कळ पाहण्यांत आहेत; व त्यांचें गेल्या पांचचार वर्षें मीं विशेष अवलोकन केलेलें आहे. या व्यायामानंतर अर्ध्याशेरापासून दीडशेरापर्यंत त्यांपैकीं कित्येक मुलें दूध पितात

असेंही मला कळून आलें. परंतु या त्यांच्या व्यायामापासून त्यांस फारसा फायदा झालेला माझ्या पाहण्यांत आलेला नाहीं: त्यांच्या छातीवर मास भरलें नाहीं, त्यांच्या तोंडावर किंवा डोळ्यांत तेज दिसलें नाहीं; त्यांमध्यें अजाराचें प्रमाण कमी नव्हतें, व त्यांची वाढ इतरांप्रमाणेंच खुरटी राहिलेली आहे. वर्षेंचीं वर्षें याप्रमाणें तालीम, क्रिकेट किंवा दुसरे खेळ खेळत असलेल्या मुलांचा याप्रमाणें व्यायाम निष्फळ झाल्याचीं उदाहरणें शेंकडों दाखवितां येतील. हीं उदाहरणें इंग्रजी शिकलेल्यांच्या व न शिकलेल्यांच्या घरांत आहेत; वडील, मधल्या व कनिष्ट मुलांत आहेत; ब्राह्मण, कुणबी व पारशी मुलांत आहेत; खाऊनपिऊन सुखी व दरिद्री, उभय वर्गांमध्यें आहेत; व तीं पुण्यांत व मुंबईंत मीं प्रत्यक्ष पाहिलेलीं आहेत, व•इतर ठिकाणांहून कालेजांत येणाऱ्या मुलांत तशींच तीं सांपडतात. ज्या कोणास तीं स्वतः पहावयाचीं असतील त्यानें कोणत्याही शाळेंतील तालिमखान्यांत पांच वाजल्यापुढें जाऊन तेथें कसरत करीत असलेलीं मुलें उघडीं पहावीं, व त्यांच्या मातापितरांचद्दल चौकशी करावी. वर सांगितलेली स्थिति बहुधा आढळेल असें मला निश्चितपणें वाटतें; व ही स्थिति ध्यानांत येऊनच शिक्षक लोकांनीं मुलांच्या शरीराच्या दुर्बळतेचीं कारणें सांगतांना व्यायामाचा अभाव हें कारण सांगण्याचें सोडून देऊन " घरचें दारिद्र्य " हें कारण देण्यास आरंभ केला असावा.

माझें असें मत आहे कीं शाळेंतील शिक्षण इतकें व अशा प्रकारें होतें कीं मुलांचीं सर्व मज्जातंतुमंडलें शिथिल होऊन तीं विश्रांतीकरितां तळमळूं लागतात. हें चिन्ह शेवटच्या पांचव्या तासांतच मुलांच्या सुकलेल्या चर्येवर दिसूं लागतें. त्यानंतर श्रम केल्यास रात्रीं लवकर झोंप येते व अभ्यास होत नाहीं असें मुलें स्पष्ट सांगतात; व असें असून पुढें शारीरिक श्रम करून शिवाय अभ्यास करणारांस चांगली झोंप येत नसावी हें उघड आहे; व ही अनिद्रा पुष्कळांच्या आरोग्यास अपाय करीत असली पाहिजे. इंग्रजी शाळांतूनच केवळ नव्हे, तर मराठी शाळांतूनही घरीं आलेलीं मुलें सुकून गेलेलीं व जेवण होईपर्यंत शून्य दृष्टीनें कोठें तरी उभीं राहून वेळ काढतांना दिसतात, असें पूर्वी सांगितलेंच. जेवण होतांच कोणी निजतात, कोणी घोकंपट्टीस आरंभ करितात, असा पालकांचा अनुभव असेलच. घरच्या अभ्यासाचें ओझें त्यांच्या मनावरून पुढें पुढें कधींच दूर होत नाहीं. व व्यायामही नाहीं आणि विश्रांतिही नाहीं अशी त्यांची परीक्षेच्या सुमारास स्थिति होते. शाळेंतील शिक्षण अतिरिक्त आहे असें जें पूर्वी सांगितलें त्यास या प्रकारची ही व्यायामाची निष्फळता बळकटी आणिते; व तें शिक्षण कमी तास असावें, निराळ्या पद्धतीनें द्यावें, व मुलें शाळेंतून लवकर सुटलींच पाहिजेत, या सुधारणांची आवश्यकताही याच गोष्टीवरून सिद्ध होते. जर याहून विपरीत स्थिति कोठेंही दिसली असती तर शारीरशास्त्राचे कित्येक सिद्धांतच कदाचित् खोटे ह्मणावे लागले असते.

५५. आतांपर्यंत शिक्षण, घरचा अभ्यास, व्यायाम आणि विश्रांति यांची

मुलाच्या दिनचर्येंत कशी व्यवस्था असावी यासंबंधी [illegible] त्या सर्व विवेचनांत विशेषेंकरून जें तत्त्व ध्यानांत ठेवायाचें तें हें की, व्यायाम शारीरिक व मानसिक श्रम करण्याची कांहींएक नियमित शक्ति असते व प्रत्येक व्यक्तीच्या मज्जातंतुमंडलांच्या सामर्थ्यानें मोजिली जातें. कोणत्या व्यक्तींत कोणत्याही वयाच्या भागांत जें मज्जातंतुगत सामर्थ्य असेल त्या प्रमाणानें तो शारीरिक आणि मानसिक श्रम करूं शकतो. जेव्हां शरीराची व होत असते तेव्हां त्याबरोबरच मज्जातंतु व मेंदू यांची वाढ होत असते. इतर अवयवांच्या वाढीचे सर्व नियम मज्जातंतुमंडलांस व मेंदूस लागू आहेत. शारीरिक व मानसिक श्रमांची एकंदर इयत्ता ठरलेलीच असते, कारण तिच्या योगानें उत्तम प्रमाण म्हटलें ह्मणजे मज्जातंतूंमधील सर्व सामर्थ्य खर्च होणें हें असेल याकरितां प्रत्यहीं जे शारीरिक आणि मानसिक श्रम करणें इष्ट दिसतात त्यांमध्यें मज्जातंतुगत सामर्थ्याची वांटणी करून दिली पाहिजे. एकाच्या श्रमांत, विशेषतः मानसिक श्रमांत, तें सर्व सामर्थ्य खर्च झाल्यास — किंवा प्रकारचे श्रम व्हायाचे नाहींत, व ते केलेच तर फायदा होणार ना — वरचेवर उलट अपाय होईल. शिवाय बाल्यावस्थेंत श्रम आणि विश्रांति यांच्या दरम्यान विपर्यय करण्याची जी आवश्यकता असते, ती लक्षांत धरून जे —

या तत्त्वाचें सांप्रतकाळीं उल्लंघन होत आहे, [illegible] — व शारीरिक आहे व मलांच्या शरीराची व मेंदूची वाढ अकाली बंद होत आहे असें स्पष्ट दिसत. या [illegible] केलाच आहे. पुढें हेरंतु याचसंबंधानें पुढील एक प्रत्यंतर विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. दिनचर्येचीं दोन कोष्टकें दिलीं आहेत, त्यांपैकीं पहिल्या कोष्टकांत वयाच्या मानाने आहे व चर्येची व्यवस्था शास्त्रदृष्ट्या सामान्यतः कशी असावी हें सांगितलें इयत्तेवार दुसऱ्या कोष्टकांत चालू शिक्षणपद्धतीअन्वयें हल्लीं मुलांची दिनचर्या कशी असते हें दाखविलें आहे:—

कोष्टक पहिलें

वय वर्षे पासू.—प.	मानसिक श्रम. शिक्षण+अवलोकन+अभ्यास.	एकूण तास.	विश्रांति. शिक्षणाच्या काळाच्या मधली व इतर जागृता०	एकूण तास	मंद आणि शीघ्र व्यायाम.	निद्रा.	स्नान भोजनादि दिनकृत्यें.
५ – ८	२ + २ + $\frac{1}{2}$	४$\frac{1}{2}$	२ + १$\frac{1}{2}$	३$\frac{1}{2}$	४	९	३
९ – १२	३ + १$\frac{1}{2}$ + १	५$\frac{1}{2}$	१$\frac{1}{2}$ + १$\frac{1}{2}$	३	४	९	२$\frac{1}{2}$
१३ – १६	४ + २$\frac{1}{2}$ (किंवा ३)	६$\frac{1}{2}$	३	३	४	८	२$\frac{1}{2}$
१७ – २०	४ + ३$\frac{1}{2}$ (किंवा ४)	७$\frac{1}{2}$	२	२	४	८	२$\frac{1}{2}$

कोष्टक दुसरें.*

मराठी व इंग्रजी इयत्ता पा०-पर्यंत							
१म.-३म.	५ + २½	७½	१ + २	३	२†	९	२½
४म.-२इं.	५ + ४	९	१ + २	३	२	८	२
३ इं.-६इं.	५ + ५ (किंवा अधिक)	१०	१ + २	३	२	७किंवा कमी.	२
७ इं.-का-लेज	५ + ५½ (किंवा अधिक)	१०½	२½	२½	२	७किंवा कमी.	२

पहिल्या कोष्टकावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, मुलें लहान आहेत तोंपर्यंत शरीराचें योग्य पोषण व वृद्धि होण्यास मज्जातंतुगत सामर्थ्याची शारीरिक व मानसिक श्रमांमध्यें समसमान वांटणी झाली पाहिजे; व वय ज्याप्रमाणें वाढत जाईल व शरीर अधिक टिकाऊ होईल, त्याप्रमाणें मानसिक श्रमांकडे थोड्याअधिक सामर्थ्याचा विनियोग केल्यास नुकसान होणार नाहीं. यौवन दशे-

* या कोष्टकांत घरींच राहून अभ्यास करणाऱ्या मुलांची दिनचर्या दिली आहे. दापोली येथील बोर्डिगांत सुपरिंटेंडेंट यांनीं मुलांच्या दिनचर्येचें पुढें दिल्याप्रमाणें वेळापत्रक अमलांत आणिलें आहेः—रात्रीच्या ९ पासून ४ पर्यंत झोंप घेणें; ४—५॥ (पहाटेचे) अभ्यास करणें; ५॥—७ स्नान, संध्या, नमस्कार, तालीम, वगैरे; ७—१० अभ्यास व शिक्षण; १०—११ जेवण व शाळेंत जाणें; ११—५ शाळा; (दरम्यान एक तासाची सुटी असावी); ५—६॥ (तिनीसांजचे) खेळणें, बागेंत काम करणें वगैरे; ६॥—७। जेवण, शतपावली; ७।—९ अभ्यास करणें; या व्यवस्थेंत सर्व मुलांस, ५ तास शिक्षण, ६। तास अभ्यास व त्यांत थोडें शिक्षण, सुमारें १। तास सौम्य विश्रांति, २ तास मंद व शीघ्र व्यायाम (शाळेंत जाणें त्यांतच), ७ तास निद्रा, २। तास स्नान भोजनादि. मुलांचें वय व प्रकृति पाहून त्यांस पहाटेस कमी जास्त निजूं दिलें जातें. सुपरिंटेंडेंट, मि० गणेश भास्कर साने, बी. ए., हे या संस्थेच्या आवश्यकतेसंबंधानें लिहित असतां म्हणतात.-' शाळेंतील शिक्षण म्हणजे त्यांनीं (मुलांनीं) केलेलें काम योग्य झालें आहे कीं नाहीं हें पहाणें, तसेंच त्यांस योग्य दिशा दाखविणें हें होय. त्याच्या योगानें (मुलें) जें शिकतात तें चांगलें होतें, परंतु पुष्कळ शिकून ज्ञानसंचय करणें हें स्वतःच्या (घरच्या) परिश्रमांवर अवलंबून आहे. ' या शिक्षणाच्या व्याख्येस अनुसरून बोर्डिगांतील अभ्यासाची व्यवस्था आहे असें कबूल केलें पाहिजे. येथील न्यू इं. स्कूलचे बोर्डिगांत मुलांची दिनचर्या हल्लीं पुढें दिल्याप्रमाणें असतेः—शिक्षण ४॥-५ तास; अभ्यास ४-४॥ तास; विश्रांति २॥ तास; व्यायाम २॥ तास; निद्रा ७-७॥ तास; दिनकृत्यें २। तास. शिक्षण, अभ्यास व निद्रा यांसंबंधानें वेळापत्रकांत जो भेद आहे तो खालच्या व वरच्या इयत्तां संबंधानें आहे.

† व्यायामाच्या काळांत हिंडणें, फिरणें, बाजारांत जाणें किंवा कांहीं विशेष व्यायाम करणें या सर्वांचा समावेश होतो इतका तो धरला आहे. पहिल्या कोष्टकांत अवलोकन या शब्दाचा अर्थ पदार्थांचें अवलोकन व इंद्रियशिक्षण असा समजावा.

च्या आरंभीं देखील निदान $\frac{1}{3}$ सामर्थ्य शारीरिक श्रमांकरितां राखून ठेविलेंच पाहिजे; मग ते शारीरिक श्रम मंद किंवा शीघ्र कोणत्याही प्रकारचे असोत. परंतु सांप्रतची स्थिति अशी आहे कीं, अगदीं लहान मुलगा प्रथम शाळेंत जाऊं लागतो तेव्हां देखील त्यास आपल्या तृतीयांश सामर्थ्याचा व्यायामाकडे उपयोग करितां येत नाहीं; व तो जों जों वरच्या इयत्तांमध्यें जातो, तों तों अभ्यास अगदीं सोपे आहेत असें समजल्यास, त्याच्या अंगीं असलेलें सर्वच सामर्थ्य मानसिकश्रमांकडे खर्च होऊं लागतें, व ते अभ्यास अवघड असल्यास त्यास अतिरिक्त मानसिक श्रम होतात. कारण आठ, नऊ किंवा दहा तासपर्यंत मन दक्ष ठेवणें व स्मरणशक्ति, विचारशक्ति व अवलोकनशक्ति यांचा लागेल तसतसा उपयोग करीत जाणें या कामास जेवढें मज्जातंतूंचें सामर्थ्य पाहिजे तेवढें १७ वर्षांच्या आंतील वयाच्या मुलांमध्यें असण्याचा संभव नाहीं. या वयानंतर पुढें इतकें सामर्थ्य चांगल्या सुदृढ मुलांत मात्र येईल, व तें आलें आहे असें समजलें तरी तें सर्वच मानसिक श्रमांकडे त्यानें खर्च केल्यास शारीरिक व्यायाम होणें शक्य नाहीं किंवा तो फलद्रूप होणें नाहीं.

आतां पूर्वी जेव्हां शिक्षक आतांइतके दक्ष व अभ्यास करवून घेणारे नव्हते, व मुलें अधिक वयांत त्यांच्या स्वाधीन होत होतीं, तेव्हां सांप्रतच्याच शिक्षणपद्धतीनें मुलांचें कमी नुकसान होत होतें. कारण शिक्षकांचा त्रास कमी व मुलांचे मेंदू अधिक दमदार झालेले असत. पांच भावांपैकीं मानसिक अतिश्रमांचा व व्यायामशून्यतेचा किंवा निष्फळ व्यायामाचा प्रसंग पहिल्यावर सुमारें १७ वे वर्षीं आला, दुसऱ्यावर १६ वे वर्षीं, तिसऱ्यावर १५ वे वर्षीं, चौथ्यावर १४ वे वर्षीं व पांचव्यावर १३ वे वर्षीं, असें समजल्यास, त्या पांच भावांमध्यें वाढीचें मान साहजिकपणें कमी कमी होत गेलेलें दिसून येईल. सामान्यतः असें घडलें पाहिजे कीं, ज्या दिवसापासून योग्य व्यायामास पुरे इतकें मज्जातंतुसामर्थ्य मुलामध्यें उरेनासें होईल त्या दिवसापासून त्याच्या शरीरास प्रमाणतः क्षीणता येऊं लागेल, व तें मुळींच उरेनासें झालें म्हणजे वाढ बहुतेक बंद होईल व क्षीणता वेगानें वाढेल. याप्रमाणें सर्वत्र प्रत्यय येत आहे.

५६. शाळाखात्यानें प्रसिद्ध केलेल्या किंवा पसंत केलेल्या अभ्यासाच्या इतर पुस्तकांप्रमाणेंच, आरोग्यरक्षणासंबंधीं पुस्तकांची स्थिति आहे. या पुस्तकांच्या द्वारें शिक्षकांस काय महत्वाचें मुलांस सांगावें हें कळत नाहीं, व मुलांस शिक्षणाचा नित्यव्यवहारांत बिलकुल उपयोग होत नाहीं. आरोग्यरक्षणाविषयीं जें पुस्तक हल्लीं चालू आहे, तें मुलांकरितांच आहे असें नाहीं, तें सर्व मनुष्यजातीस उपयोग होईल अशा दृष्टीनें लिहिलेलें आहे. व त्यांत आरोग्यरक्षणाविषयीं जी माहिती सांगितली आहे, ती इतकी ढोबळ आहे कीं तिचा लहानांस किंवा थोरांस फारच थोडा उपयोग व्हावा. सकाळीं सूर्य उगवतो, संध्याकाळीं मावळतो, वि-

स्तवानें हात भाजतो, अधांतरीं गेलेला पदार्थ खालीं पडतो, इ० गोष्टी सांगण्यासारखीच तीं माहितीं आहे, व त्या माहितींवरून दिलेले नियमही तसेच ढोबळ व निरुपयोगी आहेत. त्या सर्व नियमांचें तात्पर्य एका वाक्यांत येण्यासारखें आहेः ह्मणजे श्रीमंत सुज्ञ माणूस जसा रहातो व वागतो, तसें सर्वांनीं रहावें व वागावें. स्वच्छ पाणी प्यावें; स्वच्छ अन्न खावें; ओल नाहीं, घाण नाहीं, धूर नाहीं, उजेड आहे, हवा आहे, स्वच्छता आहे, अशा घरांत रहावें; स्वच्छ कपडे घालावे; साबणानें अंग धुवावें; इ० इ०. बहुतेक ब्राह्मण कुटुंबांत धर्म ह्मणूनच यांपैकीं सर्व आवश्यक गोष्टी केल्या जातात; तथापि ब्राह्मण मुलांकडून या अशा आरोग्याच्या नियमांची यथेष्ट घोटणी करून घेतली जाते. आतां या उष्णकटिबंधांत राहणारे व आरोग्याच्या बहुतेक सर्व नियमांचें प्रत्यहीं उल्लंघन करणारे तेली, तांबट, तांबोळी, कोळी, घिसाडी, महार, वडार, वगैरे लोक भल्ले धिप्पाड, सामर्थ्यवान् व दीर्घायुषी असतात, व जपून जपून वागणारे व सर्व आरोग्याचे नियम पाळणारे विद्वान् ब्राह्मण काटकुळे, दुर्बळ व अल्पायुषी असतात, या उघड उघड दिसणाऱ्या अपवादाचें कोणी एकही शिक्षक मुलांस सयुक्तिक कारण सांगत नाहीं ! व शीतकटिबंधांतील लोकांनीं लिहिलेलीं आरोग्यविषयक पुस्तकें नुसतीं वाचून कोणा शिक्षकास किंवा डाक्तरास या अपवादाचें समर्पक उत्तर देतां येईल असें वाटत नाहीं. स्वतःचें अवलोकन नाहीं, स्वतः विचार करणें नाहीं, कोणास काय शिकवावें याचा निर्णय नाहीं, शिकविलेल्याचा अनुभव नसला तरी फिकीर नाहीं, केवळ घोकंपट्टी करायाची व लोकांचे सुंदर पंख चिकटावून विद्वान् ह्मणवून घ्यायाचें, अशी आह्मां ब्राह्मणमंडळीची सांप्रतकाळीं स्थिति झाली आहे !

आरोग्यासंबंधीं जे नियम मुलांस सांगायाचे ते निराळे असावे व जे त्यांच्या पालकांस किंवा शिक्षकांस सांगायाचे ते निराळे असावे. ज्याच्या स्वाधीन जी व्यवस्था व ज्यास ज्या गोष्टीचा अनुभव नित्य येईल किंवा आणून देतां येईल त्यास तें शिकविल्यास फलद्रूप होतें. आपले अभ्यास, आपली विश्रांति, आपले व्यायाम, आपले कपडेलत्ते, आपले आहारविहार, आपलीं व्यसनें किंवा व्यासंग, यांचें मुलांस स्वतः थोडयाबहुत अंशांनीं नियमन करितां येण्याजोगें आहे. तेव्हां त्यांस या गोष्टींचें जितकें ज्ञान देतां येईल तितकें द्यावें. परंतु त्यांकडून तें घोकवून घेणें मात्र अत्यंत निरुपयोगी आहे. कारण ज्यां गोष्टींचा आचरणावर परिणाम झाला पाहिजे त्या तोंडानें येतात कीं नाहीं हें पाहून काय उपयोग ? त्यांची परीक्षा आचरणांतच घेतली पाहिजे. परंतु आरोग्याच्या नियमांसंबंधानें हल्लींच्या शिक्षकांनीं व परीक्षकांनीं हें तत्त्व अद्याप मान्य केलेलें नाहीं ! कोणी अत्यंत अमंगळ मुलानेंही स्वच्छतेचे उत्तम परिणाम कोणते ते तोंडपाठ ह्मणून दुसऱ्या स्वच्छ मुलांच्यावर जावें, व परीक्षेंत शंभर मार्क मिळवावे, हा न्याय सुरू आहे ! मुलांकरितां जी आरोग्यशास्त्राची माहिती द्यावयाची व जे नियम सांगायाचे त्यां-

चा त्यांस अनुभव आला पाहिजे. ज्या गोष्टींचा मुलांस ठोकताळा न येईल त्या त्यांच्या मनावर कशा बिंबतील ? अशा उद्देशानें पुस्तक लिहिणारा नुसता डाक्टर असून उपयोगी नाहीं, तो शिक्षणशास्त्रवेत्ताही असावा. त्यानें मुलांचें अवलोकन केलेलें असावें; मुलांच्या ध्यानांत येतील अशीं उदाहरणें व प्रत्यंतरें गोळा केलेलीं असावीं; व मुलांची केवळ समजूतच नव्हे तर करमणूक होईल, त्यांची अवलोकनशक्ति जागृत होईल व तीं परस्परांचे आरोग्यशास्त्रदृष्ट्या दोष काढितील अशा रीतीनें त्यानें पुस्तक लिहिलें पाहिजे.

भाग ६ वा.

ब्राह्मण विद्यार्थी आणि युनिव्हर्सिटी.

५७. ब्राह्मण विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत पास झाल्यावर बहुधा आर्ट्स् कालेजांत जातो. शाळेंतील अभ्यास करण्याच्या पूर्वीच्या पद्धति त्याच्या अंगीं या काळीं पूर्णपणें मुरलेल्या असतात; प्रोफेसरांनीं शिक्षण कसें द्यावें याविषयींही शाळेंतील अनुभवावरून त्याच्या कांहीं कल्पना ठरून गेलेल्या असतात; व तेंच शिक्षण पुढें मिळायाचें, तसाच अभ्यास पुढें करायाचा, कांहीं स्वातंत्र्य अधिक व शारीरिक शिक्षा नाहींत, असा कालेजासंबंधानें त्याचा अभिप्राय असतो.

शाळेंत असतां व्यायामाच्या महत्वाविषयीं विद्यार्थ्यांनीं पुष्कळ गोष्टी ऐकिलेल्या असतात, परंतु म्याट्रिक्युलेशन परीक्षा ज्या दिवशीं त्यांस क्षितिजावर दिसूं लागली त्या दिवसापासूनच व्यायामाचा विचार त्यांनीं कालांतरावर टाकिलेला असतो. ही परीक्षा पास होऊन कालेजांत आल्यावर सुमारें निम्मे विद्यार्थ्यांस पुनः व्यायामाची आठवण होते. हा व्यायाम होईल तितक्या कमी खर्चानें घेण्याचीच पुष्कळांची इच्छा असते, परंतु सहवासानें व्यायामाकरितां कित्येकांस अल्पस्वल्प खर्च करण्याची उमेद उत्पन्न होते. मानसिक श्रम करून थकल्यावर व्यायाम घेणें उचित असा पूर्वीच्या शिक्षकांनीं कित्येकांचा ग्रह करून दिलेला असतो, त्यामुळें व्यायाम मनोरंजक असला पाहिजे, थोड्या वेळांत त्यानें अंगाचें पाणी झालें पाहिंजे व शिवाय त्यामुळें रात्रीं अभ्यासाच्या वेळीं लौकर झोंप न आली पाहिजे, इत्यादि विशिष्ट गुण पाहूनच विद्यार्थी आपण घ्यावयाचा व्यायाम ठरवितात. जे लोक क्रिकेटाचा खेळ खेळतात ते मात्र या सर्व समजुतींपासून मोकळे असतात, कारण क्रिकेट हा खेळ पुष्कळ वेळ तयारी करून पुष्कळ वेळ खेळायाचा आहे. परंतु क्रिकेट खेळणारे थोडेच असतात व त्यांखेरीज इतरांचे व्यायामासंबंधी विचार वर सांगितल्याप्रमाणें असतात. या विद्यार्थ्यांस व्यायामापासून कितपत फायदा होतो हें आतां वाचकांच्या सहज लक्षांत येई-

लच्च; कारण व्यायामाच्या योजनेंत व्यायामाचें जें मुख्य तत्त्व पूर्वी सांगितलें तेंच मुळीं पाळलें जात नाहीं. सामान्य विद्यार्थ्यांसंबंधानें पाहतां व्यायाम हें कृत्रिमपणें रात्रीं भूक लागण्याचें साधन इतकें झटल्यास बरोबर होईल. व्यायामाचे शरीरास इतर उपयोग होण्यास व्यायामांचें नियमन निराळ्याच दृष्टीनें केलें पाहिजे, व कालेजांत मुलांवर इतका अम्मल चालविण्याचें कोण आपणाकडे घेतो? व पालकांसही अशी व्यवस्था कोठें हवी असते.

कालेजांत येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं निम्मे विद्यार्थ्यांस व्यायामाची इच्छा असते असें जें सांगितलें तें त्यांच्या संख्येची महत्तम सीमा दाखविण्याकरितां सांगितलें. वास्तविक पाहतां ही संख्या वर्षाच्या आरंभीं मात्र असते व नंतर कमी होत होत वर्षअखेरीस ती बहुतेक शून्यास येऊन मिळते असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणजे जोंवर अभ्यासाचें ओझें वाटत नसतें तोंवर व्यायामाकडे विद्यार्थ्यांचें लक्ष जातें, व हें ओझें जसजसें हळू हळू वाढत जातें तसतसा व्यायाम मागें पडत जातो. अशी स्थिति होण्यास मुख्यत्वें कोणतीं कारणें असतात हें लवकरच ध्यानांत येईल.

५८. कालेजांत येण्यापूर्वीच बहुतेक ब्राह्मण मुलांची वाढ खुंटलेली असते; कालेजांत असतां खाण्यापिण्यामुळें किंवा विश्रांतीमुळें जो त्यांमध्यें फरक पडतो तो त्यांच्या वाढींत किंवा शरीरसामर्थ्यांत पडत नाहीं; तो केवळ लठ्ठपणांत व तोंडावरील टवटवींत मात्र दिसतो. परंतु या दोन बाबतींत देखील विद्यार्थ्यांचें स्वरूप परीक्षा दूर असतां व ती जवळ येत असतां फार भिन्न दिसतें. कालेजांत येतांना व त्यांतून बाहेर पडतांना बहुतेक व्यक्तींची आकृति सारखीच दिसते; व कोणाची वाढ झालीच तर ती फार सूक्ष्म प्रमाणानें होते. वास्तविक पाहतां बाल्यावस्था जाऊन तारुण्यदशा येत आहे अशा संधीस शरीरांत पौरुष भरण्याचा जो काळ तो विद्यार्थी कालेजांत घालवितात. या काळांत त्यांमध्यें मोठा फरक व्हावा. वीस वर्षांपूर्वी असा फरक होतांना दिसे, परंतु तो हल्लीं दिसत नाहीं. पूर्वीच्या पुष्कळ ग्राज्युएटांस आठवत असेल कीं, कालेजांत गेल्यावर प्रथम त्यांच्या बालिश चेहऱ्याची जुन्या विद्यार्थ्यांनीं चेष्टा करावी, संस्कृत नाटकांत स्त्रीपार्टाकडे त्यांची योजना करावी, व या आणि इतर प्रकारांनीं त्यांच्या बाल्यावस्थेचा शेवटचा काळ त्यांच्या ध्यानांत राहील असें करावें. अखेरीस कालेजच्या शेवटच्या वर्षी ते भले धिप्पाड झाले असावे, त्यांचे चेहरे केंसाळ दिसावे व मग त्यांनीं जुन्या विद्यार्थ्यांचे हक्क नवीन येणाऱ्यांवर पूर्ववत् चालवावे. ही स्थिति आतां पूर्णपणें नाहींशी झाली आहे. विद्यार्थी कालेजांत कोणत्या वर्गांत असेल हें त्याच्या आकृतीवरून कळून येत नाहीं; पौरुष चिन्हांचा त्याच्या मुखावर बहुधा शेवटपर्यंत अभावच राहतो; व कालेजांतून बाहेर पडल्यावर आणि पोटाच्या उद्योगास लागल्यावर कांहीं वर्षांनीं

पूर्वीची टोपी घालून तो कालेजांत आल्यास इतर विद्यार्थ्यांपासून त्यास ओळखतां येणार नाहीं. हल्लीं सामान्यतः असें दिसतें कीं पुरुष मोठा होऊन त्यास टोपी विशोभित दिसूं लागल्यामुळें तो ती सोडून पागोटें किंवा रुमाल घालतो, असें घडत नाहीं; तर त्यास नौकरीस ठेवणारांस त्याची बाल्यावस्था गेली असें समजावें ह्मणून या इतर शिरोभूषणांचा बहुधा उपयोग केला जातो. नवीन शिक्षक मुलांत मिसळला गेल्यास त्यास शोधून काढणें किंवा परिचयावांचून ओळखणें किती कठीण आहे याविषयीं अनेक विनोदपर गोष्टी हल्लींचे शिक्षक सांगूं शकतील. एकाच कुटुंबांतील चार बंधूंमध्यें वाढीच्या संबंधानें कसा फरक पडत जातो हें पूर्वी सांगितलेंच. अवलोकन करणारानें अशा बंधूंच्या मुखांवरील पौरुष चिन्हें (मिशा, दाढी वगैरे) पाहिल्यास त्यांतही तसाच फरक त्याच्या दृष्टीस पडेल; व त्यावरून कोणाची वाढ कोणत्या वयाच्या सुमारास खुंटली असावी हें त्याच्या लक्षांत येईल. एकाच कुटुंबांतील बंधूंच्या वाढींत पडलेला फरक विद्यादानाच्या पद्धतीमुळें उत्पन्न होतो व तो गेल्या वीस वर्षांत ही पद्धति क्रमेंकरून अधिकाधिक पूर्णतेस येत गेल्यामुळें पडत आहे असें पूर्वी सांगितलें. इतके दिवस हा फरक फारच ढळढळीत होता, परंतु यापुढें हीच पद्धति कायम गहिल्यास तो फारसा मोठा असणार नाहीं असें वाटतें, कारण या पद्धतीस आतां बऱ्याच अंशीं पूर्णता आलेली आहे व तिचा अम्मल अधिक जारीनें किंवा कौशल्यानें चालवितां येणार नाहीं असें वाटतें. तेव्हां यापुढें सर्वच बंधु सारखे खुरटलेले असावयाचे, असा परिणाम दिसावा. कालेजांत येणाऱ्या कित्येक बंधुयुग्मांत असा प्रकार हल्लीं दिसूं लागला आहे. तात्पर्य हें कीं कालेजांत येतेवेळीं बहुतेक मुलांच्या वाढीचा जोर आधींच खुंटलेला असतो, व त्यामुळें मुलें थोडीं वाढल्यास वाढतात, नाहीं तर बहुधा वाढतच नाहींत. कालेजांत येतेवेळीं मुलांत वाढण्याचें सामर्थ्य आहे कीं नाहीं हें त्याच्या चर्येकडे पाहून बहुधा सांगतां येईल. बाल्यावस्थेच्या अखेरच्या दिवसांत वाढत्या अंगावर कांहीं विशेष चिन्हें दिसतात त्यांवरून कोणाच्याही पुढील वाढीचा तेव्हांच अंदाज करितां येण्यासारखा असतो.

अकालीं खुंटलेल्या वाढीच्या माणसानें त्वरित उपाय केल्यास त्याचीही वाढ परत आणतां येते असें कित्येक शास्त्रज्ञांचें मत आहे, परंतु या गोष्टीविषयीं त्यांनीं सांगितलेल्या रीतीनीं प्रयोग करून पाहणें कालेजासारख्या ठिकाणीं मुलें स्वतंत्र झाल्यावर शक्य नाहीं; तेव्हां असले प्रयोग पालकांनींच केल्यास बरें. परंतु अशा प्रयोगांमुळें विद्येचा थोडा खोळंबा होतो असें दिसल्यास त्याविषयीं कोणी पालकही बहुधा फिकीर करणार नाहींत.

कालेजांत जातेवेळीं विद्यार्थ्यांची वाढ खुंटलेली असते या गोष्टीस दुसरीं प्रत्यंतरें आहेत. म्याट्रिक्युलेशन पास झालेले सर्वच ब्राह्मण विद्यार्थी आर्ट्स् कालेजांत जातात असें नाहीं; या कालेजांत जाणारांची संख्या फार, कारण शारीरिक

श्रमापासून जशी आर्ट्स् कालेजांत सुटका असते तशी दुसरीकडे नसते. तथापि कांहीं थोडे विद्यार्थी मेडिकल कालेजांत व कांहीं सायन्स कालेजाच्या निरनिराळ्या शाखांत शिरतात; व कांहीं नौकरी धरितात किंवा वकिलीचा स्वस्थपणें अभ्यास आरंभितात. यू. एस्. एफ्. परीक्षेंत पास होणारांसही हे शेवटचे दोन मार्ग खुले आहेत. याशिवाय या दोन्ही परीक्षा पास झालेले पुष्कळ लोक नौकरीची वाट पहात घरीं बसलेलेही आहेत. या इतर सर्व विद्यार्थ्यांची शाळा संपल्यानंतर कांहीं वाढ होते कीं नाहीं हें पाहिल्यास, ती बहुधा होत नाहीं, असें दिसतें; व ह्मणूनच वामनमूर्ति वकील व न्यायाधीश, खुजे डाक्तर व एंजिनीयर, छोटेखानी पोलीस व कारकून, वगैरे तरुण मंडळी जिकडे तिकडे दिसूं लागली आहे. ब्राम्हणजातीच्या या नव्या पिढींतून पौरुषाचीं चिन्हें सर्वत्र एककालीं नाहींशीं होत आहेत हा मोठा चमत्कार नव्हे काय !

५९. शिक्षकांनीं बुद्धीस आणिलेल्या कृत्रिम भरतीचे परिणाम पूर्वी सांगितलेच. कालेजांत येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं ऐंशी किंवा नव्वद विद्यार्थ्यांच्या बुद्धीची भरती पूर्वीच होऊन गेलेली असते, व हे विद्यार्थी रडतखडत कालेजांतून युनिव्हर्सिटीच्या परीक्षा पास होऊन बाहेर पडूं अशा नुसत्या आशेनें कालेजांत आलेले असतात. कांहींच्या बुद्धीस नुकताच पूर येऊन गेलेला असतो, त्यामुळें त्यांमध्यें विशेष उत्साह दिसतो, परंतु तो पी. ई. परीक्षेंतून पार पडेपर्यंत फार झालें तर टिकतो. ज्यांच्या बुद्धीचा पराक्रम अद्याप दिसायाचा आहे ते शेंकडा दहा किंवा वीस असतात, परंतु अभ्यासाच्या दुष्ट पद्धतीमुळें व परीक्षा पास होण्याच्या घाईमुळें, त्यांपैकीं कित्येक वाटेंतच खचतात व अखेरीस बुद्धीची तीव्रता कायम ठेवून फार तर पांचघार जण बाहेर पडतात. याप्रमाणें विद्यार्थ्यांची वास्तविक स्थिति असते, तिचा प्रत्यय कोणासही आणून देतां येईल.

कालेजांतील शिक्षण शाळेंतील शिक्षणाहून निराळ्या प्रकारचें असतें, व प्रथमच कालेजांत आलेलीं मुलें तें शिक्षण घेण्यास अपात्र असतात; परंतु त्यांस या नव्या प्रकाराची लवकरच संवय होते, व पूर्वी शाळामास्तरांनीं घालून दिलेल्या अभ्यासपद्धतीस कालेजचें शिक्षण कसें साधनीभूत करावें हें त्यांस समजूं लागतें. जुन्या नापास झालेल्या विद्यार्थ्यांकडूनही या बाबतींत त्यांस पुष्कळ मदत होते, व नोटा, भाषांतरें, वगैरे साधनें पुरवून मुलांस बाहेरून मदत करून पैसे कमावणारे गृहस्थही बरेच असतात. या सर्वांच्या साहाय्यानें कालेजांतील घोकंपट्टीची किंवा "कुट्टया मारण्याची" रीति तयार होते. या रीतीचें पूर्वी एके ठिकाणीं थोडें दिग्दर्शन केलें आहे, सबब येथें पुनः वर्णन करण्याची गरज नाहीं. तिचे परिणाम थोडक्यांत सांगितले ह्मणजे झालें. हे परिणाम पहाण्याची वेळ प्रिलिमिनरी परीक्षा होय. या परीक्षेच्या वेळीं बहुतेकांचा व्यायाम सुटलेला असतो किंवा नांवाचा राहिलेला असतो. त्यायोगें अन्नपचनादि व्यापार मंद पड-

तात. मेंदूस अतिश्रम झाल्याचे व शरीरास व ज्ञानतंतूंस विश्रांति नसल्याचे परिणाम मुखचर्येवर दिसतात. परीक्षेच्या वेळीं कोणीही अगदीं बेफिकीर राहण्याचा संभव नाहीं हें खरें, परंतु या वेळीं अगदीं गर्भगळीत होणारे, अजारी पडणारे व डोकीं फिरणारे विद्यार्थी किती हें मोजिल्यास निदान एक-तृतीयांश ब्राह्मणांची अशी स्थिति होते, असें दिसून येतें. प्रत्येक प्रिलिमिनरीच्या आधीं पावसाळा असतोच, त्यामुळें पावसाळ्याची सर्द हवा, गार वारें, वगैरे अजारी पडण्याच्या ठरावीक सबबी मुलांस सांगावयास मिळतात; व शिक्षक आणि पालक बहुधा त्या डोळे मिटून ऐकतात. नीट फलाणीचे कपडे वापरावे असा शिक्षकांकडून, व नित्य मिताहार व औषधपान करावें व थंडीवाऱ्यास शरीर उघडें टाकूं नये असा डाक्तरांकडून, प्रकृति दुरुस्त ठेवण्याविषयीं मुलांस उपाय सुचविला जातो. परंतु परीक्षा आठ चार दिवसांवर येईपर्यंत हे सर्व उपाय व्यर्थ होतात, व चांगलीं सुदृढ दिसणारीं मुलें क्षीण होऊन अजारी पडतात; कोणी फार तर परीक्षेच्या दिवसापर्यंत दम धरितात व आयत्या वेळीं अजाराच्या तावडींत सांपडतात. याप्रमाणें निदान तृतीयांश विद्यार्थ्यांची स्थिति होते. जितका मुलगा घरचा बरा तितका त्यावर या प्रकारचा परिणाम कमी घडतो, व कालेजांत येणारांपैकीं बरेच घरचे बरे असतात, त्यामुळें दोनतृतीयांश तरी अशा विपत्तींतून सुटतात. मुलें मोठीं व समंजस झाल्यामुळें आपली पुढची स्थिति त्यांस डोळ्यांपुढें दिसूं लागते, त्यामुळें गरीबावर व तसेच श्रीमंत असून घरीं जांच सोसणारावर मेंदूच्या अतिश्रमाचे व विश्रांतीच्या नाशाचे हे तात्कालिक विशेष परिणाम घडत असावे. शाळेंत असतां विद्यार्थ्यांस आपल्या पुढील जबाबदारीचें इतकें ज्ञान नसतें, त्यामुळें शाळेंत प्रिलिमिनरीच्या वेळीं अजारी पडणारांची संख्या सुमारें एकषष्ठांश इतकी असते.

६०. प्रिलिमिनरी परीक्षेचा निकाल झाल्यावर ज्यांस योग्य रीतीनें पाठवितां येतें ते सेरीजकरून बाकीचे काय करितात ? त्यांस आपण परीक्षेस जाण्यास अपात्र आहों असें मुळींच वाटत नाहीं; व ' आह्मांस पाठवा, आह्मांस पाठवा,' अशी ओरड करून परीक्षेस जाण्यास परवानगी मिळविण्याकरितां जे जे उपाय सुचतील ते ते सर्व उपाय ते करून पाहतात. कालेजांतील स्थिति ज्यांस माहीत नाहीं त्यांच्या माहितीकरितां या उपायांपैकीं कांहीं येथें सांगतों.

' मी अजारी होतों, म्हणून परीक्षेच्या वेळीं अभ्यास चांगला झाला नव्हता, अद्याप अभ्यास करण्यास वेळ आहे सबब मला पाठवावें ' याप्रमाणें प्रथम विद्यार्थी प्रार्थना करितात. हे विद्यार्थी निम्मे किंवा अधिकच विषयांत नापास झालेले असतात, किंवा प्रिलिमिनरी परीक्षेस मुळींच बसलेले नसतात. पूर्वीच्या सबंध आठ दहा महिन्यांत जो अभ्यास या विद्यार्थ्यांनीं केला तो फुकट, जो उपयोगीं पडायाचा तो अजारी पडण्याच्या दिवसांतील, व जे विषय

वर्षांत करितां आले नाहींत ते राहिलेल्या अवधींत सहज तयार होतील, असें हे विद्यार्थी प्रतिपादीत असतात. ज्यांस ही अजारीपणाची बाधा सांगतां येत नाहीं ते घरचीं कामें, जुना एखादा अजारीपणा किंवा अशीच दुसरी कांहीं सबब सांगतात. व जो काय बुद्धीचा चमत्कार दाखवायाचा तो राहिलेल्या महिन्या दीडमहिन्यांत आह्मी दाखवूं अशी समजूत घालीत असतात. कित्येक आपल्या इष्टमित्रांस व पालकांस सांगून त्यांकडून भीड घालवितात. हे मित्र व पालक हा मुलगा बुद्धिमान् आहे व तो अभ्यास फार करितो अशी साक्ष देतात; त्यांची साक्ष त्यांच्या समजुतीप्रमाणें खरी असते. परंतु विद्यार्थ्याच्या बुद्धीची भरती जाऊन तींस ओहोटी लागल्याचें त्यांस अवगत नसतें. फार अभ्यास करणें, ह्मणजे फार घोकणें, हा सर्वत्र रूढ अर्थ झाला आहे; व घोकायाचें किती व वेळ किती राहिला आहे, त्यांत कांहीं तरी प्रमाण बसवून, ह्या विद्यार्थ्यांकडून सर्व अभ्यास निःसंदेहपणें होईल असें ते सांगतात.

दुसरी त्यांची अशी समजूत असते कीं, परीक्षेंत पास होणें हें अभ्यासाचें फळ नव्हे, हें नशीबाचें काम आहे, व विद्यार्थी, मित्र व पालक '**चान्स द्या,**' '**नशीबाची पारख करूं द्या**' असें फार आग्रहानें विनवीत असतात. वरच्या वरच्या परीक्षेंत मुलांची संख्या कमी असते, परीक्षकास कागद तपासण्यास अधिक फुरसत मिळते, ते विशेष दक्ष असतात, तेव्हां ज्याचा अभ्यास कमी तो केवळ नजरचुकीनें पास होऊं शकणार नाहीं, खरी तयारीच पाहिजे, वगैरे अनेक गोष्टी त्यांस सांगितल्या तरी त्या व्यर्थ होतात; त्यांचें समाधान कदापि होत नाहीं. आणखी त्यांस असें सांगावें कीं, " अभ्यास करणें व ध्यानांत राहणें, घोकण्याची शक्ति व स्मरणशक्ति यांमध्यें भेद आहे. विद्यार्थी वाचनाचे व घोकण्याचे श्रम करील, परंतु वाचलेलें व घोकलेलें ध्यानांत राहणें व प्रसंगीं त्याची स्फूर्ति होणें हें मुलाच्या स्वाधीन नाहीं. मुलाची स्मरणशक्ति कमी होत चालली आहे, तिची पारख़ बरेच वेळां झाली, आतां कां त्याम परीक्षेच्या नादीं लावितां ? " या सर्व गोष्टी त्यांस मान्य होतात, परंतु नशीबाच्या कामीं सर्व विचार मागें पडतात.

" एक वर्षांत सर्व अभ्यासांची तयारी होण्याइतकी मुलाची योग्यता नाहीं. हा तीन वर्षें म्याट्रिक. परीक्षेस जाऊन अखेरीस ७९८ वा येऊन कसा तरी चाहेर पडला आहे. याहून बुद्धिमान् मुलांस देखील एक वर्षांत पी. ई. चा अभ्यास करणें कठीण पडतें, तेव्हां याचे अभ्यास कच्चे राहिल्यास नवल तें काय. आणखी एक वर्ष अभ्यासाकडे घालविल्याखेरीज पास होण्याचा बिलकुल संभव नाहीं. " असें इष्टमित्रांस व पालकांस सांगितलेलेंही त्यांस रुचत नाहीं. अशा प्रसंगीं कित्येक विद्यार्थी आपण नापास होणार हेंही कबूल करितात, परंतु कालेजांतून पाठविल्यावर पुनः कालेजांत आल्यावांचून एक्सू-स्टूडंट ह्मणून जातां येईल, तेव्हां हा मार्ग आह्मांस खुला होण्याकरितांच परीक्षेस जाऊं द्या असें ते ह्मणतात.

कोणी म्हणेल असे विद्यार्थी पुढें एक्स्-स्टूडंट म्हणून जाऊन पास होतात काय! बहुधा असें घडतें कीं, विद्यार्थी शिक्षणाकरितां दुसऱ्या कालेजांत जातो. मग तेथून पाठविलें तर बरेंच नाहीं तर पहिल्या कालेजांतून एक्स्-स्टूडंट म्हणून जाण्याची सोय असतेच. अशा लटपटी करितां करितां कांहीं वर्षांनीं शेंकडा पंचवीस तीस एक एका परीक्षेंतून बाहेर पडतात. बाकीचे युनिव्हर्सिटीचा नाद सोडून देतात.

विद्यार्थ्यांनीं असें हे उपाय केल्यानंतर जे आणखी उपाय राहतात ते निकराचे किंवा त्राग्याचे होत. 'हा आत्मघात करून घेईल, कोठें पळून जाईल, किंवा जीव देईल, तेव्हां यास परीक्षेस जाऊं द्या' असें विद्यार्थ्यांचे पुरस्कर्ते सांगतात. 'माझें आयुष्य फुकट जाईल, माझें कुटुंब उपाशी मरेल, माझा आश्रय जाऊन मला कोठें तरी तोंड काळें करून जावें लागेल तेव्हां मला परीक्षेस जाऊं द्या.' असें विद्यार्थी म्हणतात. वास्तविक पाहतां हे विद्यार्थी रडतराऊतच असतात. मनगटाच्या जोरावर आपली उपजीविका मिळविणें जितकें लांचणीवर टाकवेल तितका त्यांचा प्रयत्न असतो; आत्मघाताच्या व कुटुंबपोषणाच्या त्यांच्या गप्पा व्यर्थ असतात. त्यांचें आर्जव करण्याचें सामर्थ्य विलक्षण असतें व कालेजांतून परीक्षेस पाठविलें म्हणजे अखेरीस नापास झालें तरी पालकांच्या व आश्रयदात्यांच्या डोळ्यांत चांगली धूळ टाकितां येते, म्हणून त्यांचा प्रयत्न असतो. वार लावून उदरनिर्वाह करून कांहीं वर्षें कालेजांत काढल्यावर, पुढें सोवत्यांवरोवर वकिलीच्या वृथाभ्यासांत आणखी कांहीं वर्षें घालविणारे विद्यार्थी आहेत. आईबापांची हवी तशी हालअपेष्टा पहात असतां आम्ही परीक्षेंत पास होऊं, अशी त्यांस वृथाशा लावणारे आहेत; व कालेजांत थकल्यावर मग नौकरीसाठीं यू. एस्. एफ. चे विषय शिकण्याकरितां पुनरपि शाळेंत जाणारेही आहेत.

६१. कालेजांतील शेवटची परीक्षा तरी पास झाली पाहिजे नाहीं तर यू. एस्. एफ्. तरी झाली पाहिजे, म्याट्रिक, व पुढील परीक्षा सरकारी नौकरीस उपयोगी नाहींत, ही गोष्ट हल्लीं पालकांस माहित झालेली आहे. तसेंच कालेजांत गेलेल्यांपैकीं शेंकडा पांचचार शेवटच्या परीक्षेंत पास होऊन बाहेर येतात हेंही पालकांस माहित आहे. परंतु शाळांत जाऊन पाहिल्यास शेंकडा पाउणशें किंवा अधिक मुलें म्याट्रिक. परीक्षेच्या बाजूस व जीं शाळेंतच मंदांत मंद ठरलेलीं तेवढीं कायतीं यू. एस्. एफ. च्या वर्गांत अशी स्थिति दिसते. यावरून कोणी तर्क करील कीं, हीं कालेजांत जाण्याची आशा करणारीं मुलें घरचीं बरीं असतील, परंतु तशी मुळींच स्थिति नसते. पालक अविचारी व मुलें छांदिष्ट, उभयतांसही आशा कीं युनिव्हर्सिटीच्या चाळणींत जे पांचचार दाणे अखेरीस शिल्लक राहतात ते आमचेच पुत्र, ते आम्हीच! स्वतःची योग्यता मुलास ओळखत नाहीं, ती त्याच्या पालकास ओळखत नाहीं, मुलास स्वतः कुटुंबभार उचलण्याचा

दिवस जितका लांबणीवर पडेल तितकें पाहिजे असतें व पालकास मुलाच्या कर्तृत्वाविषयीं व्यर्थ उमेद उत्पन्न होते. अखेरीस उभयतांही बुडून कुटुंब आधींचें घरचें घरें असलें तरी रसातळास जातें. ही स्थिति वर्षानुवर्ष चालू आहे, व तींच कित्येकांस बाह्यात्कारी दिसणाऱ्या विद्यावृद्धीमुळें मोठी अभिनंदनीय वाटत असते. आतां कोणी असें ह्मणेल कीं जे लोक विद्यावृद्धीचें अभिनंदन करितात ते ज्ञातीच्या व समाजाच्या हितावर जे विद्येचें अनुकूल परिणाम घडतात त्यांकरितां, व्यक्तिमात्रांचें व कुटुंबांचें अशा विद्यावृद्धीपासून जरी नुकसान झालें तरी काय हरकत आहे! ही गोष्ट मान्य करितां येईल; परंतु प्राथमिक शिक्षणानें ब्राह्मणज्ञातीचें व समाजाचें अमुक प्रकारें हित होतें; मध्यम शिक्षणानें अमुक प्रकारचें व्हावें, व वरिष्ट शिक्षणानें अमुक प्रकारचें झालें पाहिजे, असें प्रत्येक शिक्षणप्रकाराचे स्पष्ट फायदे लिहून, त्यांपैकीं अमुक साध्य होतात व अमुक होत नाहींत. अमुक साध्य करीत असतां अमुक प्रकारचें नुकसान होतें, अमुक एक फायदे होण्याचें चिन्हच दिसत नाहीं, असा सर्वप्रकारें विचार करून नंतर ज्या ज्या शिक्षणप्रकाराचे फायदे नुकसानाहून अधिक असतील त्याचें अभिनंदन करण्यास हरकत नाहीं व ज्यामध्यें तसा प्रकार दिसत नसेल त्यांत सुधारणा करण्याचें समाजाग्रणींनीं त्वरित आरंभिलें पाहिजे.

६२. याप्रमाणें ही परीक्षेस जाणारांची स्थिति सांगितली; युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस गेलेल्यांपैकीं पुढें किती पास होतात, हें सर्वांस ठाऊक आहेच. सामान्यतः तृतीयांशाचें प्रमाण धरल्यास हरकत नाहीं. पहिल्याच खेपेस पास होणारांचें प्रमाण याहून फार कमी हें सांगायास नकोच. परीक्षांच्या या अशा निकालासंबंधानें विद्यार्थ्यांची ओरड आहे, हें स्वाभाविकच आहे; परंतु त्यांच्या ओरडीकडे लक्ष देऊन पालक व इतर त्यांचे कैवारी जेव्हां युनिव्हर्सिटीस किंवा परीक्षकांस दोष देतात, तेव्हां वास्तविक स्थिति आहे तरी काय हें पाहणें जरूर होतें. या कामांत युनिव्हर्सिटी जी चूक करणार ती अभ्यास नेमण्याची व परीक्षांची संख्या ठरविण्याची. परीक्षक जी चूक करणार ती प्रश्न फार अवघड काढण्याची. या चुका त्यांकडून कितपत होतात हें ठरविणें कठिण आहे, कारण या कामीं एकमत होणें शक्य नाहीं.

" म्याट्रिक्युलेशन परीक्षेस इतकें गणित कशास पाहिजे ? " असें ह्मणणारे आहेत; परंतु ते एकंदर गणितविषय पाहतात; त्या विषयांत सरासरीनें शेंकडा पंचवीस मार्क मिळाले तरी मुलास युनिव्हर्सिटी पास करिते या गोष्टीकडे ते लक्ष देत नाहींत. घरें युनिव्हर्सिटीनें आहे त्याच्या चतुर्थांश गणितविषय नेमिला व तो पूर्णपणें उमेदवारांस आला पाहिजे असें मनांत आणून त्यांत शेंकडा नव्वद माके मिळवावे तेव्हां पास व्हावें, असा नियम केल्यास हल्लींच्या गणितविषयास दोष देणारे कबूल होतील काय ? शिक्षकांस हें पसंत होईल काय ? व त्यायोगें

विद्यार्थ्यांची अधिक संख्या पास होईल काय ? जर आहे या विषयाचा चतुर्थांश नेमावा व त्यांत चतुर्थांश मार्क मिळाले म्हणजे पास करावें, असें कोणी म्हणेल तर त्यानें गणितविषय मुळींच असूं नये असें स्पष्ट म्हणणें बरें. या विषयाखेरीज इतर नेमिलेल्या विषयांस कोणी फारसा दोष देत नाहीं. शास्त्रीय विषय मुळींच नसावे, असें म्हणणारे कांहीं थोडे आहेत; परंतु त्यांस कोणी समंजस माणूस आपली संमति देणार नाहीं. सबब ही प्रवेशपरीक्षा युनिव्हर्सिटीस अधिक सुलभ करितां येणार नाहीं असें गृहीत करूं. यानंतर ती परीक्षकांस अधिक सुलभ करितां येईल कीं नाहीं या विषयाचा विचार करितां तेंही शक्य दिसत नाहीं. यावरून कोणाही सामान्य तयारीच्या विद्यार्थ्यांस या परीक्षेंत गोते खावे लागले तर तो त्याच्या बुद्धीचाच दोष असें म्हटलें पाहिजे.

या एका परीक्षेंतून पार पडतां पडतां मुलांची कोण त्रेधा उडते हें पाहिलें म्हणजे, पुढें तरी जितक्या कमी परीक्षा असतील व प्रत्येकीस जितका अधिक वेळ देतां येईल तितकें चरें असें सांप्रतकाळीं कबूल केलें पाहिजे. मुलांची मिलिमिनरीच्या वेळची स्थिति पाहिली म्हणजे कोणासही कळून येईल कीं, कालेजांतील पहिल्या दोन परीक्षांचे अभ्यास मुलांस एका एका वर्षांत होत नाहींत; त्यांस शारीरिक व्यायामास वेळ मिळत नाहीं; शिक्षकांस फार घाई करावी लागते; अभ्यास अंगीं मुरत नाहीं, व त्याचें प्रसंगीं मुळींच चीज होत नाहीं. सर्व ज्ञान वरकरणी असतें व तें अल्पकाळांत नष्ट होतें. त्यामुळें पुढील परीक्षांचे श्रम हलके व्हावे ते होत नाहींतच. परीक्षांची संख्या कमी केल्यानें, हल्लीं जी विद्यार्थ्यांची स्थिति आहे ती थोडी तरी सुधारेल व त्यांच्या मनावर व शरीरांवर जे निरंतरचे दुष्परिणाम घडत आहेत, ते कांहीं थोड्या अंशीं तरी दूर होतील यांत बिलकुल संशय नाहीं. परंतु केवळ अधिक विद्यार्थी पास करून घेण्याच्या हेतूनें परीक्षांची संख्या कमी करायाची, असा जर कोणाचा आशय असेल तर तो प्रशंसनीय म्हणतां येणार नाहीं. कारण बी. ए. ची डिग्री मिळविण्यास दोनच परीक्षा दिल्या म्हणजे झालें असें ठरवितांना जर **पी. ई.** व **इंटरमीजिएट** या दोहोंचे हल्लींचे अभ्यास एकत्र करून त्यांत दोन वर्षांनीं एकदां परीक्षा घ्यावी असें ठरविलें तर अधिकच कहर होईल; तेव्हां परीक्षा कमी असाव्या व कहरही होऊं नये, असें म्हणणें म्हणजे वास्तविकपणें अभ्यास कमी करा असें अन्योक्तीनें म्हणणें होय. परीक्षांचे विषय कमी करा असें स्पष्ट म्हणण्यासही कदाचित् पुष्कळ लोक तयार होतील, परंतु ब्राह्मणांच्या बुद्धीचा तूर्त ऱ्हास होत आहे, तेव्हां आपली अब्रू राखण्याकरितां अमुक प्रकारचें ज्ञान आह्मांस नसलें तरी चालेल असें त्यांनीं म्हटलें व ज्या इतरांस स्वबुद्धीची विशेष घमंडी वाटत आहे त्यांनीं त्यांच्या म्हणण्यास हरकत घेतली तर त्या इतरांस आपणांस फारसा दोष देतां येईल काय ? हल्लीं तीन परीक्षांत मिळून जें ज्ञान दिलें जातें तितकें सर्व आवश्यक आहे असें मानिलें व तें

विद्याभ्यास क्रमानें प्राप्त होत गेलें आहे असें स्वतः युनिव्हर्सिटीस पहायाचें असलें, तर तीन परीक्षांत त्यांची वाटणी केल्यानेंच प्रत्येक परीक्षेस चेताचा अभ्यास होईल. इतक्या ज्ञानाची दोन परीक्षांत योग्य वाटणी होऊं शकणार नाहीं. तीन परीक्षा देवून शिक्षणक्रम सुधारणें झाल्यास आणखी एक वर्षानें तरी कालेजांतील शिक्षणाचा काळ वाढविला पाहिजे म्हणजे तो पांच वर्षांचा केला पाहिजे व नंतरही अधिक चांगले निकाल होतील असा भरंवसा नाहीं. याचें कारण लवकरच पुढें सांगतों.

६३. ग्रयाजुएट होणारास कोणतें कोणतें ज्ञान आवश्यक आहे ह्याविषयीं निर्णय करणें कठिण आहे, व ह्मणून कोणाच्या दृष्टीनें हल्लींचे अभ्यास फार आहेत आणि कोणाच्या दृष्टीनें ते योग्य आहेत, असा मनभेद दृष्टीस पडतो. जर हल्लींचे अभ्यास योग्य असतील तर तीन परीक्षा असल्या, पाहिजेत, किंवा कालेजच्या शिक्षकांवर भरंवसा ठेवून त्यांच्या सर्टिफिकिटावरून एकंदर विषयांपैकीं कांहीं विद्याभ्यास येत होते असें मानिलें पाहिजे व मग बाकीच्या विषयांत दोन किंवा एक देखील परीक्षा घेऊन भागेल; व या परीक्षेचा अभ्यास हवा तितका कमी करितां येईल. तेव्हां वास्तविकपणें कालेजच्या शिक्षकांवर या बाबतींत किती भरंवसा ठेवावा हाच प्रश्न मुख्य होतो. अशा तऱ्हेनें शिक्षकांच्या सर्टिफिकिटावर अवलंबून राहण्यास युनिव्हर्सिटी हल्लीं नाराजी आहे हें उघड दिसतें, व हें तिचें करणें कितपत योग्य आहे याचा विचार प्रत्येकानें आपआपला करून घ्यावा. बरें ग्रयाजुएटास इतक्या ज्ञानाची गरज नाहीं तें कमी करावें असें ज्यांचें मत आहे त्यांचा विशेषतः गणित विषयावर व तदनुषंगिक शास्त्रीय विषयांवर अपवाद निघायाचा. आर्ट्सचे ग्रयाजुएटास डाक्टर किंवा एंजिनियर प्रमाणें विशिष्ट विषयांची माहिती नसल्यास चालेल, यांत संशय नाहीं; परंतु गणित, पदार्थविज्ञान, रसायन, वगैरेच्या मूलतत्त्वांचेंही त्यास ज्ञान नसल्यास चालेल काय! असें विचारितां कोणी 'होय' व कोणी 'नाहीं' ह्मणतील. इंग्रजीचें, इतिहासासें व अर्थशास्त्राचें ज्ञान त्यास चांगलें असलें पाहिजे, असें बहुधा सर्वांचें मत पडेल. प्राचीन भाषांविषयीं बहुतेकांचें अनुकूल मत आहे. तेव्हां वास्तविक पाहतां एका गणित विषयाबद्दलच खरी हाकाहाक आहे. आतां या युनिव्हर्सिटीनें लंडन युनिव्हर्सिटीप्रमाणेंच क्रम ठेवावा अशी आवश्यकता ज्यांस वाटत असेल, त्यांस हल्लींचा क्रम मान्य असणें साहजिकच आहे, परंतु यांहून इतरांकरितां अशीच निराळी परीक्षांची मालिका आक्सफर्डच्या किंवा केंब्रिजच्या नमुन्यावर काढण्यास युनिव्हर्सिटीस हरकत नाहीं. हल्लीं प्रत्येक विषयाचें जें अपुरें ज्ञान देण्यांत येतें त्या ऐवजीं, इंग्रजी, प्राचीन भाषा, इतिहास, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, गणित, पदार्थविज्ञान, रसायन, वगैरे नियमित विषय घेऊन त्यांपैकीं अमुक दोन किंवा तीन विषयांचें ज्ञान असलेंच पाहिजे व शिवाय राहिलेल्या

विषयांपैकीं एकाचें अमुक प्रमाणानें व दुसऱ्याचें अमुक प्रमाणानें ज्ञान असलें ह्मणजे मनुष्य पास समजायाचा, असें केलें ह्मणजे पुष्कळांचें समाधान होईल. दुसऱ्या बी. एस्सी. परीक्षेसारखा अभ्यासक्रम बी. ए. च्या परीक्षेस योजणें अशक्य नाहीं, व तसें केल्यास बहुधा पुष्कळांचें समाधान होईल; व कोणासही कुरकुर करण्यास जागा उरणार नाहीं. याप्रमाणें विषय नियमित करण्यांत परीक्षा कमी घेण्याचाही एका रीतीनें उद्देश साधतो. हरतऱ्हेच्या पंचराशिकांत परीक्षा घेतल्यास बेरीज, वजाबाकी, गुणाकार वगैरे पूर्वीच्या विषयांची परीक्षा निराळी घेण्याची जरूर नाहीं. याच रीतीनें जर परीक्षेचे विषयच असे नेमिले कीं, त्यायोगें पूर्वीच्या व पुढील ज्ञानाची एकदमच परीक्षा होईल, तर मधल्या परीक्षांचा बराच त्रास चुकेल. बी. ए. चा अभ्यासक्रम दोन प्रकारांनीं ठरविण्यास युनिव्हर्सिटीस कोणतीही मोठी हरकत आहे असें वाटत नाहीं, व इंग्लंडांत अनेक युनिव्हर्सिट्या असल्यानें जो फायदा होत आहे तो एका युनिव्हर्सिटीस आपल्या विद्यार्थ्यांस करून देण्याचें अवघड नाहीं. असो; युनिव्हर्सिटीच्या संबंधानें हे विचार केवळ सूचनेदाखल प्रकट केलेले आहेत. परंतु प्रस्तुत निबंधांत ज्या प्रश्नाचा मुख्यत्वेंकरून विचार कर्तव्य आहे तो हा कीं, इतके कमी विद्यार्थी परीक्षेंत पास होण्याचें कारण परीक्षा कडक किंवा उमेदवार कमी दर्ज्याचे; व असे उमेदवार युनिव्हर्सिटीनें परीक्षा कमी करून अधिक पास करून घेण्यांत किती फायदा आहे.

६४. विद्यासात्याशीं किंवा शिक्षणाशीं ज्यांचा संबंध नाहीं असे लोक जेव्हां युनिव्हर्सिटीस व परीक्षकांस दोष देत असतात, व पालकवर्गांतील लोक त्यांचे अनुवादक बनून जेव्हां आवेशानें टाळ्या पिटीत असतात, आणि विद्यार्थ्यांची तर मोठी ओरड सुरू असतेच--तेव्हां शिक्षकलोक स्वस्थपणें गम्मत पहात असतील, व आपण अंगानिराळे राहून बरें परस्पर काढूर उठलें आहे असा हर्ष मानीत असतील ! विद्यार्थी अज्ञान ह्मणून त्यांच्या योग्यतेचा, व शिक्षक सज्ञान ह्मणून त्यांच्या शिक्षणपद्धतीचा, दोहोंचाही विचार एकीकडे राहून, अशा काहुरांत या भलत्यासच दोष दिला जातो. प्रथम म्याट्रिक्युलेशन व यू, एस्. एफ्. परीक्षांचा निकाल पाहिल्यास बाहेरील माणसांस वाटतें कीं, "अहो, कायते चतुर्थांशच पास झाले ! काय जुलूम हा ?" परंतु त्यास आंतील मर्म कोठें माहीत असतें ?

या परीक्षांस उमेदवार पाठविण्यापूर्वी प्रत्येक शाळेंत प्रिलिमिनरी परीक्षा होते. या परीक्षेच्या निकालावरून परीक्षेस जाण्यास योग्य कोण व अयोग्य कोण हें ठरतें. म्याट्रिक्युलेशनमध्यें भाषाविषयांत तृतीयांश व इतर विषयांत चतुर्थांश मार्क मिळाल्यानें उमेदवार पास होतो. याच दृष्टीनें प्रिलिमिनरीचाही निकाल करण्याची चाल आहे; व कोणत्याही एका किंवा अधिक विषयांत इतकेही मार्क ज्यास मिळत

नाहींत त्यास युनिव्हर्सिटी नापास करिते हें सर्व शिक्षकांस माहित असतें. तेव्हां शिक्षकांनीं प्रिलिमिनरी घेतल्यावर तींत सर्व विषयांत पास झालेले विद्यार्थी मात्र परीक्षेस पाठविले, तर त्यांची संख्या किती होईल ? ती अखेरीस युनिव्हर्सिटींत जितके पास होतात त्यांहून थोडी कमीच होईल. तेव्हां जर युनिव्हर्सिटीनें असें म्हटलें कीं, तुमच्या प्रिलिमिनरीच्या निकालावरूनच आम्ही आपला निकाल ठरवितों, तर त्या ह्मणण्यास कोणीही हेडमास्तर कबूल होतील काय ? वास्तविक पाहतां विद्याखात्याच्या बाहेरील लोक परीक्षकांमध्यें जे जे गुण चाहतात ते ते प्रिलिमिनरीच्या प्रसंगीं त्यांमध्यें असतात; कदाचित् ते गुण थोडे फाजिल असतात असें म्हटल्यास चालेल. शाळेंतील शिक्षकच प्रिलिमिनरीचें परीक्षक तेव्हां त्यांस मुलांबद्दल पूर्ण अनुकंपा असते हें उघड आहे. शिवाय आपण असतात, शिकविलेल्या विषयांतच ते परीक्षा घेतात, तेव्हां त्यांस मुलांस काय येतें आहे हें माहीत असतें. परीक्षेस योग्य प्रश्न कोणते व कोणते अखेरच्या परीक्षेंत येतील हें मनांत आणूनच त्यांनीं पूर्वी शिकविलेलें असतें व त्यांस बहुधा पूर्वीच्या दहा पांच परीक्षांचा अनुभव असतो, तेव्हां मुलें अगदीं गचाळ असल्याखेरीज नापास होत नाहींत. इतकेंच नव्हे तर अमुक मुलगा चांगला, अमुक मूर्ख अशी त्यांस माहिती असते, तीमुळें मूर्ख मुलगा पास होण्याचा संभव असतो, परंतु चांगला मुलगा विनाकारण नापास होण्याचा फार थोडा संभव असतो. प्रिलिमिनरीचे वेळीं जे अभ्यास परीक्षेस नेमिलेले असतात, ते कोठें कोठें पुरे नसतात, ह्मणजे जेवढे विषय परीक्षेच्या आधींच्या चार महिन्यांत शिकवून तयार करून घेतलेले असतात तेवढ्यांतच परीक्षा घेण्याचा कित्येक शाळांत प्रघात आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां युनिव्हर्सिटीच्या नियमाअन्वयें प्रिलिमिनरींत जे विद्यार्थी पास होतील तेवढेच शिक्षकांनीं परीक्षेस धाडिले, तर परीक्षांचा निकाल शेंकडा नव्वद किंवा अधिक देखील होण्याचा संभव आहे. परंतु वास्तविक स्थिति काय असते ? सर्व गोष्टी अनुकूल असूनही प्रिलिमिनरींत दोन विषयांत नापास झालेलीं मुलें शिक्षक विनधोक परीक्षेस पाठवितात; त्यामुळें जितके प्रिलिमिनरींत पास झाले तितकेच अधिक परीक्षेस जातात; याशिवाय राहिलेल्यांपैकीं कोणी वशिल्यानें, कोणी आर्जवानें, कोणी इतर पूर्वी सांगितलेल्या मार्गांनीं परीक्षेस जातां; यामुळें जाणारांच्या संख्येस आणखी भर पडते. सरासरी असें दिसतें कीं, चाळीस पास झालीं ह्मणून, चाळीस दोन विषयांतच नापास झालीं ह्मणून, व वीस मुलें इतर कारणांमुळें, अशीं शंभर मुलें शाळांतून परीक्षांस पाठविलीं जातात; त्यांशिवाय शिक्षकांनीं न पाठविल्यापैकीं आपण होऊन जाणारीं पन्नास मुलें या संख्येस मिळविलीं पाहिजेत. अशा दीडशें मुलांपैकीं चाळीस पंचेचाळीस अखेरीस युनि-

व्हर्सिटीनें पास केल्यास त्यांत परीक्षकांकडे यत्किंचितही दोष येतो काय ! जर चाळीसांच्या ऐवजीं वीसच पास झालीं असतीं तर शिक्षकांनीं प्रलय करून सोडला असता. आतां हें खरें कीं, शिक्षकांच्या भरंवशाचीं शेंकडा दोन चार मुलें नापास होतात परंतु उलट " हीं मूर्ख मुलें कशीं पास झालीं असतील तीं असोत " असे ज्याविषयीं त्यांचे उद्गार निघतात अशीं शेंकडा पांच सात मुलें असतात. यांची बेरीज वजाबाकी करितां साधारणपणें युनिव्हर्सिटीचा निकाल शिक्षकांच्या पथ्यावर पडतो; कधीं एखादे वर्षीं याविरुद्ध परिणाम झालाच तर व्हावयाचा. प्रतिवर्षी वर्गांत शिकविल्यापैकीं दोन तृतीयांश मुलें परीक्षेस जातात; त्यांपैकीं एक तृतीयांश पास होतात, असें धरण्यास हरकत नाहीं; आतां पाठविल्यापैकीं जे दोन तृतीयांश नापास होतात, त्यांपैकीं " हा मुलगा पास झालाच पाहिजे, हा कसा नापास झाला ! " असें कितीकांविषयीं शिक्षकलोक परीक्षकांस विचारण्यास तयार होतील ! फार झालें तर शेंकडा एक किंवा दोन मुलांसंबंधानें; या मुलांस अन्याय झाला असें कदाचित म्हणतां येईल; परंतु परीक्षेच्या वेळीं कोणी घाबरतो, कोणी घाईंत भलतेंच लिहितो, वगैरे अनेक गोष्टी मनांत आणिल्यास, परीक्षकानें अन्याय किंवा निष्काळजीपणा केला असें सहसा म्हणवणार नाहीं.

याप्रमाणें म्याट्रिक. व यू. एम्. एफ्. या परीक्षांचा योग्य निकाल होत असतां त्याविषयीं विनाकारण ओरड होते. वास्तविक दोष मुलें पाठविणारांचा व त्या जाणाऱ्या मुलांचा आहे. प्रिलिमिनरीनंतर एक महिन्यानें युनिव्हर्सिटीची परीक्षा होते. पूर्वी कित्येक वर्षें यथेष्ट शिक्षण दिल्यावरही जीं मुलें दोन किंवा अधिक विषयांत नापास होतात त्यांचा त्या दोन किंवा अधिक विषयांत पास होण्याचा किती संभव आहे हें पाहिल्यास मुळींच नाहीं असें दिसतें. कारण इंग्रजींत व गणितांत नापास होणारीं मुलें फार. एक महिन्यांत हे विषय सुधारण्यासारखे नाहींत. असें असतां जी गोष्ट मुलांस पूर्वीच्या कित्येक वर्षांच्या अभ्यासानें साध्य झाली नाहीं ती त्यांस एका महिन्यांत साध्य होईल असें अनुमान करण्यास कांहीं तरी कारण आहे काय ! असें अनुमान करणारा शुद्ध नशीबावर व घोकंपट्टीवर भरंवसा ठेवणारा असला पाहिजे.

याप्रमाणें खरी स्थिति आहे असें कोणासही थोडया श्रमानें पाहतां येईल, व ही स्थिति ध्यानांत आणल्यावर युनिव्हर्सिटीस दोष न देतां पूर्वीच्या शिक्षणक्रमास दोष देण्याचें भाग पडेल. बारा वर्षें मरे मरे तों अभ्यास करून, शरीराची माती करून, अखेरीस शाळेच्या प्रिलिमिनरींत बुद्धिमान् म्हणून नांवाजलेल्या झालीच्या फार तर चतुर्थांश मुलांनीं चतुर्थांश मार्क मिळवून मोठ्या कष्टानें पास व्हावें हा काय चमत्कार आहे ! या प्रश्नाचा विचार सर्व विद्यावृद्धीच्या हितचिंतकांनीं

आधीं करावा, मग युनिव्हर्सिटीच्या कर्तव्याचा विचार करण्यास खरीं साधनें त्यांस मिळतील.

शाळेच्या वरच्या इयत्तेंत येईपर्यंतचा व पुढें कालेजांतील वरच्या वर्गांत चढण्याचा क्रम पाहिला तर तो याहून भिन्न नसतो. एका इयत्तेंतून दुसऱ्या वरच्या इयत्तेंत जातांना चार विषयांपैकीं निदान दोन विषयांत मुलगा पास झाला आहे इतकें पाहिलें म्हणजे तो शिक्षकांच्या मतें वरच्या इयत्तेस पात्र होतो; व या सोप्या शर्तीअन्वयें जे अपात्र ठरले त्यांसही वरच्या इयत्तेंत घेऊन शिकविणाऱ्या शाळा आहेतच. अपात्र मुलांपैकीं सरासरी दशांश मुलें पालकांच्या सल्ल्यानें त्याच इयत्तेंत पुनः वर्षभर राहिल्यास भाग्य म्हणावयाचें; व म्हणूनच मुलें वर घालण्याच्या सुमारास सर्व शाळांमध्यें धामधूम उडून जाते व त्यांमध्यें या वेळीं विद्यार्थ्यांचा मोठा फेरचदल होतो. सरासरीनें अखेरचा परिणाम पाहतां असा होतो कीं, अपात्र मुलें वर जातात तीं जातातच, परंतु एका शाळेच्या अपात्र मुलांचा दुसऱ्या शाळेंत भरणा होतो. याप्रमाणें परस्पर विनिमयानंतर पुढील वर्ष पूर्ववत् सुरू होतें. प्रत्येक शाळेंतील मुलांची संख्या बहुधा कायम राहते, व शिवाय स्वतःचीं अपात्र मुलें स्वतः वर न घातल्यामुळें शाळेची सुव्यवस्थितपणाबद्दलही ख्याति कायम राहते. हा एवढा या विनिमयाचा फायदा असतो. ज्या शाळेस दुसरीकडील मुलें मिळण्याचा संभव कमी, तिचे उत्पादक आपलींच सर्व मुलें कांहीं द्रव्यरूप दंड किंवा बक्षीस घेऊन वर घालतात; व दुसरीकडील मुलें कोणत्याही इयत्तेंत बसाव्यास आलीं तरी तीं घेण्यास त्यांचीं तयारी असतेच. या अनिष्ट स्थितीचें कारण मुलांची व पालकांची शिक्षणासंबंधीं घाई, हें होय. याप्रकारें सर्व मुलें चढत चढत एकदां वरच्या पायरीस म्हणजे सातव्या इयत्तेंत येऊन ठेपलीं म्हणजे तेथें मात्र मोठा तुंबारा होतो. शाळेंतील सातव्या इयत्तेंत इतर सर्व इयत्तांहून साहजिकपणें कमी मुलें असावीं, परंतु तीं अधिक असतात. हा विपरीत परिणाम कसा घडतो याविषयीं अत्यंत आश्चर्य मानणारे इन्स्पेक्टर वगैरे विद्याखात्याचे अधिकारी जेव्हां दिसतात, तेव्हां त्यांच्याही अतिस्थूल अवलोकनशक्तीचें आपणांस आश्चर्य वाटतें ! विशेष ध्यानांत ठेवायाची गोष्ट ही कीं, जे दोन किंवा तीन विषय एकदां कच्चे राहिले, ते दरसाल दर इयत्तेंत कच्चे राहूनच मुलगा वर चढत जातो, व तशा त्याच्या स्थितींतच तो युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस धाडिला जातो.

याप्रमाणें शाळेच्या पायऱ्या चढण्याची हकीकत आहे. आतां कालेजांच्या वरच्या पायऱ्या चढण्याची तऱ्हा सांगतों. कालेजच्या प्रिलिमिनरीच्या वेळची मुलांची स्थिति वर्णन केलीच. कालेजांत एकाच वेळीं पांच किंवा सहा विषयांचा अभ्यास करावा लागतो, परंतु मार्क मिळवून पास होण्याच्या कामीं सर्व विषयांचे चारच विभाग होतात; कारण कांहीं विषय दुसऱ्यांचे पोटांत जातात किंवा आनु-

वेंगिक होतात. शाळेंतील मुलांपेक्षां कालेजांतील विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटीची परीक्षा पास होणें अधिक सुलभ असतें; कारण शाळेंतील मुलांस शाळांतील शिक्षकांपुढें परीक्षा द्यावयाची नसते, ज्यांस शाळेंत काय, किती व कसें शिकवितात हें मुळींच माहित नाहीं असे लोकही म्याट्रिक. व यू. एस्. एफ्. चे परीक्षक नेमिले जातात. परंतु कालेजांतील विद्यार्थ्यांस ही गैरसोय नसते. जे ज्या विषयाचे एका किंवा दुसऱ्या कालेजांत प्रोफेसर तेच त्यांचे त्या विषयांत परीक्षक नेमिले जातात. ज्यांनीं स्वतः शिकविलें असतें, नोटा दिल्या असतात, आधीं प्रश्न काढले असतात, तेच प्रोफेसर पुढें परीक्षक बनतात; तेव्हां त्यांकडून अन्याय होऊं नये; निदान झाल्यास त्याबद्दल युनिव्हर्सिटीस दोष देतां येणार नाहीं. जर विचारूं नये असे कांहीं प्रश्न विचारले गेले तर प्रोफेसरानें कोणत्या प्रकारचें शिक्षण दिलें असेल याचीही त्यावरून परीक्षा होईल, ही त्यास भीति असते. कालेजांतील प्रिलिमिनरी परीक्षा पाहिल्यास ती शाळेंतील प्रिलिमिनरीच्या मानानें बहुतकरून अधिक सोपी होते; कारण एकंदर विषयांपैकीं बहुधा निम्मे विषय जे नुकतेच शिकवून झाले असतात तेवढ्यांत मात्र परीक्षा होते. या परीक्षेंतही दोन प्रमुख विषयांत पास झाला ह्मणजे परीक्षेस जाण्यास पात्र झाला असाच बहुधा नियम असतो. असें असतां प्रिलिमिनरी परीक्षेंत अर्धाल्या सर्व विषयांत युनिव्हर्सिटीच्या नियमांअन्वयें पास होणारांचें प्रमाण पाहिल्यास तें अखेरीस युनिव्हर्सिटींत पास होणाऱ्या उमेदवारांइतकेंच सरासरीनें असतें. म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेविषयीं ज्या कित्येक गोष्टी सांगितल्या त्या सर्व या परीक्षांसही बराबर लागू पडतात. प्रिलिमिनरीचें किंवा स्वतः घेतलेल्या पूर्वीच्या इतर परीक्षांचे मार्क पुढें ठेवून 'अमुक उमेदवार कसा नापास झाला' असें विचारण्यास प्रोफेसरांसही फारच थोडी जागा असते. तेव्हां युनिव्हर्सिटीकडे काय दोष आहे? जर केवळ नशीबावर हवाला देऊन व घोकंपट्टीवर सर्व भिस्त ठेवून उमेदवार परीक्षेस जातील, तर तो युनिव्हर्सिटीचा दोष ह्मणायाचा काय ? या विषयासंबंधानें अधिक लिहिण्याची गरज नाहीं. या अशा प्रकारांनीं म्याट्रिक्युलेशनपासून बी. ए. पर्यंत दर परीक्षेस सरासरी तृतीयांश उमेदवार पास होत जातात. सहजगत्या अखेरीस फार थोडे शिलक राहतात. यास युनिव्हर्सिटीनें काय करावें ? आतां परीक्षा कमी करणें व त्याद्वारें अभ्यास कमी करणें, हा पास होणारांची संख्या वाढविण्याचा उपाय आहे खरा. त्यायोगें एकदम तिप्पट किंवा पाहिजे तितके पट संख्या शेवटास जाऊन पोहोंचेल. या रीतीनें ग्रयाजुएटांची संख्या वाढवून समाजास फायदा आहे असें दिसल्यास हा मार्गही स्तुत्यच गणिला पाहिजे.

कोंबडा कितीही उंच उडाला तरी चिमणीइतका तो उंच जात नाहीं; चिमणी कावळ्याइतकी जात नाहीं; कावळा घारीइतका उंच गेलेला दिसत नाहीं. प्रत्येक पक्ष्याची मजल कांहीं एका उंचीपर्यंत असते. त्यानें पुनः पुनः उडंड्या

मारल्या तरी त्याहून उंच त्यास जातां येत नाहीं. आतां कोणी बादशहानें चिमणी पांचशें फूट उडाली पाहिजे ह्मणून बिरबलाजवळ हट्ट धरिल्यास त्यास एकच उपाय आहे. तो हा कीं, फूट बारा इंचांचा असतो तो दोन इंचांचा केला आहे असें बादशहाच्या सर्व मुलखांत फर्मावून देणें. या रीतीनें बादशहास खुषमस्कऱ्यांच्या द्वारें चिमणी पांचशें फूट उडूं लागली ह्मणून वार्ता कळून तो खुष होईल. उमेदवारांच्या बुद्धीच्या मानानें ते युनिव्हर्सिटीच्या कमी अधिक पायऱ्या चढतात; वरच्या उंच पायरीवर कसेंही करून उडी मारा असें त्यांस ह्मटलें तर पुष्कळांकडून तें होत नाहीं; त्यांस त्या कार्यास प्रोत्साहन करणाराचा अविचार अशा प्रसंगीं दिसतो; व अनेक पालक तो करीत आहेत. विद्यावृद्धीच्या खऱ्या हितचिंतकानें ज्या गोष्टीचा विचार केला पाहिजे ती ही कीं, तितक्याच उंचीवर चढण्यास कमी पायऱ्या पुरतील कीं नाहीं; थोड्या पायऱ्या करण्यांत प्रत्येक पायरीची उंची वाढते हें त्यानें विसरतां कामा नये. एकादी वरची पायरी मुळींच काढून टाकून एकंदर उंचीच कमी करणें हें त्यास उचित नव्हे. ज्या नियमित मानसिक उच्चपदावर जावयाचें त्यास पोहोंचण्याकरितां भिन्न मार्ग ठेवणें हेंच वास्तविक पाहतां श्रेयस्कर आहे, मग कोणी कमी पायऱ्यांची जवळची बिकट वाट घेईल; व कोणी सौम्य चढावाची लांबच लांब गाडीवाट घेईल. परंतु अखेरीस सर्व सारख्या उंचीस जाऊन पोहोंचतील. युनिव्हर्सिटीनें बी. ए. च्या परीक्षेचे दोन निरनिराळे मार्ग केल्यास सर्व अडचणी दूर होतील असें वाटतें.

कालेजांत विद्यार्थ्यांचे अभ्यास कां होत नाहींत या गोष्टीचा कोणीं शोध केलेला दिसत नाहीं. विद्यार्थी शाळांतून बाहेर पडून कालेजांत येतात तेव्हां त्यांची कशी स्थिति झालेली असते हें पूर्वी सांगितलेंच; परंतु जर विचारी वाचकाचा त्या सांगण्यावर अद्याप विश्वास बसला नसेल तर त्यानें पुढील गोष्टींचा आणखी अनुभव घेऊन पहावा. कालेजांत येणाऱ्या ब्राह्मण विद्यार्थ्यांची बुद्धि इतकी मंद झालेली असते व स्मरणशक्ति इतकी क्षीण झालेली असते कीं नवीन विषयाच्या शिक्षणाकडे किंवा तो मनःपूर्वक समजावून घेण्याकडे त्यांचें लक्ष नसतें. त्या विषयासंबंधानें प्रोफेसर बोलत असतां त्याच्या तोंडचे शब्द उतरून घेण्यांतच ते गुंग असतात. घरीं होईल तितकी विषयाची समजूत करून घेऊन नंतर वर्गांत प्रोफेसराचें विवेचन लक्षपूर्वक व समजुतीनें ऐकायाचें, हें त्यांस मुळींच माहीत नसतें; प्रोफेसरानें प्रश्न व त्यांवर नोटा सांगाव्या ह्मणजे त्यानें आपलें काम बराबर केलें असा त्यांचा ग्रह दिसतो; व नेमलेलीं पुस्तकें काळजीनें वाचण्यापेक्षां त्यांवर नोटा कोठें आहेत, त्या कोणीं दिल्या आहेत, त्यांतील कोणतीं वाक्यें किंवा सदरें महत्वाचीं आहेत, हें पेन्सिलीनें रेघा मारून स्पष्ट करून ठेवणें यांतच त्यांचा वेळ जातो. अशा तयारीनंतर घोकीत बसणें याचें नांव अभ्यास. याप्रमाणें त्यांची पद्धति

आहे, हें कोणासही पाहतां येईल; व या स्थितीस शेंकडा सुमारें पंचवीस लोक साधारणपणें अपवाद असे सांपडतील. या पंचविसांच्या बुद्धीची तरतरी कायम राहिल्यामुळें ते तीस अधिक श्रम देतात असें दिसेल. परंतु त्यांमध्येंही प्रकार आहेत. सर्व विषयांत सारखें गम्य आहे असे फारच थोडे; कोणी संस्कृतांत शास्त्री असतो परंतु इतर विषयांसंबंधानें जे अगदीं कमी दर्ज्याचे विद्यार्थी त्यांसारखीच त्याची स्थिति असते. कोणी गणिती असतात; त्यांस बहुधा इंग्रजी व इतिहास यांचा कंटाळा असायाचा; व त्या विषयांची त्यांनीं विचारावांचून शुद्ध घोकंपट्टी आरंभाच्याची. कोणी इंग्रजीचे भोक्ते असतात; यांचा इतिहास आपोआप चांगला तयार होतो, परंतु अगदीं सोपेंही गणित आपणांस समजायाचें नाहीं अशी त्यांच्या मनाची पूर्ण खात्री असते, व तसेंच घडतें. याप्रमाणें कालेजांतील हुषार विद्यार्थ्यांचे मुख्यत्वेंकरून तीन प्रकार असतात–म्हणजे शास्त्री, गणिती, आणि भाषावेत्ते. यांशिवाय कांहीं थोडे मात्र अष्टपैलू म्हणजे सर्व विषयांत बरेंच गम्य असलेले असतात. या सर्वांची एकंदर संख्या प्रत्येक वर्गांत सुमारें शेंकडा वीस पंचवीस असते, बाकी सर्व घोकंपट्टीवाले असतात. पास होणारांत जे अष्टपैलू असतात ते बहुतेक व कांहीं थोडे गणिती व भाषावेत्ते असतात हें सांगायास नको. एका किंवा दोन विषयांत मुळींच गम्य नसणें हें पूर्वीच्या शिक्षणानें व संवयीनीं मेंदूच्या कांहीं भागांस आणिलेल्या अकाल वार्धक्याचें फळ होय. याप्रमाणें ही बुद्धीची स्थिति सांगितली. आतां स्मरणशक्तीच्या संबंधानें पाहतां शेंकडा सुमारें ऐंशी किंवा पंचायशी विद्यार्थ्यांस शेवटच्या पंधरा दिवसांची तयारी विशेष उपयोगीं पडते. या पंधरा दिवसांत त्यांस जे अतिरिक्त श्रम होतात त्यांमुळें बहुतेक क्षीण होतात, कोणी आजारी पडतात व कोणाचा दुसरी कांहीं अवस्था होते. परीक्षेच्या आधींचे पंधरा दिवस ज्यांनीं अभ्यास केला नाहीं, त्यांस त्यांच्या आवडत्या विषयाखेरीज इतर विषयांचे अगदीं सोपे व ढोबळ असेही प्रश्न सोडवितां येत नाहींत, असें प्रिलिमिनरीच्या वेळीं स्पष्ट दिसून येतें; व शेवटपर्यंत अभ्यास करूनही या इतर विषयांचे जे प्रश्न सोडवितां येतात ते बुकांतले व नोटांचले घोटलेले; उदाहरणें किंवा शिकलेल्या तत्त्वांच्या व्यावहारिक उपयोगाचे सोपे प्रश्न बहुतकरून येत नाहींत. ही सर्व माहिती मुलांची परीक्षा घेऊन, त्यांस त्यांच्या अभ्यासासंबंधीं माहिती विचारून, कोणते विषय, कसे व किती दिवस त्यांच्या ध्यानांत राहतात याविषयीं त्यांचेंच मत घेऊन लिहिलेली आहे. प्रिलिमिनरीच्या वेळीं दोन विषयांत पास झालेल्यांस बाकी दोन विषयांत कां नापास झालां असें विचारल्यास जें ठराविक उत्तर मिळतें तें हें कीं, " सर, तयारीस वेळ मिळाला नाहीं. " गेल्या तीन महिन्यांत जेवढे विषय वर्गांत झाले तेवढ्यांत ही परीक्षा झालीना ? व प्रश्नही सोपे होते ना ? " असें पुढें विचारितां, " होय, हे

विषय शिकवून झाले खरे, परंतु त्यांच्या तयारीस कोटें वेळ मिळाला ! " असें उत्तर येतें. या उत्तराचा अर्थ मर्मज्ञ वाचकाच्या सहज ध्यानांत येईल.

कालेजांतील शिक्षणाचें स्वरूप व त्या शिक्षणाच्या ग्राहकतेसंबंधीं मुलांची योग्यता ध्यानांत येण्यास एवढें विवरण बस्स आहे. या विवरणावरून असें दिसून येईल कीं, युनिव्हर्सिटीनें आक्तफर्ड व केंब्रिज यांच्या पद्धतीवर बी. ए. च्या डिग्रीकरितां नवीन परीक्षांची मालिका काढिल्यास कालेजांत येणाऱ्या एकंदर ब्राह्मण विद्यार्थ्यांपैकीं चतुर्थांश विद्यार्थ्यांचा पुष्कळ फायदा होईल; परंतु शेवटपर्यंत मजल न मारतां येऊन मध्येंच गळणारी बरीच मंडळी अखेरीस शिल्लक राहील यांत संशय नाहीं. ही स्थिति सुधारण्यास शाळांतील शिक्षणपद्धति सुधारणें हा एकच उपाय आहे.

६५. आतां युनिव्हर्सिटीच्या कर्तव्यांसंबंधानें आणखी एका प्रश्नाचा विचार करून हा भाग संपवितों. परीक्षा सोप्या करण्याकरितां युनिव्हर्सिटीनें कांहीं विषयांची परीक्षा देशी भाषेंत द्यावी असें कित्येकांचें म्हणणें आहे, व युनिव्हर्सिटीकडून देशी भाषांस मुळींच उत्तेजन मिळत नाहीं याविषयीं त्यांची तक्रार आहे. देशी भाषेंत परीक्षा घेण्यासंबंधानें विचार करितां ट्रेनिंग कालेजांचा अनुभव लक्षांत आणावा लागतो; व हा अनुभव विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीच्या संबंधानें पाहतां फारसा अनुकूल आहे असें कोणी म्हणणार नाहीं. मराठींत तयार केलेले शाळामास्तर कितपत हुशार, कितपत विचारी व कितपत शोधक आणि परिश्रमी असतात याविषयीं सर्वांस अनुभव आहेच; व त्यांच्या परीक्षेस नेमलेल्या विषयांची त्यांनीं पूर्वी कशी तयारी केलेली असते याविषयीं माहिती मिळविणें कोणासही दुरापास्त नाहीं. हल्लीं विद्यार्थ्यांची अशी स्थिति दिसते कीं, त्याजवळ पैसा नाहीं, त्यास उत्तम गुणी मनुष्य आपल्या कामीं ओढून घेतां येत नाहीं, व नवीन लागणारांपेक्षां जे लागलेले आहेत त्यांस सुखी कसें ठेवावें एवढाच विचार शिलक राहिला आहे. जे लागलेले आहेत ते कोणत्या स्थितीस येऊन पोहोंचले आहेत व लागत आहेत ते कोणत्या दर्जाचे आहेत याविषयीं पूर्वी अनेक ठिकाणीं उल्लेख आलाच आहे. आतां जर देशी भाषांतून कांहीं विषय उत्तम शिकवायाचे असें ठरलें व त्याच भाषेंत परीक्षा घेतल्या तर पहिला परिणाम जो होईल तो हा कीं हल्लीं ज्या योग्यतेचे शिक्षक ते विषय शिकवीत आहेत त्यांहून फार कमी योग्यतेचे शिक्षक तें काम आपणांकडे घेतील. शिक्षणपद्धतीचें स्वरूप लक्षांत आणितां हे शिक्षक अंगीं असलेली योग्यता क्रमानें गमावून कुचकामाचे होतील, व ते विषय हल्लीं जसे वेडेवांकडे शिकविले जात आहेत तसेही पुढें शिकविले जाणार नाहींत. जो काय फायदा होईल तो एवढाच कीं हल्लीं शिक्षण इंग्रजीमिश्रित देशी भाषेंत आरंभीं होतेंच, तें कदाचित् शुद्ध देशी भाषेंत होऊं लागेल. शिकणारापेक्षां शिक्षक थोडा अधिक जाणणारा असला म्हणजे झालें, हें तत्त्व हल्लीं पूर्णपणें अमलांत

लेलें आहे व या तत्त्वाअन्वयें सर्वत्र व्यवस्था झालेली आहे. ' अमुक विषयाचें उपयुक्त ज्ञान असलें ह्मणजे झालें, कोणत्याही भाषेंत कां तें दिलें जाईना ' असा जर कोणीं विचार सुचविला तर ही गोष्ट विद्याखात्यास एका दृष्टीनें इष्टच होईल. कारण माणसें कमी योग्यतेचीं व कमी पगाराचीं असलीं तरी चालतील. खासगी शाळांस तर हा विचार विशेषच सोईचा होईल, कारण देशी भाषेंत पाहिजे त्यास पाहिजे तें शिकवितां येईल असें साहजिकपणें गृहीत केलें जातें. शिवाय, जें स्वतःस समजत नाहीं तेंही पुस्तक पुढें असल्यास शिकवितां येतें असें शब्दांनींच नव्हे, तर कृतीनेंही स्पष्ट सिद्ध करून दाखविणारे शिक्षक हल्लीं सर्व शाळांतून सांपडतील. स्वस्त शिक्षणाच्या खासगी शाळांत त्यांचा भरणा अधिक आहे व ह्मणूनच त्या शाळांस या अशा सुधारणेमुळें विद्यादान अधिक स्वस्त करितां येईल व देशाभिमानी लोकांस ही स्थिति पाहून आनंद होईल !

यावरून असें लक्षांत येईल कीं, शिक्षणक्रमांत कोणीही माणसानें नवीन सुधारणा सुचविण्यापूर्वी प्रथम जो विचार केला पाहिजे तो हा कीं उद्दिष्ट हेतु साध्य करण्याचें काम कोणाकडे जावयाचें आहे व तो तें कशा प्रकारें सिद्धीस नेईल. विद्याखात्यांतून चांगलीं उत्कृष्ट माणसें नाहींशीं व्हावीं, विद्येच्या उत्तम उपकरणांची गरज लागूं नये, विद्यार्थ्यांस ज्ञानाची सीमा आकुंचित दिसावी व कमी योग्यतेचीं माणसें शिक्षकाचें काम करितांना पाहून ज्ञानाच्या महत्वाविषयीं त्यांच्या दुष्ट कल्पना व्हाव्या, असा ज्या सुधारणांचा व्यवहाररीत्या परिणाम होण्याचा संभव असेल त्या सुधारणा विद्येचा प्रसार इच्छिणारांनीं कदापि मनांत देखील आणूं नये.

युनिव्हर्सिटीनें देशी भाषांस उत्तेजन देणें झाल्यास तें वर सुचविलेल्या रीतीनें दिल्यास फार नुकसान होईल असें मला वाटतें, परंतु दुसऱ्या कोणत्या रीतीनें तें द्यावें हा विषय स्वतंत्र आहे; त्याचा येथें विचार करणें योग्य होणार नाहीं.

विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि वरिष्ट प्रकारचें शिक्षण सुधारण्याकरितां युनिव्हर्सिटींत खटपट करणारे उदार विचाराचे गृहस्थ, या सर्वांची हल्लीं मोठी विलक्षण स्थिति दिसते. वरिष्ट प्रतीचें शिक्षण देण्याच्या भरीस पालक कां पडतात हें पाहिल्यास असें दिसतें कीं, जितकें अधिक शिकावें तितकी अधिक मोठ्या पगाराची नौकरी मिळण्याचा संभव असतो किंवा अधिक द्रव्यप्राप्तीचा मार्ग होतो, हा विचार पालकांमध्यें प्रबळ असतो. कोणीही, पालक या दृष्टीनें, अधिक पहात नाहीं. विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें पहातां त्यांस विद्यार्जनानें दोन गोष्टी साध्य होतील असें वाटतें; ह्मणजे पालकानें चिंतिलेली द्रव्यप्राप्ति ही एक व आपली समाजांत प्रतिष्ठा वाढेल ही दुसरी. परंतु शिक्षणापासून या दोन फायद्यांखेरीज तिसरा कोणताही व्यावहारिक किंवा सामाजिक फायदा आहे किंवा परिणाम व्हावा, असें विद्यार्थी व पालक यांस कळत नाहीं व शिक्षक शिकवीत नाहींत.

हीं गोष्ट माझ्या मतें निर्विवाद आहे. या कारणानें वास्तविक पाहतां अशी स्थिति झाली आहे कीं, ज्यांस वरिष्ट प्रतीचें शिक्षण मिळालें आहे व ज्यांस तें मिळालें नाहीं, त्यांच्या आचारविचारांत लक्षांत येण्यासारखा फरक दिसत नाहीं. ग्रयाजुएट माणूस, त्याचा पांचवे इयत्तेंतील भाऊ व थोडें इंग्रजी शिकलेला उभयतांचा चाप या सर्वांचें, उत्तम आचार कोणते व उत्तम विचार कोणते याविषयीं एक मत झालेलें दिसतें. कुटुंबाच्या सुधारणेस विद्या कारण होत, असें हल्लीं दिसत नाहीं. ग्रयाजुएटांची विवेकशक्ति अधिक सूक्ष्म, माहिती अधिक विस्तृत, कल्पना अधिक थोर, विचार अधिक प्रगल्भ, महत्वाकांक्षा अधिक श्रेष्ट, व आचार, नीति आणि उद्योग अधिक श्रेयस्कर, असें कोणत्याही कुटुंबांत दिसत नाहीं. त्यामुळें जरी समाजांत आपली प्रतिष्टा अधिक आहे असें ग्रयाजुएट मानितात, तथापि त्यांस खालीं ओढणारे लोक हल्लीं इतके झाले आहेत कीं वरिष्ट शिक्षणाचा हा फायदा संशयात्मकच मानिला पाहिजे. जर वर्तमानपत्रांतील कोणताही वादविषयक मजकूर वाचल्यावर किंवा एखाद्या सभेची हकीकत ऐकिल्यावर सापांचिक मनुष्य, शाळेंतील मुलगा व विद्वान् ग्रयाजुएट एकदम एकच उद्गार काढितील, एकच निर्णय सांगतील, एकाच प्रकारच्या मानसिक सरणीनें जातील, तर वरिष्ट विद्येचा विशेष परिणाम नाहीं व त्या विद्येस विशेष मान मिळण्याचें कारण किंवा संभव नाहीं हें उघड आहे. मग ही विद्या निरर्थक झाली नाहीं काय ? ही स्थिति हल्लींच्या विद्वानांस आली आहे, असें लौकरच पुढें सविस्तर दाखविण्यांत येईल; व युनिव्हर्सिटींतील शिक्षणक्रमांत सुधारणा करूं इच्छिणारांच्या ती चांगली ध्यानांत घेऊनच त्यांनीं सुधारणेचे प्रयत्न आरंभिले आहेत. आतां ही स्थिति सुधारण्यास साधन कोणतें ? परीक्षा कमी करणें हें? कीं अभ्यास कमी करणें हें ? कीं पुस्तकें निराळीं नेमणें हें ? ही सुधारणा युनिव्हर्सिटीकडून होण्यासारखी तरी आहे काय ? माझ्या मतें युनिव्हर्सिटींत खटपट करून या कामीं कांहींच फायदा होण्याचा संभव नाहीं. दिव्याचा प्रकाश मंद पडूं लागल्यास त्यांतील तेल, वात व हवेचा पुरवठा बराबर आहे कीं नाहीं हें पहावें कीं त्याच्या लोलकांच्या संख्येचा व रंगांचा विचार करावा ! या प्रश्नाचें उत्तर कोणीही देईल; परंतु इतकेंही तारतम्य शिक्षणविषयक विचारांत दिसून येत नाहीं ! चालू शिक्षणपद्धतीनें मुलांच्या शरीरास व मेंदूस पहिल्यापासून कसें वळण लाविलें जातें, त्यांची शक्ति वाढत जाते कीं क्षीण होत जाते, ज्या पायावर विद्येची इमारत रचायाची तो हवा तसा बळकट तयार होतो कीं पोकळच राहतो, इत्यादि गोष्टींचा कोणीच विचार करीत नाहीं; परंतु ही इमारत अशी डळमळीत कां म्हणून छपर ठोकणाराशीं निकराचा वादविवाद सुरू आहे ! अल्पस्वल्प खर्चानें काडयामोडयांचें घर बढायाकरवीं घाईघाईनें बांधून झाल्यावर त्यापासून आम्हां ब्राह्मणांस केवळ निवाराच पाहिजे असतो असें नाहीं, तर

त्यावर हरतऱ्हेचे रंग खुलून लोकांनीं त्याकडे टकमकां पाहिलें पाहिजे, त्यापासून राजमंदिराचीं कित्येक वरिष्ट सुखें आह्मांस प्राप्त झालीं पाहिजेत व कांहीं दुरुस्तीवांचून आह्मांस व आमच्या पुढील पिढ्यांस त्याचा अक्षय्य उपभोग झाला पाहिजे ! हें कोणत्या युक्तीनें व्हावें ?

भाग ७ वा.

शारीरिक व मानसिक ऱ्हासाच्या कारणांविषयीं आणखी थोडा विचार.

६६. येथपर्यंत निबंधाचा जो ओघ आला त्यांत पुढील गोष्टी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. या गोष्टी सारांशानेंच येथें सांगतों ह्मणजे त्यांची पुनरुक्ति कोणास कंटाळवाणी होणार नाहीं. (१) ब्राह्मणजातीय नव्या तरुण पिढीचा शारीरिक ऱ्हास झाला आहे व होत आहे; (२) शारीरिक ऱ्हासावरोवरच मानसिक ऱ्हासही सारखा चालू आहे; (३) ह्या उभयविध ऱ्हासाचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं फार मोठें व फार प्रबळ कारण शाळांतील सांप्रतची शिक्षणपद्धति हें होय; (४) या पद्धतीमुळें व शारीरिक आवश्यकतांच्या अज्ञानामुळें शिक्षण, अभ्यास, विश्रांति आणि व्यायाम यांकडे दिलेल्या काळाचें योग्य नियमन होत नाहीं; (५) ही दुट पद्धति अनुकूल साधनें मिळून जों जों वळावत आहे तों तों ऱ्हासाचें प्रमाण वाढत आहे; व (६) या प्रकारें प्रारंभींच्या शिक्षणानें जें एकदां शरीराचें व मेंदूचें नुकसान होतें तें पुढें कोणत्याही उपायांनीं किंवा सुधारणांनीं भरून येत नाहीं.

या सर्व गोष्टी सिद्ध करण्याकरितां येथवर जीं प्रमाणें दिलीं तीं पूर्णपणें वस्तुस्थितीस अनुसरून आहेत. कोणाही शोधक माणसास त्यांचा हवा तेव्हां प्रत्यय घेतां येईल. वस्तुस्थिति वर्णन करितांना मुळींच अतिशयोक्ति केलेली नाहीं, असेंही अवलोकन करणारास दिसून येईल. जें थोडें अतिशयोक्तिरूप वाटेल तेंही केवळ चालू असलेल्या अतिनिंद्य प्रकाराचेंच यथावत् वर्णन आहे असें सर्वांच्या ध्यानांत येईल. परंतु अशा महत्वाच्या विषयांत कार्यकारणभावाचद्दल कोणाचीहीं एकदम खात्री होत नाहीं; ह्मणून वर सांगितलेल्या सर्व गोष्टींचीं दुसरीं कोणतीं कारणें भिन्न प्रकृतीच्या लोकांस सुचतात व या निबंधांत प्रतिपादिलेल्या कारणांस कोणते अपवाद येतात, त्यांचा थोडा विचार करावा आणि या विषयासंबंधानें जे थोडे प्रयोग करून पाहण्यांत आले आहेत त्यांचीही थोडी माहिती द्यावी असें या भागांत योजिलें आहे.

६७. सांप्रतच्या स्थितीवद्दल सर्वप्रकारें युनिव्हर्सिटीस दोष देणारे अनेक लोक आहेत; त्यांस जें उत्तर द्यावयाचें तें पूर्वी दिलेंच. त्यांशिवाय कांहीं लोक असे आहेत कीं ते वस्तुस्थिति पाहूनच घाबरलेले दिसतात व अत्यंत निराशेचे जे उद्गार ते त्यांच्या तोंडून ऐकूं येतात. "ब्राह्मणज्ञातीस ही पाश्चिमात्य विद्या श्रेयस्कर होत नाहीं; जे तीं प्राप्त करून घेतात ते प्रथम विद्वान् होतात खरे; परंतु त्या श्रमांत त्यांच्या अंगचें सर्व पौरुष नाहींसें होतें; त्यांची संतति रोगी व निर्बुद्ध होते; तीं पाश्चिमात्य विद्येकरितां तसेच पुढें श्रम करितें; तीस मागच्या पिढीइतकी विद्या तर प्राप्त होत नाहींच, परंतु अंगचें अवशिष्ट पौरुष मात्र अधिकच गमावतें; व याप्रकारें पिढीमागें पिढी क्षीण होत आहे. पाश्चिमात्य विद्येवांचून तर ब्राह्मणांस तरणोपायच उरला नाहीं; तेव्हां या विद्येपायीं या ज्ञातीचा समूळ नाश होणार व त्या नाशाची अवधिही फार लांब नाहीं!"

हे निराशेचे उद्गार थट्टेनें लिहिले आहेत असें कोणी समजूं नये. कित्येक विद्वान् लोकांनीं ते खऱ्या भावानें मनापासून काढिल्यावरून येथें दिले आहेत. आतां इंग्रजी विद्येंत पौरुषहानीचा कांहीं चमत्कारिक गुण आहे असें समजण्यास कोणतेंही कारण नाहीं. इकडे लोक ती विद्या शिकत आहेत व तिकडे त्यांचा ऱ्हास चालला आहे एवढें बघूनच केवळ उभयतांचा कार्यकारणभावसंबंध जुळविणें योग्य नाहीं. दुसरें असें कीं, शारीरिक व मानसिक हानि केवळ इंग्रजी विद्वानांच्या मुलांतच आहे असें नाहीं. शास्त्री व भिक्षुक घराण्यांतील कित्येक मुलें याच पिढीस इंग्रजी विद्येकडे वळलेलीं आहेत; त्यांचे वडील गतवीर्य झाले आहेत असें समजण्यास बिलकुल कारण नाहीं; परंतु तीं मुलें विद्वानांच्या मुलांप्रमाणेंच खुरटलेलीं आहेत. इंग्रजी न जाणणाऱ्या जुन्या चालीच्या कांहीं धिप्पाड गृहस्थांच्या घरांतही हाच प्रकार दिसत आहे, व तो केवळ ब्राह्मण जातींतच नाहीं, तर गुजराथी, कुणबी, कामाठी, अय्या, मुसलमान व पारशी यांमध्येंही आहे. या जातींतील कित्येक पालकांनीं व्यापारधंदा करून व श्रीमंत होऊन आणि इंग्रजीच्या अज्ञानानें नुकसान होतें असें पाहून आपल्या मुलांस विद्वान् करायाचें म्हणून त्यांस याच पिढींत इंग्रजी शिक्षणाच्या कडक अमलाखालीं दिल्याचीं उदाहरणें आहेत; व त्यांमध्येंही शारीरिक व मानसिक हानि दृष्टीस पडत आहे. तेव्हां ही हानि केवळ जातिभेदावर, किंवा धर्माचारांवर, किंवा खाण्यापिण्याच्या पदार्थांवर किंवा त्यांच्या विपुलतेवर अवलंबून नाहीं असें कोणाच्याही ध्यानांत येईल. ज्यास या गोष्टीचा प्रत्यय पाहणें असेल त्यानें मुंबईच्या एल्फिन्स्टन् हायस्कूलच्या मराठी व गुजराथी अशा दोन्ही शाखांचे एकाच इयत्तेचे वर्ग जाऊन पहावे. त्या वर्गांत कोणत्याही रीतीनें एक दुसऱ्याहून चढ दिसणार नाहीं, व सर्व जातींचें सांप्रतच्या शिक्षणपद्धतीखालीं सारखें पेषण चाललें आहे असें त्याच्या ध्यानांत येईल. हीच गोष्ट दुसऱ्या कोणत्याही हायस्कुलांत

जीं थोडीं इतर जातीचीं मुलें असतात तीं पाहून लक्षांत येईल. आतां ब्राह्मण-जातीच्या व इतर जातीच्या तरुणांत जो भेद दिसतो, तो हल्लीं कालेजांतील शेवटची परीक्षा देऊन जे नुकतेच बाहेर पडत आहेत त्यांमध्यें थोडा आहे, व तो उत्पन्न होण्याचीं कारणें निराळीं आहेत. जे घरचे श्रीमान्, ज्यांस चढाओढीस लावण्याच्या भरीस शिक्षक कधींच पडले नाहींत, ज्यांस एकों इयत्तेंत असलें काय किंवा दुसऱ्या इयत्तेंत असलें काय त्याबद्दल लहानपणीं शाळेंत फिकीर वाटलेली नाहीं, जे बहुधा प्राथमिक शाळांच्या क-चाट्यांत मुळींच सांपडले नाहींत, व ज्यांनीं खुशालचंदपणें हळू हळू बुद्धीचा उदय होईल तसा युनिव्हर्सिटीचा मार्ग क्रमिला, अशांवर जर हे ऱ्हासा-चे परिणाम दिसले नाहींत तर त्यांत नवल काय ? श्रीमंत किंवा दरिद्री कोणाही ब्राह्मणास अशा मिजासीनें विद्या संपादन करण्याचें साधत नाहीं, ह्मणून ब्राह्म-णाचा ऱ्हास निश्चितपणें होतो; परंतु इतर जातींतील सामान्य स्थितीच्या ज्या विद्यार्थ्यांस ब्राह्मणांप्रमाणेंच परीक्षांतून केव्हां एकदां बाहेर पडूं असें होतें, त्यांवर ऱ्हासाचे परिणाम दिसल्यावांचून राहत नाहींत. या गोष्टीचीं खुद्द मुंबईंत हवीं तितकीं उदाहरणें दाखवितां येतील; व या बाबतींत पार्शीलोक ब्राह्मणांपेक्षां बऱ्या स्थितींत आहेत अशी जी समजूत आहे ती हल्लींच्या पूर्वी वर्णिलेल्या शिक्षणक्र-माखालीं असलेल्या गरीब पार्शांस लागू नाहीं.

इतर जातीचे सर्वच तरुण लोक विद्याव्यासंगी नाहींत, व जे नाहींत त्यांवर शिक्षणाचे दुष्ट परिणाम घडतही नाहींत. ज्यांवर ते घडतात त्यांशीं या इत-रांचें मिश्रण झाल्यानें ते परिणाम कांहींसे झांकले जातात. कांहीं थोड्या वर्षां-पर्यंत बोलण्याचालण्यापुरतें इंग्रजी शिकून नंतर व्यापारांत, उद्योगांत, कारखा-न्यांत किंवा नोकरीवर जाणारे इतर जातीचे तरुण लोक फार आहेत; हे लोक थोडे सुखी होतांच पोषाख, रीतभात, संभाषण व वागणूक या सर्वांनीं विद्वाना-सारखेच दिसूं लागतात; व मग त्यांस ओळखतां न आल्यामुळें 'ब्राह्मण मनुष्य चकून म्हणतो कीं ही जात कशी चांगली राहिली व आपणच कां खालीं चाललों. शोधक माणसानें याहून अधिक सूक्ष्म अवलोकन करून विद्याप्राप्तीकरितां को-णाची किती उत्सुकता व घाई आहे व त्याच्या ऱ्हासाचें प्रमाण काय आहे हें पाहिल्यास मुळाशीं ऱ्हासाचें एकच प्रमुख कारण दिसेल असें मला वाटतें. आई सुशिक्षित, बाप सुशिक्षित, धर्मपंथ उत्तम, घरचें वळण चांगलें इत्यादि गोष्टी प्रबळपणें आपलीं कार्यें कोणत्याही जातींत अद्यापि करूं लागलीं नाहींत; व नि-दान एकाच शाळेंत शिकणाऱ्या भिन्नजातीय विद्यार्थ्यांवर त्यांमुळें भिन्न परि-णाम दिसावे, इतकें ज्ञान व इतकी व्यवस्था अद्याप कोणत्याही जातीच्या कुटुं-बांत उत्पन्न झालेली नाहीं. कोणत्याही जातीच्या शेंकडा पांचचार कुटुंबांत जरी ती उत्पन्न झालेली असली तरी तेवढ्यावरून कोणी चकून जाऊं नये. पार्शी,

मुसलमान, गुजराथी वगैरे जातींची हल्लीं ब्राह्मणांवर जी सरशी दिसते तीवरून मनुष्य चकण्याचा संभव आहे. परंतु ब्राह्मणांमध्यें व या दुसऱ्या जातींमध्यें जें अंतर उत्पन्न होत आहे, त्याचें कारण निराळेंच आहे.

६८. ब्राह्मण विद्यार्थ्यांमध्यें आणि ब्राह्मणेतर इतर सर्व विद्यार्थ्यांमध्यें एक मोठा भेद आहे. इतर विद्यार्थ्यांमध्यें एक प्रकारची विरोध करण्याची शक्ति आहे ती ब्राह्मणांत नाहीं. इतर विद्यार्थ्यांस जेव्हां जिवापाड अभ्यासाचा जाच होतो तेव्हां ते बहुधा पुस्तकें फेकून देऊन मोकळे होतात; मग झालेल्या विद्येवरच मिस्त्रीची, कारकुनाची, कंपाझिटरची, शिपायाची, जी कोणती जागा मिळेल तीं ते पतकरितात. यामुळें थोडेंबहुत शिकलेले इतर जातीचे लोक निरानिराळ्या धंद्यांत जाऊन पडलेले आहेत व ते म्हणण्यासारखे शरीरानें ऱ्हास पावलेले नाहींत. परंतु ब्राह्मण मुलांस घरींदारीं एकच एक विद्या दिसत असते; त्यांमध्यें वर सांगितल्या प्रकारची विरोधशक्ति असली तरी ती कायम रहात नाहीं. त्यांवर दाब लागतां लागतां तीं अखेरीस त्या दाबाखालीं चिरडून जातात; त्यांच्या अंगचें पाणी जातें, वं कोणी फुकाचें पोटास घालील तर असाध्य विद्येच्या साधनाकरितां ते किती दिवस श्रम करितील हें सांगवत नाहीं. कांहीं लोक वकीलीच्या परीक्षेस जातां जातां म्हातारे झाले असें सांगतात; कांहींनीं एकाच परीक्षेच्या पांच, सात, दहाचाऱ्या केलेल्या पाहण्यांत आहेत. एकदा अतिश्रमाविषयींचा मनाचा साहजिक विरोधभाव गेल्यावर, मनास जो लोचटपणा येतो, जें निष्फळ दीर्घसूत्रित्व अंगीं भरतें, तें मनुष्याच्या आयुष्यक्रमांत अनिवार्य कारणांनीं फरक पडल्याखेरीज नाहींसें होत नाहीं. याप्रमाणें ब्राह्मण विद्यार्थ्यांची स्थिति असल्यामुळें त्यांचा जसा झपाट्यानें ऱ्हास होत आहे तसा इतरांचा चाललेला नाहीं; व तो अन्यदेशांतही पडून यावयाचा नाहीं.

अन्यजातीय विद्यार्थ्यांस, विशेषतः कुणबी, मुसलमान वगैरे जातींच्या मुलांस नादारी, स्कालर्शिपा, बक्षिसें, वगैरे देऊन सांप्रतच्या शिक्षणपद्धतीच्या अमलाखालीं आणण्याचा विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांचा दीर्घ प्रयत्न सुरू आहे. सर्व शाळामास्तरांस व मुनिसिपालिट्यांस त्यांची जाचणी लागून राहिली आहे; त्यांस वाटतें ब्राह्मण शिक्षक या अन्यजातीय मुलांस निरुत्साह करीत असतील. परंतु खरें इंगित त्यांस कळत नाहीं. कलम १६ मध्यें सांगितल्याप्रमाणें हीं अन्यजातीय मुलें आपण होऊनच शाळांतून व कालेजांतून पळ काढितात. वर्गाच्या शेवटच्या बाकावर नित्यनित्य बसून जर त्यांची नादारी, स्कालर्शिपा, वगैरे कायम राहिल्या तर ते लहानपणीं कांहीं दिवस शाळेंत टिकतात; त्यांचें ज्ञान वाढतें कीं नाहीं याची शंकाच आहे. परंतु मोठेपणीं हाडांच्या काड्या करून आपले स्नायु कवडीच्या मोलाचे करून घेण्यास ते कबूल नसतात. कारण निरानिराळ्या धंद्यांत शिरून चांगली अंगमेहनत केल्यास त्यांस विद्वान् ब्राह्मणांइतकें वेतन मिळतें, ब्रा-

ह्मणांस जें करवत नाहीं किंवा साधत नाहीं तें या अन्यजातींस साधतें, ह्मणूनच त्यांचा वरिष्ट विद्येकडे ओढा कमी. आतां अशा या जातींपैकीं जे घरंदाज आहेत व मिजासींनें राहून अभ्यास करण्याची ज्यांस ऐपत आहे, ते मात्र वरिष्ट शिक्षणाच्या शेवटास उत्तम प्रकारें जातात. त्यांमध्येंच विद्वान्, विचारी, व जातींचे पुढारी सांपडतात. बाकीचे जे थोडे मोठ्या मागाकुटीनें धीर देऊन देऊन परीक्षांच्या तडीस नेऊन पोहोंचवावें लागतात, त्यांमध्यें शरीराच्या व मनाच्या ऱ्हासाचे सर्व दुष्परिणाम दिसतात. दुर्बळपणा, अल्पदृष्टि, मत्सर, आळस वगैरे त्यांचे कित्येक दुर्गुण ऱ्हासमूलक होत. जसे हल्लींचे ब्राह्मण विद्वान् स्वतःच्या ज्ञातीच्या प्रक्रमास उपयोगी पडेनासे झाले आहेत, तशीच या अन्यजातीय विद्वानांची स्थिति होते, किंबहुना त्यांस कांहीं अंशीं ब्राह्मणत्वच येतें.

वर सांगितल्या वस्तुस्थितीवरून पाहतां आजच ब्राह्मण गतपौरुष झाले आहेत असें निराशेनें ह्मणणें कोणासही योग्य होणार नाहीं. ऱ्हासाचीं जीं मुख्य कारणें आहेत तीं प्रतिकार्य आहेत, व त्यांचा प्रतीकार होईल तितक्या लवकर करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. जर आपण प्रतीकार करण्याचें सोडून देऊन शुद्ध वाचाळपणा व दुराग्रह धरून बसलों तर मात्र थोडया वर्षांत या चालू ऱ्हासाचा प्रतीकार करणेंही अवघड होईल; व त्याचा पाया पुरा पडेपर्यंत थांबल्यानें तो जातिनाशासही कारण होईल.

६९. सांप्रतच्या शिक्षणपद्धतीस दोष दिलेला ज्यांस खपत नाहीं ते असा एक अपवाद काढतील कीं, " अहो, आह्मीही याच पद्धतीनें पूर्वी शिकत नव्हतों काय ! जी पद्धति वीस वर्षांपूर्वी आम्हांस बाधली नाहीं ती आतांच आमच्या मुलांस कां बाधावी ! तेव्हां आमच्या संततींत दिसणाऱ्या ऱ्हासाचें हें कारण नंसावें. " याप्रमाणें अपवाद काढणारांस उत्तर देणें सोपें आहे. पूर्वी २९वे कलमांत सारांशानें हें उत्तर दिलेलें आहे; त्याचाच येथें थोडा विस्तार करितों.

अपवाद काढणारांनीं प्रथम असा विचार करावा कीं ते मराठी शाळेंतच किती वयापर्यंत शिकत होते व कितवे वर्षीं इंग्रजीच्या अभ्यासास लागले. सामान्यतः हल्लीं मुलें मराठी चौथी इयत्ता शिकून ज्या वयांत बाहेर पडतात, व इंग्रजीच्या अभ्यासास लागतात त्याहून दोन चार वर्षें अधिक वय झाल्यावर ते इंग्रजी शाळेंत गेलेले असावे. जुने शिक्षकलोक अद्यापिही सांगतील कीं इंग्रजी पांचव्या इयत्तेंतच लठ्ठभारती मिशाळ विद्यार्थी त्या वेळीं दृष्टीस पडत होते, व त्यांच्या अनेक खोड्यांबद्दल त्यांस शिक्षा देणें शिक्षकांस फार कठीण होई.

दुसरें असें लक्षांत आणावें कीं, त्या वेळचे पालक शाळेंतील शिक्षणाबद्दल गैरमाहीत व उदासीन असत. मुलांस लवकर अभ्यास संपविण्याबद्दल उत्तेजन किंवा शिक्षा देणारे त्या वेळीं फार थोडे होते, व मुलास बरऱ्या इयत्तेंत घाला असें हेडमास्तरास क्वचितच कोणी सांगायास जात असेल. 'अरे, शाळेचा अभ्यास केला

का ?' असें मुलास विचारून त्यानें ' होय ' असें उत्तर दिलें ह्मणजे पालकांचें समाधान होई, व शाळेच्या सबबीवर स्वातंत्र्य घेऊन काय पाहिजे तें करण्यास व पालकांस हवा तो खर्च पाडण्यास मुलें भीत नसत. विद्या स्वल्पांत होते ही गोष्ट त्या वेळच्या पालकांस माहीत नव्हती; व हें विद्येचें काम ह्मणजे खर्चाचें आहे, तें आपल्या हातून कशाचें होतें असें समजून पुष्कळ पालक पांचव्या इयत्तेंत मुलगा येतांच त्यास नोकरीवर चिकटावून देत, किंवा ओव्हरसियरच्या, कांपाउंडरच्या किंवा शुद्ध उमेदवारीच्या कामाकडे त्यास लावून देत. अशी त्या-वेळचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. व पांचव्या इयत्तेंतच मुलें इतकीं वाढलेलीं असत कीं तीं अशा कामांस लायख होत. मुलाचें अक्षर कसें काय आहे हें पालकांस महत्वाचें वाटून त्याबद्दल मात्र ते चौकशी करीत. इंग्रजी शाळेंत जाणारांस मराठी मोडी अक्षर शिकविणाऱ्या या पुणें शहरांत त्या वेळीं पुष्कळ शाळा होत्या, त्यांत सकाळीं जाऊन मुलें अक्षर वळवीत. या शाळा हल्लीं सर्व नाहींशा झाल्या आहेत. कारण कोणत्याच अक्षराचें महत्व पालकांस वाटेनासें झालें आहे व शिवाय सकाळीं शाळेचा अभ्यास सोडून मोडी अक्षर वळविण्यास कोण जातो !

७०. त्या वेळच्या शिक्षणासंबंधानें तिसरी गोष्ट ध्यानांत ठेवायाची ती ही कीं, मुलांकडून अभ्यास कसा करवून घ्यावा हें शिक्षकांस आतांप्रमाणें समजत नव्हतें, व तो करवून घेण्याचीं विपुल साधनेंही नव्हतीं. ज्यास जो मार्ग सुचे त्या मार्गानें तो अभ्यास करी, व तो सर्व अभ्यास घोकंपट्टीचा असे असेंही नव्हतें. त्या वेळीं जे लोक मराठी शाळेंत शिकत होते, त्यांनीं घरीं दोन तीन तास बसून यथेच्छ उंच स्वरानें ज्या दिवशीं घोकलें असे वर्षाच्या दोनशें साठ शाळा भरण्याच्या दिवसांपैकीं किती दिवस असत ! त्या वेळीं तालुक्याचे व जिल्ह्याचे भूगोल व अर्थान्वयाचीं व इतर शेंकडों पुस्तकें कोठें होतीं. तसेंच इंग्रजी शिकत असतां वर्षांतील दोनशें वीस दिवसांपैकीं रात्रीं व सकाळीं मन लावून अभ्यास केला असे सहाव्या इयत्तेंत येईपर्यंत किती दिवस असत ! अभ्यासाचा कांच काय तो इंग्रजी सहाव्या इयत्तेंत असतां प्रथम वाटूं लागे, व तो सातव्या इयत्तेंत फार होई; परंतु तेथपर्यंत तो मुळींच जाणवत नसे. याप्रमाणें त्या वेळीं सामान्यतः स्थिति असे. गरीबांचा अभ्यास बहुधा म्याट्रिक्युलेशन परीक्षेच्या पुढें होत नसे, व त्या परीक्षेस ज्या वयाचे विद्यार्थी घेतले जात असत त्याहून सर्वांचें वय दोन चार वर्षांनीं अधिकच असे. बुद्धिमान् मुलें त्या वेळीं शिक्षणक्रमांतून फारच थोडे श्रम करून बाहेर पडत; त्यांस परीक्षेकरितां घोकायाचीं अशीं फारच थोडीं पुस्तकें होतीं; व इंग्रजी सुधारण्यास पुष्कळ वाचणें आणि गणित सुधारण्यास पुष्कळ उदाहरणें सोडविणें, याखेरीज दुसरा उपाय असेल ही गोष्ट शिक्षकांसही त्या वेळीं माहीत नव्हती. आडम्, आर्नोल्ड वगैरे दोन तीन ग्रंथ व्याकरणावर आहेत, व ते वाचले पाहिजेत इतकेंच त्या वेळीं वि-

द्यार्थ्यांस माहीत होतें; व गणितादि विषयांत 'थियरी' किंवा उपपत्ति पाठ करावी लागते, हें त्यांस कालेजांत जाण्यापूर्वी मुळींच माहीत नसे. आपल्या स्वतंत्र वाचनानें आपले अभ्यास सुधारायाचे, याशिवाय दुसरे सुलभ मार्ग नाहींत, ही जशी त्या वेळीं समजूत असे तशी हल्लीं कोठें आहे. घोकंपट्टीस त्यावेळीं जो मुख्यत्वें आरंभ होई तो कालेजांत गेल्यावर, परंतु तेथेंही परीक्षेची तयारी करण्यास पुष्कळ ग्रंथ वाचावे लागतात, व त्यांच्या नोटा स्वतः काढाव्या लागतात व त्या तयार केल्या ह्मणजे परीक्षेंत पास होतां येते, अशी प्रत्येकाची समजूत असे. त्या वेळच्या लोकांचा नोटा काढण्यांत किती वेळ जाई, त्या नोटा कशा परंपरेनें पुढील विद्यार्थ्यांस मिळत, वगैरेबद्दल पूर्वीच्या ग्रचाजुएट्रांस अद्यापिही आठवण असेल. हल्लीं विद्यार्थ्यांनीं अवांतर पुस्तकें वाचून स्वतः काढिलेल्या नोटा सांपडणें कठीण, परंतु अमक्या प्रोफेसरच्या नोटा, तमक्या प्रोफेसराच्या नोटा, वगैरे मिळून त्यांजवळ मोठा भारा सांपडेल. अभ्यासाच्या कामीं आत्मावलंबन त्या वेळीं जितकें असे तितकें हल्लीं नाहीं; व ज्यामध्यें तें त्या वेळीं नव्हतें ते नापास होत जाऊन मध्येंच कालेज सोडून जात. परंतु हल्लीं चालू शिक्षणपद्धतीनें मुलांसच नवीन वळण लाविलें आहे असें नाहीं, तर कालेजांतील विद्वान् प्रोफेसरांसही तिनें वांकवून टाकिलें आहे; व पूर्वी वर्डस्वर्थ वगैरे प्रसिद्ध प्रोफेसरांनीं न केलेले श्रम त्यांस हल्लीं ही पद्धति करायास लावीत आहे. या माझ्या छापील नोटा तयार करा, ह्मणजे मला हें पुस्तक शिकविण्याची गरज उरणार नाहीं, असें कोण प्रोफेसर त्या वेळीं ह्मणूं शकला असता? नमलेल्या पुस्तकाच्या अखेरीं दिलेले प्रश्न किंवा उदाहरणें छापील पुस्तकाच्या द्वारें सोडवून दाखवून मुलांचे स्वतः विचार करण्याचे श्रम दूर करण्याचें कोणीं पतकरिलें असतें! आपल्या नोटा तयार होत येतांच तें पुस्तक युनिव्हर्सिटींत नेमून घेण्याची त्या वेळीं कोण खटपट करीत होता! व जगांतील कोणत्याही विषयावर निबंध लिहिण्याची माहिती व नियम मुलांस पुरवून हें काम देखील, सिंगरच्या शिवण्याच्या यंत्रानें केल्याप्रमाणें, अल्पायासानें कसें होतें याविषयीं कोणत्या प्रोफेसरानें त्या वेळीं पुस्तक प्रसिद्ध केलें असतें! असो; यावरून जी एक गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं, विद्यार्थ्यांच्या अंगचें सर्व आत्मावलंबन नष्ट करून निरर्थक मानसिक श्रमांचा बोजा वाढविण्यास हल्लीं जीं अनेक कारणें उत्पन्न झालीं आहेत तीं त्या वेळीं नव्हतीं, व ह्मणून पुरुष कांहीं तरी पराक्रमी होई व त्याची कर्तबगारी कालेजांतून बाहेर पडतांच संपत नसे.

त्या वेळच्या व हल्लींच्या शिक्षणासंबंधानें जी चवथी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, या वीस वर्षांत शिक्षकांमध्येंही पुष्कळ अंतर पडलें आहे. त्या वेळीं मराठी किंवा संस्कृत पाठशाळेंत शिकलेले गृहस्थ मराठी शाळांचे हेडमास्तर असत, व त्यांच्या विद्वत्तेबद्दल चरीच ख्याति असे. मुलांस काय यावें

चावद्दल त्यांची समजूत बरीच प्रौढ असे, व मुलांस तें आपोआप येणार नाहीं असें जाणून ते पुष्कळ अवांतर माहिती स्वतः सांगत, व मुलांकडून ती लिहून घेववीत. त्यांशिवाय जे दुसरे शिक्षक असत ते पढीव नसत; ह्मणजे ते स्वतः घोकंपट्टीच्या अमलांत तयार झालेले नसत; कांहीं विशेष कारणानें विद्याखात्यांत शिरलेले कोणी तरी लोक ते असत. हल्लीं ट्रेनिंगांत तयार झाल्याखेरीज मराठी शाळेवर कोणाची नेमणूक होत नाहीं; व ट्रेनिंग कालेजचा अभ्यास हे होतकरू शिक्षक कसा करितात, याविषयीं चौकशी केल्यास ते मुलांस पुढें कसें शिकवितील या विषयीं संदेह राहत नाहीं. या शिक्षकांस दिलेलें शारीरिक शिक्षण त्यांस कितपत फलद्रूप होतें, व त्यांची चर्या व शक्ति कशी काय असते हें पाहिल्यास, इंग्रजी भाषा न शिकतां मानसिक अतिश्रम माणसास करितां येतात, शरीरास व मेंदूस क्षीण करण्याचे शुद्ध मराठी मार्गही आहेत, व ते योजण्याच्या कामीं भावी शिक्षकांच्या शिक्षकांनीं बरेच श्रम घेतलेले आहेत असें दृष्टीस पडतें. पूर्वीचे शिक्षक हल्लींपेक्षां किती कमी योग्यतेचे होते, व हल्लींची शिक्षणपद्धति पूर्णपणें अमलांत आणण्यास ते किती नालायक होते, हें त्यांस मिळत गेलेल्या बढतीवरूनच दिसून येतें. जे शिक्षक पूर्वी इंग्रजी पांचवी किंवा सहावी इयत्ता शिकवीत असत, ते हल्लीं ढासळत ढासळत पहिल्या दुसऱ्या इयत्तेवर येऊन पोहोंचले आहेत. कित्येकांस शिक्षणाच्या कामांतून सोडवून डेपुटींच्या हाताखालीं दिलेलें आहे; व कोणीही जुना शिक्षक इंग्रजी शाळेंत फार दिवस राहिला असून खालीं घसरल्यावांचून नाहीं. मराठी शाळांतील अवशिष्ट जुन्या शिक्षकांची अशीच घसरगुंडी झालेली आहे; व जुने शिक्षक खालच्या इयत्तांवर किंवा मुलींच्या शाळांत असिस्टंटच्या जागांवर नेमिले गेले आहेत. तेव्हां शिक्षकांतही हा जो मोठा फेर झाला आहे त्याचे परिणाम लक्षांत घेतले पाहिजेत. या परिणामांचा विचार करितां असें दिसतें कीं, हल्लीं ज्या शिक्षकांनीं शिक्षणाचें काम हातीं घेतलें आहे, ते हल्लींच्याच पद्धतीनें शिकलेले आहेत. या कारणानें त्यांस तिची जशी माहिती, जसा अनुभव, जितका तिजविषयीं अभिमान व ती पूर्णपणें अमलांत आणून तिचें उत्कृष्ट फल लवकर साध्य करून देण्याचा जितका उत्साह आहे, तितका त्या पूर्वीच्या शिक्षकांमध्यें नव्हता. ही एक गोष्टही त्या काळांत व हल्लींच्या काळांत फार मोठा फरक उत्पन्न करण्यासारखी आहे.

७१. याशिवाय पांचवी गोष्ट लक्षांत आणायाची ती ही कीं, मानसिक श्रमांची इयत्ता असावी तीपेक्षां एक तासानें जरी वाढली तरी तेवढ्यानेंही ते श्रम करणारांच्या शरीरवृद्धीस थोडा अपाय होईल. ती दोन तासांनीं वाढल्यास त्याहून अधिक अपाय होईल; व सामान्यतः, शरीरवृद्धीस अपाय करणारें कारण ज्या प्रमाणानें अधिक असेल त्याच प्रमाणानें त्याचें कार्यही अधिक स्पष्टपणें प्रकट होईल. मानसिक श्रमांची इयत्ता एकदम वाढलेली नाहीं, वर सांगितलेले फेरफार हळू हळू वर्षा-

नुवर्ष होत आलेले आहेत, व त्याच प्रमाणानें वर्षानुवर्ष ऱ्हासाचें प्रमाण वाढत वाढत आलेलें आहे; ह्मणूनच तीन तीन वर्षांच्या अंतरानें जे चालू शिक्षणक्रमांतून गेले त्यांच्या शरीराच्या वाढींत क्रमानें अधिकाधिक न्यूनता आलेली दृष्टीस पडते, असें एकाच घरच्या मुलांचें उदाहरण घेऊन दाखविलें. चेर आतां असा विचार करूं कीं जीं मुलें त्या पूर्वीच्या काळीं मराठी व इंग्रजी शाळेंत असतांना अतिरिक्त अभ्यास करीत होतीं, व त्यायोगें शाळांतून पहिला नंबर ठेवीत होतीं, त्यांची हल्लीं काय स्थिति दृष्टीस पडत आहे ? त्यांच्या बुद्धीस अल्पवयांत भरती येऊन तीं अस्तंगत मागें पडलेलीं नाहींत काय ? त्यांवर तरी त्या वेळींही असा परिणाम झाला असावा. पुष्कळ मध्यमवयांतील विद्वान् गृहस्थांस आपले शाळेंतील सहाध्यायी आठवत असतील व त्यांपैकीं जे पहिला दुसरा नंबर ठेवून फार हुषार ठरलेले होते तेही कदाचित् त्यांच्या ध्यानांत येतील. तशांची मजल कोठपर्यंत जाऊन पोहोंचली, ते हल्लीं कोणतें काम करीत आहेत, व बुद्धीविषयीं त्यांचा लौकिक कसा काय आहे, ते शरीरानें दुर्बळ होऊन रोगांनीं गांजलेले आहेत किंवा अल्पायुषी मरण पावले आहेत, इत्यादि गोष्टींचा त्यांनीं विचार केल्यास चालू शिक्षणपद्धतीनें मानसिक अतिश्रम ज्यांस झाले त्यांवर त्या पूर्वीच्या काळींही दुष्परिणाम घडत असत असें दिसून येईल.

शेवटची आणखी एक गोष्ट जी लक्षांत ठेवायाची ती ही कीं, जी पद्धति दुष्ट असते ती जितकी पूर्णावस्थेस येईल तितके तिचे दुष्परिणाम वाढत जातात. हल्लींची शिक्षणपद्धति प्रथमदर्शनींही दोषी आहे, परंतु ती पूर्वी जेव्हां अर्धी कच्ची अमलांत होती तेव्हां तिचें शिक्षकांकडून जेवढें उल्लंघन किंवा हेळसांड होई, तितके तिचे दुष्परिणाम कमी होऊन उलट चांगल्या पद्धतीचें स्वरूप तीस येई. परंतु शिक्षकांस तिचें जसजसें मर्म कळत गेलें, तसतसें तिचें उल्लंघनही कमी होऊं लागलें, व तिच्या दुष्परिणामांचा पगडा जोरानें चमूं लागला. क्रमानें तीस अनुकूल अशीं साधनें हरएक विषयांत उत्पन्न होत गेलीं; शिक्षकही त्याच पद्धतीनें अव्वलपासून अखेरपर्यंत शिकलेले व थकून भागून शिक्षकाच्या धंद्यास लागलेले जिकडे तिकडे भरूं लागले; इतर कांहीं विशेष चांगली शिक्षणपद्धति असेल ही कल्पनाही नष्ट होत चालली; व चालू पद्धतीस पूर्णावस्था आणण्याचें मोठमोठ्या प्रमुख संस्थांनीं हातीं घेतलें. अशा या क्रमामुळें या पद्धतीनें मुलांचें नुकसान होत असेल असें शिक्षकांच्या किंवा पालकांच्या ध्यानींमनींही येण्याचा संभव उरला नाहीं. मानसिक व शारीरिक ऱ्हास मात्र सर्वत्र दिसूं लागला, व जो तो आपापल्या मनाच्या प्रवृत्तीप्रमाणें त्याचीं निरनिराळीं कारणें देऊं लागला. खेरीज गवाळें व घरभर सांथीत आहे, अशा भ्रांतिग्राह्यप्रमाणें हल्लीं समाजाची स्थिति झालेली आहे. मद्यपानाच्या दुर्व्यसनास लागलेला मनुष्य जसा एक, दोन, पांच, दहा घोटांची परवा करीनासा होतो, जो नादीं न सांपडेल त्यास जसा त्याचा

आग्रह सुरू असतोच, त्यास त्या दुर्व्यसनाचे कोणतेही दुष्परिणाम असतील अशी कल्पनाच जशी येत नाहीं, त्याप्रमाणेंच स्वतःच्या धंद्यास व योग्यतेस येत असलेला कमीपणा व स्वतःच्या बुद्धीचा व कर्तृत्वाचा झालेला व होत असलेला ऱ्हास, नवीन शिक्षकवर्गाच्या ध्यानांत येईनासा झाला आहे. ज्या अभ्यासाचे अहोरात्र घुटके मारून आपण हे असे तयार झालों, त्याच अभ्यासाचे विद्यार्थ्यांस दोन अधिकच घुटके दिले तर ते किती फक्कड तयार होतील, या उमेदींतच हा नवीन शिक्षकवर्ग आहे ! व सुरापानाहून अभ्यासदानाचे दुष्परिणाम अधिक घोर व अधिक अजरामर करण्याची ईर्षा बाळगीत आहेत ! आंग्लविद्या आठ आणे खंडी प्रमाणें विकण्याचीं दुकानेंही तशींच वाढत आहेत; कारण हल्लींच्या शिक्षणपद्धतीचें ज्यांनीं खरें मर्म ओळखिलें असें लोक विद्यावृद्धीचें सोपें व लौकिकाचें काम हातीं घेत आहेत. त्यांचें ज्ञान अल्प, विचार कोते, वर्तन अप्रशस्य व दुसऱ्या कोणत्याही कामीं उपयोग किंवा लायकी नाहीं. असें असतां हें विद्यादानाचें काम मात्र त्यांस अप्रतिमपणें करितां येत आहे अशाविषयीं विद्वानांत गणना होण्यासारख्या माणसांचीं त्यांनीं सर्टिफिकिटें संपादन केलीं आहेत. विद्यावृद्धीचें कोलीत शुद्ध मर्कटांच्या हातीं दिलें असतां त्यांच्या नैसर्गिक चेष्टांनीं जी आग लागेल व जो प्रकाश पडेल तो या विद्वानांत गणना होणाऱ्या माणसांनीं पाहिल्यास ते चकित होऊन हर्षाच्या व आश्चर्याच्या भरांत नाचूं लागतील व " शिक्षणाची ईश्वरी देणगी, दुसरें काय ? " असे उद्गार काढतील यांत संशय नाहीं !

असो. या सर्व गोष्टींवरून एकाच पद्धतीनें शिकविलेल्या विद्यार्थ्यांमध्यें वीस पंचवीस वर्षांच्या अंतरांत केवढा फरक पडूं शकेल, व पडला आहे, हें कोणाच्याही लक्षांत न येईल, व या निबंधांत प्रतिपादिलेल्या सिद्धांतांस घेतलेला हा अपवाद मुळींच त्यास बाधक होत नाहीं असें वाचकांच्या लक्षांत येईल. आतां कोणी विचारील कीं अशीच पद्धति दुसऱ्या कोठें चालू आहे काय ? या प्रश्नाचें निश्चयात्मक उत्तर देणें कठीण आहे. इंग्लंडांत ज्या शाळांत अशी शिक्षणपद्धति थोडीही चालू आहे व घरच्या अभ्यासाचें त्यामुळें मुलांवर निःसीम ओझें होतें, तेथें असेच दुष्परिणाम घडलेले पुष्कळांनीं वर्णिलेले आहेत. प्रशिया, डेन्मार्क, वगैरे ठिकाणीं विद्येचे असेच दुष्परिणाम दिसूं लागतांच तेथील राज्यकर्त्यांनीं कमिशनें नेमून चौकशी करविली व कमिशनरांनीं सुचविल्या प्रकारच्या सुधारणा ताबडतोब अमलांत आणिल्या. एतद्देशीय विद्याखात्यानें किंवा सरकारानें अशी चौकशी करून कांहीं उपाय योजण्याची आतां वेळ आली आहे, असें वाचकांस दिसून येईल. व सर्व समंजस लोकांनीं अशी चौकशी सुरू होण्याकरितां व तिजमध्यें खऱ्या स्थितीचें आविष्करण होण्याकरितां खटपट आरंभिली पाहिजे.

५२. सांप्रतच्या शिक्षणक्रमानेंच शारीरिक आणि मानसिक ऱ्हास होत आहे, व शिक्षणक्रम बदलल्यास तो टाळतां येईल असें वाटल्यावरून कित्येक प्रयोग

करून पाहिले आहेत. त्यांपैकीं बरेच घरगुती असल्यामुळें येथें त्यांची माहिती देतां येत नाहीं. शिक्षण दोन तास, अभ्यास दोन तास, व अवलोकनादि व्यापार एक दोन तास, अशा पद्धतीनें ठेविलेल्या मुलांचा अभ्यास फारसा कमी न होतां कोणतेही ऱ्हासाचे परिणाम त्यांवर घडत नाहींत व त्यांची वाढ पूर्ण होते असा केलेल्या प्रयोगांचा अनुभव आहे. तसेंच वाढ खुंटत आहे असें पाहून शाळेंतून काढून घरीं स्वस्थ रिकामा बसविल्यानें मुलाची अशक्तता जाऊन शरीराची वाढ परत आल्याचीं व मेंदू पुनः हुशार झाल्याचीं उदाहरणें करून पाहिलीं आहेत. या अशा प्रयोगांवरून जे सुधारणेचे उपाय सुचले ते न्यू इंग्लिश स्कूलमध्यें चालू करण्याकरितां दोन प्रयत्न केले. घरच्या प्रयोगांत ज्या नवीन पद्धतीनें मुलांस शिकविलें त्याच पद्धतीनें शाळेंत नवीन इंग्रजी शिकणाऱ्या वर्गांस शिक्षण द्यावें ह्मणून सन १८९३च्या अखेरीस न्यू इंग्लिश स्कूलमध्यें नवीन वर्ग काढिले. शाळेंतील कित्येक गैरसोयींमुळें व पालकांचा अभ्यासाविषयीं गैरसमज व घरीं दक्षता कमी यामुळें, या वर्गांमध्यें शरीररक्षणासंबंधानें जो मुख्य उद्दिष्ट हेतु तो कितपत सिद्ध होईल हें आजच सांगतां येत नाहीं. हल्लीं मूळ योजिलेल्या शिक्षणपद्धतीचें कांहींसें रूपांतर झालेलें आहे.

गेल्या वर्षाच्या आरंभीं न्यू इं. स्कुलास जेव्हां बोर्डिंग जोडिलें तेव्हां त्यांत १० वर्षांपासून १८ वर्षांपर्यंत वाढलेलीं मुमारें ३५ मुलें आलीं. हीं मुलें आलीं तेव्हां शाळेंतील इतर मुलांप्रमाणेंच होतीं. बोर्डिंगांत खाणेंपिणें, विश्रांति आणि व्यायाम यांसंबंधानें उत्तम नियम चालू होते त्यामुळें मुलांच्या शरीरांवर त्यांचे परिणाम तेव्हांच दिसूं लागले. परंतु एवढ्या थोडया मुलांकरितां सर्व शाळेचा अभ्यासक्रम बदलणें शक्य नव्हतें, ह्मणून चालू शिक्षणपद्धतीनेंच मुलें शाळेंत शिकवीलीं जात होतीं. परंतु त्यांच्या मागचा घरच्या अभ्यासाचा जाच होईल तितका कमी केला होता. घरच्या अभ्यासास मुलांस फार तर तीन तास मिळत. तेवढ्यानें त्यांचें भागत नव्हतें, व त्यांचा नंबर वर्गांत वर येऊं शकेना. याबद्दल पालकांच्या हरतऱ्हेच्या तक्रारी येत होत्या, परंतु त्यांकडे फारसें लक्ष देण्यांत आलें नाहीं; पालकांचीं होईल त्या तऱ्हेनें समजूत घालण्याचा मात्र प्रयत्न केला. कांहीं झालें तरी सर्व क्रियांचें आद्य साधन जें शरीर तें प्रथम सुधारून घेण्याचा निश्चय होता, व तो पुष्कळ अंशीं सिद्धीस गेला. त्याचें फळ असें झालें कीं, गतवर्षी बोर्डिंगांत जीं मुलें शिकत होतीं त्यांपैकीं बहुतेक चांगलीं वाढीस लागलीं व पुष्ट झालीं. या गोष्टीचा पालकांस व तसाच शिक्षकांस तेव्हांच प्रत्यय आला. मुलांच्या तोंडावर दोन महिन्यांत निराळें तेज दिसूं लागलें. खेळाच्या, जोराच्या व मेहनतीच्या कामांत तीं अधिक वयाच्या तितक्याच फर्ग्युसन कालेजच्या मुलांस ऐकेनाशीं झालीं. गेल्या वर्षी बोर्डिंगांतील व कालेजांतील मुलांमध्यें खेळाच्या बाबतींत झालेले सामने अद्याप शिक्षकांच्या व मुलांच्या ध्यानांत आहेत. शाळेंतील

शिक्षणक्रम व घरची अभ्यासाची तऱ्हा यांमध्यें कांहीं सुधारणा करितां आल्यास बोर्डिंगांतील मुलांचीं विद्येच्या संबंधानें तसाच फायदा होईल अशी साची होऊन व त्यांचें उदाहरण दुसऱ्या मुलांपुढें राहिल्यानें सर्व शाळेचा फायदा होईल असें मनांत येऊन, म्याट्रिक्युलेशन् व यू. एस्. एफ्. परीक्षांचा अभ्यास, हल्लींपेक्षां कमी कष्टानें सात वर्षांच्या चालू मुदतींत संपावा अशा नवीन इयत्ता घसविण्याचा प्रयत्न केला. शाळेंतील शिक्षण चार तास, घरचा अभ्यास तीन तास, व शिक्षकांनीं विषयाची तयारी करून नवीन पद्धतीनें शिकवावें–अशी योजना करण्याचा हेतु होता; परंतु कांहीं निराळ्याच कारणांमुळें या नवीन इयत्ता विद्यार्थ्यास पसंत न पडून त्या मागें पडल्या व त्यांस व्यावहारिक स्वरूप देण्याचें काम तसेंच राहिलें. बोर्डिंगांत गतवर्षीं ज्या प्रयोगास आरंभ करण्यांत आला त्यापासून अखेरीस ज्या ज्या गोष्टी सिद्ध करायाच्या होत्या त्या सर्वांची या कारणानें सिद्धता झाली नाहीं हें खरें, परंतु एक गोष्ट सिद्ध झाली असें मला वाटतें. ती ही कीं, घरच्या अभ्यासाचें ओझें कमी केल्यास व शाळेंतील चढाओढ बेताची ठेविल्यास थकून चाललेलीं मुलें चांगलीं वाढीस लागतात व त्यांस शरीरसामर्थ्य येऊन व्यायामांची अनिवार्य हौस उत्पन्न होते व ते व्यायाम फलद्रूप होतात.

वास्तविक पाहतां हा प्रयोग फारच महत्वाचा व जबाबदारीचा आहे; कारण न्यू इं. स्कूलच्या बोर्डिंगांत शरीरसंरक्षणाची जशी उत्तम व्यवस्था आहे तशा व्यवस्थेखालीं, परंतु हल्लींच्या शिक्षणपद्धतीनें, मुलें तयार झाल्यावर, जर मानसिक व शारीरिक ऱ्हासाचीं चिन्हें त्यांमध्यें दिसलीं, तर या प्रयोगावरून दोन गोष्टींपैकीं एक गोष्ट सिद्ध होईल. पहिली गोष्ट ही कीं, मातापितरांकडून शारीरिक ऱ्हासाचें बीज मुलांत शिरलें पाहिजे, किंवा दुसरी अशी कीं, चालू शिक्षणपद्धतीनें अतिरिक्त मानसिक श्रम मुलांस होऊन त्यामुळें ऱ्हासाचें बीज त्यांमध्यें उत्पन्न झालें असलें पाहिजे. शिक्षकांनीं व पालकांनीं एकाच सिद्धांतास यावें अशा रीतीनें हा प्रयोग चालविणें अवश्य आहे हें विशेष सांगायास नकोच.

आतां सरशेवटीं शिक्षकांस व पालकांस मुलांची वाढ योग्य रीतीनें होत आहे कीं नाहीं हें पाहतां यावें म्हणून पुढें एक कोष्टक देतों. वाढत्या मुलाची वयपरत्वें मध्यम प्रमाण उंची व त्या उंचीस योग्य वजन किती असावें हें कोष्टकांत सांगितलें आहे. हें कोष्टक युरोपीय डाक्टरांनीं शाळांतील हजारों मुलें मोजून मापून तयार केलेलें आहे; तें या देशास जुळेल असें फेरफार करून येथें दिलेलें आहे. चांगल्या वाढीचा मुलगा फार कृश किंवा फार स्थूल नसतो; त्याच्या हाडाचा सांगाडा मोठा असतो व त्याच्या अवयवांस गोलपणा येईल इतकें अंगावर मांस असतें. आवश्यक कपड्यांचें वजन धरून कोष्टक तयार केलेलें आहे. हें वजन या देशांत मुलाच्या वजनाच्या $\frac{१}{३०}$ धरणें सोईचें आहे. कोष्टकांत दिलेल्या

आंकडे मध्यम प्रमाण दाखवितात, हें विशेषेंकरून ध्यानांत धरावें, व आईबाप स्थूल किंवा कृश आहेत हें पाहून योग्य वाढीच्या मुलाचें वजन मध्यम प्रमाणाहून थोडें अधिक किंवा कमी असावें, असें जाणून मुलाच्या वाढीचा अंदाज करावा.

गेल्या जन्मदिवशीं वर्षे.	उंची–इंच.	वजन–पौंड. (२ पौंड = १ शेर.)	वय.	उंची.	वजन.
७	४६	५१	१४	६०॥	९८
८	४८	५७	१५	६३	१०९
९	५०	६३	१६	६७॥	१२०
१०	५२	६९	१७	६९॥	१३०
११	५४	७५	१८	६७	१३५
१२	५६	८१	१९	६७॥	१४०
१३	५८	८८	२०	६८	१४५

या कोष्टकावरून असें दिसतें कीं १३ वर्षें पुरीं होईपर्यंत दरवर्षीं मनुष्य २ इंच वाढतो व त्याचें वजन ६ पौंडांनीं वाढतें. तेरा वर्षांपासून १६ वर्षें पुरीं होईपर्यंत वाढ अधिक जोरानें होते व तिचें प्रमाण दरवर्षीं उंचींत २½ इंच व वजनांत ११ पौंड हें आहे. यानंतर उंचींत फार थोडी वाढ होते, परंतु रुंदींत बरीच होत, व सर्व अवयव सुदृढ होऊं लागतात, त्यामुळें वजनांत चरेंच अंतर पडत जातें. स्नायू व हाडें यांच्या जाडींत व शक्तींत २५ वे (कदाचित् २८ वे) वर्षापर्यंत वाढ होत जाते व तसेंच वजनही वाढत जातें; ह्मणूनच पुरुषाची वाढ पंचविसावे वर्षीं पुरी होते असें ह्मणतात. अशी पूर्ण वाढ होण्यास शरीरास योग्य व्यायाम व ब्रह्मचर्य हीं आवश्यक असतात.

ज्या मुलांचे मातापितर उंचीनें ६६ इंचांच्या सुमारचे आहेत, त्यांची वाढ मोजतांना आरंभीं वयास एक वर्ष मिळवून व पुढें दोन वर्षें मिळवून कोष्टकाचा उपयोग केल्यास अंदाज बराबर येईल. कित्येक वेळां मुलांची वाढ उत्तम होत गेल्यास, जर त्यांच्या अजांची उंची मातापितरांच्या उंचीहून अधिक असली तर तीस मुलें जाऊन पोहोंचतात. यावरून निरोगी कुटुंबांतील माणसांचा एकाच पिढींत कायमचा शारीरिक ऱ्हास होत नाहीं असें कांहीं थोडया अंशीं अनुमान होतें. या बाबतींत सर्व शाळांत व दवाखान्यांत मापें ठेवलीं गेल्यास फार उपयोग होणार आहे.

ब्राह्मणसमाजाची हल्लींची सामान्य स्थिति.

भाग ८ वा.

ब्राह्मणसमाजाची वृद्धावस्था.

७३. येथपर्यंत ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक ऱ्हासाविषयीं जें विवेचन केलें, त्यावरून ब्राह्मण समाजांत जे नवीन विद्वान् लोक कर्ते पुरुष होऊन कुटुंबभार उचलण्यास येत आहेत ते कोणत्या प्रकारचे असावे याविषयीं वाचकांस कल्पना आली असावी. वीस वर्षांपूर्वी जेव्हां अशाच विद्वानांचा समाजांत भरणा होऊं लागला होता, तेव्हां या समाजास उकळी येत आहे कीं काय असें भासत होतें. नव्या नव्या चळवळी सुरू होत होत्या, नवीन नवीन समाजहिताचे प्रश्न वादविवादास येत होते, जुन्यांच्या किंवा नव्यांच्या चित्तास शांतता किंवा समाधान नव्हतें. कालेजांतून विद्या संपादन करून येणारा मनुष्य कुटुंबांत कोणत्या नव्या कल्पना आणील, धर्माचें कोणत्या बाबतींत उल्लंघन करील, समाजाच्या कोणत्या रूढि झुगारून देईल, कोणते सद्गुण किंवा दुर्गुण व्यक्त करील–या सर्व गोष्टींबद्दल कोणास कांहीं भरंवसा नसे, व इष्टमित्र, आप्तबंधु किंवा सर्व समाज मोठ्या उत्सुकतेनें हा काय करितो म्हणून वाट पहात असे. तारुण्यानंतर वृद्धावस्था सर्वांस आहेच; त्यायोगें त्यावेळचा प्रत्येकजण निदान दोन पावलें पुढें टाकून नंतर थंड होई. त्या दिवसापासून आतांपर्यंत जर विद्वानांची अशीच पिढीमागें पिढी येत गेली असती, तर आज या समाजास कांहीं निराळेंच स्वरूप आलें असतें. परंतु त्या पूर्वीच्या माणसांपैकीं जे गेले ते कांहीं पौरुष गुण दाखवून गेले; जे शिलक आहेत ते जितके चढले तितके चढून स्वस्थ झाले आहेत; तरी देखील तेच आज सर्व सामान्य सुधारणेचे कांहीं अंशीं नायक किंवा प्रतिपालक आहेत. त्यांमागून जे येत गेले ते कोठें आहेत हें कळतच नाहीं; कोणी सुधारणेचा एक अंधारा कोपरा पाहून त्यांतच अल्पस्वल्प प्रयत्न करीत आहेत, कोणी सुधारणेचा विचारच सोडला आहे, कोणी थंड राहूनच त्यायोगें सुधारणेच्या विरुद्ध पक्षास मदत करीत आहेत, व कोणी इतके अजागळ आहेत कीं ते आपलें पोट भरीत आहेत एवढीच त्यांची चडिजाव समजली पाहिजे. वास्तविक पाहतां व्याख्यानांवरून, वर्तमानपत्रांतील लेखांवरून, किंवा गप्पागोष्टींच्या तऱ्हेवरून, समाज उत्कर्ष पावत आहे किंवा

निकृष्ट दशेस येत आहे, हें ठरविणें योग्य नाहीं. नवीन कर्ते पुरुष आपापल्या कुटुंबाचा भार कोणत्या धोरणानें हातीं घेत आहेत, हें पाहून या गोष्टीचा निर्णय केला पाहिजे. व जर त्या कर्त्या पुरुषांत पाणी नसेल, नवीन हिताहिताच्या कल्पना नसतील, हालचालीचें सामर्थ्य नसेल, तर समाज निकृष्ट दशेस येत आहे, असें निश्चयानें अनुमान करावें. या दृष्टीनें या भागांत ब्राह्मण समाजाच्या सांप्रतच्या स्थितीचा विचार केला आहे.

७४. समाजाच्या बाल्यादि अवस्था कशा ओळखाव्या याविषयीं. शरीराच्या प्रत्येक भागास बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या तिन्ही अवस्था स्वतंत्रपणें भिन्न काळीं येतात असें पूर्वी सांगितलें. आतां या गोष्टीचें थोडें उपयुक्त विवरण करून नंतर मेंदूच्या अवस्थांचा अधिक विचार करूं.

बाल्यावस्थेंत शरीरास विलक्षण चांचल्य असतें. या गोष्टीचीं पूर्वी कांहीं उदाहरणें दिलीं. मनुष्याची बाल्यावस्था कायम आहे कीं नाहीं हें ठरविणें सोपें आहे. बाल्यावस्थेंतील मनुष्यास, ह्मणजे मुलास, हाक मारतांच किंवा कांहीं काम सांगतांच तो धांवतच येतो, व धांवतच कामास जातो. चालणें जलद, बोलणें जलद, वाचणें जलद, करणें जलद; जणुं काय सर्व अवयव आपलें काम पटकन् करून टाकण्यास उतावीळ झाले आहेत. कोठें कांहीं नवीन गोष्ट ऐकिली कीं ती पाहण्याची घाई, कोठें कांहीं नवीन कसरत पाहिली कीं ती करून पाहण्याची घाई, असें बाल्यावस्थेंत मुलांस होतें. रस्त्यांत कांहीं दंगा झाला किंवा कांहीं वाजलें कीं मुलगा आपले सर्व व्यवसाय सोडून काय आहे तें पाहण्यास पळालाच. हें सर्व प्रकारचें चांचल्य बाल्यावस्थेंत जें दिसतें त्यामुळें अवलोकनशक्ति अंगांत येते, व जिज्ञासा दृढ होत जाते. हे गुण पुढील आयुष्यांत फारच उपयोगी असतात. तारुण्यावस्थेंत हें चांचल्य कमी होतें, परंतु तें अगदीं नाहींसें होत नाहीं. मध्यमावस्थेंत आणि वार्धक्यांत तें नाहींसें होऊन मनुष्य धिम्मा होतो. कोणामध्यें हें चांचल्य किती दिवस वागतें हें पाहून त्याच्या अवस्थेची आपणांस कल्पना येईल. मोठेपणीं हें चांचल्य व्यासंगानुरूप कांहीं अवयवांत असतें व कांहींतून तें नाहींसें होतें. मुलें थकलेलीं नसतांही सावकाशपणें चालूं लागलीं, काम सांगितल्यावर थोड्या वेळानें त्या कामास लागलीं, काम संपल्यावर थोड्या वेळानें उठलीं, एकंदरीनें त्यांच्या अंगची धांवपळ व उतावीळ गेली, ह्मणजे त्यांचें बाल्य गेलें असें समजावें. ही स्थिति सतरा वर्षांच्या मुलास किती वर्षें आधीं येते हें पाहिल्यास त्यानें बाल्यावस्थेंतील वाढीचीं किती वर्षें गमावलीं हें कोणाही पालकास समजून येईल.

शरीराच्या अवस्थांचा याहून अधिक विचार येथें करण्याचें कारण नाहीं. विचार, मनोवृत्ति आणि वासना यांचें जें इंद्रिय ह्मणजे मन किंवा मेंदू त्याच्या तीन अवस्था कशा ओळखाव्या हें आतां पाहूं. बाल्यावस्था ही होईल तितक्या

ज्ञानाचा संग्रह करण्याची वेळ असते. प्रत्येक पदार्थ पहावा, त्याचें नांव ऐकावें, प्रत्येक वस्तूस हात लावावा, ती चाखावी, उचलून घ्यावी, अशा प्रकार लहान मुलांत दिसतो. अवलोनाची इच्छा व जिज्ञासा यांस नवा नवा ऊत येत असतो, व तो निवविनां निवविनां थोगांस कंटाळा येतो. जें नांव ऐकावें तें काय असतें हणून मुलांकडून प्रश्न आलाच; पदार्थ पाहतांच हें काय, हणून प्रश्न आलाच. त्यांस कांहीं सांगूं लागल्यास त्यांतही त्यांस हजार प्रश्न सुचतात; त्यांची कल्पनाशक्ति प्रबळ होते, व जितकें अद्भुत सांगावें तितकें सर्व कल्पनेनें तयार होतें, व त्यांस तें खरेंच हणून भास होतो. खऱ्यासोट्याचा त्यांचा विचारच नसतो, जें इंद्रियांनीं ग्राह्य असेल त्याचा संग्रह करणें ही पहिली गोष्ट त्यांस हवी असते. कल्पनेच्या द्वारें वासनेंतही अनेक तरंग सहजगत्या उठतात. जें तूर्त साध्य असेल तें ताबडतोंच करण्याची घाई व जें मोठेपणीं साध्य असेल तें केव्हां मोठे होऊं व करून पाहूं, हणून घाई. कोणतेंही वर्णनीय कृत्य सांगितल्यास तें करण्याचा पूर्ण निश्चय तत्काळ होतो व त्या निश्चयास अनुकूल अशी स्थिति राहिल्यास वृद्धापकाळपर्यंत देखील तो निश्चय कायम राहतो. मुलांच्या मानसिक शिक्षणाच्या कामीं सदाचाराचा बोध मनावर दृढ करण्यास व महत्वाकांक्षेचें बीज पेरण्यास हाच काळ प्रधान गणिलेला आहे. बरी किंवा वाईट कोणतीही गोष्ट अंगवळणी पडण्यास व तिजविषयीं मनांत निर्धार होण्यास मनाची बाल्यावस्था असावी लागते. उत्तर वयांत असें घडण्यास फारच श्रम लागतात, व अखेरीस सिद्धि येणें मुष्कील होतें. विचारपूर्वक बरेंवाईट, खरेंखोटें ठरविणें हें बाल्यावस्थेच्या अखेरच्या दिवसांत मुलांस थोडें साधतें. जेव्हां मुलें बऱ्यावाइटाचा किंवा खऱ्याखोट्याचा निर्णय करीत असतात, तेव्हां केवळ वितंडवाद चाललेला असतो, किंवा पालकानें किंवा शिक्षकानें जें सांगितलें असतें किंवा कोठें वाचलेलें किंवा ऐकलेलें असतें त्याचाच बहुधा मुलें अतिशयोक्तिपूर्वक पुनरुच्चार करीत असतात. प्रमाणाकरितां कादंबऱ्यांतील, पंचतंत्रांतील किंवा इसापनीतींतील गोष्टीही चालतात. अशा या बाल्यावस्थेंत खरें व हितकारक जें असेल तेंच शिक्षकानें मुलांस सांगितलें पाहिजे, व त्यांची कल्पनाशक्ति जागृत करून सांगितल्या गोष्टींचें महत्व वाढविलें पाहिजे; मग त्यांविषयीं वासना किंवा महत्वाकांक्षा सहजच उत्पन्न होते. मुलांसच विचार करीत बसविणें त्रासरूप होय, व त्यायोगें बुद्धीच्या बाल्यावस्थेंतील ग्राहकतेचा लवकर नाश होतो.

प्रश्न विचारायाचें सोडून देऊन हें काय असेल बरें, हें कसें घडलें असेल बरें, वगैरे विचार मनांत येऊन स्वतः त्याविषयीं मुलें विचार करूं लागलीं हणजे त्यांच्या बुद्धीची बाल्यावस्था संपत आली असें समजावें. शुद्ध संग्रहाचा काळ, हणजे भांडवल जमविण्याचा काळ जाऊं लागला, व त्या भांडवलावर थोडाबहुत व्यापार करून पाहण्यास आरंभ झाला असें या मनाच्या स्थितीवरून सिद्ध

होतें. बुद्धीचे अनेक भाग आहेत. केव्हां केव्हां एका भागास लवकर तारुण्य किंवा वार्धक्य येतें, व दुसरा अर्थवट बाल्यावस्थेंत राहतो. यामुळें कांहीं गोष्टींबद्दल मनुष्य मिळेल तितकी माहिती मिळवून विचार करितो, कांहींबद्दल अधिक माहिती न मिळवितां एकदम ठाम मत देतो, व कांहींबद्दल यांत काय आपणांस करायाचें आहे म्हणून नादच सोडून देतो. हे तीन प्रकार तारुण्य, मध्यमावस्था आणि वार्धक्य यांचे क्रमानें निदर्शक आहेत. मध्यम वयापर्यंत बुद्धि सर्व भागांत सारखी तरुण राहील तर कल्पनांस व विचारांस अत्यंत वैचित्र्य येतें. कोणत्याही विषयाचा किंवा वासनेचा तिटकारा नसतो, सर्वांतच सारखी गोडी लागते. अशा कार्यास बुद्धि विशाल असावी लागते व ती तरुणपणींही थोड्यांमध्यें दृष्टीस पडते. कांहीं मोठ्या बुद्धीच्या पुरुषांच्या मनास शिक्षणानें किंवा नित्य व्यासंगानें एकदेशीयत्व येतें. असें एकदेशीयत्व म्हणजे इतर बुद्धिभागांचें अकाल वार्धक्यच गणिलें पाहिजे. बुद्धीचे सर्व भाग बाल्यावस्थेंत सारखे वाढविणें, व त्या सर्वांस होईल तितक्या प्रकारें पुढें तारुण्यदशेंत ठेवणें हा शिक्षणाचा मुख्य उद्देश असावा, असें विद्वानांचें मत आहे. हा उद्देश कोणत्या पद्धतीनें किती साध्य होतो, किंवा तो साध्य करण्याच्या कामीं कोणत्या साधनांचा उपयोग करणें इष्ट आहे हा विचार निराळा.

बुद्धीचे सर्व भाग तारुण्यावस्थेंत असल्यास सर्व विषयांत मनुष्यास गोडी वाटेल. कोणत्याही विषयाची नवीन माहिती कानांवर येत असतां त्यास कंटाळा येणार नाहीं; कोणत्याही विषयांत चिलकुल गम्य नाहीं असें घडणार नाहीं, व तें नसेल तर तो तेव्हांच थोडें संपादन करील. सर्व विषयांत पुष्कळ पारंगतता मिळविणें किंवा ते सर्व सारख्या महत्वाचे वाटणें, असा या लिहिण्याचा अर्थ नव्हे; परंतु अमुक विषय अगदींच तुच्छ म्हणून त्याविषयीं मुळींच ज्ञान नको, असें कोणत्याही विषयाबद्दल बुद्धीस न वाटणें असा अर्थ आहे. ही जी ज्ञानप्राप्तीची गोष्ट सांगितली तीच मनोवृत्ति व वासना यांची असली पाहिजे. सुंदर पदार्थ, प्राणी व मनुष्यें पाहायास हवीं; तशींच विलक्षण किंवा विद्रूपही पहावयास हवीं. गाणें वजावणें हवें, तसेंच मुलांच्या कलकलाटाचा किंवा यंत्रांच्या दणादणीचा अनुभव हवा. सुगंध व सुखस्पर्श हवा, परंतु कांहीं विलक्षण दुर्गंध किंवा दुःस्पर्श असल्यास त्याविषयींही तशीच जिज्ञासा असायाची. शृंगारापासून शांत रसापर्यंत कोणत्याही रसाचें दर्शन किंवा श्रवण पाहिजे, सम प्रमाणानें नव्हे, परंतु जिज्ञासेचें समाधान होईपर्यंत. तसेंच कोणत्याही नवीन कल्पनेविषयीं एकाएकीं अश्रद्धा नसायाची, व विचारानें निर्विवादपणें खात्री होईपर्यंत तिच्या सत्यासत्यतेबद्दल कमी अधिक संदेह राहायाचा. अशी ज्या मनाची स्थिति असेल तें मन पूर्णपणें तरुण समजावें. अशा मनाची तयारी करण्याकरितां ज्ञानरूप भांडवलाचा पूर्वीचा फार मोठा साठा असावा लागतो व तो नित्य वाढत चालला तथापि त्याचा

संग्रह करण्याची, त्यास व्यवस्थित करण्याची, धारण करण्याची व प्रसंगीं स्फूर्ति देण्याची बुद्धीमध्यें शक्ति असावी लागते. तरुण बुद्धींतच नव्या कल्पनांचा प्रादुर्भाव व्हावयाचा; अशा बुद्धीनेंच त्यांचें ग्रहण किंवा पोषण व्हावयाचें, व जरी बुद्धीच्या सर्वभागीं तारुण्य राखितां आलें नाहीं, तरी महत्वाच्या सर्व विषयांत तिची ग्राहकता राखणें अवश्य आहे. बुद्धीच्या तारुण्यावस्थेंत केवळ ग्राहकता असते असें नाहीं; योग्य प्रसंगीं आवेश, उत्साह व सहृदयताही उत्पन्न होते; शरीरावयव मदत करण्यास तयारच असतात व वासनाही बलवत्तर असते. एक वेळ असंभाव्य गणिलेल्या गोष्टी तरुण बुद्धीच्या गृहस्थांनीं संभाव्य मानून स्थापित केल्या; पूर्वी नसलेल्या कल्पनांचा त्यांकडूनच उगम झाला; व ज्या नवीन कल्पना निघावाच्या त्याही अशा उगमापासूनच पुढें निघतील.

७५. आतां बुद्धिभागांस जीर्णावस्था जेव्हां येते तेव्हां प्रथम जिज्ञासा व गोडी नाहींशी होऊं लागते, व आहे त्या ज्ञानांत सर्व भागवून घेण्याची संवय लागते. ज्या ज्या बुद्धिभागास जीर्णता येत जाते त्याच्या त्याच्या ग्राह्य विषयांत मनुष्याचे ठाम ग्रह होतात व नियमित प्रकारचे आनंद व उद्वेग शिलक उरतात. उदाहरणार्थ ज्यांस गाणें वजावणें, चित्रकला, सुगंधी अत्तरें, सुखस्पर्श वगैरेंची संवय राहिली नाहीं, त्यांस तीं कंटाळवाणीं होतात; गोड पदार्थ फार दिवस ज्यानें खाल्ले नाहींत त्यास त्यांची गोडीच कळेनाशी होते. इतर लोक कांहीं अशा गोष्टींची स्तुति करीत असतात तेव्हां, त्यांत काय आहे असें त्यास वाटतें; कारण बुद्धीची तेवढी ग्राहकता गेली. वृद्धपणीं शृंगाराचा व शृंगारपर काव्यांचा याच कारणानें कंटाळा येतो, व व्यासंगाप्रमाणें एका किंवा दुसऱ्या विषयांत मात्र गोडी शिलक उरते. याही विषयांत बहुधा जवळच्या भांडवलावरच व्यापार चालतो. चांगली माहिती असल्यावांचून जेव्हां कोणी मनुष्य नवीन कल्पनेविषयीं आग्रहपूर्वक मत देतो, लोकांचें म्हणणें ऐकून घेण्याविषयीं तिरस्कार दाखवितो, असें घडणें मुळींच शक्य नाहीं असा दुराग्रह धरितो, या गोष्टींचा मुळींच विचार करायास नको असें एकदम सांगतो, तेव्हां त्याचें ते ते बुद्धिभाग मंद होत चालले आहेत असें समजावें. असें मांद्य येण्यास कारण एकच, तें हें कीं ते भाग चलन झाल्यावांचून फार दिवस राहिले. जी शरीराच्या अवयवांची स्थिति तीच बुद्धिभागांची असते असें यावरून ध्यानांत येईल. जेव्हां वृद्धांस आपण दुराग्रहाबद्दल दोष देतों, तेव्हां वास्तविक त्यांचीं आपणांस करुणा यावी; कारण त्यांची त्या बाबतींत ग्राहकताच गेलेली असते. ही जी वृद्धांची स्थिति तीच जर तरुणांमध्येंही दिसूं लागली, जर त्यांचेही बुद्धिभाग निश्चल, मंद व कल्पनाहीन दिसूं लागले, व त्यांच्याही वासना व उद्वेग थोड्या नियमित सरणींत परिवर्तन पावूं लागले, तर त्यांच्याही बुद्धीस अकाल वार्धक्यानें गांठलें **म्हणून** समजावें; व असे तरुण गृहस्थही अनुकंपनीयच होत. तो

दोष त्यांचा नव्हे, तर त्यांच्या शिक्षणाचा समजला पाहिजे. वृद्धपणींही अनेक विषयांत ग्राहकता असणें हें फार विशाल बुद्धीस व अनेक प्रकारच्या बुद्धिव्यासंग करणारास मात्र शक्य असतें. परंतु तारुण्यांत देखील बुद्धि तरुण राखितां येऊं नये हें खरें दुर्दैव होय. कोणा मनुष्यास पैशावांचून दुसऱ्या कोणत्याही विषयाचें महत्व वाटूं नये, हें त्याच्या कित्येक बुद्धिभागांच्या जीर्णतेचेंच फळ होय, परंतु अशा रूपण माणसाप्रमाणेंच इतर प्रकारांनीं पुष्कळ लोकांच्या बुद्धींचा तारुण्यांत किंवा वार्धक्यांत स्थिति होते. बुद्धीची दशा कशी ओळखावी याविषयीं येथें थोडीं उदाहरणें देतों. व्यवहारांत प्रत्येक शोधक माणसास अशीं शेंकडों उदाहरणें नित्य आढळतील. कोणी वृद्ध माणूस जवळ असतां तुम्ही अनेक प्रकारच्या विषयांचा वादविवाद करा, त्याचें त्यांत लक्ष लागणार नाहीं व तो अर्धवट वेड्याप्रमाणें ऐकून स्वस्थ राहील, परंतु तो वेदांती असल्यास, "एका फ्रेंच गृहस्थानें मनुष्यास दोन आत्मे असतात असें स्थापित केलें आहे" असें सांगतांच डोळे पुरते उघडून 'मूर्ख आहे चेटा!' असा तो एकदम उद्गार काढील. हीच गोष्ट तरुण बुद्धीच्या माणसांत निघाल्यास 'कायहो, प्रमाणें तरी काय आणलीं आहेत' असा ते प्रश्न करतील; व बालबुद्धीच्या मुलांस तीं सांगितल्यास नीं हें एवढें वाक्यच संग्रहास ठेवतील. तसेंच 'अहो अमक्याच्या येथें रात्र होतांच आपोआप दिवे लागतात' असें वृद्धानें ऐकिल्यास 'खोटी गोष्ट आहे, कदाचित् भूतचेष्टा, नाहीं तर हातचलाखी असेल' असें तो म्हणेल. तरुण मनुष्य आश्चर्यपूर्वक म्हणेल कीं, 'खरेंच काय! तुम्हीं पाहिलें काय? चला आपण जाऊन पाहूं. कांहीं विजेचा चमत्कार असावा.' मुलांस ही गोष्ट कळतांच तीं दिवे लागलेले पाहून येऊन सोबत्यांस तीं आश्चर्याची बातमी देतील, व वडिलांस किंवा शिक्षकांस हें कसें होतें म्हणून विचारतील, आपणच त्याचा निर्णय करण्याच्या भरांस पडणार नाहींत. तसेंच तुम्ही वृद्धास त्याच्या मित्राबद्दल सांगा कीं, 'अहो त्यानें काल अमुक पदार्थ खाल्ले' तो म्हणेल 'छेः, खोटी गोष्ट, तो जन्मांत तसला पदार्थ खायचा नाहीं!' तरुणांस तेंच सांगितल्यास 'तुम्ही कशावरून म्हणतां? कदाचित् खातही असेल बुवा! कोण काय करील याचा नेम नाहीं,' असें तो म्हणेल. मुलांस सांगतांच ते तीं गोष्ट खरी असो वा खोटी असो, गांवभर सांगत फिरतील. बुद्धीस जीर्णता आल्यावर क्षुल्लक बाबतींतही मनुष्य किती दुराग्रही होतो हें या थोड्या उदाहरणांवरून कळून येईल; व अशा माणसाची खात्री करीत बसणें व्यर्थ होय. ती खात्री शाब्दिक प्रमाणांनीं तर व्हावयाची नाहींच, उलट करून देणारा मूर्ख आहे असा मात्र दुराग्रह उत्पन्न होईल. सर्व इंद्रियांची साक्ष पटविणारें प्रत्यक्षप्रमाण असल तर मात्र अशा मनुष्याची खात्री होणें शक्य आहे. व्यवसायपरत्वें भिन्न भिन्न विषयांत भिन्न वयाच्या मनुष्याची बुद्धि वृद्धदशेस येते व म्हणूनच कोणा एखाद्याचीं मतें जेव्हां कोणत्याही एका किंवा अधिक विषयांत ठाम ठरून

जातात, जवळच्या ज्ञानभांडबलावर त्याचा जारीनें व्यापार सुरू होतो, व योग्य आणि अयोग्य, शक्य आणि अशक्य, संभाव्य आणि असंभाव्य यांविषयीं तो पटापट निर्णय देऊं लागतो, तेव्हां तो त्या विषयांत वृद्ध झाला आहे म्हणून समजावें. 'या गोष्टीचा पुष्कळ शोध व विचार करून पाहिला अद्याप ती खरी, किंवा शक्य किंवा संभाव्य दिसत नाहीं,' असें जोंवर मनुष्य खरें सांगत आहे, दांभिकपणानें नव्हे; तोंपर्यंत त्याच्या बुद्धीच्या त्या भागास टवटवी आहे असें ओळखावें. गुलाबाच्या फुलाप्रमाणें बुद्धीची वाढ आहे. प्रथम कळी लहान असून ती हळू हळू मोठी होते, मग हळू हळू ती उमलून तिच्या अनेक पाकळ्या सुंदरपणें बाहेर पडतात; जर उमलण्यापूर्वीच तीस एखाद्या अंगीं कीड लागली असली तर उमलल्यावर त्या बाजूच्या तिच्या पाकळ्या खुरटलेल्या असून लवकर गळून जातात; पूर्णावस्था आल्यावरही हळू हळू पाकळ्या सुकून गळण्यास आरंभ होतो. व अखेरीस बियाचे थोडे दाणे मात्र शिलक उरतात.

७६ समाजांतील कर्त्या पुरुषांमध्यें ज्या प्रकारच्या लोकांची अधिक संख्या असते त्याप्रमाणें त्या समाजास तारुण्य किंवा जरा आली आहे असें ओळखावें. सुव्यवस्थित समाजांत कुटुंबांतील कर्ते पुरुष मध्यमावस्थेंत जात असतात, व लवकरच कर्ते होणारे पुरुष तारुण्य दशेंत असतात; त्यामुळें नवीन कल्पनांचें, सुधारणांचें व वासनांचें हळू हळू पुढें पाऊल पडत असतें. वीस वर्षांपूर्वी ब्राह्मणसमाजास अशी स्थिति येत चालली होती, असें पूर्वी सांगितलेंच; परंतु हल्ली हा समाज जीर्णावस्थेस आल्याप्रमाणें दिसत आहे. त्यावरून कोणत्या प्रकारचे नवीन शिक्षित लोक कर्तेपणाच्या स्थितींत येत चालले आहेत, या गोष्टीची कल्पना होते. लहान मुलांपासून वृद्धकर्पांपर्यंत माणसें पाहिल्यास त्यांमध्यें मतवैचित्र्य इतकें थोडें दिसतें कीं कोणास वाटेल एकाच सांच्यांतून सर्व मेंदू एकदम ओतून काढले आहेत. राजकीय बाबतींत काय काय झालें पाहिजे, सामाजिक बाबतींत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, उद्योगाच्या बाबतींत काय केलें पाहिजे, शिक्षणाच्या बाबतींत कोणत्या आवश्यकता आहेत, इत्यादि सर्व विषयांवर बहुमत ठरलेलेंच आहे, परंतु त्या बहुमताची दिशा शुद्ध आहे, किंवा मर्यादा पुढें गेली आहे, किंवा उद्देश थोर व उत्कृष्ट आहेत, असें मात्र मुळींच दिसत नाहीं. सरकारचें, सुधारकांचें किंवा इतर कोणाचें कांहीं विशेष प्रकारचें वर्तन झाल्यास सर्वत्र एकाच प्रकारचे उद्गार निघतात व त्यांचीच पुनरावृत्ति फार दिवस होत राहते. ही स्थिति विचारवंतांस विचारानंतर येत नाहीं, ठाम मतें झाल्यानें व दुराग्रहांचा पगडा बुद्धीवर बसल्यानें येते व म्हणूनच तिचें आधीं भविष्यही करितां येतें. या गोष्टींची प्रतीति पाहण्यास कोणीही ग्र्याजुएट झालेल्या नव्या मंडळींस स्वतंत्रपणें निबंध लिहिण्यास किंवा बोलण्यास सांगावें; शेंकडा दहापांचच तो लिहिण्याचा हिय्या करितील. विषय राजकीय, सामाजिक, धर्मसंबंधी

किंवा दुसऱ्या कोणत्याही सुधारणेसंबंधीं असावा. तो राजकीय असेल तर राज्यकर्ते अमुक हक्क देण्यास कोणते अपवाद काढतात, आपल्या अंगच्या कोणत्या उणिवा दाखवितात, हक्क न बजावतां आल्याबद्दल कोणतीं उदाहरणें दाखवितात, वगैरे प्रकारें विरुद्ध मतांचें बराबर निदर्शन करावें व राज्यकर्त्यांचें म्हणणें किती अगदीं खरें आहे, किती अल्पांशानें खरें आहे, किती शुद्ध मत्सराचें, द्वेषाचें किंवा पक्षपाताचें आहे हें सप्रमाण सिद्ध करावें, व या हक्कास आपण पात्र होण्यास कोणत्या सुधारणा आपणांमध्यें झाल्या पाहिजेत हें ठरवावें, आणि सर्व विषय निस्पृहपणें लिहिलेला व व्यवहारांत तदनुरूप आचरण करण्यास उपदेश घेण्यासारखा असावा,—असें स्पष्ट सांगावें; व विषयास जी माहिती पाहिजे ती मिळवून देण्याचेंही कबूल करावें. या प्रमाणें दुसऱ्या कोणत्याही विषयासंबंधानें सूचना असावी. अशा निबंधांत मतवैचित्र्य होण्यास पुष्कळ अवकाश आहे; परंतु तें झालेलें दृष्टीस पडणार नाहीं. आम्ही आहों या स्थितींत सर्व राजकीय हक्कांस पात्र आहों; आम्ही आहों त्या सामाजिक स्थितींत कांहीं थोडे शुल्लक फरक केले म्हणजे बस्स आहे; आमचा आहे हा धर्म, आचार, उद्योग, क्रम, वगैरे यांपैकीं कोणता एकही फारसा सुधारण्यासारखा नाहीं, व या बाबतींत जितके आमच्यांत तितकेच इतर राष्ट्रांत **दोष** आहेत व असायाचे; सबब आम्ही कोणत्याही राष्ट्राहून कमी प्रतीचे नाहीं, अशीं सामान्यतः मतें येतील. इतर राष्ट्रांतील गुणांपेक्षां दोषांचेंच अधिक विवेचन सांपडेल. हें आमचें राष्ट्र उच्च प्रतीचें होण्यास उपाय अगदीं सोपे व थोडे आणि विघ्न काय तें राज्यकर्त्यांचें, असें प्रतिपादिलेलें आढळेल. आबालवृद्धांची आपापल्यापरी ही अशी समजूत समाजाच्या बुद्धीची केवळ वृद्धदशा दाखविते. मनांत पाहिजे ती महत्त्वाकांक्षा बाळगणें, पाहिजे ती आशा धरणें, पाहिजे तेवढी आत्मोत्कर्षाची उमेद बाळगणें हें निराळें, व व्यवहारांतील आचरण सुधारण्याच्या कामीं स्वपरगुणदोषांविषयीं तरुण कर्त्या पुरुषांनीं अंध असणें हें निराळें. या दुसऱ्या प्रकारच्या दोषास आम्ही पात्र होत आहों हींच मोठी शोचनीय गोष्ट होय. सर्व प्रकारचें स्वातंत्र्य असून कल्पना व विचार यांचें वैचित्र्य नाहींसें व्हावें, आचार व उद्योग यांत फरक पडत जाऊं नये, व केवळ निरर्थक पिष्टपेषणांत व चर्वितचर्वणांत सुशिक्षितांचा सर्व वेळ जावा, याहून अधिक शोचनीय स्थिति ती कोणती ? बुद्धीच्या नाशाचें याहून बलवत्तर कारण सांगण्याची काय गरज आहे ?

७७. याप्रमाणें ही बुद्धीची स्थिति झाली. आतां मनोवृत्तींची स्थिति पाहिल्यास तीही तशीच. घरचे कर्ते पुरुष चार एके ठिकाणीं जमले असतां नवीन कराची गोष्ट निघाल्यास 'अहो तो दिलाच पाहिजे' किंवा 'सरकारापुढें काय कोणाचें चालणार आहे!' किंवा 'पहावें यांच्या खटपटीनें काय होतें तें?' किंवा 'आज सरकार करील ती पूर्वदिशा आहे' असें निर्विकारपणें म्हणून इतर

गण्यांच्या ओघांत वाहतात, परंतु झालेल्या जुलुमानें किंचितूही हृदयांत पोळ-ल्यासारखे दिसत नाहींत. हीच गोष्ट उद्योगधंदा, धर्म, नीति, सुधारणा वगैरे सर्व कामांत. धर्मसंबंधी किंवा नौकरीसंबंधी किंवा इतर बाबतींत स्वतःचे जेथें हक्क बुडत असतात तेथेंही हीच उदासीनवृत्ति. अशा कामीं कोणीं सभा भरविल्यास, कत्यां पुरुषांपैकीं फार थोडे सभेस आलेले असायाचे; परंतु कांहीं आरास, तमाशा किंवा समारंभ असल्यास ह्याच पुरुषांची ही गर्दी; ह्यातारे कोतारेही फुकटच्या करमणु-कीस जाण्यास तयार ! हा प्रकार कांहींसा चालिरीतेचा दिसतो हें उघड आहे-कालच्या सभेस कां आला नाहीं असें कोणीं त्यांस विचारतां " अमुक काय बो-लणार होता तें माहीत होतें, उद्यां छापून येईलच. जाऊनच काय करायाचें ! " अमें उत्तर तयारच असतें. आतां कोणी ह्मणेल कीं, सरकारी नोकर असल्या-मुळें पुष्कळांस सभांस जातां येत नाहीं; परंतु ही राजकारणी सभेची स्थिति असल, इतर सभांचद्दल समाजांतील कर्त्या पुरुषांमध्यें कां उदासीनता दिसावी ! **वास्तविक पाहतां शरीरास किंवा मेंदूस चलन नको असतें, व कोणतीही मनोवृत्ति अशा कामीं जागृत होत नाहीं हें औदासीन्याचें कारण असतें.** नौकरलोकांची स्थितिही शोचनीय दिसते; कारण ज्यूरीसारख्या ज्या प्रश्नांत त्यांस स्वातंत्र्य असणें जरूर असतें व ज्यांत त्यांच्या स्वतःच्या अक्कल, योग्य-तेस किंवा हक्कांस मुख्यत्वें धक्का बसतो, त्यांतही त्यांस वरिष्ट अधिकाऱ्यांची भीति वाटल्यास काय सिद्ध होतें ! **हें कीं कोणत्याही बाबतींत सरकार जें काय करील त्याविरुद्ध अक्षरही काढायाचें नाहीं, अशा शर्तीवर ब्राह्मणलोकांनीं नौकरी धरिलेली असते.** आतां प्रत्येक शहरीं डा-क्तर, वकील, पेन्शनर व इतर दहा पांच गृहस्थ यांखेरीज बाकी सर्व सरकारी नौकरच असतात. सरासरीनें शेंकडा दहा पांच कर्ते पुरुष सरकारी नौकरीखेरीज इतर प्रकारें आपला निर्वाह करितात. सरकारविरुद्ध भांडण्याचें काम या दहा पांच पुरुषांकडे असायाचें, व तेही सर्व सुज्ञ व थोर मनाचे असतात असें नाहीं. व त्यांच्या अविचारानेंव उच्छृंखळपणानें आपलें कदाचित् नुकसानच हो-ईल अशी बाकीच्यांस भीति असते. कारण ब्राह्मणांची अशी स्थिति झालेली आहे कीं, जेथें पारतंत्र्य तेथें त्यास अवधि नाहीं व जेथें स्वातंत्र्य तेथें तेंही अ-नावर असतें. स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांपासून उत्पन्न होणाऱ्या बऱ्यावाईट मनोवृत्तींवर सदसद्विवेकशक्तीचा अल्पही अम्मल राहिलेला नसतो. ज्या ज्ञाती-च्या वकिलीचें सर्व काम या प्रकारच्या थोडया सुज्ञासुज्ञ संशयात्मक लोकांकडे आहे, ज्या ज्ञातींतील कर्त्या पुरुषांस आपलीं अनुमोदनें व टाळ्या अविचारी मुलां-च्या हस्तें सभेस पोंचवाव्या लागतात, ती ज्ञाती ऊर्जित दशेस येण्याच्या किंवा आपले हक्क संभाळण्याच्या लायख आहे काय ! सरकारी नौ-करीवर असलेल्या कर्त्या पुरुषांस सभेच्या कामास मदत करणें

झाल्यास विचारांनीं, लेखांनीं व द्रव्यद्वारा करितां येणार नाहीं काय? परंतु जेव्हां कोणतीही गोष्ट मनास खरोखर झोंबेल व झोंप येणार नाहीं, तेव्हां अशा तऱ्हेनें मदत करण्यास मनुष्य तयार होईल. कर्त्यांच्या मनोवृत्ति आधींच थंडगार झालेल्या, उत्साह व अगत्य काय तें बाल्यावस्थेंतील मुलांत उरलेलें, अशी जेथें स्थिति दिसते तेथें समाजास मानसिक वार्धक्य आलें असें कां समजूं नये!

समाजाचें नायकत्व अंगावर ओढून घेणारास पाठबळ कोणाचें आहे? मुलांचें. प्रोत्साहन कोणाचें आहे? मुलांचें. या स्थितींत फलप्राप्ति काय होणार? मुलांच्या टाळ्यांचा गजर, किंवा वर्तमानपत्रांतील कडक लेख वाचून बरोबर होणारी वाहवा! "शाबास, लिहावें तर असें; नाहीं तर दुसरे लिहितात!" परंतु तें वर्तमानपत्र दप्तरास बांधून आफिसांत नेण्याची देखील या वाहवा करणारांची छाती नसते, व वाहवा शब्दापलीकडे कवडीचीही लोकनायकांस त्यांकडून मदत मिळत नाहीं! वर्तमानपत्रकार मात्र आपणांस धन्य मानितो, परंतु लोककार्य तिळमात्रही सिद्धीस जात नाहीं.

आपआपसांत अश्लील व अयोग्य वर्तन करण्याची पुष्कळ ब्राह्मणांस शरम वाटत नाहीं. रूढि व आचार कित्येक प्रसंगीं धडधडीतपणें अनर्थावह असतां त्यांचेंही मंडन करण्यास तयारी असतेच. आपापसांतील दुही माजत असतांही आगीवर तेल ओतण्याचा प्रकार चालू असतोच. याप्रमाणें मनोवृत्तींचें आकलन करण्याचें कोणांतही सामर्थ्य नसतां व सदसद्विवेकशक्ति नित्य अंगांत वागत आहे असें वाग्यात्कारीं तरी दाखविण्याची संवय नसतां, यांपेकींच कांहीं प्रकार इंग्रजांच्या कानावर गेले किंवा इंग्रजी पत्रकारांनीं त्यांवर टीका केली कीं ब्राह्मण खवळून जातो, सर्व हकीकत शुद्ध खोटी आहे असें तो जगजाहीर करितो, व घरांत असतां 'अरे, ही बातमी इंग्लिशपत्रांस कोणीं दिली असेल बरें' असा प्रश्न करून ज्याचा संशय येईल त्यावर सूड उगवण्याच्या तयारीस लागतो. याप्रमाणें मनोवृत्तींच्या संबंधानें हा समाज सर्वप्रकारें अव्यवस्थित झाला आहे व हें वृद्धत्वाचें व हेकडपणाचें चिन्ह होय.

७७. ज्या समाजाचे शेंकडा नव्वद लोक परतंत्र झाले आहेत व बाकी सुज्ञपणें व दूरवर विचारानें भांडतील असा नेम नाहीं, त्या समाजास राज्यकर्त्यांच्या इच्छेविरुद्ध किंवा त्यांच्या औदार्यावांचून कोणतेही महत्त्वाचे हक्क मिळायाचा, किंवा राज्यकर्त्यांस फायदेशीर असा जुलूम दूर व्हावयाचा, बिलकुल संभव नाहीं. अशा समाजानें प्रथम आपले कर्ते पुरुष स्वतंत्र केले पाहिजेत व मग राजकारणी कामांत खटपट केली पाहिजे, तेव्हां त्याच्या खटपटीस जोर येईल; नाहीं तर परतंत्र झालेल्या माणसांस उपद्रव मात्र व्हावा असा त्यांच्या खटपटीचा परिणाम व्हावयाचा; व तोच हल्लीं होत आहे. राजकारणी खटपटींचा हा अनिष्ट परिणाम वर्तमानपत्रकारांस

कडक लेख लिहिण्यास एक विषय होतो हें खरें आहे, परंतु वर्तमानपत्रकारांच्या या फायद्याचा विचार एकीकडे ठेवून ब्राह्मण समाजाची राजकारणी हक्कांसंबंधानें व जुलमासंबंधानें स्थिति प्रतिवर्षाच्या आरंभीं गतवर्षापेक्षां बरी आहे कीं थोडी वाईटच झाली आहे हें निःपक्षपातानें पाहिल्यास ती उत्तरोत्तर वाईट होत आहे असेंच दृष्टीस पडेल. ब्राह्मण लोक बहुतेक सरकारी नौकरींत गुरफटलेले आहेत, त्यांच्याच द्वारें रयतेवर पाहिजे तसा जुलूम करितां येईल व घरच्या दारिद्र्यस्थितीमुळें ब्राह्मणांस स्वतंत्रपणें कोणतीही गोष्ट करणें शक्य नाहीं, त्यांस पिळावें तितके ते पिळले जातात, या गोष्टी सरकारास माहीत नाहींत असें समजूनच सर्व स्वतंत्र सभासद कडक लेख व कडक भाषणें करीत असतात; परंतु जर ते ही एकच गोष्ट समजतील तर कडक व सौम्य शब्दांचा सरकारपाशीं सारखाच उपयोग किंवा गैरउपयोग होईल ही कल्पना त्यांस येईल. मुलांच्या मनोरंजनाकरितां आपले प्रयत्न नाहींत, उद्दिष्ट हेतु सिद्धीस नेण्याचा योग्य उपाय असेल तर पहावा, हा विचार फार थोडयांच्या मनांत वागत असतो. नेटिव्ह संस्थानांत इंग्रज प्रजा असून त्यांचीं वर्तमानपत्रें असतीं तर राज्यप्रकरणांत हेच किंवा याहून मोठे शेंकडो दोष अत्यंत सुज्ञ ब्राह्मणाच्या दिवाणगिरींत त्यांस काढितां आले नसते काय ! असा प्रश्न कित्येक इंग्रज लोक विचारतात; व संस्थानांची स्थिति पाहिल्यावर, " जेथें तेथें असेंच असायाचें, त्यांत कोणी कोणाचा राग मानूं नये. " असें त्यांस उत्तर देणें भाग पडतें. ब्राह्मणांच्या सभापांडित्याचें अशा उत्तरानें पुष्कळ महत्व कमी होतें.

ज्या समाजास नवे हक्क मिळवायाचे असतील त्यांत इतके लोक स्वतंत्र असले पाहिजेत कीं ते सरकारी नौकरींत असलेल्या बाकीच्यांचें व त्यांच्या कुटुंबांचें प्रसंग पडल्यास पोषण करूं शकतील. ह्मणजे निदान निम्मे लोक तरी स्वतंत्र उद्योग करणारे पाहिजेत. मग नौकरींत राहणारांस मोठें पाठबळ येईल, सरकारास त्यांकडून हवें तें करवून घेतां येणार नाहीं, त्यांचा पाहिजे तसा अपमान करितां येणार नाहीं, किंवा त्यांच्या सर्व समाजाबद्दल तिरस्कार बाळगितां येणार नाहीं. ही ब्राह्मणांची जोंवर स्थिति नाहीं, जोंवर जुलमाकरितां शिव्या देणारांपेक्षां नौकरीकरितां दांत विचकणारे ब्राह्मणच राज्यकर्त्यांच्या अधिक अवलोकेनांत येतात, तोंवर ब्राह्मणांचे राजकारणी परिश्रम सरकारच्या इच्छेविरुद्ध असतील तर ते त्यांच्या स्वतःच्या अहितास किंवा निदान उपहासास कारण होतील. ह्मणीं ज्या स्थितींत ब्राह्मण आहेत त्या स्थितींत त्यांनीं कोणतीही महत्त्वाची प्राप्ति करून घेतल्यास तो एक चमत्कारच गणिला पाहिजे. जगाच्या इतिहासांत असा हा प्रकार नवीनच प्रथम घडला असें लिहिण्याची त्या वेळीं पाळी येईल.

७८. कर्तबगारी आणि उद्योग यांसंबंधानें ब्राह्मण समाजाची स्थिति.

एकंदर सर्व ब्राह्मणमंडळी विद्येच्या कां मागें लागली आहे ? विद्येंत यश येवो वा न येवो, ती केवळ विद्याव्यसनी कां बनली आहे ? विद्येवांचून दुसरा तरणोपायच नाहीं अशी या एका बुद्धिमान् ज्ञातीची कां स्थिति व्हावी ? या गोष्टींविषयीं विचार करितां एक चमत्कारिक कारण ध्यानांत येतें. तें असें कीं, या ज्ञातीच्या अंगची कर्तबगारी आणि उद्योग पूर्णपणें नाहींसा झाला आहे त्याचा हा परिणाम होय. प्रथमदर्शनीं हा सिद्धांत कोणास विलक्षण वाटण्यासारखा आहे; परंतु कर्तबगारी व उद्योग नाहींसा होणें हें मानसिक आणि शारीरिक उभयविध ऱ्हासाचें अखेरचें निश्चित फळ होय.

आज परदेशांत शेंकडों एकर जमीन फुकट मिळत आहे म्हणून भिकारी ब्राह्मणांस सांगा, आह्मांस तिचा काय उपयोग असें ते म्हणतील. ही जमीन परदेशांत नसून याच देशांत माळव्यांत आहे, ह्मणून सांगा तिचा त्यांस उपयोग नाहीं. अमुक ठिकाणचें जंगल फुकट तोडून नेऊन विका असें ह्मटल्यास देशांतल्या देशांत ब्राह्मण आगगाडीनें शें दोनशें मैल जाणार नाहीं. अमुक ठिकाणीं सोन्याची खाण आहे, खडे फोडून धुवून घेतले तर सोनें मिळतें ह्मणून सांगा, त्यांस कांहीं फायदा दिसत नाहीं. याप्रमाणें बहुरत्ना वसुंधरा असून ब्राह्मणास ती व्यर्थ होय. शेतकीची व फारेस्टखात्याची परीक्षा उत्तरल्यावरही शेत किंवा फारेस्ट नको असतें, तर त्यासंबंधाची नौकरी पाहिजे असते. गिरणींत किंवा कारखान्यांत काम शिकून कांहीं वेतन मिळतें ह्मणून सांगा, माधुकरी व शाळेंतील नादारीच बरी ह्मणून वाटेल. मुंबईच्या रस्त्यानें जात असतां जीं शेकडों दुकानें लागतात, त्यांपैकीं कोणतें ब्राह्मणास काढतां येईल व तें त्यानें काढलें तर इभ्रतीनें तो लहानाचा मोठा व्यापारी होईल, असा विचार केल्यास, एकही व्यापार त्याच्या योग्य सांपडायाचा नाहीं. जर घड्याळें विकण्याचा किंवा स्टेशनरी विकण्याचा एकादा दिसला तर त्यांत पोटापुरतें मिळण्याची मारामार असें आढळेल. ब्राम्हणांस करावेसे वाटणारे कांहीं धंदे दिसतील. उदाहरणार्थ, खोदीव काम करण्याचा, फोटोग्राफ काढण्याचा, विजेनें मुलामा करण्याचा, वगैरे; परंतु या कामाच्या शाळा कोठें आहेत ? शाळेवांचून ब्राह्मणास कांहीं यावयाचें नाहीं. कोठें कारखान्यांत उमेदवारी करून हळू हळू काम शिकायाचें, ही कल्पनाच त्यास येत नाहीं. गुजराथी किंवा पार्शी गृहस्थास जसा भरंवसा असतो कीं आपण मुलास हें काम कोठें तरी ठेवून शिकवूं, मग त्यास थोडें भांडवल देऊन स्वतःचें दुकान किंवा कारखाना काढून देऊं, तो आपलें पुढें खुशाल पोट भरील, तसा भरंवसा ज्यास आपल्या मुलाबद्दल आहे असा ब्राह्मण पालकच नाहीं. तेव्हां यावरून या ज्ञातीच्या कर्तबगारीची व उद्योगाची पारख होत नाहीं काय !

याप्रमाणें ब्राह्मणाच्या हातून व्हावयाचे नाहींत असे उद्योग काढून टाकतां टाकतां शिलक उरतें ? लिहिण्यावाचण्याची सरकारी नौकरी, किंवा तशीच खासगी

नाकरी, वकिली, डाक्तरी, इंजिनीयरी, इत्यादि. ह्मणजे ज्या कामास बुद्धीचा सर्च फार, शारीरिक श्रम बेताचे असा कांहीं धंदा. या स्थितीवरून असें सिद्ध होतें कीं, ब्राह्मणजातीय कर्त्या पुरुषांपैकीं नव्वद हिस्सा लोकांस परतंत्र झाल्याचांचून इलाजच नाहीं, मग त्या पारतंत्र्यांत बुद्धीच्या श्रमाची जी किंमत येईल ती येईल. ब्राह्मणाच्या स्त्रायु महिना पांच रुपये मोलाच्याही नाहींत असें झालें आहे ! ब्राह्मणाच्या बुद्धीस असें पीक आलें आहे कीं, उत्तम माल फार दुर्मिळ सरा, परंतु भिकार माल कुजून जाण्याइतका तयार आहे. जेव्हां कोबीच्या कांद्यांचा सुकाळ होतो तेव्हां ते गरीबगुरिबांस फुकट वांटून तरी त्यांचा निकाल लावितां येतो; परंतु थोडेंबहुत शिकून घरीं माशा मारीत बसलेल्यांस " अरे, तुह्मी सर्व एकत्र जमून कांहीं नवीन उद्योगाची माहिती मिळवा; वाचून वाचूनच जें कळेल तें इतर धंद्यांतील लोकांस सांगून पहा, कदाचित् त्याचा त्यांस मोठा उपयोग होईल; हीं कुणब्यांचीं उनाड मुलें रस्त्यांत खेळत आहेत यांस फुकट लिहिणेंवाचणें शिकवा; कांहीं तरी सत्कार्य एकजुटीनें करा, मग तें कोणत्याही प्रकारचें कां असेना ! " असें सांगितल्यास ' कोण रिकामा त्रास करितो ?' असें उत्तर मिळेल. ह्मणजे बुद्धि कुजून व्यर्थ जाईल, परंतु स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या ती उपयोगीं पडणार नाहीं. दरिद्री विद्यार्थ्यांस विद्यादान देण्याचें हें फळ पाहिलें ह्मणजे मन उदास होतें.

ब्राह्मणाची विद्या कोणत्याही उद्योगास किंवा कारखान्यास किंवा नव्या धंद्यास उपयोगीं नाहीं ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. विद्येच्याद्वारें कोणत्याही इतर ज्ञातीस ब्राह्मण उपयोगीं पडत नाहीं, हें त्या त्या ज्ञातींसही कळून आलें आहे. तुमच्या विद्येचा आह्मांस काय उपयोग असें ब्राह्मणांस इतर ज्ञातींनीं विचारल्यास " तुह्मांस थोड्या खर्चानें शिक्षण देऊं, थोड्या खर्चांत अर्ज लिहून देऊं, व जे थोडे आह्मांमध्यें स्वतंत्र लोक आहेत ते तुमच्या राजकीय हक्कांकरितां सरकाराशीं भांडतील, " याहून अधिक उपयोग दाखविणें ब्राह्मणांस शक्य नाहीं. या उपयोगांसंबंधानें पाहतां इतर ज्ञातींस जेवढें शिक्षण लागतें तेवढें देऊन तीनपासून दहा रुपयेपर्यंत किफायत करून घेणारे ब्राह्मण आहेत हें कबूल करावें लागतें, च त्यांची कर्तबगारीही या किफायतीवरूनच दिसून येते. या बाबतींत ज्याच्या स्त्रायूंस किंवा हस्तकौशल्यास पांच रुपये महिन्याहून अधिक किंमत येत आहे असा इतर ज्ञातीचा कोणीही मनुष्य ब्राम्हणाच्या वाटेस जाणार नाहीं. राजकारणी खटपटीसंबंधानें पाहतां ब्राह्मणांकडून द्रव्य मिळायाचें नाहीं, किंवा ज्ञातींतील जीं सर्वमान्य उत्कृष्ट माणसें त्यांचें साह्य किंवा सह्या मिळायाच्या नाहींत. कारण अशीं माणसें सरकारानें सेवापाशांत अडकविलीं आहेत. तेव्हां राजकीय खटपटींत द्रव्य, सुविचार, वजन व महत्वाच्या सह्या मिळविण्यास पाहीं,

गुजराथी, मुसलमान व इतर जातींचे व्यापारी व जमीनदार, आणि उदार युरोपीय गृहस्थ यांकडेच जावें लागतें. मग खटपटीमध्यें जरी यश आलें तरी वाचालतेपलीकडे ब्राह्मणांचा कोणता उपयोग झाला ? हल्लीं इतर सर्व ज्ञाती कामापुरतें शिकून आपापले हक्क संरक्षण करण्यास तयार होत आहेत, किंबहुना झाल्या आहेत. पार्शी, गुजराथी व मुसलमान यांमध्यें शेंकडा पन्नासाहून अधिक लोक स्वतंत्र धंद्याचे असल्यानें त्यांच्या खटपटीस महत्व येत आहे. वास्तविक पाहतां ब्राह्मणांनीं आपलें अंग या कामांतून काढून घेतल्यास कांहीं नुकसान होईल, किंवा थोडें झालेंच तर तें फार दिवसपर्यंत टिकेल, असें मुळींच उरलें नाहीं.

हल्लीं ब्राह्मणसमाजांतील अल्पस्वल्प स्वतंत्र लोक राजकारणी खटपटींत कां अंग घालतात हें पाहिल्यास, खऱ्या शक्य उपयोगाच्या दृष्टीनें त्यांचा तसा प्रयत्न दिसत नाहीं. जर राजकारणी खटपटींत आपलें अंग न ठेवावें, तर आपण लवकरच अगदीं मागें पडूं व आपलें अद्यापि जें थोडें महत्व शिलक आहे तेंही नाहींसें होईल अशी त्यांस जबरदस्त भीति आहे. ब्राह्मणांस प्रतिष्ठा मिळविण्याचा व परोपकारित्व गाजविण्याचा हा **एकच एक** मार्ग उरलेला आहे. जर ही खटपट सोडून आपल्या ज्ञातीस सुधारण्याचा व ऊर्जितदशेस आणण्याचा मनःपूर्वक ते प्रयत्न करतील, तर ती सुधारलेली व ऊर्जितदशेस आलेली नाहीं असें जगापुढें स्पष्ट कबूल केल्यासारखें होईल ; व हें ब्राह्मणांच्या आतांपर्यंतच्या बाहेरील डामडौलाशीं व वल्गनांशीं जुळत नाहीं. इकडे पहावें तों ज्ञातीचा ऱ्हास मोठ्या झपाट्यानें सुरू आहे; ब्राह्मणांच्या खटपटी शुष्क व निरुपयोगी आहेत असें सरकारी इंग्रज अंमलदार कृतीनें स्पष्ट दाखवीत आहेत व इतर ज्ञातींचीं अशाविषयीं समजूतही पडत आहे. अखेरीस परिणाम काय होणार ! **जर ही ब्राह्मणजात वेळेवर सावध होऊन स्वतःचें खरें सामर्थ्य व खरें कर्तृत्व वाढविण्याच्या स्वतंत्र खटपटीस लागली नाहीं, तर मिशीस लावण्यापुरताही तुपाचा अंश घरांत नाहीं अशी स्थिति येईपर्यंत आंतल्या आंत हाल सोसाचे लागतील, व पुढें जी स्थिति येईल ती शब्दांनीं कशास लिहावी !**

७९. कारण असें पहा कीं, ब्राह्मणांचें जें मायपोट म्हणजे नौकरी त्यामध्येंही इतर ज्ञातींनीं ब्राह्मणांकडून वांटणी घेण्याचें काम चालविलें आहे. मामलेदार, मुनसफ, वगैरे ज्या मोठ्या अंमलदारीच्या जागा व दिवाण, नायबदिवाण, सुभा, वगैरे ज्या संस्थानांतील मोठ्या जागा, त्यांची संख्या नियमित आहे. त्यांपैकीं बहुतेक जागा पूर्वी ब्राह्मणांनीं व्यापिलेल्या होत्या, परंतु हल्लीं इतर ज्ञातींनीं त्यांपैकीं बऱ्याच जागा मिळविल्या आहेत. या इतक्या जागा ब्राह्मणांच्या हातून गेल्या. हीच स्थिति याहून कमी दर्ज्याच्या जागांची हल्लीं सुरू आहे व त्यामुळें असें झालें आहे कीं, उत्तरोत्तर लहानमोठ्या ब्राह्मण कामगारांची संख्या कमी कमी होत आहे. ज्या जातीस शरीर आणि द्रव्यसंपत्ति हीं अनुकूल आहेत

त्यांची विद्याही अधिक सुरक्षितपणें होते व त्यांची मोठ्या जागेवर नेमणुकही अधिक सुलभपणें होते. या कारणानेंही त्या जातींचे पुरुष ब्राह्मणांस मागें टाकीत आहेत. अशा तऱ्हेनें ब्राह्मणांस कोणत्या जागा शिलक उरतात; ज्यांची परवा इतर जाती करीत नाहींत त्या; व त्याही फार थोड्या आहेत. कारण कुणबी, मुसलमान वगैरे गरीबलोकही या बाबतींत ब्राह्मणांचे प्रतिस्पर्धी होत आहेत. वकीलीच्या धंद्यांतही इतर अनेक ज्ञाति ब्राह्मणांशीं सामन्यास आल्या आहेत. सरकारी डाकरीच्या कामांतून, विशेषतः मोठ्या जागांवरून, ब्राह्मणलोक मुळींच नाहींसे होत आहेत. तेव्हां या अशा प्रसंगाचा कोणीं विचार केला आहे काय?

जे ह्लीं मुनसफ किंवा मामलेदार आहेत त्यांच्या मुलांपैकीं तसाच मोठा अंमलदार होऊन त्यांची जागा पुढें राखील असा किती संभव उरला आहे. बहुतेक मोठे अंमलदार घेऊन पहा. जेथें बाप दोनचारशें रुपये मिळवितो आहे तेथें मुलें वास, पंचवीस, पन्नास रुपये मिळवून स्वस्थ आहेत. जो एक मिळविता पुरुष असतो त्याच्याइतकी मिळकत होण्यास तीन चार मुलांचे पगार एकत्र करावे लागतात. इतर ज्ञाति ब्राह्मणांशीं चढाओढ करीत आहेत त्यामुळें व आपापसांतही मोठी चढाओढ सुरू झाल्यामुळें जो विशेष परिणाम झाला आहे तो असा कीं, पूर्वी ज्या अधिक मिळकतीच्या जागा होत्या त्यांचे पगार दिवसेंदिवस कमी होत आहेत. व अशा जागांपैकीं कांहीं इतर ज्ञातींस मिळत आहेत. या सर्व गोष्टींचा परिणाम काय झाला आहे! हा कीं **ब्राह्मण जातीच्या कुटुंबांच्या सरासरी मिळकतीचा सालअखेर आढावा काढल्यास प्रत्येक कुटुंब गरीब होत आहे असें दिसेल.** बाप मोठा ह्मणून मुलास मुलगी द्यावी; व बापाच्या मागें मुलाची काय स्थिति होईल अशी विवंचना करीत बसावें, अशी कितीकांची स्थिति झाली आहे, या गोष्टीचा शोध वाचकानें करावा. बापाइतकी विद्वत्ता नाहीं, योग्यता नाहीं, इभ्रत नाहीं असें घरोघर होत आहे, व **कुलीन आणि संपत्तिमान् अशीं कुटुंबें दिवसेंदिवस नाहींशीं होत आहेत. त्यांच्या जागीं तशींच तितक्या योग्यतेचीं दुसरीं कुटुंबें उत्पन्न झालेलीं फार थोडीं दिसतात. ब्राह्मण कुटुंबांची संपत्ति व सुस्थिति या कारणामुळें किती डळमळीत व अस्थिर आहे हें पांच पांच वर्षांनीं टिकटिकाणचीं एकंदर मोठीं घराणीं मोजून तेव्हांच लक्षांत येईल.** ही विपत्ति जों जों खालीं जावें तों तों फारच वाढत जाते. प्राप्ति थोडी, मुलें पंचवीस वर्षांचीं होईपर्यंत कुटुंबभार उचलण्यास नालायख व नाराजी, त्यांचा अभ्यासच संपत नाहीं व त्यांस नौकरी मिळत नाहीं. मातापितरांस हालांत हाल सोसून मरेपर्यंत मुलांकरितांच खस्त सोसावी लागते. ह्मातारा दिवसभर खपून पांच चार रुपये मिळवीत आहे, आई मोलाचें दळून दिवस काढीत आहे, धाकटे बंधु माधुकरी मागून अन्न आणीत आहेत, व वडील मुलगा कालेजांत

विद्याभ्यास करीत आहे, अशी स्थिति अनेक ठिकाणीं पाहण्यांत येते. माता-पितरांचे हाल पाहवत नाहींत, व अभ्यासी मुलांच्या चावळेपणास सीमा दिसत नाहीं; याप्रमाणें अनेक कुटुंबांची दुर्दशा झालेली आहे. परंतु जो तो म्हणतो यास उपाय काय ? ब्राह्मण ज्ञातीच्या कर्तबगारीची, उद्योगाची व मिळकतीची यावरून कोणासही कल्पना येईल. **वृद्धीच्या व शरीराच्या ह्रासावरोबरच ऐहिक सुस्थितीचाही ह्रास होत आहे.** भोंवऱ्यांत सांपडलेल्या माणसाप्रमाणें जों जों अधिक तडफड करावी तों तों आणखी खालींच जाण्याचा क्रम सुरू आहे. आपलें जग प्रथम अत्यंत संकुचित करून घेऊन नंतर त्यांतच शेवटपर्यंत तडफड करून हानि पावणारी अशी दुसरी भूपृष्ठावर मनुष्याची जात नाहीं. किल्ल्यांत शत्रूंनीं कोंडल्यावर जेव्हां पुरवठा संपत येतो तेव्हां जशी आंतील सैन्याची स्थिति होते तशी कर्तृत्वहीनतेमुळें व निरुद्योगामुळें ब्राह्मण ज्ञातीनें आपली आपण स्थिति करून घेतली आहे. दुष्ट शिक्षण, अनिष्ट आचार, कोते विचार, निरुद्योग आणि पारतंत्र्य असे जे अहंकाररूप किल्ल्याचे पांच मजबूत बुरूज त्यांचें उपासमारानें ठार होईपर्यंत आम्ही जवानमर्द ब्राह्मण गडी कांहीं विजातीय मर्दुमकीनें संरक्षण करीत राहणार कीं काय कोण जाणें !

८०. ब्राह्मणांची योग्यता सर्वत्र कमी होत आहे. गेल्या कांहीं दिवसांपासून असें दिसूं लागलें आहे कीं, बहुसमाजांत ब्राह्मणांची योग्यता अथवा प्रतिष्ठा हळू हळू कमी होत चालली आहे, व ब्राह्मणांसही ही गोष्ट कळून येऊन त्यामुळें ते इतर जातीयांस वारंवार पुढाकार देत आहेत; व आपण मागें राहूनच सर्व सूत्रें चालन करीत आहोंव अशी मनांतल्या मनांत समजूत घालून समाधान पावत आहेत. ही स्थिति ब्राह्मणांस येत आहे यांत संशय नाहीं; व ती कां येत आहे या प्रश्नाचें उत्तर देणेंही फारसें कठीण नाहीं. (अ) देशाभिमानाकरितां व देशसेवेकरितां जे नाणावलेले आहेत त्यांच्या मतें हा परिणाम सरकारची ब्राह्मणांवर जी चक्रदृष्टि आहे तिचा होय. परंतु दुसऱ्या अनेक सुज्ञ ब्राह्मणांच्या मतें समाजांत जे शेंकडा दहापांच लोक स्वतंत्र असतात, त्यांपैकीं कांहीं उद्धाम होऊन त्या स्वातंत्र्याचा अविचारानें उपयोग करितात, व सरकारासच केवळ नव्हे, तर त्यांचे जे बंधु सरकारी नोकरींत आहेत त्यांसही आपल्या लिहिण्याबोलण्यानें व धामधुमीनें नाखूष करितात. या स्थितीचा प्रतीकार करण्याची नोकरमाणसांस उमेदही नसते व संधीही मिळत नाहीं; व त्यामुळें ते उदासीन राहतात. त्यांच्या औदासीन्याचा परिणाम असा होतो कीं, जे थोडे लोक आम्हीच सर्वांचे पुढारी म्हणून समाजापुढें मिरवतात, त्यांइतकेच चाकरीचेही अविचारी आहेत असा सरकारचा समज होतो. या समजामुळें सेवापाशांत गुंतलेल्यांचें नुकसान होतें, अपमान होतो व योग्यता कमी होते हें सांगायास नको च. आपणांस जी गोष्ट पसंत नाहीं ती आपल्या नांवावर विकत आहे असें पहात असतांही आपण सरकारी

नौकर म्हणून स्वस्थ राहणें हें नौकरलोकांस इष्ट नाहीं. त्यांनीं एकवट होऊन व जीं थोडीं स्वतंत्र व तशींच विचारीं माणसें आपल्या अभिप्रायाचीं असतील तीं आपल्या साहाय्यास घेऊन आपलीं मतें प्रसिद्ध करणें अवश्य आहे. सरकारी आफिसरांचे ब्राह्मणांविषयीं व्यर्थ दुराग्रह होण्यास नौकरीवर असलेल्या विचारी पुरुषांचें औदासीन्य कारण होतें यांत बिलकुल शंका नाहीं. परंतु जे सरकारी नौकरींत शिरतात व परतंत्र होतात त्यांस कुटुंबभरणापलीकडे व आपल्या संकुचित कर्तव्यापलीकडे कांहींच दिसेनासें होतें, त्यामुळें त्यांच्या बुद्धीस व शरीरास अकाळीं जीर्णता येते, त्यांच्या मनोवृत्ति शांत होतात, व ते हालचालीच्या कामास नालायक होतात. कुटुंबांतल्या कुटुंबांत होत असलेली हानि देखील त्यांस दिसेनाशी होते, दिसली तरी तिचा प्रतीकार कसा करावा हें कळत नाहीं; तेव्हां असली मंडळी सामान्य समाजाच्या हिताहिताच्या भानगडींत कशाची पडते ? ही शेंकडा नव्वद लोकांची स्थिति सांगितली.

८१. (ब) ब्राह्मणांचें वजन कमी होण्याचें जें दुसरें कारण दिसतें तें आपसांतील दुही हें होय. ही दुही दुरून पाहणारास असें दिसतें कीं, या दुहींत कोणताही एक पक्ष आपणांमध्यें गुण अधिक किंवा विचार अधिक, व म्हणून समाजाचें अग्रणीत्व आपल्याकडे असावें असें प्रतिपादीत नसतो; तर प्रत्येक पक्षाची बागणूक अशी कीं दुसऱ्या पक्षाचे दोष अधिक आहेत, ते समाजास घातक आहेत, व तो पक्ष सर्वस्वी निंद्य आहे असें पाहिजे त्या मार्गानें सिद्ध करायाचें, व त्यावरून स्वपक्ष दुसऱ्याहून वरिष्ट आहे व त्याची सरशी झालीच पाहिजे असें लोकांस अनुमान करायास लावायाचें. स्वपरपक्षांच्या गुणांचा विचारच नसायाचा. दोषांचें प्रमाण मात्र मोठ्या निकरानें ठरविलें जायाचें. अशी दुही पाहून त्रयस्थ माणसांचें उभयतांविषयींही मत खालावतें, व जरी त्यांस कोण अधिक गुणी हें ठरवितां आलें नाहीं तरी दोही बाजूंच्या विद्वानांच्या साक्षीवरून दोहोंतही विलक्षण दोष, अविचार व हेका आहे अशी त्यांची समजूत होते. त्यांतून ज्या पक्षास अज्ञान व असमंजस अशा व्यक्तींचें मोठें पाठबळ, त्या पक्षाचा नायक आपलें महत्व राखण्याकरितां त्यांच्या अज्ञानास व असमंजसपणास उत्तेजन* देत असला पाहिजे असें जेव्हां त्यांच्या ध्या-

* उदाहरणार्थ—"आमची अशी समजूत आहे कीं, ज्याप्रमाणें जैन आणि बौद्ध धर्मांचा पराभव होऊन वैदिक धर्माचाच अखेरीस प्रचार झाला, त्याचप्रमाणें आतां राजकर्त्यांचा धर्म म्हणून ख्रिस्ती धर्म कितीही पसरला तरी **अखेरीस सर्व हिंदुस्थान पुनः वैदिक धर्मानुयायी होईल.** इ० इ०" केसरी, २२ आक्टोबर १८९५. ही प्रतिज्ञा करणारानें, वैदिक धर्माचें स्वरूप, हिंदुस्थानच्या लोकसंख्येंतील अन्यधर्मीयांचें प्रमाण, ब्राह्मणांमध्यें अवशिष्ट राहिलेली कर्तबगारी व त्यांची वैदिक धर्मांतील श्रद्धा, वगैरे गोष्टींचा, म्हणजे साध्य, साधक, आणि साधनें यांचा विचार करून हें वाक्य लिहिलें असेल किंवा दुसऱ्या कांहीं नजीकच्या फायद्यावर दृष्टि देऊन लिहिलें असेल हें केसरीचे भोळे वाचकही सांगतील.

विद्याभ्यास करीत आहे, अशी स्थिति अनेक ठिकाणीं पाहण्यांत येते. माता-पितरांचे हाल पाहवत नाहींत, व अभ्यासी मुलांच्या चावळेपणास सीमा दिसत नाहीं; यामुळें अनेक कुटुंबांची दुर्दशा झालेली आहे. परंतु जो तो म्हणतो यास उपाय काय ? ब्राह्मण ज्ञातीच्या कर्तबगारीची, उद्योगाची व मिळकतीची यावरून कोणासही कल्पना येईल. **बुद्धीच्या व शरीराच्या ऱ्हासाबरोबरच ऐहिक सुस्थितीचाही ऱ्हास होत आहे.** भोंवऱ्यांत सांपडलेल्या माणसाप्रमाणें जों जों अधिक तडफड करावी तों तों आणखी खालींच जाण्याचा क्रम सुरू आहे. आपलें जग प्रथम अत्यंत संकुचित करून घेऊन नंतर त्यांतच शेवटपर्यंत तडफड करून हानि पावणारी अशी दुसरी भूपृष्टावर मनुष्याची जात नाहीं. किल्ल्यांत शत्रूंनीं कोंडल्यावर जेव्हां पुरवठा संपत येतो तेव्हां जशी आंतील सैन्याची स्थिति होते तशी कर्तृत्वहीनतेमुळें व निरुद्योगामुळें ब्राह्मण ज्ञातीनें आपली आपण स्थिति करून घेतली आहे. दुष्ट शिक्षण, अनिष्ट आचार, कोते विचार, निरुद्योग आणि पारतंत्र्य असे जे अहंकाररूप किल्ल्याचे पांच मजबूत बुरूज त्यांचें उपासमारानें ठार होईपर्यंत आम्ही जवानमर्द ब्राह्मण गडी कांहीं विजातीय मर्दुमकीनें संरक्षण करीत राहणार कीं काय कोण जाणें !

८०. ब्राह्मणांची योग्यता सर्वत्र कमी होत आहे. गेल्या कांहीं दिवसांपासून असें दिसूं लागलें आहे कीं, बहुसमाजांत ब्राह्मणांची योग्यता अथवा प्रतिष्ठा हळू हळू कमी होत चालली आहे, व ब्राह्मणांसही ही गोष्ट कळून येऊन त्यामुळें ते इतर जातीयांस वारंवार पुढाकार देत आहेत; व आपण मागें राहूनच सर्व सूत्रें चालन करीत आहोंत अशी मनांतल्या मनांत समजूत घालून समाधान पावत आहेत. ही स्थिति ब्राह्मणांस येत आहे यांत संशय नाहीं; व ती कां येत आहे या प्रश्नाचें उत्तर देणेंही फारसें कठीण नाहीं. (अ) देशाभिमानाकरितां व देशसेवेकरितां जे नाणावलेले आहेत त्यांच्या मतें हा परिणाम सरकारची ब्राह्मणांवर जी चक्रदृष्टि आहे तिचा होय. परंतु दुसऱ्या अनेक सुज्ञ ब्राह्मणांच्या मतें समाजांत जे शेंकडा दहापांच लोक स्वतंत्र असतात, त्यांपैकीं कांहीं उद्धाम होऊन त्या स्वातंत्र्याचा अविचारानें उपयोग करितात, व सरकारासच केवळ नव्हे, तर त्यांचे जे बंधु सरकारी नौकरींत आहेत त्यांसही आपल्या लिहिण्याबोलण्यानें व धामधुमीनें नाखुष करितात. या स्थितीचा प्रतीकार करण्याची नौकरमाणसांस उमेदही नसते व संधीही मिळत नाहीं; व त्यामुळें ते उदासीन राहतात. त्यांच्या औदासीन्याचा परिणाम असा होतो कीं, जे थोडे लोक आम्हीच सर्वांचे पुढारी म्हणून समाजापुढें मिरवतात, त्यांइतकेच बाकीचेही अविचारी आहेत असा सरकारचा समज होतो. या समजामुळें सेवापाशांत गुंतलेल्यांचें नुकसान होतें, अपमान होतो व योग्यता कमी होते हें सांगायास नको च. आपणांस जी गोष्ट पसंत नाहीं ती आपल्या नांवावर विकत आहे असें पहात असतांही आपण सरकारी

नौकर म्हणून स्वस्थ राहणें हें नौकरलोकांस इष्ट नाहीं. त्यांनीं एकवट होऊन व जीं थोडीं स्वतंत्र व तशींच विचारीं माणसें आपल्या अभिप्रायाचीं असतील तीं आपल्या साहाय्यास घेऊन आपलीं मतें प्रसिद्ध करणें अवश्य आहे. सरकारी आफिसरांचे ब्राह्मणांविषयीं व्यर्थ दुराग्रह होण्यास नौकरीवर असलेल्या विचारी पुरुषांचें औदासीन्य कारण होतें यांत विलकुल शंका नाहीं. परंतु जे सरकारी नौकरींत शिरतात व परतंत्र होतात त्यांस कुटुंबभरणापलीकडे व आपल्या संकुचित कर्तव्यापलीकडे कांहींच दिसनासें होतें, त्यामुळें त्यांच्या बुद्धीस व शरीरास अकाळीं जीर्णता येते, त्यांच्या मनोवृत्ति शांत होतात, व ते हालचालीच्या कामास नालायख होतात. कुटुंबांतल्या कुटुंबांत होत असलेली हानि देखील त्यांस दिसेनाशी होते, दिसली तरी तिचा प्रतीकार कसा करावा हें कळत नाहीं; तेव्हां असली मंडळी सामान्य समाजाच्या हिताहिताच्या भानगडींत कशाची पडते ! ही शेंकडा नव्वद लोकांची स्थिति सांगितली.

८१. (ब) ब्राह्मणांचें वजन कमी होण्याचें जें दुसरें कारण दिसतें तें आपसांतील दुही हें होय. ही दुही दुरून पाहणारास असें दिसतें कीं, या दुहींत कोणताही एक पक्ष आपणांमध्यें गुण अधिक किंवा विचार अधिक, व म्हणून समाजाचें अग्रणीत्व आपल्याकडे असावें असें प्रतिपादीत नसतो; तर प्रत्येक पक्षाची वागणूक अशी कीं दुसऱ्या पक्षाचे दोष अधिक आहेत, ते समाजास घातक आहेत, व तो पक्ष सर्वस्वी निंद्य आहे असें पाहिजे त्या मार्गानें सिद्ध करायाचें, व त्यावरून स्वपक्ष दुसऱ्याहून वरिष्ट आहे व त्याची सरशी झालीच पाहिजे असें लोकांस अनुमान करायास लावायाचें. स्वपरपक्षांच्या गुणांचा विचारच नसायाचा. दोषांचें प्रमाण मात्र मोठ्या निकरानें ठरविलें जायाचें. अशी दुही पाहून त्रयस्थ माणसांचें उभयतांविषयींही मत खालावतें, व जरी त्यांस कोण अधिक गुणी हें ठरवितां आलें नाहीं तरी दोही बाजूंच्या विद्वानांच्या साक्षीवरून दोहोंतही विलक्षण दोष, अविचार व हेका आहे अशी त्यांची समजूत होते. त्यांतून ज्या पक्षास अज्ञान व असमंजस अशा व्यक्तींचें मोठें पाठबळ, त्या पक्षाचा नायक आपलें महत्व राखण्याकरितां त्यांच्या अज्ञानास व असमंजसपणास उत्तेजन* देत असला पाहिजे असें जेव्हां त्यांच्या ध्या-

---

* उदाहरणार्थ—"आमची अशी समजूत आहे कीं, ज्याप्रमाणें जैन आणि बौद्ध धर्मांचा पराभव होऊन वैदिक धर्माचाच अखेरीस प्रचार झाला, त्याचप्रमाणें आतां राजकर्त्यांचा धर्म म्हणून ख्रिस्ती धर्म कितीही पसरला तरी **अखेरीस सर्व हिंदुस्थान पुनः वैदिक धर्मानुयायी होईल.** इ० इ०" केसरी, २२ आक्टोबर १८९५. ही प्रतिज्ञा करणारानें, वैदिक धर्माचें स्वरूप, हिंदुस्थानच्या लोकसंख्येंतील अन्यधर्मीयांचें प्रमाण, ब्राह्मणांमध्यें अवशिष्ट राहिलेली कर्तबगारी व त्यांची वैदिक धर्मांतील श्रद्धा, वगैरे गोष्टींचा, म्हणजे साध्य, साधक, आणि साधनें यांचा विचार करून हें वाक्य लिहिलें असेल किंवा दुसऱ्या कांहीं नजीकच्या फायद्यावर दृष्टि देऊन लिहिलें असेल हें केसरीचे भोळे वाचकही सांगतील.

नांत येतें व पोक्त विचाराच्या माणसांशीं त्याचा वेवनावही त्यांच्या पाहण्यांत येतो, तेव्हां अशाचें प्राबल्य चांगल्या उत्तम खटपटींतही नाशकारक होईल असा त्यांचा ग्रह होतो. याप्रमाणें या दुहीचा परिणाम आहे, व कुणबी, मुसलमान, पार्शी, राजेरजवाडे, सरकारी अम्मलदार व इतर युरोपियन गृहस्थ यांचा ब्राह्मणांविषयीं गैरभरंवसा झाला आहे. जेव्हां कांहीं प्रसंगीं ते ब्राह्मणांशीं सार्वलौकिक कामांत मिळतात, तेव्हां ते मोठी सावधगिरी ठेवितात ! कारण, प्रामाणिकपणा, दीर्घ उद्योग, दिलेल्या वचनाचें पालन, निरपेक्षपणें कर्तव्य तेवढेंच करायाचें असा शुद्ध निश्चय व आपलाच हेका, आपलीच प्रतिष्ठा व आपलेच बेत जरी सर्वस्वी साध्य झाले नाहींत, तरी कर्तव्यापासून ढळायाचें नाहीं असा पूर्ण निग्रह-हे अमोलिक व अत्यावश्यक गुण आपल्या अंगीं आहेत, असें फार थोडया स्वतंत्र ब्राह्मणांनीं निःसंशयपणें दाखविलेलें आहे, व या उलट समजूत होण्यास त्यांपेकीं पुढें पुढें निराविणारांनीं पुष्कळ वेळां संधी दिली आहे. ही गोष्ट सिद्ध करण्यास ब्राह्मणेतरांचा दुराग्रहमूलक पुरावा नको आहे; खुद्द ब्राह्मणांकडूनच तो मिळविण्यास अडचण पडणार नाहीं. ही बाकी राहिलेल्या शेंकडा दहांची स्थिति होय.

८२. परंतु नौकरींत गेलेल्यांचा आळस, व बाकी राहिलेल्यांचा अविचार, आपसांतील दुही, व प्रसंगविशेषीं दिसून आलेले अनेक दुर्गुण, या सर्वांचा विचार एकीकडे ठेविला, तरी देखील ब्राह्मणांच्या खटपटींत आपण न पडणें हेंच रास्त आहे, असें हल्लीं स्वतंत्र युरोपियन, पार्शी, मुसलमान व उत्तम शिक्षण मिळालेले दुसऱ्या इतर जातींचे लोक समजूं लागले आहेत. या गोष्टींचीं कारणें वर दिलेल्या कारणांहून भिन्न आहेत व तीं दोन सदराखालीं येतात. (क) ब्राह्मणांच्या कित्येक आचारविचारांत, धर्मसंप्रदायांत, व रीतीभातींत मोठे स्थूल दोष आहेत; त्यायोगें अन्याय, निर्दयता, दुर्विकार, दुराचार, वगैरे कित्येक अत्यंत गर्हणीय दोष व्यक्तिमात्रांत येतात, व त्यांचे दुष्परिणाम ज्ञातींतील प्रत्येक व्यक्तीस क्रमाक्रमानें आज नाहीं तर उद्यां बाधक होतात. ही स्थिति स्वतः ब्राह्मणांस कशी समजत नाहीं ! ती इतरांस कळून त्यांनीं ते दोष दाखविल्यास ब्राह्मणांचा प्रयत्न केवळ पांघरूण घालण्याचा कां असतो ! खऱ्या पौरुषोत्साहानें ते दोष दूर करण्याचा कां नसतो ! या प्रकारचा विचार ब्राह्मण ज्ञातीच्या खऱ्या अनुकंपकांसही जेव्हां येतो, व इतर ज्ञातींत जेव्हां त्याविषयीं चर्चा सुरू होते, व स्वतः ब्राह्मणांस प्रत्युत्तर विचारतां ते असमाधानकारक आहे असें जेव्हां दिसतें, तेव्हां निंदक व अनुकंपक उभयतांसही ब्राह्मणाची योग्यताच कमी वाटते, व ज्ञानाचा आणि शिक्षणाचा सत्परिणाम ज्यांवर होत नाहीं अशा तऱ्हेचे हे लोक आहेत असें मनांत येऊन त्यांचें मन अविश्वासानें भरतें, व सर्व कामांत ते ब्राह्मणांपासून दूर राहूं पाहतात. मुंबईस कांहीं दिवस राहून ब्राह्मणांविषयींचे इतर जातीच्या वजनदार पुरुषांचे उद्गार ऐ-

कत राहिल्यास अशी स्थिति फार आहे असें कोणाच्याही लक्षांत येईल; व मुंबईच्या सार्वजनिक कामांत ब्राह्मणांची पुष्कळ पिच्छेहाट झाली आहे, असेंही दिसून येईल. याप्रमाणें ही प्रत्यक्ष स्थिति पाहून कित्येक ब्राह्मण विद्वानांस अत्यंत खेद होतो, परंतु दुसऱ्या कित्येकांस मोठा राग येतो. इतर ज्ञातींनीं धर्मांत, रीतीभातींत व चालवर्तनांत सुधारणेच्या नांवाखालीं युरोपीयांचें अनुकरण केल्यामुळें त्यांनीं आपलें किती नुकसान करून घेतलें आहे याविषयीं त्यांचीं व्याख्यानें व लेखमाला सुरू होते; अहंकाररूप किल्ल्यांत निश्चेष्ट पडलेले श्रावक व वाचक पूर्णपणें समाधान पावून पूर्ववत् गाढनिद्रेच्या वश होतात, व अशुभ स्वप्नाप्रमाणें सुधारणेची भीति क्षणमात्र चित्तास उद्विग्न करून विलयास जाते. परंतु याप्रमाणें अज्ञान लोकांस भुरळ पाडणाऱ्या दुरभिमानी कोपिष्ट ब्राह्मण वक्त्यांच्या व लेखकांच्या लक्षांत येत नाहीं कीं ज्या जातींनीं वर सांगितल्या प्रकारच्या अनुकरणरूप सुधारणा करून आपलें नुकसान करून घेतलें आहे त्याच जाती वळावत आहेत; त्यांचा उद्योग, त्यांची संपत्ति व त्यांचें महत्व वाढत आहे; त्यांस येथेंच नव्हे तर परदेशांतही नांवलौकिक मिळत आहे; त्यांचेंच औदार्य व परोपकारित्व गाजतें आहे; व त्यांसच पुढें करून आपण मागें चालण्याचा ब्राह्मणांस प्रसंग येत आहे. याच इतर जातींची संतति ब्राह्मणांच्या संततीहून विद्येंत, उद्योगांत, कर्तबगारींत, आणि सर्व बाबतींत पुढें जात आहे, व उभयतांच्या सामन्यांत ब्राह्मणांच्या संततीस मागें हटावें लागत आहे. ज्या सुधारणांचे हे असे परिणाम आहेत, त्या जरठबुद्धि सुधारणाभीरु वृथापंडितांच्या मतें नुकसानीच्या ठरल्या म्हणून काय झालें ?

८३. (ड) ब्राह्मणांपासून अलग राहण्याचा ज्यांचा हल्लीं कल दिसतो त्यांपैकीं एका प्रकारच्या लोकांचें हें वर्णन झालें. त्यांमध्येंच आणखी दुसरा प्रकार उत्पन्न होत आहे तो आतां सांगतों. ब्राह्मणांच्या चळवळीपासून अखेरीस कांहीं फायदा होत नसल्यास त्याबद्दल कित्येक विचारी पुरुष फिकीर करीत नाहींत, परंतु त्या योग्य आहेत किंवा नाहींत या गोष्टीचाच त्यांस संदेह येतो. ही गोष्ट स्पष्ट करण्याकरितां असें समजूं कीं, सामान्यतः सर्व रयतेच्या हिताची किंवा रयतेवर होणारा निष्फळ जुलूम दूर करण्याविषयींची कांहीं मोठी खटपट आहे व सर्व ब्राह्मण या कामीं एकदिलाचे आहेत. सुशिक्षित व विचारी असा अन्यजातीय मनुष्य आपलें अंग या खटपटींत घालण्यापूर्वी हित कोणत्या प्रकारचें व जुलूम कोणत्या प्रकारचा म्हणून विचारतो. तेव्हां त्यास पुढील प्रकार मुख्यत्वेंकरून दाखविण्यांत येतात असें समजूं:-हिंदुस्थानच्या सीमेवर निष्कारण लढाया आरंभिल्यामुळें जी खजिन्यांत तूट आली आहे ती भरून काढण्याकरितां पुढील वर्षीं जमाबंदी एक कोटीनें वाढविण्याचा सरकारचा हेतु आहे. व म्हणून सरकार एक नवा कर बसवीत आहे; याच विचारानें सरकार नेटिव्ह नोकरलोकांचे

पगार व संख्या कमी करीत आहे; व असें असून मोठ्या पगाराच्या व अमलाच्या जागा नेटिव्हांस देण्यास सरकार नाखुष आहे; त्या जागा कित्येक प्रसंगीं पगार वाढवून युरोपीयांस देण्यांत येत आहेत; नेटिव्हांच्या पात्रापात्रतेचा सरकारांत विचार होत नाहीं; इत्यादि.

या गोष्टींचा विचार करतांना वरील मनुष्य असें पाहतो कीं एक कोटि रुपये उत्पन्न करण्यास चार कोटि माणसांवर दरसाल चार आणेप्रमाणें कर वाढविला पाहिजे. रयतेमध्यें निदान चार कोटि माणसें चांगलीं कर्तीसवर्ती असलीं पाहिजेत; व हीं इतकीं या देशांत कुटुंबें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. जमीनमहसूल, फारेस्टची व इतर मालमत्ता विकून होणारा वसूल व भांडवल खर्चून उत्पन्न केलेल्या बाबींचा दरसाल येणारा फायदा, हे सरकारचे बाजवी उत्पन्नाचे मार्ग सोडून बाकीच्या करांचें प्रत्येक कुटुंबावर प्रमाण बसवितां तें फार तर तीन किंवा चार रुपये बसतें, व प्रश्न असा कीं या चार रुपयांचे सव्वाचार करणें जुलमाचें होईल काय ! या प्रश्नाचा विचार करतां रयतेची स्थिति कशी काय आहे तें तो पाहतो. युरोपीय देशांत वर्षांतील आदितवार व सण सोडून बाकीच्या सर्व दिवसांत दररोज दहा तासप्रमाणें सर्व गरीबलोकांस, आबालवृद्धांस, कष्ट करावे लागतात, व त्यांवरील करही एथल्यापेक्षां अधिक प्रमाणाचे आहेत, व ह्मणून त्यांत एक पैसाही वाढल्यास मोठा ओरडा होतो. ही गोष्ट साहजिकच आहे, कारण रयतेच्या उद्योगाची सीमा झाल्यावर त्या उद्योगाच्या प्राप्तींतून दरसाल अधिकाधिक हिस्सा मागणें सरकारास रास्त नाहीं. परंतु या देशांत पहावें तों सेंड्यापाड्यांत जो रयतेचा मोठा भाग भरलेला आहे, त्यास वर्षांतून जितके दिवस कामाचे, तितकेच निदान विसाव्याचे असें दिसतें. अशा रयतेच्या कर्त्या पुरुषांस एक दिवस अधिक श्रम करायास लावून त्यांकडून त्या दिवसाची मजूरी राजकारणाकरितां घेतल्यास अन्याय होईल काय ! इकडील लोकांचा आळस, निरुद्योग व भिकारी दशेंत राहण्याची हौस पाहून पुष्कळांस त्यांचा तिरस्कार येतो; व कराचें ओझें वाढलें तरच हे आळशी लोक कांहीं उद्योग करितील व जें सरकारास देतील त्याहून अधिक मिळविण्याची त्यांस चटक लागून ते आपली स्थिति सुधारतील असें त्या विचारी माणसास वाटतें. व कर कमी करा असें सरकारास ह्मणण्यास तो तयार होत नाहीं.

उद्योगाच्या कामांत सरकार आड येत नाहीं; कोणाच्या स्वतंत्र धंद्यावर सरकारचा डोळा नाहीं; व जेव्हां सरकार उद्योगाच्या प्राप्तीवर कर बसवितें, तेव्हां तो मोठ्या विचारानें बसवितें असें त्या विचारी माणसाच्या ध्यानांत येतें. ज्या उद्योगावर कर बसवायाचा तो उद्योगच नाहींसा होऊन उद्योगही नाहीं व करही नाहीं, असें कदापि होत नाहीं. व्यापाऱ्यांनीं आपमतलबानें कितीही हाकाहाक केला, तरी श्रमाचे पैसे निघून व भांडवलाचें व्याज निघून शिवाय जो निर्वाह

फायदा उरतो त्याचा अंश सरकार मागतें, या गोष्टीस अपवाद नाहीं. तेव्हां उद्योगाची गोष्ट एकीकडे ठेवून, नोकरांच्या पगारांचाच विचार करतां, अन्य जातीय माणसास वाटतें, जर नेटिव्हांच्या पगाराचें मान सरकार कमी करीत असेल तर हा केवळ व्यापार आहे. सरकारास माणसें मिळतात तरी कशीं ? राज्याच्या केवळ व्यवस्थेस कमी खर्च लागावा हेंच उचित आहे, व उत्तम माणसें फुकट किंवा थोड्या पगारावर मिळत नाहींत म्हणून मोठे पगार ठेवावे लागतात; कोणत्याही सुधारलेल्या देशांत कमी पगारावर हवीं तशीं माणसें मिळाल्यास सरकार त्या स्थितीचा फायदा घेतेंच. हिंदुस्थानसरकारचा यांत काय दोष आहे ! कमी पगारावर लोक राहण्यास तयार होतात हेंच आश्चर्य !

युरोपांत शिक्षण मिळालेले लोक एतद्देशीय शिक्षणानें तयार झालेल्या लोकांपेक्षां श्रेष्ठ असतात, त्यांनीं पुष्कळ पाहिलेलें असतें व त्यांस विचाराच्या, परिश्रमाच्या व अवलोकनाच्या चांगल्या संवयी लागतात, व ते नौकरीच्याच कामास नव्हे, तर उद्योगधंदे व कारखाने चालविण्याच्या कामास, सुधारणांच्या कामास व लोकशिक्षणाच्या कामास विशेष लायक होतात. अशी समजूत केवळ युरोपियन लोकांतच आहे असें नाहीं, तर ती राजेरजवाडयांत होत आहे, पार्शी व मुसलमान यांमध्यें होत आहे, गुजराथी लोकांतही तिचा अंकुर उगवत आहे व ब्राह्मणज्ञातींत ती मुळींच नाहीं असें नाहीं. इतर ज्ञातींत तीं इतकी दृढ होत चालली आहे कीं ज्यांस ऐपत आहे ते आपल्या मुलांस युरोपीय शिक्षणाचा पूर्णत्वानें किंवा अल्पांशानें लाभ करून देण्यास चुकत नाहींत. अशा समजुतीच्या लोकांनीं नेटिव्हांस उच्च प्रतीच्या जागा देण्याच्या बाबतींत उदासीन रहावें यांत नवल नाहीं. ते असा विचार करितात कीं, ब्राह्मण असो वा कोणीही असो, ज्यास उत्तम बॅरिस्टरचें काम लागतें तो युरोपियनावांचून दुसऱ्याकडे जात नाहीं; उत्तम डाक्टराची किंवा शस्त्रवैद्याची गरज लागते त्यास युरोपियनाकडे जाण्याखेरीज उपाय नसतो; उत्तम एंजिनियराची, प्रोफेसराची; कारखान्याच्या म्यानेजराची, किंवा कोणत्याही प्रकारच्या उत्तम माणसाची गरज लागल्यास तो युरोपियन असणें सर्वांसच इष्ट वाटतें; व या नौकरीच्या एका कामांतच उत्तम अंमलदार नेटिव्हांत एतद्देशीय शिक्षणानें तयार होतील असें मानण्यास काय कारण आहे ? व जर होतील असें मानणें झालें तर त्यांच्या उपयुक्ततेचें एकंदर प्रमाण फार कमी धरलें पाहिजे. या प्रकारें विचार करणारे आहेत. नेटिव्ह संस्थानांत नेटिव्ह अंमलदारीचे वर्णनीय परिणाम कोठें दिसत नाहींत. नवीन कायदे करणें झाल्यास, नवीन सर्व्हे करणें झाल्यास, नवीन राजवाडयाचा नकाशा करणें झाल्यास, म्हणजे सर्व प्रकारच्या ज्ञानकलाकौशल्याच्या कामांस युरोपियन कां लागतो ! हा परिणाम तरी पोलिटिकल एजंटाच्या निव्वळ हट्टाचा नसावा. याप्रमाणें विचार करून पुष्कळ लोकांचा ब्राह्मणांच्या खटपटीस मदत करण्याविषयींचा निरुत्साह होतो. व जे

थोडे तीस मदत करण्यास तयार होतात ते अन्यजातीचे गृहस्थ, आपलें नुकसान न होतां व राज्यकर्त्यांजवळची आपली पत कमी न होतां झाल्यास ब्राह्मणांच्या अर्थीं आपलाच फायदा, व निदान तूर्तांतूर्त पुढारीपणाचा मान तरी ठरलेला, अशीं सर्व तंत्रें पाहूनच सहाय होतात.

ब्राह्मणांची योग्यता कमी होण्याचीं याप्रमाणें चार भिन्न कारणें आहेत. त्यांपैकीं कोणतेंही शुद्ध मत्सराचें आहे असें ह्मणतां येत नाहीं, व त्यांवरून ब्राह्मणांच्या अंगचे दोषच त्यांस जागोजाग नडतात असें स्पष्ट दिसून येतें.

भाग ९ वा.

शरीरसामर्थ्याचें महत्व.

८४. **शरीरसामर्थ्याचें महत्व ब्राह्मणांस बिलकुल कळेनासें झालें आहे,** ह्मणून ते त्याविषयीं अत्यंत बेफिकीर असलेले दिसतात. नित्याच्या व्यवहारांत हरप्रसंगीं मनुष्याचा मान राहण्यास शरीरसामर्थ्यासारखें दुसरें साधन नाहीं. प्रथमदर्शनीं मनुष्याबद्दल बहुमान उत्पन्न होण्यास त्याची शरीरसंपत्ति कारण होते; प्रथमदर्शनीं मनुष्याबद्दल निरस्कार उत्पन्न होण्यास शरीरसंपत्तीचा अभाव कारण होतो. शरीरसंपत्तीवांचून योग्य हक्कांचा उपभोग घेतां येत नाहीं; शरीरसामर्थ्यावांचून उद्योग व परिश्रम होत नाहींत; शरीरसामर्थ्य कोणत्या कामीं लागत नाहीं असें नाहींच; व तें गमावणारा स्वतःसच अपकार करून घेतो असें नाहीं, तर पुढील संततीवरही मोठे अनुपकार करून तिची कृतज्ञता गमावितो. कोणीही स्वतःच्या शरीरसामर्थ्याची हानि करून घेणें ह्मणजे स्वतःच्या ज्ञातीमध्यें गुप्तपणें विषवृक्षाचें बीजारोपण करणें होय; व हें एक दूरपरिणामी महापातक गणिलें पाहिजे. शरीरसंपत्तीविषयीं उदासीनता कोणीही विचारी पुरुष योग्य ह्मणणार नाहीं. असें असतां विचारी व अविचारी ब्राह्मण गृहस्थांचीं मुलें क्षीण होत आहेत, त्यांस अकालीं वृद्धावस्था येत आहे, तीं अल्पवयांत मरत आहेत, त्यांचा जिकडे तिकडे पाडाव व पिच्छेहाट होत आहे; परंतु या गोष्टींकडे सर्वांचें दुर्लक्ष आहे. **ब्राह्मणांत विचार आणि कृति यांचा परस्पर कांहीं संबंध उरला नाहीं,** याचें हें उत्कृष्ट प्रमाण होय. इकडे पंखाचें एक एक पिस गळून पडत आहे, तिकडे उंचाहून उंच भरारी मारण्याची तडफड चालली आहे; व आतां दहा पांचही पिसें अंगावर उरलीं नाहींत व प्राणोत्क्रमणाची वेळ आली एथपर्यंत व्यक्तिमात्राचा असा हा वंध्य प्रयत्न चालायाचा !

रस्त्यानें जाण्याचा सर्वांस सारखा हक्क आहे, परंतु ब्राह्मणांचीं मुलें चापडीं कुणब्यांच्या मुलांस चकवून अडचणींतून जातात. कुणब्यांची पांच चार टवाळ

मुलें तालमीच्या दारीं कट्ट्यावर बसून पांच पन्नास ब्राह्मण मुलें रस्त्यानें जात असल्यास त्यांच्या कुचेष्टा करितात; तीं मुलें बिचारीं तिकडे लक्ष न देतां खालीं पडलेली टोपी उचलून घेऊन आपल्या वाटेनें जातात. हौदावर ब्राह्मणाचा मान नाहीं, आगगाडींत नाहीं; जेथें म्हणून स्वतः आपल्या हक्कांचें तत्क्षणीं संरक्षण करायाचें असतें तेथें तें ब्राह्मणाच्यानें होत नाहीं, व दिवाणी फौजदारी करण्यास फुरसत नसली किंवा ऐपत नसली तर तेवढे हक्क आपणांस नाहींतच असें समजून ब्राह्मण गडी स्वस्थ बसतो. तोंडाच्या जोरानें व पोषाखानें काम होत नाहीं असें पाहिलें कीं श्रीमंत, वजनदार, तापट, कसाही ब्राह्मण गृहस्थ असो तो ताब्यावर आलाच. त्याची तक्रार वर्तमानपत्रांकडे, व त्याची हळहळ वर्तमानपत्रांच्या वाचकांस. याप्रमाणें जे हक्क मिळाले आहेत, जे साहजिकच आहेत, तेही संभाळण्याची पंचाईत ब्राह्मणांस पडूं लागली आहे.

८५. शरीरसंपत्तीवांचून असलेल्या हक्कांचा उपभोग घेतां येत नाहीं या गोष्टीचीं दुसरीं अनेक प्रत्यंतरें विचारी वाचकास सुचतील. कित्येक हक्क मिळविण्यास व ते राखण्यास नुसती शरीरसंपत्तिच लागते असें नाहीं तर शिवाय द्रव्यसंपत्तिही लागते. या गोष्टीच्या प्रत्यंतराकरितां एक दोन उदाहरणें घेतों. असें समजूं कीं, ज्याप्रमाणें व्हालंटीयर होण्याची परवानगी युरेजन व पार्सी यांस मिळाली आहे त्याप्रमाणें ती पांच चार वर्षांच्या खटपटीनें सुशिक्षित व कुलीन ब्राह्मणांसही देण्यांत आली. व्हालंटीयर होण्यास मिलिटरी नियमांप्रमाणें जें शरीराचें प्रमाण लागतें तें असें–उंची निदान ५ फूट ६ इंच असावी; छातीचा घेर निदान ३ फूट असावा, व वजन सुमारें १३५ पौंड असावें; शरीर निरोगी व सुदृढ असावें, व्यायाम सहन होईल इतकी अंगांत ताकत असावी, दृष्टि मंद झालेली नसावी, इ०. या प्रकारच्या डाक्टराच्या परीक्षेंत जे पास होतील त्यांची संख्या नवीन पिढींतील कुलीन व सुशिक्षित मंडळींत बोटांवरच मोजतां येईल असें वाटतें. व कांहीं थोडीं वर्षें गेल्यावर सर्व महाराष्ट्रांतील सर्व ब्राह्मणांत मिळून एका कूर पुरते लोक निघतील कीं नाहीं व शिवाय, त्यांमध्यें व्हालंटीयर होणारास जो खर्च सोसावा लागतो तो चालविण्याची ऐपत असेल कीं नाहीं या गोष्टीची मोठी शंका आहे. या बाबतींत खटपटही बंद झाल्यासारखी आहे तिचें कारण हेंच तर नव्हेना?

म्युनिसिपालिटींत सुशिक्षित, विचारी व अनुभविक माणसें यावीं अशी सरकारची मनापासून इच्छा आहे. प्रमुख म्युनिसिपालिट्यांची सर्व व्यवस्था स्वतः पाहण्याचा हक्क सरकारानें कांहीं वर्षांनीं लोकांस दिला असें समजूं. आतां महाराष्ट्रांतील प्रमुख म्युनिसिपालिट्यांमध्यें आजमितीस लोकांकडून व सरकाराकडून जे लोक मेंबर म्हणून **निवडले** व **नेमिले** जातात, त्यांच्या शिक्षणाची, विचारीपणाची, अनुभवाची व उपयोगित्वाची निःपक्षपातानें तुलना करून सरासरी प्रमाण मांडावें, व वर्षानुवर्ष या तुलनेंत निवडलेल्या लोकांच्या योग्यतेचें प्रमाण वाढत आहे कीं

कमी होत आहे तें पहावें. यानंतर आणखी कांहीं वर्षांनीं काय स्थिति होईल तिचा अदमास करावा, व नंतर मुनिसिपालिटीचे सर्वच सभासद लोकांनीं निवडलेले आहेत असें ग्रहण करावें. मग जो फेरफार झालेला दृष्टीस पडेल तो अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे, शहरवासी जनांचें त्यायोगें हित होईल कीं अहित होईल याविषयीं निःस्पृहपणें निर्णय सांगावा. मला वाटतें हा निर्णय नवीन संपादिलेल्या हक्कास प्रतिकूळ होईल. आपल्याच लोकांनीं केलें म्हणून तें झांकून ठेवायाचें, त्याबद्दलची सरकारपर्यंत तक्रार न्यायाची नाहीं, असा प्रकार हल्लीं सुरू आहे, म्हणून मुनिसिपालिट्यांची स्थिती दिवसेंदिवस सुधारत नसूनही त्यांची कांहीं थोडी अब्रू राहिलेली आहे. मुंबईच्या इंग्रजी वर्तमानपत्रांप्रमाणें जेथें तेथें पत्रें असलीं व आपली गैरसोय होतांच कमिटीच्या अब्रूची पर्वा न करितां तक्रार करणारी युरेजन, पार्शी, वगैरे मंडळी जागोजाग राहिवाशी असली, तर सांप्रत मिळालेला हक्क लवकरच जाण्याची पाळी येईल. अशी कमिट्यांची स्थिति आहे कीं नाहीं याचा प्रत्येकानें विचार करावा व तिचें कारण शोधावें. एक असें दिसेल कीं निवडणुकीच्या वेळीं व त्यानंतर मेंबर होणारास व त्याच्या पक्षीयांस फार अंगमहिनत करावी लागते व विलक्षण आवेश अंगांत आणावा लागतो. **हीं अंगमहिनत करण्याचें ज्यांस सामर्थ्य आहे व ज्यांच्या सुशिक्षितपणामुळें बहुमान उत्पन्न होऊन तशीच अंगमहिनत करणारी दुसरी मंडळी ज्यांभोंवतीं गोळा होत आहे, असे सुशिक्षित, अनुभवशीर लोक कमी कमी होत चालले आहेत.** दुसरें असें लक्षांत येईल कीं अंगमहिनत हा जिन्नस स्नेहानें, वजनानें व पैशानें मिळण्यासारखा आहे व सुशिक्षणापेक्षां पैशास तो लवकर आपल्या हस्तगत करून घेतां येतो. इकडील मतदारांची स्थिति पाहिल्यास असें दिसतें कीं ज्यांस आपल्या हक्कांचें महत्व कळत नाहीं किंवा ते हक्क कोणाच्याही स्वाधीन केले तरी सारखेंच हिताहित व्हावयाचें अशी ज्यांची कल्पना असते, अशा मतदारांची संख्या मोठी आहे व असायाचीच. हे मतदार या कारणानें आपल्या फायद्याकरितां आपले हक्क विकण्यास तयार असतात. ते विकण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. उदाहरणार्थ, कोणी त्यांवर पैसे कमावतो किंवा तृर्तांतृर्त दुसरा कोणताही प्रापंचिक फायदा करून घेतो; कोणी त्या हक्कांचा उपयोग करितांना स्नेह, भीड, मुरवत यांकडे नजर देतो; कोणी दुरभिमान किंवा क्रोधमद्मत्सरादि मनोवृत्तींस वश होतो; इत्यादि. आपल्या व इष्टमित्रांच्या खटपटीनें, पैशानें, वजनानें, दहशतीनें, भावी फायद्यांची आशा उत्पन्न करून, तृर्तांतृर्त फायद्याचें चिन्ह दाखवून, हरतऱ्हेनें मतदारांस आपलेसे करून घेणारे, व जरी अशा खटपटी आरंभीं केल्या तरी सभासद झाल्यावर आपल्या शिक्षणास योग्य व रहिवाशांचें ज्यांत खरें हित आहे, अशींच कार्यें हातीं घेऊन तडीस नेणारे, असे उद्योगी ऐपतदार सुशिक्षित ब्राह्मण लोक नव्या पिढींत किती आहेत! बहु-

समाजांशीं संबंध येतो तेव्हां आरंभापेक्षां पर्यवसानावर विशेष लक्ष देणेंच इष्ट असतें. सर्व देशांत राजकारणी पुरुष असेंच करितात. राजकारणी महत्वाकांक्षा सफल होण्यास प्रथम दीर्घ उद्योग, नंतर द्रव्यादि साधनें, व त्यानंतर शिक्षण व सुविचार उपयोगीं पडतो. हल्लीं यांपैकीं पहिलीं दोन फार थोडया ब्राह्मणांस अनुकूल आहेत, व तिन्हीं एकत्र असल्याचीं फारच विरळ उदाहरणें आहेत. अशिक्षित लोकांची याहून फार निराळी स्थिति आहे. कमिटीचा सभासद होणें व त्या द्वारें मान किंवा फायदा मिळविणें, या कामीं उद्योग व पैसा उपयोगीं पडतो ही गोष्ट त्यांपैकीं पुष्कळांस हळू हळू समजूं लागली आहे; रहिवाशांचें हित, लोकसेवा, महत्वाच्या प्रश्नांचा सुविचार, वगैरे गोष्टींची कमिटींत गरज असते असें त्यांस वाटत नाहीं व असलीच तर कोणी तरी ती कैशी तरी भागवीलच, तेवढ्याकरितां सुलभ असलेला मान व फायदा आपण गमावूं नये असा त्यांचा निश्चय होतो. उद्योगाच्या व पैशाच्या बळानें ते सभासद निवडले जातात, व सुशिक्षित, अनुभवशीर परंतु साधनहीन ब्राह्मणांची पिच्छेहाट होते. जे लोक सुशिक्षित आहेत, त्यांमध्यें जर अंगमहीनत करण्याची शक्ति, लोकांस वश करण्याचीं साधनें व पेशाची अनुकूलता नसेल तर राजकारणी हक्क मिळाले तरी त्यांपासून त्यांस किंवा त्यांच्या बंधूंस फायदा होत नाहीं, ते त्यांस उपभोगितां येत नाहींत, किंवा पूर्णत्वास आणितां येत नाहींत; या गोष्टींचें हें एक उदाहरण नूतन सर्वांच्या लक्षांत येण्याजोगें आहे.

८६. म्युनिसिपालिटयाप्रमाणेंच दुसऱ्या अनेक सार्वजनिक संस्था, ज्या सुविचार व सुधारणा यांच्या वृद्धीकरितां (केवळ करमणुकीकरितां नव्हे) उद्योगी, चैतन्यदार व सुशिक्षित लोकांनीं पंधरा वीस वर्षांपूर्वी स्थापित केल्या, त्यांस जोर व महत्व कां येत नाहीं, त्यांची उत्तरोत्तर सुधारणा कां होत नाहीं, व त्यांच्या द्वारें लोकहित होण्याचें प्रमाण कमी कमी कां होत आहे ! केव्हां केव्हां त्या मुळींच मोडून जाण्याचें किंवा त्यांपासून अहित व बेअब्रू होण्याचें दुश्चिन्ह कां दिसत आहे ! वास्तविक पाहतां शिक्षित लोकांची संख्या वाढत चालली आहे; मुलें देखील अशिक्षित राहिलेलीं नाहींत ! या प्रश्नांचें उत्तर वरकरणीं विचार करणारे देशाभिमानी लोक बहुधा असें देतील कीं, सरकारचा हल्लीं सुशिक्षितांवर मोठा कटाक्ष आहे, त्यांस होतां होईल तों सरकार प्रतिकूल असतें, व सरकारी आफिसर दुराग्रही व दुष्ट असतात, त्यामुळें सुशिक्षितांचें कांहीं चालत नाहीं. परंतु अशी स्थिति राजकारणी सभांची कदाचित् असेल, परंतु इतर सभांची कां असावी ? वक्तृत्वोत्तेजक सभेसही मांद्य आलें तर त्याचें कारण हेंच काय ? विचारी मनुष्यास असें दिसून येईल कीं, बुद्धीचा अकालीं ऱ्हास झाल्या मुळें शिक्षित-(सुशिक्षित ह्मणणें बराबर होणार नाहीं)-शिक्षित लोकांमध्यें सुविचारांची स्फूर्ति कमी झालेली आहे, व सुविचाराच्या मदतीस लागणारे मानसिक

श्रम, उदात्त मनोवृत्ति, प्रबळ महत्त्वाकांक्षा व दृढनिश्चय हे गुण लुप्त होत चालले आहेत. शारीरिक ऱ्हासामुळें दीर्घ उद्योग किंवा अंगमहिनत होईनाशी झाली आहे. अनेक गोष्टी साध्य करितां येत नाहींत तर एकीच्याच मागें लागून ती तडीस न्यावयाची, इतकेंही धैर्य शिक्षितजनांत राहिलेलें नाहीं. सभेस जावयाचा प्रसंग आल्यास तो हवा खाण्याच्या वाटेवर असल्यास जावयाचें, किंवा कोणाची टर उडून, किंवा दुसऱ्या प्रकारें, गम्मत होणार आहे असें कळल्यास; परंतु कर्तव्य म्हणून क्वचितच.

वर सांगितल्या प्रकारच्या संस्थांच्या कामीं शिक्षित व अशिक्षित यांचा मार्ग जोंवर अगदीं भिन्न असतो तोंवर त्या कधीं मोडतात, कधीं अर्धवट जीवंत असतात, व कधीं एखाददुसऱ्या भल्या माणसाच्या प्रयत्नानें त्यांकडून थोडें हित होतें. परंतु शिक्षित आणि अशिक्षित यांचा अशा संस्थांच्या कामीं मतभेद असेल तर हल्लीं त्यांची भयंकर स्थिति होते. अशिक्षितांमध्यें शिक्षितांपेक्षां शरीरसामर्थ्यही अधिक व उद्योगही अधिक आहे. शिवाय उद्दिष्ट हेतु सिद्धीस नेण्यास चांगलीं साधनें असतील तर बरें, नाहींतर वाईट साधनेंही त्यांच्या उपयोगीं पडतातच. मग अशा झटापटींत शिक्षितांचा पाडाव होण्यास उशीर काय ? ज्याप्रमाणें राजकीय बाबतींत, त्याप्रमाणेंच सामाजिक व इतर सर्व बाबतींत, आपल्या हक्कांचा उपभोग घेण्यास व त्यांस पूर्णत्वास आणण्यास शिक्षणावांचून इतर साधनें पाहिजेतच; त्यांत मुख्य म्हणजे शरीरसामर्थ्य, दीर्घ उद्योग आणि पैसा. अशिक्षितांशीं प्रसंग असल्यास **जशास तसें व दोन हात वर**, आरंभापेक्षां पर्यवसानावर विशेष दृष्टि, अशी सुशिक्षितांची तयारी पाहिजे. नाहींतर बाप व्याख्यान देत आहे, व मुलगा मुलांत मिसळून अप्रासंगिक टाळ्यांचा व हंशाचा गजर करीत आहे ! शिक्षक वर्गांत सुधारणेचा बोध करीत आहे, व सुट्टींत मुलें त्याच्या उपहासाचे वर्तमानपत्रांतील लेख वाचून करमणूक करीत आहेत ! अशी स्थिति साहजिकपणें होते. आपली फौज आपल्या पूर्ण अमलांत देखिल्याखेरीज, तिचें सामर्थ्य व कर्तृत्व वाढविल्याखेरीज, व तिचा प्रसंगीं उपयोग करितां येईल अशी सदोदित तयारी असल्याखेरीज, कोणाही महत्कार्यास आरंभ करणें किंवा परपक्षास सामना देणें उचित नव्हे. पालकांनीं आपलीं मुलें अनावर होऊं देतां कामा नये; शिक्षकानें बोधग्रहणास अपात्र अशा मुलांचा संग्रह आपल्या शाळेंत करूं नये; संस्थापकांनीं अपात्रजनांस संस्थेंत शिरण्यास वाट ठेवूं नये. असें केलें तरच प्रत्येकास आपलें काम थोडें तरी निर्भयपणें करितां येतें.

८७. **ब्राह्मणांस शरीरसामर्थ्य कमावणें अशक्य आहे काय ?** कित्येकांचें असें म्हणणें पडतें कीं ब्राह्मणांत शरीरसामर्थ्य येणें अशक्य आहे. '**सिद्धं ह्येतद्धि क्वचि वीर्यं द्विजानां बाह्वोर्वीर्यं यत्तु तत्क्षत्रियाणाम्**। या वचनावर त्यांचा पूर्ण भरंवसा दिसतो. परंतु पुराणांतील कथा वाचून किंवा अगदीं अलीकडचा

कोण आपल्या तेहास वाचून हें वचन सर्वकाळ सारखेंच खरें मानिलें पाहिजे असें दोघांचेही ;. कांहीं दिवसांपूर्वी क्षेत्रस्थ ब्राह्मणांचा शरीरसामर्थ्याबद्दल लौकिक

८८ कणचे ब्राह्मण पूर्वी जेव्हां स्वतः आपलें शेत पेरीत असत (किंवा हल्लीं विलः असतील) तेव्हां त्यांचें शरीरसामर्थ्य इतर कोणाहीपेक्षां कमी असे असें है. गतां येणार नाहीं. तसेंच पूर्वी जेव्हां शहरोशहरीं तालमी असत तेव्हां इतर ज्ञातींप्रमाणेंच ब्राह्मणज्ञातींतही भयंकर तालीमबाज मंडळी असे. हल्लींही कित्येक भिक्षुकांच्या व पूर्वीच्या चालीच्या गृहस्थघराण्यांत, विशेषतः खेडयापाडयांत, दांडगी ब्राह्मणमंडळी दृष्टीस पडते. व जे तरुण गृहस्थ हल्लीं ' ब्राह्मण तिंतका जात्याच अशक्त ' असें प्रतिपादित आहेत त्यांनींच आपल्या पूर्वीच्या एकदोनच पिढ्यांची हकीकत ऐकिल्यास पुष्कळांस स्वतःच्या पूर्वजांच्या सामर्थ्याच्या कांहीं तरी चमत्कारिक गोष्टी कळून येतील. जे ब्राह्मणजातीय लोक विद्याभ्यासा ऐवजीं काचाडकष्ट करीत आहेत ते, ह्मणजे आचारी, पाणके वगैरे, शरीरानें तरुणपणीं चांगले चळकट असतात, व जर खराब झालेले असले तर तो बहुधा दुर्व्यसनांचा परिणाम असतो. ब्राह्मणांनीं शरीरसामर्थ्याबद्दल हताश होण्याचें बिलकुल कारण नाहीं; जे हताश झालेले दिसतील ते शरीरसामर्थ्य कमावण्यासच नव्हे तर त्याचें महत्व कळण्यासही नालायक झालेले असले पाहिजेत. त्यांस अकालीं प्राप्त झालेल्या शारीरिक व मानसिक वार्धक्याचें हें फळ होय.

इंग्रजी ग्रंथ वाचले असतां असें दिसून येतें कीं तिकडील लोकांमध्यें साहजिक समजूत अशी आहे कीं, जो चांगल्या स्थितींत वाढलेला गृहस्थ तो मोलमजुरी करून किंवा धंद्याचे कष्ट करून वाढलेल्या मनुष्यापेक्षां बांध्यानें मोठा असतो एवढेंच नव्हे, तर शक्तीनेंही भारी असतो. मनुष्य कोणत्या दर्ज्याचा आहे हें कपडयावरून व मुद्रेवरूनच नव्हे, तर शरीराच्या बांध्यावरून व उंचीवरूनही ओळखतां येतें. जे चांगल्या घराण्यांतील इंग्लिशलोक इकडे येतात ते पाहिले असतां व मिलिटरीमध्यें जे खालच्या प्रतीचे लोक असतात ते पाहिले असतां ही गोष्ट खरी आहे असें दिसून येतें. आक्सफर्डच्या विद्यार्थ्यांची व जवळच्या शहरांतील रहिवाशांची केव्हां केव्हां झटापट उडते, तींत रहिवाशांचा बहुधा पाडाव होतो असें म्हणतात. आतां ही तिकडील स्थिति योग्यच आहे व ती विरुद्ध असेल तरच आश्चर्य असें दिसतें. कारण काबाडकष्ट करणाराचें अन्न कमी दर्ज्याचें असायाचें, वस्त्र कमी दर्ज्याचें असायाचें, व उद्योगांत एका नाहीं तर दोन अवयवांस कांहीं विशेष प्रकारचें चलन देण्यांत त्याचा सर्व दिवस जायाचा. या अशा व्यवस्थेनें त्याचें शरीर कसें उत्तम तयार व्हावें ? गृहस्थाची सर्व व्यवस्था याहून चांगली, अन्नवस्त्र चांगलें, औषधपाणी लागलेंच तर तेंही चांगलें, व हरतऱ्हेचा व्यायाम घेण्यास बाल्यावस्थेंत व तारुण्यांत मोकळीक. अशा त्यांच्या स्थितींत शरीर कां चांगलें वरिष्ट प्रतीचें तयार होऊं नये !

आमच्या इकडची स्थिति पाहिल्यास मोलमजुरी करणाराचें पोट गुण लुप्त गृहस्थास डुरकावतें. याचें कारण ईश्वर आपणांस बऱ्या स्थितींत ठेवू होईनाशी अन्नवस्त्र व व्यायामाची उत्तम संधी देतो, परंतु ती आपण गमावून बसतों मग लाकांहीं थोडें ओझें उचलणें झाल्यास हमालास बोलावा ! कांहीं घरची आभेत लावणें झाल्यास गड्यास हाक मारा ! ऐपत आल्यास शरीरासही घोड्याच्या पा यांनीं चलन द्यावयाचें व पोटाचा अकटोविकट डेरा तयार करायाचा ! ह्यापैकी कित्येक गोष्टी आम्ही आपला मान राखण्याकरितां करितों; व ही मान राखण्याची संवय इतक्या पराकाष्टेस जाते कीं खेळायाचे ब्याट क्रीडास्थानीं नेण्यास शिपाई पाहिजे; काठी, छत्री, जोडा इकडून तिकडे करण्यास किंवा रस्त्यानें जवळ बाळगण्यास शिपाई पाहिजे; टांचणी घरीं नेऊन पोंहोंचविण्यास शिपाई पाहिजे, इत्यादि. हा सर्व प्रकार अधिकाराचें व अंमलदारीचें भूषण गणिलें जात आहे! कित्येक फार श्रीमंत घराण्यांतील स्त्रीपुरुषांची मिजास याहीपलीकडे कांहीं अविश्वसनीय सीमेस जाऊन पोहोंचली आहे असें ऐकतों ! श्रीमंताचीच तऱ्हा सांधेल तितक्या अंशांनीं गरीब ब्राह्मणकुटुंबेंही उचलीत आहेत. ही त्यांची दुःस्थिति व तिचे भावी संततीवर घडणारे दुष्परिणाम मनांत आणिले असतां, जेव्हां पैसा दोन पैसे वांचविण्याकरितां स्त्रिया घरींच दळणकांडण करीत व पैसा दोन पैसे वसूल करण्याकरितां पुरुष दोन चार कोस धांव मारीत, तेव्हांचा तो काळ बरा म्हणावा लागतो. पैशाचा इतका लोभ प्रशंसनीय नसेल, परंतु शरीराची इतकी उमेद प्रशंसनीयच होय.

कोणीही ब्राह्मण गृहस्थाच्या विद्याभ्यासी मुलानें आपण जात्याच अशक्त असें समजून शरीरसामर्थ्याविषयीं निराश होण्याचें कारण नाहीं. जो त्याविषयीं उमेद धरील त्यास तें कष्ट करणाऱ्या मनुष्यापेक्षां अधिक सुलभ आहे. कारण अन्नवस्त्र चांगलें असल्यास शरीराचें पोषण उत्तम होतें; व ज्यास निदान पोटापुरतें दोनवेळ मिळतें त्यानें व्यायाम योग्य रीतीनें केल्यास शरीराच्या पोषणापासून मेंदूच्या जागीं बळकट स्नायु उत्पन्न होतात. फुरसतीच्या वेळीं शारीरिक श्रम करण्याची उमेद अंगीं असल्यास कुस्तीची माहिती, काठीनें किंवा तलवारीनें पट्टा खेळण्याची विद्या, व मुष्टियुद्ध, या सर्व गोष्टी अनुकूल करून घेतां येतात. अशा कलांपुढें नुसत्या आडदांड शरीराचें काय चालणार ? जर मुलांनीं याप्रमाणें आपलीं शरीरें तयार केलीं नाहींत तर आईबापांनीं पंचवीस वर्षेपर्यंत पालनपोषण करण्याचे जे श्रम केले व कुटुंबाच्या काळजातूंन मुक्त करून जी स्वतंत्रता दिली तिचें मुलांनीं काय सार्थक केलें ? परंतु आमच्या अजागळ विद्यार्थ्यांस हा असा विचार कधीं येतच नाहीं. त्यांमध्यें शरीरसंपत्तीची हौस नाहीं, जी काय हौस ती अभ्यासाची. गरीब व श्रीमंत ब्राह्मणांची एकसारखीच स्थिति आहे. रस्त्यांत कोणी धटामस्करी केल्यास गरीब ती सोसून घेतो, फार श्रीमंतास शिपायाच्या जोरावर

कोण आपल्या वाटेस जाणार आहे अशी धमक वाटते, आगगाडींत व अन्यत्र दोघांचेही प्रसंगविशेषीं सारखेच हाल होतात.

८८. शरीरसामर्थ्याच्या उणीवीमुळें नवीन ब्राह्मण विद्वान् हवापाण्यासंबंधानें विलक्षण कुप्त्या काढूं लागले आहेत. पुण्याची हवा अलीकडे फार बिघडली आहे असें पुष्कळांचें मत झालें आहे. वाईट हवापाण्यामुळें अजारी लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे असें डाक्तरलोकही ह्मणूं लागले आहेत. येथील एका विद्वान् डाक्तरानें भरमंडळींत वाईट हवापाण्यामुळें रोगांचीं सूक्ष्म बीजें कशीं उत्पन्न होतात व तीं मनुष्यास कशीं बाधा करितात याविषयींचा स्वतःचा अनुभव मोठ्या सात्विक भावानें एकदा मला सांगितला. तो म्हणाला, ' एके दिवशीं मी आपलें शेत पहायास गांवाबाहेर गेलों; तें शेत उसाचें असल्यामुळें त्यास पूर्वी कधीं सोनखत घातलेलें होतें. मी गेलों तेव्हां शेत चांगलें वाढलें होतें, व त्यानें पुष्कळ दिवस पाणी साठलें होतें त्यामुळें घाण किंवा अमंगलपणा थोडाही नजरेस येत नव्हता. यावरून मला थोडें आंत जाऊन शेत कसें तयार झालें आहे हें पाहण्याची बुद्धि झाली. झाडें एका बाजूस करून वाट करून देण्यास मजबरोबर कुणबी शेतकरी होता. मी फारसा आंत न जातांच परत आलों, परंतु तेवढ्यांतच कांहीं रोगबीजें श्वासोच्छ्वासावाटें रक्तांत मिसळलीं कीं काय कोण जाणें. मी दोन तीन महिने फारच अजारी होतों, आतां हा नुकताच बरा झालों आहें. अजाराचें कारण वर सांगितलें तें असावें किंवा दुसरें एक असावें. मी ज्या खोलींत निजतों त्या खोलीच्या माऱ्यावर पावसाळ्यांत गळलें होतें. ही वर झालेली ओल हळू हळू खालीं उतरून महिना दोन महिन्यांनीं ती माझ्या खोलीच्या गिलाव्यास येऊन पोहोंचली असावी. गिलावा शुद्ध मातीचा नसतो, तो तयार करितांना त्यांत गवत घातलेलें असतें. या गवतास ही ओल लागून तें सडण्यास आरंभ झाला असावा व त्यामुळें रोगाचें बीज खोलींतील हवेंत उत्पन्न झालें असावें. शिवाय मी राहतों तें घर बांधून कितीक दिवस झाले आहेत. घरांत राहणारांच्या श्वासोच्छ्वासावाटें बाहेर पडणारीं मलद्रव्यें अनेक वर्षें भिंतींत जिरत आलीं असावीं. प्रतिवर्षीं चुन्याचा लेप दिल्यानें तीं नाहींशीं होतात किंवा पक्कीं जागच्या जागीं बांधलीं जातात हें निश्चयानें सांगवत नाहीं. अशा त्या भिंतींत पावसाळा गेल्यावर जी ओल उतरून आली व तिजमुळें गवतावर किंवा आंत जिरलेल्या मलद्रव्यांवर जी रासायनिक किया झाली ती खोलींतील हवा दूषित करण्यास कारण झाली असावी. कसेंही असो, त्या शेतांतील हवेमुळें ह्मणा किंवा खोलींतील हवेमुळें ह्मणा, मला इतके दिवस दुखण्यांत काढावे लागले. बरा झाल्यावर या सर्व कल्पना माझ्या ध्यानांत आल्यावरून मग मी गिलावा आतां तरी वाळला आहे कीं नाहीं हें पाहिलें व तो वाळला आहे अशी मनाची पक्की खात्री करून घेतली ह्मणूनच त्या खोलींत निजण्याचा क्रम पूर्ववत् सुरू राखिला. " आतां डाक्तरसाहेबांच्या अजाराचें सरें का-

रण काय असेल तें असो; तें ठरविण्याचा माझा उद्देश नाहीं. या ठिकाणीं ही गोष्ट सांगण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, जेव्हां विद्वान् डाक्तर याप्रमाणें रोगोत्पत्तीच्या स्वानुभवाच्या गोष्टी कोणत्याही अंतर्गत हेतूनें लहानमोठ्या मंडळीमध्यें बसून सांगतात, तेव्हां ती मंडळी किती भेकड होऊन जात असेल व तिच्या कल्पनातरंगांस केवढी भरती येत असेल ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत आणून द्यावी.

पुण्याची हवा बिघडत चालली आहे अशाविषयीं हल्लीं सर्व सुशिक्षित लोकांत एकवाक्यता दृष्टीस पडते. परंतु हवेमध्यें कोणत्या बाबतींत फेर पडला आहे असें विचारतां कोणासही सयुक्तिक उत्तर देतां येत नाहीं. तीस वर्षांपूर्वी ज्यांनीं पुणें पाहिलें आहे अशीं माणसें या शहरांत थोडीं नाहींत. त्यावेळीं पुण्याचे रस्ते अरुंद व फरशीचे होते. त्यांच्या दोहीं बाजूंस गाळ, केरकचरा व घाण असे. पावसाळ्यांत रस्त्याच्या मधून पाण्याचा प्रवाह चाले व त्यांतूनच माणसें चालत. मोऱ्यांची, पायखान्यांची किंवा घरांची दुरस्ती वर्षेंचीं वर्षें झालेली नसे व होत नसे. त्यावरूनच पुण्याचें चित्र काढिल्यास तें ओळखूंही येणार नाहीं. हल्लीं रस्ते मोठे व प्रशस्त केलेले आहेत, त्यांची स्वच्छता राखली जात आहे. घर, कपडे व अंग स्वच्छ ठेवण्यास पाणी विपुल आहे; साबण स्वस्त झाला आहे. भाजीपाला सडूं नये, तो चिखलांत मांडण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून मार्केट बांधलें आहे. रहिवाशी आपलीं घरें व घरांचे निकाल स्वच्छ ठेवितात कीं नाहीं हें पाहण्याची बरीच चांगली व्यवस्था आहे व ते बहुधा स्वच्छ राखिले जात आहेत. पूर्वीचीं घरें कमी कमी होत आहेत किंवा तींच सुधारून दुरुस्त होत आहेत; कारण हवा, उजेड व स्वच्छता यांचें महत्व लोकांस अधिक कळूं लागलें आहे. लोकांच्या आरोग्यास धक्का लागेल असें स्पष्ट कारण तरी कमिटीनें राहूं दिलेलें नाहीं, व अस्पष्ट कारणांचा कमिशनरांच्या कल्पनाचातुर्याप्रमाणें निःपात होत आहे. दवाखाने इतके झाले आहेत कीं कोणासही औषध दुर्मिळ उरलें नाहीं; औषध देण्याचे देशी व इंग्रजी सर्व प्रकार जारीनें सुरू आहेत. दवाखाने कोठें आहेत हें शोधण्यासही प्रयास नाहींत. मोठ्या हमरस्त्यावर दवा देण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही कारखान्याच्या टोलेजंग पाट्या नाहींत व प्रसिद्ध वर्तमानपत्रांत दुसऱ्या फारशा जाहिराती नाहींत. व्यायामाचें महत्व लोकांस पूर्वीपेक्षां अधिक कळूं लागलें आहे, व जो तो पूर्वीपेक्षां या कामीं अधिक सावध झाला आहे. पूर्वीप्रमाणें हल्लीं रोगांच्या सांथी वारंवार येत नाहींत, वरिष्ट जातींस त्यांची बहुधा बाधा होत नाहीं, व त्यांस फार भयंकर स्वरूप आलेलें गेल्या वर्षांत पाहण्यांत नाहीं. पर्वतीचा सुंदर तलाव कोरडा पडला आहे व खुद्द तलावांतील हवाही व्यायामस्थानास योग्य आहे असा डाक्तरांनीं अभिप्राय दिल्यावरून पुण्याचा जिमखाना तेथें करण्याचें घाटत आहे. उसाची लागण दूर गेली आहे, व कालव्याचें पाणी वर्षभर पुरत नाहीं अशी स्थिति झाली

आहे, तीवरून कालव्याचा खालच्या जमिनींत होणारा झिरपा पूर्वीपेक्षां कमी झाला असावा. याप्रमाणें जें जें हवा बिघडण्याचें कारण कल्पनावन्तांनीं काढिलें त्याचें होईल तितकें कामिटीनें व सरकारानें निवारण केलेलें आहे. या व अशाच दुसऱ्या सर्व गोष्टी ध्यानांत आणिल्या असतां रोगांचीं सूक्ष्म बीजें पुण्याच्या हवेंतून नाहींशीं होत आलीं असावीं, निदान त्यांचें प्रमाण व त्यांचा प्रभाव पुष्कळ कमी झाला असावा, असा साहजिक सिद्धांत निघतो. शिवाय पऱ्यांचीं छपरें करितां येऊं लागल्यामुळें माऱ्यावर गळून भिंतीस ओल येण्याचा गतिबंध करितां येण्यास हरकत उरली नाहीं. देशी व परदेशी फलानी निघाल्यामुळें व गळपट्टे घरीं व बाजारांत विपुल झाल्यामुळें ब्राह्मणांचें शरीराच्छादन पूर्वीपेक्षां उत्तम होत आहे यांत शंका नाहीं. अशा सर्व गोष्टींची पुणेंकरांस अनुकूलता असतां हा हवा बिघडण्याचा बोभाटा दिवसेंदिवस कां वाढत चालला आहे, व त्याविषयीं कां सर्वत्र चर्चा सुरू होते ? या शहरापलीकडेच क्यांप ह्मणजे लष्करची हद्द आहे तेथें हा बोभाटा नाहीं. युरोपियन लोकांस पुण्याचीं हवा सर्व ऋतूंत, व विशेषतः पावसाऱ्यांत, पूर्वीप्रमाणेंच प्रिय आहे. इस्पितळांत हवामानासंबंधानें जीं यांत्रिक अवलोकनें करितात त्यांवरून हवेच्या दाबांत, ओलाव्यांत, उष्णमानांत, किंवा इतर बाबींत ऋतुपरत्वें जे भेद व्हावयाचे ते पूर्वी जसे होत होते तसेच हल्लीं होत आहेत असें दिसतें. वृद्धलोक सांगतात कीं, पूर्वीइतका हल्लीं पाऊस पडत नाहीं व पूर्वीइतकीं वर गळकीं व खालीं ओलसर घरें आतां दृष्टीस पडत नाहींत. विहिरींचें पाणी चढून वर आलें आहे व तें पूर्वी तोंडांत घालवत नसे तें आतां अडचणीच्या वेळीं पिण्यास हरकत नाहीं इतकें गोड झालें आहे. आतां विहिरीच्या पाण्याच्या खोलींत पडलेल्या तफावतीनें जर कांहीं हवेवर दुष्परिणाम घडत असतील, तर तेवढे खेरीजकरून बाकी जे जे फेरफार या शहरांत झालेले आहेत त्यांनीं पुण्याची हवा शेंकडोंपट सुधारली असली पाहिजे. असें असतां विद्वान्लोकांचा अनुभव याच्या विरुद्ध कसा ? या प्रश्नाचें उत्तर काय ? वर सांगितल्या डाक्तरांच्या मतें विहिरीचें पाणी चढून आलें आहे ही एकच गोष्ट सर्व बाकी सुधारणा व्यर्थ करण्यास बस्स आहे, व शुद्ध खडकावर घर बांधून कोणी राहिला व त्यानें शेजारच्या कालव्याचा चार वोटें पाणी चॉलणींरां पाट बागेस पाणी देण्याकरितां जवळ आणिला तर त्यामुळें त्याची प्रकृति बिघडेल. अशाविषयीं नुकत्याच घडलेल्या एका मृत्यूचें त्यांजवळ रामबाण प्रमाण आहे.

८१. परंतु माझा अनुभव याहून अगदीं निराळा आहे व ऋतुपरत्वें उत्पन्न होणाऱ्या अजारांची जात व प्रमाण हीं पाहतां त्याची सत्यता दिसून येईल. किन्येक जुने ब्राह्मण बारा महिने प्रत्यहीं सकाळीं सदाशिवपेठच्या हौदावरून स्नान करून येतांना मी गेल्या वीस वर्षे पाहत आहें. पुण्याच्या हवेंत फेरफार झाला आहे

ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींही नाहीं. कित्येक ब्राह्मण याप्रमाणेंच पहाटे स्नान करून कावडी भरून पाणी पोहोंचवितांना ह्यातारे झालेले आहेत, त्यांस अजारानें गांठलेलें नाहीं व त्यांस ही हवा बिघडल्याची अद्याप वार्ता नाहीं. काबाडकष्ट करणारे लोकांतही हवा बिघडल्याचा बोभाटा नाहीं. तसेंच मारवाडी, गुजराथी, वाणी उद्‌मी लोकांत तो नाहीं. आईबापांच्या दोषानें क्षीण झालेल्या मुलांची गोष्ट निराळी; परंतु जे ब्राह्मण निरोगी आहेत त्यांचीं मुलें बायकांच्या सोंवळ्याओंवळ्यामुळें व विटाळांमुळें नित्य अर्धा दिवस उघडीं असतात, त्यांस पावसाळ्यांतील हवा देखील बहुधा बाधत नाहीं. गलिच्छ घरांत राहणाऱ्या कुणब्यांचीं मुलें रात्रंदिवस उघडीं रस्त्यांत खेळत असतात, त्यांस हवा बाधत नाहीं. भिकारी व त्यांचीं मुलें अन्नावांचून व कपड्यावांचून पाहिजे तिकडे हिंडत असतात व विसाव्यास कोठें तरी पडतात, त्यांस पुण्याची हवा बाधत नाहीं, कदाचित् मानवत असें ह्मणतां येईल. फारच थोड्या ब्राह्मणांच्या स्त्रिया फलाणीचीं जाकिटें घालूं लागल्या आहेत. त्यांचा पोषाख पन्नास वर्षांत बदललेला नाहीं, व ऋतुपरत्वें त्यांत फेर होत नाहीं. वैधव्यादि स्थितीमुळें झालाच तर डाक्तरांच्या मतें त्यांच्या आरोग्यास धक्का बसेल असा तो होतो. या सर्व स्त्रिया पावसळ्यांत छत्रीवांचून पूर्ववत् भिजत आहेत, व पूर्ववत् अनवाणी पायानें ओलींतून, चिखलांतून चालत आहेत. सैंपाघरांत त्या प्रतिरात्रीं सारवून सारवून ओलें करीत आहेत, व रात्रीं घरांतील भांडींकुंडीं घांसून संपेपर्यंत उघड्यावर असतां चौघडीस शिवत नाहींत. अशा या ब्राह्मणांच्याच स्त्रियांकडून, ह्मणजे सुशिक्षितांच्याच मायबहिणींकडून, हवा पूर्वीपेक्षां बिघडल्याची तक्रार नाहीं किंवा दवाखान्यांत त्यांची हवेच्या बाधेमुळें गर्दी होत नाहीं. ज्या दिवशीं ती होईल त्या दिवशीं सर्वच संपलें असें ह्मणावें लागेल !

या सर्व गोष्टी घडतात तरी कशा ? विद्वानांतच हवा बिघडल्याविषयीं इतका बोभाटा कां ? पावसाळा येतांच त्यांतून कसे पार पडूं अशी त्यांस कां धास्ती पडते ? आपणास विजापूर मानवेल कीं नागपूर मानवेल, मुंबई मानवेल कीं महाबळेश्वर मानवेल याविषयीं त्यांमध्यें कां दीर्घ विवंचना सुरू असते ? या प्रकारें पुण्याचीच हवा बिघडली आहे असें नाहीं. ज्या ज्या शहरांत विद्येची वृद्धि फार त्वरेनें झालेली आहे, तेथील ब्राह्मणलोकांत पूर्वीपेक्षां आतां हवा बिघडली ही समजूत उत्पन्न झालेली आहे. नगरच्या एका गृहस्थानें असें मला सांगितलें, मिरजेच्या एकानें सांगितलें. जेथील हवेविषयीं अद्याप फारसा बोभाटा नाहीं तेथील लोकांस विद्येचीं उत्कृष्ट साधनें पुरतेपणीं मिळालीं नाहींत असा तरी एक सिद्धांत करावा; किंवा दुसरा असा करावा कीं इतर ज्ञातींनीं, विशेषतः पार्शी व युरोपियनांनीं, तेथील हवा उत्तम उत्तम असें ह्मणून तिची ख्याति केल्यामुळें विद्वानांस हवा बिघडल्याची तक्रार करण्याचें धैर्य राहूं दिलेलें नाहीं.

याप्रमाणें, शहरदुरस्तींत सुधारणा होत असतां ठिकठिकाणची हवा बिघडत चालली आहे, अशी विद्वानांची समजूत कां ? या गोष्टीचें कारण विद्वानांचें अज्ञान, व तर्कशास्त्र नुसतें त्यांकडून घोकविल्यानें त्यांत अवलोकनशक्ति येत नाहीं किंवा बराबर अनुमान करितां येत नाहीं अशी त्यांची स्थिति, हें होय. भांडवलाच्या व पतीच्या अभावानें ब्राह्मणी कारखान्याच्या बडया एंजिनास कोळसे न मिळून तें थंड झालें व त्याचीं यंत्रें गंजून गेलीं तर त्याच्या अकालिक मृत्यूचें पुण्याची हवा बिघडली हेंच कारण कांहीं दिवसांनीं दाखविण्यांत येईल ! आपला दोष कसा झां कावा व तो दुसऱ्या कोणावर कसा लादावा याविषयीं ब्राह्मणांचें चातुर्य राजकीय, सामाजिक व शिक्षणादि व्यवहारांत दिसून येतेंच; परंतु जेथें दुसऱ्या कोणास दोष देण्याचें साधत नाहीं तेथें हवापाणी, विस्तृत सृष्टि व ईश्वरी योजना यांस दोष देण्यास ब्राह्मणगडी मागेंपुढें पाहणार नाहीं !

९०. शीतोष्णवातांपासून मनुष्याच्या शरीरास बाधा न व्हावी याकरितां शरीरांत अत्यंत सुंदर व्यवस्था केलेली आहे. या व्यवस्थेवर ज्यांची नेमणूक केलेली आहे ते अवयव म्हटले म्हणजे मुख्यत्वें फुप्फूस, रक्तवाहिन्या व स्वेदवाहिन्या हे होत. शरीरास थंडी लागतांच फुप्फूस अधिक काम करूं लागतें व हवेंतील प्राणवायूशीं अधिक रक्ताचा संयोग करून उष्णता उत्पन्न करितें. जणूं काय शरीरांत एक शेगडीच पेटविली जाते. हें तापलेलें रक्त रक्तवाहिन्या सर्व शरीराच्या बाह्य भागांस नेऊ न पोहोंचवितात. याच संधीस स्वेदवाहिन्यांचीं तोंडें बंद होऊन अंग कोरडें पडतें व त्यापासून घामाचें बाष्पीभवन होण्याचें बंद होतें. त्यामुळें त्वचा थंड होण्याचें बंद होतें. जर मनुष्यानें कपडयालत्त्यांनीं शरीरास थंडीची बाधा फारशी पोहोंचूं दिली नाहीं तर या कामीं जेवढें रक्त खर्च झालें असतें तेवढें होत नाहीं; तें दुसऱ्या कामीं लावण्याच्या उपयोगीं पडतें. आतां फार उन्हाळा झाला असें समजल्यास फुप्फुसाचा व्यापार मंद होतो, रक्त तितकें तापत नाहीं, तें थंड पाणी पिऊन पातळ करितां येतें, असें रक्त त्वचेशीं येतांच स्वेदवाहिन्यांचीं तोंडें उघडतात; त्यांवाटें घाम वाहूं लागतो, व घामाचें बाष्पीभवन होतें तेव्हां त्वचा थंड होते. स्वेदवाहिन्यांतून घामाबराबर एक तेलकट पदार्थ बाहेर पडत असतो त्यानें त्वचेस स्निग्धता राहते व वाऱ्यानें ती रूक्ष होत नाहीं. याप्रमाणें या क्रिया इतक्या सप्रमाण चालतात कीं शीतोष्णवातांमध्यें बरेच मोठे फेरफार झाले तरी त्यांची बाधा निरोगी माणसास सहसा होत नाहीं.

आबालवृद्धांनीं भरलेलें एक ब्राह्मण कुटुंब घेऊन त्यांत ऐन थंडीच्या दिवसांत काय दिसतें तें पहा. तान्हें मूल उघडें असतांही त्याचें अंग गरम लागेल; आठ दहा वर्षांचा मुलगा एखादा सदरा चढवून भूगोल घोकीत इकडून तिकडे गर्दीनें जातांना येतांना दिसेल; त्याहून मोठा पंधरा सोळा वर्षांचा मुलगा सदऱ्यावर एखादें जाकीट चेढवून उन्हाच्या बाजूस अंग वळवून अभ्यास करीत बसलेला

दिसेल; त्याहून मोठा वीस वर्षांचा जवान अंगासरसा फालणीचा कपडा चढवून, त्यावर शर्ट जाकीट वगैरे घालून, गळ्यास गळपट्टा गुंडाळून मोठ्या थोरल्या पुस्तकाच्या वाचनांत गुंग झालेला दिसेल; त्याहून मोठा पंचविशीच्या मुमाराचा मनुष्य इतकेच किंवा थोडे अधिक कपडे चढवून वर्तमानपत्रें वाचीत असेल. या सर्वांचा वृद्ध बाप पेन्शन घेऊन धर्मचिंतनास लागलेला असेल व तो पहाटेस उठून अंगावर पंचा व एकेरी बाराबंदी व होक्यास धोतर गुंडाळलेलें अशा शीतनिवारक साधनांनीं शरीराचें संरक्षण करून उघड्या अंगणांत कांहीं क्षुल्लक गृहकार्यें करीतांना दिसेल. त्याची सकाळीं आंघोळ झाल्यापासून तो देवघरांत पूजार्चन करीत उघडा बसलेला आढळेल, व कर्त्या मुलानें मोठ्या ममतेनें पांघरण्याकरितां घेऊनं दिलेली धाबळी घडी घालून जपून खुंटीवर ठेवलली दिसेल. इकडे सकाळचे दहा वाजले, तथापि तरुण मंडळीस कपडे उतरण्याचें धैर्य नाहीं असें आढळेल. ही मंडळी आंघोळी करून सांवळीं नेसलीं तर नेसलीं, नाहीं तर सदरे घालूनच जेऊन शाळेस, कालेजास व आफिसास गेल्यावर वृद्धाची देवपूजा आटपेल व तो भोजन करील. संध्याकाळीं वृद्ध देवदर्शन करून येतो; कपड्यांनीं मढविलेले तरुण व्यायामास गांवाबाहेर स्वच्छ हवेंत जातात. कांहीं दिवस असा क्रम चालल्यावर एके दिवशीं गार वारें सुटतें; त्या दिवशीं व्यायाम करून घरीं आलेल्या तरुण मंडळींपैकीं. के णी अजारी पडतो, बिचारा वृद्ध रातोरात डाक्तरकडे जाऊन औषधपाण्याची तजवीज करितो. याप्रमाणें स्थिति दिसून येईल. तीवरून तरुण विद्वान् पुण्याची हवा बिघडली असें म्हणतो; परंतु ती त्या वृद्धास कां अपाय करीत नाहीं असा विचार त्याच्या मनांत येत नाहीं. आपण व वृद्धानें बाल्यावस्थेंतील दिवसांचा निरानिराळ्या तऱ्हेनें उपयोग केला हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. यौवनदशेंतही उभयतांचा आयुष्यक्रम निराळ्या प्रकारचा. वृद्धाचें सर्व आयुष्य असें गेलेलें कीं क्षुधा प्रदीप्त झाल्यासेरीज त्यानें कधींही अन्न ग्रहण केलेलें नाहीं. तरुणानें क्षुधेच्या मांद्याची वर्षानुवर्ष उपेक्षा केलेली, व शरीरास फुलाप्रमाणें ठेवून मनास इंजिनाच्या चाकाप्रमाणें वर्षेंचीं वर्षें गरारा फिरायास लाविलेलें. यायोगें वृद्धाचें फुप्फूस, रक्तवाहिन्या वगैरे अवयव वृद्धपणींही टणटणीत निरोगी राहिलेले असतात; तरुणाचें फुप्फूस क्षीण झालेलें असतें; रक्तवाहिन्यांमध्यें चुन्याचें कीट बसून सर्वांगांत रुधिराभिसरण मंद झालेलें असतें; अपचनामुळें अन्नापासून रुधिररसाचा पुरवठा शरीरास होत नसतो; व त्वचा कोंवळी व नाजूक होऊन ती आपलीं कामें नीट बजावूं शकत नाहीं. या प्रकारचा हा वृद्धतरुणांत भेद पडलेला असतो व तो सर्व शिक्षणाच्या काळांत उत्पन्न होऊन वृद्धिंगत होत असतो. या स्थितीचें कारण हवापाणी समजावें, कीं युनिव्हर्सिटी समजावी, कीं देशाचें दारिद्र्य समजावें, कीं सरकारचा व सृष्टीचा प्रकोप समजावा, कीं कोणतें समजावें असें

नवीन तरुणांस होतें ! व डाक्टरलोकही या त्यांच्या कल्पनांस उत्तेजन देतात हा कोण अविचाराचा अश्लील प्रकार होय !

११. ब्रह्मदेशांत पांच पन्नास मोठ्या पगाराच्या जागा नवीन झाल्या आहेत, कोणी म्याट्रिक्युलेट किंवा यू. एस्. एफांनीं अर्ज केल्यास त्यांस त्या मिळण्याची शंका नाहीं, असें सांगितलें तर ' आपल्या लोकांस तिकडची हवा सोसत नाहीं ' असें तत्काळ उत्तर मिळेल. इतकें लांब जाण्याचें तर धैर्य होत नाहींच, परंतु माळव्यांत, पंजाबांत, सिंधमध्येंही जाण्यास नवीन विद्वान् नाराजी असतो. ब्रह्मदेश असो, चीन असो, आस्ट्रेलिया असो, तेथें जाण्यास पार्शी किंवा मारवाडी धजतो, परंतु ब्राह्मण धजत नाहीं. पार्शास मद्यमांसाचा विधिनिषेध नाहीं, मारवाड्यास तो ब्राह्मणाप्रमाणेंच आहे व आधुनिक ब्राह्मणांपेक्षां मारवाडी तो विशेष धर्म समजून पाळतो. हा मारवाडी द्रव्यलोभानें स्वदेशांत व परदेशांत पाहिजे तेथें जातो. रानावनांत, पहाडांत, जेथें कोठें माणसाची वस्ती आहे तेथें मारवाड्याचें ठाणें आहेच. त्याची वृत्ति सर्वत्र सारखी; त्याचे कपडे स्वदेशीं व परदेशीं सारखेच. त्यास सर्व ठिकाणची हवा मानवते. द्रव्य संपादनाच्या कामीं युक्त्या काढण्याचा मानसिक श्रम त्यास आहे, व साधारण शिकलेल्या लोकांपेक्षां व्यावहारिक ज्ञान, कायद्याचें ज्ञान, मनुष्यांची माहिती, वगैरे गोष्टी त्याच्या मेंदूंत अधिक भरलेल्या असतात; तो संभाषणांत अजागळ दिसत नाहीं व त्याच्या बुद्धीची तरतरी त्यास जन्मभर सोडीत नाहीं. यावरून असें दिसून येईल कीं, त्याच्या मेंदूस जे श्रम पडतात ते म्याट्रिक. होऊन जन्मभर खरडे घाशींत घसणाऱ्या आळशी ब्राह्मणाहून फार अधिक असतात. तेव्हां त्यास सर्व ठिकाणची हवा कां मानवते, शिकलेल्या ब्राह्मणासच ती कां बाधते, या गोष्टीचा विचार करायास नको काय ?

" आह्मी ऋषिकालापासूनच असे हो ! आह्मांस पैशाचीही पर्वा नाहीं आणि शक्तीचीही पर्वा नाहीं, " असें कोणी अविचारी विद्वान् प्रतिपादन करितात. त्यांस असें कळत नाहीं कीं, ऋषिकाळीं या भयंकर दंडकारण्याच्या ज्या गुहांत किंवा पर्णकुटिकांत तापस लोक रहात होते त्यांमध्यें आधुनिक ऋषिसंततीस एक रात्रही निभावून नेतां येणार नाहीं; झाडांच्या वल्कलांचें परिधान करून घटकाभर देखील थंडींत बसवायाचें नाहीं; कंदमूलांचें भक्षण करून किंवा उंच्छवृत्तीनें शेतांतील दाणे गोळा करून एक दिवसही पोट भरणार नाहीं. ऋषींचें शरीरसामर्थ्य कमी होतें किंवा जंगलच्या हवेस किंवा हिंस्र पशूंस ते भीत होते, असें मानण्यास मुळींच जागा नाहीं. जें अनुमान होतें तें सर्व याच्या उलट. ऋषिंस द्रव्याची अपेक्षा नव्हती हें खरें, परंतु द्रव्याची गरजच लागणार नाहीं अशा प्रकारें ते आयुष्याचा व्यय करीत. त्यांचें ब्रह्मचर्य, त्यांची गुरुसेवा, त्यांविषयीं व त्यांच्या सामर्थ्याविषयीं सर्व ज्ञातींचा बहुमान व राज्यकारणांत त्यांची उदासी-

नता, हे गुण आधुनिक ब्राह्मणांत असते तर तेही परमपूज्य, तेजस्वी वैरागी व नले असते व त्यांच्या शिक्षणपद्धतीचा विचारच करण्याची जरूर नसती. हल्लींचे ऋषि म्हणजे वैरागी होत; त्यांची स्थिति पहा, त्यांच्या प्रवासांची हकीकत ऐका, म्हणजे या हल्लींच्या ऋषींत व हल्लींच्या विद्वानांत शरीरसामर्थ्याचें केवढें अंतर आहे तें लक्षांत येईल. आपण ऋषि नेण्हत व त्यांची बरोबरी करण्यांत फायदा नाहीं. आपली वृत्ति निराळी आहे. आपणांत जे दोष दिसतात ते सर्व बाल्यावस्थेंतील व तारुण्यांतील शिक्षणाचे व दिनचर्येचे दुष्परिणाम होत.

सशक्त ब्राह्मणांचीं तीन चार वर्षांचीं दहा निरोगी मुलें घेऊन तीं आज इंग्लंडांत नेऊन ठेविलीं व तेथें मध्यम स्थितींतील गृहस्थांच्या मुलांप्रमाणें वाढवून मोठीं केलीं तर तीं पुरीं वाढतील, दांडगीं होतील, विद्वान् होतील, इतकेंच नव्हे, तर जगाच्या कोणत्याही भागास पाठविल्यास तीं खुषीनें जातील. ऋषिकाळापासून हा काळपर्यंत त्यांच्या शरीरावर व मेंदूवर झालेले परिणाम त्यांच्या आचरणांत किंवा कर्तबगारींत बहुधा दिसणार नाहींत, दिसलेच तर ते महत्व देण्यासारखे नसतील. आपणांमध्यें अजून चांगला जोम आहे असा भरंवसा ब्राह्मणांनीं धरिल्यास त्यांस सांप्रतची दुःस्थिति सुधारणें अशक्य नाहीं. अजून ऋषींप्रमाणें आफ्रिकेच्या जंगलांत जाऊन राहूं, किंवा भार्गवरामाप्रमाणें अफगाणीस्थानच्या क्षत्रियांवर तोड करूं, किंवा चाणक्याप्रमाणें देशाच्या राज्यसूत्रांचें हवें तसें चालन करूं अशी उमेद धरण्यास ब्राह्मणांस हरकत नाहीं. परंतु त्यांचें शिक्षण बाल्यापासूनच हल्लींपेक्षां फार निराळें असलें पाहिजे व त्या नव्या प्रकारच्या शिक्षणाचा पहिल्यापासून नवा पाया घातला पाहिजे.

भाग १० वा.

ब्राह्मणांच्या कर्तव्यांचें दिग्दर्शन.

९२. आत्मसंरक्षण हें ब्राह्मणांचें पहिलें कर्तव्य होय. राजकारणी खटपटीस ब्राह्मण अगदीं नालायक झाले आहेत, असें येथवर निरनिराळ्या प्रकारांनीं दाखविलें. अन्यायापासून व जुलमापासून रयतेचें संरक्षण करण्याचें मोठें काम एकीकडेच राहिलें, परंतु आत्मसंरक्षणाचेंही काम ब्राह्मणांच्या हातून होण्याचें कठिण होत चाललें आहे. आपण आपल्या स्वतःच्या ज्ञातीची सुधारणा करणें, तिची शक्ति व स्वातंत्र्य वाढविणें, स्वतः योग्यता, थोरवी व संपत्ति कमावून ज्ञातीस ऊर्जित दशेस आणणें, हें निदानचें काम देखील ब्राह्मणांच्या हातून घडून येत नाहीं. या प्रकारचा प्रयत्न करणें त्यांच्या अहंकारास कमीपणा आणतें. प्रसिद्धपणें स्वहित साधणें झाल्यास तें अकटोविकट

परमार्थाच्या रूपानेंच साधिलें पाहिजे, अशी ब्राह्मणांची समजूत आहे. या अशा वर्तनानें ब्राह्मणांची घसरगुंडी इतक्या वेगानें सुरू आहे कीं आणखी दहा पंधरा वर्षें असाच क्रम चालू राहिल्यास सर्वत्र ब्राह्मणांविषयीं तिरस्कार व अविश्वास उत्पन्न होईल. आणखी एक किंवा दोन पिढ्यांतच ब्राह्मणसंतति आपल्या सर्व निकृष्ट स्थितीबद्दल आह्मां हल्लींच्या पालकांस हरएक प्रकारें दूषण देईल. अशा या शोचनीय स्थितींतही स्वसंरक्षणाचा मार्ग कोणास हितावह वाटणार नाहीं. बुद्धीच्या जीर्णावस्थेमुळें चालिश प्रकार पाहूनच ब्राह्मणांच्या चित्तवृत्तीस उकळी फुटते. तापाच्या ऐन भरांत मेंदू तापून जसा कल्पनांस पूर येतो व व्यक्तिमात्रास तो खरा वाटून त्याच्या अवयवांचें तदनुरूप स्फुरण होतें, त्याप्रमाणेंच हल्लीं क्षीणबुद्धि ब्राह्मणांच्या मेंदूची व महत्वाकांक्षेची स्थिति झाली आहे. कार्य कोणतें व साधनें काय, त्यांची योग्यायोग्यता ब्राह्मणांस कळेनाशी झाली आहे. **"सर्व सोपें आहे हो ! परंतु क्षुल्लक विघ्नें येऊन काम तडीस जात नाहीं यास काय करावें ? " असा प्रत्येक कामांत ब्राह्मणांस प्रश्न येऊन त्यांचे हातपाय मोडल्यासारखे होतात; परंतु त्यांस या प्रश्नांतील रहस्य कळत नाहीं !** या सामान्य स्थितीचें उद्घाटन करूं लागल्यास ब्राह्मणांच्या अलीकडील सर्व चळवळींचा उल्लेख करावा लागेल, परंतु तसें करण्यास येथें अवकाश नाहीं. रानटीपणा, चालिशपणा व ज्वरमय मेंदूची स्थिति–असें जिकडे तिकडे आहे कीं नाहीं हें पाहण्याचें शोधक वाचकांकडेच सोंपाविणें बरें. दिशा दाखविण्याकरितां मात्र कांहीं थोडीं उदाहरणें येथें देतों.

आजच्या नाशिक सामाजिक परिषदेसंबंधानें चाललेला दंगा सर्वांच्या डोळ्यांपुढें आहे, तेव्हां या दंग्याचें अंतःस्थ स्वरूप सर्वांनीं लक्षांत आणावें. राष्ट्रीयसभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरावी कीं नाहीं, व एकाच मंडपांत दोन्ही सभा भरल्यामुळें त्यांमध्यें जो संबंध उत्पन्न होतो तो व्हावा कीं नाहीं, हा प्रश्न मुळाशीं आहे. या प्रश्नासंबंधानें विचार करितां सुधारक व असुधारक या दोन विरुद्ध पक्षांचें जें भांडण आहे त्याचें कारण हें कीं, प्रत्येक पक्षाच्या लोकांस असें वाटत आहे कीं या **हिंदुसमाजाचे आह्मीच नायक,** या समाजाचें हितचिंतन करण्याचा आमचाच हक्क आहे, आह्मी त्याचे विचारी मुखत्यार आहों व आह्मी जी दिशा लावून देऊं त्या दिशेस त्याचें सुकाणूं फिरत रहावें. उभयपक्षीय ब्राह्मणवृंदांचें हें भांडण पाहिलें ह्मणजे पूर्वीच्या दंतकथेंतील एका भयंकर प्रसंगाची आठवण होते. पासिफिक (अथवा शांत) महासागराच्या मध्याच्या सुमारास हॉनिलुलु (उ. अ. २२, प. रे. १५७.) ह्मणून एक बेट आहे, या बेटाच्या किनाऱ्यावरील एका बाजूचा कांहीं भाग समुद्रपृष्ठाहून थोडा उंच आहे, म्हणून त्यास लुलुपर्वत असें म्हणतात, व बाकी भाग समुद्रपृष्ठाच्या सपाटीच्याच सुमारास आहे, त्याचें हॉनिप्रदेश असें नांव आहे. हॉनिप्रदेशावरील

राहणारे व त्यांचे सरदार आणि लुलुपर्वतावर राहणारे व त्यांचे सरदार, या उभयतांमध्यें फार प्राचीनकाळीं निरंतरचें जबरदस्त हाडवैर होतें, व त्यांचीं केव्हां केव्हां जीं तुंबळ युद्धें होत त्यांमुळें हें बेट आतां महासागरांत बुडतें कीं काय असा शेजारच्या बेटांतील लोकांस भास होई. अर्ध्या भूगोलावर पसरलेल्या शांत महासागरावर कोणाची सर्वस्वी मालकी आहे, हॉनिवाल्यांची कीं लुलुवाल्यांची, हा प्रश्न त्यांमधील तंट्याचें कारण होता. हॉनिप्रदेशांतील लोकांचें म्हणणें कीं "सर्व पासिफिकचें साम्राज्य आमचें आहे, कारण आह्मी जमिनीवर राहणारे असलों तरी ही जमीन समुद्रपृष्ठाहून दोन इंचहीं उंच नाहीं, व शिवाय आमचे स्वभाव जलचर पशूंशीं जसे जुळतात, आह्मांमध्यें व त्यांमध्यें जें विलक्षण सादृश्य आहे व जो साहजिक स्नेहसंबंध आहे त्यावरून ते पशू आमच्याच पक्षाचे गणिले पाहिजेत. व म्हणून आह्मी पासिफिकचे मालक व या सागराची सर्व हालचाल आमच्या स्वाधीन असली पाहिजे." उलट पक्ष, ह्मणजे लुलुपर्वतावरील लोक अशाच निकरानें आपला हक्क सांगत. ते म्हणत "हा पर्वत काय तो पंचवीस फूट उंच आहे, व या पंचवीस फुटांच्या अंतरामुळें या शांत महासागरावरील आमचा हक्क गेला असें म्हणणें शोभत नाहीं. महासागराचें पृष्ठ उचलून आणून पर्वतशिखरास मिळविण्याचा आमचा सारखा प्रयत्न सुरू आहे, व प्रतिवर्षीं पावसाळ्यांत या बेटाचा जो गाळ वाहून जाऊन समुद्रतळीं बसतो त्यामुळें समुद्रतळ व तसेंच समुद्रपृष्ठ कांहीं थोडें तरी उचलून येत असलें पाहिजे. पर्वतांचे माथे धुवून नेऊन समुद्रतळ भरून काढण्याची क्रिया सृष्टिनियमांमुळेंच सर्वत्र सुरू आहे, तीस लुलुपर्वत किंवा शांत महासागर अपवाद नाहीं. या उभयतांच्या परस्पर भेटीचें कार्य कांहीं थोडया अंशांनीं दरसाल घडत आहे व ही भेट अखेरीस निश्चयानें होणारच व ती केव्हां होईल हें गणितानें कोणासही सहज काढितां येईल. आतां जलचर पशूंसंबंधानें पाहतां त्यांमध्यें व आम्हांमध्यें म्हणण्यासारखा मुळींच भेद नाहीं; आह्मी आकाशास विशेष जवळ गेल्यामुळें आमचा पक्षिवर्गाशीं अधिक स्नेह झाला आहे खरा, परंतु तेवढ्यावरून जलचरांशीं आमचा संबंध तुटला काय! सर्व वातावरण आमच्या स्वाधीन आहे, व त्याच्या छत्राखालीं सर्व महासागर आहे. पक्ष्यांच्या, आमच्या व वातावरणाच्या धामधुमीमुळें हा शांत महासागरही क्वचित् उचंबळतो, हें सर्वांस माहीत नाहीं काय! तेव्हां त्यावर कोणाचें स्वामित्व सिद्ध होतें! आमचें." " हा तंटा पाहणाऱ्या शेजाऱ्यांस हीं युद्धें पाहून आश्चर्य वाटे, व त्यांची पुढें पुढें खात्री झाली कीं पासिफिक महासागर व त्यांतील जलचर जोंवर स्तब्ध आहेत तोंवर या तंट्याचा निकाल लागणार नाहीं व तो बोलूं लागण्याच्या वेळेस हॉनिलुलु हें बेट समुद्रपृष्ठाच्या शेंकडों फूट खालीं गेलेलें असेल, व त्यावरील लोकांचे सांगाडे समुद्रतळीं मिळतील!

या प्राचीन प्रसंगाची आठवण होण्याचें कारण हें कीं हिंदुसमाजाच्या पृष्ठापासून सुधारक व असुधारक यांचें अंतर हॉनिलुलु बेटांतील उभयविध रहिवाशांइतकेंच आहे. सुधारक किंवा असुधारक कोणतेही ब्राह्मण घेतल्यास त्यांमध्यें व इतर सर्व ज्ञातींमध्यें जें साम्य आहे तें पाहिल्यास हॉनिलुलु बेटांतील रहिवाशी व त्यांचे जलचर बंधु यांमधील साम्याइतकेंच आहे. शांत महासागराप्रमाणें हिंदुसमाज स्तब्ध आहे व त्यानें आपलें अग्रणीत्व कोणासच दिलेलें नाहीं. सुधारकांनीं राज्यकर्त्यांचें थोडें अनुकरण करून व त्यांचीं सौजन्याचीं कांहीं तत्त्वें स्वीकारून त्यांशीं स्नेह केला, ह्मणून ते हिंदुसमाजास मुकले असें समजण्यास हिंदुसमाजानें फारच थोडी हालचाल केली आहे. जो तंटा आहे तो ब्राह्मणांत आपआपसांत आहे; व जेव्हां कालचक्राच्या घर्षणानें हिंदुसमाज थोडा जागा होऊन दोन पायऱ्या वर चढून येईल, तेव्हां ब्राह्मणजात कायम असल्यास तीस कोणी विचारील कीं नाहीं हें सांगवत नाहीं. लुलुपर्वतावरील लोकांप्रमाणेंच सुधारक ब्राह्मण जो प्रयत्न करीत आहेत तो एवढाच कीं, अगदीं कनिष्ट गणिलेल्या हिंदु जातींसही जे सामाजिक व धार्मिक हक्क आहेत ते आपणांस मिळावे व त्या जातींचें धर्मपृष्ट वर ओढण्याचें प्रचंड काम आरंभून कालक्रमानें त्या पृष्टास आपणच जाऊन पोहोंचावें. ही स्थिति ध्यानांत आणिली असतां कनिष्ट हिंदु जातींचें कोणाएकास पाठबळ मिळाल्यास तें सुधारकांस मिळावें असें साहजिक अनुमान होतें. परंतु आश्चर्य हें कीं, असुधारक ब्राह्मण मोठा ओरडाआरडा करून आह्मांस हिंदुसमाजाचें पाठबळ आहे असें प्रतिपादीत आहेत व अविचारी लोक कलकलाट कोणाचा मोठा हें पाहून तेवढ्यावरूनच असुधारकांचें ह्मणणें बराबर आहे असें समजत आहेत. हिंदुसमाज तटस्थ आहे, निद्रित आहे, बेफिकीर आहे हें निदान ब्राह्मणांस तरी ओळखत नाहीं.

महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर सर्व जाति धर्मभोळ्या आहेत, त्यांस सामाजिक सुधारणा ह्मणजे काय हें कळत नाहीं, तथापि त्या सर्वांचें राष्ट्रीयसभेस पाठबळ असणें इष्ट आहे व त्यांच्या मनाविरुद्ध कोणतीही गोष्ट करूं नये—हें सर्व असुधारकांचें ह्मणणें कदाचित् कबूल करितां येईल. परंतु सामाजिक परिषदेनें आतांपर्यंत या महाराष्ट्रांतील धर्मभोळ्या लोकांचीं मनें दुखावण्यासारखें काय केलें आहे किंवा पुढें करण्याचें योजिलें आहे? कांहींच नाहीं. तिचीं कृत्यें जुन्या चालीच्या ब्राह्मणांस पसंत नसतील, परंतु हरतऱ्हेचे कुणबी, माळी, सुतार, तांबोळी, जिनगर, कोळी, साळी, महार, चांभार, वगैरे, यांच्या मोठ्या समाजास बाधक असें परिषदेचें एकही कृत्य दिसत नाहीं; कांहीं अंशीं त्यांस पसंत होण्यासारखींच तिचीं मनें आहेत.

कारण कुणबी, कोळी, साळी यांमध्यें विधवाविवाहास परवानगी आहे तींच ब्राह्मणांस असावी; या अन्य जातींमध्यें विधवांचें वपन करण्या-

चा परिपाठ नाहीं, तो ब्राह्मणांतहीं नसावा; या जातींमध्यें मांसाशनादि गोष्टी धर्मसंमत आहेत, त्यांची परवानगी प्राचीन ब्राह्मणांप्रमाणें रुचिवैचित्र्यानुरूप आधुनिकांसही असावी; मुलींच्या लग्नाच्या वयासंबंधानें पाळलीच पाहिजे अशी निश्चित इयत्ता जशी पुष्कळ इतर ज्ञातींत नाहीं तशीच ती ब्राह्मणांतहीं नसावी; ज्ञातीच्या भिन्न शाखांमध्यें झालेल्या शरीरसंबंधाची संतति शूद्रांप्रमाणेंच ब्राह्मण जातीच्या शाखांत लवकर मिसळून जावी; या इतर जातींचे हजारों लोक दर-साल केवळ समुद्रयानच करीत आहेत असें नाहीं तर दुसऱ्या बेटांत (मारिशस, वगैरे) वसाहतीस जात आहेत, व तेथें आपला धर्म पाळीत आहेत, हीच मोकळीक ब्राह्मणांस असावी; स्त्रियांस शिक्षण देऊं नये असा या जातींचा निर्बंध नाहीं, तोच ब्राह्मणांमध्येंही नसावा; इतर जातींत स्त्रीपुरुष एकच धंदा करितात, बराबर कामधंद्यास जातात, रस्त्यानें सर्वांच्या दृष्टीसमोर उभयतां शेजारी चालून संभाषण करीत असतात, इत्यादि, याच सर्व गोष्टी करण्याची परवानगी ब्राह्मणांस असावी; इतर जातींमध्यें सर्व सामाजिक व धर्मसंबंधी पातकांचें प्रायश्चित्त झटलें म्हणजे जातिभोजन हें आहे,तेंच प्रायश्चित्त ब्राह्मणांनींही शक्त्यनुसार घेतल्यास त्यांस त्यांच्या ज्ञातीनें पावन करावें;*—या व अशाच दुसऱ्या कांहीं महत्वाच्या गोष्टींत **इतर ज्ञातींप्रमाणें आपणांस स्वातंत्र्य असावें** म्हणून सामाजिक परिषदेच्या द्वारें सुधारक ब्राह्मण वास्तविकपणें खटपट करीत आहेत व तें इतर ज्ञातींइतकें मिळाल्यास ते पन्नास वर्षें स्वस्थ बसावयास तयार होतील. तेव्हां या त्यांच्या म्हणण्यास कोणते शूद्र आपली संमति देणार नाहींत याचा जुन्या चालीच्या ब्राह्मणांनीं व इतर असुधारकांनीं विचार केला आहे काय! विधवाविवाहासंबंधानें किंवा विधवावपनासंबंधानें ब्राह्मणांनीं आपल्या चालू रूढीच कायम ठेवाव्या, त्याच वेदोक्त धर्मास अनुसरून आहेत, त्याच ब्राह्मणांनीं पाळल्या पाहिजेत, असा कोणत्याही इतर जातीच्या पंचांनीं शास्त्रार्थ दिलेला किंवा दुराग्रह धरलेला असुधारकांनीं पाहिला आहे काय ? मुंबईच्या न्हाव्यांच्या उदाहरणावरून पाहतां या सर्व सुधारणांच्या कामीं इतर ज्ञाति ब्राह्मणांस मदत करण्यास तयार होतील असें दिसतें; निदान त्यांस खरी स्थिति सांगितल्यास जें स्वातंत्र्य त्या जाती अनुभवीत आहेत तें ब्राह्मणांस मात्र नसावें असें त्यांचे पंच म्हणणार नाहींत. परंतु या एकंदर प्रश्नांची व सामाजिक परिषदेची त्यांस वार्ताही नाहीं; सुधारणा या शब्दाचा खरा अर्थ त्यांस कोणीच समजावून दिलेला नाहीं; व म्हणूनच पाहिजे त्यास त्यांच्या नांवावर विकतां येतें. सर्व

*याशिवाय सर्व हिंदुसमाजास लागू अशाही कांहीं सुधारणा सामाजिक परिषदेनें सुचविल्या आहेत, उदाहरणार्थ, लग्नांत खर्च कमी करावा, भांग, गांजा, दारू, अफू, वगैरे मादक पदार्थांचें सेवन करूं नये; पुरुषांनीं बाहेरख्याली असूं नये,इ०. या सुधारणा सर्व जातीच्या समंजस पुरुषांस, खुद्द असुधारकांसही, कबूल आहेत.

मुके व बहिरे आमच्या पक्षाचे आहेत असें म्हणणाराप्रमाणेंच असुधारक ब्राह्मणांची हलींची कृति आहे. व या बेचंद बादशाहीपुढें गरीबगुरीब आपल्या माना वांकवीत आहेत !

वास्तविक विचार करितां **हिंदु ज्ञातीमध्यें ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत जों जों खालीं जावें तों तों धर्माचारांचे प्रतिबंध कमी कमी होत जातात व व्यक्तिस्वातंत्र्य वाढत जातें.** श्रुतिस्मृतिपुराणोक्त शुद्ध धर्माचारांप्रमाणें नित्य वागणारा ब्राह्मण व डाक्तरचें, फिटरचें किंवा यंत्रकलाकौशल्याचें काम करणारा, किंवा मद्यमांसांचें गुप्तपणें सेवन करणारा किंवा स्पर्शास्पर्शाचा विचार न करणारा आधुनिक ब्राह्मण, यांमध्यें हिंदुधर्मप्रणीत वर्णाचारांच्या नियमांअन्वयें भेद पाहतां या दुसऱ्या ब्राह्मणांत शूद्रधर्म अधिक दिसतात; याही इयत्तेच्या पलीकडे स्वातंत्र्य घेऊन कातडीं कमावण्याचें, बूट शिवण्याविकण्याचें वगैरे काम करणारे ब्राह्मण निघाल्यास त्यांच्या कृतींत कांहीं अतिशूद्रधर्म प्रकट होतील. यावरून आधुनिक सुधारणेची दिशा कोणाच्याही ध्यानांत येईल. **प्रत्येक जातीस कनिष्ठ जातींचें धर्माचारांचें स्वातंत्र्य पाहिजे आहे, व वरिष्ठ जातींचें, ज्ञान, सदाचार व संपत्ति पाहिजे आहे.** म्हणून धर्माचारांसंबंधानें, ह्मणजे सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनें पाहतां शूद्रांची स्थिति ब्राह्मणांपेक्षां श्रेष्ठ आहे व जर कुणबीलोकांस योग्य ज्ञान आणि सदाचार अंगीं आणितील तर ते सर्व बाबतींत एकदम ब्राह्मणांच्या पुढें जातील व ब्राह्मणांस त्यांच्या तोंडाकडे बघत बसावें लागेल. सुधारक ब्राह्मणांनीं याकरितां श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मांची सुधारणा करण्याचें सोडून देऊन 'तुकारामपंथाचा' प्रसार करण्याचें व्रीद अंगीकारावें. तुकारामाच्या गाथेंत सामाजिक सुधारकांस हरतऱ्हेचीं नीतिपर बोधाचीं उत्तम प्रमाणें सांपडतील व या अशा धर्मग्रंथांतून अत्यंत सुधारलेल्या धर्मांचीं मूलतत्त्वें, उदाहरणद्वारा किंवा भावार्थद्वारा, काढितां येतील. तुकारामाइतका धर्माचारांत स्पष्टवक्तेपणा व स्पष्ट कर्तृत्व अंगीं आल्यास आणखी काय पाहिजे. तेव्हां जर सामाजिक सुधारणेची वास्तविकपणें वर सांगितलेली दिशा आहे, व ती अनिवार्य आहे, व जर सुधारणा शब्दानें कनिष्ठ जातींचे लोक फसण्याचा संभव आहे, तर स्पष्टपणें शूद्रधर्मांचा किंवा तुकारामपंथाचा प्रसार कां आरंभूं नये ? अहंकारास वश होऊन ब्राह्मणांनीं मोठ्या नांवाखालीं लपंडाव करण्याचें कारण नाहीं. सुधारक ब्राह्मणांस सर्व जातींचें साहाय्य मिळण्यासारखें आहे. सामाजिक परिषद् राष्ट्रीयसभेच्या मंडपांत न भरूं द्यावी अशाबद्दल असुधारकांचा इतका आग्रह कां दिसतो ? परिषदेच्या द्वारें ब्राह्मण विद्वान् आपली निकृष्ट स्थिति जगजाहीर करून इतर जातींचा तिरस्कार किंवा अनुकंपा जोडतात ह्मणून. याप्रमाणें इतर जातींस चढून जाण्यास ब्राह्मणांनीं कारण व्हावें यांत कोणाचाही मुळींच फायदा नाहीं. आपली आपण मनःपूर्वक सुधारणा करावी व दोष ओळखावे हा श्रेयस्कर मार्ग होय.

परंतु पूर्वी सांगितलेंच कीं विद्वान् ब्राह्मणांचें समाधान होण्यास स्वहितही अकटो-विकट परमार्थाच्या रूपानेंच साधलें पाहिजे ! आतां हा सुधारकांचा दोष कबूल केला तथापि त्यांमध्यें एक गुण आहे. तो हा कीं, ब्राह्मण समाजास ते जें दुःख देतात व त्याची ते जी विटंबना करितात ती सर्व जातींच्या सुज्ञ माणसांपुढें मात्र करितात. परंतु असुधारकांचा अविचार याच्या फार पुढें जातो. ते विटंबनेचीं कारणें सर्व जातींच्या असमंजस माणसांपुढें मांडितात व तीं अजरामर व्हावीं ह्मणून त्यांचे अभिप्राय व त्यांचें पाठबळ मागतात. ब्राह्मणजातीच्या वरिष्टत्वाचें उभयपक्षांकडून या प्रकारें संरक्षण चाललें आहे.*

---

* ता. १० नवंबर १८९५ रोजीं सायंकाळीं पुण्यांत एक प्रचंड जाहिरसभा भरली होती. एका जुन्या चालीच्या थोर सत्यवक्त्या गृहस्थानें या सभेच्या सभासदांचा येणेप्रमाणें अदमास केला; सुमारें ३०० ब्राह्मण गृहस्थ, २०० ब्राह्मण मुलें, व ३००० कुणबी माळी, कोळी साळी, भडबुंजे भुसारी, महार चांभार वगैरे मिळून होते. यांशिवाय नुसती थोडा वेळ गम्मत पाहून जाणारीं माणसें पांचचारशें असत, तीं जात तेव्हां दुसरीं त्यांच्या जागीं भरत असा क्रम सारखा सुरू होता. कारण ही बाजाराची जागा होती. हा अंदाज खरा मानून चालण्यास हरकत नाहीं. सभेमध्यें इकडे तिकडे हिंडून कान देऊन ऐकणाऱ्या नशाच दुसऱ्या गृहस्थानें सभेच्या कृत्यांचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें सांगितला :—

वक्ता:—" वेदोक्त धर्म ह्मणजे काय चीज आहे तीं येथील बहुसमाजास कळणार नाहीं, परंतु ब्राह्मणांस तरी कळेल. ही चीज कांहींही असो, महत्वाची आहे असें तुम्ही मान्य कराल, कारण तुम्ही पशू नव्हत, माणसें अहांत. सामाजिक परिषद् राष्ट्रीयसभेच्या मंडपांत भरवून या फाजूड चिजेचा घाण करण्याचा प्रयत्न सुधारकांनीं आरंभला आहे. नुकतीच त्या सभेच्या सेक्रटरीची नोटीस प्रसिद्ध झाली आहे. तींत केशवपनाबद्दल ठराव आहे." (केसरी ता. १२।११।९५)

एक प्रेक्षक:—केस ओपायचे व्हय ?—**दुसरा**—नाहीं लेका, हजामती करायच्या. **प. प्रे.** कोणाच्या ? **दु. प्रे.** वामणांत इतके दिवस राहून एवढ नाहीं कळत ? (हुश् हुश् व गप्प. बसण्याबद्दल तार्काद.)

वक्ता:—पुर्वी संमतिवयाच्या बिलाच्या वेळीं याच परिषदेनें संमतीचें वय बारा वर्षाच्या पुढें नेण्यास सरकारास मदत केली—

एक प्रेक्षक—हें काय दादा ? **दुसरा**—अरे ते बारा वर्षाला फळशोभन व्हायच कायद्यानें बंद केलं ना ?

वक्ता:—त्यावेळीं याच शहरांत तुम्ही सुधारकांस चांगला हात दाखविलात.पण सरकारानें त्यांचेंच ह्मणणें ऐकलें. ह्मणून " राष्ट्रीयसभेचा व सामाजिक परिषदेचा संबंध नको. हें सामाजिक परिषदेचें रोप लहान आहे तोंच खुडून टाका. " (केसरी) ही हरळीची मुळी आहे. ही किती तुडावली तरी दरसाल पाउस पडतांच डगवते. ह्मणून ही जाळून खाक केली पाहिजे.

एक प्रेक्षक—खर बोलला तान्या. या की मांडवाला आग लावून !

वक्ता:—तुम्हा पोरें नाहीं, थोर आहां तेव्हां ही परिषद् येथें भरण्याबद्दल तुमची संमति आहे काय ? मुळींच नाहींना ? वेदोक्त धर्माचें संरक्षण व्हावें, पायमल्ली होऊं नये, म्हणून येथें जमलेल्या सर्व लोकांचें मत आहेना ? "

(पुढें चालू.)

वरील विवेचनावरून कोणाच्याही लक्षांत येईल कीं अन्यजातीय बहुसमाज सुधारकांस मिळण्याचा अधिक संभव आहे, परंतु तो तटस्थ आहे, व त्याच्या नांवावर तिऱ्हाईत लोक हवें तें प्रतिपादीत आहेत. जी दुही आहे ती ब्राह्मणांत आपसांत आहे. व सर्व हिंदुसमाजाचें नायकत्व कोणाचें ह्मणून निष्फळ वाद उभा राहून ब्राह्मणांचीं डोकीं तापत आहेत, लेखण्या धांवत आहेत व अनेक प्रकारचे रानटी प्रकार सुरू आहेत. हिमालय पर्वत किती निश्चल, किती ओसाड, किती थंड, समुद्रापासून किती दूर हें पाहून व वाईट वाटून त्यास समुद्राजवळ नेण्याचा पायाजवळील गोगलगाईंनीं व माथ्याजवळील नाकतोडयांनीं प्रयत्न आरंभिला. गोगलगाईंच्या मतें त्यास हळूहळू ओढीत ओढीत नेणें अधिक इष्ट आहे, नाकतोडयांच्या मतें एकदम उचलून समुद्रतीरीं आणणें अधिक सुलभ आहे. दोघांसही हिमालयास चलन देणें जरूर वाटत आहे, परंतु नाकतोडयांच्या मतें

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

एक प्रेक्षक—हो हो, येदोक्त हजामती झाल्याच पाहिजेत. चार न्हाव्याच ते पोट आहे. आमच्या कुणबटाच्या हजामती करून काय मिळायच आहे. '

दुसरा प्रेक्षक—पोरींची बी लग्न झपाझप झालींच पाहिजेतन्. गरीबगुरीबाला अन्न मिळत, चार दिवस मजा होते दुसर काय पाहिजे '

तिसरा प्रेक्षक—अन् येदोक्त फळशोबन बी आटपून घ्या. भाऊ सोनार ह्मणतोना, 'झाली हो' ३ **बारा वर्षांची जी** ३ ' पण तात्या आता आटपा कि, आठ वाजायला आल, मग गुत्ते बंद होतीलन् पुढें छकडाला आम्हांला जायचहये.

वक्ता:—" आटपलेंच म्हणायाचें. तुमच्या उद्गारांवरूनच तुमचे अभिप्राय स्पष्ट दिसत आहेत. आम्हां वेदोक्तब्राह्मणधर्मप्रसारकांस तुमचें असें पाठबळ आहे म्हणूनच या धर्माचा जाज्वल्यानें सर्व हिंदुस्थानभर पुनः प्रसार होण्याची आशा आहे. आतां रीतीप्रमाणें सभेचे ठराव वाचतों. व हे सर्व तुम्हांस कबूल आहेत अशाविषयीं वर्तमानपत्रांस तारेनें बातमी देतों. "

पुष्कळ प्रेक्षक—(एकदम) आमची बी नांव तारत येऊं या बरका तात्या. तुमच्या बामणाच्या बंडाला आम्हांबी हात लावला हये.

या संभचा मागून जी माहिती निरनिराळ्या पत्रांत छापिली आहे तीवरून हा सारांश अक्षरशः खरा आहे असें वाचकांच्या लक्षांत येईल. रा० ब० रानडे व बानर्जी यांचें **मीड कमी होतें ह्मणुन राष्ट्रीयसभा नाहीं खरी. परंतु कोळयासाळ्यांच्या व भंगीभडबुंज्यांच्या स्त्रियांचें केशवपन होत आहे तें बंद करावें ह्मणुन सामाजिक परिषदेनें ठराव केला आहे काय ?** मग अशा दहा हजार लोकांच्या सभेचें परिषदेविषयीं बहुमत ठरवितांना केशवपनाचा उल्लेख करण्याचें कारण काय ? या कामीं दोन इंग्लेजंग सभा झाल्या त्यांमध्यें गेल्या दोन वर्षातील परिषदेचे ठराव कोळ्यासाळ्यांस कसे बाधक आहेत, त्यांचा उल्लेख करून कां बहुमत घेण्यांत आलें नाहीं ? सुधारक व असुधारक हे दोघेही निरनिराळ्या प्रकारांनीं ब्राह्मणांची निकृष्ट स्थिति कनिष्ट जातींस कळवून त्यांचें पाठबळ मागत आहेत असें यावरून दिसून येईल. हा उभयतांचाही मोठा अविचार आहे.

"गोगलगाई मंद, त्या या कामीं उपयोगीं नाहींत" व गोगलगाईच्या मतें "नाक-तोडे उतावीळ, ते या कामीं उपयोगीं नाहींत." प्रत्येकास काळजी ही कीं या दुसऱ्यांस गप्प करून आपलें हिमालयहिताचें कार्य कसें शेवटास न्यावें! हा हिंदुसमाज हिमालयपर्वतासारखा आहे. हिंदुसमाजास हालविण्यास सरकारचा जुलूम तरी पाहिजे, नाहीं तर पुढें सांगितलेला हृदयप्रवेशाचा मार्ग तरी धरिला पाहिजे. वाक्पांडित्यानें तो हालेल असें समजणें, ह्मणजे गोगलगाईच्या ओढीनें किंवा नाकतोडयांच्या उड्डानानें हिमालयपर्वत हालेल असें समजण्यासारखेंच आहे. ब्राह्मणांस जे लोक निकृष्ट दिसतात त्यांची निकृष्टता रूढिमूलक नाहीं, ती दारिद्र्यमूलक आहे. सुधारणेच्या कामीं ब्राह्मणांची परिषद्द्वारा त्यांस मदत नको आहे, निराळ्याच तऱ्हेनें पाहिजे आहे; व ती त्यांस मिळत नाहीं असें पुढें लवकरच दाखवितों.

ब्राह्मणांच्या ज्वरमय मेंदूच्या स्थितीचें हें एक उदाहरण विस्तारानें दिलें. दुसरीं बालिशतेचीं, रानटीपणाचीं वगैरे कांहीं उदाहरणें देतों, त्यांचा विचारी वाचकांनीं विस्तार करून घ्यावा. हंड्या झुंबरें दाट लावून प्रेक्षणीय रोषणाई करून, गानवादन आणि नर्तन यांची मजा रूपुस्तास लावून, मध्यें उपदेशपर व्याख्यानांची योजना करून, व मग मोठा ब्राह्मणसमाज रात्रभर धर्माभिमानानें सद्गदित झाला व नव्या वीर्योद्रेकानें उचंबळूं लागला असें पाहून देशोद्धरणाचें हें सुचिन्ह मानणें हा बालिश प्रकार नव्हे काय? पूर्वी याच भरतभूमींत जन्मलेल्या दुष्यंत पुत्रानें सिंह व वाघ कसे कान धरून वाकविले हें लहान पांच वर्षांच्या मुलांस सांगितल्यावर, किंवा ज्यांस अद्याप आपली टोपी संभाळतां येत नाहीं अशा अधिक वयाच्या मुलांपुढें मराठ्यांच्या इतिहासांतील वीरश्रीच्या गोष्टी वर्णिल्यावर, त्यांची कल्पनाशक्ति जागृत होऊन तीं जेव्हां टाळ्या पिटूं लागतात, तेव्हां 'हां महाराष्ट्र ब्राह्मणांत अद्यापि पाणी आहे बरें!' असा त्या टाळ्यांवरून सिद्धांत काढणें, परंतु समाजांतील कर्त्या पुरुषांच्या मानसिक दुर्दशेचा विचारच न करणें, हा तर्कशून्य देशाभिमान नव्हे काय? मोठ्या राष्ट्रीय सत्कार्यास जिकडून तिकडून दमडी टोली सटासट गोळा होत आहे (व राजे-रजवाडयांच्या देणग्या मिळून) फंड दहा हजारांवर गेला आहे व या सत्कार्याचें महत्व लहानथोरांच्या हृदयांत खोलपर्यंत भिनत चाललें आहे असें जगजाहीर करून, त्यापासूनही वर निर्दिष्ट केलेला सिद्धांत काढणें त्याच प्रकारचें आहे. व या सर्व सिद्धांतांअन्वयें समीप येऊन ठेपलेल्या कार्यसिद्धीच्या समारंभास घाईघाईनें लागून कांहीं सुजाण लोक आपलें ज्वरित मेंदू अहोरात्र तापवीत आहेत! कांहीं लेखणीस विसावा देईनासे झाले आहेत! कांहीं तोंडास खळच पडूं द्यायची नाहीं असा निश्चय करीत आहेत! कांहीं नाटकें, मेळे वगैरे करमणुकीचीं व तशींच मोठे फंड उभारण्याचीं साधनें जारीनें तयार करीत आहेत! इत्यादि.

१३. केवळ राजकारणी हेतु मनांत पिकवीत राहून वर सांगितल्या प्रकारच्या कार्यांत दंग असणाऱ्या विद्वान् ब्राह्मणांनीं प्रथमदर्शनीं फार चमत्कारिक दिसणारें असें एक तत्त्व ध्यानांत ठेविलें पाहिजे. या तत्त्वाच्या अज्ञानामुळें ब्राह्मणांमध्यें जें थोडें हालचालीचें सामर्थ्य आहे तेंही भलत्याच कामीं लागत आहे व त्यामुळें ब्राह्मणज्ञातीचें ऱ्हासापासून व विपत्तींपासून संरक्षण करण्याच्या कामीं तें येत नाहीं. ह्मणून या महत्त्वाच्या तत्त्वाचें कोणासही अज्ञान असणें इष्ट नाहीं.

ब्राह्मणांच्या कल्पनातरंगांपासून जे अत्युच्च तुषार निघतात त्यांमध्यें भावी राजकीय स्वातंत्र्याचे सुंदर सप्तरंग केव्हां केव्हां मजेनें झळकतात. राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न ह्मणजे वास्तविकपणें राज्यक्रांतीचा होय. राज्यव्यवस्थेंत फेरफार होऊन एकाचे हक्क दुसऱ्यास जाणें, किंवा ज्यांचे कर्मी त्यांस अधिक मिळणें, ज्यांचे अधिक त्यांचें कर्मी होणें, इत्यादि लहानमोठ्या सर्व प्रकारांस राज्यक्रांति हा शब्द येथें लाविला आहे. राज्यक्रांति पुष्कळ प्रकारांनीं होते, व लहानमोठ्या राज्यक्रांतींचीं शेंकडों उदाहरणें इतिहासांत आहेत. कोठें राजकीय हक्कांकरितां व अमलाकरितां मोठ्या लढाया होतात, कोठें लहानसहान बंडें होतात, कोठें राजकारणी पुरुषांच्या परस्पर विचारें कांहीं तडजोड होते, कोठें एकामागून एक नवे महत्त्वाचे हक्क राज्यकर्ते प्रजेस देत जाऊन तीस संतुष्ट ठेवितात, व कोठें या शेवटच्या मार्गानें प्रजेचे हक्क वाढत जाऊन राज्यकर्ते दुर्बळ होतात, व प्रजासत्ताक राज्यव्यवस्था सुरू होते. अशा राज्यक्रांतीच्या अनेक प्रकारांपैकीं एतद्देशीय समंजस, विचारी व देशाभिमानी पुरुषांस कोणत्या प्रकारची राज्यक्रांति पाहिजे आहे, या गोष्टीचा निश्चय करणें अवघड नाहीं. मला वाटतें अत्युत्कट देशाभिमानी लोकांच्या हृदयांत जी प्रबळ महत्त्वाकांक्षा असेल तीही समाधान पावण्यास इतकें बस्स आहे कीं हल्लींच्या राज्यकर्त्यांस जेवढे राजकारणी हक्क आहेत तेवढे सर्व, योग्यतेनुरूप, एतद्देशीयांस मिळावे. एवढें मिळालें ह्मणजे यांत सर्व गोष्टींचा समावेश होतो, असें विचारी पुरुषांस दिसून येईल. आतां अशा प्रकारच्या राज्यक्रांतीस उदारपणें आपले विचार प्रकट करणारे इंग्रज लोक निदान बाह्यात्कारी चोल्ण्यांत तरी नाकबूल नाहींत, व म्हणून अशी आशा बाळगणें व तिच्या धोरणानें राजकारणी खटपट करणें हें राजद्रोहाच्या सदराखालीं येत नाहीं. परंतु जे लोक राज्य करितात त्यांस असलेल्या विशेष हक्कांपासून त्यांचा मोठा फायदा असतो व आपला एकही महत्त्वाचा हक्क प्रजेस देण्यांत त्यांचें मोठें नुकसान असतें. ह्मणूनच राज्यकर्त्यांपासून नवीन हक्क संपादन करण्याचें प्रजेस अवघड पडतें. राज्यक्रांति सौम्यपणें होवो किंवा युद्धद्वारा होवो, ती होण्याचा संभवही उत्पन्न होण्यास राज्यकर्ते व प्रजा यांमध्यें कोणते गुणावगुण अवश्य असतात हें पाहूं.

ब्राह्मण ज्ञातींत इतिहासाचें प्रचुर ज्ञान संपादन केलेले पुष्कळ विद्वान् आहेत, व कायदा आणि इतिहास यांच्या ज्ञानानंतरच ते राजकारणी पुरुष बनतात. त्या सर्वांस पुढील एका तत्त्वाची सत्यता मान्य होईल असें वाटतें, व माझ्या मतें त्या तत्त्वास बाधक असें उदाहरण कोणत्याही देशाच्या प्राचीन किंवा अर्वाचीन इतिहासांत सांपडणार नाहीं. हें तत्त्व असें कीं जेव्हां राज्यकर्ते व प्रजा यांमध्ये देशभेद, धर्मभेद, जातिभेद किंवा कुलभेद असतो. तेव्हां देशाच्या, धर्माच्या, जातीच्या किंवा कुलाच्या अभिमानानें राज्यकर्ते कोणताही खराखर महत्त्वाचा व फायद्याचा हक्क प्रजेस देऊं इच्छीत नाहींत. प्रजेस तो हक्क त्यांकडून मिळविण्यास तिच्या अंगीं राज्यकर्त्यांइतकें किंवा थोडें अधिकच शरीरसामर्थ्य असावें लागतें. केवळ तिची पुष्कळ मोठी संख्या उपयोगीं पडत नाहीं. जर प्रथम शरीरसामर्थ्य असेल तर राज्यकर्त्यांच्या जाचानें किंवा मत्सरानें एका मागून एक दुसरे कित्येक आवश्यक गुण प्रजेंत यंऊं लागतात. ते गुण झटले झणजे धैर्य, धाडस, उद्योग, संपत्तिमत्ता व स्वार्थत्याग हे होत. कोणांत एक तर कोणांत दुसरा, कोणांत एकाहून अधिक, असे हे गुण उत्पन्न झाल्यावर मग शरीरसामर्थ्याचा उपयोग होतो. परंतु सर्व गुणांच्या मुळाशीं शरीरसामर्थ्य असावें लागतें. तें नसेल तर इतर गुणांची उत्पत्ति, पाहिजे तेवढ्या आवेशानें व तीव्रतेनें होणेंच अशक्य असें समजावें. जेव्हां राज्यकर्ते व प्रजा यांमध्यें शरीरसामर्थ्य समप्रमाण असतें तेव्हां मात्र एकाकडून दुसऱ्यास हक्क मिळतात. नाहीं तर मिळत नाहींत. जर राज्यकर्ते शौर्याच्या घमेंडीनें निर्धास्त राहतील; द्रव्याच्या सुलभ प्राप्तीमुळें विलासी होतील, व या प्रकारच्या दुष्ट संवयींमुळें शरीरसामर्थ्यानें व तज्जन्य गुणांनीं थोडे कमी पडतील, तर ती संधी साधून प्रजा आपला डाव साधील; हा एक नवीन हक्क किंवा नवा राज्याधिकार मिळविण्याचा प्रकार झाला. दुसरा प्रकार समसमान शरीरसामर्थ्यादि गुण झाल्यावर प्रजा राज्यकर्त्यांस अनावर होते, व तींस एकामागून एक नवीन महत्त्वाचे हक्क देणें त्यांस भागच पडतें; मग ते हक्क राज्यकर्ते सौम्यपणें देवोत किंवा बंडाळी नंतर देवोत. याशिवाय राज्यक्रांतीचे आणखी दुसरे जे प्रकार आहेत त्यांच्याहीं मुळाशीं शरीरसामर्थ्याची समसमानता असते.

राज्यक्रांतीचा व बुद्धिभावल्याचा कांहीं संबंध नाहीं. कारण प्रजेस राज्यकर्त्यांचा जाच समजण्यास किंवा मत्सर वाटण्यास अत्यल्प ज्ञान पुरें असतें. दुसरें असें कीं, जेव्हां प्रजेस तो जाच नको असतो, किंवा तो मत्सर असह्य होतो, तेव्हां हजारांत पांचचार बुद्धिमान् पुरुष असल्यास सहज मसलतींचें सर्व काम भागतें; व नित्य व्यवहारांच्या शिक्षणानेंही हजारांत पांचचार शुद्ध, विचारी आणि कल्पक पुरुष सर्व ज्ञातींत उत्पन्न होतात. हजार, दहा हजार किंवा लक्ष सामर्थ्यवान् पुरुषांचें नायकत्व एक बुद्धिमान् पुरुष करूं शकेल, परंतु इत-

क्याच बुद्धिमान् परंतु दुर्बळ लोकांचें नायकत्व करण्यास तितकेच सामर्थ्यवान् पुरुष पाहिजेत. राज्यक्रांतीचा काळ म्हणजे प्रबळ बुद्धिमत्तेचा काळ नव्हे, तर समसमान शरीरसामर्थ्यांचा काळ होय. अशा या काळीं प्रजा संख्येनें अधिक असतें म्हणून राज्यक्रांति होते. एका गटाची दुसऱ्यावर सत्ता बसण्यास किंवा बसलेली मोडण्यास, स्वातंत्र्याची व पारतंत्र्याची अदलाबदल होण्यास, किंवा अशीच दुसरी राज्यक्रांति होण्यास बुद्धिमत्ता कारण होत नाहीं, केवळ अधिक संख्या कारण होत नाहीं, तर शरीरसामर्थ्यांतील भेद कारण होतो. **बुद्धीची अत्यंत चळवळ, शरीरसामर्थ्याचा ऱ्हास. बुद्धिवैभवामुळें धर्मश्रद्धा, आचार, नीति, वगैरेमध्यें अत्यंत अव्यवस्थितपणा–अशी स्थिति भावी ऊर्जित दशेची कधींच निदर्शक नसते, तर ती विनाशकाळाची निदर्शक असते, असें प्रत्येक देशाच्या इतिहासांत दिसून येईल.** बुद्धिवैभवाचें अत्यंत उत्कृष्ट फळ मिळालें म्हणजे जगांतील अन्याय व दुःख अनिवार्य वाटून निराशेनें वैराग्यशील होणें हें आहे. जगांत जर अन्याय व दुःख अनिवार्य असेल तर त्याचा फायदा आपण घ्यावयाचा, नुकसान दुसऱ्यास द्यावयाचें, निदान समसमान फायदा व नुकसान वाटून घ्यावयाचें, हा **प्रवृत्तिमार्ग** शरीरसामर्थ्याचा गुण आहे.

जगाच्या इतिहासांत केवळ शरीरसामर्थ्याचा विजय झाल्याचीं शेकडों उदाहरणें आहेतच, परंतु केवळ बुद्धीचा किंवा संख्येचा शरीरसामर्थ्याविरुद्ध जय झाल्याचीं उदाहरणें सांपडावयाचीं नाहींत. सामर्थ्यवान् पुरुषांस नवीनच राज्य स्थापायाचें असेल, तर बुद्धि व संख्या यांचें कांहीं दिवस विघ्न होतें, परंतु सामर्थ्याच्या निग्रहापुढें अखेरीस बुद्धीचें व संख्येचें कांहीं चालत नाहीं. शरीरसामर्थ्यानें जे लोक कमी (बुद्धीनें कसेही असोत) त्यांनीं विरुद्ध पक्षापुढें सारखा टिकाव धरल्याचें उदाहरण नाहीं; तसेंच त्यांनीं त्या त्या काळच्या राज्यकर्त्यांकडून नवीन महत्वाचे व फायद्याचे हक्क संपादिल्याचेंही उदाहरण नाहीं.

या प्रमाणें हें सार्वत्रिक तत्त्व आहे असें मला वाटतें. ऐरिशलोकांस नवीन महत्वाचें हक्क मिळविण्यास कठिण पडण्याचें कारण शरीरसामर्थ्य व तज्जन्य प्रवृत्तिकारक गुणांचा कर्मापणा हें आहे. जर्मनलोकांकडे गेलेले प्रांत परत मिळविण्याचें फ्रेंचलोकांस अशक्य झालें आहे त्याचें कारण हेंच आहे. तुर्कस्थानच्या राज्यांतून निघून जीं लहान लहान संस्थानें हल्लीं स्वतंत्र होत आहेत, त्यांच्या स्वातंत्र्यभाषीचें कारण हेंच आहे. रशियाचें सर्वांस भय वाटण्याचें कारण तरी हेंच असावें. ग्रीस, इताली आणि अमेरिका यांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास वाचल्यावर तेथें याच तत्त्वाचा सर्वत्र प्रत्यय येतो. मुसलमानांच्या हिंदुस्थानावर विजयाच्या स्वाऱ्या, त्यांची येथें बादशाही व अखेरीस तिचा पूर्ण विध्वंस या सर्व गोष्टींचें विवरण या तत्त्वानें होतें. शिवाजीची व त्या काळच्या मराठ्यांची मुसलमानांवर सरशी होण्याचें वास्तविक कारण असें दिसतें कीं, मुस-

लमानलोक विलासी व शौर्याच्या घमंडीनें निर्धास्त झालेले होते, मराठेलोक शरीरानें दांडगे, कसलेल्या शरीराचे व जांचलेले होते. व उभयतांचें शरीरसामर्थ्य त्या काळीं सारखेंच असलें पाहिजे. शरीरसामर्थ्यामुळें उत्पन्न होणारे गुण सहजगत्या प्रचळ होत जाऊन मराठ्यांनीं मुसलमानांचा पाडाव केला. हिंदुस्थानच्या इतर भागांत जेथें अशी स्थिति नव्हती तेथें राज्यक्रांति झाली नाहीं. हिंदुलोक जोंवर सांप्रतच्या राज्यकर्त्यांहून थोडे देखील दुर्बळ आहेत, तोंवर त्यांस राज्यकर्त्यांकडून कोणताही महत्वाचा हक्क मिळायाचा संभव नाहीं अशी माझी पूर्णपणें समजूत आहे.

इंग्रजी राज्याची बळकटी एतद्देशीयांच्या क्षीणतेवर जितकी अवलंबून आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर नाहीं असें मला वाटतें; ज्या प्रांतांत शरीरसामर्थ्यांत प्रजा राज्यकर्त्यांशीं सामना करूं शंकल, तेथें या राज्याची बळकटी कमी आहे; व त्यामुळें राज्यकर्त्यांचा जांचही तेथें कमी असावा व त्यांबद्दल मत्सर उत्पन्न होण्यासही थोडीच संधी दिली जात असावी. शारीरिक सामर्थ्याची परवा न करितां, रिकामा देशाभिमान अंगीं भरणाऱ्यांनीं व नवीन हक्क संपादनासाठीं डोकीं नापवून झटणाऱ्यांनीं अशा प्रकारें कोणतीही खरोखर महत्वाची प्राप्ति होणार नाहीं असें निश्चितपणें समजावें. **जर शरीरसामर्थ्य असेल तर बुद्धीचे सर्व गुण संपादन करणें शक्य असतें व मनुष्य जसा हवा तसा तयार होतो. जर शारीरिक सामर्थ्य गमावून बुद्धीसही हळू हळू जीर्णता आणीत गेलें, मनोवृत्तींचा उत्साह व तीव्रता नाहींशी करीत गेलें, आणि इच्छाशक्तीचा किंवा निश्चयाचा ताठरपणा राखिला नाहीं, तर प्रसंगीं जसा मनुष्य हवा तसा तयार होत नाहीं.** वाचाळता शिलक उरते खरी; परंतु शरीरसामर्थ्यावर अवलंबून असणारे पौरुष गुण अंगीं भरण्याचा संभवच रहात नाहीं. शरीरसामर्थ्याच्या महत्वाविषयीं या सर्व गोष्टींचा विचारपूर्वक सर्वांनीं प्रत्यय करून घ्यावा; व विशेषतः आधुनिक ब्राह्मण विद्वानांनीं या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरवावें व नंतर पहिलें कर्तव्य कोणतें, व मागाहूनचें कोणतें, याविषयीं क्रम ठरवून, नव्या मार्गानें पुनरपि उद्योगास लागावें, अशी त्यांस माझी सूचना आहे.

९४. हा अवस्थांतराचा काळ आहे खरा ! पुष्कळ विचारी पुरुषांस ब्राह्मणांच्या हरतऱ्हेच्या खटपटींची निष्फळता व, प्रसंगाविशेषीं, दुष्परिणाम दाखविले असतां त्यांचें जें ठराविक उत्तर येतें तें हें कीं, हा अवस्थांतराच्या मधला काळ आहे; यांत असेंच व्हावयाचें; कोणत्याही देशास असा काळ प्रथम अनुभवल्याशिवाय खरीज ऊर्जित दशा येत नाहीं. हें त्यांचें म्हणणें खरें आहे, परंतु विपन्नदशा येण्यापूर्वी देखील मध्यंतरीं असा एक काळ देशास अनुभवावा लागतोच. तेव्हां ब्राह्मणांचा अवस्थांतराचा काळ **ब्राह्मणांच्या** भावी उत्कर्षाचा निदर्शक आहे कीं अपकर्षाचा आहे हें ठरविलें पाहिजे. ज्या देशास किंवा

ज्ञातीस पुढें ऊर्जित दशा आली त्या देशांत किंवा ज्ञातींत आधीं अवस्थांतराच्या काळांत ज्या चळवळी सुरू झाल्या त्या उत्पन्न होण्याचीं कारणें पाहतां नवीन सामर्थ्याचा अवतार, नवीन कल्पनांचा उद्भव व नवीन निश्चयाचें बळ, अशीं नीं कारणें होतीं. एकामागून एक ज्या व्यक्ति समाजांत निपजत, त्यांचें स्वरूप पूर्वीच्याहून उग्र, त्यांच्या कल्पना पूर्वीच्यांच्या पुढेंच, त्यांचें धैर्यबळ प्राणांतानेंच शांत व्हावयाचें. त्यांच्या तेजानें दिपून, त्यांच्या प्रभावास मोहून, महाजनांचा मोठा ओघही त्यांचा अनुचर बनला. मराठ्यांच्या उदयापूर्वी महाराष्ट्रास असाच अवस्थांतराचा काळ येऊन गेला असावा. परंतु सांप्रतच्या काळाचें स्वरूप फार भिन्न आहे. गेल्या वीस वर्षांच्या अवधींत ब्राह्मण विद्वानांची उंची दर दहा वर्षांस दोन इंच या प्रमाणानें कमी झाली आहे. स्त्रियांमध्येंही असाच व याहून अधिक ऱ्हास झाला आहे. शरीरसामर्थ्य तृतीयांशानें तरी कमी झालें आहे. समाजास कशी वृद्धावस्था आली आहे हें दाखविलेंच. करारी, निश्चयी, दीर्घोद्योगी, पौरुषगुणी माणसें नष्ट होत आहेत व नवीं पैदा होत नाहींत हें सांगितलें ह्मणजेच सत्ययास येईल. लहानापासून थोरापर्यंत आत्मावलंबन नाहीं; विद्या आणि दारिद्र्य, यांनीं परस्परांस जोरानें कवटाळिलें आहे; व जेवढा हा देश विस्तीर्ण आहे तेवढीच शिक्षितांच्या कर्तबगारीची मर्यादा आकुंचित झाली आहे. हें अवस्थांतर भावी ऊर्जित काळाचें निदर्शक आहे असें ह्मणावें तरी कसें ? निकृष्ट दशेचें द्योतक आहे असें ह्मणणें रास्त नाहीं काय ! या अवस्थांतरांत शुभ चिन्हें तरी सुजाण लोकांस कोणतीं दिसतात असा त्यांस माझा प्रश्न आहे.

१५. **ब्राह्मणांकडून जें देशहित होण्यासारखें आहे त्याच्या मार्गाचें दिग्दर्शन.** ब्राह्मणलोकांनीं गमतीखातर ह्ल्लींच्या सर्व राजकारणी खटपटी पाहिजे तर पुढें चालवाव्या; परंतु आज मित्तीस त्यांचें जें पहिलें कर्तव्य आहे तें स्वसंरक्षण हें होय. या कर्तव्यास ते थोडे दिवस पराङ्मुख राहिले तर या जातीस जी अत्यंत निकृष्ट स्थिति येणार आहे तिचें पूर्वी जागोजाग दिग्दर्शन केलेंच आहे. पुढें जो उपायचिंतनाचा भाग येणार आहे त्यांत ब्राह्मणांनीं वेळींच सावध होऊन कोणत्या गोष्टी करणें आवश्यक आहे त्या थोडक्यांत सांगितल्या आहेत; परंतु कित्येकांस अशी भीति पडेल कीं, या स्वसंरक्षणाच्या कामास जर आह्मी मनःपूर्वक लागलों तर आमच्या हातून परमार्थ काय घडणार ! अशा स्वार्थभीरु लोकांच्या एक दोन गोष्टी ध्यानांत आणून देण्यासारख्या आहेत. त्यांचा उल्लेख पुढें केला आहे.

इंग्लंडदेशास ज्यांनीं ऊर्जित दशेस आणिलें ते लोक काय ते आजपर्यंतचे पार्लमेंटाचे मेंबर व जहाजांवरील खलाशी असा इतिहासवाचनानंतर ज्यांचा समज झाला असेल त्यांची समजूत घालीत बसणें व्यर्थ आहे. ज्ञान, उद्योग आणि सदाचार यांची देशभर पेरणी करणारे व देशाची संपत्ति, विजय आणि लौकिक वाढविणारे,

मलदार, यांमधील मद्दतर भरून काढण्याच्या व त्यांमध्यें प्रेम आणि एकदिल उत्पन्न करण्याच्या कामीं आधुनिक विद्वत्ता निष्फळ झाली आहे, व लोकोपकार क कर्तव्यांची हल्लीं जी मोठी नौबद वाजत आहे ती उंटावरून शेळ्या राखणारांची आहे. या गोष्टींची परिस्फुटता करण्याकरितां कांहीं उदाहरणें घेतों.

खेडेगांवांत गेलें असतां तेथें एक भयंकर प्रकार आढळतो, तो हा कीं जें पिं ण्याचें पाणी त्याची हरतऱ्हेनें घाण करण्याचा कारखाना अनादिसिद्ध चालत आहेसें वाटतें. कित्येक ठिकाणीं पूर्वीच्या परोपकारी पुरुषांनीं तळीं बांधलीं आ हेत, घाट बांधले आहेत, विहिरी केल्या आहेत, देवार्चनाकरितां मंदिरें बांधलीं आहेत, नदीकांठीं मोठे छायावृक्ष लावून त्यांस पार बांधलेले आहेत, व अशाच परोपकाराच्या अनेक सोयी केल्या आहेत. परंतु मी जेथें जेथें गेलों आहें व माझ्या मित्रांकडूनही जी माहिती मिळाली आहे तीवरून असें दिसतें कीं सर्वत्र जें आहे त्याची अधिकाधिक घाण करण्याची एकंदर ग्रामवासी जनांची सटपट सुरू आहे. घाट बांधणारानें घाटाचे दगड किती सुरेख घडविलेले अस तात, हें पाहिलें ह्मणजे आश्चर्य वाटतें; परंतु त्याचा एखादा दगड सरला किंवा ढासळला तर त्या घाटावर चेनीनें गप्पा ठोकीत बसणारे आळशी लोक तो नीट करणार नाहींत. याप्रमाणें एकामागून एक दगड ढासळून पाण्यांत जात अस तात, त्यांमध्यें माती येऊन भरते, मग गाईह्मशी पाण्यावर आणण्याची ती वाट होते, ह्मशी धुण्याचा तेथेंच कारखाना सुरू होतो व पूर्वीच्या परोपकारी पुरुषांच्या औदार्याचें गांवच्या लोकांच्या आळसानें व निष्काळजीपणा नें बिलकुल चीज होत नाहीं. याप्रमाणें घाट मोडलेले, तळीं पड लेलीं, पार निरुपयोगी झालेले, मंदिरें पाकोळ्यांनीं भरलेलीं. व या सर्वांस जाण्यापुरती वाटही स्वच्छ नाहीं, अशी मीं सर्वत्र स्थिति पाहिलेली आहे. जी घाण करायाची ती प्रथम आपल्या घराच्या दारीं. मग शें जाऱ्याच्या, व नंतर सार्वजनिक रस्त्याच्या बाजूस, असा आमचा अत्यंत सोंवळें ओवळें करणारांचा अनादिसिद्ध परिपाठ आहे. शौचकूप आणि विहिरी शेजारीं पाहिजेत, नाहीं तर पाणी पिण्याच्या ओढ्याच्या काठीं घाण करण्यास गेलें पाहिजे; त्यावांचून मनास स्वच्छताच वाटत नाहीं. अमुक खेड्यांतील देवाल याची व त्याच्या वाटेचा गांवचे सर्व लोक मिळून दक्षतेनें स्वच्छता व दुरुस्ती राखतात, असें जर मला कोणी सांगेल तर तें खरेंही वाटणार नाहीं, इतकीं दुसरीं उलट उदाहरणें मीं पाहिलीं आहेत. प्रवाहाच्या वरच्या अंगीं पाण्यांत कर्दम, शेवाळ व झाडपाला न सांचूं देणें व ह्मशी न धुणें असा निर्बंध कोठेंही नाहीं इत कींच नव्हे, तर होऊं शकत नाहीं असें गांवचे अम्मलदार सांगतील. जुने घाट वगैरे कोठेंही दुरुस्त नाहींत; परंतु त्यांचे घडीव धोंडे घरीं नेऊन पायखान्यास लावणारे लोक आहेत. **कोणतीही सार्वजनिक व्यवस्था चांगली राखल्याचें उदाहरण**

खेड्यापाड्यांत सांपडणें नाहीं. मग तें खेडें मोठ्या शहराजवळ असो, किंवा शहरापासून लांब असो.

याप्रमाणें ही स्थिति पाहिल्यावर या खेड्यांच्या व्यवस्थेकरितां नेमिलेले विद्वान् लोक आपलें कर्तव्य किती संकुचित करून घेतात हें तेव्हांच ध्यानांत येतें. मामलेदार, फडणीस, पोलिस आफिसर यांचें व पाटीलकुळकर्ण्यांचें इनामदारांवर व सामान्य रयतेवर केवढें वजन असतें, व तसेंच मुनसफाचें व वकिलांचें वाणी उदमी सावकारांमध्यें केवढें वजन असतें, हें पाहिलें ह्मणजे, व या वजनाचा दुष्ट उपयोग वारंवार घडल्याचीं उदाहरणें ऐकिल्यावर, खेड्यापाड्यांतील लोकांकडून त्यांचींच आरोग्याचीं, धर्माचीं, विसाव्याचीं स्थानें स्वच्छ व सुंदर ठेवविण्याचें काम या आफिसरांकडून घडूं नये याविषयीं आश्चर्य वाटतें. या कामीं त्यांचें वजन अशा सत्कार्यास लागलेलें पाहून सरकार त्यांची वाहवाच करील; परंतु ज्यांमध्यें आपणांस दिवस काढायाचे त्यांचें हित अशा रीतीनें करावें ही कल्पना कोणास आहे ? दोन चार उपदेशाचे शब्द बोलल्यानें देखील हीं कार्यें घडण्यासारखीं आहेत, व युरोपियन अंमलदार येण्याच्या संधीस तीं वेळेपुरतीं करूनही घेतलीं जातात. तसेंच चोऱ्या, मारामाऱ्या, आगी लावणें हें काम वाईट आहे ह्मणून रयतेस सांगणारा नाहीं. शिक्षकाचें काम सदाचार शिकविण्याचें नव्हे, बाळबोध इयत्ता शिकविण्याचें आहे ; व तेंही मुलें शाळेस येतील तर ! इस्तितळावरील असिस्टंट घरोघर जाऊन उपकाराचें बीज पेरून लोकप्रिय झालेला सांपडणार नाहीं, उलट तो व पोलीस मिळून किती बनावट खटले होतात हें जूरीच्या खट-ल्यांत दिसतें. मामलेदारास फुरसत नाहीं, व मुनसफास कोणाशीं संबंध ठेवायास नको. खेड्यांत लानटेनिस कोर्टें नाहींत ह्मणून त्याची हाकाहाक, व केलीं तरी बरोबरीचा कोण खेळायास मिळणार! यामुळें ज्या थोड्यांत परोपकारबुद्धीचा अंकुर फुटतो, ते अकल्पित कल्पना काढून त्यांच्या सिद्धयर्थ फंड गोळा करितात, किंवा वर्तमानपत्रांस व मासिकपुस्तकांस सुधारणेच्या वरिष्ट प्रकारांचीं साधनें सुचवीत असतात, अथवा वर्षभर परिश्रम करून पुण्याच्या अव्यवस्थित समाजाकडून फटफजिती करून घेण्यास येथें येतात. परंतु अशांची संख्या फार थोडी ; मोठी संख्या बसून बसून वर्तमानपत्रें वाचीत असते, व डिस्पेप्सियानें त्यांस बहुधा अल्पायुषीं मरण येतें. परंतु या अशा सुज्ञ लोकांस आपल्या कर्तव्यांची सीमा वाढविण्यास केवढी मोठी जागा आहे, हें समजत नाहीं व त्यांस लोकांकडून दुवा मिळत नाहीं. **जर ठिकटिकाणच्या आफिसरांनीं वर सांगितलेल्या कामांत कंबर बांधली, तर खेडींपाडीं किती सुंदर होतील, लोकांस सदाचार कसा प्रिय होईल, त्यांस उद्योगाची व सुधारणेची कशी गोडी लागेल, व हें स्थानिक स्वराज्य किती गोडी गुलाबीनें चालेल !** हिंदु रयतेंत कृतज्ञतेचा मोठा गुण आहे. अंमलदारानें जुलूम केल्यास तो वरिष्ठ

साहेबाच्या सांगण्यावरून केला अशी तिची लवकर समजूत पडते, परंतु अंमलदारानें कांहीं उपकार केला तर त्यास ती देवाप्रमाणें भजते.

खेड्यापाड्यांच्या सुधारणेचा प्रयत्न ब्राह्मण अंमलदारांनीं मनःपूर्वक आरंभिल्यास, रयतेचें जें हित होईल तें होईलच, परंतु त्यांचें स्वतःचेंही पुष्कळ हित होईल. त्यांमध्यें उत्साहाचें नवें बीज उत्पन्न होईल; त्या उत्साहानें त्यांच्या शरीरास हलावें लागेल, कल्पनेस जागें व्हावें लागेल, मनोवृत्तींस उमाळा येईल, व कृतज्ञतेचे मनःपूर्वक उद्गार ऐकून चित्तास समाधान वाटेल. मग आयुष्य कंटाळवाणें होणार नाहीं व डिस्पेप्सियानें मरणें अवश्य होणार नाहीं. परंतु हें सांगणें उत्कट महत्वाकांक्षी ब्राह्मणांस कोठून रुचणार! जर हींच खेडीं इंग्रजी शेतकऱ्यांनीं भरलेलीं असतीं, युनिव्हर्सिटींतून पास होऊन कोणी गरीब इंग्लिशमन त्यांत कुर्जिमन झाला असता, दुसरा कोणी शाळामास्तर असता, तिसरा श्रीमन मनुष्य स्कायर किंवा इनामदार असता, न्याय व जमाबंदी करणारीं माणसें तशींच इंग्लिश जातीचीं असतीं, तर हीं खेडीं रमणीय झालीं असतीं, इनामदार व्यापारी यांस गरिबांच्या सुधारणांचा तगादा लागला असता व तो त्यांनीं हौसेनें मानिला असता. परंतु गरीब दुबळ्या रयतेच्या हृदयांत शिरून उपदेशाचे व सांत्वनाचे शब्द प्रत्येकाच्या घरोघर पोंचवायाचे हें खऱ्या परोपकाराचें बीज आमच्या सुशिक्षितांस कोठें माहीत आहे. कोणा कामगार गांवाकडे येत आहे असें पाहतांच हा आपणांस वेठीस धरील कीं काय या भीतीनें रयत घरांत व शेतांत दडून बसते; परंतु कोणी वैरागी, साधु, संत येतांच गांव त्यास मोठ्या आदरानें सामोरा जातो व कांहीं दिवस त्याच्या भजनीं लागतो. कारण तो भोंदू कीं असेना, तो त्यांच्या पोटांत शिरतो, त्यांच्या पीडा ऐकून घेतो, त्यांस आश्वासनाचे शब्द बोलतो, औषधोपचार सांगतो, अंगारा व प्रसाद देऊन त्यांची काळजी दूर करितो. विद्वानांस याच सर्व प्रकारांचें शब्दशः अवलंबन करायास नको, दुसरे असेच चांगले परोपकाराचे सात्विक मार्ग शोधून काढणें अवघड आहे काय! परंतु बंधुभाव व अनुकंपा यांची त्यांच्या हृदयांत उत्पत्तिच होत नाहीं. तुकारामरामदासांच्या गाथा वाचून त्यांस आंतील मर्म कळत नाहीं. **आडम् बीड, रोमोला, राबर्ट एल्समीयर,** वगैरे इंग्रजी नाव्हलें प्रसिद्ध म्हणून वाचायास घ्यावीं, पाल्हाळीक म्हणून फेकून द्यावीं हा त्यांचा क्रम. इंग्लंडांतील खेड्यांत लहान मोठ्या जागांवर नेमलेले सुशिक्षित पुरुष व स्त्रिया आपलीं कर्तव्यें **कोणतीं** मानितात हें त्यांस कोठें समजून घ्यायाचें असतें! **मेथाडिस्ट** अथवा **वेस्लियन** लोकांनीं धर्म व सदाचार यांच्या प्रेरणेकरितां प्रत्येक घरांतील माणसांचीं हृदयें स्वाधीन करून घेण्याचा कसा प्रयत्न केला व अद्यापि करीत आहेत, हें जाणण्याची त्यांस कोठें हौस आहे!

अमुक देशांत अमक्या शतकांत मोठी धर्मक्रांति झाली व ती अमक्यानें क-

लों, इतकें वाचूनच आमची तरुण शिक्षित मंडळी तटस्थ होते. अशा प्रकारच्या क्रांति एकाच्या किंवा दहांच्या प्रयत्नानें होत नसतात हें त्यांच्या मनांत कोणींही विंचविलेलें नसतें. शिवाजीनें अमुक केलें, रामदासानें अमुक केलें, लूथरनें अमुक केलें,--तेव्हां एक एक पुरुष काय करूं शकणार नाहीं ! असें त्यांस वाटत असतें; व ह्मणूनच असा एकादा पुरुष उत्पन्न होण्याची ते वाट पहात आहेत. सामाजिक सत्कार्यांचा सर्वांस आपापल्यापरी थोडाबहुत भाग उचलावा लागतो, हें कोणासही माहीत नाहीं: जर असतें तर त्यांची वर्तणूक फार निराळ्या तऱ्हेची असती. पिकास आलेलें शेत पाहून ' काय सुपीक जमीन आहे हो ! ' असे उद्गार काढणारानें, राजरोज शेतांत खपून शेतकऱ्यानें व त्याच्या मुलामाणसांनीं जी मेहनत केली ती विसरतां कामा नये. तद्वतच राज्यांत, धर्मांत, नीतींत, रीतीभातींत क्रांति होण्यापूर्वी जे अनेक दृढनिश्चयी पुरुष लौकिकाची पर्वा न करून, केव्हां केव्हां हालअपेष्टा सोसून, सदाचारगचा कित्ता घालून देण्याचें व उपदेशाचें आवश्यक कार्य करीत असतात व आपल्या भोंवतालच्या लहानशा जनसमूहाच्या अंत:करणांत प्रकाश उत्पन्न करीत असतात, त्यांची लोकसेवा आपण विसरतां कामा नये. गरीबगुरीबांची, गिरण्यांतून काम करणारांची, रोग्यांची, मुलांची, जनावरांची, कैद्यांची, दासांची, किंबहुना हरएक प्रकारच्या दुःखीकष्टी लोकांची स्थिति सुधारण्याकरितां सुधारलेल्या देशांत भिन्न काळीं ज्या मोठ्या चळवळी झाल्या, त्यांचें ठिकठिकाणीं बीजारोपण करणारे महात्मे इतिहासांत अप्रसिद्ध आहेत खरे; परंतु ते अनेक होते. सुशिक्षण व बंधुप्रीति यांमुळें त्यांचीं अंत:करणें परदुःख पाहून विव्हळत होतीं, व जें ज्यास साध्य तें तेवढेंच करून त्यांपैकीं प्रत्येकजण ऐहिक स्थितीचें सार्थक्य करून गेला; त्यांतच जो मोठा थोर निपजला त्याचें नांव आपणांस ऐकूं येत आहे. ज्या धर्मांत सदाचार सांगितला आहे, तो चांगला असला पाहिजे; परंतु चांगलीही गोष्ट चांगल्या उपयोगास लाविता येण्यास चांगलीच माणसें लागतात. द्रव्यमदानें उन्मत्त झालेल्यास ताळ्यावर आणणें, आणि, विशेषत:, ऐहिक विपत्ति भोगणारांचें समाश्वासन करणें या कामीं धर्माचें उत्कृष्ट साफल्य दिसतें.* वायचलांतील बोधपर वाक्यें व प्रार्थना सुशिक्षित स्त्रिस्ती

---

* **तुकारामानें** ह्मटलें आहे :

जें का रंजले गांजले । त्यांसी ह्मणे जो आपुलें ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥
दया करी जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका ह्मणे सांगो किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥ १ ॥
जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदार विचारें वेंच करी ॥
उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ॥
परउपकारी, नेणें परनिंदा । परस्त्रिया मदा बहिणी माया ॥
भूतदया गायीपशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥
शांतिरूप, नव्हे कोणाचें वाच्यत्व । वाढवी महत्व वडिलांचे ॥
तुका ह्मणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ २ ॥

मनुष्याच्या मनांत जशा चिंबलेल्या असतात, त्यांचा तो जसा हरप्रसंगीं उपयोग करितो, तसा एतद्देशीय धर्माभिमान्यांनीं आपल्या श्रुतिस्मृतिपुराणगाथांचा उपयोग करण्याचा कोठेंही प्रयत्न केला आहे काय ? आश्वासनरूप पारमार्थिक शब्दांनीं कुटुंबांतील दुःखीकष्टी हैराण माणसांचेंही आमच्यानें सांत्वन होत नाहीं, ते आह्मी दुबळ्या रयतेचे कनवाळू ह्मणाविणारे सुशिक्षित, अन्यजातीय गांजल्यापीडिल्यांची कशाची पर्वा करितों ? आमच्या धर्माचा हा मूळ उद्देशच नव्हे असा पुष्कळांचा ग्रह दिसतो, त्याचा उद्देश राजकारणी चळवळीच्या कामीं मोठा आहे; व ह्मणून या एका बाबतींत श्रद्धेनें व इतर बाबतींत स्पष्ट दांभिकपणानें ते स्वधर्मप्रतिपालक बनलेले आहेत. साध्य काय करायाचें व साधन काय योजायाचें, या गोष्टींच्या बालिश अविचाराचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

असो. तात्पर्य हें कीं खेड्यापाड्यांतील अंमलदार व इतर ब्राह्मणमंडळी रयतेच्या खऱ्या सुधारणेस किंवा सुखास क्वचितच कारण होते. याविरुद्ध तिचें आचरण असल्याचीं उदाहरणें फार. साहेबास खुष करण्याकरितां किंवा आपली नौकरी राखण्याकरितां अमुक माणूस निष्कारण जुलूम करणार नाहीं अशी साक्ष ज्याविषयीं रयत देईल असा ब्राह्मण अंमलदार सांपडणें मुष्कील; उलट याच उद्देशांनीं अमुक माणूस पाहिजे तें अनन्वित कृत्य करील, अशी ज्यांचेद्वल रयतेची खात्री आहे, त्यांची संख्या थोडी नाहीं. कनिष्ट प्रतीच्या ब्राह्मण नौकरांच्या सदाचाराचेद्वल व नीतीचेद्वल लोकांत ख्याति नाहीं, उलट बोंभाटाच आहे. जे चांगले शिकलेले ब्राह्मण अंमलदार येतात, ते स्वधर्मांचे आहेत असें रयतेस ओळखण्यासही फार थोडीं साधनें असतात. कारण त्यांच्या स्वतःच्या नित्याचारांत हिंदुधर्म फारच थोडा दृष्टीस पडतो, व शिवाय धर्मरीत्या रयतेचे जे हौसेचे, आनंदाचे व उत्सवाचे दिवस, त्या दिवशीं त्या अंमलदारांत मात्र हौस, आनंद व उत्साह दिसत नाहीं. त्यांचीं चाय़कामुळें अद्यापि बहुधा तशीं नाहींत ह्मणूनच ते हिंदुधर्मी असें ह्मणण्यास जागा असते.

अशा प्रकारचें ज्यांचें रयतेशीं वर्तन त्यांनीं आपले स्वतंत्र उद्योगाचे उपाध्याय कांग्रेस तर्फे व्याख्यानें देऊन पैसे गोळा करण्यास खेड्यापाड्यांतून पाठविले, ह्मणून ते रयतेचे मुखत्यार झाले काय ! व रयतेचें आपणांस पाठबळ आहे ह्मणून त्यांनीं मोठा आक्रोश केला तरी त्यावर कोणीही विचारी पुरुष विश्वास ठेवील काय ? राज्यकर्त्यांवर अशा आक्रोशाचा परिणाम होण्यास ते अवलोकनशील इंग्लिशलोक नसले पाहिजे होते. पूर्वीचे मिजाशी व विलासी मुसलमान बादशहा किंवा हिंदु राजे पाहिजे होते. राज्यकर्ते ब्राह्मणांहून किती अधिक अवलोकनशील व धूर्त आहेत, हें त्यांच्या इतर शोधांवरून तरी आह्मांस कळून यावें; परंतु हाच अवलोकनाचा गुण अल्पांशानेंही आमच्यांत उरला नाहीं. आह्मी हातचें सोडून पळत्याच्या मागें लागून कां आपापसांत भांडत

आहों ? प्रत्यक्षाचा तिरस्कार करून कां मृगतृष्णेस लुब्ध झालों आहों ? जें सुसाध्य त्याची कां उपेक्षा करीत आहों व जें दुःसाध्य किंवा असाध्य त्याकरितां सर्व प्रकारचे भयंकर खटाटोप आरंभून कां उंटावरून शेळ्या राखीत आहों ? परमार्थ नाहीं तो नाहींच व स्वार्थाचीही हानि–असा जो प्रकार तो देशसेवेच्या नांवाखालीं गाजत आहे. यांत आमचें शहाणपण दिसतें असें आह्मी समजतों, व वयस्थ आह्मांस मूर्ख ह्मणतात ह्मणून ते लोभी व मत्सरी, असें आह्मी ठरवितों !

ब्राह्मणांनीं रयतेविषयीं बंधुभाव धरावा, रयतेच्या हरघडी उपयोगीं पडावें, तीस सल्ला व उपदेश द्यावा, तिची पीडा व दैन्य वारावें, सत्कार्यांत व सदाचारांत आयुष्य घालवावें व रयतेच्या अंतर्यामीं पूज्य व्हावें. स्वहिताचा व परहिताचा हा मार्ग सर्वांस सुलभ व स्वाधीनचा आहे. परंतु माझ्या ब्राह्मण बांधवांस बंधुप्रीतीचें, लोकानुकंपेचें, धर्मप्रवृत्तीचें व नित्य परमार्थाचें जें खरें प्रमेय, खरें ह्रदय, तें केव्हां कळेल तें कळो !

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.



उपायचिंतन.

भाग ११ वा.

नवीन शिक्षणक्रमाचे हेतु व दिशा.

९७. **प्रस्तावना.** या व पुढील भागांत हरएक सामाजिक व राजकीय बाबतींत ब्राह्मणज्ञातीची कशी व कोणत्या उपायांनीं सुधारणा करावी या मोठ्या विस्तृत प्रश्नाचा विचार करावयाचा नाहीं. कारण या प्रश्नाचें सयुक्तिक उत्तर देण्यास या पुस्तकाएवढालीं कित्येक पुस्तकें लिहावीं लागतील, व अखेरीस सुचविलेले उपाय योग्य आहेत कीं अयोग्य आहेत, ते साध्य आहेत कीं असाध्य आहेत, या गोष्टीविषयीं शंका राहणारच. तेव्हां सर्वसाधारण सुधारणेचे उपाय निश्चित करणें हें प्रकमशील पुरुषांस हळूहळू येत गेलेल्या अनुभवावरच अवलंबून ठेविलें पाहिजे. परंतु आपल्या संततीनें दीर्घायुषी व्हावें, उद्योग करावा व स्वार्थ आणि परमार्थ जोडावा, व आपल्या ज्ञातीचा चालू ऱ्हास बंद होऊन तीस पुनः उत्कर्षावस्थिति यावी, अशाकरितां आजच पहिला 'उपाय कोणता करावा हा सर्वांस तूर्त प्रश्न उत्पन्न झालेला आहे व त्या एका प्रश्नाचें उत्तर या व पुढील भागांत देण्यांचें योजिलें आहे. संततीचें व तिच्या द्वारें ज्ञातीचें हित करण्याचा पहिला मार्ग म्हटला म्हणजे त्या संततीस दिलेलें शिक्षण उत्तम फलदायी करणें हा होय. म्हणून नवीन शिक्षणक्रमाच्या द्वारें कोणते सद्गुण संततीच्या अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा, कोणत्या बाबतींत विशेष सुधारणा पाहिजे आहे, कोणत्या विशेष जबाबदाऱ्यांच्या अंगावर घेतल्या पाहिजेत, इत्यादि गोष्टींचा स्थलावकाशाप्रमाणें आतां विचार करूं.

आयुष्याच्या पहिल्या भागांत मनुष्यास ज्या प्रकारचें एकंदर शिक्षण दिलें जाईल, किंवा वळण लाविलें जाईल, त्या प्रकारचा पुढें मनुष्य होतो ही गोष्ट कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं; तथापि शाळेंतील शिक्षणाच्या बाबतींत ब्राह्मण ज्ञातीस् या ढोबळ तत्त्वाचीही अद्याप समजूत पडलेली नाहीं असें दिसतें; व म्हणून ब्राह्मण विद्वानांचे योग्य दिशा सोडून भलतीकडेच प्रयत्न वहात आहेत. कोणी लहानपणीं लहानसहान चोऱ्या करूं लागला व त्याच्या त्या दुर्वर्तनाकडे आईबापांनीं दुर्लक्ष केलें, तर तो हळू हळू मोठ्या चोऱ्या करूं लागतो, व पुढें त्याचीं कृत्यें क्रमानें प्रसिद्धीस येत जाऊन तो बहुधा पोलि-

सांच्या तावडींत सांपडतो, व तुरुंगवास अनुभवितो, या गोष्टींविषयीं समंजस ब्राह्मणांची साक्षी आहे. तसेंच शारीरिक दुर्वर्तनाविषयीं तर ब्राह्मणांस चांगली धास्ती बसून गेली आहे; 'हां, थंडीवाऱ्यांत हिंडूं नको, गार पाणी पिऊं नको, ओले कपडे घालूं नको, पांघरुणांनीं नीट गुरगुटून बैस' या आरोग्यमूलक उपदेशाच्या द्वारें सर्व समंजस कुटुंबांत मुलांची नित्य कानउघाडणी चालली आहे; परंतु **मानसिक दुर्वर्तन** मुलाच्या सद्गुणांपेकींच एक समुख गणिलें जातें, त्याची सर्वत्र वाहवा होते व तें सर्वांस अनुकरणीय वाटतें. मुलगा मानसिक अतिश्रम करूं लागला, त्यानें बुद्धीस क्षीणता आणिली, तो परीक्षेस जाण्याकरितां त्रागा करूं लागला, तो कुंथभार उचलण्यास नाराजी किंवा नालायख झाला, त्याकडून वडिलांचा किंवा मोठ्यांचा मान राहीनासा झाला, हरतऱ्हेची सांसारिक विपत्ति भोगीत असतां त्यास उद्योग सुचेनासा झाला, व कोणतीही महत्त्वाची गोष्ट करण्याची त्याच्या अंगीं उमेद न राहून तो शुद्ध गप्पाष्टकांत वेळ घालवूं लागला, तथापि हें सर्व सद्वर्तनच गणिलें जात आहे! ज्या कोणा पालकास हा सर्व प्रकार गैर आहे असें समजतें तेही त्या मुलाचेच बाप, त्यांमध्येंही अंधपरंपरा सोडून देऊन, आपापल्या कुटुंबांत तरी ऱ्हासाचें बीज येऊं द्यावयाचें नाहीं, असा मनाचा निर्धार करण्याचें बळ नाहीं. "तुम्ही म्हणतां तें सर्व खरें आहे, परंतु करायचें काय? जें होईल तें होईल!" असे निराशेचे उद्गार काढणारेच फार. परंतु जे दहावीस किंवा शें दोनशें लोक आपल्यासारख्याच विचाराचे असतील, त्यांशीं मिळायाचें, होईल तेवढेंच भावी विपत्तीचें निवारण करायाचें, सामर्थ्य असेल तेवढी तरी या स्वार्थाच्याच कामास द्रव्यादिद्वारा मदत करायाची, व नियहपूर्वक सुधारणेस लागायाचें हें कोणास साधत नाहीं.

सर्व समाज सावध होत नाहीं, म्हणून सावध लोकांनीं आपली हानि करून घ्यावी काय? आपणांस हवें तसें सरकार वागत नाहीं, म्हणून तें तसें वागेपर्यंत आपण वाट पहायाची काय? कोण नवीन शाळा घालणारा आपल्या मदतीस येईल! कोण विशेष उत्तम शिक्षण देऊन फी आणखी कमी घेईल! त्याची ती शाळा चालण्यास राजेरजवाडयांकडून व सरकारांतून केव्हां मदत मिळेल? व त्याच्या सर्व स्वार्थत्यागाचा आपणांस केव्हां हक्कानें लाभ मिळेल? अशी वाट पहात बसणाऱ्या व मध्यंतरीं सर्व प्रकारची स्वार्थहानि करून घेणाऱ्या पालकांच्या अविचारास काय म्हणावें? स्वतःचें हित साधण्याकरितां जो दुसऱ्यावर अवलंबून राहतो त्याचें तें हित दुसऱ्याच्या मनाप्रमाणें होतें, स्वतःच्या मनाप्रमाणें होत नाहीं, व बेळीं हित म्हणून अहितही त्याच्या पदरीं बांधलें जातें. आत्मावलंबनावांचून कोणतीही गोष्ट उत्तम प्रकारें साध्य होत नाहीं, व हें आत्मावलंबन अंगीं येईपर्यंत ब्राह्मणांस ऊर्जित काळ येणार नाहीं, हें सर्वांनीं मनांत बाळगिलें पाहिजे. प्रा

थमिक शिक्षण योग्य होत नाहीं व त्यायोगें आपल्या मुलांचें नुकसान होतें अशी ज्यांची खात्री होईल, त्यांनीं एकवट होऊन आपल्याच मुलांपुरता एक वर्ग काढावा, आपल्या मनाप्रमाणें शिक्षण द्यावें व जो येईल तो खर्च वांटून घ्यावा. हीच इतर शिक्षणाची गोष्ट होय. असा शेवटचा निकराचा उपाय योजण्यास जेव्हां लोक तयार होतील, तेव्हां त्यांच्या खटपटीनें हवी तितकी सुधारणा होऊं शकेल, व त्यांच्या मनासारखें शिक्षण मुलांस मिळूं लागेल. तेव्हां प्रथम सर्वांनीं कुटुंबहानि व ज्ञातीचा ऱ्हास बंद करण्याकरितां वाचाळ माणसांच्या कर्तृत्वफलाची वाट पहात बसणें योग्य नाहीं; आत्मावलंबन पूर्णपणें अंगीं धरिलें पाहिजे; व एकत्र होऊन विचार करितांना व्यवहारदृष्ट्या अमुक गोष्टी साध्य करून घ्यावयाच्या अशा निग्रहानें काम आरंभिलें पाहिजे. जेवढे लोक मिळतील तेवढे मिळतील, पुष्कळ मिळण्याची खटपट करायाची, परंतु आपण थोडे म्हणून देखत देखत हानि करून घ्यावी काय ? कुणबी शेतकरी लोकही कांहीं अंशीं ब्राह्मणांहून अधिक निग्रहाचे दिसतात. " आमच्या मुलांस चाळचोध इयत्ता व भूगोल शिकवितां काय ? आह्मी शाळेंत मुलें पाठवीत नाहीं, " असें ते स्पष्ट उत्तर देतात; मग त्यांच्या मुलांस शाळेंत आणण्याकरितां काय तजवीज करावी, मोडी इयत्तांत कोणते विषय घालावे, वगैरे विचार करणें मोठ्या आळशी अधिकाऱ्यांसही भाग पडतें. विद्याखात्याची व्यवस्था सर्वस्वी ब्राह्मणांकडे आहे असें म्हटल्यास चालेल; विद्याधिकारी ब्राह्मणांचे कैवारी आहेत; व हाताखालच्या ब्राह्मणांनीं अमुक सुधारणा आवश्यक आहेत असें एकदिल होऊन सांगितल्यास, त्या सुधारणा करण्यास त्यांस परवानगीच नव्हे, तर उत्तेजन व मदतही मिळेल. असें असतां सर्वांनीं उपाद्व्यगिरी आरंभिली आहे--हणजे ' नवरा मरो, नवरी मरो, दक्षणेशीं काम ! ' या न्यायानें सर्वांनीं आपलें वर्तन ठेवलें आहे. हानि स्वतःच्या ज्ञातीची, व दोष सरकारच्या विद्याखात्यास ! ही अतिनिंद्य स्थिति पाहून विचारी ब्राह्मणांचें अंतःकरण कसें कळमळत नाहीं ?

९८. **विद्यावृद्धि.** पंधरावीस वर्षांपूर्वी सर्व विद्वान्, विचारी पुरुषांस जी एक गोष्ट कळून आली ती ही कीं, सर्व प्रकारची सुधारणा होण्यास विद्येचा प्रसार झाला पाहिजे. हें तत्त्व पूर्णपणें सत्य आहे, परंतु विद्येचे चांगले परिणाम होण्यास दुसऱ्या कांहीं गोष्टी आवश्यक असतात ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आली नाहीं; व ' विद्या ' असें नांव उच्चारितांच ' हां, आणा ' अशी आवेशाच्या भरांत त्यांच्या चित्तवृत्तीची स्थिति झाली. या पुणेंशहरांत वीस पंचवीस वर्षांपूर्वी लोकांस पाण्याचें दुर्भिक्ष वाटूं लागलें होतें, व एक पाणी विपुल होईल तर सर्व प्रकारच्या आरोग्यमूलक सुधारणा होतील अशी विद्वानांची खात्री झाली. कारण **पाणी** हणजे **जीवन**, पाण्यावांचून माणसाचें चालेल काय ? पिण्यास पाणी पाहिजे, सैंपाकास पाहिजे, अंग धुण्यास पाहिजे, कपडे धुण्यास पाहिजे, घरें, रस्ते, मोऱ्या, सर्व कांहीं स्वच्छ

करण्यास पाणी पाहिजे. अशा उमेदीनें कालवा शेजारीं येतांच केव्हां पाण्याचा प्रसार करूं असें सर्वांस झालें. दहापंधरा वर्षांत जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. शहराच्या दक्षिणेस पाणी, उत्तरेस पाणी, चारी दिशांनीं पाणी, भोंवतालीं लांचवर पाणी, खालीं जमिनींत पाणी, वर हवेंत पाणी, रस्तोरस्तीं पाणी, घरोघर पाणी, कोठें पाणी नाहीं असें उरलेंच नाहीं. मग विद्वान्लोक व आरोग्यखात्याचे अधिकारी सावध झाले, ' अहो पाणी आलें खरें, पण याच्या निकालाची काय व्यवस्था ! ' इकडे सर्दी, ताप, विषम, वगैरे रोगांनीं शहरांत आपलें ठाणें चसविलें, जिकडे तिकडे ओरड झाली; तेव्हां सरकार सावध होऊन विद्वानांच्याच विनवणीवरून त्यानें पुण्यांतील लोकांचें पाणी कमी केलें; व राहिल्या पाण्याचा तुही लवकर निकाल लावा ह्मणून जबरीचा हुकूम दिला.

त्या पाण्याचा निकाल लावण्याचें काम हल्लीं चाललें आहे. विद्येचे हितावह परिणाम होण्यास शरीरसामर्थ्य लागतें, ही गोष्ट विद्याप्रसाराच्या भरांत आह्मी विसरून गेलों. जर शुद्ध विद्येनें सर्व सुधारणा होऊं शकतील तर विद्येचा प्रसार करण्यास उशीर किती ! विद्याप्रसारास काय ने शिक्षक लागतात; शिक्षकांचे प्रथम दहापांच दाणे पेरले ह्मणजे शालारूप वृक्ष तयार होतो, त्यास हवीं तितकीं फळें लागून शिक्षकच शिक्षक तयार होतात. मग विद्यावृद्धि स्वस्त होते, विद्येचीं झाडें भराभर वाढतात, तीं एकमेकांस दाटी करितात, व आपआपल्या उत्कर्षाकरितां मुलांस निःसत्व करण्याच्या चढाओढीस लागतात, याचें वीतभर लेसन तर त्याचें हातभर, याचें पांच तास शिक्षण तर त्याचें सात तास, याच्या वर्षांत दोन इयत्ता तर त्याच्या चार, इ० इ०. या प्रकारच्या विद्याप्रसारांत ज्या कित्येक अनिष्ट गोष्टी विसरल्या जातात, त्या पूर्वी सांगण्यांत आल्या आहेत; परंतु एक विशेष गोष्ट येथें सांगितली पाहिजे ती ही कीं, सर्व सुधारणा विद्येवर अवलंबून, सर्व विद्या शिक्षणावर अवलंबून व सर्व शिक्षण शिक्षकांवर अवलंबून, अशी परंपरा लागत जाऊन समाजाची हानि करणें किंवा हित करणें फार थोड्या व्यक्तींच्या हातीं दिल्यासारखें होतें, व ते जर अविचारी असले तर निश्चयानें हानि होते. असा प्रकार ब्राह्मण समाजांत घडून आला आहे. विद्येच्या कामांत पालक चिलकुल विचार करीनासे झाले आहेत, त्यांस शिक्षणाच्या बाबतींत अक्षरही कळेनासें झालें आहे. मुलांस शाळेंत पाठविलें व त्यांची फी दिली कीं आपलें कर्तव्य संपलें अशी त्यांची समजूत झाली आहे; व त्यायोगें त्यांस या बाबतींत पूर्णपणें पारतंत्र्य आलें आहे. शिक्षणाच्या बाबतींत लोकमत नाहीं; शिक्षणाच्या कामीं शिक्षक करतील ती पूर्वदिशा; शिक्षक कोण आहेत व कसे आहेत हेंही पाहण्याची पालकांस गरज वाटेनाशी झाली आहे. व सर्व सुधारणेच्या व सर्व कुटुंबहिताच्या मुळाशीं असणाऱ्या या विद्याप्रसाराच्या कामीं सर्वजणांनीं आपल्या योग्य कर्तव्याची सारखी वीस वर्षे हेळसांड केली आहे. यां हेळसांडीचे

परिणाम मागील भागांत सांगितलेच; तात्पर्य असें कीं, ब्राह्मणज्ञाति आज ज्या निकृष्ट स्थितीस आली आहे, त्या स्थितीस ती या विद्याव्यसनाखेरीज दुसऱ्या कोणत्याही अनर्थावह गणिलेल्या व्यसनांनीं आली नसती; म्हणजे इतक्याच लोकांनीं दारू, भांग, गांजा, अफू, वगैरे मादक पदार्थांचा नित्य उपयोग केला असता, तरी त्यांनीं आपल्या संततीची अशी हानि करून घेतली नसती. उत्तरहिंदुस्थानांतील अमलीलोक पाहिले म्हणजे या गोष्टीचा प्रत्यय येईल. दुबळेपणा व विद्या यांची जोड आजपर्यंत कोणत्याही देशास हितावह झालेली नाहीं; तीमुळें सर्वत्र ऱ्हासाचा पाया पडला, व परमपूज्य पदास चढलेलीं राष्ट्रें रसातळास गेलीं. दुही, पाखंड, वितंडवाद, भेकडपणा व चिरडणारा भेटला कीं चिरडून जाण्याचा गुण, या व अशाच दुसऱ्या पुष्कळ ऱ्हासकारक दुर्गुणांचा या जोडीपासून प्रादुर्भाव होतो. सर्व शिक्षकांनीं व पालकांनीं, सर्व देशहितेच्छूंनीं हें एक तत्त्व निरंतर ध्यानांत धरावें कीं **बलिष्ठ शरीरांतच बलिष्ठ मनाचा वास होतो, निरोगी शरीरांतच निरोगी मनाचा वास होतो; दुबळ्या रोगी शरीरांत वास करणारें मन कोतें, कुचकें व कुचकामाचें होतें, त्याचा समाजास कोडीमात्र कायदा होत नाहीं.**

या सर्व गोष्टी ध्यानांत धरून विद्यादानाचा प्रयत्न आरंभिला पाहिजे व विद्यादानाच्या ज्या संस्था हल्लीं आहेत त्यांची सुधारणा करूं लागलें पाहिजे. विद्या कशी असावी व कोणत्या प्रकारें द्यावी याविषयीं पालकांत बहुमत झाल्याखेरीज व त्यांनीं विशेष विचार व दक्षता दाखविल्याखेरीज कोणतीही महत्वाची सुधारणा होणें नाहीं. विद्यादानासंबंधानें विचार करितां प्रथम जी गोष्ट ज्ञातिपरत्वें ठरविली पाहिजे ती ही कीं, मनुष्यास जें शिक्षण द्यावयाचें तें त्यास कोणत्या कार्मी द्यावें व त्याच्या अंगीं त्यापासून कोणते गुण उत्पन्न व्हावे. ही गोष्ट ठरविल्याखेरीज विद्यादानाचा प्रयत्न आरंभणें कित्ता निष्फळ होतें, हें गेल्या वीस वर्षांच्या अनुभवानेंच सिद्ध होतें. मातापितरांनीं **विद्येचा उद्देश** आधीं ठरविला पाहिजे, आपली ऐपत जाणून विद्येची **सीमा** व **काळ** ठरविला पाहिजे, नाहीं तर त्यांची शुद्ध 'रीण करून सण करणारा' प्रमाणें स्थिति होते, व कुटुंबास ऊर्जित काळ यावा तो विपरीत काळ येतो. ब्राह्मणांची विशेषतः अशी अवस्था होत चालली आहे व पुष्कळ लोक 'काय, करावें तरी काय?' या गोंधळांत पडले आहेत. सर्व रोगांचे प्रतीकार सुकर आहेत असें ह्मणतां येईल; परंतु दारिद्र्यरोगाचा प्रतीकार दुष्कर आहे. प्रतीकार होतो. ब्राह्मणलोक आपल्या आळसानें या दारिद्र्यदोषाची अधिकाधिक जोड करून घेत आहेत व निष्फळ विद्यासाधनास लागले आहेत. त्यांनीं एकवार मनाचा धडा करून कांहीं अवघड दिसणारा उपाय करून पाहिला पाहिजे, मग

त्यांचा मार्ग सुलभ होईल. गरीब व ऐपतदार या दोहोंच्या शिक्षणांत दिसण्यासारखा भेद कैल्याखेरीज विद्येचा प्रत्येकास व्हावा तसा फायदा होणें अशक्य आहे. नुसतें विद्येचें बंड माजवून एकमेकांस लंगडे करणें, या रीतीनें ज्ञातीचा काय फायदा होणार ? गरीबांस व श्रीमंतांस उभयतांसही कोणत्या सामान्य गुणांचें साधन केलें पाहिजे व प्रत्येकास कोणत्या विशिष्ट गुणांचें साधन केलें पाहिजे हा विचार शिक्षणयोजनेच्या मुळाशीं आहे त्याचा प्रथम विचार करूं.

९९. **मानसिक शिक्षण.**–मानसिक शिक्षण ह्मणजे मनुष्याच्या बुद्धीकडून कांहीं विशिष्ट ज्ञानाचा संग्रह करविणें असा अर्थ तूर्त समजला जातो, त्यामुळें हें शिक्षण अगदीं अपुरतें व पुष्कळ अंशीं निरुपयोगी असें हल्लीं होत आहे. पूर्वीचे भाग वाचून या गोष्टीचा प्रत्यय वाचकांस आलाच असेल. मनाचे तीन भाग कल्पिले आहेत; बुद्धि, मनोवृत्ति आणि इच्छाशक्ति. या तिहींचेंही योग्य शिक्षण ज्ञाल्याखेरीज विद्येचें चीज होत नाहीं, व मनुष्याच्या स्वभावास मोठेपणा व त्याच्या उद्योगास धिम्मेपणा येत नाहीं. परंतु या तिहींचें उत्तम शिक्षण होण्यास, ज्ञानसाधनाचीं जीं द्वारें, ह्मणजे इंद्रियें, तीं होतील तितकीं तीव्र केलीं पाहिजेत. हीं गोष्ट क्रमेंकरून अवलोकनाची सूक्ष्मता वाढविल्यानें होते. ह्मणून शिक्षणक्रमांत अव्वलपासून अखेरपर्यंत इंद्रियशिक्षणाची व अवलोनशक्ति वाढविण्याची योजना असली पाहिजे. या गोष्टीचें महत्व पुढील विवेचनावरून लक्षांत येईल.

ब्राह्मणांमध्यें अवलोकनशक्तीचा अभाव––ब्राह्मणांनीं अवलोकनशक्ति गमावून किती शतकें झालीं हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. अवलोकनावर अवलंबून असणारीं दोनच शास्त्रें इकडील ग्रंथसंग्रहांत सांपडतात, ज्योतिष आणि वैद्यक. ज्योतिषांत गेल्या कित्येक शतकांत कोणी अधिक विचार किंवा अवलोकन कैलेलें दिसत नाहीं. वैद्यकांतील औषधोपचारांसंबंधानें वनस्पतींचें अवलोकन सुटून तर्शींच कित्येक शतकें झालीं आहेत, व शारीरभागांचें सूक्ष्म अवलोकन करायाचें सुटून त्यांहूनही अधिक शतकें गेलीं आहेत. इतर जीं शास्त्रें इकडे उपलब्ध होतात तीं सृष्टीच्या किंवा मनाच्या सूक्ष्म अवलोकनावर अवलंबून असणारीं नाहींत, अल्पस्वल्प अवलोकनावरून कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें कल्पनांचीं विलक्षण जालें उत्पन्न करून त्यापासून निर्माण केलेलीं आहेत. गेल्या दहा, किंवा वीस, किंवा किती तरी शतकांत ब्राह्मणांनीं बुद्धीचा काय उपयोग केला असा प्रश्न कोणीं विचारल्यास त्यास **निबंधमालाकारांनीं** कोटेंसें दिलेलें उत्तर द्यावें लागतें. ज्याप्रमाणें आरबांचा पाहरा पेटींतल्या द्रव्याचें संरक्षण करितो, त्याप्रमाणें पूर्वजांनीं संपादिलेल्या ज्ञानाचें ब्राह्मणलोक संरक्षण करीत होते. पेटींतील कागदपत्र कुजून जावे, नाणीं गंजून काळीं पडून जावीं, कसर लागून वस्त्रांचें भुसकट व्हावें, येथपर्यंत चलन दिल्यावांचून राहिलेला तो आरबांनीं संरक्षण केले ला खजिना जसा पुढील संततीच्या हातीं यावा त्याप्रमाणें आधुनिक ब्राह्मणांचं

स्थिति झाली आहे. तीं जुनीं काळीं पडलेलीं नाणीं कोठेंच चालेनाशीं झालीं आहेत, व तीं आटवून जी मौल्यवान् धातु हातीं लागणार ती भट्टीस लागणाऱ्या कोळशांच्याच किमतीची सरासरी असणार. अशा स्थितींत नाणीं आहेत तशींच घासून कानसून त्यांच्या माळा करून गळ्यांत घालण्याचा प्रसंग आला आहे. उपजीविकेकरितां एखादें मोडून खाऊं ह्मटल्यास उपयोग नाहीं. अगदीं भिकाऱ्याचें भिकारदशेंत या मालमत्तेवर कसें तरी पोट भागेल, असा सर्वांस अनुभव येऊन चुकला आहे. आहे त्या स्थितींत हें ज्ञानभांडार या तऱ्हेचें आहे; त्यास देशी किंवा विलायती मुलामा दिल्यानें कांहीं थोडी अधिक किंमत येते; परंतु त्या मुलामा देण्याच्या कामानें कितीकांचें पोट भरणार ?

गेल्या दहापांच शतकांत तरी ब्राह्मणांनीं अवलोकनशक्तीचा उपयोग केलेला नाहीं. जें पूर्वजांनीं रचिलें तें पहिल्यापासून शेवटपर्यंत घोकीत बसण्यास त्यांनीं सुरुवात केली. तें जेव्हां घोकून संपेल तेव्हां त्याच्या अर्थाची जिज्ञासा उत्पन्न झाल्यास व्हावयाची, व तीही फार थोडयांस. यामुळें हा अर्थ दिवसेंदिवस दुर्बोध होत चालला. मग ज्यांस तो कळे त्यांनीं त्यावर टीका करण्याचें काम आरंभिलें. या टीका करण्याच्या कामांत काय ती विद्वत्ता दिसायाची व आपले स्वतःचे ग्रह लोकांच्या मनांवर बिंबविण्यास संधी सांपडायाची. त्यामुळें एकाच ग्रंथावर अनेक टीका उत्पन्न झाल्या, वादविवाद सुरू झाले, व भिन्न मतें स्थापित करण्याचा प्रयत्न चालू झाला. पुढें जे घोकणारे आले त्यांचें काम अवघड होऊं लागलें; कारण त्यांस मूळही घोकायाचें व टीकाही घोकायाची व तिचा स्वभाषेंत अर्थही घोकायाचा. कोणी शास्त्री लहान मुलास रघूचा सर्ग शिकवितांना पाहिल्यास त्यास या गोष्टींची प्रतीति येईल. अशा या घोकंपट्टीखालीं स्वतः अवलोकन करण्यास किंवा विचार करण्यास कोठून वेळ मिळणार ? मनाच्या सर्व शक्ति पहिल्या घोकण्याच्या प्रयत्नांतच संपून जात; व ज्याप्रमाणें परधर्मीयांनीं हल्ले करकरून या देशाचें राजकीय स्वातंत्र्य नाहींसें केलें, त्याप्रमाणेंच परमपूज्य पूर्वजांच्या लेखांची शुश्रूषा व घोकंपट्टी करण्यानें राहिलेलें मानसिक स्वातंत्र्य पूर्णपणें नाहींसें झालें.

एतद्देशीय शास्त्रें व काव्यें पाहिलीं ह्मणजे या गोष्टींचा प्रत्यय येतो. मूळ लिहिणारांपेक्षां टीकाकार फार. शास्त्रविषयांत मूळ लिहिणारे अलीकडे फारच थोडे झाले आहेत, व काव्यें लिहिणारांमध्यें अवलोकन नसल्यामुळें त्यांनीं पूर्वीच्या कवींच्याच कल्पना अधिकच अतिशयोक्तीनें लिहिल्या, व दुर्बोधता, विसंगति, वैरस्य आणि बीभत्सता यांनीं काव्यें भरून टाकिलीं. शक्य व अशक्य, खरें किंवा काल्पनिक, इष्ट किंवा अनिष्ट, इत्यादि गोष्टींचा काव्यांत किंवा शास्त्रांत अलीकडील ग्रंथांत थोडाही विचार राहिलेला दिसत नाहीं. ह्मणतात; धर्मशास्त्राचें अध्ययन केलें आहे ते असेंच ज्योतिषाचें अध्ययन केलें

लेले असेंच ह्मणतात; गरुडपुराणादि अर्वाचीन पुराणांचें, वैद्यकाचें, स्मृतींचें, अलंकाराचें, व्याकरणाचें व इतर शास्त्रांचें अध्ययन करणारे हें असेंच मत देतात. ज्यांनीं कोणत्याच शास्त्राचें अध्ययन केलेलें नाहीं, त्यांचें मात्र याहून निराळें मत असण्याचा कदाचित् संभव आहे. पूर्वजांच्या सर्व मानसिक प्रपंचाची ही अशी दुर्दशा होण्यास घोकंपट्टी व अवलोकनाचा अभाव हीं प्रबळ कारणें होतीं.

मेकालेनें एतद्देशीयांस पाश्चात्य विद्यांचें शिक्षण दिलें पाहिजे असें जेव्हां ठरविलें व त्याप्रमाणें क्रम सुरू झाला, तेव्हां आरंभीं या विद्येनें हिंदुलोकांस ऊर्जित दशा येईल असें सर्वांस वाटूं लागलें. परंतु विद्याप्रसारकांनीं ज्यांस विद्या द्यावयाची त्यांच्या मनाच्या दुष्ट संवयी ध्यानांत आणून विद्येचा क्रम ठरविला नाहीं; किंवा उत्तम संवयी लागण्याकरितां विशेष उपायांची योजना केली नाहीं. यामुळें कोणते अनिष्ट परिणाम झाले आहेत व जें उत्कर्षाचें साधन तेंच कसें अपकर्षाचें कारण होत आहे हें गेल्या दहा भागांत दाखविलेंच. ब्राह्मणांनीं पाश्चिमात्य विद्येच्या शिक्षणास आपली प्राचीन घोकंपट्टीची पद्धति जोडली. सृष्टीच्या सूक्ष्म अवलोकनावर व सूक्ष्म शोधावर पाश्चिमात्य विद्येचा पाया रचिलेला आहे. या विद्येचें घोकंपट्टीनें रहस्य कळायाचें नाहीं, व तें ब्राह्मणांस कळतही नाहीं आणि फलद्रूपही होत नाहीं, असें त्यांच्या हरएक प्रकारच्या कृतीवरून दिसून येतें. बुद्धीचा ओघ एका दिशेस होता, तो दुसऱ्या दिशेस वळला, परंतु त्याचें पात्र आकुंचित होतें तें तसेंच राहिलें. शहरास पाणी पुरत नाहीं ह्मणून कोणी कालव्याची दिशा फिरवून पहावी त्याप्रमाणें हा विद्यादानाचा प्रयत्न झाला आहे. कालव्याच्या उगमाचें तळें अधिक विस्तृत व अधिक खोल असलें तरच अधिक पाणी शहरास मिळेल, हा महत्वाचा विचार मुळींच विसरून गेला !

या गोष्टींचा वाचकास प्रत्यय येण्याकरितां अवलोकनाच्या कामांत आधुनिक विद्वान् किती मागें आहेत याविषयीं प्रत्यक्ष पाहिलेलीं उदाहरणें प्रथम देतों. एका एमेनें गाढव हें जनावर आपल्या वयाच्या सत्ताविसाव्या वर्षीं प्रथम पाहिलें, तेव्हां त्यास मोठें आश्चर्य वाटलें, व त्याच्या नाकास दोन लोंबते अवयव असतात त्यांचें नांव त्यानें विचारलें. एका बिएस कुलूप लाविनांना किल्ली कोणीकडून कोणीकडे फिरवितात हें विचारतांच मोठा गोंधळ पडला; व दुसऱ्या पुष्कळांस एकदम विचारतां पडेल असें मला वाटतें. वाघ व चित्ता, नारळी व शिंद, इत्यादींमधील भेद पुष्कळांस माहीत नाहीं. पुस्तकांतील चित्रांत गाडीचीं चाकें वाटोळीं काढलेलीं नाहींत असें मुलानें विचारलें असतां एका शिक्षकानें चिताऱ्याची चूक असावी ह्मणून सांगितलें. चित्रावरून मनुष्य हंसत आहे कीं रडत आहे हें पुष्कळांस ओळखत नाहीं; व चित्र लहान मुलीचें आहे कीं थोर स्त्रीचें आहे, ती ईश्वराची प्रार्थना करीत आहे कीं प्रियकरास विनवीत आहे हें ओळखण्याइतकें गम्य थोड्यांतच सांपडेल. याप्रमाणें अशीं उदा

हरणें देऊं गेल्यास मोठा ग्रंथ होईल. आतां याहून थोडीं वरिष्ट प्रतीचीं देतों.

एका सिव्हिल एंजिनीयरास सूक्ष्मदर्शक लावितां येईना; ज्योतिष घेऊन एमे झालेल्यास दुर्विण लावितां येईना; इतकेंच नव्हे तर ती पेटींतून काढल्यावर परत तींत ठेवितां येईना. आइसक्रीमची गोष्ट निघतांच मीठ व बर्फ यांची आवश्यकता लोक सांगतात, तेव्हां या दोन पदार्थांपासूनच तें तयार होतें अशी एकाची बरेच दिवस कल्पना होती. नकाशा पुढें ठेवून पाहतां ध्रुवप्रदेश सरासरी विषुवप्रदेशाइतकाच रुंद असावा, केवळ रेखांशाचीं वर्तुळें जवळ जवळ गेल्याचा भास होतो, असें दुसऱ्याचें मत झालें. आकाशांतील ढळक ताऱ्यांची किंवा ग्रहांची माहिती फार थोड्यांस आहे; बागेंतील झाडांचीं नांवें फारच थोडे सांगतील; उसाचें शेत व जोंधळ्याचें शेत प्रथमदर्शनीं कित्येकांस ओळखायाचें नाहीं; व गाण्यांतील सुरांची किंवा रागांची कामापुरती ओळख असण्याचा, वगैरे, संभव किती थोडा हें सांगायास नकोच. आतांपर्यंत हीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं ठळक ठळक विद्वानांचीं दिलीं आहेत, त्यांवरून कमी प्रतीच्या व कमी बुद्धीच्या विद्वानांच्या अवलोकनाची वाचकास कल्पना येईल. परंतु अशा उदाहरणांनीं कोणाची पक्की खात्री होणार नाहीं; ह्मणून ज्या कामांत ब्राह्मणांच्या बुद्धीचें विशेष कर्तृत्व दिसतें अशीं सर्वमान्य उदाहरणें देणें जरूर आहे.

ब्राह्मणांनीं विद्या शिकून लिहिलेलें, बोललेलें व केलेलें काय काय आहे या गोष्टीचा या कामीं पुरावा आणिला पाहिजे. ज्ञान, माहिती व सुविचार यांच्या प्राप्तीकरितां एतद्देशीय वर्तमानपत्रांपैकीं फारच थोडीं वाचण्यासारखीं आहेत व जीं आहेत तींही अल्पवयस्क मुलें किंवा स्त्रिया यांच्या हातीं देण्यासारखीं नाहींत, ही गोष्ट विद्वानांसही मान्य आहे. स्वतःचें अवलोकनच नाहीं तेव्हां स्वतःचे विचार कोठून येणार ! यामुळें शाळेंत पंतोजी पाडे सांगतो व सर्व मुलें ओरडून ते ह्मणतात, त्याप्रमाणें एतद्देशीय वर्तमानपत्रें पर्वाचा ह्मणत आहेत; एकानें लिहावें व बाकीच्यांनीं त्याचीच ओरड करावी. एतद्देशीय कवींनीं जीं नाव्हलें व नाटकें लिहिलीं आहेत, त्यांतही अवलोकनाचा पूर्ण अभाव; सृष्टीचें किंवा मानवी स्वभावाचें स्वतः केलेलें व स्वतःच्या शब्दांनीं लिहिलेलें वर्णन कोठें मिळायाचें नाहीं; व सांपडल्यास त्यास बहुधा बीभत्स किंवा कंटाळवाणें स्वरूप आलेलें असायाचें. ही स्थितिही विद्वानांस कबूलच आहे. अद्यापि एतद्देशीय नायिकांस कारंज्यांचे तुषार अग्निकणांचे परी भासत आहेत; अद्यापि सागर रत्नें भरून सामोरा येत आहे, अद्यापि नवमालिका व मालती या लता उपवनें सुगंधित करीत आहेत, हिंदुस्थानच्या अरण्यांत अद्यापि सिंहांची डुरकणी ऐकूं येते, गुहांमध्यें तपस्विजन वास करीत आहेत, व हिमालयाच्या एखाद्या उंच शिखरावर चढलें किंवा विमानांत बसून उंच गेलें कीं सर्व हिंदुस्थान खालीं नकाशाप्रमाणें पसरलेला दिसत आहे. ऋषि नाटकांत विदूषकाचा पार्ट करीत आहेत, वीरसेन

आपल्या मनांतील क्रोध प्रकट करण्याकरितां दोन्ही हात मुठी आवळून पुढें लांबवून मागेंपुढें झुलत आहे, व मराठे वीर उभे राहून पंधरा वीस मिनिटांचीं व्याख्यानें देत आहेत. कोठेंही अवलोकन दिसत नाहीं. ज्या अनुकरणाचा ब्राह्मणांस इतका तिटकारा तेंच त्यांच्या नांवाजलेल्या नाव्हलांत, नाटकांत व अभिनयांत पहिल्यापासून शेवटपर्यंत दिसतें. पेहराव व नांवें मात्र हिंदूंचीं, बाकी सर्व अनुकरण.

ज्यास स्वतः अवलोकन करायास नको त्यास पूर्वजांकडून किंवा परदेशीयांकडून कल्पना उसन्या घेतल्या पाहिजेत. पुस्तकांच्या नांवापासून या उधारखात्यास आरंभ होतो. वर्तमानपत्राचें नांव **इंदुप्रकाश**, मासिकपुस्तकाचें **निबंधचंद्रिका**, शालोपयोगी पुस्तकाचें **कुसुमांजलि**, इ०. पूर्वजांची निवळ टीका लिहिण्याची संवय मराठी पहिल्या पुस्तकापासून सरतेशेवटपर्यंत जाऊन पोहोंचली आहे. इतिहास, गणित, शास्त्रें वगैरे आधुनिक विषयावर ग्रंथ झाले आहेत ते भाषांतररूप असून मुलांकरितां आहेत तेव्हां त्यांचा विचारच करायास नको. राष्ट्रीयसभेच्या महत्वाच्या कामाकरितां हिंदुस्थानच्या सर्व दिशांस जाऊन आलेले ग्रयाजुएट थोडे नाहींत, परंतु हिंदुस्थानच्या प्रवासावर कोणी चांगलें पुस्तक लिहिण्यास धजलेला नाहीं. कारण सर्व प्रांतांत शरीर मात्र वाहून नेलेलें, परंतु इंद्रियें बंद राहिलेलीं, अवलोकन मुळींच नाहीं. अशी बहुतेकांची स्थिति. जो डोळे उघडून पाहील त्यास लोकांस सांगण्यासारखें कांहीं दिसेल, त्याच्या मनांत गमतीच्या किंवा आश्चर्याच्या कल्पना येतील, त्या त्यानें लिहिल्या तर लोकांसही गंमत व आश्चर्य वाटेल. परंतु कोणी प्रवासाची हकीकत लिहूं लागतांच त्याचें स्वतःचें अवलोकन फार थोडें असें तात्काळ दिसतें, जें काय असतें तें लोकांचे उतारे किंवा भाषांतरें किंवा त्यांच्याच मनोवृत्तींचें कृत्रिम अनुकरण. यामुळें प्रवासाची हकीकत निबंधरूप होते, त्यांत प्रवास करणाराची चित्तवृत्ति मनांत येऊन जो आनंद व्हावा तो होत नाहीं. वरील सर्व विषयांवर कोणीं व्याख्यानें दिलीं तरी हीच स्थिति आढळते. याप्रमाणें विद्वानांच्या लिहिण्याबोलण्याची स्थिति आहे. आतां ज्या गोष्टी देशप्रीतीनें आमच्या आह्मीं अवलोकन करून करायास पाहिजे होत्या, त्या युरोपियनांनींच आह्मांकरितां करून ठेविल्या आहेत, व आमचें काम त्यांच्या कृति पाहणें, ऐकणें व त्यांचा अभ्यास करणें इतकेंच उरलें आहे असें पूर्वी ९५ व्या कलमांत सांगितलेंच.

आतां ब्राह्मणांनीं केलेल्या गोष्टींचा उल्लेख करूं लागलें ह्मणजे मात्र काय सांगावें असें होतें. सुंदर, रमणीय व स्वाभाविक असें काय याविषयीं ब्राह्मणांचें अवलोकनच नाहीं, तेव्हां त्यांमध्यें सुंदर चित्रें काढणारे, सुंदर व भव्य राजवाड्यांचे डिझाईन करणारे, किंवा कांहीं नवीनच कल्पना काढून कलाकौ-

अत्यंत सुधारणा करणारे नाहींत, हें साहजिकच आहे. कोणीही एंजिनियरानें आपलें घर अशा ठिकाणीं व अशा तऱ्हेनें बांधलेलें दिसत नाहीं कीं त्याचा कित्ता एंजिनियर नसणारांनीं घ्यावा व आपलीं घरें सुधारावीं. डाक्तरांची तीच स्थिति. वकील, मुनसफ वगैरेंची तीच स्थिति. सर्व दमडीटोलींचा संग्रह करीत बसले आहेत, परंतु जो धंदा पत्करिला, त्यांत पुढें पुढें जाऊन कांहीं नवीन पहावें किंवा करावें, कांहीं नवीन कृति काढून नांवालौकिकास यावें ही इच्छाच नाहीं. शिक्षणाचा धंदा हातीं घेऊन मुलांचा कोण सत्यनास करून टाकिला आहे हें सांगितलेंच. आपण आरंभिलेल्या सुधारणेची दिशा न समजून कुणबीमाळ्यांशीं जें व्यर्थ वैमनस्य* उत्पन्न केलेलें आहे तें दाखविलेंच; व व्यर्थ अहंकार बाळगून मुसलमानांशीं व राज्यकर्त्यांशीं जो वैवनाव आरंभिला आहे त्याचे अनिष्ट परिणाम प्रसंगानुसार वर्णन केलेच.

पुष्कळ ब्राह्मण विद्वानांशीं बोलतांना असें दिसतें कीं त्यांस अवलोकनाचें महत्व कांहीं केल्या समजत नाहीं. त्यांस वाटतें जन्मास येऊन ज्या दोन गोष्टी करायाच्या त्या कुटुंबपोषण व देशसेवा या होत. कुटुंबपोषणास नौकरीच्या कामीं लागणारी विद्या पाहिजे ती कशीना कशी तरी शाळेंत मिळतेच. देशसेवा करण्यास वर्तमानपत्रें व व्याख्यानें समजण्यापुरतें ज्ञान असलें म्हणजे झालें. जे कारस्थानी पुरुष नायकत्व अंगीकारितात त्यांस इतिहासाचें, अर्थशास्त्राचें व चालू राजकीय घडामोडींचें कांहीं ज्ञान लागतें, तेवढें इंग्रजी ग्रंथावरून त्यांस मिळविता येतें. स्वतःच्या अवलोकनाची काय गरज आहे ? सारांश हा कीं, अवलोकनाचांचून कोणी मनुष्य अत्युत्तम एंजिनीयर, डाक्तर, शास्त्रवेत्ता, शिक्षक, शोधक, कल्पक किंवा सुधारक होऊं शकणार नाहीं असें गृहीत केलें, तथापि तो अत्युत्तम राजकारणी (म्हणजे देशसेवक) पुरुष होण्यास कोणती हरकत आहे ? ज्यांनीं आतांपर्यंत देशाच्या अवलोकनावांचूनच लिहिलें व सभा भरवून व्याख्यानें दिलीं, परंतु महत्वाची कोणतीही कार्यसिद्धि केली नाहीं, उलट आपल्या ज्ञातीस दिवसेंदिवस अधिकाधिक निकृष्टता मात्र आणिली त्या राजकारणी पुरुषांसच हें बोलणें शोभेल ! लोकस्थितीविषयीं ठराविक मतांच्या थोडें पुढें जाण्यास, कोणतेही विचार उधार आणलेले नव्हेत तर आपले स्वतःचे असें वक्तृत्वपूर्वक दाखविण्यास, विरुद्ध पक्षाचें बळ कशांत आहे व आपला कमीपणा कशांत आहे हें ओळखण्यास, लोकांचीं मनें स्वाधीन करून घेण्यास, इतरांचे अंतर्गत हेतु ओळखून सावध होण्यास, व अशींच दुसरीं अनेक दूरदर्शित्वाचीं कार्यें करण्यास व पार्लमेंटाचा सभासद होण्यास आमच्या कारस्थानी पुरुषांस स्वतःचें अवलोकन लागत नाहीं, तर दुसऱ्यांचे ग्रंथ व त्यांचेच शब्द

(* या भागाच्या खेरीज पुरवणी पहा.)

मात्र पाहिजे असतात! व अस्सेरास समजूत काय? कीं देशांत अत्युत्तम कारागीर, शास्त्रवेत्ते, कल्पक व शोधक मनुष्य नसले तर चालतील; उद्योगी व सामर्थ्यवान् प्रजा नसली तरी चालेल; धर्म, नीति, एकी व उत्तम शिक्षण नसलें तरी चालेल; राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यास बोलून बोलून व लिहून लिहून राज्यकर्त्यांस जेरीस आणिलें ह्मणजे सर्व कार्यसिद्धि होणार! इंग्रजलोकांत स्वार्थबुद्धि जोंवर कायम आहे, जोंवर सर्व जग मायामय आहे असें समजून तपश्चर्येस लागण्याचा त्यांनीं चेत केला नाहीं, तोंवर अशा या कारस्थानी पुरुषांस ते कितीसे वठतील ते वठोत! सर्व राजकारणी पुरुषांची कल्पना ही कीं, एकदां स्वातंत्र्य मिळालें ह्मणजे मग अवलोकनास व उत्तम बलाढ्य माणसें तयार करण्यास आरंभ करितां येईल;--एवढेंच कीं तीं तयार होईपर्यंत रानटी अफगाण लोकांनीं, व त्यांच्या मागोमाग रशियाच्या कोसाकांनीं आह्मांस पादाक्रांत करून टाकूं नये, किंवा आमच्यांतीलच हजारों बंडखोर लोकांनीं देशाभिमानास पराङ्मुख होऊन जिकडे तिकडे झोटिंगशाई आरंभूं नये!

देशाच्या उत्कर्षासंबंधानें कार्यकारणांचा हा विलक्षण विपर्यास विद्वानांनीं केलेला पाहून त्यांमध्यें अवलोकनशक्ति नाहीं व विवेकही नाहीं असें दिसतें. इंग्रजी नाव्हलांचीं संविधानकें त्यांस कळतात, परंतु मर्म कळत नाहीं असें पूर्वी एके प्रसंगीं दाखविलें. इतिहासाचें व युरोपीय राष्ट्रांतील हरतऱ्हेच्या धामधुमींचें त्यांस तसेंच मर्म कळत नाहीं. शुद्ध अंधपरंपरा चालली आहे. या स्थितींतून वर येण्यास एकच मार्ग आहे. तो हा कीं, इंद्रियांचें शिक्षण चांगलें झालें पाहिजे, अवलोकनशक्तीस तीव्रता आली पाहिजे, व विचारास जी सामुग्री लागते तिचा फार मोठा साठा जवळ झाला पाहिजे. हल्लीं ब्राह्मणांची अशी स्थिति आहे कीं, जें डोळ्यांपुढें आहे तें त्यांस दिसत नाहीं; कारण इंद्रियांनीं बातमी आणून शिपायाचें काम केलें तरी मेंदू ठिकाणावर असेल तर त्यास ती पोहोंचणार, व तो केव्हां निद्रित, केव्हां व्यग्र व केव्हां कल्पनांच्या अंतर्गृहांत, विलासी देशी राजामाणें, क्रीडा करीत राहणार! या शोचनीय स्थितींतून बाहेर ओढून त्यास योग्य कामास लावण्यास अवलोकनाची शक्ति पूर्ण दशेस आणिली पाहिजे. ब्राह्मणांच्या एकंदर शिक्षणांत इंद्रियशिक्षण किती महत्वाचें आहे हें याप्रमाणें विस्तारानें दाखविलें.

१००. **बुद्धीचें शिक्षण**. कांहीं एका इयत्तेपर्यंत विशिष्ट विषयांचें ज्ञान सर्व व्यक्तींस असलें पाहिजे व तें ज्ञान बुद्धीच्या द्वारें करून देणें व बुद्धीस विचार करण्याची योग्य दिशा दाखविणें, हें प्राथमिक किंवा मध्यम प्रकारच्या शिक्षणानें झालें पाहिजे. हें इतकें बुद्धीचें सामान्य शिक्षण होय. याहून अधिक शिक्षण देणें झाल्यास त्यांत मनुष्याचा पुष्कळ वेळ जाईल, व उद्योगधंद्याच्या कामीं लागणारें ज्ञान किंवा हस्तकौशल्य संपादन करणें त्यास अशक्य होईल. तेव्हां बुद्धीचें

विशेष शिक्षण देण्यापूर्वी, ह्मणजे वरिष्ट शिक्षण देण्यापूर्वी, पुढें मुलगा कोणतें काम करणार, त्याच्या बुद्धीचा जोर कितपत आहे, व आपली ऐपत किती आहे, या गोष्टींचा पालकानें विचार करून या विशेष शिक्षणाच्या नादीं लागावें. नाहीं तर तें अनिष्ट परिणाम करितें.

प्राथमिक व मध्यम प्रकारचें जें शिक्षण द्यावयाचें तें शरीराची पूर्ण वाढ करून व शरीरशक्तींत बिलकुल कमतरता न पडूं देऊन दिलें आहे असें ग्रहण करूं. ही गोष्ट किती आवश्यक, परंतु किती अवघड आहे, याचा प्रत्यय वाचकास आलाच असेल. या कामीं बुद्धीच्या मानानें अभ्यास सावकाशीनें करवून घेतला पाहिजे, व घाई करण्याचा पालकांनीं बिलकुल विचार सोडला पाहिजे. यानंतर बुद्धीचा एक गुण लक्षांत आणून पुढचें शिक्षण आरंभिलें पाहिजे. हा गुण असा कीं, इंद्रियद्वारा ज्ञानाचा संग्रह करणें, ही गोष्ट अधिक साध्य आहे, परंतु कल्पनेनें ज्ञानसाधन करणें, मिळविलेल्या ज्ञानाचे परस्परसंबंध जुळविणें, व बुद्धीस वैचित्र्य आणि सूक्ष्मता (complexity) आणणें ही गोष्ट अवघड आहे. एका किंवा दोन विषयांत बुद्धीची अशी तयारी करण्यासही मोठी जोरदार बुद्धि लागते; व मोठ्या बुद्धीसही अल्पकाळांत अशा प्रकारची तयारी करणें दुरापास्त आहे. ज्या बुद्धींत पुरेसा जोर नाहीं, तीस वैचित्र्य आणि सूक्ष्मता देऊं लागल्यास तें शरीरास अपायकारक होतें, असें युरोपीय शिक्षणशास्त्रकारांचें मत आहे व सर्वत्र अनुभवही तसाच आहे. शरीराम [illegible] त्याचा तसाच परिणाम मनावर होतो व व्यक्तीचें उभय प्रकारें नुकसान होतें. पुष्कळ विद्वान् ग्रंथकर्ते, कवि, शास्त्रवेत्ते, वगैरे अल्पकाळ आपलें तेज पाडून बुद्धीचें पुरतें बीज केल्यावांचूनच अल्पायुषी मरण पावलेले आहेत. त्यांचीं चरित्रें वाचतां त्यांच्या बुद्धीस अल्पवयांतच अत्यंत वैचित्र्य व सूक्ष्मता आलेली दृष्टीस पडते. उलट न्यूटन, डार्विन् वगैरे तसेच दुसरे अत्यंत बुद्धिमान् पुरुष घेतल्यास त्यांमध्यें हें अल्पवयांतील बुद्धिवैभव दिसत नाहीं, व ते दीर्घायुषी व रोगमुक्त होति तसेंही आढळतें. अल्पवयांत बुद्धीस परिपक्वता आणणें हें एकंदरीनें अत्यंत अनिष्ट गणिलेलें आहे, व ती कोणा मुलाच्या बुद्धीस येऊं लागल्यास त्याची विद्या कांहीं दिवस बंद करून अवलोकनादि शुद्ध इंद्रियकार्यें व शारीरिक श्रम त्याकडून करवावे, असें सर्वांचें मत आहे. आमच्या इकडे पालकांस अज्ञानामुळें ही अल्पवयांतील बुद्धीची परिपक्वदशाच वर्णनीय वाटते व तीस ते होईल तितकें उत्तेजन देतात, ही त्यांची केवढी चूक होय! या चुकीचे दुष्परिणाम सर्वांच्या ध्यानांत येण्यासारखे स्थूल असून त्यांकडे कोणाचें लक्ष जात नाहीं! पुष्कळ पाहणें, पुष्कळ ऐकणें, पुष्कळ संग्रह करणें, इत्यादि इंद्रियग्राह्य पुष्कळ ज्ञान संपादन करणें, हें अल्पवयांतील पहिलें कर्तव्य समजावें, त्यामुळें अवलोकनशक्ति व जिज्ञासा वाढते, शरीरास अपाय होत नाहीं, मन सर्वदा दक्ष राहतें, ज्ञानाचा चळकट पाया पडतो, व ज्या

बुद्धींत सामर्थ्य असेल तीस पुढें मोठ्या वयांत भव्य इमारत बांधण्याची सामग्री तयार मिळते. ज्यांस बुद्धिसामर्थ्य कमी त्यांस आपल्या नित्य व्यवहाराच्या कामीं आपल्या ज्ञानाचा सांठा उपयोगास आणितां येतो. ह्मणून बाल्यावस्थेंत बुद्धीस दीर्घ विचार, वैचित्र्य व सूक्ष्मता आणण्याच्या नादीं कोणीही लागूं नये. बुद्धीचा ह्रास श्रीमंत व दरिद्री या उभयतांमध्येंही आढळतो, परंतु श्रीमंतांस व्यर्थ मानसिक श्रम करून पुढें दुबळेपणा आला तरी तो सह्य असतो, परंतु गरीबाची त्यायोगें निश्चित हानि होते. सबब शाळामास्तरांनीं पालकांस, विशेषतः गरीब पालकांस, मुलांच्या बुद्धीचा अंदाज नेहमीं देत गेलें पाहिजे, व पालकांनीं मुलांच्या पुढील शिक्षणाचा क्रम त्या अंदाजावरून ठरविला पाहिजे.

दुसरें असें कीं, अल्पवयांत संपादिलेलें शुद्ध बुद्धिवैभव मनुष्यास शारीरिक श्रमांपासून पराङ्मुख करितें. हा परिणाम अमेरिकेसारख्या यंत्रविद्येच्या माहेरघरीं देखील दृष्टीस पडूं लागला, तेव्हां सरकारानें शाळांतील शिक्षणक्रम बदलून टाकिला. शारीरिक श्रम करण्याचें सामर्थ्य असल्यावांचून स्वार्थ किंवा परमार्थ दोन्ही साधत नाहींत. कांहीं कामीं मन अगदीं नाजूक होतें व कांहीं कामांत तें दगडाप्रमाणें निर्जीव होतें. विचार व व्यवहार यांमध्यें त्यामुळें मोठें अंतर पडतें व मनुष्य सामाजिक कर्तव्यांस निरुपयोगी होतो. कित्येक कवि, इतिहासकार व तत्त्ववेत्ते यांविषयीं असें दाखवितां येतें कीं, त्यांचे ग्रंथ वाचले असतां त्यांचीं मनें अत्यंत थोर, विचार अत्यंत प्रगल्भ व त्यांचा सदाचाराविषयीं निर्णय अगदीं चराचर, असें आढळतें, परंतु त्यांचीं चरित्रें वाचलीं असतां ते अत्यंत दुराचारी व निर्दय असावे अशी खात्री होते. याचें कारण असें कीं वैचित्र्य व सूक्ष्मता संपादून त्यांची बुद्धि भराभर पुढें गेली, व त्यांच्या मनोवृत्ति व इच्छाशक्ति यांस चांगलें वळण न लागून त्या अगदीं मागें पडल्या, व बुद्धीस जें उचित ह्मणून वाटे तें हातून घडेनासें झालें. ब्राह्मणांच्या विद्येचा हल्लीं असाच परिणाम दृष्टीस पडतो. या सर्व गोष्टी मनांत आणून बुद्धीचें शिक्षण कोणास किती द्यावें, हें ठरविलें पाहिजे. अविचारी मुलांचा आग्रह या कामीं उपयोगी नाहीं, पालक व शिक्षक यांनीं मिळून निःस्पृहपणें विचार केला पाहिजे

१०१. **मनोवृत्तींचें व इच्छाशक्तीचें शिक्षण.** ज्याप्रमाणें बुद्धीचें शिक्षण ज्ञानाच्या वैचित्र्यास व सूक्ष्मतेस कारण होतें, त्याप्रमाणें मनोवृत्तींचें व इच्छाशक्तीचें शिक्षण क्रियांच्या वैचित्र्यास व सूक्ष्मतेस कारण होतें. सदाचारासंबंधानें पाहतां मनोवृत्तींचें शिक्षण बुद्धीच्या शिक्षणाहूनही अधिक महत्वाचें आहे. जर मनोवृत्ति योग्य दिशेनें वाहूं लागल्या तर सदाचारास अत्यंत मदत होते, व जर मनोवृत्ति अयोग्य मार्गास लागल्या तर सर्व दुराचारांस जोर येतो, असें सर्व विचारी पुरुषांचें मत आहे. प्रत्येक मनोवृत्ति सदाचाराच्या कामीं लावितां ये-

ईल व ह्मणूनच ईश्वरानें मनुष्यास मनोवृत्ति दिल्या आहेत, असें वट्लर वगैरे कित्येक तत्त्ववेत्त्यांनीं स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. मनोवृत्तींस योग्य दिशा लागल्यावांचून सद्विचारांचें प्राबल्य होत नाहीं, मनोवृत्तींचें आकलन करितां आल्याखेरीज तत्त्वज्ञान व्यर्थ आहे, हा सिद्धांत एतद्देशीय व परदेशीय सर्वच तत्त्ववेत्त्यांनीं ठरविलेला आहे. मनोवृत्तींचें नुसतें आकलन करणें किती अवघड आहे हें ध्यानांत आणिल्यास सदाचाराच्या कामीं त्यांचाच उपयोग करून घेणें हें अधिकच अवघड आहे हें सांगावयास नको च. परंतु अल्पवयांत शिक्षकांकडून व पालकांकडून योग्य शिक्षण मिळाल्यास ही अवघड गोष्टही बऱ्याच अंशीं साध्य होते; ती होईल तितकी साध्य करून घ्यायाची असा उभयतांचाही निश्चय असला पाहिजे; व या कामीं उभयतांनींही नित्य दक्षता ठेवून प्रयत्न केला पाहिजे. हलक्या व थोर घराण्यांतील पुरुषांच्या वागणुकींत जो भेद दिसतो तो मनोवृत्तींस मिळालेल्या भिन्न शिक्षणाचा परिणाम होय.

हा विषय कदाचित् उदाहरणांवांचून कांहीं वाचकांस समजायाचा नाहीं, ह्मणून येथें थोडीं उदाहरणें देतों. आपल्या मनासारखी कोणतीही गोष्ट झाली नाहीं कीं मनुष्यास क्रोध येतो. ही मनोवृत्ति वर्षाच्या मुलापासून मोठ्या वृद्ध माणसापर्यंत सर्वांमध्यें दिसते. लहान मुलास दिव्याची जोत धरूं दिली नाहीं तर तें रडून आकांत करील, तरुण मनुष्य आपलें कोणीं कांहीं ऐकिलें नाहीं तर संतापून जाईल, वृद्ध मनुष्यास जें रुचत नाहीं तें सांगितल्यास त्याचे माथें फिरून जाईल. या अशा क्रोधरूप मनोवृत्तीस योग्य दिशा लाविल्यास काय परिणाम होईल ! हा कीं आपल्या स्वाधीनच्या कोणीं मनुष्यानें दुराचार केला, किंवा आपण सत्कार्य करीत असतां कोणीं निरर्थक विघ्न केलें, किंवा कोणीं अन्यायानें आपल्या किंवा लोकांच्या शरीरास, संपत्तीस किंवा अब्रूस धक्का लाविला, तर त्याचा आपणांस राग येईल, व त्याचें शासन करण्याकरितां जो योग्य मार्ग दिसेल तो आपण घेऊं. परंतु जर याच क्रोधरूप मनोवृत्तीस अयोग्य दिशा लागली, तर आपण कुमार्गानें जात असतां कोणी आड आल्यास त्यावर आपण तुटून पडूं. गर्व आणि अभिमान हीं एकाच मनोवृत्तीचीं नांवें आहेत. कोणत्याही गुणावद्दल चढून जाऊन लोकांस तुच्छ मानणें व याप्रमाणें त्या मनोवृत्तीचा दुरुपयोग करणें ह्मणजे गर्व होय; जो गुण आपणांस महत्वाचा वाटतो त्याचें इतरांनीं संपादन करावें ह्मणून तो लोकांच्या डोळ्यांपुढें धरणें, हें त्याच मनोवृत्तीचें योग्य स्वरूप अभिमान शब्दानें दाखविलें जातें. दया, धैर्य, निग्रह, बंधुप्रीति, सहृदयता, पूज्यबुद्धि, वगैरे प्रशंसनीय मनोवृत्ति होत; यांच्या विरुद्ध वृत्ति निंद्य होत. कोणत्याही मनोवृत्तीच्या परिणामांवरून ती योग्य किंवा अयोग्य ठरविली जाते. ही योग्यायोग्यता

टराविणें हें बुद्धीचें, ह्मणजे विवेकशक्तीचें कार्य होय; व विवेकशक्तीचा व मनोवृत्तींचा पूर्णपणें मेळ घालणें हें मनोवृत्तींच्या शिक्षणाचें उत्तम फळ होय.

परंतु एवढ्यानेंच मनोवृत्तींचें शिक्षण पुरें होत नाहीं. कांहीं थोड्या मनोवृत्ति मात्र अशा आहेत कीं त्या उत्पन्न होऊन आनंदांत त्यांचें पर्यवसान व्हावें व नंतर त्यांचा अस्त व्हावा. बाकी सर्व अशा आहेत कीं त्यांमुळें पुढें उचित क्रिया होईल तरच त्यांचें साफल्य होतें व त्यांपासून समाधान वाटतें. सद्विचार व अनुरूप मनोवृत्ति यांची एकदम उत्पत्ति होऊन उचित क्रिया हातून घडूं लागल्या व त्यांत मनास आनंद व समाधान वाटूं लागलें, ह्मणजे मानसिक शिक्षणाचें पूर्ण साफल्य झालें. उदाहरणार्थ, कोणी मनुष्य संकटांत पडलेला पाहतांच त्याची नुसती दया येऊन काय उपयोग? आपणांकडून त्यास जी मदत होण्यासारखी असेल ती करून आपण समाधान मानिलें तर त्या उत्तम मनोवृत्तीचें साफल्य झालें. नाहीं तर ती जागृत न झालेलीच बरी. याप्रमाणें मनोवृत्तींचें उपयुक्त क्रियांच्या द्वारें साफल्य होण्यास दोन गोष्टी आवश्यक असतात. एक ही कीं, शरीरसामर्थ्य असावें लागतें, तेव्हां क्रिया करण्यास उत्साह उत्पन्न होतो, व दुसरी गोष्ट संवय लागते. मग तिजमुळें आवश्यक प्रयासांचें मनास ओझें वाटत नाहीं, व मागाहून शुद्ध आनंद व समाधान होतें, दुःखाची किंवा असमाधानाची त्यावर छाया पडत नाहीं. या उदाहरणावरून इतर मनोवृत्तींच्या योग्य शिक्षणाची वाचकास कल्पना येईल. शरीरसामर्थ्याचा उत्साह असून द्रव्यादि अन्य साधनेंही अनुकूल असलीं तर परोपकार, सौजन्य, महत्वाकांक्षा वगैरे अनेक मनोवृत्तींचा अत्युत्तम परिणाम होतो व अजरामर कीर्ति प्राप्त होते. तेव्हां शरीरसामर्थ्यांबराबर संपत्तीची जोड करून घेण्याचीही उमेद हरप्रयत्नांनीं उत्पन्न करणें इष्ट आहे.

शरीरसामर्थ्यावांचून किंवा द्रव्यादि साधनावांचून हल्लीं विद्वान्लोकांचे सुविचार व उत्तम मनोवृत्ति व्यवहाररीत्या मुळींच कामीं येईनाशा झाल्या आहेत हें पूर्वी दाखविलें. केवळ मोठ्या वर्णनीय मनोरथांचा उपयोग नाहीं, उत्साह, प्रवृत्ति व आत्मावलंबन असावें लागतें, व तें सांप्रतच्या अतिशय स्वस्त किंवा अतिशय महाग, कोणत्याच शिक्षणानें येत नाहीं, हा त्या शिक्षणाचा मोठा दोष होय. बुद्धीच्या शिक्षणांत वैचित्र्य व सूक्ष्मता यांचा जो एक दोष दाखविला, तो मनोवृत्तींच्या शिक्षणांतही उत्पन्न होतो. कोणी अत्यंत पीडिलेला मनुष्य पाहतांच अंगावर शहारा येणें, तेथून निघून जावेंसें वाटणें व त्यास मदत करण्याचें एकीकडेच राहणें हा परिणाम अनिष्ट होय. असा मनोवृत्तींचा परिणाम होईल इतकें मन नाजूक करणें इष्ट नाहीं, त्यास संवर्यीनीं धिम्में केलें पाहिजे. या सर्व गोष्टी ध्यानांत ठेवून नैसर्गिक मनोवृत्तींचें शिक्षण आरंभावें. हें शिक्षण व व्यायामद्वारा शरीरास मिळालेलें शिक्षण पूर्णत्वानें प्राप्त झाल्यास इच्छाशक्तीचें अर्धे शिक्षण झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

कारण इच्छाशक्तीच्या शिक्षणांत एका विशिष्ट मनोवृत्तींचें जेव्हां प्राधान्य उत्पन्न करावें तेव्हां तिचें पूर्ण शिक्षण होतें. ही विशिष्ट मनोवृत्ति कांहीं अंशीं नैसर्गिक आहे खरी, परंतु तीसच सर्वप्रकारें प्रबळ करून तिचा व्यक्तिमात्रावर अमल उत्पन्न करणें हें कृत्रिम साधनांवांचून व नित्य संवयींवांचून साध्य होत नाहीं. ही अतिश्रेष्ठ मनोवृत्ति म्हटली म्हणजे **सदाचारप्रीति** होय. या मनोवृत्तींत इतर अनेकांचा समावेश होतो. धर्मासंबंधानें श्रद्धा, ईश्वरासंबंधानें भक्ति, कृतज्ञता व नम्रता, बांधवांसंबंधानें माया व अनुकंपा, समाजासंबंधानें न्याय, व नीति, व्यवहारांत खरेपणा व सभ्यता, शरीरसंरक्षणासंबंधानें आरोग्यनियमांचें पालन, इत्यादि गोष्टी, सदाचारप्रीतीच्या अंगभूत होत. अशिक्षित मनुष्याची किंवा लहान मुलांची वर्तणूक पाहिल्यास या सर्व गोष्टींसंबंधानें त्यांची नैसर्गिक वृत्ति सदाचाराच्या विपरीत असते. जें आपलें तें आपलें, व लोकांचें तेंही आपलें करून घेण्याचा मनुष्याचा साहजिक क्रम असतो, व बुद्धि आणि बळ यांचा अशा कामीं उपयोग केला जातो. सर्व गोष्टींत स्वार्थबुद्धि प्रबळ होते, व परमार्थाची किंमतच वाटत नाहीं. तूर्ततूर्त सुखास मनुष्य लुब्ध होतो व भावी दुःखांस विसरून जातो. या सर्व अनुभवांवरून धर्म, नीति, आरोग्य, आणि सभ्यता यासंबंधाचे जे हितावह नियम उत्पन्न झाले आहेत ते निरंतर पाळण्याची जेव्हां संवय होते व त्या संवयीमुळें ते पाळले तरच समाधान, नाहीं तर अत्यंत दुःख, अशी मनाची स्थिति होते, तेव्हां मनुष्याच्या इच्छाशक्तीचें पूर्ण शिक्षण झालें असें समजावें.

१०२. **संवयी.**--सर्व प्रकारचें मानसिक शिक्षण उत्तम प्रकारें होण्यास मनुष्यास क्रमानें उत्तम संवयी लागत गेल्या पाहिजेत. नैतिक शिक्षणांत या संवयींचें जितकें महत्व आहे तितकें दुसऱ्या कोणत्याही गोष्टींचें नाहीं. मुलांस चांगल्याच संवयी लागत आहेत अशाविषयीं पालक जेवढी खबरदारी ठेवतील तेवढी थोडीच समजली पाहिजे, व शिक्षकांनींही तशीच ती ठेविली पाहिजे. शिक्षकांस संवयींचें महत्व मुळींच कळत नाहीं अशी हल्लींची अत्यंत शोचनीय स्थिति आहे. जी एक संवय पालक व शिक्षक हल्लीं मुलांस लावितात ती अभ्यास करण्याची व तिचे दुष्परिणाम पूर्वी सांगितलेच.

शरीरसंरक्षणासंबंधानें मुलांस ज्या संवयी लावायाच्या त्या नियमितपणाच्या होत. खाणेंपिणें, व्यायाम, विश्रांति, वगैरेंच्या बाबतींत मुलांस घालून दिलेले नियम तीं सतत पाळीत आहेत कीं नाहीं हें पालकांनीं व शिक्षकांनीं नित्य पाहिलें पाहिजे. तें पाहणेंही कांहीं दिवस इतक्या दक्षतेनें केलें पाहिजे कीं, त्या त्या क्रिया मुलांच्या अंगवळणी पडाव्या, त्यांस त्यांची संवय जडावी व त्या करण्यांत आनंद, परंतु न केल्यास चैन पडूं नये अशा त्यांची स्थिति व्हावी. खाण्यापिण्यांत अधाशीपणा येऊं देऊं नये, परंतु खाण्याच्या नियमित वेळीं भूक

लागतांच कांहीं तरी पदार्थ तयार ठेवलेले असले पाहिजेत. योग्य व्यायाम होत आहे, परंतु अतिरिक्त होत नाहीं एवढेंच पाहिलें म्हणजे झालें, व विश्रांति कमी होत नाहीं, हें मुख्यत्वेंकरून पाहिलें पाहिजे; सांप्रतच्या स्थितींत तो अधिक होण्याचा संभव नाहीं. आरोग्यरक्षणासंबंधीं नियमांचें शाळेंत आरंभापासून उत्तम शिक्षण झालें पाहिजे व तें मुलांस कांहीं विशेष संवयी लावण्याच्या उद्देशानें असलें पाहिजे, केवळ डोक्यांत माहिती भरण्याच्या उद्देशानें नसावें.

अवलोकनाच्या संबंधानें संवयी लावण्याकरितां शाळेंत व घरीं मुलांस जे जे प्रश्न सुचतील ते ते शिक्षकांस किंवा पालकांस विचारण्याची परवानगी असावी एवढेंच नव्हे, तर संवय लावावी. कोणी कांहीं विशेष अवलोकन केलें किंवा चमत्कारिक पदार्थ आणिला, किंवा विशेष संग्रह केला, तर त्याबद्दल त्याची वाहवा करण्याचा व त्यास बक्षिस किंवा उत्तेजन देण्याचा परिपाठ असावा. जेव्हां मुलांनीं विचारलेल्या प्रश्नाचें सयुक्तिक व खरें उत्तर शिक्षकांस देतां येणार नाहीं, तेव्हां त्यानें विचार करून सांगेन म्हणून सांगावें, परंतु खोटें उत्तर देऊं नये किंवा उत्तर देण्याचें मुळींच टाळूं नये. **शिक्षकांची मुलांच्या संघट्टनानें सुधारणा होण्याचा हा एक प्रमुख मार्ग आहे.** हल्लीं सर्व प्रश्न शिक्षक मुलांस विचारतात व तेही चुकांतले, त्यामुळें शिक्षक व मुलें उभयतांही गचाळ होत जातात; व अवलोकन आणि जिज्ञासा हे गुण उभयतांतूनही नाहींसे होतात. वर सांगितलेल्या क्रमानें उभयतांचीही उत्तरोत्तर सुधारणा होत जाईल. युरोपिय शिक्षणशास्त्राकारांनीं या बाबतींत शिक्षकांनीं कसें दक्ष असावें अशाविषयीं महत्वाच्या सूचना केल्या आहेत; व कोणता मनुष्य शिक्षणाच्या कामास योग्य व कोणता अयोग्य हें ठरविण्याचा हा एक मार्ग सांगितला आहे. शिक्षणाचे विषय व तत्संबंधीं पुस्तकें अवलोकनशक्ति व जिज्ञासा जागृत होईल अशा प्रकारचीं असलीं पाहिजेत, व त्यांचा कसा उपयोग करावयाचा याविषयीं शिक्षकांनीं नित्य विचार व प्रयोग करीत असलें पाहिजे.

अभ्यासाच्या संबंधानें जी संवय लावायाची ती लक्ष स्वाधीन ठेवण्याची होय. मुलास साधेल तितकाच वेळ त्यास एकचित्त होऊन लक्षपूर्वक समजून घेण्याची व वाचण्याची, किंवा आवृत्ति करण्याची संवय लागली म्हणजे झालें.

मनोवृत्तींच्या व सदाचाराच्या संबंधानें चांगल्या संवयी लागणें अत्यंत आवश्यक गणिलेलें आहे. धैर्यादि इष्ट मनोवृत्तींस पूर येऊं देणें व मदमत्सरादि दुष्ट मनोवृत्तींचा तत्काळ निग्रह करणें, सत्कार्य हौसेनें करणें व दुष्ट कार्यापासून साहजिकपणें निवृत्त होणें--ही गोष्ट अनुकरणानें, संगतीनें, उपदेशानें, स्तुतिनिंदारूप उत्तेजनांनीं व अशाच दुसऱ्या साधनांनीं साध्य होते. **वर्गातील सर्व मुलें सारख्या योग्यतेचीं असल्यास हीं सर्व साधनें विशेष उपयोगीं**

पडतात, व तीं तशीं नसल्यास कांहींत गुण व कांहींत दोष, किंवा सर्वां-तच दोष उत्पन्न होतात. ही गोष्ट ध्यानांत धरून वर्ग केले पाहिजेत.

पालकाचीं यासंबंधानें अनेक कर्तव्यें सांगूं लागल्यास फारच विस्तार होईल, ह्मणून शिक्षकाच्या कर्तव्यांपैकीं एकदोहोंचा मात्र येथें उल्लेख करितों, त्यांवरून पालकाच्या कर्तव्यांची दिशा ध्यानांत येईल. **मुलांस जी शिक्षा करावयाची ती मुलांच्या साहाजिक न्यूनतांवद्दल किंवा त्यांच्या अज्ञानाकरितां नसावी. तर त्यांस वाईट संवयी लागूं नयेत ह्मणून असावी. कोणत्याही वाईट गो-ष्टीची संवय लागत असते, तेव्हां तिजपासून जें सुख वाटतें तें तोलून दुःख अधिक वाटावें व किंचित् भय उत्पन्न व्हावें, अशा तजविजीकरितां शिक्षा देणें ती द्यावी.** मुलाच्या कांहीं न्यूनतेमुळें किंवा अज्ञानामुळें आपणांस राग आला ह्मणून मुलास शिक्षा देणें, हें अधम शिक्षकाचें काम होय. परंतु ह्ल्ली शाळांतून हाच प्रकार सर्वत्र सुरू आहे. शिक्षक वर्गावर जातांना हातांत छडी घेऊनच जातो, व असें तो प्रसंगविशेषीं करितो असें नाहीं तर नित्यच करितो. मुलांनीं अभ्यास केला नाहीं असें वाटतांच त्यांस शिक्षा, मग कोणत्याही का-रणानें त्यांचा अभ्यास झालेला नसो. मुलांस कांहीं आलें नाहीं किंवा सांगित-ल्यावर समजलें नाहीं कीं शिक्षा, मग हा दोष मुलाच्या मंद बुद्धीचा असो तरी फिकीर नाहीं. याप्रमाणें या शिक्षा देण्याच्या बाबतींत जो अविचार दृष्टीस पडतो व शिक्षाही अशा रानटीपणाच्या व अप्रमाण असतात, कीं बेफिकीर हिंदूपा-लकच त्या पाहून ऐकून तटस्थ राहतात ! **या अविचाराच्या शिक्षांचा परिणाम असा होतो कीं, चांगल्या संवयी जाऊन त्यांच्या जागीं वाईट संवयी उत्पन्न होतात.** फार मार खाणारीं मुलें निगरगट्ट व निलाजरीं होतात; कोणी न्यायानें शि-क्षा केली तर सहन करायाची, नाहीं तर अन्यायामुळें त्वेष चढायाचा—हा महत्वाचा गुण अंगांत रहात नाहीं. अत्यंत शिक्षा करणाऱ्या पालकांचीं व शिक्षकांचीं मुलें बावळीं होतात किंवा उनाड होतात. शिवाय शिक्षा चुकविण्याकरितां खोटें बो-लणें, आपलें अज्ञान झांकणें व खोटेंच समजलें ह्मणून सांगणें, वगैरे हानिकारक अतिनिंद्य भेकडपणाचे दुर्गुण मुलांस जडतात. **अविचारानें शिक्षा करणारा शिक्षक मुलांस दुर्वर्तन शिकवितो असें ह्मणण्यास हरकत नाहीं.** ब्राह्मण-ज्ञातींतील तरुणांचे कित्येक दुर्गुण व दुष्ट संवयी त्यांस त्यांच्या शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या आहेत. अशा अविचारानें शिक्षकावरही दुष्परिणाम घडतात; तो हेकट, रागीट व उतावीळ होतो, व एकंदरीनें शिक्षकाच्या कामास नालायक होतो.

मुलांस अब्रूची चाड असावी असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं मुलांस अपराधाबद्दल चूक अपशब्द बोलूं नये, व त्यांची कृतज्ञता जोडायाची असेल तर त्यांस नित्य ममतेनें वागवावें. हल्लीं —

प्रकार चाल

थोड्या अवधींत मुलांसच हे लाड नकोसे होतात व ते मानसिक अतिश्रमास स्वतः होऊन लागतात, सुटी कशास पाहिजे असें म्हणतात, वगैरे. खालच्या व वरच्या वर्गांतील मुलांमध्यें हा फरक कोणाही शोधक माणसास दिसून येईल. मुलांस वर्गांत **ढ, मठ्ठ, शंख, गाढव**, वगैरे संज्ञांनीं किंवा याच अर्थाच्या इंग्रजी संज्ञांनीं हाक मारण्याचा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. मुलांस अपशब्द ऐकून घेण्याची वाईट संवय होते व मोठेपणींही ती कायम राहते. यामुळें ब्राह्मण मुलांत व तरुणांत एकमेकांस अपशब्द बोलण्याची व ते ऐकून घेण्याची संवय कुणब्यांइतकीच दृष्टीस पडते; केवळ संभावितपणाचे अपशब्द मात्र बहुधा योजिले जातात. परस्परांबद्दल निष्कारण तिरस्कार किंवा चिनफायद्याची सलगी वाढविण्याकडे या अपशब्दांचा प्रेमळ बंधूमध्यें किंवा सोबत्यांमध्यें देखील उपयोग होत नाहीं.

१०३. आतांपर्यंत या व पूर्वीच्या भागांत शिक्षणविषयासंबंधानें जी माहिती दिली ती चालू शिक्षणपद्धतींत कोणते दोष आहेत व चांगल्या शिक्षणपद्धतीची दिशा कोणती असावी या गोष्टींची वाचकांस कल्पना यावी म्हणून दिली. हा ग्रंथ शिक्षणशास्त्रावर लिहिलेला नाहीं, म्हणून शिक्षणसंबंधीं हरएक प्रश्नाचा येथें विचार करितां येत नाहीं. तथापि या देशांतील शिक्षकांच्या समजुतीकरितां शिक्षणशास्त्रावर जो ग्रंथ लिहायाचा तो कसा असावा याविषयीं वाचकांस कल्पना येण्यास आतांपर्यंत केलेलें विवेचन पुरे आहे. मागें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, एतद्देशीय भावी शिक्षकांस शिकविलेल्या शिक्षणपद्धति सुमारें अर्ध्या शतकानें जीर्ण झालेल्या आहेत. ट्रेनिंग कालेजांत शिकाविण्याकरितां लिहिलेलें '**शिक्षण आणि अध्यापन**' नांवाचें सरकारी पुस्तक (१८९३ चीं आवृत्ति) कोणीं घेऊन पाहिल्यास त्यास या गोष्टीचा प्रत्यय येईल. शिक्षणाची सुधारणा व्हावी, व त्यासंबंधी नवी उत्कृष्ट माहिती मिळावी, असा या पुस्तकाचा मुळींच उद्देश दिसत नाहीं. हल्लीं जी अप्रयोजक जुनाट शिक्षणपद्धति इकडील शाळांत सुरू आहे, तिचें तिसऱ्या व सातव्या भागांत जें अत्युत्कृष्ट फळ सांगितलें तें साध्य करण्यास शिक्षकांनीं तयार व्हावें, हा या पुस्तकाचा उद्देश दिसतो ! व हें असें पुस्तक कसें शिकविलें जातें आणि त्याची परीक्षेकरितां कशी तयारी लागते हें वाचकांस समजून घेणें असल्यास त्यांनीं शेवटचा प्रश्नसमुदाय पहावा. ट्रेनिंगच्या परीक्षेंत दिलेले नमुनेवाईक निवडक प्रश्न त्यांत सांपडतील. 'पुस्तकांतील उतारे उतरून द्या' या किंवा अशाच अर्थाचे बहुतेक प्रश्न आहेत. ट्रेनिंगच्या विद्यार्थ्यांचीं निवडक उत्तम उठलेलीं उत्तरेंही छापिलीं असतीं तर हें पुस्तक बहुतेक द्विरुक्त झालेलें दृष्टीस पडलें असतें !

'**शिक्षक म्हणजेच शाळा**' असा युरोपीय सिद्धांत आहे, व शिक्षणाचे उत्कृष्ट [illegible] जी साधेल ती पद्धति त्यानें

आरंभावी व परिणामांवरून त्या पद्धतींची योग्यता ठरवावी, असा अस्सेरचा सिद्धांत आहे. शिक्षणाचे दोष दाखविल्यावरही शिक्षकांस ते सुधारण्याच्या कांहीं कल्पना न येतील तर ते अजागळच समजले पाहिजेत. ' सर्व खरें, परंतु काय उपाय करावा तें सांगा, ' असें ह्मणणाऱ्या माणसांस दुसऱ्यांनीं विचार व सुधारणा शिकविल्या पाहिजेत, व त्यांचा त्याच्या कृतींत चांगलाच परिणाम होतो हेंही पहात बसलें पाहिजे. शिक्षकांचीं मनें जर शिक्षणसंबंधी विचारांतच तल्लीन असतीं व त्यांस आत्मावलंबन असतें तर त्यांस ही अशी स्थिति आली नसती; व शिक्षणविषयासंबंधानें त्यांचें अवलोकन व वाचन बरेंच अधिक असतें.

शिक्षणाच्या विषयावर एतद्देशीयांकरितां ग्रंथ लिहिणें झाल्यास तो एतद्देशीयांच्या उणीवा कोणत्या आहेत, त्यांचें सामर्थ्य किती आहे, त्यांस कोणत्या चांगल्या किंवा वाईट संवयी लवकर जडतात, इत्यादि अनेक गोष्टींचें अवलोकन करून, व अनुभवानें आणि विशिष्ट प्रयोगांनीं जे युरोपियन पद्धतींत फेरफार करणें इष्ट दिसेल ते करून नंतर ग्रंथ लिहिला पाहिजे. नवीन ग्रंथ ह्मणजे भाषांतर, व त्यांत फेरफार ह्मणजे आपण करितों त्याचें मंडन-अशीं पुस्तकें आश्रयदात्यांच्या समजुतीकरितां मात्र लिहावीं ! लोकांस चांगलें वळण लावण्यास त्यांचा काडीमात्र उपयोग होत नाहीं.

१०४. **सारांश.** (१) शरीर पूर्णपणें वाढलेलें असावें. छाती व दंड यांच्या पूर्णावस्थेकडे विशेष लक्ष दिलेलें असावें, कारण, **सामान्य अनुभव असा दिसतो कीं योग्य श्रमांनीं तरुणपणीं ज्याची छाती चांगली भरते, काळीज आणि फुप्फूस हीं निरोगी होतात व त्यामुळें आवाज मोठा व खणखणीत असतो, त्या मनुष्यास मोठेपणीं बैठी नौकरी असली तरी तो शेवटपर्यंत बळकट व दीर्घायुषी होतो.** शरीर आधीं संभाळायाचें व तें संभाळून होईल तितकी विद्या करवायाची असा शिक्षकांचा व पालकांचा पूर्ण निर्धार असावा व तो त्यांनीं मुलांच्या पूर्णपणें लक्षांत आणून द्यावा. याप्रमाणें निर्धार निदान १६ वें वर्ष पुरें होईपर्यंत तरी दिसून यावा. जी गोष्ट मुलांस तीच मुलींस लागू आहे व ह्मणून त्यांचेंही शिक्षण वर सांगितलेल्या निर्धाराअन्वयें झालेलें असावें. व उभयतांस आरोग्यशास्त्राचीं मूलतत्त्वें अशा तऱ्हेनें शिकविलीं असावीं कीं त्यांनीं स्वतःची वर्तणूक योग्य आहे इतकेंच पाहून राहूं नये, तर इतरांच्या वर्तनांतील गुणदोष व त्यांचे बरेवाईट परिणाम ओळखण्यास योग्य व्हावें. उभयतांसही ब्रह्मचर्याचें महत्व शास्त्ररीत्या व उदाहरणरीत्या समजावून दिलेलें असावें व या कामीं त्यांचे विचार उत्कृष्ट होण्यास व त्यांचा निश्चय बलिष्ट होण्यास जीं जीं साधनें असतील, तीं तीं सर्व कामीं लावावीं. **बुद्धीच्या कामावर ज्यांस जन्मभर उपजीविका मिळवायाची आहे, त्यांस दीर्घायुष्य व उत्तम संतति होण्यास शरीर सुदृढ व निरोगी राखून ब्रह्मचर्याची**

इयत्ता जेवढी वाढेल, तेवढी वाढविणें, हा एकच उपाय आहे असें झटल्यास चालेल.

(२) अवलोकनाची शक्ति जितकी पूर्णत्वास येईल तितकी आणण्याचा प्रयत्न करावा व इंद्रियें नित्य तीव्र व ग्राहक ठेवण्याची संवय लावावी. ज्यांमध्यें अवलोकन नाहीं त्यांची स्थिति अशी दिसते कीं, इंद्रियांनीं दिलेलें ज्ञान सहजगत्या मेंदूस जाऊन पोहोंचत नाहीं; जेव्हां विशेष लक्ष लावावें तेव्हां मात्र तें पोहोंचतें; किंवा ज्या विचारांत मेंदू गर्क असतो त्या विचारांस अनुकूल असें जेवढें असतें तेवढें मात्र पोहोंचतें. या कारणानें मनुष्यास एक प्रकारची अंधता येते; त्याच्या अंगीं दुराग्रहाचें बीज उत्पन्न होतें; त्याची समजूत पाडणें कठिण होतें; त्यानें संपादिलेलें वरेंच ज्ञान विसरून जातें किंवा निष्फळ होतें; त्याच्या इंद्रियग्राह्य सुखांस व आनंदांस संकुचितपणा येतो; व एकंदरीनें पुष्कळ सामाजिक कर्तव्यांस तो नालायक होतो.

पदार्थ डोळ्यापुढें येतांच त्याच्या कांहीं सामान्य गुणांची आठवण व्हावी, व त्यांत कांहीं विशेष असल्यास तें तेव्हांच ओळखावें. कोणतीही क्रिया पाहिल्यास असेंच घडावें; व पदार्थांत किंवा क्रियेंत जें विशेष दिसलें तें कशामुळें अशी जिज्ञासा उत्पन्न व्हावी. अमुक नियमाअन्वयें अमुक गोष्टी घडतात असा साधारणपणें पाहण्यांत येणाऱ्या सर्व गोष्टींबद्दल मनांत निर्णय ठरलेला असतो. हा निर्णय शास्त्रीयज्ञानानें शुद्ध करून द्यावा व नवीन क्रिया किंवा पदार्थ दृष्टीस पडतांच त्यांमध्यें अमुक गुण दिसावे, त्यांपासून अमुक परिणाम व्हावे, अमुक नियम त्यांस लागू होत असावे, इत्यादि अनेक कल्पना साहजिकपणें मनांत याव्या, व त्या क्रिया व ते पदार्थ साधेल तेवढ्या अधिक सूक्ष्मपणें पाहून ठेवण्याची प्रबळ इच्छा उत्पन्न व्हावी. या रीतीनें ज्या प्रकारचा व्यासंग असेल, किंवा प्रसंग येतील, किंवा संधी मिळेल, त्याप्रमाणें विचाराची सामग्री वाढत जाईल.

(३) बुद्धीच्या शिक्षणासंबंधानें जी गोष्ट ध्यानांत ठेवायाची ती ही कीं, ज्या गोष्टी मनुष्याच्या साहजिकपणें अवलोकनांत येतात, त्यांसंबंधाचें त्यास चांगलें ज्ञान झालेलें असावें, व तत्संबंधीं त्यास खरीं अनुमानें करितां यावीं. आरोग्य, मनोवृत्ति, व सदाचार यांसंबंधीं उत्कृष्ट नियमांचें, उदाहरणांचें व प्रासंगिक कर्तव्यांचें चांगलें ज्ञान दिलेलें असावें. सर्वच विषयांचें या दृष्टीनें ज्ञान करून दिलें पाहिजे. यानंतर ज्या प्रकारच्या कनिष्ट, मध्यम किंवा श्रेष्ट मंडळींत मनुष्याचें आयुष्य पुढें जाण्याचा संभव दिसेल, त्याप्रमाणें त्याच्या बुद्धीचें, वरील सर्व विषयांतच, अधिकाधिक शिक्षण होत गेलें पाहिजे. नाहीं तर शिक्षण एक प्रकारचें व धंदा आणि संगति निराळ्याच प्रकारची असें घडून मनुष्य असमाधानी, आळशी व मनोराज्य करणारा होतो, व त्याचें कर्तृत्व व्यर्थ जातें. ह्मणूनच पुढील धंद्याचा आधीं विचार करून मग शिक्षणाची दिशा व इयत्ता पालकांनीं ठरविली पाहिजे.

सांप्रतच्या शिक्षणपद्धतीनें स्मरणशक्ति आणि अनुमान किंवा तर्क या क्ति, या दोहोंपैकीं एकीचें प्राबल्य झाल्याचें सर्वत्र दृष्टीस पडतें, व विशेषतः तर्कशक्ति मागें पडते. विद्यार्थ्यांमध्यें याच कारणानें कोणी भाषाप्रिय व कोणी गणितप्रिय होतात; व या दुसऱ्यांची संख्या हल्लीं फार कमी आहे. हा दोष शिक्षणाचा होय. शिक्षण व अध्यापन यां विषयावरील लहानमोठे एतद्देशीय ग्रंथ पाहिल्यास शिक्षकांचा परस्परांस सल्ला असा कीं, स्मरणशक्ति वाढविण्याचा सर्वांनीं प्रयत्न करावा. आतां स्मरणशक्ति वाढविणें म्हणजे काय हें फारच थोड्यांस कळत असावें; सर्व शिक्षक जो प्रयत्न करितात तो हा कीं मुलांकडून पुष्कळ ध्यानांत ठेववायाचें, व साधनें पाहिल्यास वाचन, कथन किंवा घोकंपट्टी. हा स्मरणशक्ति वाढविण्याचा मार्ग जरी सिद्धीस गेला तरी तो अहितकारक आहे; कारण तर्कशक्तीस त्यायोगें कमीअधिक धक्का बसतो, व स्वतः विचार करण्यापेक्षां, उघडपणें किंवा लपून छपून, दुसऱ्यांचे विचार चोरून घेण्याची बुद्धीस संवय लागते. मनुष्याचें शिक्षण कमी किंवा अधिक ज्या प्रमाणानें झालें असेल त्या प्रमाणानें तो कनिष्ट किंवा वरिष्ट पुरुषांचे विचार बोलूं लागतो. त्याच्या संभाषणांत दुसऱ्यांचे विचार दिसतील; त्याच्या अंगचा आवेशही अनुकरणमूलक असेल; त्याच्या नकलाही लोकांकडून मिळालेल्या असतांल, तो दुसऱ्याचें पाहून पाहून आपलें आचरण नियमित करील, व चोलण्याचालण्यांत, रुतींत व दुराग्रहांत तो जाणून किंवा नेणून पक्का अनुकरण करणारा होईल. या गोष्टीचा सर्वांनीं प्रत्यय घेऊन पहावा. पाहिजे तर स्मरणशक्तीकरितां प्रसिद्ध अशा मोठ्या बुद्धिमानांचीही स्थिति पहावी; परावलंबन सर्वत्र आढळून येईल. याकरितां मुलांची स्मरणशक्ति वाढविण्याचा हा मार्ग शिक्षकांनीं सोडून द्यावा. असें केल्यानें मेंदूंतील स्मरणशक्ति जाण्याची त्यांस भीति नको. भिक्षुकलोक व स्त्रिया यांच्या आठवणींत वृद्धपणापर्यंत किती गोष्टी असतात हें पाहिलें म्हणजे, स्मरणशक्तीची देणगी आपोआप नष्ट होणारी नाहीं असें लक्षांत येईल; व तींस कृत्रिम भरती आणणें बुद्धीच्या ऱ्हासास कारण होतें असें पूर्वी दाखविलेंच आहे. अवलोकन व तर्कशक्ति वाढविण्याचा सर्व शिक्षकांनीं प्रयत्न केला पाहिजे. जों जों अवलोकन व अनुभव वाढेल तों तों स्मरणशक्ति वाढून येईलच. नवीन कल्पना व विचार समाजांत आणणारे जे धुरंधर पुरुष, म्हणजे कवि, शास्त्रकार, कल्पक वगैरे, त्यांस केव्हां केव्हां आपली स्मरणशक्ति व भाषा अपूरी असें वाटूं लागे व म्हणून व्यवस्थित टिप्पणें करण्याचे त्यांस प्रयास पडावे व त्यांनीं नवीन शब्दसृष्टिही बनवावी.

(४) उत्तम मनोवृत्ति प्रसंगीं प्रबळपणें जागृत व्हाव्या व हीन मनोवृत्ति प्रसंगांत उत्पन्न झाल्या तरी विलयास जाव्या, व प्रत्येकीस उचित अशीं कृत्यें नित्य घडावीं अशा संवयी तरुण मनुष्यास लागल्या पाहिजेत, सदाचार व स-

भ्यता यांसंबंधी कर्तव्यें अगदीं अंगवळणीं पडलीं पाहिजेत. उपजीविका मिळविण्यापलीकडे विद्येचा उपयोग होण्यास अशा संवयी अत्यंत आवश्यक आहेत; व उपजीविकाही उत्तम मार्गानें मिळविण्यास त्या अंगीं असल्याच पाहिजेत. सर्व विद्येचें हेंच फळ होय, व हें फळ उत्कृष्टपणें प्राप्त व्हावें म्हणूनच सर्व बुद्धीचे परिश्रम होत. शिक्षणाच्या साफल्याविषयीं एका अत्यंत थोर विचारी पुरुषानें येणेंप्रमाणें अभिप्राय दिला आहे व तो सर्व शिक्षणशास्त्रकारांस संमत आहे: **विद्यार्थ्यास केवळ पुष्कळ माहिती करून देणें हा शिक्षणाचा मुख्य हेतु नाहीं; त्यांच्या बुद्धिभागांस पूर्णता आणणें हाही शिक्षणाचा मुख्य हेतु नाहीं; शिक्षणाचा जो मुख्य हेतु आहे किंवा असावा तो हा कीं, विद्यार्थ्यांच्या मनांत कांहीं विशिष्ट वासना उत्पन्न व्हाव्या, त्या अशा कीं त्यांच्या द्वारें जणूं काय निरंतर ईश्वरी प्रेरणाच होत जाऊन त्यांच्या वर्तनाचें जन्मभर नियमन व्हावें.***

याप्रमाणें वर शिक्षणाचे जे हेतु व परिणाम सांगितले ते सर्व मुलांवर घडण्यासारखे आहेत; मुलगा बुद्धिमान् असेल तर अधिक ज्ञान संपादन करील, मंद असेल तर कमी ज्ञान संपादन करील; परंतु हा एक भेद सोडून बाकी सर्व मुलें सारखीं तयार व्हावीं, व या उद्देशानेंच शिक्षकानें आपलें काम पूर्वी बजावलेलें असलें पाहिजे.

१०५. वर सांगितल्या प्रकारचा मनुष्य तयार होण्यास शिक्षक व पालक या उभयतांमध्येंही अनेक महत्वाचे गुण अवश्य असले पाहिजेत. सांप्रतकाळीं पालकाचे गुण पालकांत फार विरळा आढळतात, व शिक्षकाचे गुण शिक्षकांत मुळींच नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां पालक जितका शिक्षकावर अधिक भार टाकील, तितका त्याचा स्वतःचा भार कमी होईल हें खरें, परंतु शिक्षकाच्या अंगीं अधिकाधिक गुणांची त्यायोगें आवश्यकता उत्पन्न होईल. आतां तूर्त पालकांची अशी स्थिति आहे कीं, आपलीं कर्तव्यें होतील तितकीं शिक्षकांकडून करून घ्यायाचीं. असें त्यांनीं करणें झाल्यास पालकांचीं कर्तव्यें उत्तम प्रकारें स्वतःनें करण्याजोगें शिक्षक त्यांनीं पाहिले पाहिजेत. परंतु आपलीं आपण कर्तव्यें करायाचीं नाहींतच व शिक्षकांनींही स्वतःचीं केलीं नाहींत तथापि उदा-

---

* I know no wiser or felicitous description of the true aim of a school than is contained in the words of President Adams of Cornell University, when he says, "The main object of education is not merely the acquisition of information; it is not even the development of the faculties; it is, or ought to be, the awakening of certain desires that will serve to the pupil as a sort of perpetual inspiration through life."—J. G. FITCH, *One of Her Majesty's Chief Inspectors of Training Colleges.*

सीन रहायाचें, हा पंथ पालकांनीं स्वीकारल्यामुळें मुलांची दुर्दशा होत आहे. पालकांचे थोडेबहुत पैसे वाचतात, परंतु मुलाच्या आयुष्याचें, कर्तबगारीचें व देशाचेंही नुकसान होतें, व चांगल्या कुटुंबास थोड्या अवधींत उतार कळा लागते. हा स्वहिताचा किंवा दूरदर्शित्वाचा किंवा समाजहिताचा मार्ग नव्हे, हें पालकांस कळून ते केव्हां जागे होतील ते होवोत.

शिक्षकाच्या अंगीं जितके अधिक गुण अवश्य मानावे व त्याची जबाबदारी जितकी वाढवावी, तितकी त्याची किंमत वाढते, हें तत्वही एतद्देशीय पालकांत कळत नाहीं, व सरकारास जरी तें कळतें तथापि तें पाळण्याची त्यास सवड नाहीं, किंवा इतकी दक्षता ठेवितां येत नाहीं. अशा स्थितींत एतद्देशीय पालक अजागळाप्रमाणें तटस्थ आहेत. जर शिक्षकाची किंमत उतरवली तर शिक्षक मनासारखा मिळत नाहीं व मिळाला तरी मनासारखा तो वागण्यास तयार होणार नाहीं; त्याच्या संधानानें पालकांस वागावें लागतें व त्याचे दोष पहातांही निरुपायानें स्वस्थ बसावें लागतें. थोडा पैसा वांचविण्याकरितां पालकांनीं आपली अशी स्थिति करून घ्यावी काय ? सरकारी किंवा कमिटीची शाळा असल्यास पालकांनींच शिक्षकांवर देखरेख ठेविली पाहिजे, व जरूर पडल्यास फी अधिक द्यावी परंतु वाईट शिक्षकाच्या हातीं मुलें देऊं नयेत. मराठी शाळा मास्तरांचा पगार तीन रुपये आणि पांच रुपये केल्याबद्दल जर कींव येत असेल, तर नुसती ओरडाआरड करून फायदा काय ? फी अधिक देण्यास तयार झालें पाहिजे. ' जशी फी, तसें शिक्षण ' हें तत्व सर्वत्र लागूं पडलेंच पाहिजे, व हें जाणून ज्यांस ऐपत असेल त्यांनीं आपल्या मुलांची विशेष तर्तूद केलीच पाहिजे. व ज्यांस ऐपत नाहीं त्यांनीं स्वतःच अधिक सावध, अधिक परिश्रमी, व अधिक दक्ष होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; व लोकमत उत्पन्न करून त्याद्वारें शिक्षकांस व सरकारास नित्य सावध करीत राहिलें पाहिजे.

जेव्हां कोणी गृहस्थ खासगी शाळा काढितो, तेव्हां त्याचे दोन उद्देश असतील; एक असा कीं निवळ पैसे मिळविण्याचा एक धंदा काढायाचा, असा गृहस्थ पालकांस अमुक पाहिजे आहे तें पुरविण्याकडे लक्ष देतो; किंवा त्याचा दुसरा उद्देश असा असेल कीं आपलें कांहीं विद्याविषयक वरिष्ट हेतु या धंद्यानें सिद्धीस न्यावयाचे, असा गृहस्थ पालकांच्या आवश्यकतांची मुळींच दखल करणार नाहीं. पहिल्या प्रकारच्या उद्देशानें शाळा काढणारे फार आहेत; जेथें जी शोचनीय स्थिति दिसते ती उत्पन्न होण्याचें कारण हें कीं पालकांस जें पाहिजे आहे तें—**स्वस्त शिक्षण व थोड्या वेळांत पुष्कळ तयारी.** यामुळें, शिक्षक दुर्व्यसनी नसावा, तो धर्मशील असावा, तो विद्वान्, विचारी व परिश्रमी असावा, इत्यादि गोष्टी बाह्यात्कारी बोलण्यांत पालक सुचवितात, परंतु कोणी एकही त्यांची फिकीर करीत नाहीं. शिक्षक कसाही अविचारी असो, दुष्ट असो

हेलकट असो, अज्ञान असो, दुर्व्यसनी असो तो तसाच सर्वांस चालतो. सुधारक व असुधारक, जुने आणि नवे, गरीब आणि श्रीमंत, सर्वांच्या मुलांचा एकत्र समुदाय जुळतो, व त्या सर्वांस शाळेंत ज्या संवयी लागतील त्या लागतील. शिक्षक व पालक यांचे उपदेश भिन्न प्रकारचे असले ह्मणजे मोठाच दुष्परिणाम होतो व विद्यार्थी ज्या एकाच्या उपदेशाचें ग्रहण करितां त्याहून दुसऱ्याचा त्याकडून नित्य अपमान व कुचेष्टा होते. हा प्रकार आमच्या समाजांत चालला आहे व तो समाजाची सर्वस्वी अधोगति व हानि करणारा आहे. जर खासगी शाळेवर पालकांच्या बहुमताचा अंमल चालत नसेल, तर ती त्यांस फायदेशीर होत नाहीं. ऐपतदार पालकांनीं याकरितां अधिक पैसा खर्च करावा, परंतु सर्वमान्य समंजस माणसाच्या हातीं विद्यादानाचें काम द्यावें, व त्या माणसानें तें उत्तम प्रकारें करावें ह्मणून सर्वत्र त्याचा मान राखावा व त्यास हरएक प्रकारें मदत करावी. असें त्यांनीं न करितां, हल्लींच्या स्वेच्छ शिक्षकांचे अवगुण किंवा दुराचरण त्यांनीं दाखविलें तर त्यांस जें उत्तर मिळतें तें स्पष्टच आहे. 'तुह्मांस स्वल्पांत पुष्कळ शिक्षण मिळाल्यारीं कारण, इतर बाबतींत चौकशी करण्याचें काम नाहीं. पाहिजे तर मुलास शाळेतून काढा; मुलांस काय तोटा गेला आहे!' इतकें प्रत्युत्तर ऐकून घेण्याचेंही थोडयाच पालकांस धैर्य असतें, व शाळेंतील अनिष्ट प्रकार पाहूनपाहूनच वारंवार त्यांचा त्याविषयीं किळस नाहींसा होतो.

मुलांस आपल्या मनाप्रमाणें सदाचार लागावा व त्यांचें उत्तम शिक्षण व्हावें असें ज्या पालकांस वाटत असेल, त्यांनीं एकत्र होऊन आपणांस हवी तशी शाळा योग्य माणसांकडून काढवावी व तिचा सर्व खर्च सोसावा. ही गोष्ट कोणास अत्यंत खर्चाची आहे असें वाटेल, परंतु सामान्य स्थितींतील गृहस्थांच्या ऐपतीबाहेरची ही गोष्ट नाहीं; व तिचा हा विशेष फायदा आहे कीं शिक्षक मनासारखा, आपणांशीं एकदिल, पूज्य व संतुष्ट असा मिळतो. ही आपली संस्था, हिची सुधारणा झाली पाहिजे, उत्कर्ष झाला पाहिजे, तीस भरभराटी आली पाहिजे, असे विचार मनांत येऊन शिक्षक व पालक आपापलीं कर्तव्यें उत्साहानें करतात, व आपण अगदींच स्वतंत्र असें शिक्षकास वाटून तो कुमार्गास लागण्याचा संभव उरत नाहीं. आपण सन्मार्गानें चालत आहों ह्मणूनच आपला पगार चालू आहे व आपणांस मान मिळत आहे, असें त्याच्या निरंतर मनांत वागतें. तात्पर्य हें कीं उत्तम माणसें फुकाचीं मिळत नाहींत; शिक्षणाची सुधारणा करणें ह्मणजे उत्तम माणसाच्या हातीं, किंवा निदान देखरेखीखालीं, शिक्षणाचें काम देणें होय. शिक्षकांचीं कर्तव्यें वाढविणें, ह्मणजे पालकांचीं कित्येक कर्तव्यें त्यांकडे सोंपविणें होय. व या सर्व गोष्टी उत्तम प्रकारें सिद्धीस जाण्यास, एकाच अभिप्रायाच्या पालकांनीं एकवट होऊन आपल्या मुलांच्या चांगल्या शिक्षणाकरितां जो

पडेल तो खर्च सोसून त्यांकरितां स्वतंत्र शाळा काढविणें हा एकच उपाय सांप्रतच्या स्थितींत आहे. नमुन्याकरितां व इतरांस वळण देण्याकरितां तरी एक एक शाळा अशा तऱ्हेची सर्व मोठ्या ठिकाणीं समंजस ऐपतदार माणसांनीं स्थापित केली पाहिजे; व ऐपतीप्रमाणें कमीजास्त खर्चाचा बोजा उचलण्यास तयार झालें पाहिजे. **शाळा उत्तम प्रकारें चालली पाहिजे इतकें फीचें उत्पन्न झाल्यास, शिक्षकांकडून उत्तम शिक्षण व उत्तम आचरण करवून घेतां येईल. शाळेचें उत्पन्न या कामीं जितकें कमी पडेल, तितके शिक्षक कमी दर्ज्याचे होतात, इतकेंच नव्हे तर ते पालकांच्या कह्यांतून जातात.** कोणतीही शाळा किती चांगली चालली आहे याचा ती न पाहतांही अंदाज करितां येईल. शिक्षकांचे पगार, मुलांची संख्या, फीचे दर, शाळेचें एकंदर उत्पन्न व शाळागृहाचें आणि व्यायामशाळेचें क्षेत्रफळ, इतकें कळलें म्हणजे बस्स आहे. ही गोष्ट पुढील भाग वाचल्यावर ध्यानांत येईल.

पुरवणी.

(पृष्ठ १७८ पहा.)

इंग्रजी राज्य होण्यापूर्वी ब्राह्मणांनीं आपणांवर मोठे **अनुपकार** करून ठेविले असें पुष्कळ शूद्रांचें मत आहे. वास्तविकपणें ही गोष्ट अगदीं खोटी आहे, व खरी स्थिति याच्या उलट आहे. ब्राह्मणांनीं आपणा स्वतःस धर्मपाशांनीं विलक्षणपणें बांधून घेतलें, तसें त्यांनीं शूद्रांस बांधलें नाहीं. स्त्रियांस व शूद्रांस जेवढें विद्येचें व धर्माचें ज्ञान द्यावें म्हणून त्यांनीं ठरविलें तेवढेंच ब्राह्मणांच्या विद्येंत व धर्मांत महत्त्वाचें होतें, व व्यवहारांत उपयोगी पडण्यासारखें होतें. बहुतेक ब्राह्मणपुरुष लिहिण्यावाचण्याचें काम करीत, म्हणून कांहीं अधिक शिकत, स्त्रिया व शूद्र फारच गरज असल्यावांचून मुळींच शिकत नसत. वडिलांकडून किंवा गुरूंकडून परंपरेनें जें ज्ञान किंवा विद्या किंवा धर्मोपदेश त्यांस प्राप्त होई तेवढ्यांतच त्यांचें समाधान होत असे. ब्राह्मणांपेक्षां जे थोडे संस्कृत शास्त्रांचा, धर्मग्रंथांचा व काव्यांचा अभ्यास करीत, त्यांचे दोन वर्ग असत; एक वेदांचें नुसतें पठण करणारे भिक्षुक व दुसरे काव्यादिकांचें अध्ययन करणारे शास्त्री, पंडित, वगैरे. यांपैकीं भिक्षुकांचें ज्ञान स्त्रियांहून किंवा शूद्रांहून अधिक नसे, जें असें तें आन्हिक धर्मकृत्यांचें मात्र, बाकी सही करण्याची पंचाईत. शास्त्री, पंडित वगैरेंचें ज्ञान अधिक असे, परंतु त्यांत शुद्ध घोकंपट्टी, पूर्वजांचें अनुकरण व निरर्थक चर्वितचर्वण असा प्रकार फार होता. म्हणून त्यापासून शास्त्रीपंडितांस फारशी प्राप्ति नव्हती. सरस्वती आणि लक्ष्मी यांच्या परस्पर मत्सराचें मात्र स्वानुभवानें [illegible] कवींनीं हृदयद्रावक वर्णन केलेलें आहे. कांहीं थोड्या अत्यंत बुद्धिमान् पंडितांस राजाश्रय मिळे व बाकीच्यांस शिक्षकाचा

पुराणिकाचा, वैराग्याचा किंवा भिक्षुकीचा धंदा करावा लागे, तेव्हां त्यांची उपजीविका होई. परंतु या चारी धंद्यांचें स्वरूप पाहतां असें दिसतें कीं, संपादिलेल्या विद्येचें व्यवहारोपयोगी ज्ञान ब्राह्मण किंवा शूद्र स्त्रीपुरुषांस करून देणें व त्यांची अशा रीतीनें सेवा करून आपली उपजीविका करणें, असे हे धंदे आहेत. आतां ही सेवा ब्राह्मणांनीं कशी केली याविषयीं विचार करितां असें दिसतें कीं त्यांच्या धर्मसंबंधी कल्पना स्वतःच्या ज्ञातीस जशा प्रतिबंधक झाल्या तशा इतर ज्ञातींस झाल्या नाहींत; व जरी त्यांनीं आपणांस परम थोर व पवित्र असें ठरविलें तरी त्यायोगें ते स्वतः मात्र बहुसमाजापासून विभक्त झाले, त्यांचे अनेक उद्योगधंद्याचे मार्ग बुडाले, व आत्मावलंबन नाहींसें होऊन दारिद्यदशा त्यांस येत गेली. या सर्व स्थितींतून बाहेर पडण्याचे मार्ग अद्याप ब्राह्मणांस सांपडत नाहींत. रामदासासारख्या परमपूज्य साधूंसही ब्राह्मणांचे विटाळचंडाळाचे विचार अत्यंत निंद्य वाटूं लागले होते. पूर्वीच्या काळच्या शूद्रांस क्षुल्लक धर्मकृत्यांत मात्र ब्राह्मणांची गरज लागे व त्यांच्या समजुतीप्रमाणें त्यांचें समाधान झाल्यावर त्यांनीं ब्राह्मणांस थोडी दक्षिणा दिली असल्यास त्याबद्दल हल्लींच्या शूद्र विद्वानांस वाईट वाटणें योग्य नाहीं. जातीच्या इतर सर्व कृत्यांचा निर्णय जसा ते पंचांच्या द्वारें स्वतः करीत असत तसा धर्मकृत्यांचा त्यांनीं केला नाहीं खरा, परंतु ब्राह्मणांनीं त्यांस या कामीं स्वातंत्र्य दिलें असतें तरी हें काम शूद्रांनीं पतकरिलें असतें काय असा प्रश्न येतो. मला वाटतें हें काम शूद्रांनीं मुळींच पत्करिलें नसतें; कारण बुद्धीचा क्षुल्लक कामाकडे व्यय मोठा व प्राप्ति कमी असा हा उपाध्यायाचा धंदा आहे. ब्राह्मणांनीं स्वतःमध्येंही गृहस्थ आणि भिक्षुक असे दोन वर्ग करून हा धंदा कांहीं थोडक्यांच्या स्वाधीन केला. हींच व्यवस्था सृष्टिक्रमानें उत्पन्न व्हायाची व तींबद्दल ब्राह्मणांस दोष देणें योग्य नाहीं. उद्योगी, घरंदाज, संपत्तिमान् अशा ब्राह्मणांनीं पूर्वीं संस्कृत विद्येचा फारसा अभ्यास केला नाहीं व तसाच तो इतर ज्ञातीच्या तशाच गृहस्थांनीं केला नाहीं. 'ज्ञान' असें नांव घेतांच संस्कृत काव्यें व शास्त्रें असें पूर्वीं जसें ब्राह्मणांस वाटे तसें शूद्रांस वाटत नसे ही गोष्ट शूद्रांच्या फायद्याची झाली. ब्राह्मणांची बुद्धि शास्त्रांची गुंतागुंत सोडविण्यांत व्यर्थ जाई, शूद्रांची उपयुक्त अवलोकन करण्यांत खर्च होई. यामुळें **कालिदासा**पासून आतांपर्यंत ब्राह्मणांनीं जीं काव्यें केलीं व जे धर्मग्रंथ केले, त्यांमध्यें सृष्टीचें, मनुष्यस्वभावाचें व प्राथमिक धर्मतत्त्वांचें जें ज्ञान दिसतें त्याहून दसपट अधिक एका **तुकारामा**च्या गाथेंत दिसतें. जर सर्व शूद्रांस संस्कृत शिक्षण मिळत गेलें असतें तर व्यापक भूतदया व अखंड भक्ति हे गुण ज्यांमध्यें इतक्या प्रबळपणें दिसतात ते साधु, **तुकाराम**, **नामदेव** वगैरे, मुळींच उत्पन्न होण्याचा संभव नव्हता. जर शूद्र लोक ब्राह्मणांप्रमाणेंच दिवसाच्या प्रतिक्षणाची धर्मकृत्यांत कशी वांटणी करायाची या विचारांत गुंग असते तर **शिवाजी**ही उत्पन्न होण्याचा संभव नव्हता. **ज्ञानदेव** व **रामदास** यांची **साधुसंतांत** गणना होण्यास त्यांचा कांहीं संस्कृत शास्त्राभ्यास असल्यास तो उपयोगीं पडला नाहीं, ते शास्त्री किंवा पंडित असते तर **वामन** पंडिताइतपत त्यांची ब्राह्मण समाजांत मात्र योग्यता असती, थोरल्या शूद्र समाजांत मुळींच नसती. **पेशवे** व **त्या काळचे ब्राह्मण वीर** वेदोक्त धर्मानें अवश्य सांगितलेले गुण अंगीं होते म्हणून अर्जितदशेस आले नाहींत. तर त्या धर्माचें गृहस्थाश्रमामुळें उल्लंघन करण्याचें त्यांस धैर्य आलें व त्या वेळच्या शूद्रांचें त्यांनीं अनुकरण केलें म्हणून ते उदयास आले. याप्रमाणें संस्कृत विद्येचा अभाव देशोत्कर्षास कारण झाला व शूद्रांनीं या कामीं

ब्राह्मणांचे आभार मानिले पाहिजेत. तुकारामानें त्या वेळीं येणेंप्रमाणें आपला अनुभव लिहून ठेविला:—

भला देवा कुणबी केलों । नाहीं तर दंभें असतों मेलों ॥ ध्रु. ॥
भलें केलें देव राया । नाचे तुका. लागे पाया ॥
विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥
गर्वें होता ताठा । जातों यमपंथें सुटा ॥
तुका ह्मणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥ २ ॥

वांझेनें दावीलें गव्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाधव्याला ॥
तेंवि शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनिया ॥
बोलाचीच कढी, बोलाचाचि भात । जेवूनिया तृप्त कोण झाला ॥
कागदीं लिहितां नामाची साखर । चाखितां मधुर गोडी नेदी ॥
तुका ह्मणे जळो जळो ती महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ॥

ह्लीं उपाध्यापेक्षां शिक्षकाचें काम अधिक महत्वाचें झालें आहे, शूद्रास तें करण्या परवानगी आहे, परंतु कोणा शूद्रास त्याची परवा आहे ? जे लोक ह्लीं भूगोल शिकण्या वद्दल एवढी तक्रार करितात, ते पूर्वी रघूचा सर्ग शिकले असते काय ? सर्व संस्कृत धर्म ग्रंथांचीं ह्लीं इंग्रजींत भाषांतरें होत आहेत, परंतु किती शूद्र विद्वान् तीं हातीं धरीत आ हेत ? शूद्रांनीं विद्या शिकावी ह्मणून निःपक्षपाती इंग्रज सरकार चहात आहे, परंतु कि ती शूद्र या त्यांच्या उदार विचारांचा फायदा घेत आहेत ? मराठे जातीच्या थोर व उदा र राजांसही आपल्या शेतकरी प्रजेस विद्येचें महत्व समजावून देण्याचें वरेंच अशक्य वा टत आहे, याचें तरी कारण काय ? ही सर्व ह्लींची स्थिति मनांत आणतां पूर्वी ब्राह्मणां ची परवानगी जरी असती तरा ब्राह्मणाची विशिष्ट विद्या व उपाध्याचा धंदा शूद्रांना मुळींच पत्करिला नसता असें लक्षांत येतें. ब्राह्मणांनीं आपणांस श्रेष्ठ असें समजून जे जे इत्क वळकावले ते ते सर्व त्यांच्या हानीस कारण झाले असें दिसतें. व शूद्रांस जें जें करण्याची त्यांनीं बंदी केली तें तें त्यांचीं शरीरें सुदृढ राखण्यास, मनोवृत्ति बलवत्तर करण्यास, व अ उद्योगाची हौस कायम ठेवण्यास, सामाजिक आचारांचें स्वातंत्र्य मिळविण्यास, व अ वलोकनशक्ति आणि धर्मोत्साह हीं प्रसंगीं जागृत करण्यास कारण झालें. यार्क रितां शूद्रांनीं जरी ब्राह्मणांस दुवा दिला नाहीं, तरी त्यांनीं ब्राह्मणांचा मत्सर किंवा द्वेष करण्याचें कारण दिसत नाहीं; उलट ब्राह्मणांची कींव येऊन ज्या धर्मपाशांनीं ब्राह्मण जखडून गेले आहेत ते तोडून टाकण्याची त्यांनीं ब्राह्मणांस मदत करावी, व ब्राह्मणांनी एकदील व्हावें, असा ब्राह्मणांवर प्रसंग येऊन गुदरला आहे. परंतु आधुनिक शिक्षणानें शूद्रांस ह्लीं एक प्रकारचें ब्राह्मणत्वच येतें असें पूर्वी एके ठिकाणीं सांगितलें. रयतेच्या ह वंधानें जी ब्राह्मण अंमलदारांची स्थिति वर्णन केली तीच, किंवा तीहून अधिक निकृ स्थिति शूद्रांची आहे, कारण दांडगाईचीं सर्व खातीं शूद्रांनीं व्यापिलीं आहेत. द्रव्यार्क रितां परतंत्र होणें, कुळधर्माची परवा न करणें, हीन मनोवृत्ति पिकवीत बस व रयतेपासून अंतर्यामीं दूर दूर होणें—हे सर्व परिणाम ब्राह्मणांप्रमाणेंच कुणब्यांम उत्पन्न झालेले ह्लीं दिसतात; व प्राचीनकाळीं विद्येचा असाच परिणाम त्यांवर घडत यांत बिलकुल शंका नाहीं. सबब यापुढें तरी शूद्रांनीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे.

भाग १२ वा.

शिक्षणाचे विषय आणि पद्धति.

१०६. **शाळागृहें, वगैरे.** शाळागृहें, त्यांभोंवतीच्या बागा, व्यायामशाला, पटांगणें वगैरे व शाळागृहांतील नानाप्रकारचें सामान, या सर्वांविषयीं येथें लिहूं लागल्यास फार विस्तार होईल. परंतु या सर्वांचा शिक्षणाशीं निकट संबंध आहे असें सिद्ध झालेलें आहे, व यासंबंधानें 'शाळेंत आरोग्य कसें राखावें' या विषयावर स्वतंत्र लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकांत पुष्कळ माहिती मिळेल. ही माहिती इकडे लागू करण्यास या देशांतील हवामान, दिवसाच्या उजेडाचें प्रमाण, शिकणाऱ्यांच्या प्रकृति, वगैरे अनेक गोष्टी लक्षांत आणून विचार केला पाहिजे, तेव्हां ती उपयोगीं पडेल; व हा एका स्वतंत्र ग्रंथाचाच विषय होईल. परंतु शाळागृहाचा व शिक्षणाचा मुळींच संबंध नाहीं असा जो इकडील पालकांचा ग्रह आहे तो फार अनर्थकारक आहे. शाळेंत अंधार असल्यास मुलांस डोळे ताणावे लागतात किंवा पुस्तक फार जवळ धरावें लागतें; एवढेंच नव्हे तर त्यांच्या चेहेऱ्यावरही एक प्रकारचा निस्तेजपणा येतो, कारण मनास उल्हास न राहून रक्ताभिसरण बरोबर चालत नाहीं. उलट, फारच उजेड असल्यास डोळे मिटावेसे वाटतात, मन निरवधान होतें, व झोंप आल्यासारखें होतें. शाळेंतील बांकांस टेंकायास नसलें व तीं भिंतीशीं मांडलेलीं नसलीं तर, अशक्त मुलांस कुबड काढून बसण्याची संवय लागते, व शिक्षणाचा काळ जितका अधिक तितकी ही संवय अधिक होऊन मुलें वेढब होतात. शाळेंतील सर्व मांडणी व्यवस्थित असल्यास, मुलांस व्यवस्थितपणा येतो, परंतु ती तशी नसल्यास मुलेंही अव्यवस्थित होतात; त्यांचीं पुस्तकें कोठें तरी पडतात, केव्हां हरवतात, चोरीस जातात, वगैरे. शाळा नित्य शृंगारल्याप्रमाणें मुलांस वाटल्यास, मुलेंही नीटनेटके पोषाख करून शाळेंत येतात, परंतु याउलट स्थिति असल्यास मुलांचे पोषाख अस्ताव्यस्त, त्यांचें हिंडणें फिरणें निष्काळजीपणाचें, व त्यांच्या खोड्या सामानाशीं, भिंतीशीं, जमिनीशीं, वगैरे. याप्रमाणें मुलांस वाईट संवयी लागण्यास, तीं अव्यवस्थित होण्यास व त्यांच्या आरोग्यासही धक्का बसण्यास शाळेंतील अमंगळपणा व अव्यवस्था कारण होते. ह्मणून शाळागृहें आनंददायक, आरोग्यकारक व सुव्यवस्थित असलींच पाहिजेत.

शाळागृहाभोंवतीं बाग असावी, कारण शाळा शृंगारण्याचा हा सर्वांत सोपा मार्ग आहे. शाळागृहांतही सुंदर चित्रें, नकाशे, वगैरे सामान नीट मांडलेलें असावें. शाळेस लागूनच व्यायामशाळेचें पटांगण असावें. शहरामध्यें जागेच्या संकोचास्तव या सर्व गोष्टी हव्या तशा मिळूं शकत नाहींत. ह्मणून शहर लहान अ-

सेल तर शाळागृह गांवाच्या वाहेर प्रशस्त जागा पाहून तेथें वांधावें, व मोठ्या शहरांत साधेल तितकें तें गांवाच्या एका बाजूस न्यावें, ह्मणजे जागा अधिक प्रशस्त व शांत अशी मिळण्याचा संभव असतो. जेव्हां शाळा शहरांतच असते तेव्हां व्यायामशाळा तरी शहराबाहेर ठेवावी व शाळेचे तास असे ठेवावे कीं, मुलांस वाहेर जाण्यास वेळ मिळावा. जेव्हां शाळेस प्रशस्त जागा नसते व व्यायामशाळा नसते, तेव्हां मुलें फार अभ्यासी होऊन शरीराची व मनाची हानि करून घेतात, ह्मणून शहरांत गैरसोईच्या ठिकाणीं भरणाऱ्या शाळांस सुट्टीचे दिवस अधिक असावे, व मुलांस गांवावाहेर जाण्यास किंवा परगांवीं इष्टमित्रांकडे जाण्यास वरचेवर संधि मिळावी. या व अशाच अनेक गोष्टींचा सुज्ञ शिक्षकांनीं व पालकांनीं चांगला विचार केलेला असावा.

वर्ग मांडणें तो अशा तऱ्हेनें मांडावा कीं, प्रत्येक मुलावर शिक्षकाची दृष्टि राहावी व त्याची मुखचर्या शिक्षकास उत्तम प्रकारें दिसावी; तसेंच शिक्षकानें आपणापुढें मांडलेले पदार्थ किंवा त्याच्या वाजूस असलेला फळा, नकाशा वगैरे अनेक उपकरणें मुलांस उत्तम प्रकारें दिसावीं, व शिक्षकास एकाशीं वोलतांना दुसऱ्याकडे पाठ करण्याचा केव्हांही प्रसंग येऊं नये. अशी वर्गाची मांडणी करण्यास मुलांच्या एकामागें एक अशा दोन किंवा तीन ओळी कराव्या; या ओळी साधेल तर धनुष्याकार असाव्या. प्रत्येक वांक दोन मुलांपुरतें असावें व त्यास टेंकायास मागें कांहीं तरी असावें; व पुढें मुलांस लिहायास डेस्कें असलीं तर उत्तमच. प्रत्येक वांकांत व दुसऱ्यांत मध्यें वाट ठेवावी, ह्मणजे त्या योगें प्रत्येक मुलास दुसऱ्यास धक्का न लावतां उठून शिक्षकाकडे जातां येतें. नंवर देण्याची पद्धति हल्लीं यूरोपांत व अमेरिकेंत अगदीं नाहींशी होत आली आहे; परंतु ती केव्हां केव्हां थोडा वेळ इकडे चालविणें कोणास इष्ट वाटल्यास शिक्षकानें आपल्यासमोर एका ओळींत सर्व मुलें कांहीं वेळ उभीं करावीं. वर्गांत फार तर तीस मुलें असावीं, व एकाच शिक्षकानें सर्व विषय शिकवावे अशी योजना करावी. मुलें वयानें, विद्येनें, बुद्धीनें व गृहस्थितीनें होतां होईल तों सारख्या योग्यतेचीं असणें अत्यंत इष्ट आहे.

१०७. वयाचें व इयत्तांचें प्रमाण सरासरीनें काय असावें, या वाबतींत इतर देशांचा अनुभव पाहिला पाहिजे. परंतु या देशाची व इतर देशांची स्थिति फार भिन्न आहे. इतर देशांत शिक्षणाचे विषय स्वभाषेंत शिकवितात, येथें ते इंग्रजींत शिकविणें भाग पडत आहे, यामुळें तिकडच्या व इकडच्या इयत्तांची तुलना करणें कठीण होतें. तथापि एकंदर ज्ञानाची तुलना करून पाहिल्यास व अमेरिकेंतील इयत्ता नमुन्याकरितां घेतल्यास म्याट्रिक्युलेशनच्या किंवा यू. एस्. एफ्च्या योग्यतेच्या परीक्षेस तेथें १८ वें वर्ष पुरें झालेल्या विद्यार्थ्यांस मात्र घेतात

तात. मराठी सहाव्या इयत्तेच्या योग्यतेच्या परीक्षेस १५ वे वर्षी घेतात. अमेरिकन लोक बुद्धिमान् आहेत, त्यांच्या शिक्षणपद्धति अधिक उत्तम आहेत व त्यांस शिक्षणार्चीं सर्व साधनें अनुकूल आहेत, या गोष्टी मनांत आणून अमेरिकन लोकांचा विद्याक्रम योग्य फेरफार करून येथें सुरू केल्यास कोणास तो असमाधानकारक किंवा फार मंद असें वाटण्याचें कारण नसावें. या दृष्टीनें विचार करितां असें लक्षांत येतें कीं मुलाची देशी भाषेंत चवथी इयत्ता पूर्ण होण्याचें वय १२ वें वर्ष लागण्याचा सुमार असावा. यानंतर सहा सात वर्षांनीं ह्मणजे १८ वें वर्ष संपण्याचे सुमारास त्याची म्याट्रिक्युलेशनची तयारी व्हावी; व २२ वे वर्षाच्या अखेरीस त्यानें कॉलेजांतून बाहेर पडावें. ही सामान्य बुद्धीच्या मुलाच्या अभ्यासाची इयत्ता होय. मुलगा फार बुद्धिमान् असेल तर त्यास घाईनें विद्याक्रमांतून नेऊं नये, तर त्याच्या शिक्षणांत अधिक विषयांचा संग्रह करावा व ते विषय अवलोकनाचे किंवा हस्तकौशल्याचे असावे; त्याकरितां घरीं किंवा शाळेंत निराळें शिक्षण देण्याची तजवीज करावी. असें न करितां शिक्षणाची व्यर्थ घाई केल्यानें त्याची तर्कशक्ति प्रौढ होत नाहीं, केवळ स्मरणशक्तीचें विशेष पोषण होतें व ही गोष्ट अखेरीस चांगलाच परिणाम करिते असें नाहीं. यू. एस्. एफ्च्या परीक्षेप्रमाणेंच म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस कांहीं विषय, पाहिजेत तर विद्यार्थ्यानें घ्यावे असे नेमिले तर फार फायदा होईल. इंजीनियरिंग कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस हल्लीं पी. ई. च्या क्लासांत एक वर्ष काढावें लागतें; व तें त्यांनीं काढल्यावर ते त्या कॉलेजांत जाण्यास योग्य होतात असें मुळींच नाहीं. जर म्याट्रिक्युलेशन परीक्षेसच कांहीं अधिक शास्त्रीय विषय जोडले, किंवा यू. एस्. एफ्. परीक्षेस प्राचीन भाषा व कांहीं अधिक इंग्रजीचा अभ्यास जोडला, तर विद्यार्थी इंजीनियरिंग कॉलेजास किंवा मेडिकल कॉलेजास अधिक योग्य होतील व आर्ट्स कॉलेजांत जाण्याची त्यांस गरज उरणार नाहीं. या प्रकारच्या सुधारणा केल्यास या दोन्ही परीक्षांच्या जागीं एकच परीक्षा करितां येईल; ज्या कॉलेजांत पुढें जावयाचें त्यास योग्य विषय कोणते हें ठरविलेलें असलें ह्मणजे झालें. असें करून म्याट्रिक्युलेशन् व यू. एस्. एफ्. या परीक्षांस येणाऱ्या उमेदवारांच्या वयाची इयत्ता १८ वे वर्षापर्यंत चढवावी, ह्मणजे १७ वें वर्ष पूर्ण झालेल्या उमेदवारांस मात्र परीक्षेस द्यावें; असें युनिव्हर्सिटीनें केल्यास पुष्कळ पालकांचें हित होईल; विद्येची घाई व तिचे दुष्परिणाम बंद होतील; व उच्च प्रतीचें शिक्षण घेण्यास योग्य व प्रौढ झालेले विद्यार्थी मिळाल्यानें त्या शिक्षणाचें अधिक चीज होईल. परंतु कांहीं थोड्या लोकांच्या आग्रहानें अशी व्यवस्था युनिव्हर्सिटीनें केली नाहीं, ह्मणून पालकांनीं व शिक्षकांनीं मुलें यथेष्ट पिटावीं असें नाहीं. संततीच्या शिक्षणाच्या कामांत तरी निष्कारण पारतंत्र्यांत ब्राह्मणांनीं पडण्याचें कारण नाहीं. प्रत्येक पालकानें आपल्या मुलाच्या हिताकरितां त्यास उत्तम शिक्षण सावकाशीनें देण्याची

कांहीं तरी तजवीज पाहिलीच पाहिजे. या कामीं आळस किंवा औदासीन्य वाळगून कसें होईल ?

अमेरिकन लोक मुलांस आठवे वर्षीं ह्मणजे ७ वर्षें पुरीं झाल्यावर शाळेंत घालतात. इंग्लंडांत व इतर देशांतही असाच प्रघात आहे; परंतु तो इकडील शिक्षकांच्या लक्षांत आलेला नाहीं. याचें कारण असें कीं, तिकडे जीं 'इन्फन्ट स्कुलें' ह्मणजे फार लहान मुलांच्या शाळा आहेत त्यांमध्यें सातवें वर्ष पुरें होईपर्यंत **बालक्रीडे**च्या रूपानें शिक्षण देण्याची पद्धति आहे. या शाळांत हस्तकौशल्य पदार्थांचें अवलोकन व इकडील विन इयत्तेइतकें ज्ञान मुलांस खेळाच्या रीतीनें करून दिलें जातें. ह्मणून तिकडील शाळांत पहिल्या इयत्तेस जो आरंभ होतो तो आठव्या वर्षीं, असें सरासरीनें ह्मणण्यास हरकत नाहीं. या देशांत लहान मुलांस शाळेंत घालण्याचें कमींत कमी वय ७ वें वर्ष, पहिल्या इयत्तेस आठवें, दुसरीस नववें, तिसरीस १० वें, व चौथीस ११ वें वर्ष असा नियम करणें इष्ट आहे; व इंग्रजी शाळेंत मुलास घेतेवेळीं त्याची प्राथमिक चौथी इयत्ता पूर्ण झाली आहे व तो बारा वर्षांचा आहे, हें पाहणें जरूर आहे. घाईचे परिणाम पालकांच्या लक्षांत येत नाहींत हें एक आश्चर्यच आहे. म्याट्रिक. व यू. एस्. एफ्. या परीक्षांत पास होणारांचें सरासरी वय पाहिल्यास तें १८ वर्षांच्या वर असतें; मुलें १५ वर्षांचीं आकारानें मात्र दिसतात, परंतु तीं वाढ गमावून वयानें थोर झालेलीं असतात; व परीक्षेस जाण्याची त्यांची जितकी जलदी असते तितकी पास होण्याची तयारी असत नाहीं, असा सर्वांचा अनुभव आहे.

१०८. शिक्षणपद्धतींत ज्या सुधारणा करणें इष्ट आहेत त्या सर्वांचें व तत्संबंधीं क्रमिक पुस्तकांचें येथें वर्णन करूं लागल्यास ग्रंथविस्तार फार होईल, व तो केला तरी शिक्षकांवाचून इतरांस त्यांत गोडी लागणार नाहीं. सबब ज्या कित्येक गोष्टी सर्वांच्याच ध्यानांत आणून देणें इष्ट आहे, त्यांचा मात्र पुढें उल्लेख केला आहे. हल्लींच्या शिक्षणक्रमाचें स्वरूप लक्षांत आणिल्यास, शिक्षकांस त्याविषयीं प्रश्न करून त्यांचे अभिप्राय घेतल्यास किंवा त्यांची शिक्षणपद्धति व योजना पाहिल्यास असें दिसून येईल कीं, **शिक्षणाचा हेतु एक व विषय पुष्कळ अशी जिकडे तिकडे स्थिति आहे. हा जो एक हेतु शिक्षक मनांत बाळगतात तो मुलांस विषय यावा किंवा समजावा,** व त्या येण्याची व समजण्याची जी उत्कृष्ट सीमा गणिली जाते ती नेमलेलें पुस्तक समजणें ही होय. समजावून काय द्यायाचें हें ज्या शिक्षकास कळत नाहीं किंवा त्याकरितां स्वतः श्रम करायास नको असतात, तो या कारणानें घोकवून घेण्यास आरंभ करितो. शिक्षणाचे विषय आरंभीं चार, मग पांच, मग सहा किंवा अधिक असतात व जों जों इयत्ता चढत जावें तों तों त्यांपैकीं कांहींचे अनेक पोटभाग होत जातात. आरंभीं विषय स्वभाषा, गणित, इतिहास व भूगोल हे अस-

तीत; नंतर इंग्रजी भाषेचा विषयांत समावेश होतो; त्यानंतर संस्कृत भाषेचा; तिच्या मागून शास्त्रीय विषयांचा; इत्यादि भाषाविषयांत लेखन, व्याकरण, व्युत्पत्ति, वगैरे पोटभाग होतात; गणितांत अंकगणित, बीजगणित, भूमिति, गतिस्थिति-शास्त्र वगैरे; इतिहासांत भिन्न देशांचे इतिहास व भूगोलांत सर्व खंडांचें व महा-सागरांचें वर्णन वगैरे. शास्त्रीय विषयांत आरोग्यशास्त्र, रसायन, ज्योतिष, इ०. या-प्रमाणें भिन्न विषयांचे अनेक पोटभाग होत जातात, परंतु हे सर्व विषय मुलांस येते करायाचे एवढाच हेतु सरशेवटपर्यंत कायम असतो. यामुळें शिक्षकांस मा-नसिकशास्त्राचें किंवा शारीरशास्त्राचें किंवा कोणत्याही नेमलेल्या विषयाहून अ-धिक विषयांचें ज्ञान असणें अनावश्यक होतें; व कोणा पाहिजे त्यास पुस्तक घेऊन पाहिजे तें शिकविण्याची योग्यता येते.

शिक्षणासंबंधीं जी नवी समजूत उत्पन्न झाली पाहिजे ती ही कीं, शिक्षणाचे हेतु फार आहेत व विषय कमी आहेत. विषयांची संख्या जी वाढलेली दिसते ती केवळ विस्ताररूप होय, शिक्षण कंटाळवाणें होऊं नये, त्यास वैचित्र्य यावें म्हणून हा विस्तार क-रणें जरूर होतें. जर थोडे विषय शिकवून उद्दिष्ट अनेक हेतु सि-द्धीस जातील तर थोडे विषय शिकाविल्यानेंही शिक्षणाचें सार्थक झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिक्षणविषयापेक्षां शिक्ष-णाच्या हेतूंवर शिक्षकाचें अधिक लक्ष असावें.

शिक्षणाच्या सर्व हेतूंचा एक मोठा हेतु करून तो कोणता असावा हें मागें प्रेसिडेंट आडम्स् यांच्या शब्दांनीं सांगितलें. परंतु व्यवहारांत शिक्षणाच्या पद्ध-तीचा विचार करितांना अनेक हेतु डोळ्यांपुढें धरले पाहिजेत. हे हेतु येणें-प्रमाणें:—(१) अवलोकन करण्याची व कल्पना करण्याची संवय वाढविणें; (२) निर्णय आणि अनुमानें बराबर करण्याची संवय लावणें; (३) स्मरणशक्ति व प्रसंगस्फूर्ति, हे बुद्धीचे गुण तीव्र करणें; (४) धर्म, नीति, सदाचार, सभ्यता, आरोग्यरक्षण, वगैरे यांसंबंधीं बोध करून तदनुरूप वर्तन ठेवण्याची प्रीति व तद्विरुद्ध वर्तनाचा द्वेष उत्पन्न करणें, व सर्व प्रकारचीं सत्कृत्यें करण्याची व दुष्कृत्यांपासून निवृत्त होण्याची संवय लावणें; (५) स्वार्थाकरितां व परमार्था-करितां जें सुयोग्य व व्यक्तिपरत्वें सुसाध्य असेल तें करण्याची वाकबगारी अंगांत आणणें, व जें काम हातीं धरायाचें तें व्यवस्थेनें, एकदिलानें, उद्योगानें, अंगमे-हनतीनें व उपयुक्त साधनांनीं पूर्ण करण्याची संवय किंवा ईर्षा उत्पन्न करणें. याप्रमाणें हे शिक्षणाचे पांच प्रमुख हेतु आहेत, त्यांचा थोडक्यांत उल्लेख करण्या-करितां एवढेंच म्हटलें तर बस्स आहे. **विद्यार्थ्यास अवलोकनाची, वि-चाराची, प्रसंगावधानाची, सद्वर्तनाची व उद्योगाची संवय ला-वणें हें शिक्षकाचें कर्तव्य होय.**

१०९. अवलोकन आणि कल्पना. मनुष्याच्या एकंदर ज्ञानाचें अवलोकन, अनुमान, व साहजिक आणि कृत्रिम प्रेरणा, हे तीन उगम आहेत. यांपैकीं शुद्ध प्रेरणेनें फार थोडें ज्ञान प्राप्त होतें. अनुमानास अवलोकनाचें साहाय्य लागतें, ह्मणून मनुष्याचें बहुतेक ज्ञान प्रत्यक्षपणें किंवा परोक्षपणें अवलोकनजन्य आहे; याकरितां अवलोकन करण्याची संवय अत्यंत आवश्यक आहे. ज्यास ही संवय नाहीं त्याचें ज्ञान प्रेरणा व अनुमान यांवर अवलंबून असतें व त्यामुळें तें अयोग्य, अपुरें किंवा खोटेंही असण्याचा संभव असतो. कोणीही माणसानें नाइलाज झाल्याखेरीज, स्वतःच्या मनाची अमुक प्रकारची प्रेरणा आहे ह्मणून किंवा अमुक मनुष्य किंवा पुस्तक असें सांगतें ह्मणून, कांहीं विशेष अनुमानें करून व तीं खरीं मानून स्वस्थ राहूं नये. जोंवर शक्य असेल तोंवर स्वतःच्या अवलोकनानें प्रत्यक्ष ज्ञान मिळवावें, लोकांचे जे अनुभव ते आपले ही करून घ्यावे, व ही शक्यता संपली ह्मणजे लोकांच्या अवलोकनावर व अनुभवावर विश्वास ठेवून त्यापासून जें ज्ञान मिळेल त्याचा फायदा घ्यावा. परंतु अशा ज्ञानास बुद्धिमान् पुरुषानें मोठें महत्व देऊं नये व त्यावर सर्वस्वी अवलंबून राहूं नये. परंतु या प्रकारचा दोष हल्लीं अनेक विद्वानांत दिसून येतो व ह्मणूनच संपादन केलेल्या ज्ञानापैकीं फार थोड्याचा त्यांस उपयोग होतो; व तोही करूं जातां अनुभवाचें बळ नसल्यामुळें लोकांनीं विरोध केल्यास त्यांस स्वस्थ बसावें लागतें. लोकांची खात्री होईल असा पुरावा त्यांजवळ हजर नसतो. ह्मणून शिक्षणांत जी पहिली गोष्ट करायाची ती अवलोकन वाढविण्याची होय.

कल्पनांची उत्पत्ति अवलोकन व साहजिक प्रेरणा यांपासून होते. मांजर काळें असतें, पांढरें असतें, पिवळें असतें, असें पाहिल्यावर तें तांबडेंही असेल, हिरवेंही असेल, अशा नानाप्रकारच्या कल्पनांची साहजिकपणें मनांत प्रेरणा होते; तसेंच तें लहान असेल, मोठें असेल, वाघाएवढें असेल, असें मनांत येतें, व कित्येक वेळां अशा कल्पना शास्त्रीय तत्त्वें ध्यानांत येण्यास कारण होतात. उदाहरणार्थ मांजर व वाघ हे एकाच वर्गांतील प्राणी असावे अशी समजूत होऊन उभयतांमध्यें किती बाबतींत साम्य आहे हें शोधण्याचें शास्त्रवेत्त्यांच्या मनांत येण्यास मोठ्या वाघाएवढ्या मांजराची कल्पना कारण झाली. मनुष्याच्या डोळ्यांची आकृति व ते शरीरावर कोठें वसविलेले असतात हें पाहिल्यावर, एकाच पुरुषास दोहोंच्या जागीं तीन किंवा अधिक डोळे कल्पून त्याची आकृति मनांत आणितां येईल. याप्रमाणेंच दोन, चार, आठ, शंभर, हजार हातांचे पुरुष, किंवा इतक्या पायांचीं जनावरें कल्पनेनें तयार होतील; घोड्याच्या किंवा सिंहाच्या तोंडाचा राक्षस तयार होईल; इत्यादि. कल्पनेस कांहीं असंभाव्य नाहीं, परंतु तिचेंही प्रमाण अवलोकनानें नियमित होतें; व अनुभव आणि अनुमान जों जों वाढतात, तों तों शक्य आणि अशक्य, संभाव्य आणि असंभाव्य, असे कल्पनांमध्यें भेद उत्पन्न

होतात, व जसा प्रत्यक्षावर व तज्जन्य अनुमानांवर मनुष्याचा एकंदम विश्वास वसतो, तसा कल्पनांवर वसेनासा होतो; व जो वसतो तो कमी अधिक प्रमाणाचा असतो. लहान मुलें कल्पनांवर फार विश्वास ठेवितात. तरुण मनुष्य वराच ठेवितात व मध्यम वयांतील मनुष्य फार थोडा ठेवितात; याचें कारण अनुभवाचें उत्तरोत्तर होत गेलेलें प्रावल्य होय. कल्पनाशक्ति नष्ट होणें हें बुद्धीच्या वार्ध्क्याचें फळ होय. बुद्धीचें कर्तृत्व कायम राहण्यास कल्पनाशक्ति तीव्र राहिली पाहिजे. मोठ्या विशाल बुद्धीच्या पुरुषांत अनुभवामुळें कल्पनाशक्ति ऱ्हास पावत नाहीं, तर तीस केवळ निराळें वळण लागतें. प्रसिद्ध कवि, शास्त्रवेत्ते, इतिहासकार, वगैरेंचे ग्रंथ वाचल्यास या गोष्टीचा प्रत्यय येईल. एकादें लहान मूल देखील मनुष्यें उडूं लागल्याची, अरण्यांत सुंदर वंगला उत्पन्न झाल्याची, एका बाणानें हजार लोक जखमी झाल्याची, किंवा कोणी मनुष्य सबंध समुद्र प्याल्याची कल्पना करील; व त्या कल्पना त्यानें लिहिल्या ह्मणून तो कवि होत नाहीं; वाईट कवि याच बालिश रीतीनें काव्यें करितात. उत्तम कवीनें वर्णिलेले प्रसंग या प्रकारचे नसतात. त्यानें लिहिलेल्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष घडणाऱ्या असतात किंवा संभाव्य असतात; त्यांची जुळणीही तशीच असते; त्यांमध्यें दिसणारा कार्यकारण भाव अनुभवास येण्यासारखा असतो; परंतु त्या सर्व गोष्टी एके ठिकाणीं पाहूं गेल्यास मात्र सांपडणें कठीण; कल्पनेनें जें काय केलेलें असतें तें हें कीं, त्या गोष्टी वेंचून घेणें, त्यांची संभाव्य रचना करणें, त्यांविषयीं वाचणाराचा किंवा पाहणाराचा अनुभव जागृत करणें, त्यांस खऱ्याचें स्वरूप आणणें, व तेणेंकरून प्रत्यक्ष प्रसंग पाहून जसा वाचकाच्या किंवा प्रेक्षकाच्या चित्तवृत्तीस पूर आला असता तसाच पूर आणणें. याप्रमाणेंच शास्त्रेतिहासादि सर्व विषयांचें प्रथम ज्ञान व पुढें विस्तार होण्यास कल्पनाशक्ति आवश्यक असते; नुसत्या अनुमानानें किंवा प्रेरणेनें भागत नाहीं. मुलांची कल्पनाशक्ति वाढविण्याचा शिक्षकाचा नित्य प्रयत्न असावा; अनुभवानें तीस आपोआप चांगलें वळण लागतें. तसेंच अनुमानाची शक्ति प्रबळ होते तेव्हां शक्य व संभाव्य कोणतें आणि अशक्य व असंभाव्य कोणतें, ह्याचा विचार मनुष्य सहजच करितो व आपला आपणच कल्पनांस आडा घालतो. ह्मणून कल्पनाशक्ति आवरूं नये, अनुमानशक्ति वाढवावी.

११०. **निर्णय आणि अनुमान.** ज्या गोष्टी निर्विवादपणें ठरल्या आहेत, ज्यांचा अनुभव पूर्वी सर्वांस आला, हल्लीं येत आहे, व पुढें येणारच, व ज्यांस अपवाद नाहीं, अशा तत्त्वांस **सिद्धांत** असें ह्मणूं. एका किंवा अनेक सिद्धांतांपासून पदार्थांच्या व क्रियांच्या गुणांबद्दल व परिणामांबद्दल ज्या गोष्टी आपण स्थापित करितों त्या **निर्णय** होत. प्रत्यक्षावरून किंवा अनुभवावरून जी सर्वसाधारण गोष्ट आपण साहजिकपणें सिद्ध करितों ती **अनुमान** होय. या अनुमानास अपवाद नसेल तर त्यास सिद्धांताचें रूप येतें; किंवा उपाधिभेदाप्रमाणें

त्याचें सिद्धांतत्व नियमित होतें; ह्मणजे अनुमानाच्या सत्यतेविषयीं केव्हां केव्हां थोडा किंवा फार संदेह राहतो. सिद्धांताची सत्यता मात्र निःसंदेह असते.

सिद्धांतांस सार्वत्रिक सत्यता असते ह्मणून त्यांची प्रतीति पाहण्याचें अवघड नाहीं व ह्मणून ती शिक्षकानें सर्व मुलांस आणून दिली पाहिजे. अनुमानाच्या व्यावहारिक सरणी सांगितल्या पाहिजेत व ही मानसिक क्रिया आपणांसमोर घडवून घेऊन ती बरावर चालविण्याची मुलांस संवय लाविली पाहिजे. ज्या अवलोकनांवरून व अनुभवांवरून अनुमानें होतात, तीं अवलोकनेंही मुलांकडून करवून घेतलीं पाहिजेत. गणितविषयांतील सर्व तत्त्वें सिद्धांतरूप आहेत. व त्या तत्त्वांचा अनुभव दाखविणें फारच सोपें आहे, ह्मणूनच अंकगणित लहान मुलांसही शिकवितां येतें व शिकवावें. दिलेल्या उदाहरणांत सिद्धांतांपासून निर्णय काढण्याचें मुलांचें काम असतें, व जों जों गणितविषय वाढवीत जावा तों तों प्रसंगावधानाखेरीज गणितांतही निर्णय करणें कठीण होत जातें.

दिव्याची ज्योत धरूं गेल्यास हात पोळतो हें अनुमान होय; या अनुमानास सिद्धांताचीच योग्यता आहे; दहावीस कावळे पाहून कावळा काळा असतो असें अनुमान केल्यास, त्यास शुद्ध सिद्धांताचें रूप येत नाहीं, तरी व्यवहाररीत्या हें अनुमान योग्य आहे. गाईबैलांस वशिंड असतें हें अनुमान त्याहून कमी योग्यतेचें आहे; व झाडावर चढलेला मनुष्य खालीं पडेल, असें अनुमान केल्यास त्याचा कांहींच उपयोग नाहीं. महत्वाचीं अनुमानें करण्यास अवलोकनाचा कसा सांठा असावा लागतो, हें मुलांस समजावून देणें फार इष्ट आहे, व शास्त्रीय विषयांचें शिक्षण याच हेतूनें दिलें जावें. सिद्धांतांपासून निर्णय करण्यास किंवा अनुभवावरून अनुमानें करण्यास पूर्वी झालेल्या ज्ञानाहून अधिक ज्ञान लागत नाहीं. पूर्वीच्या ज्ञानास व्यवस्थितपणा आणणें व त्याचा परंपरेनें विस्तार करणें एवढेंच बुद्धीचें काम असतें. ह्मणूनच गणितविषयांत विस्ताराच्या मानानें पाहतां इतर सर्व शास्त्रांहून पारिभाषिक संज्ञा कमी आहेत, व या विषयाची समजूत होण्यास अल्पल्प भाषाज्ञान पुरतें. परंतु गणिताचा व्यवहारांत उपयोग करूं जातांच अवलोकन, अनुभव व इतर प्रकारचें ज्ञान, यांची गरज लागते, व मग भाषाज्ञान जरूर होतें. ह्मणून इतर अनुभविक ज्ञानाच्या प्रमाणानें गणिताचें ज्ञान वाढवीत जावें, नाहीं तर तें व्यर्थ होतें.

१११. स्मरणशक्ति व प्रसंगस्फूर्ति. स्मरणशक्ति वाढवून वाढत नाहीं, व वाढलीच तर पुष्कळ कार्यांस बुद्धि निरुपयोगी होते, ह्मणून शिक्षकांनीं स्मरणशक्ति कृत्रिमपणें वाढविण्याचा, विशेषतः 'घोक आणि ह्मण' या मार्गानें वाढविण्याचा, प्रयास करणें सर्वस्वी हानिकारक आहे. ज्याप्रमाणें योग्य शारीरिक श्रमांनीं शरीर वाढून मोठें होतें, त्याप्रमाणेंच योग्य मानसिक श्रमांनीं मेंदू वाढून मोठा होतो. शरीर किंवा मेंदू वाढविण्याची घाई उपयोगीं नाहीं, ती अपायका-

रक होते. ज्याप्रमाणें व्यक्तिपरत्वें शरीराची वाढ मर्यादित असते, त्याप्रमाणेंच मेंदूचीही वाढ मर्यादित असते. ज्याप्रमाणें अमुक जात शरीरानें सदृढ आहे असें ठरवितांना आपण त्या जातींतील माणसांची सरासरी वाढ, शरीरसामर्थ्य वगैरे पाहतों, त्याप्रमाणेंच अमुक जात बुद्धिमान् आहे असें ठरवितांना त्या जातीच्या माणसांच्या ज्ञानावरून व कर्तीवरून त्यांच्या मेंदूची सरासरी वाढ व त्याचें सामर्थ्य किती आहे हें आपण निश्चित करतों. ज्या कोणत्याही जातीस आपण दुसऱ्या जांहून अधिक बुद्धिमान् असें सिद्ध करायाचें असेल तिनें मेंदूच्या सरासरी वाढींत व सामर्थ्यांत दुसऱ्यांहून अधिक श्रेष्ठता दाखविली पाहिजे.

प्रसंगस्फूर्तीवांचून स्मरणशक्तीचा फारसा उपयोग होत नाहीं हें उघड आहे. तेव्हां मुलांच्या ध्यानांत पुष्कळ गोष्टी आहेत हें पाहण्याऐवजीं त्या प्रसंगीं त्यांस सुचतात कीं नाहींत हें पाहणें आवश्यक आहे. गणिताचे किंवा तर्कशास्त्राचे नियम पुष्कळांच्या ध्यानांत असतात, परंतु ते लागू करण्याचा प्रसंग येतांच त्यांची बुद्धि कुंठित होते. नकाशावर पुष्कळांस दिशा कळतात, परंतु परक्या गांवांत गेल्यावर पूर्व कोणची म्हणून दिवसांही शंका येते. भूगोलाचें ज्ञान फारच थोड्यांस प्रवासामध्यें उपयोगीं पडतें. अशा आणखी शेंकडों गोष्टी सांगतां येतील. हीं सर्वे केवळ स्मरणशक्ति वाढविण्याचे दुष्परिणाम होत. कोणतीही गोष्ट ध्यानांत राहण्यास व तिची प्रसंगीं स्फूर्ति होण्यास ती इंद्रियांवर मोठा आघात करून मेंदूपर्यंत जाऊन पोहोंचली पाहिजे; तसेंच तिच्या स्फूर्तीची वरचेवर आवश्यकता लागण्यासारखी असेल तर कृत्रिमपणें तिची उत्पत्तिही वरचेवर करीत गेलें पाहिजे. ही गोष्ट इंद्रियज्ञान भिन्न प्रकारें पुनः पुनः देऊन सिद्धीस जाते. जेव्हां ध्यानांत ठेवण्याची गोष्ट नित्य सिद्धांतरूप असते तेव्हां मात्र ती घोकून ध्यानांत ठेवणें इष्ट आहे. प्रत्यहीं ज्या गोष्टींची स्फूर्ति आवश्यक असते तेवढ्या मात्र या घोकून घ्याव्या. उदाहरणार्थ अंक, पाडे, कांहीं व्यावहारिक नियम, वगैरे घोकून पाठ करविणें इष्ट आहे; त्यामुळें नित्यकृत्यांत निरर्थक श्रम व वेळ दोन्ही वांचतात. परंतु व्याकरण, भूमिति, वगैरे कित्येक विषयांत घोकंपट्टीचा उपयोग फारच विचारानें केला पाहिजे; तो न करणेंच बहुधा श्रेयस्कर असतें.

११२. मनोवृत्तींच्या संबंधाचें, सर्व प्रकारच्या सद्वर्तनासंबंधाचें, व उद्योगकलाकौशल्याचें शिक्षण इतर मार्गांनीं देतां येईल तितकें द्यावेंच, परंतु तें प्रत्यक्ष गोष्टींच्या द्वारें देणें अधिक आवश्यक आहे. या कामीं सिद्धि येणें हें शिक्षकाच्या स्वतःच्या दक्षतेवर व संवर्यींवर पुष्कळ अंशीं अवलंबून आहे, म्हणून त्याविषयीं विशेष विस्तारानें लिहिण्याचा फारसा फायदा होणार नाहीं. एका विषयाप्रमाणें ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टीचा मात्र येथें थोडा उल्लेख केला पाहिजे. कांहीं साहजिक किंवा कृत्रिम प्रेरणा, हा एक ज्ञानाचा मार्ग सांगितला. प्रेरणामूलक ज्ञानाचा, वर्तन आणि उद्योग यांच्या नियमनांत, अत्यंत उपयोग होतो व तो

शिक्षकानें आरंभापासून करावा. सुख हवें व दुःख नको, ही एक साहजिक प्रेरणा आहे, व ती सर्व इतर प्रेरणांपेक्षां वलिष्ठ आहे. वडिलांची आज्ञा पाळावी, खरें वोलावें, वगैरे नीतितत्त्वांचें ज्ञान तसेंच प्रेरणेनें ह्मणजे, शिक्षकानें स्वतःच्या अनुभवावरून, द्यावें. धर्माच्या निर्विवाद मूलतत्त्वांचें ज्ञान तसेंच प्रेरणेनें द्यावें, व त्या प्रेरणा ईश्वराच्या आज्ञा या रूपानें द्याव्या. व्यायामसंवंधी नियम, कला-कौशल्यसंवंधाचे व्यावहारिक नियम, इत्यादींचें ज्ञान आरंभीं प्रेरणेनेंच द्यावें; इतर आवश्यक ज्ञान विद्यार्थ्यांस येईपर्यंत वाट पाहूं नये. ज्या ज्या गोष्टींची पहिल्यापासूनच संवय लाविली पाहिजे, त्यांची ती संवय होण्यास प्रेरणारूप ज्ञान आधीं दिलेंच पाहिजे; अवलोकन, अनुभव आणि अनुमान यांपासून तें ज्ञान येण्यासारखें असल्यास तें पुढें क्रमानें करून द्यावें. उदाहरणार्थ, पोहायाची संवय उपयोगीं आहे; ती लहानपणींच लाविल्यास चांगली लागते; तेव्हां पाण्यांत हात कसे टाकावे, पाय कसे हालवावे, वगैरे गोष्टी पाण्यांत मूल असतां त्यास शिकवाव्या, व त्यास पोहायास लावावें. मुलाचा शास्त्राभ्यास होऊन पाण्याचे धर्म, शरीराचें विशिष्टगुरुत्व, वगैरे गोष्टी त्यास जेव्हां कळतील तेव्हां कळतील, त्यांची आधीं परवा करूं नये. जेव्हां अवलोकनादि मार्गांनीं ज्ञान अंगीं येऊन मनुष्य **योग्य वेळीं** कर्तव्यास तयार होण्याची शक्यता नसते तेव्हां स्थूल अनुभविक नियमांच्या प्रेरणेनेंच त्यास स्वकर्तव्यास योग्य वेळीं तयार केलें पाहिजे.

११३. याप्रमाणें शिक्षणाचे जे प्रमुख पांच हेतु त्यांची थोडी फोड केली. आतां हे हेतु सिद्धीस नेण्याकरितां कोणते उपाय करायाचे त्यांचा विचार करूं. सर्व देशांत कांहीं नियमित विषय शिक्षणास घेऊन त्यांच्या विवेचनाच्या द्वारें हे हेतु साध्य करण्याची पद्धति आहे; व सांप्रतकाळीं जीं अत्यंत ऊर्जितदशेस आलेलीं राष्ट्रें आहेत, त्यांमध्यें कोणते विषय प्राथमिक व मध्यम प्रतीच्या शिक्षणास उपयोगी गणिले आहेत हें पाहिल्यास असें दिसतें कीं, हे विषय इकडच्या शिक्षणक्रमांत जे आहेत तेच होत; परंतु दोन तीन वाबतींत मोठा भेद आहे. त्या अशा कीं तिकडील शिक्षणपद्धति निराळ्या प्रकारची आहे; शिक्षणाच्या धंद्याकरितां विशेष शिक्षण दिलें जातें, व तें इकडच्यापेक्षां निराळ्या व वरिष्ठ प्रतीचें असतें. अवलोकनाचे विषय अधिक चांगल्या रीतीनें शिकविले जातात व त्यांची इयत्तेवार वांटणीही निराळ्या प्रकारची असते. तिकडे म्याट्रिक्युलेट होणारा मनुष्य व इकडे म्याट्रिक किंवा यू. एस्. एफ्. पास होणारा मनुष्य यांमध्यें या कारणानें महदंतर पडतें; तें अंतर पुस्तकी ज्ञानांत नसतें, तर उभयतांस लागलेल्या, अवलोकन, विचार इत्यादिकांच्या संवर्यीत असतें; व ह्मणून तें नुसता तिकडील शिक्षणक्रम पाहून ध्यानांत येत नाहीं, व्यक्तींची कर्तवगारी पाहिली ह्मणजे मात्र येतें. या कारणानेंच पुष्कळ लोक चकून 'तिकडे काय विशेष आहे' असें ह्मणतात. याकरितां अवलोकनासंबंधीं तिकडे कोणते अधिक विषय आहेत व त्यांची योजना

कशी असते, हें लक्षांत आणून, या देशास योग्य असे विषय निवडून घेतले पाहिजेत, व सर्वच विषय कोणत्या धरतीवर शिकविणें इकडे विशेष फलद्रूप होईल हें ठरविलें पाहिजे. पुढील सदरांत या विषयाचा संक्षेपानें विचार करण्याचें योजिलें आहे.

(१) **भाषाविषय.** हा विषय इतर सर्व शिक्षणविषयांपेक्षां अधिक महत्वाचा आहे. या एकाच्या शिक्षणानेंही शिक्षणाचे सर्व हेतु साध्य होण्यासारखे आहेत; व तो जर उत्तम शिकविला गेला तर उत्तम मनुष्य तयार होईल. ह्मणून स्वभाषेचें, परभाषेचें व प्राचीन भाषेचें शिक्षण कसें द्यावें हें समजणें इष्ट आहे.

स्वभाषा. स्वभाषेचें शिक्षण हल्लीं प्राथमिक शाळांत थोडें होतें; व इंग्रजी शाळेंतील यू. एस्. एफ्. च्या वर्गांत व ट्रेनिंग कॉलेजांत, तें थोडें वरिष्ठ प्रतीचें होतें. याशिवाय देशभाषेचें उत्तम शिक्षण होण्याचीं दुसरीं स्थळें नाहींत, व ह्मणून त्या विषयीं कोणी फारसा विचारही केलेला नाहीं. प्राथमिक शाळेकरितां लिहिलेलीं क्रमिक पुस्तकें कशीं असावीं हें येथें निराळें सांगत नाहीं. पुढें पद्धति वर्णन केली आहे तीवरून योग्य पुस्तकें कशीं असावीं, हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

प्राथमिक शाळेंत भाषाविषयाच्या द्वारें अवलोकन आणि कल्पना वाढविण्याचा पहिला हेतु असावा; व मुलांचें जें आधीचें अवलोकन आहे तें मूळ धरून त्यापासून क्रमाक्रमानें तें वाढवीत जावें, व या दृष्टीनें वाचायाचें पुस्तक लिहिलेलें असावें. मुलगा व्यवहारांत जें जें पाहतो व ऐकतो त्यासंबंधीं त्याची हळू हळू जिज्ञासा वाढावी, तेंच त्यानें अधिक लक्षपूर्वक पहावें, पाहिल्यावर त्यास तें तोंडानें सांगतां यावें, सांगतां आल्यावर अधिक जाणत्या माणसानें तेंच कसें सांगितलें आहे हें त्यास वाचून समजावें, व समजल्यावर कमी अधिक प्रमाणानें स्वतः लिहितां यावें, असा शिक्षणाचा अनुक्रम असावा. ह्मणजे **अवलोकन, तोंडी वर्णन, वाचन** व नंतर **लेखन,** अशा क्रमानें पाहिलेल्या पदार्थांच्या व क्रियांच्या गुणधर्मांचें भाषाज्ञान झालें पाहिजे. असें शिक्षण देण्यास अवलोकनाची सामुग्री किंवा पदार्थसंग्रह, चित्रें, वगैरे हीं शिक्षकाजवळ असलीं पाहिजेत, व शिवाय अमुक ठिकाणीं अमुक आहे किंवा चाललें आहे अशा पाहण्यासारख्या जागा शिक्षकास माहीत असल्या पाहिजेत. तो शोधक व कल्पक असावा व त्यास मुलांच्या प्रश्नांचें कामापुरतें सयुक्तिक खरें उत्तर देतां आलें पाहिजे. पदार्थ पाहतां पाहतां मुलांस अधिक प्रश्न सुचावे, व ते त्यांनीं विचारतांच शिक्षकानें त्यांचें समाधान करावें ज्या गोष्टी मुलांस सुचणार नाहींत त्या त्यानें त्यांस सुचवून द्याव्या व त्यांचें लक्ष त्यांकडे लावावें. उदाहरणार्थ, शाळेच्या वाटेवर किंवा दुसऱ्या कोठें घर बांधण्याचे काम चाललेलें असेल; तेथें मुलांनीं जाऊन पहिले दिवशीं घर बांधण्यास काय काय सामान लागतें तें पाहून यावें. शिक्षकानें मुलांकडून पाहिलेले पदार्थ वर पाहावे, व ते कोणीं अधिक सूक्ष्मपणें पाहिले आहेत, हें लक्षांत आणून त्यास शाबा-

सकी द्यावी. नंतर सर्व पदार्थांची याद फळ्यावर लिहावी, ती मुलांकडून वाचवावी; व नंतर त्यांस स्वतः आपल्या वहीवर ती लिहायास सांगावी. हा एक धडा झाला. दुसरे दिवशीं आपली वही घेऊन मुलें पुनः घराचें काम पहायास जातील; व कोणता पदार्थ कोणत्या ठिकाणीं किंवा कोणत्या कामीं लाविलेला आहे हें पाहून येतील, मग कोणतें काम कोण करीत आहे हें ते पाहतील, मग घराची मांडणी त्यांस समजेल, घराच्या भागांचें ज्ञान होईल, घराचे उपयोग व रचना हीं ध्यानांत येतील, स्वतःच्या घरांत व नवीन घरांत कोठें तफावत आहे ती लक्षांत दिशांचा भेद, ऊन्ह कोणीकडून येतें, सावली कोणीकडे पडते, वारा कोणत्या बाजूनें येतो, इत्यादि अनेक गोष्टीही ते समजून घेतील. जें पाहिलें तें तोंडानें सांगायाचें, वाचायाचें, व लिहायाचें, असा क्रम सुरू असल्यास अनेक शब्दांची माहिती, जुळणी, अर्थ व त्यांविषयीं योग्य विचार मुलांस येण्यास अवकाश लागणार नाहीं. असा विस्तार होण्यासारखे विषय मात्र क्रमिक पुस्तकांत असावे; 'गोष्यांचें वर्णन' किंवा असेच दुसरे असूं नयेत. शब्द उच्चारितांच अमुक पदार्थ असें मुलाच्या वरावर ध्यानांत आलें ह्मणजे पुरे आहे; 'तुळई ह्मणजे दोन खांवांवर ठेवलेलें लांब जाडी लांकूड' असें त्यांस सांगतां न आलें तरी हरकत नाहीं. तुळई कोठें कशी ठेवलेली असते हें विचारून त्या प्रश्नास निराळें उत्तर मागावें; परंतु तुळईची व्याख्या करण्याच्या भरीस पडूं नये.

मनुष्याच्या स्वरूपाचें व स्वभावाचें अवलोकन शिकविण्यास भाषाविषय फार उपयोगी आहे. मनुष्याची जशी चित्तवृत्ति असेल तशी त्याची मुद्रा होते, अवयवांचें स्फुरण होऊन ते विशेष प्रकारें चलित होतात, व आवाजांतही फरक पडतो. या गोष्टी ध्यानांत येण्यास अवलोकन फारसें सूक्ष्म लागत नाहीं. या कामाकरितां भिन्न चित्तवृत्ति उदाहृत करून संभाषणाच्या रीतीनें लिहिलेले धडे पुस्तकांत असावे. ते उत्तम मुलांस योग्य अशा भाषेंत लिहिलेले असावे व त्यांत मुलांच्या कृति, छंद, गुण, दोष वगैरे विषयांचें वर्णन असावें. हे धडे शिक्षकानें वाचून दाखवावे, व नंतर दोन मुलांकडून संभाषणाप्रमाणें वाचवावे, व प्रत्येकास योग्य आविर्भाव अंगीं आणण्यास मदत करावी. एक वाचीत असतां त्याकडे दुसऱ्याचें व वाकी सर्वांचें लक्ष असतेंच, व त्यामुळें भिन्न चित्तवृत्तींनीं तोंडावर, अवयवांमध्यें, स्वरांत, वगैरे कसे फेरफार होतात हें सर्वांच्या लक्षांत येतें. यानंतर साधल्यास पुस्तकांवांचून तसेंच संभाषण करायास लावावें. पुष्कळ सुविचार व सद्वर्तनाचे नियम या प्रकारें लक्षांत आणून देतां येतील, ते मुलांच्या तोंडींही बसतील. धर्मसंबंधी प्रार्थना वगैरे याच रीतीनें ह्मणून द्याव्या, व प्रेमळता, नम्रता, वगैरे मनोवृत्तींची संवय लावावी. या कामीं गाण्याची मदत घेतल्यास कर्णेंद्रियास आणखी विशेष शिक्षण मिळेल, व तें अवश्य आहे; त्या योगें मुलांस गाण्याची तार लागल्यास तीं रस्त्यांत ऐकलेलीं भलतींच पद्यें ह्मणण्याचें बंद होतें. युरोपांत

व अमेरिकेंत शिक्षकास गायन शिकवितात, व मुलांकडून प्रत्यहीं प्रार्थना ह्मणून घेतात. जरी शिक्षकास गायन आलें नाहीं, तरी त्यास योग्य अभिनयाची किंवा आविर्भाव अंगीं आणण्याचीं शंका वाटूं नये, सर्व काम निःशंकपणें व निर्भीडपणें चालवें.

अवलोकनावरोवर निर्णय, अनुमान, तर्क, कल्पना या सर्वांची उत्पत्ति होतेच, व विद्यार्थी आणि शिक्षक यांमध्यें जो संवाद उत्पन्न होतो त्यांत याच मानसिक क्रिया सुरू असतात; ह्मणून हे संवाद या क्रिया वरोवर करण्याचें शिक्षण देण्यास उपयोगी आहेत, व त्याच हेतूनें ते करावे. अशा रीतीनें स्मरणशक्ति व स्फूर्ति आपोआप अंगीं येते व मन सर्वदा चलाख व तयार राहतें. ह्मणून या संवंधानें अधिक लिहीत नाहीं.

मुलांची योग्यता पाहून सदाचार आणि उद्योग यां संवंधाचे धडे क्रमिक पुस्तकांत घालावे. उद्योगासंबंधाचे धडे स्वतः मुलांस त्या त्या क्रिया करितां याव्या अशा दृष्टीनें लिहिलेले असावे. सदाचाराच्या संवंधानें ह्मणी, कविता व गोष्टी लिहिलेल्या असाव्या. या गोष्टी खऱ्या असोत वा खोट्या असोत; त्या अशा रीतीनें सांगितलेल्या असाव्या कीं सदाचाराची प्रीति आणि दुराचाराचा द्वेष व तिरस्कार सहज उत्पन्न व्हावा, व त्यांचे बरे वाईट परिणाम लोकांनीं अनुभवलेले डोळ्यांपुढें उभे रहावे. शक्यता व संभाव्यता यांकडे कमी लक्ष असलें तरी चालेल, कारण पदार्थांच्या संबंधानें कल्पनांस जसा विचाराचा आढा पडणें व्यवहारांत इष्ट असतें, त्याप्रमाणें सदाचाराच्या व धर्माच्या कल्पनांची गोष्ट नाहीं. या कल्पना योग्य असल्यास जितक्या वलवत्तर होतील तितक्या इष्टच असतात व त्यांवर श्रद्धा वसून त्यांअन्वयें मनाचे निर्धार होणें अत्यंत श्रेयस्कर असतें. मनुष्य ज्या मनोवृत्तींमुळें दुराचारास प्रवृत्त होतो त्या, **तात्कालिक लाभाची किंवा सुखाची इच्छा** व सामान्यतः **स्वार्थ साधण्याची ईर्षा,** या होत. मनुष्यस्वभावांत या फार प्रवळ वृत्ति आहेत, व त्यांचा पाडाव करण्याकरितां प्रत्यक्ष व काल्पनिक सर्व प्रकारचे योग्य उपाय योजणें हें सदाचार शिकविणाराचें कर्तव्यच आहे.

भाषाविषय जों जों पुढें जातो तों तों त्यांत कांहीं भाग असे येतात कीं, त्यांस केवळ विचारशक्तीची गरज लागते. या कारणानें हे भाग कांहींसे गणिताच्या किंवा शास्त्रांच्या जातीचे आहेत. असे भाग व्याकरण, शब्दव्युत्पत्ति, वाक्यालंकार वगैरे हे होत. इतर भाषांच्या व शास्त्रांच्या शिक्षणाविषयीं पुढें ज्या गोष्टी सांगण्यांत येतील, त्यांवरून हे भाग कसे शिकवावे याविषयीं कल्पना येईल.

(२) **परभाषा.** या विषयाच्या शिक्षणाचा विचार इतर सर्व राष्ट्रांपेक्षां एतद्देशीयांस अधिक महत्वाचा आहे, कारण इतर राष्ट्रें ज्या बहुतेक गोष्टी स्वभाषेंतून शिकतात त्या इकडे परभाषेंतून शिकणें जरूर झालें आहे; सुशिक्षितांचा

वहुतेक व्यवहार इंग्रजी भाषेंत चालतो; नौकरी मिळविण्याचें व ज्ञानसंपादनाचें हेंच उत्तम साधन सर्वांस हल्लीं उपलब्ध आहे; व ह्मणून परभाषेच्या अभ्यासाकडे लहान कोंवळ्या मुलांस लावणें भाग पडत आहे. यामुळें स्वभाषेनें जीं कार्यें मुलभपणें व उत्कृष्टपणें व्हावयाचीं, तींही परभाषेंतून करून घेण्याचा प्रसंग येतो, व तीं कार्यें चांगलीं सिद्धीस जात नाहींत. ह्मणून **स्वभाषेचा थोडा तरी व्यासंग शेवटपर्यंत मुलांस असणें अवश्य आहे; व त्याचा मुख्य उद्देश व्याकरणादि विषय शिकविण्याचा नसावा, तर मनुष्य-स्वभावाचें ज्ञान, सदाचारप्रीति व काव्यें आणि शास्त्रें यांमध्यें उत्तम अभिरुचि, हीं सर्व उत्पन्न करण्याचा असावा.** ज्यांचा स्वभाषेचा अभ्यास शेवटपर्यंत कायम राहतो, ह्मणजे यू. एस्. एफ्. चा अभ्यास करणारीं मुलें व ट्रेनिंगचे विद्यार्थी, त्यांच्याही शिक्षणक्रमाची हल्लींची योजना या दृष्टीनें पाहतां अत्यंत अयोग्य आहे, असें शोधक मनुष्यास दिसून येईल. ही स्थिति दूर झाली पाहिजे.

एतद्देशीयांस जी परभाषा शिकावयाची ती इंग्रजी भाषा होय. युरोपांतील सर्व सुशिक्षित लोक एक किंवा दोन परभाषांचें थोडें फार अध्ययन करितात. तें करण्यांत त्यांचा हेतु व्यापारसंबंधानें पत्रव्यवहार करितां यावा, प्रवासांत अडचण पडूं नये व वर्तमानपत्रें आणि ग्रंथ वाचूं लागल्यास त्यांचा अर्थ तात्पर्यानें तरी कळावा. इतकें ज्ञान ते वहुधा शिक्षणानें करून घेतात. नंतर व्यासंगाप्रमाणें ज्याचें तो स्व-परिश्रमानें ज्ञान वाढवून घेतो. हा तांत्रिकज्ञान करून घेण्याचा मार्ग एतद्देशीयांस उपयोगी नाहीं, शिवाय इतर देशांतील लोक वरेच प्रौढवयाचे झाल्यावर परभाषा शिकतात, तसेंही येथें नाहीं. सवव तिकडील परभाषा शिकण्याच्या पद्धति जशाच्या तशा इकडे आणून उत्तम फळ येत नाहीं. हल्लीं इकडे इंग्रजी भाषा शिकण्याची जी पद्धति सुरू आहे ती प्राचीन भाषा शिकण्याची पद्धति आहे, एवढेंच कीं ती अधिक प्रयासानें परभाषेच्या चालू शिक्षणास लावून घेतलेली आहे. प्राचीन भाषांचें अध्ययन करितांना जो मुख्य उद्देश असतो तो हा कीं, प्राचीनांनीं जें लिहिलें आहे तें समजावें. इतर सर्व उद्देश या मुख्य उद्देशास अनुसरून असतात. आतां प्राचीन भाषा शिकतांना आरंभीं कोणी-ही प्राचीनांसारखेंच लिहूं किंवा वोलूं पाहत नाहीं. जे विचार स्वभाषेंत सांगायाचे तेच प्राचीन भाषेंत सांगण्याची गरज नसते, व ह्मणून शब्दांची स्फूर्ति कारशी तीव्र असण्याची गरज नसते, व वाक्यरचनेच्या नियमांचें तांत्रिक ज्ञान मात्र असावें लागतें. अर्वाचीन भाषेंत शब्दांच्या व वाक्यांच्या नुसत्या उच्चारांत व निरनिराळ्या शब्दांच्या व वाक्यांच्या अर्थांत व रचनेंत जे अनियमित विशेष प्रकार असतात, व जे प्रकारच व्यवहारांत मोठे उपयोगी गणिले जातात, ते प्राचीन भाषेंत वहुधा अगदीं अप्रधान होतात. ह्मणून प्राचीन भाषेचें ज्ञान

केवळ स्मरणशक्ति व विचारशक्ति यांच्या साहाय्यानें होतें. तसें चालू परभाषेचें होत नाहीं. मनुष्य परभाषेचे शब्द किंवा वाक्य उच्चारीत असतां त्याकडे प्रत्यक्ष पाहणें, त्याचा आविर्भाव लक्षांत आणणें, व त्याच्या शब्दांचा अर्थच नव्हे तर उच्चारही ध्यानांत ठेवणें, मग आपण तशाच क्रिया करून तेंच वाक्य उच्चारणें यांत इंद्रियांस फार अधिक काम आहे, व नेत्र, कर्ण आणि जिव्हा यांचा क्रमें-करून पुनःपुनः उपयोग करावा तेव्हां परभाषेचें स्वभाषेसारखें ज्ञान होण्याचा संभव आहे. जेव्हां मनुष्याच्या मनांत पदार्थ व त्याचें स्वभाषेंतील नांव पक्कें विंबलेलें असतें, तेव्हां प्राचीन भाषा शिकत असतां, केवळ त्या भाषेंतील व स्वभाषेंतील श-ब्दांचा संबंध जोडायाचा असतो, मग प्राचीन भाषेंतील शब्द येतांच त्याचा अर्थ ध्यानांत येतो. अर्वाचीन परभाषेचा स्वभाषेसारखा अभ्यास करणारास त्या भाषेंतील व स्वभाषेंतील शब्दांची नुसती सांगड घालून फायदा होत नाहीं, का-रण तो शब्द आला ह्मणजे त्याचा अर्थ ध्यानांत येईल खरा, परंतु पदार्थ पाह-तांच त्याचें स्वभाषेंतील नांव मात्र आठवेल, परभाषेंतील आठवण्यास फार प्रयास पडतील. ज्यांस इंग्रजी वोलण्याची संवय नाहीं, केवळ वाचून अर्थ समजून घेण्याची संवय आहे, ह्मणजे ज्यांचा इंग्रजीचा अभ्यास प्राचीन भाषेच्या अभ्या-साच्या धर्तीवर झालेला आहे, त्यांस या गोष्टीचा तेव्हांच अनुभव येईल. अशा लोकांची संख्या हल्लीं फार आहे, कारण हल्लींची इंग्रजी भाषा शिकण्याची प-द्धति प्राचीन भाषेस योग्य अशी आहे.

या सर्व गोष्टी मनांत आणून आरंभींचा इंग्रजीचा अभ्यास सुलभ करण्याची नवी पद्धति योजिली पाहिजे. या पद्धतीनें प्रथम जी गोष्ट साध्य झाली पाहिजे ती ही कीं, सात आठ वर्षांच्या मुलास स्वभाषेचें जितपत ज्ञान असतें व तो तिज-मध्यें जितपत वोलूं शकतो तितपतच इंग्रजीचें ज्ञान व इंग्रजी वोलण्याची शक्ति साधेल तितक्या लवकर इंग्रजी शिकणाऱ्या मुलांस यावी. नंतर पुढील इंग्रजी शिक्षण सर्व इंग्रजींतूनच देतां येईल, व स्वभाषेच्या शिक्षणाच्या पूर्वी सांगितलेल्या पद्धतीनें तें दिलें ह्मणजे उत्तम सिद्धि येईल. हा असा हेतु मनांत धरून पुढील पद्धति वर्णिली आहे. ती सिद्धीस जाते अशाविषयीं जे थोडे प्रयोग करून पा-हिले आहेत ते सांगण्यासारखे नाहींत. परंतु कित्येक युरोपियन भाषाभिज्ञांनीं याच जातीची पद्धति इतर अर्वाचीन भाषांस लाविल्यास चांगली सिद्धि येते असें अनुभवानें पाहिलेलें आहे. ही पद्धति येणेंप्रमाणें:—

मुलांस प्रथम अक्षरओळख करून दिल्यावर, अक्षरांपासून शब्द कसे उत्पन्न हो-तात, व त्यांचे उच्चार कसे करावे, याविषयीं सामान्य नियम सांगावे.

यानंतर पुरुषवाचक सर्वनामें व प्रश्नार्थक सर्वनामें सांगावीं व त्यांच्या विभक्ति सांगाव्या.

नंतर कांहीं दृष्टीसमोर असणाऱ्या पदार्थांचीं नांवें सांगावीं व त्यांचा उपयोग होईल

अशीं सकर्मक क्रियापदें सांगावीं. The या शब्दाचा सामान्य उपयोग सांगावा. व नामांचें अनेकवचन करण्याचा नियम सांगावा. सर्व शब्द, त्यांचीं वचनें, व अर्थ फळ्यावर लिहवून घ्यावे. पुढील सर्व क्रमांत याप्रमाणें फळ्याचा, शब्द आणि वाक्यें लिहिण्याकडे, होईल तितका उपयोग करावा. यापुढें पुरुषवाचक सर्वनामें कर्त्याच्या जागीं घालून तीन चार शब्दांचीं वाक्यें तयार करावीं व त्यांचा अर्थ सांगावा. सर्व पदार्थ वर्गांत असावे; जे पदार्थ वर्गांत ठेवण्यासारखे नसतील त्यांचीं मोठीं चित्रें असावीं. गुणवाचक शब्दांचा अर्थ दृष्टीनें ध्यानांत आणून देण्याकरितां रंगीत पदार्थ, वगैरे लागतील; आरंभीं हीं सर्व साधनें आवश्यकच समजावीं. **अर्थ होतां होईल तों घोकवून घेऊं नये.**

नंतर अकर्मक क्रियापदें घेऊन दोन तीन शब्दांचींच वरच्याप्रमाणें वाक्यें करावीं. येथपर्यंत स्वभाषेचा बराच उपयोग होण्यासारखा आहे. यापुढें तो व्याकरणाच्या धड्याच्या वेळीं मात्र अधिक करावा व बाकी धड्यांत फार कमी करावा.

सकर्मक व अकर्मक क्रियापदें घेऊन मुलांस उद्देशून आज्ञार्थक प्रयोगाचीं वाक्यें करावीं व दिलेल्या आज्ञा करवून घेत असतां 'होय, करतों' अशा अर्थाचीं मुलांकडून त्याच शब्दांत स्वार्थी प्रयोगानें उत्तरें घ्यावीं. उदा० 'Please, shut the door.' 'Yes Sir, I shut the door.' दार लावण्याची क्रिया करीत असतां मुलानें याप्रमाणें उत्तर दिलें पाहिजे. याप्रमाणें सांगितलेल्या सर्व पदार्थांचा व क्रियापदांचा अर्थ कृतीनें मुलांच्या मनांत भरवावा.

यापुढें भविष्यकाळ कसा करायाचा हें सांगून वर सांगितल्याप्रमाणें स्वार्थी व आज्ञार्थी वाक्यें करून घ्यावीं.

नंतर Do या क्रियापदाच्या साहाय्यानें प्रश्नार्थक वाक्यें करावीं व भविष्य किंवा वर्तमानकाळांत उत्तरें घ्यावीं.

हें इतकें ज्ञान उत्तम झाल्यावर संवादरूप दोन, चार, सहा वाक्यांचे समुदाय वाचनास द्यावे, व मुलांच्या जोड्या घेऊन ते वाचवावे. सर्व वाक्यें मुलांच्या दिनकृत्यांत उपयोगीं व संभाषणास लागणारीं असावीं. यापुढें शब्दांचा भरणा थोडा अधिक करावा, ह्मणजे अधिक नामें व क्रियापदें सांगावीं, त्यांमध्यें नेहमींच्या प्रचारांतील शब्द अधिकाधिक आणावे. पुढील सर्व धड्यांस संवाद जोडावे.

A, An या शब्दांचा उपयोग. To be या क्रियापदाचीं रूपें, त्याचा भविष्यकाळ; तत्संबंधी वाक्यें. नामांचा कर्त्याच्या जागीं उपयोग, प्रश्नार्थी आणि आज्ञार्थी वाक्यें. धातूंचा भूतकाळ, भूतकाळाचा वाक्यांत उपयोग.

To have या क्रियापदाचीं रूपें, त्यांचा उपयोग.

वर्तमानकालवाचक आणि भूतकालवाचक क्रियापदें अथवा विशेषणें (Being, been, इ०). त्यांचा वाक्यांत उपयोग.

नामांच्या विभक्ति; विभक्तिप्रत्ययार्थी शब्द. या संबंधानें स्वभाषा व इंग्रजी भाषा यांमधील भेद. पांच, सहा किंवा अधिक शब्दांचा वाक्यांत उपयोग.

विशेषणें व क्रियाविशेषणें. त्यांची जागा. वाक्यांत उपयोग. उभयान्वयी आणि उद्गारवाचक अव्ययें. सोप्या वाक्यांची रचना. गोष्टीच्या रूपानें तयार केलेले वाक्यसमुदाय.

यापुढें विध्यर्थाचे सोपे प्रकार. इ०, इ०.

या पद्धतीची वाचकांस कल्पना येण्यापुरता तिचा येथें उल्लेख केला. या पद्धतींत संवाद हें भाषाज्ञानाचें मुख्य साधन गणिलें आहे, ह्मणून तींस **संवादपद्धति** असें ह्मणतात. शिक्षकानें देशी भाषेचा होईल तितका कमी उपयोग करावा व पुढें पुढें त्यानें स्वतः किंवा मुलांनीं, इंग्रजी भाषेच्या शिक्षणाच्या काळांत, मुळींच देशी भाषेंत बोलूं नये. देशी भाषेच्या व्याकरणाचा विषय निघाला असतां त्या काळांत इंग्रजी व देशी भाषेच्या साम्याविषयीं किंवा भेदाविषयीं पाहिजे तर विवेचन करावें. लहान वाक्यांपासून आरंभ करून अखेरीं लांब वाक्यापर्यंत यावें, नंतर संयुक्त वाक्यें करवावीं, व याप्रमाणें फूल उमलावें तसें वाक्यांचे सर्व भाग परिपूर्ण करावे. या दृष्टीनें या पद्धतीस उद्भेदपद्धति असेंही कोणी ह्मणतात. इंग्रजी व्याकरणाचा जो भाग शिकवायाचा, त्याची आधीं देशी भाषेच्या व्याकरणासंबंधानें उत्तम समजूत पडलेली असणें आवश्यक आहे. त्यायोगें इंग्रजी शिक्षणाच्या वेळीं व्याकरणाच्या पुष्कळ नियमांचें विवेचन करण्याची जरूर रहात नाहीं. हल्लीं इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत जीं इंग्रजी क्रमिक पुस्तकें चालतात, त्यांमध्यें जे वारंवार उपयोगांत येणारे शब्द असतात, ते सर्व येईपर्यंत व तसेंच सोप्याशा एखाद्या इंग्रजी व्याकरणांतील सर्व विषय संपेपर्यंत या पद्धतीनें शिक्षण दिलें पाहिजे, ह्मणजे तें लहान मुलाच्या देशी भाषेच्या ज्ञानाइतकें होईल. चांगलीं योग्य क्रमिक पुस्तकें तयार केल्यास एवढें इंग्रजीचें ज्ञान वारा वर्षांच्या मुलांस दोन वर्षांत देतां येईल. तिसरे वर्षीं मोठी परंतु सोपी अशी एखादी सुरस गोष्ट मुलांकडून वाचवावी व शुद्ध व्याकरणावरील एखादा सोपा ग्रंथ शिकवावा. असें करण्याचा उद्देश हा कीं, इंग्रजी भाषेंतील विशेष उपयोगी अनियमित प्रयोग (इडियमा वगैरे) व व्याकरणाचीं इंग्रजीच्या द्वारें समजूत, व राहिलेसाहिले किरकोळ विषय संपावे, व मुलांस सोपीं पुस्तकें स्वतः वाचून चटकन् अर्थ ध्यानांत आणण्याची संवय लागावी. चौथी इयत्ता संपेपर्यंतचा इंग्रजी भाषाविषयाचा अभ्यास याप्रमाणें तीन वर्षांत व्हावा, असा अदमास आहे; व जो होईल तो अधिक व्यवहारोपयोगी होईल हेंही स्पष्ट आहे. यापुढें सर्व शिक्षण साधेल तर इंग्रजीच्याच द्वारें द्यावें. मराठींतून शिकविणें झाल्यास विशेष विचाराचे मात्र विषय शिकवावे, व ते पुनः सबंध इंग्रजींतून शिकवावे. सारांश, पुढें पुढें होतां होईल तों देशी भाषेप्रमाणेंच इंग्रजीचा उपयोग करावा.

(३) प्राचीन भाषा. भाषांतरपद्धति होय. हल्लीं ज्या रीतीनें इंग्रजी व संस्कृत शिकवितात ती सतें तेव्हां प्राचीन भाषेचा या पद्धतीनें फार लवकर अभ्यास होतो. ह्मणून संस्कृत शिकणारानें तें मराठींतून शिकावें. मराठींत व संस्कृतांत केवढें साम्य आहे हें सांगायास नकोच. भाषांतरपद्धतीनें दुसरी भाषा शिकण्यास एक गोष्ट आवश्यक असते ती ही कीं, ज्या भाषेंत भाषांतर करायाचें ती उत्तम अवगत असली पाहिजे, ह्मणजे मग नवीन जी भाषा शिकायाची तिचें मर्म कळतांच तें भाषांतरांतही तसेंच आणितां येतें, व त्यामुळें आनंद होऊन तें मर्म मनांत विवतें. संस्कृत पद्यांचीं इंग्रज लोकांनीं केलेलीं भाषांतरें व इकडील विद्वानांनीं इंग्रजींत केलेलीं भाषांतरें कोणी वाचून तुलना केल्यास, कवीचें हृद्गत जसें इंग्रजांच्या भाषांतरापासून लक्षांत येऊन आनंद होईल तसा आनंद एतद्देशीयांच्या इंग्रजी भाषांतरापासून होणार नाहीं. कारण कवीचें हृद्गत ध्यानांत आलें तरी तें परभाषेंत वठवितां येत नाहीं; भाषांतरास आरंभ करितांच शब्दास प्रतिशब्द घालावयाची स्फूर्ति होते, व भाषांतर ह्मणजे केवळ पर्यायशब्दांची एक रचना होते. हल्लीं संस्कृत भाषा इंग्रजींतून शिकवितात तिचा हा असा परिणाम होतो; कांहीं दिवसांनीं संस्कृताचाही वीट येतो, तेंही समजेनासें होतें; व प्राचीन भाषा शिकण्याचे जे उद्दिष्ट हेतु ते मुळींच साध्य होत नाहींत. सर्वत्र अशी स्थिति दिसते, परंतु इंग्रजींतून संस्कृत शिकविण्याचा क्रम मात्र बंद होत नाहीं. व्याकरणाचे अ-संख्य नियमही इंग्रजींतून शिकविले जातात, व ते शिकविण्यांतच सर्व वेळ गेल्यानें भाषांतरपद्धतीस अत्यंत निंद्य स्वरूप येतें. मग हें व्याकरण केव्हां जाईल व हें संस्कृतही केव्हां जाईल अशी विद्यार्थ्यांची स्थिति होते ! आश्चर्य हें कीं, हीच पद्धति देशी भाषेंतून संस्कृत शिकविण्यास ट्रेनिंग कॉलेजांत लाविली जाते, व तिचेही तसेच परिणाम होतात, तथापि ती न बदलण्याविषयीं आग्रह आहे व अरसिक व अल्पश्रुत शिक्षक देशभर पाठविले जात आहेत! इंग्रजी भाषेस हीच पद्धति लावल्यानें असेच दुष्परिणाम होत आहेत, एवढेंच कीं इंग्रजीकडे शिक्षणाचा पुष्कळच वेळ दिल्यामुळें संस्कृतापेक्षां अधिक वाचून होतें, व पर्यायशब्दांनीं भाषांतर करण्याचें अधिक सुलभ केलें जातें. परंतु संस्कृत किंवा इंग्रजी ग्रंथांचें हृद्गत समजण्याची योग्यता फारच थोड्या, अत्यंत बुद्धिमान् विद्यार्थ्यांस, मात्र येते. या गोष्टींचीं थोडीं थोडीं प्रत्यंतरें पूर्वी कांहीं ठिकाणीं सांगितलींच आहेत.

मध्यम प्रतीच्या शाळांमध्यें प्राचीन भाषा शिकवाव्या कीं नाहीं या प्रश्नाविषयीं गेल्या तीस चाळीस वर्षें युरोपांत मोठा वादविवाद चालला आहे, व त्याचा अद्याप तिकडेही निकाल नाहीं. अमेरिकेंत प्राचीन भाषांचें महत्व वरेंच कमी झालें आहे व युरोपांत होत आहे, यावरून या प्रश्नाचा अखेरीस कसा निकाल

लागेल तें दिसत आहे. प्राचीन भाषा मध्यम शिक्षणांतून कमी करण्याची आवश्यकता प्रथम दिसूं लागण्याचें कारण असें झालें कीं, महत्वाचे शास्त्रीय विषय शिकविण्यास शाळांमध्यें संधी मिळेना, व व्यवहारांत त्यांचें ज्ञान प्राचीन भाषेच्या ज्ञानापेक्षां ज्या त्या कामीं अधिक लागूं लागलें. यामुळें शास्त्रांचा अभ्यास शाळाक्रमांत शिरलाच, व त्यास जागा करितांना प्राचीन भाषांस कमी अधिक प्रमाणानें बाहेर काढणें भाग झालें. शाळेमध्यें शास्त्रीय ज्ञान जितकें अधिक देण्याचें आरंभावें तितका प्राचीन भाषांचा अभ्यास संपुष्टांत आणणें भाग पडणारच, तथापि त्यांस जो थोडा अवकाश मिळेल त्यांत त्यांच्या अभ्यासापासून उत्कृष्ट गणिलेले फायदे होतील तितके साध्य करून घेणें अवश्य आहे, व या हेतूनें प्राचीन भाषांचा शाळेंत अभ्यास आरंभावा.

प्राचीन भाषांच्या अभ्यासापासून जे फायदे होतात ते मुख्यत्वेंकरून पुढें सांगितलेले होतः (१) देशी भाषेची व्युत्पत्ति व व्याकरण चांगलें समजतें; (२) देशी भाषेंत नवीन शब्दांची उत्पत्ति करण्याचीं साधनें मिळतात; (३) प्राचीन भाषांच्या व्याकरणाच्या अभ्यासानें निर्णय आणि अनुमान या मानसिक क्रिया उत्तम प्रकारें करण्याची बुद्धीस संवय लागते; (४) प्राचीनांचा अनुभव, त्यांचे विचार, त्यांच्या उत्कृष्ट कल्पना, मुळांतून जशा ध्यानांत येतील तशा भाषांतरांतून येणार नाहींत व तसा आनंदही होणार नाहीं; (५) कित्येक शास्त्रांचें मूळ व त्यांवरील विवेचनें प्राचीन भाषांतूनच वाचणें जरूर आहे; कारण त्यांचीं भाषांतरें करून तीं सर्वांस उपलब्ध करावीं इतकें त्यांचें महत्व नाहीं व खपही नाहीं. मध्यम प्रतीच्या शाळेंत संस्कृताचा जो अभ्यास करायाचा तो वरील सर्व फायदे विद्यार्थ्यांस शाळेंतच प्राप्त करून द्यायाचे म्हणून नाहीं, तर ते प्राप्त करून घेण्याची योग्यता त्याच्या अंगीं आणायाची, व त्यास या विषयाची अशी अभिरुचि लावायाची कीं, तिजमुळें त्यानें जे इष्ट दिसतील ते फायदे पुढें करून घ्यावे. कोणी नुसता विचारशक्तीस संस्कार देणारा असेल तो व्याकरण शिकेल, कोणी गणिती असेल तो ज्योतिष पाहील, तर्कशास्त्री असेल तो न्याय शिकेल, वैद्य असेल तो वैद्यकग्रंथ वाचील, व सर्व जन काव्यालंकार आणि सुभाषितें शिकतील. **संस्कृताची गोडी उत्पन्न करणें, त्याच्याद्वारें महत्वाचें ज्ञान होईल अशी समजूत पाडणें, व तें ज्ञान आनंद आणि श्रेष्टता देणारें आहे अशी खात्री करणें, या दृष्टीनें संस्कृताचा मध्यम प्रतीच्या शाळांत व ट्रेनिंग कॉलेजांत अभ्यास करविला पाहिजे.** कामापुरतें व्याकरण शिकवावें व उत्तम विचार आणि कल्पना येण्यासारखें वाचन होईल तितकें करून घ्यावें, म्हणजे हा हेतु सफळ होईल. देशी भाषेचें व्याकरण चांगलें यावें, इंग्रजीचे व संस्कृताचे आवश्यक व्याकरणभाग यावे, आणि वाचन पुष्कळ व्हावें.

पूर्वी सांगितल्या प्रकारांनीं देशी भाषेचा, इंग्रजीचा व संस्कृताचा कोठपर्यंत

अभ्यास करायाचा? व्याकरणज्ञान कामापुरतें होऊन सुलभ ग्रंथ आपोआप समजूं लागे-पर्यंत. यानंतर सर्वच भाषांचा अभ्यास अधिक महत्वाच्या उद्देशानें केला पाहिजे. तो उद्देश हा कीं भाषेंतील मर्म कळावें; जी गोष्ट लिहायाची ती वाचकांच्या मनावर विंववि‌ण्याकरितां उत्तम ग्रंथकार कशी वाक्यरचना व विषयरचना करितात हें लक्षांत यावें; त्यांच्या उपमा, उत्प्रेक्षा, व इतर आलंकारिक उक्ति कोणत्या अवलोकनांवर अवलंबून आहेत, त्या कितपत साहजिक आहेत किंवा अतिशयोक्तिपर आहेत, त्या योगें मनास किती आनंद होतो, त्यांपासून उपदेश काय व्यायाचा, इत्यादि सर्व प्रकार विद्यार्थ्यांस कळावे; व शब्द आणि त्यांचें व्याकरण यांच्या पलीकडे कल्पना जाऊन भावार्थाकडे अधिक लक्ष लागावें, हें भाषाशिक्षणाचें खरें चीज होय. तांत्रिक ज्ञान आणि व्याकरण हें आधीं तयार होतांच शिक्षकानें या पुढच्या वरिष्ठ उद्योगास लागलें पाहिजे. नाहीं तर शेवटपर्यंत व्याकरणच चालतें, मुलांस भाषेचा वीट येतो, व हल्लींसारखा निष्फळ अभ्यास मात्र पदरीं पडतो.

(४) इतिहास. मनुष्याचें ज्ञान होतां होईल तों स्वतःच्या अनुभवानें, व अवलोकनानें, व विचारानें उत्पन्न झालेलें असावें ही गोष्ट खरी, परंतु कांहीं आवश्यक ज्ञान या रीतीनें वेळीं मिळण्याचा संभव नाहीं, व कांहीं सर्व आयुष्यभर अवलोकन करूनही यावयाचा संभव नाहीं. धर्म आणि नीति यांचें ज्ञान प्रेरणेनें देण्याचें कारण, सदाचाराची वेळींच संवय लागण्यास असें करणें आवश्यक आहे हें होय. इतिहासाचें ज्ञान प्रेरणेनें, ह्मणजे दुसऱ्यांच्या अनुभवावरून, देण्याचें कारण हें कीं तें एका संबंध आयुष्यांत देखील प्राप्त होण्यासारखें नाहीं, परंतु व्यावहारिक, सामाजिक आणि राजकारणी कर्तव्यें करण्याची आवश्यकता मनुष्य कर्तेपणाच्या स्थितींत येतांच उत्पन्न होते. इतिहासकारांनीं ज्या गोष्टी घडल्या त्यांचें यथावत् केलेलें वर्णन वाचून जो उपदेश मिळतो व कर्तव्यास जी सुदिशा लागते ती या कारणानें आवश्यकच आहे. सामर्थ्याची, व सदाचाराची व ऐक्याची योग्यता कळण्यास; जातिस्वभाव, धर्म, नीति, लौकिकरूढि, कायदे व राज्यव्यवस्था यांच्या भिन्न प्रकारांचे वरे वाईट परिणाम लक्षांत येण्यास; व भिन्न देशांच्या इतिहासांत कोणत्याही सामाजिक व राजकीय बाबतींत सुधारणा किंवा हानि होण्यास कोणत्या गोष्टी कारण झाल्या, व उत्कर्षाचे व अपकर्षाचे मार्ग आणि साधनें कोणतीं होतीं, हें समजण्यास इतिहासाचें ज्ञान उपयोगीं पडतें. प्राथमिक शाळांत इतिहास उपदेशाच्या हेतूनें शिकवावा. स्वदेशांतील उत्कृष्ट पुरुषांचीं चरित्रें व नंतर परदेशांतील तशाच पुरुषांचीं चरित्रें सांगावीं, व त्यांची योग्यता, त्यांचे उद्गार, त्यांनीं केलेली देशसेवा व देशावर तिचे चांगले परिणाम, या गोष्टी प्रथम लहानपणीं मुलांस शिकवाव्या, व 'आम्हीही तसेंच होण्याचा प्रयत्न करूं' असा उत्साह व तशीच महत्वाकांक्षा त्यांच्या हृदयांत उत्पन्न करावी. मध्यम शिक्षणाच्या

खालच्या वर्गांत, म्हणजे मुलें इंग्रजी चौथी किंवा पांचवी इयत्ता संपवीपर्यंत, त्यांस इतिहासांतील कांहीं ठळक ठळक महत्वाच्या काळांचें ज्ञान द्यावें; व हे काळ असे निवडून काढावे कीं, कांहीं सामाजिक व राजकारणी तत्वें कार्यकारणरूपानें कशीं लागू होत आलीं व देश कसा उत्कृष्ट किंवा निकृष्ट स्थितीस येत गेला हें त्यांवरून समजावें. या पुढील काळांत कोणतेही एक दोन देश घेऊन त्यांच्या इतिहासाच्या महत्वाच्या काळांत त्याच महत्वाच्या तत्वांचा अंमल दाखवावा. शिक्षणशास्त्रकारांनीं याप्रमाणें इतिहासाचें शिक्षण व्हावें म्हणून सर्वत्र सांगितलेलें आहे. घडलेल्या गोष्टी व त्यांपासून निघणारीं अनुमानें, व सिद्ध होणारे सिद्धांत जर क्रमानें विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबले नाहींत तर इतिहासाचें शिक्षण व्यर्थ होय; अमुक अमुक घडलें एवढेंच कळून उपयोग काय? स्वतःच्या आयुष्यक्रमांत अमुक काळीं अमुक घडलें, हेंही कोणी मोठ्या कष्टानें ध्यानांत ठेवीत नाहीं, तर दुसऱ्यांच्या चरित्रांतील गोष्टी ध्यानांत ठेवून त्यास कोणता फायदा होणार? म्हणून घडलेल्या गोष्टी प्रमाणरूप आहेत, त्यांपासून अमुक अनुमानें व सिद्धांत निघतात हें जर शिकविलें नाहीं, तर नुसतीं प्रमाणें तेव्हांच विसरून जातील.

प्राथमिक शाळेंत व इंग्रजी शाळांच्या खालच्या वर्गांत देशी भाषेंतून इतिहास शिकवावा व इतिहासाचीं पुस्तकें वाचनाच्या क्रमिक पुस्तकांप्रमाणें असावीं. भावार्थाचा बोध होऊन अनुमानें व सिद्धांत ध्यानांत येण्यास भाषेची अडचण असूं नये. नाहीं तर भाषा कळून गोष्टी ध्यानांत ठेवण्यांतच सर्व वेळ जातो. या दृष्टीनें लिहिलेल्या ऐतिहासिक पुस्तकांची भाषा उत्तम असावी, लेखांचें सार ध्यानांत येऊन तें तेव्हांच मनांत बिंबावें, व अशा ग्रंथांचें वाचन पुनः पुनः केलें तरी त्यांत गोडी लागावी, कांहीं नवीन विचार किंवा कल्पना मनांत याव्या, त्याविषयीं प्रश्न विचारण्याची विद्यार्थ्यांस हौस उत्पन्न व्हावी व अशा जिज्ञासेमुळें विषयांचा पुढें अभ्यास कायम राहील अशी तजवीज व्हावी. आपण कांहीं विवक्षित सामाजिक व राजकारणी तत्वें सिद्ध करीत आहों, असें लक्षांत धरून सर्व ऐतिहासिक गोष्टी सांगितलेल्या असाव्या; व तीं तत्वें मुलांस कळण्यासारखीं सोपीं असावीं.

(५) **भूगोल व ज्योतिष.** मध्यम प्रतीच्या शिक्षणांत या विषयांच्या ज्या भागांचा समावेश केला जातो ते भाग अवलोकन आणि कल्पनाशक्ति यांची योग्य वृद्धि करण्याच्या हेतूनें शिक्षणक्रमांत घातलेले असतात. मुलांस स्वतःच्या घराच्या किंवा शाळेच्या जागेची कल्पना यावी व दिशां कळाव्या. या कामास त्यांजवळ घड्याळाच्या सांखळीस असतें त्या प्रकारचें एक लहान होकायंत्र असावें. हें दोन चार आण्यांस मिळतें. दिशांचा बोध झाल्यावर उपदिशा सांगाव्या; नंतर शाळेच्या भोंवतालचे रस्ते कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे जातात, आपल्या घराच्या कोणत्या दिशेस शाळा आहे, वगैरे गोष्टी मुलांस स्वतः पाह-

ण्याची संवय लावावी. यानंतर शहराचा नकाशा त्यांच्या ध्यानांत येईल; मग शहरास निरनिराळ्या दिशांनीं येणारे रस्ते व ते कोणीकडून येतात तें समजावून द्यावें. मोठ्या मैदानांत उभें राहिलें तरी क्षितिजापलीकडचें कांहींही दिसत नाहीं ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आणून द्यावी; व प्रत्येकाचे आप्त, इष्टमित्र कोणकोणत्या ठिकाणीं आहेत हें विचारून ते दूर आहेत म्हणून दिसत नाहींत, ते आहेत तेथेंही पृथ्वी आहे, तिचा विस्तार मोठा आहे, इंग्रज लोकांच आप्त एतद्देशीयांच्या आप्तांहूनही फार दूर ठिकाणीं आहेत, व याप्रमाणें अमुक जातीचे लोक अमुक इतक्या अंतरावर आहेत, इत्यादि गोष्टी सांगत सांगत पृथ्वीच्या आकाराची कल्पना आणून द्यावी. मग पृथ्वी गोलाकार आहे व तिचें स्वरूप कृत्रिम गोलानें दाखवितां येतें, या गोष्टीची समजूत पाडावी. मुलांनीं प्रवास केलेला असल्यास त्यांस स्थलांच्या अंतरांची कल्पना असते; तीं प्रवासास जाणारीं असल्यास व त्यांचें होकायंत्र त्यांजवळ असल्यास आपण आतां अमुक दिशेस चाललों आहों, इतकें अंतर आलों, अमुक गांव दिसत होतें तें नाहींसें झालें, अमुक दिसूं लागलें, इत्यादि अनेक अवलोकनें तीं करितील. कल्पनाशक्तीनें स्थलांमधील अंतर व भूपृष्ठाचा विस्तार वाढवून भूगोलाची कल्पना आल्यावर भूगोलविषयक उपयुक्त माहिती द्यावी, व सुप्रसिद्ध स्थलांचें वर्णन, लोकांचें वर्णन रीतीभातींचें वर्णन, वगैरे देऊन कल्पनेस अधिकाधिक पुढें जायास लावावें, योग्य वेळीं नकाशांची माहिती करून द्यावी; व अक्षांश रेखांशांचा उपयोग सांगावा. फार प्रसिद्ध स्थलें नुसत्या अवलोकनानें व कोणतेंही स्थळ अक्षांश रेखांश कळल्यावर, नकाशावर किंवा गोलावर दाखवितां येऊं लागलें म्हणजे भूगोलाचें पुष्कळ ज्ञान झालें.

भूगोल हा अवलोकनाचा विषय असून त्याचा शिक्षक दुरुपयोग करितात ही गोष्ट जगभर प्रसिद्ध आहे. याप्रमाणें शिक्षण व्यर्थ जाऊं नये म्हणून अमेरिका व इतर कांहीं ठिकाणीं आरंभापासूनच (म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या इयत्तेपासून) भूतलविद्येचा (Physical Geography) अभ्यास भूगोलास जोडण्याची योजना शिक्षणक्रम ठरविणारांनीं केलेली आहे. मुलांच्या पाहण्यांत नद्या, तळीं, डोंगर, वगैरे आलेलीं असतात. नद्या कशा उत्पन्न होतात, ओढे कसे उत्पन्न होतात, नदीचें पात्र रुंद किंवा अरुंद कसें होतें त्याची पातळी खोल कां असते, त्यांत वाळू कोठून येते, डोंगरावर ओहोळ कसे उत्पन्न होतात; इत्यादि अनेक अवलोकनें भूतलविद्येच्या द्वारें करितां येतात; व हा विषय भूगोलावरावरच शिकविला पाहिजे; तो फार मनोरंजक आहे.

जसें आपणांस खालीं भूपृष्ठ आहे तसें वर आकाश आहे. त्यांतही अवलोकन करण्यासारखें पुष्कळ आहे. सूर्य, चंद्र, प्रमुख ग्रह व तारे हे पाहिल्यानंतर त्यांच्या गति लक्षांत आणाव्या. या कामासही होकायंत्र पाहिजे. पुष्कळ कॉलेजांतील वि-

द्यार्थ्यांस सूर्य पूर्वेकडे उगवतो व पश्चिमेकडे मावळतो एवढेंच माहीत असतें, परंतु त्यांस दक्षिणायन व उत्तरायण यांमध्यें सूर्याच्या उदयास्तस्थानांत मोठा फरक पडतो हें माहीत नसतें; सूर्योदयाचीं सर्व स्थानें पूर्वदिशा व अस्तस्थानें पश्चिमदिशा असा त्यांचा ग्रह असतो. वद्यपक्षांत चंद्र पूर्वेस उगवतो हें त्यांनीं पाहिलेलें असतें, परंतु शुक्लपक्षांत तो कोठें उगवतो हें त्यांस माहीत नसतें. चंद्रासही दक्षिणायन व उत्तरायण आहे ही कल्पना त्यांनीं एकलेलीही नसते. याप्रमाणेंच अयनभेदानें घरांत दुपारीं ऊन्ह व रात्रीं चांदणें निरनिराळ्या दिशांनीं पडतें, सावली निराळ्या दिशेस जाते, वगैरे अगदीं उघड गोष्टी त्यांस माहीत नसतात; मग तारे पाहून दिशा ओळखणें, शुक्रोदयावरून रात्रीचा अदमास करणें, वगैरे गोष्टी लांबच राहिल्या. याप्रमाणें या गोष्टी खऱ्या आहेत कीं नाहींत याविषयीं सर्वांनीं अनुभव पहावा. खगोलाचें अवलोकन व्हावें ह्मणून ज्योतिषाचा शिक्षणक्रमांत समावेश केला आहे, परंतु सर्वत्र त्याची हेळसांड होत आहे; व ही गोष्ट ट्रेनिंग कॉलेजांसही लागू आहे. भावी शिक्षक अवलोकनविषयांत शून्य मार्क मिळविणारे असतात !

जें ज्ञान प्रत्यक्ष ह्मणून भासतें तें वारंवार अयथार्थ असतें. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणतेंही ज्ञान असो, त्यापैकीं जें एकंदर सर्व अनुभवांशीं व अनुमानांशीं उत्तम प्रकारें जुळेल तेंच खरें, ही गोष्ट मनांत ठसविण्यास ज्योतिषासारखा दुसरा विषय नाहीं. तसेंच इतर विषयांच्या अभ्यासानें मनुष्याच्या मनास एक प्रकारचा माद येतो. मनुष्य पृथ्वीचा व चराचराचा मालक, मनुष्याकरितां सर्व सृष्टि आहे, मनुष्यास जें इष्ट किंवा आवश्यक नाहीं तें क्रमानें दोषरूप किंवा व्यर्थ होय, असें मनुष्यास वाटूं लागतें. कित्येक व्यक्तींस इतका माद भरतो कीं त्यांस ईश्वर देखील मानवी समाजाकरितांच हवा असें वाटून त्यास राखणें इष्ट आहे असें ते प्रतिपादन करितात; मग कित्येकांस तोही नकोसा होतो, व कित्येकांस अनुकूळ वास्थितीमुळें 'मनुष्यांत मनुष्य मीच, मजकरितां सारें' असा भास होतो. ज्योतिष व भूस्तरविद्या यांच्या अभ्यासानें हा मनुष्याचा माद उतरतो. तसेंच शरीरसामर्थ्याहून कल्पनासामर्थ्य अधिक दुर्लभ आहे, ही गोष्टही ज्योतिषाच्या अभ्यासानें ध्यानांत येते. सूर्याची (भासमान) दैनंदिन गति बंद करून त्यास स्थिर करणें व पृथ्वीचें (भासमान) स्थैर्य मोडून तिला सूर्याभोंवतीं फिरायास लावणें, हें केवळ बाहुबलानें होण्यासारखें असतें तर तें घडवून आणण्याचा अनेक सामान्य जनांनींही प्रयत्न केला असता; परंतु जगाच्या आरंभापासून ख्रिस्ती शकाच्या पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत बुद्धि आणि विवेक यांच्या जोरानें वर सांगितल्याप्रमाणें खरी स्थिति आहे अशी ज्यांस केवळ कल्पना करितां आली, अशीं माणसें सर्व इतिहासांत पांच चारही सांपडत नाहींत. ह्मणूनच चीनची प्रसिद्ध भिंत इजिप्त देशांतील थोरले मनोरे, वगैरे बाहुबलाचीं प्रचंड कामें फार प्राचीन काळ

घडलीं; परंतु ज्योतिःशास्त्राच्या खऱ्या कल्पना येऊन अद्यापि फार वर्षें झालीं नाहींत व हल्लीं देखील त्या प्राप्त करून घेण्याचें थोड्यांसच साधतें.

या सर्व गोष्टी ध्यानांत आणून, भूगोलखगोल व भूतलविद्या शिकविणारानें जे उद्देश डोळ्यांपुढें ठेवायाचे ते असे असावे कीं, मुलांचें अवलोकन व कल्पना वाढवायाची, त्यांस दिग्विस्ताराचें ज्ञान आणून द्यायाचें, सृष्टींतील कांहीं महत्वाचीं कार्यें व गति समजावून द्यायाच्या, व सृष्टींत मनुष्याची योग्यता किती व त्याचा पराक्रम किती हें ध्यानांत आणून द्यावयाचें. या हेतूनें भूगोलविषयक जीं क्रमिक पुस्तकें शिकवायाचीं तीं भाषाविषयाच्या किंवा इतिहासाच्या पुस्तकांप्रमाणें उत्तम मनोरंजक भाषेंत लिहिलेलीं असावीं, व तीं एकदा समजावून दिल्यावर कोणाही मुलास पुनः वाचतांच समजून आनंद व्हावा. याप्रमाणें हल्लीं इंग्लंडांत प्रयत्न सुरू आहे.

(६) **शास्त्रीय विषय** (रसायन, पदार्थविज्ञान, वगैरे.) अवलोकन व विचार करण्याची संवय व्यवस्थित व योग्य नियमांप्रमाणें लावणें व या द्वारें कांहीं अत्यंत आवश्यक व्यावहारिक ज्ञान मनुष्यास करून देणें, हा शिक्षणक्रमांत शास्त्रीय विषय घालण्याचा प्रमुख हेतु होय. अवलोकनानें कांहीं गोष्टी ध्यानांत येतात, त्यांचा कांहीं एक कार्यकारणभावही लक्षांत येतो, व तो खरा कीं खोटा याविषयीं साहजिक शंका येते. अनेक अवलोकनें केल्यावरोवर कल्पनेनें 'या कारणानें हें होत असेल' असें साहजिक वाटतें, परंतु खात्री कशी व्हावी? खऱ्या खोट्याचा निर्णय करण्यास व खरा कार्यकारणभाव ठरविण्यास, विशेष प्रयोग करून अनुभव घेतला पाहिजे. सर्व शास्त्रांत प्रयोग आवश्यक आहेत, शिक्षणविषयांत देखील प्रयोग पाहिजेतच, व हे प्रयोग कसे योजावे, व्यावहारिक अनुभवाप्रमाणेंच कृत्रिम अनुभव कसे मिळवावे, प्रयोगापासून सिद्धांत होण्यास कोणत्या शर्तीं पाळल्या पाहिजेत, इत्यादि गोष्टी शास्त्राभ्यासानें कळतात; शिवाय त्यापासून जें उपयुक्त ज्ञान होतें तें हरप्रसंगीं उपयोगीं पडतें. शास्त्रीय विषय शिकविणारानें प्रथम आरंभिलेल्या धड्यांत जो विषय असेल त्यासंबंधाचीं अनेक साहजिक अवलोकनें व अनुभव लक्षांत आणून द्यावे. मग कल्पनेस त्यांच्या कोणतीं कारणें सुचतात तीं विचारावीं; त्या अवलोकनांपासून खरे खोटे कोणकोणते ग्रह स्वाभाविकपणें उत्पन्न होतात ते सांगावे; प्रयोग कशाकरितां करायाचे हें दाखवावें, व प्रयोगानें अमुक दिसल्यास अमुक अनुमान किंवा सिद्धांत काढणें जरूर होईल असें लक्षांत आणून देऊन प्रयोग करावा. प्रयोग फसणार नाहीं, त्यानें खोटा भास किंवा घोटाळा उत्पन्न होणार नाहीं, अशाविषयीं फार काळजी घ्यावी. कांहीं शास्त्रविषय याप्रमाणें शिकवून झाल्यावर अनेक भिन्न भिन्न दिसणाऱ्या गोष्टी कशा एकाच नियमान्वयें घडतात हें सांगावें; व अनेक अवलोकनांची व्यवस्था लावणें, त्यांस एकाच नियमाखालीं आणणें, त्या नियमान्वयें 'अमुक केल्यास अमुक होईल' असें भविष्य करणें, व हें भविष्यज्ञान उद्योगधं-

घांच्या व भौतिक शक्ति मानवी कार्यांस जोडण्याच्या कसें कामीं पडतें हें अनेक उदाहरणांनीं दाखवावें. याप्रमाणें करीत गेल्यास शिक्षण चांगलें मनावर बिंबेल व त्याचा उपयोगही होईल. वरील क्रमास अनुसरून शास्त्रीय विषय लिहिलेला असावा.

(७) **चित्रकला व संगीत.** चित्रकला हा विषय सर्व अमेरिकन शाळांमध्यें पहिल्या इयत्तेपासून शेवटच्या इयत्तेपर्यंत शिकवितात; इंग्लंडांत तो इतक्या पूर्णपणें शिकवीत नाहींत, फ्रान्स व जर्मनीमध्यें त्याचा इंग्लंडपेक्षां अधिक अभ्यास करवितात; व सर्व युरोप व अमेरिका खंडांत असें मत झालें आहे कीं प्राथमिक शिक्षण उत्तम होण्यास शिक्षकांस तरी निदान चित्रकला किंवा ड्राइंग आलें पाहिजे. जर्मनींत ट्रेनिंगच्या विद्यार्थ्यांस तिन्ही वर्षें ड्राइंगचा अभ्यास करावा लागतो, इतर युरोपीय देशांत पुष्कळ अंशीं अशीच स्थिति आहे; परंतु आमच्या ट्रेनिंगच्या अभ्यासांत हा विषय मुळींच नाहीं, व कोणी क्वचित् तो स्वेच्छेनें घेतल्यास त्यास उत्तेजन नाहीं. ही न्यूनता शिक्षणखात्याचे अधिकारी जितक्या लवकर दूर करितील तितकें देशाच्या फायद्याचें आहे. ड्राइंग हा अवलोकन शिकविण्याचा विषय आहे. आपण पहातों तें आपणांस कसें दिसतें तें प्रत्यक्ष काढणें व या चित्रावरून पाहिलेल्या गोष्टींचा दुसऱ्यांस बोध करून देणें, हें बराबर पाहिल्याचें उत्तम प्रमाण होय. बरावर पाहतां येण्याची विद्या फार महत्वाची आहे. प्रथम सोप्या आकृति पाहून काढणें, नंतर कठीण आकृति काढणें, नंतर यांत्रिक रीत्या आकृति काढणें, नंतर छाया आणि उजेड यांचा भेद जाणणें, रंगांचे गुण जाणणें, व अखेरीस मनुष्यांच्या, पशूंच्या व निर्जीव सृष्टीच्याही चेष्टा व मुद्रा ओळखणें, हास्यकारक काय, उल्हासकारक काय, उदात्त काय, सुंदर काय, भेसुर काय, इत्यादि जाणणें, व नंतर कल्पनेनें यांच्या निरनिराळ्या रचना करणें हें उत्तम चित्रकलेनें साध्य होतें. ज्याप्रमाणें अलंकार व कविता यांचा अभ्यास कवित्व अंगीं यावें म्हणून नव्हे, तर अभिरुचि अंगांत यावी म्हणून असतो, त्याप्रमाणेंच चित्रकलेचा अभ्यास उत्तम चित्रें काढतां यावीं म्हणून करविणें शक्य नाहीं, परंतु यथावत् अवलोकन करणें, नुसत्या चित्रांवरून किंवा नकाशांवरून सर्व योजना कळणें, व उत्तम चित्रकाऱ्यांचीं कामें, फोटोग्राफ, वगैरे पाहतांच त्यांचा अभिरुचिपूर्वक भाव ओळखणें, हें चित्रकलेच्या अभ्यासानें शक्य असतें. डोळ्यांस जसें शिक्षण होतें तसेंच हातांसही होतें, व हें शिक्षण कलाकौशल्याच्या व धंद्याच्या शिक्षणांत फार महत्वाचें समजतात, ही गोष्ट सर्वांस माहीत असेलच. अमेरिकन शिक्षक ड्राइंगच्या द्वारें सर्व शिक्षण कसें सुलभ करितात याविषयीं इंग्रजांच्याच ग्रंथांवरून कोणासही माहिती मिळवितां येईल. अमेरिकेच्या प्राथमिक शाळांत अवलोकनाच्या द्वारें सर्व शिक्षण कसें देतात, हेंही शोधक वाचकानें समजून घ्यावें. या कामास फळे पुरेनासे झाल्यामुळें वर्गाच्या निम्मे भिंती फळ्यासारख्या करून काळ्या रंगविण्याचा तिकडे प्रघात सुरू झाला आहे.

संगीताचें तांत्रिक ज्ञान अभिरुचि आणि आनंद वाढविण्याकरितांच आहे, व कंठ आणि कान यांस त्या योगें योग्य शिक्षण मिळून फार उपयोग होतो.

(८) **गणित.** हा विषय शुद्ध विचाराचा आहे. कांहीं गणितसिद्धांत अगदीं सोपे आहेत व ते अगदीं लहान मुलांसही समजण्यासारखे आहेत. लांपासून उत्तरोत्तर अधिक गहन सिद्धांत समजून देण्याचा क्रम असला पाहिजे. ज्या विषयाचीं तत्त्वें सांगण्यास व सिद्ध करण्यास भाषाज्ञान व अनुभव अधिक लागतो ते विषय मागून घ्यावे; ह्मणजे आधीं अंकगणित, मग बीजगणित, मग भूमिति व मग गतिस्थितिशास्त्र, क्षेत्रमापन किंवा त्रिकोनमिति हे विषय यावे. गणिताच्या शिक्षकानें मुख्य गोष्ट ध्यानांत ठेवायाची ती ही कीं, रीति समजावून देणें सोपें असतें, परंतु उदाहरण दिलें ह्मणजे त्याचा अर्थ कळल्यावर देखील त्यांतील गणितदृष्ट्या उपयोगी भाग मुलांस ओळखत नाहींत. या कारणानें मुलें बहुधा उदाहरणें चुकतात. ही मुलांतील उणीव अवलोकन कमी असल्यामुळें व लक्ष त्यांच्या स्वाधीन नसल्यामुळें उत्पन्न होते; ह्मणून ती योग्य उपायांनींच दूर केली पाहिजे. नाहीं तर बुद्धिमान् मुलेंही मठ्ठ होतात. गणिताच्या कामांत उजळणीची घोकपट्टी पुष्कळ अंशीं व्यर्थ होते. ज्यांस विशेष गणित शिकायाचें असतें त्यांस उजळणी वेतानेंच शिकवावी, कारण पुढें ती विसरून जाऊन कांहीं फायदा होत नाहीं. विसापर्यंत पाडे, व दहापर्यंत आणि दरदशकाची[1] पावकीपासून अडीचकीपर्यंत उजळणी व याच रीतीनें एकोत्री शिकविल्यास वस्स आहे. शिवाय तोंडचे हिशेब थोडेसे यावे.

प्राथमिक आणि मध्यम शिक्षणाचे याप्रमाणें मुख्य आठ विषय होतात—ह्मणजे स्वभाषा, परभाषा, प्राचीनभाषा, इतिहास, भूगोल, शास्त्रें, चित्रकला आणि गणित. ड्राइंगखेरीज सर्व विषय योग्य अनुक्रमानेंच हल्लीं इयत्तेवार लाविलेले आहेत. या मांडणींत कांहीं थोडे फेरफार मात्र करणें जरूर आहे. परंतु वास्तविक महत्त्वाचे जे फेरफार पाहिजे आहेत ते शिक्षणाच्या हेतूंत, पद्धतींत, क्रमिकपुस्तकांत, व विशेषतः शिक्षकांच्या ज्ञानांत, त्यांच्या पूर्वींच्या शिक्षणांत, व त्यांच्या योग्यतेंत. शिक्षणाचा व्यवसाय उत्तम माणसानें आरंभिला तरच तो फलद्रूप होतो, नाहीं तर पिशाच्चाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणें विद्यादान देखील अनर्थावह होतें. ही गोष्ट सर्व पालकांनीं पक्की लक्षांत बाळगावी. शिक्षणाचे वर जे हेतु सांगितले ते वरिष्ठ शिक्षण डोळ्यांपुढें धरून सांगितलेले नाहींत.

---

१. ह्मणजे एक पाव पावपासून दहापाव अडीचपर्यंत, व नंतर वीस पाव, तीस पाव, चाळीस पाव इत्यादि शंभर पावपर्यंत. थोडी वेरीज येतांच शंभरांपर्यंत कोणत्याही अंकाचे पाव सांगतां येतील, व अर्धवट विसरलेल्या उजळणीहून अधिक सुलभपणें हें कार्य होईल. उदाहरणार्थ ५७ पाव किती हें एकदम थोडींच मुलें सांगतील तीं ५० पासून ह्मणण्यास आरंभ करितात. इतक्या श्रमानें ५० पाव अधिक सात पाव यांची वेरीज होईल.

प्राथमिक व मध्यम प्रतीच्या शिक्षणास उद्देशूनच ते हेतु वर्णन केले, व त्यांची अतिशयोक्ति केली नाहीं. उत्तम शिक्षण दिलें जात असतां जर मुलगा मूर्ख व मट्ट निघाला तर तो त्याच्या अंगचा दोष गणिला पाहिजे; परंतु जोंवर शिक्षण-क्रम उत्तम नाहीं तोंवर शिक्षकांत व पालकांत तंटा होण्याची ही जागा आहे. मुलाच्या बुद्धीचें प्रमाण पाहूनच त्याकडून विद्या करवावी; मुलाचें सामर्थ्य, कल, व मातापितरांची ऐपत पाहून त्यास कोणतें शिक्षण उत्तम हें ठरवावें. मुलांच्या संगोपनांत व शिक्षणांत विचारी पुरुषानें अंधपरंपरेस लागूं नये.

११४. **शिक्षणाचा खर्च.** म्याट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंतच्या शिक्षणाचे तीन भाग करितां येतील व असावेः (१) प्राथमिक शिक्षण, मराठी चौथी इयत्ता पूर्ण होईपर्यंत, वर्षें चार; (२) कनिष्ठ इंग्रजी शिक्षण, इंग्रजी चौथी इयत्ता पूर्ण होईपर्यंत वर्षें चार; (३) मध्यम इंग्रजी शिक्षण, म्याट्रिकचा किंवा यू. एस्. एफ्. चा पूर्ण अभ्यास, वर्षें चार. या तिन्ही प्रकारच्या शिक्षणाच्या निरनिराळ्या शाळा असणें इष्ट आहे. त्यांस क्रमानें **प्राथमिक, कनिष्ठ इंग्रजी** आणि **मध्यम इंग्रजी** शाळा, असें ह्मणतां येईल. पुढील कालेजचा अभ्यास **वरिष्ठ इंग्रजी** शिक्षणाखालीं येतो व त्यासही चार वर्षें लागतात. सर्व शिक्षणास याप्रमाणें १६ वर्षें लागतात. त्याशिवाय पुढील कायद्याच्या किंवा एम्. ए. च्या परीक्षेस जीं लागतील तीं निराळीं. प्रत्येक वर्गांत जितकीं कमी मुलें असतील तितकें शिक्षण चांगलें होतें, व तीं सर्वप्रकारें सारख्या योग्यतेचीं असतील तर अधिक फायदा होतो. वर्गांतील मुलांची संख्या वीसपासून तीसपर्यंत असावी. प्राथमिक शाळेचे चार वर्ग समजल्यास चार शिक्षक लागतील. ते उत्तम पाहून ठेवल्यास व त्यांचा पगार रु. २० पासून ४५ पर्यंत असल्यास पगाराचा खर्च, रुपये १२० होतो. जागेचें भाडें वगैरे सर्व खर्चाचा अदमास पगाराच्या निम्मे होतो असा अनुभव आहे; ह्मणून सुमारें १२० मुलांच्या शाळेचा खर्च रु. १८० होईल. व फी १ रुपयापासून २ रुपयेपर्यंत वाढती ठेवल्यास ही शाळा उत्कृष्टपणें चालेल. आपल्या कोंवळ्या मुलांच्या हिताकरितां पुष्कळ मध्यम स्थितींतील ब्राह्मण लोक इतकी फी देण्यास तयार होतीलसें वाटतें. याशिवाय मुलामागें ५ रुपये भांडवल परतीच्या बोलीनें दिल्यास शाळेचें सर्व सामान उत्तम प्रकारचें तयार करितां येईल.

---

१. पुष्कळ पालकांची अशी समजूत आहे कीं, मराठी पांचवी किंवा सहावी इयत्ता झाल्यावर मुलगा इंग्रजी शिकायास लागल्यास त्याचा तो अभ्यास चांगला होतो, परंतु हा केवळ भ्रम आहे. मराठीचा विशेष चांगला अभ्यास होण्यास मुलांस पुष्कळ संस्कृत शब्द कळणें जरूर होतें, त्यांचें अवलोकन वाढलेलें असावें लागतें व बुद्धि प्रगल्भदशेस यावी लागते. याकरितां मराठीस आधीं जें एक वर्ष द्यावयाचें, त्या ऐवजीं इंग्रजी शाळेच्या अभ्यासास एक वर्ष अधिक द्यावें, व तेथें प्रत्येक इयत्तेंत मराठीचा अभ्यास ठेवावा, अशा योजनेनें वरील क्रम सांगितला आहे.

कनिष्ठ इंग्रजी शिक्षणाच्या शाळेंतील शिक्षकांस रु. ४० पासून ७० पर्यंत पगार द्यावे लागतील. चार शिक्षकांचा पगार सुमारें २०० रुपये होईल; व शाळेचा एकंदर खर्च रु. ३०० धरण्यास हरकत नाहीं. ह्मणजे १२० मुलांच्या पालकांस प्रत्येकीं रु. २॥ फी द्यावी लागेल. हा इतका खर्च फार आहे असें वाटत नाहीं.

मध्यम इंग्रजी शाळेंत पगार रु. ५० पासून १२० ठेविला, तर पगार ३०० व अवांतर २०० रुपये लागतील. १२० मुलांच्या शाळेंत फीचा दर सरासरी चार रुपये ठेविला पाहिजे.

ज्या लोकांस रु. १ पासून ४ पर्यंत फी देण्याचें सामर्थ्य आहे असे सुमारें २०० लोक एकत्र होतील तर त्यांस आपल्या मुलांकरितां स्वतंत्र शाळा काढतां येतील. जे याहून कमी ऐपतीचे आहेत, त्यांच्या शाळेस सरकारांतून मदत मिळाल्यास त्यांसही ही गोष्ट अशक्य नाहीं. अगदीं गरीबांस मात्र बाजारी माल घेतला पाहिजे, परंतु त्यांसही एक उपाय आहे व तो त्यांनीं स्वीकारिल्यास त्यांचें फार हित होणार आहे. प्रत्येक मोठ्या शहरीं स्वसंततीच्या शिक्षणाचें काम चांगलें व्हावें ह्मणून सुमारें दोन अडीचशें संभावित, कुलीन, समंजस, मध्यम-प्रतीचे लोक एकवट न होतील तर तो त्यांचा दोष समजला पाहिजे. याच उद्देशानें इतकेच गरीब लोकही एकवट होऊन प्रयत्न न करितील तर तो त्यांचा दोष गणिला पाहिजे. सरासरीनें एकाच योग्यतेचीं ज्यांचीं मुलें आहेत असे तीस पालक एकवट झाल्यास, त्यांसही आपल्या मुलांच्या योग्य शिक्षणाची तजवीज करितां येईल. परंतु असें करण्याचें कोणाच्या मनांत येत नाहीं, याचें कारण शाळेच्या व्यवस्थेसंबंधानें पुष्कळांचे कांहीं खोटे ग्रह झालेले आहेत व ते दूर झाले पाहिजेत.

११५. शाळा मोठी असणें हितावह नाहीं. शाळा उत्तम प्रकारें चालण्यास ज्या गोष्टी आवश्यक असतात त्यांचा पूर्वी कित्येक ठिकाणीं उल्लेख केलाच आहे. या गोष्टी मुख्यत्वेंकरून पुढें सांगितलेल्या होत; **शिक्षक उत्तम असणें; शाळेस जागा चांगली असणें; खेळायाची जागा शाळेस लागून असणें; शाळेंतील प्रत्येक शिक्षकास प्रत्येक मुलगा आपल्या शाळेंतील ह्मणून ओळखतां येऊन त्याच्या वर्तनावर नजर ठेवतां येणें; शिक्षक समान योग्यतेचे व एकदिलानें काम करणारे असणें, गृहस्थिति, ऐपत, घरचें शिक्षण व संप्रदाय यांसंबंधानें सारख्या योग्यतेचीं मुलें शाळेंत, व विशेषतः वर्गांत, असणें; धर्म, नीति व गैरेसंबंधानें शिक्षकांचे व पालकांचे ग्रह सारखे असणें, व त्यांची परस्परांची ओळख व भेटी होत राहून एकमेकांवद्दल भरंवसा व बहुमान राहणें; इत्यादि.** जर शिक्षणाचे हेतु पूर्वी सांगितले ते सर्व

साध्य होणें अवश्य मानिलें तर यांपैकीं कोणत्याही गोष्टीकडे दुर्लक्ष करितां कामा नये.

शाळेच्या जागेसंबंधानें विचार करितां असें दिसून येतें कीं, जों जों शाळा मोठी तों तों ती बांधण्यास अधिक खर्च लागतो, व ती बांधून होत नाहीं. मोठ्या शाळेच्या कामाकरितां इमारत बांधून देतील असे व्यापारीही थोडे असतात, व तयार घरेंही थोडींच मिळतात; या कारणानें **मोठ्या शाळेचे बरेच वर्ग अप्रशस्त ठिकाणीं वसविणें भाग पडतें.** दुसरें असें कीं, जितक्या अधिक मोठ्या शहराच्या भागांतून मुलें गोळा होतील तितकी त्यांच्या घरास शाळा लांब होणार. या कारणानें मुलांस घरीं चटकन जाऊन येतां येत नाहीं; तसेंच पालकांस वरचेवर शाळेची स्थिति पाहण्यास मिळत नाहीं, किंवा ती आपली असें वाटत नाहीं व शिक्षकांचा व त्यांचा स्नेह जडत नाहीं.

व्यायामाच्या जागेसंबंधानें अशाच अडचणी येतात. शंभर मुलें खेळण्यासही मोठें पटांगण लागतें. शंभर मुलांपुरती तालमीची जागा किंवा सामान तयार करण्यास मोठा खर्च केला पाहिजे. शंभर मुलांवर क्रीडास्थानीं देखरेख होणें कठीण, इ०. मोठ्या शाळेचीं सुमारें शंभर मुलें खेळत असतां एवढी गर्दी व कलकलाट होतो कीं, प्रेक्षक चकून सर्व मुलें हौसेनें व्यायाम करीत आहेत असें त्यास वाटतें; वास्तविक **मुलांच्या मोठ्या समाजास व्यायामाचीं साधनें पुरविणें व दक्षतेनें त्यांकडून व्यायाम करवून घेणें हें शहरांत तरी अशक्य आहे.**

शिक्षकांच्या संबंधानें विचार करितां ज्या अडचणी उत्पन्न होतात त्या याहून अधिक महत्वाच्या आहेत. शाळेच्या हेडमास्तराचें काम फार महत्वाचें आहे, व तें चांगलें होण्यास तें कमी असावें. शिक्षणाच्या विषयाची ज्यास उत्तम माहिती आहे, ज्याचें पुष्कळ अवलोकन झालेलें आहे, ज्यानें शिक्षणाच्या कामांत लौकिक व वहुमान मिळविला आहे, त्याकडे पगार वाढवून हें काम दिलें जातें. असा माणूस जर शिक्षकांची हजिरी घेण्याचें काम, पत्रव्यवहाराचें काम, व अशींच दुसरीं क्षुल्लक कामें करूं लागला व आळशी होत गेला तर काय फायदा? हेडमास्तराचा वर्ग ह्मणजे अत्युत्तम शिक्षणाचा वर्ग अशी मुलांत ख्याति असावी. त्या वर्गांत आपण केव्हां जाऊं असें मुलांस व्हावें, व त्यांत गेल्यावर आपणांस हा एक नवा हक्क मिळाला असें त्यांस वाटावें. परंतु मोठ्या शाळेंत असें होत नाहीं. हेडमास्तर फार झालें तर शिक्षकांच्या कामावर तांत्रिक देखरेख करितो, व तांत्रिक देखरेखीनें शिक्षकांविषयीं वारंवार अन्यायाचें मत होतें. स्वतः शिक्षणाचें काम बंद करितांच शिक्षकांच्या अडचणी कळेनाशा होतात, किंवा त्यांस कित्ता घालून देतां येत नाहीं. आपलीं मुलें कोणतीं हें माहीत नसतें, व आपल्या मागून आपलींच मुलें चालून कुचाळ्या करीत आहेत कीं काय, हेंही समजण्याचा

मार्ग उरत नाहीं. मुलांस दुर्वर्तनावद्दल शिक्षा व सद्वर्तनावद्दल वक्षीस व उत्तेजन देणें, त्यांस प्रसंगीं ममतेचे व आश्वासनाचे शब्द बोलणें, आपण प्रिय होऊन मुलांस शाळा प्रिय करणें, हीं महत्वाचीं कर्तव्यें कोणाही मोठ्या शाळेच्या हेडमास्तरास करितां येत नाहींत. तो आळशी होत जातो; कारकून त्याचें काम पाहतो; या अनुभवावरून कारकुनाच्या योग्यतेचीं माणसें हेडमास्तराच्या जागीं नेमिलीं जातात. इ०.

इतर शिक्षकांच्या दृष्टीनेंही शाळेंत मोठे दोष उत्पन्न होतात. ज्या शाळेंत पन्नास शिक्षक आहेत, त्या शाळेंत शिक्षकांस लौकिक मिळविणें कठीण होतें, व माझा अनुभव असा आहे कीं त्या लौकिकावद्दल कोणी फिकीरच करीनासा होतो. अगदीं खालचा शिक्षक व अगदीं वरचा, या दोहोंमध्यें मोठें अंतर पडतें, व त्यांचा स्नेह किंवा संभाषण होत नाहीं. या कारणानें वरच्या इयत्तेच्या मुलांकडून त्यांचा वारंवार अपमान होतो व तो वरिष्ठ माणसांस सांगितल्यास मुलांस शिक्षा होईल खरी, पण आपला उपहास होईल अशी त्यांस भीति असते, व सामान्य अपराध ते हेडमास्तरापर्यंत नेत नाहींत. याप्रकारच्या पुष्कळ कारणांनीं वेतापुरतें काम करून मोकळें व्हावें, अशी संवय पुष्कळांस लागते. अगदीं वरच्या पायरीस आपण पोंचूं अशी त्यांस आशा राहत नाहीं, ती फार उंच असते. मग हेडमास्तराच्या पुढें पुढें करणारे लोक त्यास महत्वाचे वाटूं लागतात, सौम्यपणें चांगलें काम करणारांविषयीं त्याचा आदर किंवा चांगलें मत रहात नाहीं; या दुसऱ्यांस त्यांशीं बोलणेंही अवघड होऊं लागतें; मग त्यांच्या अडचणी वरिष्ठास कळत नाहींत व ही तंट्यास जागा होते. इत्यादि.

शाळा लहान असल्यास शिक्षक थोडे लागतात; प्रत्येक इयत्तेवरील शिक्षकास त्या इयत्तेचे सर्व विषय उत्तम यावे लागतात; ते उत्तम शिकविण्याकरितां उत्तम देखरेखीखालीं तो जे प्रयत्न करितो, त्या योगें त्याची योग्यता वाढते व तो एक वरची इयत्ता शिकविण्यास लायक होतो. प्रत्येकास काय त्या चार पायऱ्या चढायाच्या असतात; व आयुष्याच्या जवानींत आणि मध्यमावस्थेंत सर्वांस ही गोष्ट प्रयत्नसाध्य आहे. गुणावांचून व लौकिकावांचून आपणांस कोणी वर नेमणार नाहीं हें सर्वांस कळतें. मोठ्या शाळेंत पांच पन्नास शिक्षकांत दहा पंधरा वाईट शिक्षक खपून जातात. त्यांस पगारही थोडा देऊन भागतें. एकाच इयत्तेचे पुष्कळ वर्ग असल्यास कोणी एकाच विषयांत पंडित ठरलेले तो विषय आपणांकडे घेतात; व विषयाच्या महत्वाप्रमाणें दोन अधिक योग्यतेच्या शिक्षकांच्या जोडीस तीन हलक्या प्रतीचे शिक्षक लावितां येतात; व कमी व अधिक योग्यतेच्या माणसांचें शाळांतून साधारण प्रमाण हेंच असतें. जो नुसता गणिती शिक्षक असेल त्यास इंग्रजींत बोलतां येत नाहीं, जो नुसता संस्कृती असतो तो चावटपणा करितो, जो नुसता भूगोलइतिहासाचा मालक, तो इंग्रजीच्या दृष्टीनें शिकवीनासा होतो, त्याची भर घोकंपट्टीवर, व शुद्ध इंग्रजी शिकविणारास हरतऱ्हेच्या संभाषणानें व उदाहर-

णांनीं ज्या इंग्रजी रचनेच्या विशेष गोष्टी सांगणें जरूर होतें त्यांस अवकाश मिळत नाहीं; ते पुस्तकांच्याद्वारें 'इडियमा' शिकवूं लागतात. ह्मणून त्यांस स्वतः कमी इंग्रजी बोलावें लागतें व एकंदरीनें कमी इंग्रजी बोललेलें मुलांच्या कानांवरून जातें, व कमी योग्यतेच्या माणसांशीं त्यांचा विशेष संबंध येतो; व जितके बहुमानास तितकेच थट्टामस्करीस योग्य, असे शिक्षक त्यांच्या डोळ्यांपुढें राहतात. या सर्व गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, शिक्षण स्वस्त करण्याच्या बुद्धीनें शाळेंत जितकीं कमी योग्यतेचीं माणसें भरतील, जितकीं खपवून नेतां येतील, जितकीं वशिल्यानें लागूं शकतील, तितकी शाळेच्या सुस्थितीची हानि होते. या गोष्टीचा प्रत्यय येण्यास एकच वाढती शाळा घेऊन तिचे परीक्षांतील निकाल पहावे. पुष्कळ मुलांत पुष्कळ पास होतात खरे; परंतु या गोष्टीस पालकांनीं भुलूं नये; आपल्या मुलांस कशी विद्या येईल या गोष्टीचा अदमास करण्यास पास होणारांचें सर्व मुलांशीं जें प्रमाण तें पाहिलें पाहिजे. शिक्षकांनीं पुष्कळ मुलें पास झालीं असें दाखवावें, एक दोघांचा वर नंबर आला यांत बडिजाव मानावा हें साहजिकच आहे, परंतु ज्यांच्या अभ्यासाची हेळसांड झाली, ज्यांकडे मुळींच शिक्षकांनीं लक्ष दिलें नाहीं अशांची संख्या व प्रमाण किती, हें पाहणें पालकाचें काम आहे. व जों जों शिक्षकांची जबाबदारी वाढवावी, त्यांकडे शारीरिक शिक्षण, सदाचारशिक्षण वगैरे गोष्टी सोंपवाव्या, तों तों शिक्षणाची हेळसांड होण्याचें प्रमाण मुलांच्या संख्येच्या प्रमाणानें वाढलेंच पाहिजे.

गृहस्थितीसंबंधानें मिश्र मुलांचा जेव्हां सहवास होतो. तेव्हां जीं मुलें स्वच्छ सद्वर्तनी व चांगल्या संवयीचीं असतात त्यांस अधिक उत्तम करण्याकडे जो शिक्षकाचा वेळ जावयाचा, तो अमंगळ, दुर्वर्तनी व आळशी मुलांस वेतापुरतें चांगलें वळण लावण्यांत जातो; त्यांस दिलेल्या क्रूर शिक्षा चांगल्या मुलांस पहात बसावें लागतें, व त्यांच्या मनांत इतरांविषयीं तिरस्कार व स्वतःविषयीं घमंडी उत्पन्न होण्यास हें कारण होतें. अमेरिकेसारख्या लोकसत्ताक राज्यांतही ही गोष्ट ध्यानांत येऊन ऐपतदार गृहस्थ आपलीं मुलें सार्वजनिक शाळेंत पाठवीनासे झाले आहेत. सुमारें एकषष्ठांश मुलें या कारणानें स्वतंत्र स्थापिलेल्या शाळांत शिकतात. परस्पर संभाषणांत मुलांत ज्या गोष्टी निघतात, त्यांस या योगें चांगलें वळण लागतें. उदाहरणार्थ कोणाचा बाप दारू पिऊन गटारांत पडल्याची वार्ता शाळेंत येत नाहीं, 'अरे हा जिनगर आहे' असें ह्मणून कोणाची चेष्टा होत नाहीं, इत्यादि. एकंदरीनें मुलांत वैमनस्यें उत्पन्न होण्यास, व त्यांच्या मारामाऱ्या व शिवीगाळ होण्यास कमी कारणें राहतात, व त्यांचा स्नेह त्यांस फलद्रूप होतो. धर्म व सदाचार यांसंबंधानेंही हीच गोष्ट लागू पडते. सुधारक व असुधारक पालकांचीं मुलें मिश्र झाल्यास त्यांमध्यें सभेच्या हकीकतीचा वाद सुरू होतो; कोणा एखाद्याच्या बापाची फजिती झालेली असते, त्यास शाळा सोडून जावें इतका उपद्रव होतो;

कोणाची मासे खाण्यावद्दल, कोणाची ह्मसोवास नवस केल्यावद्दल, इत्यादि प्रकारांनीं कुचेष्टा होते. या कारणानेंच सर्वत्र क्याथालिक पंथाचे लोक आपलीं मुलें दुसऱ्या पंथाच्या मुलांत मिसळूं देत नाहींत; आपल्या धर्मासच जेवढें उत्तम स्वरूप देववेल तेवढें देतात. दुसऱ्याही कित्येक ख्रिस्ती पंथांत या प्रकारचेंच स्वावलंबन दृष्टीस पडतें. मुलांस योग्य अभिमान, विशेष सभ्यता व अधिक चांगला सदाचार लागण्यास त्यांचा मिश्र सहवास घातक आहे. व मोठ्या शाळेंत, मोठ्या इस्पितळाप्रमाणेंच, व्यवस्था रहायाची.

या व अशाच सर्व गोष्टींचा विचार केला असतां असें दिसतें कीं, शाळा आणि कुटुंब यांमध्यें पुष्कळ साम्य आहे. एक पेठभर किंवा एक अळीभर एकच कुटुंब असल्यास, त्याचा सैंपाक चांगला होणार नाहीं, वडील माणसांची धाकट्यांवर चांगली देखरेख रहाणार नाहीं; त्यांमध्यें आळस व दुराचार शिरेल; ज्यावर कुटुंबपोषणाचा भार पडेल तो त्या कामांतच चीत होऊन जाईल; व इतकें करूनही त्यास सुख लागणार नाहीं, कारण त्याचा अंमल पुष्कळांस खपणार नाहीं, इत्यादि. उत्तम शिक्षण, उत्तम देखरेख व उत्तम वर्तन मुलांस लावण्यास शाळा लहानच असली पाहिजे. मोठ्या शाळेपासून एकही फायदा आहे, असें मला वाटत नाहीं.

शाळेंतील मुलांची योग्य संख्या ह्मणजे, एकएका इयत्तेचा एक एक वर्ग असावा; व पूर्वी शाळांच्या ज्या तीन प्रती सांगितल्या, त्या तीन प्रतींच्या शाळा निराळ्या असाव्या, ही उत्तम व्यवस्था होय. ह्मणजे सुमारें सव्वाशें मुलांची एक एक शाळा असावी. व पालकांच्या ऐपतीप्रमाणें व सामाजिक व धार्मिक समजुतींप्रमाणें व योग्यतेप्रमाणें मुलांची योग्य वांटणी व्हावी. याप्रमाणें विचार करितां एके ठिकाणच्या सारख्या प्रकारच्या लोकांस एकत्र होऊन आपल्या मुलांची शिक्षणाची योग्य व्यवस्था करणें शक्य आहे व सर्वप्रकारें हितावह आहे असें सर्वांच्या लक्षांत येईल. उद्योग व स्वावलंबन मात्र पाहिजे. या संबंधानें आणखी पुष्कळ माहिती देण्यासारखी आहे. परंतु ती देत बसल्यास ग्रंथविस्तार फार होईल.

११६. गरीबांस योग्य शिक्षण. गरीब व श्रीमंत यांनीं विद्येचा एकच मार्ग धरिल्यानें सांप्रतकाळीं फार नुकसान होत आहे. परंतु तें विद्यावृद्धीकरितां ह्मणणाऱ्यांच्या लक्षांत येत नाहीं. शिक्षण स्वस्त किंवा मुफत केल्याखेरीज तें गरीबांस मिळूं शकत नाहीं. तें स्वस्त करण्यांत त्याची योग्यता उतरते व तें हानिकारकही होतें, असें येथपर्यंत दाखविलेंच. परंतु या अशा दूषित शिक्षणाचे पुढें ही इष्ट परिणाम होत नाहींत. ज्यांनीं नादारीनें, वार लावून किंवा कोणाच्या येथें काम करून विद्या केली त्यांस या विद्या संपादनाच्या वेळीं कोणत्या संवयी लागल्या, कोणते प्रसंग आले व कोणाचा सहवास होता हें ध्यानांत आणिल्यास, विद्या समाप्त झाल्यावरचें त्यांचें कर्तृत्व ओळखतां येतें. कोणी हलकटांच्या संगतींत रा-

हिलेला असतो, कोणी अत्यंत हांजी हांजी करून निर्वाह केलेला असतो, कोणी अत्यंत अभ्यास करून वर नंबर ठेवून शरीराची खरावी केलेली असते, कोणास नित्य अपशब्द सोसून काळ काढावा लागलेला असतो व कोणास शेवटपर्यंत भिक्षा मागावी लागते. याप्रकारच्या लोकांस नौकरी लागते तेव्हां हेच त्यांचे दुर्गुण प्रबळ होतात; तेच नौकरीकरितां हांजी हांजी करितात, पगार कमी घेण्यास तयार होतात, दुसरे हलकट भोंवतालीं असल्यास त्यांसारखे लवकर होतात, व आपण बिघडून भल्या माणसास, वर्तनानें किंवा सल्लामसलतीनें, बिघडविण्यास कारण होतात. खेड्यापाड्यांतील नौकरांची स्थिति पूर्वी सांगितलीच. पगार किती कमी द्यावा लागेल एवढेंच सरकार पाहतें, कुलीनता व सभ्यता पाहत नाहीं. पगार कमी करून घेण्याच्या चढाओढींत कुलीनांचीं मुलें मागें पडतात, वशिल्यावांचून त्यांस योग्य जागा मिळत नाहीं, व हा उपाय त्यांस करावा लागणें दुर्भाग्य होय. कुलीनपणा, घरचें शिक्षण चांगलें, बाकी शिक्षण देण्याकरितां पालकांनीं वरेंच द्रव्य खर्च केलेलें, असें असतां या सर्वांचें चीज होत नाहीं. पुष्कळ गरीब लोक मोठ्या खस्ता खाऊन मुलांच्या विद्याभ्यासाकरितां खर्च करितात, कारण त्यांस नादारीकरितां तोंड विचकणें योग्य वाटत नाहीं, परंतु दुसरे असेच गरीब लोक शुद्ध निर्लज्ज असतात. आपलीं मुलें ते शहरांत आणून सोडून देतात, मग मुलांनीं पाहिजे तें करावें. या अशा मुलांपैकीं पुष्कळ नादार होतात. तीं कसें तरी पोट भरितात व क्वचितच कोणाच्या देखरेखीखालीं असतात; शाळेवाहेरील त्यांच्या सद्वर्तनाबद्दल कांहींच सांगतां येत नाहीं. आतां जे गरीब लोक आपल्या शें दोनशेंच्या वर्षांच्या मिळकतींतून पंचवीस तीस रुपये मुलांच्या विद्येकडे खर्च करितात, त्यांच्या त्या स्वावलंबनास मदत करावी कीं शहरांत मुलें आणून सोडणारांच्या बेफिकीरपणास करावी ? शिक्षण कोणास किती सुलभ करायाचें, हा विचार मनांत न बाळगल्यास सार्वजनिकरीत्या अन्याय होतो एवढेंच नव्हे, तर विद्यादान दुष्परिणामी होतें. परंतु हा विचार मनांत बाळगून कोणी नादारीचा किंवा फीचा दर ठेवीत नाहीं. सर्व शिक्षण सर्वांस सारखें सुलभ केल्यानें स्वावलंबी व संभावित घराण्यांचें मोठें नुकसान चालू आहे; त्यांच्या मुलांशीं चढाओढ करण्यास भलतेच लोक येत आहेत, व त्यांस त्यांच्या अंगच्या हांजी हांजीच्या, अपमान सोसण्याच्या, वगैरे गुणांमुळें पगार कमी होऊन जागा मिळत आहेत. या गोष्टीची सत्यता पाहिजे त्यानें वस्तुस्थितीवरून प्रत्यक्ष पाहून द्यावी; नौकरीवर लागणारांच्या व लागलेल्यांच्या एकंदर खटपटी ध्यानांत आणाव्या, व आयुष्यांतील सद्वर्तन हा जो विद्येचा सत्परिणाम त्यासंबंधानें नौकर माणसांची स्थिति पहावी; दिवसें दिवस, सर्व अपमान सोसणारे व नौकरीकरितां पाहिजे तें करणारे असे लोक नौकरींत भरत आहेत; व ज्यांस घरचें शिक्षण चांगलें त्यांसही हे अमंगळ दोष शिवत आहेत. नौकरीच्या कामीं

शिक्षितांस कशी निकृष्टता येत चालली आहे हें पूर्वी एके प्रसंगीं सांगितलेंच. विपुल विद्यादानानें वाईटांचे चांगले व्हावयाचे ते चांगल्यांचे वाईट होण्याचा परिणाम घडत आहे; व कुलीन माणसास उत्तम सदाचारी व विद्वान् होण्यार्चीं साधनें नाहींत तीं नाहींतच. हें लिहिणें पुष्कळांस रुचणार नाहीं, परंतु त्यांस तें खोडून टाकणें झाल्यास अमुक ठिकाणच्या नौकरांची अशी स्थिति नाहीं व होण्याचा संभव नाहीं असें त्यांनीं वस्तुस्थितीवरून दाखवावें. शेंकडा दोनचार नादार पुढे चांगले निघालेले त्यांनीं दाखविल्यास, कुलीन घराण्यांतील पैसा खर्चूनं तयार झालेलीं पंरंतु निरुपायानें वशिला शोधीत असलेलीं शेंकडा पन्नास मुलें आहेत असें दाखविण्याची माझी तयारी आहे, व त्यांस पुढें हलकटपणा शिकल्याखेरीज मार्ग राहिलेला नाहीं. 'अमक्यानें अमुक केलें, तेंच करण्यावांचून उपाय नाहीं' असे विचार त्यांच्या मनांत येत आहेत व त्यांमुळें ते वाकत आहेत.

गरीबांस व श्रीमंतांस शिक्षणाचा एकच मार्ग ठेवावा कीं नाहीं व त्यांचें शिक्षण मिश्रपणें व्हावें कीं नाहीं हा प्रश्न फार महत्वाचा आहे, व नुसत्या पोकळ परमार्थबुद्धीनें, शेवटपर्यंत परिणाम पाहिल्याखेरीज, त्याचा कोणी निर्णय करूं नये. परंतु याच प्रश्नाचा दुसऱ्या एका दृष्टीनें विचार करणें आवश्यक आहे. एका नौकरीच्या मार्गास ब्राह्मणांचा बहुसमाज लागल्यामुळें त्यांस निकृष्टता येत आहे, त्यांची योग्यता कमी होत आहे, कर्तवगारी नाहींशी होत आहे, शरीरसामर्थ्याचा ऱ्हास होत आहे, पुढें भविष्य मोठें भयंकर दिसत आहे, या गोष्टी पूर्वी सांगितल्याच. बुद्धीचा एकाच मार्गानें उपयोग करण्यास सर्वांस लाविल्याचा हा दुष्परिणाम होय. ब्राह्मणांस रिकामपणीं कांहींही उद्योग करितां येत नाहीं, वायकोस दळायास लागण्यापलीकडे कोणतेंही कौशल्य त्यांच्या अंगीं शिक्षणकाळांत आणिलेलें नसतें. कांहीं थोडे फरडे वर्तमानपत्राचे लेखक होतात, परंतु त्या थोड्यांसही फार थोडें वेतन मिळतें, व ते फारच थोडा परमार्थ जोडितात. ही एक गोष्ट झाली.

दुसरी अशी कीं जों जों ब्राह्मणांचीच लोकसंख्या वाढत आहे, व अन्यजातीय लोक त्यांस नौकरींतून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत, तों तों दुसऱ्या कांहीं धंद्यास लागणें, नवीन उद्योगाचे व प्राप्तीचे मार्ग काढणें, हें ब्राह्मणांस आवश्यक होत आहे. ही आवश्यकता ओळखून, व्यवस्थेनें, निर्भिडपणें व उत्साहानें आपल्या पुढील तर्तुदीस ब्राह्मणांनीं लागावें. आपलें पोट भरतें आहे, आपल्या संततीचेंही कसें तरी भरेल, अशा मूर्खपणाच्या नुसत्या भरंवशावर बसून उपयोग नाहीं. पुढें काय होणार त्याचें धोरण हल्लीं काय चाललें आहे त्यावरून दिसतेंच आहे. जेव्हां विद्यादानाचा मोठा बोभाटा केला जातो, तेव्हां विद्याग्रहण केलेल्या एकंदर लोकांच्या स्थितीचा एक एक तक्ता वाचीत जावा; ह्मणजे कोणत्या प्रकारें आयुष्यक्रम चालविण्याकरितां हें विद्यादान दिलें गेलें या गोष्टीचा सर्वांस

अंदाज येईल. पूर्वी पुण्यांतील विपुल पाण्याचा या बाबतींत दाखला दिलाच.

आतां तिसरी एक गोष्ट या बाबतींत लक्षांत आणायाची ती ही कीं, देशांतील बुद्धीचा सर्व ओघ एकाच दिशेस वळविल्यास, देशाच्या अनेक उद्योगांस जे वरिष्ठ प्रतीचे लोक पाहिजेत ते पैदा होत नाहींत. सर्व शेतें मोडून कोणी देशभर एक फुलझाडांचा बगीच्या करावा त्याप्रमाणें हल्लींचा विद्यादानाचा प्रयत्न आहे. कोणी म्हणेल दुसऱ्या जातींनीं बाकी राहिलेले धंदे करावे, परंतु त्यांस योग्य साधनें नाहींत; त्यांनाही जीं साधनें आहेत तीं या विद्येच्या बगीच्याच्या कामाचीं, म्हणूनच ते ब्राह्मणांशीं चढाओढ करीत आहेत. जर एखाद्या उच्चस्थळीं कांहीं नियमित माणसांस वसण्यापुरती जागा असेल, व तेथें सर्व जातींचा वसण्याचा प्रयत्न असेल, तर कांहींनीं तरी तेथें जाण्याच्या खटपटीस न लागतां दुसरें उच्चस्थान पाहिलें पाहिजे. जर देशास शोधक व कल्पक माणसांची गरज आहे, कलाकौशल्याच्या व देखरेखीच्या वरिष्ठ कामास लायक माणसें पाहिजे आहेत, तर या आवश्यकतेनुरूप योग्य प्रमाणानें इकडेही देशांतील बुद्धिमान् माणसें वळविलीं पाहिजेत. नाहींतर कित्येक आवश्यक कामास योग्य माणसें नाहींत, व ज्या कामास पुष्कळ आहेत त्यांस पुरेसें काम नाहीं असें होऊन, बुद्धीचा दुर्व्यय होतो. व तोच हल्लीं चालला आहे. या अशाच आणखी पुष्कळ गोष्टींचा विचार केल्यास गरीब व श्रीमंत यांचा विद्येचा मार्ग निराळा असण्याची आवश्यकता सर्वांस कळून येईल. गरीबांचे दोष दाखविण्याकरितां वरील विवेचन केलें आहे असें कोणी समजूं नये; त्यांस इष्ट गुण येण्याच्या अडचणी व त्यांतून पार पडल्यावरही त्या गुणांचें योग्य चीज होत नाहीं, या गोष्टी दाखविणें जरूर होतें.

आतां जर देशांतील बुद्धीचा, किंवा कोणत्याही ज्ञातींतील बुद्धीचा, ओघ वळवायाचें मनांत आणिलें तर जो बुद्धिभाग ताब्यांत येण्यासारखा आहे, त्यास प्रथम नवीन दिशा लावणें हेंच इष्ट आहे. मध्यमप्रतीचें व वरिष्ठप्रतीचें शिक्षण अल्पव्ययानें किंवा मुफत देण्याचें बंद केलें पाहिजे; कांहीं अत्युत्तम मुलांस मात्र तें मिळण्याची संधी ठेवावी, व तीही तीं मुलें क्षीण असल्यास; कारण इतर सर्व धंद्यांत व उद्योगांत अत्यंत उत्तम माणसें जाण्यास मदत करणें झाल्यास त्या माणसांस पुस्तकी विद्येंतून काढून लावण्याखेरीज दुसरा स्वाधीनचा मार्ग नाहीं.

या रीतीनें ज्यांचें या एक दिशेनें शिक्षण बंद करायाचें त्यांस दुसऱ्या दिशेस लावण्याचीही आधीं तर्तूद केली पाहिजे. ब्राह्मणांचीं मुलें शाळेंत जाऊं लागतांच त्यांमध्यें एक अवगुण शिरतो. तो हा कीं शारीरिक श्रम व हस्तकौशल्य त्यांस नकोसें होतें; म्हणूनच पुढें आयुष्यांत रिकामपणीं त्यांस कांहींच करितां येत नाहीं. हा अवगुण त्यांमध्यें न यावा, व योग्य उद्योग करण्यांत श्रम झाले, किंवा हात काळे झाले. तरी त्यांस फिकीर वाटूं नये अशी त्यांस पहि-

ल्यापासून संवय लाविली पाहिजे. नाहीं तर त्यांच्या अंगीं कोणत्याही प्रकारें हरतऱ्हेची कर्तबगारी राखितां येणार नाहीं.

या सर्व गोष्टींचा विचार करून गरिबांस कसें शिक्षण द्यावें याविषयीं पुढील योजना सुचविली आहे; व ती किंवा तशीच दुसरी अमलांत आल्याखेरीज ब्राह्मणांचें, ज्ञातीचें किंवा देशाचें हित होण्याचा संभव नाहीं. ब्राह्मणांनीं आपल्या ज्ञातींतील स्वतंत्र व पैसेवाले लोक वाढविणें आवश्यक आहे असें पूर्वी दाखविलेंच. स्वतंत्र कर्त्या पुरुषांची संख्या शेंकडा पन्नासांच्या वर न्यावयाची जरूरी आहे, व ही गोष्ट ध्यानांत ठेवून सर्वांनीं लवकर योग्य उपाय करावे; निष्फळ विचारांत, विवंचनेंत व वादविवादांत वेळ घालवूं नये. दोनशें गरीब पालक एकत्र झाल्यास पुढील शाळेची योजना अमलांत आणितां येईल. किंवा अशा शाळेंत मुलें घालण्याची त्यांची तयारी आहे असें पक्कें आश्वासन मिळाल्यासही शाळा काढणें शक्य आहे. ही गोष्ट ध्यानांत धरून प्रत्येकानें आपला अभिप्राय ठरवावा.

११७. उद्योगशाळा. या शाळेचा हेतु असा कीं कांहीं एक भांडवल खर्चून ती एकदा सुरू केली ह्मणजे, तींत फुकट विद्यादान देतां यावें, निदान उत्तम विद्यादानास फारच थोडा खर्च पडावा. ही गोष्ट साध्य करण्यास एकच उपाय आहे, तो असा कीं ज्या मुलांस शिकवायाचें, त्यांच्या श्रमानेंच त्यांच्या शिक्षणास लागणारा खर्च उत्पन्न करायाचा. असें करितांना मुलांस जे श्रम करायास लावायाचे ते त्यांस पुढें उद्योगधंद्याचें काम करणें झाल्यास उपयोगीं पडावे, किंवहुना त्यांस स्वतंत्र उद्योग करून पोट भरण्याचें त्यामुळें सामर्थ्य यावें, अशा प्रकारचे मात्र योजायाचे. अगदीं हीन काम न करितां सभ्यपणें उदरनिर्वाह व्हावा, नौकरी असल्यास प्राप्ति वाढविण्याकरितां घरच्या घरीं कांहीं उद्योग करितां यावा, आपल्या संततीस नवीन वळण लहानपणापासून लावितां यावें, व कारखान्यांत वगैरे ब्राह्मणांचा शिरकाव व्हावा, असे उद्देश ते श्रम करवितांना डोळ्यांपुढें धरावे. जोंवर मुलाच्या कामापासून शिक्षणाचा सर्व खर्च निघत नाहीं तोंवर पालकास थोडा खर्च पडेल, परंतु शाळा व्यवस्थेनें चालू लागल्यावर असें बहुधा घडायाचें नाहीं. मुलास कोणत्या प्रकारचा धंदा शिकवायाचा हें ठरवितांना पालकाचा धंदा, त्याची ऐपत व मुलाची बुद्धि व शरीरसामर्थ्य, यांचा मुख्यत्वेंकरून विचार करायाचा. ज्या पालकांस आपल्या मुलांस कांहीं भांडवल खर्चून स्वतंत्र उद्योगाचीं साधनें पुरवितां येतील, त्यांच्या मुलांस लहानशा कोणत्याही प्रकारच्या कारखान्यास उपयोगीं असें शिक्षण द्यायाचें; ज्यांस तशी ऐपत नाहीं, त्यांच्या अंगीं कारखान्यांत नोकर राहण्याची योग्यता आणायाची; इ०

बारा वर्षांत मराठी पहिल्या इयत्तेपासून यू. एस्. एफ्चा अभ्यास व्हावा असा क्रम योजायाचा. प्रत्यहीं तीन तास पुस्तकांचें व तीन तास उद्योगाचें शिक्षण

द्यावयाचें. इतक्या शिक्षणानें यू. एस्. एफ्. चा अभ्यास बारा वर्षांत उत्तम प्रकारें संपवितां येईल. कोणासही हवीं तितकीं वर्षें अभ्यास करीत वसण्याची ऐपत आहे असें समजलें जाणार नाहीं, होतां होईल तों लवकर आपली उपजीविका मिळवितां यावी या उद्देशानेंच शिक्षण द्यावयाचें. जे विद्यार्थी हल्लीं मध्येंच शाळा सोडून मेडिकल स्कूलमध्यें जातात, रेलवेकडे लागतात, कंपाझिटरचें किंवा कं-पाउंडरचें काम शिकतात, कोणत्याही प्रकारच्या वर्कशापमध्यें जातात, किंवा व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट, आर्टस्कूल, वगैरेसारख्या ठिकाणीं विशेष शि-क्षणासाठीं जातात, मोकदमाचें किंवा निवळ कारकुनीचें काम पत्करितात, त्यांस या शाळेंतील शिक्षणाचा फारच उत्तम उपयोग होईल. निरनिराळ्या धंद्यांच्या संबंधानें तांत्रिक तरी माहिती होईल, व आपण कसल्या भलत्याच ठिकाणीं येऊन पडलों असें मनांत येऊन कोठेंही असतां त्यांच्या उत्साहाचा भंग होणार नाहीं. या सर्वांहून जो विशेष महत्वाचा फायदा होईल तो हा कीं कलाकौशल्याच्या धंद्यांत ब्राह्मण जाऊन पडल्यावर, त्यांच्या शिक्षणामुळें व बुद्धीमुळें त्यांच्या अंगीं शोधकपणा व अभिरुचि येईल. यांत्रिक रीतीनें पुष्कळ कामें सुबक होऊं लागतील, व कांहीं नवीन कल्पना काढणारे व यंत्रें निर्माण करणारे चतुरबुद्धि-मान् पुरुष उत्पन्न होतील. यंत्रें, कल्पना, शोध व युक्त्या काढणारांचे इतिहास वाचल्यास असें दिसतें कीं ते बुद्धिमान् तर खरेच, परंतु गरीब स्थितींत जन्मलेले असल्या कारणानें त्यांस अल्पवयांत कलाकौशल्याच्या कामीं लागावें लागलें, व त्यांतच त्यांच्या बुद्धीचा उदय झाला व ते समाजांत मोठ्या योग्यतेस चढले. ज्या कोणास या गोष्टीविषयीं खात्री करून घेणें असेल त्यानें आगगाडी निर्माण करणारा **स्टिफेन्सन्**, विद्युच्छास्त्रांत नवीन शोध व कल्पना काढून रायल सो-सायटीचा प्रेसिडेंट झालेला **फाराडे**, व अशा दुसऱ्या अनेक थोर पुरुषांचीं चरित्रें वाचावीं. जगाचे सर्वांत श्रेष्ठ उपकारकर्ते कोण याचा विचार करितां, जे प्राप्त झा-लेल्या संपत्तीची वांटणी कशी करावी हें सांगतात ते नव्हेत, तर ती संपत्ति जे उत्पन्न करितात ते होत. लिहिण्यावाचण्याचें काम हें संपत्तीची मोजदाद कर-ण्याचें व ती वांटण्याचें आहे, उत्पन्न करण्याचें नव्हे. ह्मणून ब्राह्मणांनीं अधिक श्रेयस्कर उद्योगास लागणें अत्यंत इष्ट आहे. या विषयावर पुष्कळ माहिती देण्या-सारखी आहे, परंतु तिचें येथें दिग्दर्शन करण्यापलीकडे जातां येत नाहीं.

ज्या कोणास या प्रकारची शाळा काढायाची असेल त्यानें शाळेंत कोणते धंदे शिकवायाचे ते ठरवितांना आपणांजवळ भांडवल किती आहे व साधनें कोणतीं आहेत हें पाहून ते ठरविले पाहिजेत; व प्रत्येक शहराच्या किंवा गांवाच्या स्थि-तीवरून हे धंदे ठरतील. ते ठरवितांना डाक्तर, एंजिनीयर, व नव्या व जुन्या चा-लीचे कांहीं अनुभविक गृहस्थ यांची कमिटी करून ते ठरवावे; असें केल्यानें को-णास मोठें दुःख होईल असें काम ब्राह्मणांस शिकविलें जाणार नाहीं व शिवाय

प्रकृतीच्या व सामर्थ्याच्या मानानें कामें वाटलीं जातील. शाळा काढणारावर जी एक मोठी जोखीम आहे ती ही कीं मुलगा शाळेंत पहिल्या मराठी इयत्तेंत आ- ल्यापासून त्यास योग्य उद्योग सांगितला पाहिजे व त्यास विलकुल इजा न होतां त्याच्या श्रमापासून महिना एक रुपया उत्पन्न होऊं लागला पाहिजे. कदाचित् पालकांनीं इंग्रजी शिक्षणाच्या आरंभीं मोठा मुलगा शाळेंत घातला तर त्याच्या श्रमापासूनही दोन अडीच रुपये उत्पन्न झाले पाहिजेत. सर्व शिक्षणक्रमांत दर- साल आठ आण्यांनीं श्रमाची किंमत वाढत गेली पाहिजे. आतां कित्येक अनुभ- विक एंजिनियरांचें व कारखानदारांचें या कामीं मत घेतलेलें आहे, व रोजच्या तीन तासांच्या श्रमानें सरासरीनें इतकी किंवा अधिकच प्राप्ति व्हावी असा त्यांचा अभिप्राय पडतो. उद्योगधंद्याचें सामान, जागा वगैरे मिळून सुमारें २०० मु- लांच्या शाळेस ५००० रुपये भांडवल आरंभीं लागेल, असा त्यांचा अदमास आहे. या पांच हजारांचें व्याज व यंत्रांची दुरस्ती शाळेच्या चालू उत्पन्नांतून निघण्याच कठीण नाहीं. शिवाय या तऱ्हेनें जे एकदां शिक्षणक्रमांतून बाहेर पडतील, त्यां- सच उद्योगाच्या, किंवा सामान्य शिक्षणाच्या, शाळांमध्यें शिक्षकाचें उत्तम काम क- रितां यावें, ह्मणून पुढें दोन वर्षें शाळेंत शिक्षकाच्या कामीं अर्ध्या पगारावर ला- वितां येईल, व या रीतीनें हा शिक्षणाचा धंदाही शिकवितां येईल. अशा तऱ्हेनें तयार झालेल्या शिक्षकांस पुष्कळ म्युनिसिपालिट्या व संस्थानें अधिक पसंत करि- तील, व उद्योगशाळांच्या प्रसारास व उत्कर्षास तेच कारण होतील. मेडिकल व एंजिनियरिंग कालेजमध्यें प्रवेश होण्यास यू. एस्. एफ्.ची परीक्षा व इंग्रजी व- गैरे विषयांचें विशेष ज्ञान बस्स आहे, अशाविषयीं युनिव्हर्सिटींतही खटपट कर- णारे कांहीं मिळतील, व उद्योगशाळेंतील लोक अधिक चांगले डाक्तर, ओव्ह- सीयर, वगैरे होतात असें सर्वांच्या लक्षांत येईल. याप्रमाणें या शाळेंत शिक- णारांस कलाकौशल्य व नौकरी यांखेरीज दुसरेही किफायतीचे पुष्कळ मार्ग उ- त्पन्न होण्याचा संभव आहे. व कर्तृत्व अंगीं आल्यास त्यांस त्यांची कधींच उणीव पडणार नाहीं.

धंदेशिक्षणासंबंधानें व शेतीच्या अभ्यासासंबंधानें आजपर्यंत कित्येक ठिकाणीं वर्ग काढण्यांत आले, परंतु त्यांमध्यें दिलेल्या शिक्षणाचा कांहीं उपयोग होत नाहीं, जमेपेक्षां खर्च अधिक होतो, व त्यांमध्यें ज्या योग्यतेचीं मुलें यावीं त्या योग्य- तेचीं येत नाहींत, इत्यादि कारणांमुळें अशा शाळांबद्दल सर्वत्र गैरभरंवसा झालेला आहे. या वर्गांची अशी दशा होण्याचें खरें कारण हें कीं ज्या मालाचा फारसा खप नाहीं किंवा ज्या ज्ञानाचा फारसा उपयोग नाहीं असें ज्ञान विद्यार्थ्यांस दिलें जातें; व आधुनिक ग्र्याज्युएट जसे गणित शिकून तें लवकर विसरतात, त्याप्रमाणें वर्कशापच्या विद्यार्थ्यांची स्थिति होते. वर्कशापमध्यें दगडी कोळसे उचलून, एं- जिन घांसून, सुतारकाम करून, नंतर जी नौकरी मिळते ती जर खडी मोजून

घेण्याची असेल, तर वर्कशापमधलं बहुतेक अर्धवट झालेलें शिक्षण शिक्षा म्हणूनच घेतलं असा अर्थ होतो. याप्रकारचा पूर्वीचा अनुभव पाहून या शाळेंत जे धंदे शिकवायाचे त्यांच्या शिक्षणाचा हेतु ते धंदे फारच उत्तम प्रकारें करितां यावे किंवा त्यांत सुधारणा व्हावी, हा डोळ्यापुढें धरून उपयोग नाहीं. हे हेतु साध्य झाल्यास उत्तमच; परंतु मुख्य जो मुद्दा पाहायाचा तो हा कीं ज्या प्रकारच्या मालाचा खप आहे, व ज्या प्रकारचा श्रम व्यवहारांत फार लागतो, तो माल तयार व्हावा व त्या प्रकारचा श्रम करितां यावा; आणि मुलांनीं केलेल्या श्रमास तत्काळ किंमत यावी. या दृष्टीनें पुढील धंदे शिकवितां येतील.

वनस्पतिशास्त्राखालीं येणारे धंदे. **बगीचा,** इंग्रजी व देशी बागेंतील झाडांची माहिती; फुलें, फळें, व बीं गोळा करणें, इत्यादि. **बागाईत,** भाजीपाला, वगैरे उत्पन्न करणें. **जिराईत,** धान्यांची लागवड वगैरे. या सर्व गोष्टी माळी व शेतकरी जशा करितात तशाच करायाच्या. कारण पाणी घालण्यापासून तों बागेच्या विक्रीपर्यंत सर्व काम फायदेशीर उत्पन्नाचें झालें पाहिजे. **ओषधिसंग्रह,** वनस्पतींची ओळख व त्यांचा संग्रह करण्याची माहिती.

रसायनशास्त्राखालीं येणारे धंदे. रंग देणें, तेलें व अर्क काढणें, मेवामिठाई तयार करणें, वगैरे.

चित्रकला व संगीत. नकाशे काढणें, चित्रें काढणें (कागदावर, भिंतीवर, पडद्यावर, वगैरे), लिथोग्राफचें काम करणें; कागदाचीं, फडक्यांची, रबराचीं, मातीचीं चित्रें करणें, बाजे तयार करणें, इत्यादि.

पदार्थविज्ञान. हरतऱ्हेचीं खेळणीं, वगैरे. फोटोग्राफ काढणें; यंत्रें दुरस्त करणें; घड्याळांचें काम; वगैरे.

कलाकौशल्यें, सुतारकाम, ओताऱ्याचें, काताऱ्याचें व हस्तिदंती काम; हत्यारें, डब्या, कंदील, गुंड्या, वगैरे तयार करण्याचें काम; फिटरचें काम; खोदींव काम; मुलाम्याचें काम; कंपाझिटरचें व छापण्याचें एकंदर काम; इत्यादि.

याप्रमाणें हवीं तितकीं कामें आहेत. परंतु तीं शिकविण्याकरितां चांगले मातीतगार व शोधक गृहस्थ व कारागीर लागतील; व त्यांची संख्या फार लागल्यास फायदा होणार नाहीं. म्हणून बाजारांत चौकशी करून जीं कामें फार महत्वाचीं तीं ठरवून त्यांचें शिक्षण मात्र दिलें पाहिजे, व योग्य क्रमानें ते ते धंदे चालविले पाहिजेत. ठिकठिकाणच्या स्थितीप्रमाणें हे क्रम भिन्न होण्याचा संभव आहे. परंतु कोणीही विचार केल्यास याप्रमाणें शाळा चालण्यास हरकत नाहीं असें त्याच्या लक्षांत येईल.

या प्रकारच्या शाळा बहुतेक सुधारलेल्या देशांत आहेत, त्यांस केवळ कमी अधिक पूर्णत्वाचें व व्यावहारिक शास्त्रीय शिक्षणाचें स्वरूप आलेलें आहे. शिवाय अशी शाळा पूर्णत्वास येते तेव्हां तिचा फायदा वाढतो, व मग वाफेसंबंधी, विजे-

संबंधी, यंत्रांसंबंधी अधिकाधिक ज्ञान देण्यास व काम करून घेण्यास साधनें तयार होतात. हा असा तळचा पाया उत्तम व अढळ झाल्यावर त्यावर पुढें मोठ्या वर्कशापची किंवा पालिटेक्निक इन्स्टिट्यूटची इमारत उभारणें सोपें आहे. परंतु या अशा वरिष्टप्रतीच्या शाळा आधीं काढल्यास त्यांस योग्य विद्यार्थीच मिळत नाहींत, व जो त्यांत शिकायास येतो तो पुढें अमुक धंदा करायाचा म्हणून येत नाहीं, तर पुढें अमुक प्रकारची नौकरी मिळवायाची म्हणून येतो. ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, व तीवरून नवा पाया जो घालायाचा तो फार मोठे हेतु मनांत आणून घालूं नये, तर कमी योग्यतेचे, परंतु व्यवहारांत अधिक उपयोगी व अधिक साध्य असे ते असावेत.

गरीब लोकांनीं अशा शाळेंत आपलीं मुलें घातल्यास त्यांचा फार फायदा होईल; ज्ञातीस नवी उद्योगाची दिशा लागेल; व सर्व धंद्यांत विशेष बुद्धीचा उपयोग झाल्यानें समाजाचें खरें हित होईल. ब्राह्मण हल्लीं इतर जातींपासून विभक्त असल्यासारखे आहेत, तसे राहणार नाहींत; उभयतांमध्यें स्नेहभाव उत्पन्न होईल; व ब्राह्मणांची विद्या सर्वांस उपयोगीं पडूं लागेल. मग रयतेचें हित ब्राह्मणांच्या हातून अधिक होईल व तिजविषयीं खरा कळवळाही त्यांमध्यें वागेल. उद्योगाच्या स्वतंत्र प्राप्तीनें मनास जी थोरवी, जो उदारपणा व जी प्रामाणिकपणाची हौस येते, ती शुद्ध विद्याव्यासंगानें येणें मुष्कील आहे. याकरितां ही नवीन शिक्षणाची दिशा गरीब ब्राह्मणकुटुंबांनीं अंगीकारणें आवश्यकच आहे.

अमक्या मिशनरी शाळेच्या विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं मिळून आपलें विद्यालय वांधलें, आपली व्यायामशाळा बांधली, खेळायाचें पटांगण साफ केलें, सामान तयार केलें, बाग रंगारूपास आणिली, अशा गोष्टी ऐकिल्या म्हणजे शाळेंतील मुलांस च नव्हे, तर थोरल्या पुरुषांसही आश्चर्य वाटतें व त्या विद्यार्थ्यांची धन्यता कवूल करावी लागते; परंतु हाच प्रयोग इकडील शाळांत व कालेजांत ज्या विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं करून पाहिला आहे, त्यांस ब्राह्मण विद्यार्थ्यांस आपल्या संस्थेचें क्षुल्लक कामही उत्साहानें करायास नको असतें, असा अनुभव आलेला आहे. वर सांगितल्या प्रकारची शाळा काढल्यास अशी स्थिति उरणार नाहीं. थोड्या वर्षांत मुलें स्वतः आपलीं शाळागृहें वांधतील, आंतील सामान तयार करितील, शास्त्रीय प्रयोगाचीं उपकरणें घडतील, बागवगीचा करून शाळेस नित्य सुशोभित ठेवतील व आपल्या **'शाळेचा अभिमान'** शिकतील. मग तो अभिमान तीं जन्मांत विसरणार नाहींत. दुसऱ्या शाळांच्या इमारती, सामान वगैरे तयार करण्याचें काही त्यांकडेच येऊं लागेल व त्यांचा उत्साह व उदाहरण पाहून सर्व शाळांवर सत्परिणाम होईल. या प्रकारची एक उद्योगशाळा देखील अनेकप्रकारें ब्राह्मणसमाजाचें फार मोठें हित करील असें यावरून लक्षांत येईल.

भाग १३ वा.

विशेष कर्तव्यांविषयीं सूचना.

११८. विद्याखात्यास सूचना. विद्याखात्यास जी पहिली सूचना करायाची ती ही कीं, त्याच्या अधिकाऱ्यांनीं शिक्षणविषयक प्रयोगांस उत्तेजन द्यावें. शिक्षणाचा चालू प्रकार निर्दोष नाहीं असें दाखविण्याकरितांच हा ग्रंथ लिहिलेला आहे. चालू प्रकारांत जे दोष दिसले ते येथें वर्णन केलेले आहेत. विद्याखात्यानें मनापासून चौकशी आरंभिल्यास येथें दाखविल्यापेक्षां एखाददुसरा दोष खरा नाहीं असें कदाचित् दिसून येईल, परंतु उलट दुसरे कित्येक दोष जे माझ्या पाहण्यांत आलेले नाहींत ते चौकशींत बाहेर पडतील. ही चौकशी आरंभण्याचा एक हेतु हा कीं असें दोषाविष्करण व्हावें, दुसरा हा कीं विद्यादानाचे गेल्या वीस वर्षांत जे परिणाम सर्व जातींवर कमीअधिक प्रमाणानें झालेले आहेत, त्यांत अनिष्ट कोणते व ते विद्यादानामुळेंच झाले आहेत कीं नाहींत, व झाले असल्यास विद्यादानाच्या पद्धतींत कोणते फेरफार करावे, या गोष्टींविषयीं निश्चय व्हावा व सर्व लोकांस कोणत्या गोष्टीची सावधगिरी ठेवायाची याविषयीं बोध व्हावा. विद्याखात्याच्या ताब्यांत जो शिक्षणक्रम आहे त्या सर्वांत स्थूल दोष आहेत, ही गोष्ट ओळखून विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनीं मनांत राग किंवा खेद मानण्याचें कारण नाहीं, कारण कोणतीही गोष्ट आरंभींच उत्तम प्रकारें सिद्ध होत नाहीं व विद्याखात्यानें एतद्देशीयांस पाश्चिमात्य विद्या शिकविण्याचें हातीं घेऊन फार दिवस झालेले नाहींत. आरंभिलेल्या पद्धतींचे परिणाम पहायाचा हाच काळ आहे. शिवाय, इंग्लंड, युरोप व अमेरिका यांमध्यें शिक्षणविषयाकडे विचारी लोकांचें लक्ष जाऊन, त्याविषयीं जारीनें ऊहापोह सुरू होऊनही फार वर्षें झालीं नाहींत. या पुस्तकांत दाखविलेले दोष लक्षांत येऊनच पाश्चात्य शिक्षणपद्धती सुधारत गेल्या व त्या सुधारण्याचा कालक्रमानें आतां येथेंही प्रसंग आलेला आहे.

विद्याखात्याचे वरिष्ठ अधिकारी व त्यांच्या हाताखालचे इन्स्पेक्टर सुज्ञ व उदार बुद्धीचे आहेत अशी खात्री असल्यामुळेंच त्यांस कांहीं सूचना करण्याचें येथें साहस करीत आहें. माझ्या मतें **इन्स्पेक्टरनीं व त्यांच्या हाताखालच्या फौजेनें शाळातपासणीच्या कामांत हल्लीं जी शिस्त घातली आहे ती अत्यंत घातक आहे. शिक्षकानें शिक्षणाच्या द्वारें काय पैदास केली हें ते पहातात, ती कशी केली हें ते पहात नाहींत;** यामुळें **शिकून** उत्तम तयार व्हावयाची जबाबदारी विद्यार्थ्यांकडे जाते, **शिकवून** उत्तम तयारी करवायाची ही जबाबदारी शिक्षकांस ओळखत नाहीं. आधीं तपासणी करणारांस वेळ थोडा असतो, तेव्हां तेवढ्या वेळांत त्यांनीं मुलांची कशी काय त-

यारी आहे तिची चांचणी पाहिली, तरी, ज्यांस आपण पगार देत आहों त्यांच्याच श्रमाचें हें सर्व फळ आहे, असें मानण्यास त्यांस काय जागा आहे ? या गोष्टीचा- ही त्यांनीं प्रत्यय आणून घेतला पाहिजे. शाळेंत जाण्यापूर्वी शिकविलेल्या ध- ड्यांच्या पुढचा अमक्यानें अमुक धडा शिकवून दाखविण्याची तयारी ठेवावी अशी सूचना द्यावी; व शाळेंत गेल्यावर हें काम कसें होतें तें पाहून, जसा नवा धडा शिकविला तसेच पूर्वीचे धडे शिकविले आहेत कीं नाहींत याविषयीं मुलांची परीक्षा द्यावी. थोड्या वेळांत या रीतीनें शिक्षकांचे शेंकडों दोष ध्यानांत येतील, त्यांची पात्रापात्रता कळेल, व त्यांस सुधारणेचे कोणते उपाय करावे हें सांगतां येईल. शिक्षणविषयावरील ग्रंथांचें विद्याखात्याच्या सर्व नौकरांस कमीजास्ती ज्ञान असलें पाहिजे, शिक्षणाचे हेतु कळले पाहिजेत व त्यांविषयीं शिक्षकांस प्रश्न विचारून त्यांची परीक्षा घेतली पाहिजे. हें एवढें केलें तरी देखील शिक्षकांची पुष्कळ सुधारणा होईल.

प्राथमिक शाळांपैकीं ज्या शाळा शहरांत आहेत त्यांची स्थिति वाईट असण्याचें कारण नाहीं. प्राथमिक शाळेंतील शिक्षकांस नवें वळण लावण्याचें काम सर्व ने- टिव्ह डेपुटींनीं मनापासून करावें; देशसेवेचा हा मार्ग त्यांच्या ताब्यांतील आहे, व डायरेक्टर व इन्स्पेक्टर त्यांस सर्वांशीं सहाय आहेत असें त्यांनीं समजून चा- लण्यास हरकत नाहीं. हीच गोष्ट हायस्कुलांच्या हेडमास्तरांस लागू आहे. महा- राष्ट्रांतील हायस्कुलांवर जे हेडमास्तर आहेत त्यांमध्यें चौघेजण उत्तम विचारी, शोधक व कल्पक आहेत, असें मला माहीत आहे, व शिक्षकवर्गांतही त्यांची तशीच ख्याति आहे. परंतु या त्यांच्या गुणांचा देशास चांगला उपयोग होण्यास त्यांनीं उत्साह अंगीं धरला पाहिजे, व जर गर्व, हेकटपणा, एकमार्गीपणा किंवा दीर्घसू- त्रीपणा त्यांच्या अंगीं असला तर तो मन मोठें करून झाडून टाकण्यास त्यांस कां उशीर लागावा ? त्यांनीं कोणतेही शिक्षणविषयक प्रयोग आरंभिल्यास त्यांस वरि- ष्टांची परवानगी मिळेल, एवढेंच नव्हे, तर त्यांची वाहवाही होईल. आतां कि- त्येकांस वार्धक्यामुळें इतकी उमेद नसेल, तथापि त्यांच्या हाताखालीं कांहीं चांगलीं माणसें आहेत, त्यांस तरी उत्तेजन देण्याचें त्यांस अवघड नाहीं; जसें दुसरें सर्व महत्त्वाचें काम तीं माणसें पहातात तसें हें अगदीं आवश्यक काम त्यांकडून हो- णार नाहीं काय ? धर्मकृत्य तेवढें उपाध्यायाकडे, तद्वत् चालू आहे तें करण्याचें काम आमचें व प्रयोग करण्याचें काम सरकारी मदतीकरितां धडपड करणाऱ्या खासगी शाळांचें, अशी एवढ्या थोरल्या विद्वानांनीं भरलेल्या खात्याची कां स्थिति असावी ? विद्यादानाच्या दुष्परिणामांचे दुसऱ्यांच्या मुलांवर परिणाम होत आहेत तेव्हां त्यांत आपलें काय जातें, असें मनांत आणून परद्वीपस्थ माणसें स्वस्थ व- सोत, परंतु खुद्द स्वतःच्या मुलांवर व आपल्याच कुटुंबांतील दुसऱ्या मुलांवर दु- ष्परिणाम होत असतां स्वस्थ राहणारे असे आम्ही विद्वान् ब्राह्मणच जगाच्या पा-

ठीवर आहों ! 'पाहूं या, या पुस्तकावर **ग्रायर** साहेब काय अभिप्राय देतो तो,' असें ह्मणून पुष्कळ अजागळ लोक स्वस्थ वसतील हें मी जाणून आहें.

भावी शिक्षक सुधारण्याकरितां ट्रेनिंगकालेजें सुधारलीं पाहिजेत व नवीन पद्धति सुरू करणें इष्ट आहे, असें वाटल्यास सर्व क्रमिक पुस्तकेंही सुधारलीं पाहिजेत. या गोष्टी ट्रेनिंगच्या हल्लींच्या एक दोन वरिष्ठांच्या ध्यानांत आलेल्या आहेत असें ऐकतों, व जरी त्यांनीं चिंतिलेल्या सुधारणा कदाचित् निराळ्या असल्या, तरी त्यांविषयीं माझा वहुमान आहे. त्यांनींही थोड्या अधिक आवेशानें हें काम हातीं धरावें. परंतु ते वापडे काय करितील ? आमच्या इकडील वहुतेक संस्थांची अशी स्थिति आहे कीं पोहणारे थोडे, व त्यांच्या जीवावर तरून जाणारांची संख्या फार. एक एका पोहणाराच्या कंवरेस हात देण्यास गळके भोंपळे गळ्यांशीं वांधून 'मला तारा, मला तारा' ह्मणून ओरडणारे पांच पन्नास जण गर्दी करितात. विचाऱ्या पोहणारास त्यांची कींव येते, व ते वुडणार तर खरेच, परंतु भोंपळ्यांच्या भारानें तत्काळ त्यांचा प्राण जाऊं नये ह्मणून तो आपलें सर्व सामर्थ्य त्यांच्या गळ्याचे भोंपळे सोडविण्यांत खर्च करितो; व अखेरीस सर्वांची जी गति ती आपली असें जाणून निराश होतो.

ज्या खासगी शाळा आहेत त्यांस विद्याखात्यानें थोडें अधिक योग्य स्वातंत्र्य द्यावें. सामाजिक वहुमताचा खासगी शाळांवर जसा लौकर परिणाम घडतो तसा सरकारी शाळांवर घडत नाहीं.. सामाजिक वहुमतास अनुसरून कांहीं योग्य फेरफार करणें खासगी शाळांस कांहींसें जरूर होतें, कायमच्या पगाराच्या सरकारी शिक्षकांस त्या वहुमताची फिकीर नसते. या कारणामुळें सरकारी शाळांपेक्षां खासगी शाळांवर **शिक्षणपद्धतीच्या वाबतींत** कमी नजर असल्यास मुळींच नुकसान होणार नाहीं; व अशा विशेष स्वातंत्र्यास व भरंवशास कोण योग्य व कोण अयोग्य, हें इन्स्पेक्टर यांस ठरविण्याचें अवघड नाहीं. शाळातपासणीची वर जी पद्धति सांगितली ती खासगी शाळांस विशेषेंकरून योग्य आहे; व तीच अवश्य लावावी, ह्मणजे पैसे वांचविण्याकरितां अयोग्य माणसांचा खासगी शाळांत व्यवस्थापक भरणा करणार नाहींत. जोंवर शिक्षक योग्य आहेत, म्याट्रिक्युलेशनसारख्या स्वतंत्र परीक्षेंत शेंकडा अमुक ठराविक प्रमाणावर मुलें पास होत आहेत व मुलांच्या संख्येवरून शाळेवर लोकांचा किती भरंवसा आहे हें दिसत आहे, तोंवर शिक्षणाच्या इयत्तांसंवंधानें व आंतील व्यवस्थेसंवंधानें अधिकाऱ्यांनीं ढवळाढवळ करण्याचें कारण नाहीं. अमुक वर्षांत अमुक शिक्षण दिलें जातें, तें देण्याचें योग्य माणसांकडे सोंपविलेलें आहे, शाळेचे व शिक्षणाचे जे हेतु शिक्षक सांगतात ते योग्य आहेत, शिक्षणक्रमांतील पुस्तकें दोष काढण्यासारखीं नाहींत, व फीचें उत्पन्न व सरकारी ग्रांट मिळून (योग्य शिक्षक ठेवून) शाळेचा खर्च भागतो, असें पाहिलें ह्मणजे अधिकाऱ्यांचें काम ह्मालें. याशिवाय शाळेचे काग-

दपत्र, हिशेव, जागा, वगैरेकडेही त्यांनीं चांगलें लक्ष द्यावें, परंतु वाकीच्या शिक्षण-पद्धतीच्या वावतींत व शिक्षणाच्या विषयांत त्यांनीं हात घालूं नये; योग्य दिसतील त्या सूचना कराव्या, दोष दाखवावे, परंतु निश्चयात्मक अनुभव येईपर्यंत प्रयोग करण्यास मोकळीक ठेवावी. हीच मोकळीक सर्व हायस्कुलांसही असावी. आतां विद्याखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस ही सूचना कां केली असें वाटेल; ते ह्मणतील, याप्रमाणें आह्मांकडून मोकळीक आहेच; परंतु ही गोष्ट शिक्षकांस माहीत नाहीं; त्यांस व्यर्थ जखडल्यासारखें वाटत आहे, व इन्स्पेक्टर नेमलेल्या इयत्ते-प्रमाणें मुलांस प्रश्न विचारणार, शिक्षणपद्धतीचा तो विचार करील किंवा न करील, अशी त्यांस भीति आहे. वरील सूचनेप्रमाणें शिक्षक किती वावतींत वांधलेले आहेत, व किती वावतींत प्रयोग करण्यास त्यांस मोकळीक आहे, हें विद्याखात्यानें स्पष्टोक्तीनें कळविल्यास, पुष्कळ शांत माणसांस थोडा उत्साह येईल, व कोणी उ-तावळानें भलतेंच कांहीं करूं नये इतका वंदोवस्त राखण्यास कष्ट पडणार नाहींत.

विद्याखात्यास शेवटची जी सूचना करायाची ती, पूर्वी सांगितलेल्या कांहीं अनुभवांवद्दल त्यांनीं विशेष चौकशी करून योग्य उपाय योजावे ही होय. मुलें पालकांच्या साह्याच्यानें शाळा कां बदलतात, कोणी शहर सोडून दुसऱ्या शहरीं कां जातात, याविषयीं मी आपला अनुभव सांगितला आहे. या गोष्टींच्या निवारणार्थ अद्यापपर्यंत वर वर उपाय चालले आहेत. कुणवी व मुसलमान जातीच्या मुलांचा अभ्यास मागें कां पडतो याविषयीं पूर्वी दोन तीन ठिकाणीं जे अनुभव सांगितले आहेत त्यांचा विद्याखात्यानेंच नव्हे तर कनिष्ठ जातींच्या विद्येकरितां काळजी करणाऱ्या सर्व लोकांनीं अनुभव द्यावा. शिवाय मोठ्या उत्तेजनानें जे विद्वान् तयार होतात ते कशाप्रकारचे पुढें निघतात हेंही पहावें. एक ब्राह्मण विद्यार्थी मोठी विपत्ति सोसून बी. ए. होतो, एक पार्शी मध्यम स्थितींत असून बी. ए. होतो, व एक मराठा व एक मुसलमान दीर्घ उत्तेजनानें बी. ए. होतात असें समजूं; या चौघांच्या पुढील आयुष्यक्रमांत निरनिराळ्या मनोवृत्तींनीं त्यांचें आचरण नियमित होईल. ब्राह्मण आपणांस श्रेष्ठ मानून स्वस्थ राहील; पार्शी इतरांस तुच्छ मानून युरोपीयांच्या अनुकरणास व द्रव्यप्राप्तीच्या मार्गास वेगानें लागेल; त्यास काय करूं व काय न करूं असें होईल. कुणब्यांत ब्राह्मणाचेच दोष, अधिक ब्राह्मणाचा व्यर्थ द्वेष दिसेल; पार्शाची चलाखी दिसणार नाहीं; व मुसलमानांत आपण व आपले अज्ञानबंधु सर्वच श्रेष्ठ, व बाकी सर्व कमी योग्यतेचे, कदाचित् तिरस्कारास व द्वेषासही योग्य अशी (वाह्यात्कारी न दिसली तरी) अंतर्यामीं समजूत असेल. या सर्व हीन मनोवृत्तींचें आकलन करणारे सर्व ज्ञातींत लोक आहेत, परंतु सामान्य तऱ्हा ही अशी आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. उत्तम मनोवृत्तींचें पोषण करणारें असें सर्व जातींचें एकत्र शिक्षण होण्यास एकाच योग्यतेच्या मुलांचा एकत्र संग्रह झाला पाहिजे. परंतु तो हल्लीं नसल्यानें व शाळा तुफान वाढल्यानें

अयोग्य व हानिकारक मनोवृत्तींचा प्रादुर्भाव होत आहे. पूर्वी सांगितल्याप्रकारच्या लहान शाळांस सरकारची अधिक मदत असावी, व होतां होईल तों जातिभेदाप्रमाणें मुलें वांटलीं जावीं. ह्मणजे नैतिक शिक्षण सुधारेल व उपदेशासंबंधानें व तो मनावर ठसविण्यासंबंधानें, क्याथालिक व प्राटेस्टंट यांच्या मिश्र समुदायांत जशी अडचण पडते तशीच इकडेही पडते, ती पडणार नाहीं. सरकारी शाळा तरी एवढ्या मोठ्या ठेवण्यांत खर्चाच्या मानानें किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें काय फायदा आहे? सरशेवटीं विद्याखात्यास अशी विनंति आहे कीं, पूर्वी सांगितल्या प्रकारच्या उद्योगशाळा निघण्यास त्यांनीं पहिल्यापासून मदत करावी; व जर शुद्ध खासगी उत्पन्नानें अशा शाळा निभत नाहींत असें अनुभवास आलें तर इतर शाळांच्या उत्तेजनास जे नियम लागू आहेत तेच या शाळांसही लागू करावे. ब्राह्मण नादार मुलांच्या प्रश्नाचा शेवटचा निकाल लावण्याचा हाच एक उपाय आहे. विद्याखात्यावर जी ब्राह्मणांची खप्पामर्जी झाली आहे ती जाऊन त्यांस अशा उत्तेजनानें संतोष व कृतज्ञता वाटेल. नादारांसंबंधानें पुढील कलमांत एक सूचना केली आहे तिचाही विद्याखात्यानें विचार करावा.

११९. **उदार गृहस्थांस सूचना.** औदार्य हा ईश्वरी गुण आहे व तें हातून घडण्यास ईश्वरी प्रेरणाच लागते; परंतु इतर सर्व गुणांप्रमाणें औदार्याचा उत्तम उपयोग करणें सर्वांसच साधतें असें नाहीं. विद्येचें महत्व जाणून, गरीबांच्या विद्येची सोय व्हावी, ह्मणून पुष्कळ उदार पुरुष द्रव्यद्वारा मदत करण्यास पुढें येतात. ही त्यांची मदत योग्य लोकांस मिळावी हें उचित आहे. उदार गृहस्थांत राजे रजवाडे व श्रीमंत, या सर्वांचा समावेश केलेला आहे. गरीब लोकांत ज्यांचा समावेश करायाचा ते इतके आहेत कीं सर्व उदार पुरुषांचें सर्व औदार्य त्यांस उत्कृष्ट विद्या देण्यास पुरायाचें नाहीं, ह्मणूनच हें औदार्य वांटून देतांना विचार केला पाहिजे. नादारी ज्यांस द्यावी अशीं माणसें निवडतांना पहिली गोष्ट जी पहायाची ती विद्यार्थ्यांची विद्याग्रहणाची योग्यता होय, परंतु असे योग्य विद्यार्थीही असंख्य आहेत तेव्हां त्या सर्वांस न्याय झाला पाहिजे. कांहींच न मिळविणाराच्या मुलांस कोणच्याच शाळेची फी देतां येणार नाहीं; दहा रुपये मिळविणारास प्राथमिक शाळेची देतां येईल, परंतु कनिष्ठ इंग्रजी शाळेची देतां येणार नाहीं; पन्नास रुपये मिळविणारास हायस्कूलची फी देतां येईल, परंतु कालेजचा खर्च सोसवणार नाहीं. ज्यास ज्या शिक्षणाचा खर्च चालवितां येत नाहीं तो त्या शिक्षणाच्या बाबतींत गरीबच होय. परंतु जो अमुक एका इयत्तेपर्यंत मुलाच्या विद्येचा खर्च चालवितो, त्याचें आत्मावलंबन अधिक असतें, त्यानें मुलांस चांगला कित्ता घालून दिलेला असतो. हा त्याचा दोष आहे काय? मग वरिष्ठप्रतीच्या शिक्षणांत त्यास सर्वांनीं कां विसरून जावें? परंतु मराठी शाळेंत जा, इंग्रजी शाळेंत जा, कालेजांत जा, नादारीकरितां शून्यप्राप्तीच्या लोकांची गर्दी, त्यांचींच मुलें तोंडें

वेंगाडून मागें लागतात व ज्या गरीबांनीं मुलांस योग्य स्वाभिमानाचें थोडें वळण लावलें तीं माना खालीं घालून दूर दूर उभीं राहातात. अखेरीस परिणाम काय होतो? ज्यांस मिळतो त्यांस शेवटपर्यंत आश्रय मिळतो व जीं आश्रयास अधिक पात्र, ज्यांनीं पूर्वी स्वावलंबन दाखविलें, पन्नासांतील दहा रुपये मुलांच्या विद्येकरितां ज्यांनीं खर्च केले, त्यांचीं मुलें वरिष्ठ विद्येचा क्रम सोडून घरीं बसतात. ही स्थिति योग्य नाहीं, इचे वाईट परिणाम होत आहेत असें पूर्वी दाखविलें. याकरितां औदार्याच्या वांटणीचे कांहीं नियम केले पाहिजेत. प्राथमिक शाळेंत अगदीं गरीबांस मात्र नादार द्यावें, ज्यांनीं प्राथमिक शाळेची फी कष्टानें दिली त्यांस कनिष्ठ इंग्रजी शाळेंत नादार द्यावें, ज्यांनीं या ठिकाणीं मोठ्या कष्टानें फी दिली त्यांस मध्यम शिक्षणाच्या शाळेंत नादार द्यावें; व ज्यांनीं शाळेंतील सर्व शिक्षणाचा खर्च स्वतः मोठ्या कष्टानें सोसला, त्यांस मात्र कालेजांत नादार द्यावें. याप्रकारें वांटणी करूं गेलें तरी पुष्कळ पात्र विद्यार्थी शिलक उरतील ही गोष्ट मनांत आणिल्यास ही वांटणी अन्यायाची आहे असें कोणी म्हणणार नाहीं. असे नियम केल्यास जीं अगदीं गरीब मुलें बुद्धीच्या जोरानें स्कालर्शिपा वगैरे मारून विद्या करतील तींच पुढें वरिष्ठ शिक्षण मिळवितील; बाकीचीं जीं गळतील तीं लवकर उद्योगास लागतील. उदार पुरुषांस विद्येच्या या दिशेस आपलें औदार्य खर्चावेंसें वाटल्यास त्यांनीं या व्यवस्थेचा विचार करणें इष्ट आहे.

ज्यांस उद्योगाचें महत्व विशेष वाटत असेल, व गरीब परंतु बुद्धिमान् मुलांनीं उद्योगधंदा करून संपत्तीच्या **उत्पत्तीस** मदत करावी असें वाटत असेल, त्यांनीं पूर्वी सांगितल्या प्रकारच्या उद्योगशाळा स्थापन करण्यास लागणारें भांडवल देऊन या द्वारें परोपकार करावा. वास्तविक पहातां अशा शाळांस लागणारें भांडवल शेअर्स काढूनही उभारतां येईल, परंतु हा मार्ग विलंबाचा आहे, व उदाहरण घालून दिल्याखेरीज कोणास खात्री येत नाहीं, कोणी खटपटींत पडत नाहीं, व फायदा होईल ही समजूत बहुधा मनांतल्या मनांत राहते. हिंदुस्थानांत तरी अशी स्थिति आहे. परोपकारी उदार माणसांची याकरितां आरंभीं मदत पाहिजे. आपलें नांव आपल्या समाजांत चिरस्थायी व्हावें, आपल्या पुढील संततीस अभिमान वाटण्यास व महत्वाकांक्षा बाळगण्यास एक जागा व्हावी, व सार्वत्रिक देशहित व्हावें, असा विचार पुष्कळांच्या हृदयांत वास करीत असतो. अशा गृहस्थांनीं उद्योगवृद्धीच्या शाळा काढण्यास द्रव्यद्वारा मदत केल्यास त्यांचे हेतु उत्तम प्रकारें सिद्धीस जातील.

ज्यांस उद्योगापेक्षां सामान्य विद्याप्रसार महत्वाचा वाटत असेल, त्यांनीं आपलें औदार्य फुटकळ कृत्यें करण्यांत खर्च करूं नये; म्हणजे एकाची फी दे, एकास पुस्तकें दे, एकास स्कालर्शिप दे, इत्यादि या योगें जें हित होतें तें व्यक्तिमात्रास फायद्याचें होतें खरें, परंतु त्याचा पुढें नेहमीं योग्य उपयोग होतोच असें नाहीं.

याकरितां उत्तम शाळा चिरस्थायी व स्वतंत्र होण्यास त्यांनीं मदत करावी. फी व फंडाचें उत्पन्न मिळून शाळेचा खर्च निभावा, नवीन शिक्षणविषयक प्रयोग करण्यास साधनें व स्वातंत्र्य तीस यावें, तिची इमारत, खेळायाच्या जागा, शास्त्रीय उपकरणें, पदार्थांचा व पुस्तकांचा संग्रह, हीं सर्व उत्तम प्रकारचीं असावीं, केवळ शाळेचा लौकिक नव्हे, तर शिक्षकांचा लौकिक व कर्तृत्व वाढेल व तें वाढविण्याची त्यांस ईर्षा राहील असें त्यांस वेतन पडावें, व अशा प्रकारें या शिक्षणाच्या कार्यास उत्तम माणसांनींच हात घालावा, उत्तम माणसें इकडे वळण्यास उत्तेजन असावें, व त्यांची उमेद खचण्यास कारण राहूं नये, अशा कार्मीं परोपकारी पुरुषांचें औदार्य खर्च होणें अत्यंत इष्ट आहे. एक मनुष्यास उत्तम शिक्षण देणें व सर्वांस उत्तम शिक्षण देणारा एक माणूस पैदा करून देणें, या दोन कृत्यांत जें अंतर आहे तेंच अंतर फुटकळ आणि सर्वसामान्य औदार्यांत आहे. तेव्हां ऐपत असेल तर एक उत्तम लहान शाळा स्थापावी व तिचा हेतु शिक्षण व शिक्षक सुधारणें हा असावा; असें करण्यास सामर्थ्य नसेल तर हेच हेतु ज्या संस्थेच्या द्वारें सिद्धीस जातील अशी संस्था पाहून तीस चिरस्थायी व स्वतंत्र होण्यास मदत करावी. याशिवाय उदार पुरुषांस व सर्व सामान्य विचारी आणि कर्तृत्वशील पुरुषांस आणखी एक महत्वाची सूचना करायाची आहे, तिचा उल्लेख पुढें केला आहे.

१२०. स्त्रियांस उपदेश. येथपर्यंत या पुस्तकांत स्त्रियांस कायतो एक दोन वेळ उल्लेख मात्र केला, बाकी सर्व विवेचन पुरुषांच्या शिक्षणाचें व व्यवहारांचें, केलें, असें पाहून माझ्या कित्येक ब्राह्मणभगिनींस राग येईल. परंतु जें आधींचेंच वावनकशी सोनें, त्यास ताव देण्यांत काय फायदा आहे? त्यावर मळ वसला असल्यास रेशमी फडक्यानें तेंपुसून सुंदर लखलखीत केलें ह्मणजे झालें. याच न्यायानें स्त्रियांच्या शिक्षणाविषयीं व स्थितीविषयीं कोठें थोडा उल्लेख मात्र केला, परंतु त्यांच्या मनास दुःख होईल असें कांहीं लिहायाचें नव्हतें व तें लिहूं गेल्यास सांपडणेंही मुष्कील. ज्या स्त्रिया सुखी समाधानी आहेत, त्यांच्या सुखास व समाधानास खंड पडेल, असें पुरुषांनीं कांहीं करूं नये असें माझें मत आहे; परंतु ज्या स्त्रियांस क्लेश सोसावे लागत आहेत, ज्यांची धर्मकर्मांची हौस पुरविली जात नाहीं, ज्यांच्या कुटुंबसुखाच्या भराचा कोणत्याही प्रकारें भंग होतो, त्या सर्वांची स्थिति पाहून माझें अंतःकरण नित्य कळवळतें, व ही हीन स्थिति दूर होण्यास काय करावें हा विचार मनांतून जात नाहीं.

बदफैलींत व दुर्व्यसनांत आपल्या व वडलांच्या कमाईचा सर्व पैसा उडवून पुरुष अल्पायुषी निवर्तल्यावर, आप्त नाहीं, बंधु नाहीं, प्रसंगीं कोणी नाहीं असें पाहून, एका परमेश्वरावर हवाला देऊन पोराबाळांचा धैर्यानें सांभाळ करणाऱ्या अनेक थोर स्त्रिया आहेत. या कर्तव्यांत त्यांची मोठ्या पराकाष्ठेनें राखिलेली जिनगी हळू हळू नाहींशी होते, परंतु तिचें त्यांस इतकें वाईट वाटत नाहीं, परंतु

घर वसलें, कुटुंब उघडें पडलें, योग्यता गेली, हा विचार त्यांच्या मनास अक्षयीं झोंवत असतो. जिनें नुसतें अलंकार घालून मिरवावें, तीस घरच्या घरींच परक्याचें दळण्याचा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां तीस दुःखाचा हुंदका आलेला पाहून कोणाचें अंतःकरण उमळून येणार नाहीं ? परंतु हा प्रसंग हल्लीं एकीवर नाहीं, दोघींवर नाहीं, अनेकांवर येत आहे; परंतु कोणा सोयऱ्याधायऱ्यांस हस्तें परहस्तें आपण होऊन मदत करायाचें सुचत नाहीं; त्यांपुढें दांत विचकायास पतिव्रतेस गेलें पाहिजे, मग त्यांच्या हृदयास घाम आल्यास यावयाचा. स्त्रियांचा कैवार घेऊन वाचाळता करणारांनीं आपल्याच कुटुंबांतील दुखावल्या माणसांचा योग्य परामर्श घेण्याचा कित्ता घातला आहे काय ? मोठी हाल अपेष्टा सोसून व अवून राहून मुलगा मिळविता होईपर्यंत किंवा त्याचा अभ्यास संपेपर्यंत पुष्कळ थोर स्त्रिया कसे तरी दिवस काढतात; देव आतां लवकरच आपणांस चांगले दिवस पुनः दाखवील अशी त्यांस आशा लागते; त्यांचा देवावर अधिकच भाव वसतो, त्यांचे नेमधर्म वाढत जातात; इतक्यांत तरण्या मुलास दुखणें येतें, त्याचा अभ्यास त्यास वाधतो, किंवा वडलांचे रोग त्यामध्यें निपजतात; तो क्षीण होत जातो, स्वर्गवासी होतो. अशा स्थितींत मातेची दुःखदशा पाहवत नाहीं. 'देवा, आह्मांला कशाला जिवंत ठेवलें ? आमचे कां आधींच डोळे झांकले नाहींत ?' असा त्यांचा आक्रोश सुरू होतो; व तो पाहवत किंवा ऐकवत नाहीं. जेथें अल्पायुषी विद्वानाचा मृत्यु होतो, तेथें वहुधा दीर्घायुषी आई त्याचे हाल पाहण्यास जगलेली असते. परंतु अभ्यास करितांना किंवा तो संपल्यावर अल्पायुषी मरण पावणाऱ्या विद्वानांनीं आईची पर्वा केली असते काय, तिची नेमधर्माची हौस पुरवून तीस सौख्य दिलें असतें काय, किंवा आपण अल्पायुषी झाल्यास आईस केवढें दुःख होईल, वायकोस केवढें दुःख होईल, कुटुंवाचा कसा सत्यनास होईल हा विचार अभ्यासाच्या वेळीं त्यांच्या मनांत आला असतो काय ? जिनें आपणांस लहानाचें मोटें करून चांगल्या पंथास लाविलें, तिनें वायकोस सासुरवास केला ह्मणून कित्येक विद्वान् डोक्यांत राख घालतात, आईस अपशब्द वोलतात, तिचा अपमान करितात, व एका नाहींतर दुसऱ्या कामांत तिचें नित्य मन मोडतात. सुनेचा सासुरवास तिच्या मुलांस मानवेल व तीं धष्टपुष्ट दीर्घायुषी होतील हें त्यांस कळत नाहीं; वापडी ह्मातारी आपण कर्तव्य तें केलें ह्मणून मुलाचे सर्व अपराध पोटांत घालते व निमूटपणें दिवस काढिते. वर सांगितल्या प्रकारचीं दुःखें सोसणाऱ्या स्त्रियांच्या कांहीं घरांत दोन किंवा तीन देखील पिढ्या आहेत. विद्वानाचा बाप जीवंत असल्यास त्याची दिनचर्या व त्याच्या विवंचना कशा असतात हें पूर्वी सांगितलेंच; परंतु सांप्रतकाळीं ब्राह्मणसमाजांत उभयतां केस पिकलेलीं वृद्ध जोडपीं फारच थोडीं दिसतात, व थोड्या दिवसांनीं तीं मुळींच दिसेनाशीं होतील कीं काय कोण जाणे ! या कारणानें सर्व दुःखाची धनीण कुटुंबांतील कर्ती स्त्री होते.

मुलगा मिळवता होऊन कुटुंब सुखानें नांदूं लागलें ह्मणजे ह्माताऱ्या आईस जो आनंद असतो तो दुसऱ्या कोणा माणसांत मिळायाचा नाहीं. मुलास मुलेंबाळें व्हावीं, त्यांनीं रोगराईवांचून मोठें व्हावें, त्यांस ममतेनें वागवावें, त्यांस स्नान-संध्या करायास लावावें, देवास न्यावें, खाऊ द्यावा, हें सर्व तिचें कर्तव्य होतें. मुलगा पराक्रमी होत आहे, पैसे मिळवीत आहे, अंमलदार झाला आहे, हें पाहून ह्मातारीस केवढा अभिमान वाटतो ! आपल्या भोंवतीं नातवंडें बसवून ती त्यांस पूर्वीच्या पुरुषांचीं महत्कृत्यें सांगूं लागते, त्यांच्या बापाच्या लहानपणच्या गोष्टी आठवून आठवून सांगते व त्यांमध्यें कुळाच्या अभिमानाचें बीज पेरून देते; परंतु तिची वडवड कित्येकांस रुचत नाहीं ! विचारीचे आयुष्याचे थोडेच दिवस उरलेले असतात; तीस पोंचवून माणसें घरीं येतात तों घर सुनें दिसतें. मुलें फार, तीं लहानमोठीं, तीं एकमेकांच्या खोड्या करितात, कधीं अजारी पडतात; मग सूनबाईस सासूबाईची आठवण होऊन रडें कोसळतें. 'ल्या असल्या तर मुलांस त्यांनीं संभाळलें असतें, कोटें बाहेर घेऊन गेल्या असल्या, औषधपाणी दिलें असतें; ल्या होत्या तोंपर्यंत काळजी नव्हती. आतां या मुलांचें करावें कीं घरचें पहावें ?' असे विचार तिच्या मनांत येऊं लागतात, व तिच्या दुःखांस तेथून खरा आरंभ होतो. सामान्य स्थितींतील माणसांच्या घरांत चाकरमाणसें कुठलीं ? पुरुष अल्प-वयांत मिळवता होऊन निराळा राहिल्यास, घरांत मोठें मूलही नसतें, मग मोठाल्या लेकी व सुना कुठल्या ? घरचें काम करावें तर मुलांची हेळसांड होते, तीं रडतात, ओरडतात व घर हालवून सोडतात; त्यांकडे पहावें तर सैंपाक कोण करील, घरचें काम कोण करील, पुरुषांच्या औषधपाण्याची कोण तजवीज लावील ? अशा या स्थितींत स्त्रीचा काळ जातो. पुरुषांस महत्वाचें काम नसतेंच; ते मग मुलें संभाळूं लागतात; व घरांत कोणी ह्मातारी सैंपाकास तरी हवी ह्मणून त्यांस ज्ञान होतें ! परंतु जिकडे तिकडे ह्माताऱ्या दुर्मिळ झाल्या आहेत, मोलानें लाविल्या तरी त्यांच्या धोरणानें चाललें पाहिजे, नाहीं तर त्यांस परवा नाहीं. अशा स्थितींत बहु-तेक कुटुंबांमध्यें काय परिणाम होतो ! मुलांच्या त्रासानें आई अगदीं गांजून जाते, या मेल्यांस कुणी कुटें अडकावून टाकलें तर वर होईल असें तीस वाटूं लागतें. मुलें चार पांच वर्षांचीं होतांच 'यांस शाळेंत अडकावून टाका कसे' असा तिचा आग्रह पडतो. मुलींच्या शिक्षणाची तीस फारशी परवा नसते खरी, परंतु त्यांसही ती शाळेच्या कोंडवाड्यांत घालण्यास तयार होते. मग मुलें शाळेंत जातांना हट्ट करितात तेव्हां त्यांस घालविण्यास केरसुणीचा बुरखुंडा घेऊन आईच मागें लागते व दोन रट्टे खाल्ल्यावर मुलें रडत रडत शाळेंत जातात. तेथें रूळ हातांत घेऊन त्यांचा समाचार घेण्यास रानटी मास्तर तयारच असतो. या रीतीनें पुष्कळ लहान मुलांस शाळेंत जाण्याची संवय लाविली जाते. घरच्या विपत्तीमुळें मातेचीही माया नाहीं-शी होते, परंतु या विपत्तींतून वर डोकें काढण्याचा उपाय विद्वान् ब्राह्मणांस सांप-

डत नाहीं. मुलींस शाळेंत जाण्याची चटक लागतांच त्या मग घरीं ठरत नाहींत; तान्ह्या मुलास संभाळण्याचा त्यांस कंटाळा येतो, त्या शाळेंत पळतात, व त्यांस आवरणें आईस साधत नाहीं. सारांश पडतील ते कष्ट करून मुलामाणसांचें सुख पाहून त्यांतच जें समाधान वाटेल, त्याहून अधिक सुख पुष्कळ स्त्रियांच्या वांटणीस येत नाहीं. मुली मोठ्या होतांच लग्नाच्या वयाचा कुटुंबांत वादविवाद सुरू होतो, त्यांत स्त्रियांस पड खावी लागते. मुलगी मोठी झाल्यावर योग्य वर मिळण्याची चिंता तिच्या काळजास जाळते. मुलें मोठीं होत जातात तों तों तीं क्षणभर देखील समाधानानें आईजवळ वसेनाशीं होतात. तीं आपल्या अभ्यासांत दंग! 'नको त्रास देऊंसग, तुला काय त्यांत कळायचं आहे?' ह्मणून त्यांचें पदोपदीं उत्तर ऐकून घ्यावें लागतें. एकामागून एक वर्ष अभ्यासांत जातें. मुलाचे डोळे खोल जाऊं लागतात, गाल वसून तोंड फिकुटलेलें दिसतें, हाडें वाहेर निघतात, छातीवर मांस दिसत नाहीं. ही स्थिति पाहून केव्हां केव्हां आईचें मन चरकतें. 'वाळा, तुला होतें तरी काय, तूं अगदींच कसा खाईनासा झालास? हा मेला अभ्यास तरी केव्हां संपणार?' असे नानापरी ती त्यास प्रश्न विचारते, परंतु मुलास कोणी नम्रता शिकविलेली नसते व तो सुधें बोलत नाहीं. 'मला काय झालं आहे? आणखी किती खायचं?' असें तो शेफरून गेल्याप्रमाणें उद्दामपणें उत्तर देतो; त्यास आईची माया कळत नाहीं, व ती जें डोळ्यांपुढें प्रत्यक्ष दुश्चिन्ह पाहते त्यानें जिवास चटका वसूनच ती विचारते हें त्यास उमगत नाहीं. परीक्षा जवळ येते तसतशी तरुण मुलाची प्रकृति अधिकच नाजूक होते, तो दोनचार महिन्यांचें दुखणें घेऊन वसतो. सेवेस आईवांचून दुसरें कोण आहे? केव्हां केव्हां पुरुषांस नौकरीचा जाच भारी, त्यांस फावत नाहीं, ह्मणून मुलांस घेऊन स्वतः स्त्रिया दवाखान्यांत व वैद्यांच्या घरीं जातात; औषधें आणण्यास आपणच तयार होतात; प्रसंग आल्यावर जनलज्जा धरून कसें निभावणार? परंतु चालू शिक्षणानें मुलांची ही अशी घाण होते ती पहात असतां, त्याच तशाच शिक्षणाखालीं मुलींस देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ब्राह्मणज्ञातींत स्त्रिया अद्याप **वीए** झाल्या नाहींत ही गोष्ट कित्येकांच्या हृदयास लागून राहिली आहे! परंतु ज्यांनीं मुलांप्रमाणें अभ्यास केला त्यांस क्षयादि रोगांनीं गांठून अकालीं यमधामास नेलें आहे काय, ही शंका कोणाच्या मनांतच येत नाहीं! शाळेंत शिक्षण होत नाहीं तर घरीं देऊं, अशा स्तुत्य उद्देशानें तरुण जवान स्त्रीसमागमाची घाई करितो. थोडें वहुत शिकवितो, इतक्यांत अल्पवयींच तीस मातृत्व येतें. तीसच त्याची लाज वाटूं लागते; सासू असली तर सुरक्षित बाळंतपण होतें, नाहीं तर, माहेरीं जा, कांहीं तरी कर व प्रसंगांतून पार पड, असा नवरा उपदेश करितो. अशा स्त्रीचे पुढें किती हाल होतात, तिच्या मुलांची काय स्थिति होते, हें मागें एकदा सांगितलेंच; परंतु जर तीस अल्पायुषी मरण आलें, मागें मुली राहिल्या, त्यांस क्षीणता आली, लहानपणींच अपस्मार होऊं

लागला, ह्मणजे मग वापास आपल्या स्त्रीशिक्षणाच्या उत्साहाचें फळ समजून येतें. स्त्रीशिक्षण देण्याचे हे मार्ग नव्हेत; शाळेंत चालू आहेत तेही स्त्रीशिक्षणाचे मार्ग किंवा विषय नव्हेत; घरचें शिक्षण अथवा निर्बंध मोडत आहेत, तें इष्ट नाहीं व स्त्रीशिक्षणाच्या कामीं पुनः विचार केला पाहिजे, हें पुरुषांच्या केव्हां ध्यानांत येईल तें येवो.

याप्रमाणें कांहीं थोडीं स्त्रियांचीं गाऱ्हाणीं उदाहरणार्थ येथें सांगितलीं; त्यांचा अनुभव सर्वांस येण्यासारखा आहे, कदाचित् आलेला असेल. सुधारणा करण्यास घर सोडून लांब जावयास नको; व्याख्यानांचें फारसें कारण नाहीं, थोडें अवलोकन व थोडा विचार पाहिजे. वपनाचे व विवाहाचे दोन प्रश्न सोडविले ह्मणजे सुधारणेची परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाली असें कोणीं समजूं नये. गृहस्थिति सुधारणें हा स्त्रियांस सुखी करण्याचा पहिला मार्ग आहे, व उद्योगावांचून व मनोवृत्तीच्या व धर्मबुद्धीच्या उत्तम शिक्षणावांचून हा मार्ग साध्य नाहीं. जोंपर्यंत या मार्गास कोणी लागला नाहीं, तोंपर्यंत वपन व विवाह यांसंबंधानें विवेचन करतांना त्यांपासून एकंदर कुटुंबसुख वाढेल असें अनुभवावरून सिद्ध करून दाखविणें कठीण आहे, असें मला वाटतें. आरंभीं एकंदर गृहस्थिति सुधारण्याची आवश्यकता आहे, हा विचारच सुधारक व असुधारक यांच्या मेंदूंत प्रकट होत नाहीं! वपन व विवाह हे दोन खुंद करून उभयतांमध्यें शुद्ध खोखोचा डाव चालला आहे!

एतद्देशीय स्त्रियांची केवढी योग्यता आहे, त्यांमध्यें कोणते अमोलिक गुण आहेत, त्यांची धर्मबुद्धि किती नाजूक आहे, व त्यांचें अज्ञान कसें अहितकारी आहे, हें दुसऱ्या '**कुटुंबाभिमाना**च्या' उपदेशांत मीं सविस्तर वर्णन केलें आहे. कित्येक भिन्न स्थितींतील कुटुंबांतील लहानमोठ्या स्त्रियांची दुःखमय स्थिति प्रत्यक्ष पाहिल्यानें वरील विचार सुचलेले आहेत, व ती स्थिति पाहत असतां व आठवून देखील डोळ्यांस टिपें आलीं व येतात. वास्तविक पहातां कांहीं विशेष दुर्धर प्रसंगाच्या वेळचीं हीं दुःखें आहेत असेंही नाहीं. नित्याच्या स्थितींत आयुष्याचा ओघ शांतपणें वाहात असतां त्यांतच ही सर्व खळखळ दिसते. ह्मणूनच सामान्य गृहस्थिति सुधारण्याची आवश्यकता पहिली, बाकी काम मागाहून, असा निश्चय होतो.

१२१. प्रमदावनें. ब्राह्मणांनीं गृहस्थिति कशी सुधरावी, घरांतील माणसांस चांगलें वळण कसें लावावें, इत्यादि गोष्टींचा पूर्वी जें लिहिलें त्यावरून थोडा बोध होईलच, परंतु या गोष्टींचा विचार ज्यानें त्यानें आपला आपण मनःपूर्वक करणें हें बरें. या ठिकाणीं सर्व समाजाच्या हिताची एक गोष्ट सांगून हा ग्रंथ आटपण्याच्या आतां तयारीस लागतों. ब्राह्मणसमाजाच्या गृहस्थितींत इंग्रजी शिक्षणामुळें व नौकरीमुळें पुष्कळ फेरफार झाले आहेत व होत आहेत, हें सर्वांस कबूल

डत नाहीं. मुलींस शाळेंत जाण्याची चटक लागतांच त्या मग घरीं ठरत नाहींत; तान्ह्या मुलास संभाळण्याचा त्यांस कंटाळा येतो, त्या शाळेंत पळतात, व त्यांस आवरणें आईस साधत नाहीं. सारांश पडतील ते कष्ट करून मुलामाणसांचें सुख पाहून त्यांतच जें समाधान वाटेल, त्याहून अधिक सुख पुल्कळ स्त्रियांच्या वांटणीस येत नाहीं. मुली मोठ्या होतांच लग्नाच्या वयाचा कुटुंबांत वादविवाद सुरू होतो, त्यांत स्त्रियांस पड खावी लागते. मुलगी मोठी झाल्यावर योग्य वर मिळण्याची चिंता तिच्या काळजास जाळते. मुलें मोठीं होत जातात तों तों तीं क्षणभर देखील समाधानानें आईजवळ वसेनाशीं होतात. तीं आपल्या अभ्यासांत दंग! 'नको त्रास देऊंसग, तुला काय त्यांत कळायचं आहे?' ह्मणून त्यांचें पदोपदीं उत्तर ऐकून घ्यावें लागतें. एकामागून एक वर्ष अभ्यासांत जातें. मुलाचे डोळे खोल जाऊं लागतात, गाल वसून तोंड फिकुटलेलें दिसतें, हाडें वाहेर निघतात, छातीवर मांस दिसत नाहीं. ही स्थिति पाहून केव्हां केव्हां आईचें मन चरकतें. 'वाळा, तुला होतें तरी काय, तूं अगदींच कसा खाईनासा झालास? हा मेला अभ्यास तरी केव्हां संपणार?' असे नानापरी ती त्यास प्रश्न विचारते, परंतु मुलास कोणी नम्रता शिकविलेली नसते व तो सुधें वोलत नाहीं. 'मला काय झालं आहे? आणखी किती खायचं?' असें तो शेफरून गेल्याप्रमाणें उद्दामपणें उत्तर देतो; त्यास आईची माया कळत नाहीं, व ती जें डोळ्यांपुढें प्रत्यक्ष दुश्चिन्ह पाहते त्यानें जिवास चटका वसूनच ती विचारते हें त्यास उमगत नाहीं. परीक्षा जवळ येते तसतशी तरुण मुलाची प्रकृति अधिकच नाजूक होते, तो दोनचार महिन्यांचें दुखणें घेऊन वसतो. सेवेस आईवांचून दुसरें कोण आहे? केव्हां केव्हां पुरुषांस नौकरीचा जाच भारी, त्यांस फावत नाहीं, ह्मणून मुलांस घेऊन स्वतः स्त्रिया दवाखान्यांत व वैद्यांच्या घरीं जातात; औषधें आणण्यास आपणच तयार होतात; प्रसंग आल्यावर जनलज्जा धरून कसें निभावणार? परंतु चालू शिक्षणानें मुलांची ही अशी घाण होते ती पहात असतां, त्याच तशाच शिक्षणाखालीं मुलींस देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ब्राह्मणज्ञातींत स्त्रिया अद्याप **बीए** झाल्या नाहींत ही गोष्ट कित्येकांच्या हृदयास लागून राहिली आहे! परंतु ज्यांनीं मुलांप्रमाणें अभ्यास केला त्यांस क्षयादि रोगांनीं गांठून अकालीं यमधामास नेलें आहे काय, ही शंका कोणाच्या मनांतच येत नाहीं! शाळेंत शिक्षण होत नाहीं तर घरीं देऊं, अशा स्तुत्य उद्देशानें तरुण जवान स्त्रीसमागमाची घाई करितो. थोडें वहुत शिकवितो, इतक्यांत अल्पवयींच तीस मातृत्व येतें. तीसच त्याची लाज वाटूं लागते; सासू असली तर सुरक्षित बाळंतपण होतें, नाहीं तर, माहेरीं जा, कांहीं तरी कर व प्रसंगांतून पार पड, असा नवरा उपदेश करितो. अशा स्त्रीचे पुढें किती हाल होतात, तिच्या मुलांची काय स्थिति होते, हें मागें एकदा सांगितलेंच; परंतु जर तीस अल्पायुषी मरण आलें, मागें मुली राहिल्या, त्यांस क्षीणता आली, लहानपणींच अपस्मार होऊं

लागला, ह्मणजे मग वापास आपल्या स्त्रीशिक्षणाच्या उत्साहाचें फळ समजून येतें. स्त्रीशिक्षण देण्याचे हे मार्ग नव्हेत; शाळेंत चालू आहेत तेही स्त्रीशिक्षणाचे मार्ग किंवा विषय नव्हेत; घरचें शिक्षण अथवा निर्बंध मोडत आहेत, तें इष्ट नाहीं व स्त्रीशिक्षणाच्या कामीं पुनः विचार केला पाहिजे, हें पुरुषांच्या केव्हां ध्यानांत येईल तें येवो.

याप्रमाणें कांहीं थोडीं स्त्रियांचीं गाऱ्हाणीं उदाहरणार्थ येथें सांगितलीं; त्यांचा अनुभव सर्वांस येण्यासारखा आहे, कदाचित् आलेला असेल. सुधारणा करण्यास घर सोडून लांब जावयास नको; व्याख्यानांचें फारसें कारण नाहीं, थोडें अवलोकन व थोडा विचार पाहिजे. वपनाचे व विवाहाचे दोन प्रश्न सोडविले ह्मणजे सुधारणेची परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाली असें कोणीं समजूं नये. गृहस्थिति सुधारणें हा स्त्रियांस सुखी करण्याचा पहिला मार्ग आहे, व उद्योगावांचून व मनोवृत्तीच्या व धर्मबुद्धीच्या उत्तम शिक्षणावांचून हा मार्ग साध्य नाहीं. जोंपर्यंत या मार्गास कोणी लागला नाहीं, तोंपर्यंत वपन व विवाह यांसंबंधानें विवेचन करतांना त्यांपासून एकंदर कुटुंबसुख वाढेल असें अनुभवावरून सिद्ध करून दाखविणें कठीण आहे, असें मला वाटतें. आरंभीं एकंदर गृहस्थिति सुधारण्याची आवश्यकता आहे, हा विचारच सुधारक व असुधारक यांच्या मेंदूंत प्रकट होत नाहीं! वपन व विवाह हे दोन खुंट करून उभयतांमध्यें शुद्ध **खोखो**चा डाव चालला आहे!

एतद्देशीय स्त्रियांची केवढी योग्यता आहे, त्यांमध्यें कोणते अमोलिक गुण आहेत, त्यांची धर्मबुद्धि किती नाजूक आहे, व त्यांचें अज्ञान कसें अहितकारी आहे, हें दुसऱ्या '**कुटुंबाभिमाना**च्या' उपदेशांत मीं सविस्तर वर्णन केलें आहे. कित्येक भिन्न स्थितींतील कुटुंबांतील लहानमोठ्या स्त्रियांची दुःखमय स्थिति प्रत्यक्ष पाहिल्यानें वरील विचार सुचलेले आहेत, व ती स्थिति पाहत असतां व आठवून देखील डोळ्यांस टिपें आलीं व येतात. वास्तविक पहातां कांहीं विशेष दुर्धर प्रसंगाच्या वेळचीं हीं दुःखें आहेत असेंही नाहीं. नित्याच्या स्थितींत आयुष्याचा ओघ शांतपणें वाहात असतां त्यांतच ही सर्व खळखळ दिसते. ह्मणूनच सामान्य गृहस्थिति सुधारण्याची आवश्यकता पहिली, वाकी काम मागाहून, असा निश्चय होतो.

१२१. प्रमदावनें. ब्राह्मणांनीं गृहस्थिति कशी सुधरावी, घरांतील माणसांस चांगलें वळण कसें लावावें, इत्यादि गोष्टींचा पूर्वी जें लिहिलें त्यावरून थोडा बोध होईलच, परंतु या गोष्टींचा विचार ज्यानें त्यानें आपला आपण मनःपूर्वक करणें हें वरें. या ठिकाणीं सर्व समाजाच्या हिताची एक गोष्ट सांगून हा ग्रंथ आटपण्याच्या आतां तयारीस लागतों. ब्राह्मणसमाजाच्या गृहस्थितींत इंग्रजी शिक्षणामुळें व नौकरीमुळें पुष्कळ फेरफार झाले आहेत व होत आहेत, हें सर्वांस कबूल

केलें पाहिजे. हे फेरफार पुरुषांच्या वर्तनांत अधिक दिसतात, व घरांत त्यांचेंच प्राबल्य असल्या कारणानें त्यांनीं स्त्रियांच्या वर्तनांतही थोड्याबहुत प्रकारें ते उत्पन्न केले आहेत. नवीन विद्वानांच्या घरांतील स्त्रियाच केवळ नव्हेत, तर जुन्या घराण्यांतील स्त्रियाही कांहीं कांहीं बाबतींत नवीन सरणीनें विचार करूं लागल्या आहेत. या स्थित्यंतराचा परिणाम असा झाला आहे कीं, घरांतील निर्बंध मोडत आहेत व आळस घरांत शिरत आहे. मग स्त्रियांच्या मनांतही त्यांच्या समजुतीप्रमाणेंच कांहीं स्वातंत्र्याचे विचार येतात, कांहीं आळसाचे दुर्विकार उत्पन्न होतात. ज्ञानाविषयीं व व्यावहारिक कर्तव्यांविषयीं पुरुषांच्या कल्पना निराळ्या, व स्त्रियांच्या निराळ्या, एकाचें मन पांगलेलें, दुसऱ्याचें घरांतल्या घरांत घोंटाळलेलें. या सर्व प्रकारांमुळें स्त्रियांची शारीरिक व मानसिक हानि होत आहे. त्यांस जें शिक्षण असावें तें मात्र नाहीं, बाकीचें मुलांस व त्यांस सारखेंच. आपली स्त्री शिक्षित किंवा अशिक्षित कशीही असो आपल्या मुलांचें उत्तम संगोपन करण्यास ती लायख आहे, तिचें उदाहरण दुसऱ्यांनीं द्यावें, असें कोणीही विद्वान् मनापासून ह्मणेल असें वाटत नाहीं. स्त्रियांचें मन थोडें तरी पांगलें पाहिजे; व तें अवलोकनानें, सहवासानें व परस्परांशीं वादविवाद होऊनच पांगेल, पुस्तकी विद्येनें पांगणार नाहीं. जेव्हां विद्वानांच्या स्त्रिया एकत्र जमतात, तेव्हां त्या नवऱ्यांचीं मतें प्रतिपादीत असतात, तीं मतें सर्व सारखींच असतात, व त्यांमध्यें वादविवाद उत्पन्न होत नाहीं. आपल्या खात्रीनें, आपल्या अनुभवानें, आपल्या श्रद्धेच्या जोरानें आपलीं निरनिराळीं मतें सांगणाऱ्या स्त्रिया मुळींच एकत्र होत नाहींत; त्या एकमेकींच्या दृष्टीस देखील पडत नाहींत. नातेवाईक स्त्रियांमध्यें देखील जुन्यानव्याचा अभिमान उत्पन्न होतो, व दुःखप्रसंगीं कळवळ्याचे शब्द तोंडांतून आले, तथापि सामान्य स्थितींत एकमेकींचे दोष काढणें, एकमेकींवद्दल तिरस्कार दाखविणें, हेंच काम चालतें. ही स्थिति मोडण्याकरितां कांहीं उपाय योजणें अवश्य आहे.

दुसरें असें कीं, मोठीं कुटुंबें मोडून लहान कुटुंबें उत्पन्न होत आहेत. अशा कुटुंबांत बहुधा तरुण स्त्रीस बाहेर जावयास सांपडत नाहीं, तीस आप्तइष्टमित्रांच्या घरीं जावयास देखील फुरसत मिळत नाहीं, शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं स्नेह करण्यासही बहुधा संकोच वाटतो, कोणी सोबतिणी बरावर असल्याखेरीज देवासही जाण्याची इच्छा होत नाहीं, वारंवार अमुक ठिकाणीं जाऊं नको अशी नवऱ्याकडून तीस ताकीद असते; व या सर्व गोष्टींमुळें ती घरांतल्या घरांत कुजत असते. तरुण मुलींची व स्त्रियांची पुष्कळ ठिकाणीं, किंबहुना घरोघर, अशी स्थिति आहे कीं नाहीं या गोष्टीचा सर्वांनीं विचार करावा. **स्त्रियांस योग्य व्यायाम नाहीं, त्यांस कांहीं नवें पहायास मिळत नाहीं, त्या कोठें बिनधोक जातील अशीं ठिकाणें नाहींत, व त्यांचा घरकोंडेपणा**

गेल्या वीस वर्षांत, ह्मणजे स्त्रीस्वातंत्र्याच्या वादविवादाच्या हल्लींच्या ऐन भरांत, वाढत गेला आहे, असें स्त्रिया महिन्यांतून किती वेळ घराबाहेर काढतात, याविषयीं पूर्वीचें व हल्लींचें प्रमाण मोजून प्रत्यक्ष सिद्ध करितां येईल. हें अवलोकन कोणास कदाचित् आश्चर्यकारक वाटेल, ह्मणून त्यानें स्वतः शोध करून पहावा. अशा या घरकोंड्या स्त्रिया शिक्षित असल्या तरी मुलांस काय शिक्षण देणार? एका अनुभविक प्राथमिक शाळेच्या शिक्षकानें मुलांच्या अभ्यासाकडे स्त्रियांचें लक्ष नाहीं, त्या सुशिक्षित नाहींत त्यामुळें मुलांस घरून करून आणण्यास दिलेलीं उदाहरणें तीं चुकतात व अखेरीस त्यांस गणित येत नाहीं, ह्मणून रावसाहेबांसमोर तक्रार केली; त्याच्या मतें सकाळीं व संध्याकाळीं मुलें घरीं असतात, तेव्हां त्या सैंपाकाच्या वेळीं सैंपाकघरांतच डोळ्यांसमोर मुलांस बसवून त्यांकडून आईनें उदाहरणें व दुसरा अभ्यास करवून घेतला पाहिजे. जोंवर अशी दक्षता स्त्रियांत आली नाहीं तोंवर शिक्षक काय करणार! ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण स्त्रीशिक्षणापासून समजूतदार लोक तूर्त कोणतें कार्य करून घेण्याचें मुख्यत्वेंकरून चहात आहेत, हें सर्वांच्या लक्षांत यावें. **स्त्रियांच्या महत्वाच्या कर्तव्यांची ही दिशा नव्हे व स्त्रियांचा किंवा त्यांच्या गृहस्थितीचा उद्धार होण्याचा हा मार्ग नव्हे, असें किती वेळां तरी दाखवावें?**

जोंवर स्त्रीपुरुष व्यवहारांत मिश्र होत नाहींत, जोंवर करमणुकीच्या, ज्ञानप्राप्तीच्या व देवार्चनाच्या जागीं स्त्रियांस पुरुषांशीं मिश्र होण्याचा संकोच वाटत आहे, जोंवर पुरुषसमाजांतून चावटपणा व वीभत्स शब्दांचा उपयोग नांहींसा झाला नाहीं, तोंवर स्त्रियांच्या करमणुकीच्या व देवार्चनाच्या जागा निराळ्या असल्या पाहिजेत; नाहीं तर त्या घरकोंड्या होणारच. याकरितां प्रत्येक शहरीं आणि प्रत्येक गांवीं स्त्रियांकरितां एक एक स्वतंत्र करमणुकीची जागा अथवा 'प्रमदावन' उत्पन्न झालें पाहिजे. ही गोष्ट सर्व समाजांच्या हिताची आहे; व ब्राह्मण आणि ब्राह्मण, कुणवी आणि ब्राह्मण, सर्वच सुज्ञ लोकांनीं अशा प्रमदावनांच्या स्थापनेकरितां झटलें पाहिजे. जो कोणी स्त्रीजातीच्या सुधारणेची गोष्ट काढील, त्यास कोणत्या प्रमदावनास तूं काय मदत केली आहेस व वर्षाची किती वर्गणी देऊं केली आहेस, असा पहिला प्रश्न करावा. या प्रमदावनाचें वर्णन शेवटपर्यंत वाचल्यावर हा प्रश्न जुन्या चालीच्या माणसांसही हक्कानें विचारतां येईल असें वाचकांच्या लक्षांत येईल, व जुन्यानव्यांची सामोपचारानें भेट होण्यास हीं प्रमदावनें अखेरीस कारण होतील असें त्यास विचाराअंतीं कळून येईल.

ज्याप्रमाणें शहराची संपत्ति व लोकसंख्या असेल त्याप्रमाणें तेथील प्रमदावन

लहान किंवा मोठें असावें. ही स्त्रियांची विसांव्याची व करमणुकीची जागा होय, ती कोणास फार लांब पडूं नये, किंवा भरवस्तीच्या रस्त्यापासून फार लांब असूं नये; कोणाही स्त्रीस तेथें क्षणभर एकटें देखील जाण्यास भय किंवा संकोच वाटूं नये; असा बंदोबस्त नित्य रहावा व त्याची व्यवस्था अत्युत्तम समंजस संभावित सर्वमान्य माणसांकडे असावी. प्रमदावन ह्मणजे एक सुंदर बाग होय, अशी कल्पना वाचकांच्या आधींच मनांत आली असेल; व मनास आल्हाद आणि सर्व इंद्रियांचें उत्तम शिक्षण होण्यास बागेसारखें दुसरें साधनच नाहीं. झाडांच्या सुंदर आकृति, त्यांच्या पालवीचे व फुलांचे अवर्णनीय रंग, त्यांचा कोमल सुखस्पर्श, त्यांच्या फळांचें माधुर्य, त्यांवरील पक्षिकीटांचा चमत्कारिक किलबिलाट, सर्वच गोष्टी आनंददायक आहेत; व सर्वच गोष्टींत सृष्टिनियंत्यानें अत्यंत वैचित्र्य ठेविलेलें आहे. अशा बागेंत हिंडत फिरत असतां व आपले साहजिक उद्गार प्रकट करीत असतां, कोणासही दुसऱ्याचा संकोच वाटण्यास जागा मात्र राहूं नये, ह्मणजे मनुष्याच्या आनंदवृत्तीस ऊत येतो.

या बागेंत विस्तृत सृष्टीचें व या आपल्या भूस्थितीचें ज्ञान होईल असा पदार्थसंग्रह असावा. निरनिराळ्या प्रकारचे सुंदर पशु, पक्षी व कीटक येथें स्त्रियांस पहातां यावे, व त्यांचे स्वभाव ओळखण्यास संधि मिळावी. निरनिराळ्या देशांतील लोकांचें व त्यांच्या रीतीभातींचें ज्ञान होईल अशीं मोठालीं चित्रें व मूर्ति ठेविलेल्या असाव्या. या देशांतील व परदेशांतील उत्कृष्ट देखावे, उद्योगाचे प्रकार, यंत्रांचे प्रकार, जें जें ह्मणून पाहतांच कल्पना जागृत होईल व 'काय', 'कसें', 'कशाकरितां', अशी जिज्ञासा उत्पन्न होईल, तें तें चित्रांनीं, आकृतींनीं किंवा लहान नमुन्यांनीं दाखविलेलें असावें. चित्रकलेचा ज्यांनीं अभ्यास केला आहे त्यांनीं आपलीं उत्कृष्ट चित्रें येथें ठेवावीं; शास्त्रांचा अभ्यास केलेल्यांनीं हरतऱ्हेचीं शास्त्रीय खेळणीं व चमत्कार येथें दाखवावे; ज्यांनीं प्रवास केला असेल त्यांनीं त्या प्रवासांत ज्या चमत्कारिक किंवा सुंदर वस्तु पाहिल्या त्या आणून येथें मांडाव्या; व हें प्रमदावन सुंदर, रमणीय व आल्हाददायक करण्याचे ज्यास जे मार्ग सुचतील ते त्यानें करावे, व ज्यास न सुचतील त्यांनीं द्रव्यद्वारा किंवा अंगमेहनतीनें त्यास मदत करावी. मांडलेल्या पदार्थांचीं दुरून वाचतां येतील अशीं वर्णनें असावीं, व प्रत्येक लहान भागाचें मुलांस वाचण्याजोगें विशेष वर्णन पुस्तकरूपानें थोडक्यांत विकत मिळावें. मांडलेल्या वस्तूंपैकीं ज्या विकण्यासारख्या असतील त्यांचीं दुकानें वाजूस असावीं व तेथें सुंदर फुलें, फळें, मिठाई वगैरे जिन्नसही असावे. अशी तजवीज असल्यास घरोघर प्रत्यहीं सुंदर गुच्छ पतिरायांच्या टेबलावर मांडिले जातील, सुंदर व्यवस्था घरांत कशी ठेवावी हें आपोआप कळूं लागेल, व पुरुषांच्या आधीं प्रमदावनांतून घरीं परत आलेल्या स्त्रिया आनंदवृत्ति असतील, त्या मुलांवर संतापलेल्या व केरसुणीचा बुरखुंडा उगारून उभ्या असलेल्या

दिसणार नाहींत; त्यामुळें आफिसच्या कामानें थकल्या भागलेल्यांस किंवा पारतंत्र्याचीं कांहीं विशेष दुःखें प्रत्यक्ष अनुभवून खिन्न झालेल्यांस घरीं येतांच खरें समाधान वाटेल, व 'घरींदारीं सारखेंच, जिवाला सुख म्हणून नाहीं' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघण्यास कारण राहणार नाहीं.

मुलग्या अशा वागा करून स्त्रिया कशा घराच्या बाहेर पडतील असा प्रश्न वाचकांस आलाच असेल; त्याचें उत्तर असें कीं, त्यांस बाहेर काढण्यास दोन ओढी त्यांच्या मागें लागतील. पैकीं एक ओढ मुलांची. दहा वर्षापर्यंतच्या लहान मुलांस बायकांवरोबर प्रमदावनांत जाण्याची परवानगी असावी. आंत फक्त स्त्रियांनीं जायाचें असा वेळ सर्व दुपारचा असावा, बाकी वेळांत स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजास आंत जातां यावें. व स्त्रियांच्या वेळांत फक्त **संभावित** स्त्रियांस व त्यांच्या मुलांस मात्र जाण्याची परवानगी असावी. हल्लीं मुलांस आईचा सहवास नको असें झालें आहे; तीं घरांत ठरत नाहींत, व घरांत ठरलीं तरी आईच्या कामीं पडत नाहींत, कोणी सोबती नसल्यास शून्यदृष्टीनें कोठें तरी तीं उभीं राहतात. आईबरावर किंवा ताईबरावर बाहेर जाऊन गम्मत पहायास सांपडेल, अशी संधी असल्यास तीं स्त्रियांस ओढून बाहेर नेतील. त्यांतून कांहीं नवें खेळणें किंवा खाऊ मिळण्याचा संभव असल्यास असा परिणाम झालाच पाहिजे. शिक्षकांनींही त्यांस उत्तेजन द्यावें, आईस् व बहिणींस बरावर घेऊन जाणारा तिसऱ्या इयत्तेंतील मुलगा आईस मास्तरनें सांगितलेली नानाप्रकारची माहिती देईल, व तिला चकित करील. तिची जी माहिती असेल किंवा कल्पना चालेल ती ती मुलांस सांगेल. बागेंतच त्यांचीं संभाषणें सुरू होतील व घरीं आल्यावर विशेष माहितगार पुरुषांपुढें त्यांची पुनरुक्ति होईल. हल्लीं मुलांस क्रौर्यानें मारावें तरी, किंवा मूर्खत्वानें त्यांचे लाड करावे, याशिवाय मातापुत्रांस परस्परांचा ममतेचा संबंध प्रकट करण्यास जागा उरलेली नाहीं; व त्यामुळें आईबद्दल तिरस्कार असणारीं व साधेल तितक्या लवकर तिची संगत सोडणारीं मुलें फार आहेत, असें अवलोकनं करणाराच्या ध्यानांत येईल; व ही अनिष्ट स्थिति दूर करण्याचा वर सांगितलेला मार्ग आहे.

स्त्रियांचे विशेष खेळ खेळण्यास येथें जागा केलेल्या असाव्या; त्यांची ओळख होऊन, संभाषणें होऊन, एकमेकांचे विचार, एकमेकांचीं गाऱ्हाणीं व एकमेकींनीं नवीन आणलेल्या बातम्या सर्व येथें निघाव्या; मग त्यांमध्यें साहजिकच वादविवाद होतील व परस्परांच्या मनावर त्यांचे संस्कार होतील. ही चटक एकदां लागतांच स्त्रियांस तेथें जाण्याची हौस आवरणार नाहीं. हे त्यांचे सार्वजनिक क्लबच होतील; व स्त्रीसमाजाचें बहुमत ठरण्याची ही जागा होईल. ज्या स्त्रियांनीं विशेष ज्ञान संपादन केलेलें आहे, त्यांनीं तें जर सौम्यपणें, नम्रपणें, सौजन्यानें इतरांस देण्याची येथें संधी साधली तर केवढा फायदा होईल? जुन्या चालीच्या स्त्रियांमध्यें कित्येक अमोलिक गुण आहेत, ते नव्या चालीच्या स्त्रियांच्या ध्यानांत येत नाहींत;

उलट, नव्या चालीच्या स्त्रियांतून भीड, मुरवत, जनलज्जा, कुटुंबाची काळजी, कुळशीळाचा अभिमान व धार्माचार, सर्वच नाहींशीं झालीं आहेत असा जुन्या चालीच्या स्त्रियांचा ग्रह होत आहे. एकाच कुटुंबांत जेव्हां उभयतांची गांठ जुळते तेव्हां परस्परांस त्रास व असमाधान मात्र होतें. जुन्या व नव्या स्त्रियांची प्रमदावनांत एकत्र गांठ पडून त्यांपैकीं ज्या उत्तम गुणी त्यांचा सहवास जेव्हां इतरांच्या देखत प्रसिद्धपणें होऊं लागेल, व नित्य संघट्टनानें परस्परांचे गुणदोष परस्परांस कळतील व दाखविले जातील, तेव्हां उभयतांचे दुराग्रह नाहींसे होतील व स्नेह जडेल. याकरितां या प्रमदावनासारखी एकत्र मिळून संभाषण करण्याची जागा असली पाहिजे मुलें बागेंतून निघत नाहींत असें पाहून, स्त्रिया आपलीं संभाषणें पाहिजे तितकीं लांबवितील व नवे नवे विचार ऐकतील व पाहतील यांत शंका नाहीं. असें अवलोकन जेव्हां होतें तेव्हां वळकट दुराग्रह देखील ढिले पडतात, व कर्तव्याच्या नवीन मार्गाकडे निदान डोकावण्यास तरी मन तयार होतें.

१२२. प्रमदावनांत एक देवालय पाहिजे. प्रमदावनांत नित्य जाण्याचा प्रघात पडण्यास वर ज्या दोन ओढी सांगितल्या, तेवढ्याच कदाचित् वस्स होणार नाहींत, व ह्मणून त्यांहूनही एका श्रेष्ठ हेतूची प्रेरणा या कामीं मदतीस घेतली पाहिजे. ती प्रेरणा धर्माची होय; तिजमुळें अगदीं जख्ख वृद्धावाईपासून अगदीं तान्ह्या मुलीपर्यंत कोणीही स्त्री प्रमदावनांत आल्याखेरीज रहायाची नाहीं. याकरितां प्रमदावनांत उंचस्थळीं एक **विठोवाचें** देवालय बांधलें पाहिजे; व त्याच्या सभामंडपांत गायन भजन कीर्तन नित्य झालें पाहिजे. कलियुगाच्या या प्रथम चरणांतील शालिवाहन शकांत विठ्ठलाचें जसें माहात्म्य आहे, तसें या महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणाचेंही नाहीं. युगपरत्वें हिंदुधर्मांतील देवतांमध्यें व त्यांच्या आराधनेच्या उपायांत पुष्कळ फेरफार होत आले आहेत, ही गोष्ट प्राचीन व अर्वाचीन सर्व धर्मनिष्ठ पंडितांस मान्य आहे. धर्माचा कांहीं एक विशिष्ट संप्रदाय एकदा ठरून गेला ह्मणजे क्रमानें त्याची ग्लानि होत जाते; ती होण्याचीं कारणें पाहूं जातां सुजाण लोकांचें दिवसेंदिवस वाढत जाणारें अवलोकन, अनुभव आणि विवेक व वाकीच्यांचें अज्ञान, अंधता व मदोन्मत्तपणा, हीं तीं कारणें दिसतात. या कारणांमुळें एकच धर्मसंप्रदाय फार दिवस चालल्यास तो खऱ्या धर्मसाधनास निरुपयोगी होतो. जेव्हां याप्रकारें धर्मग्लानि फार होते तेव्हां नवीन धर्मसंप्रदायाची स्थापना ईश्वरी प्रेरणेनेंच होते; व ती वारंवार व्हावी लागते असें पुढील भगवद्गीतेंतील प्रमाणावरून दिसून येतें:—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥

भ० गी० अ० ४ श्लोक० ७.

या कारणानें या आर्यावर्तांत, विशेषतः या महाराष्ट्रांत, एकच एक धर्मसंप्रदाय पूर्वी कधींही फार दिवस चालला नसावा. धर्मास ग्लानि येतांच जिकडे तिकडे साधुवृंद उत्पन्न होत आले असावे; त्यांनीं चालू संप्रदायासंबंधानें ज्ञानी जनांस आलेला अनुभव अंगीकारावा, अडाण्यांच्या हातीं तो कसा दंभ-मोह-मदमत्सरांस कारण होत आहे हें स्पष्टोक्तीनें सर्वांच्या नजरेस आणावें, व पुनः नवा शुद्ध संप्रदाय स्थापन करावा. ज्ञानदेवापासून रामदासापर्यंत जी श्रेष्ठ संतमंडळी झाली, त्यांच्या उक्तींवरून व चरित्रांवरून त्यांनीं या तिन्ही गोष्टी केल्या असें स्पष्ट दिसतें. याप्रमाणें या साधूंनीं घातलेला संप्रदाय हा सांप्रतकाळीं नवा धर्माचा अवतार गणिला पाहिजे. या नव्या अवतारांत **भाव** आणि **भक्ति** हीं धर्माचीं मुख्य बीजें ठरविण्यांत आलीं आहेत व तीं सर्वांस मान्यही आहेत. या अशा धर्मबीजांची देशांत प्रथम पेरणी होतांच एकदम मोठें धर्मबळ व धर्मोत्साह जिकडे तिकडे उत्पन्न झाला. सर्व जातींस प्रेमानें पंढरीरायास मिठी मारितां येऊं लागली, व सर्व जाती आपलीं गान्हाणीं व आपले अपराध देवाजवळ सांगून त्याची कृपा व क्षमा मागूं लागल्या. आपली सर्वांवर सारखी माया आहे अशी सर्वांच्या हृदयांत प्रेरणा करणारा जो हा अत्यंत शुद्ध ईश्वरी अवतार तो विठ्ठलाचा होय, व या शकांत तोच सर्वांस ग्राह्य, सर्वांस सुलभ, व सर्वांमध्यें श्रद्धाबळ उत्पन्न करणारा आहे. ज्या साधुवर्यांनीं त्याचें प्रेमळ वर्णन केलेलें आहे, त्यांनीं खरीं धर्मतत्वें पूर्णपणें ओळखलीं होतीं अशी खात्री तेव्हांच करून घेतां येते; कारण त्यांच्या उपदेशपर काव्यांचें हद्गत जों जों सूक्षपणें पहावें, तों तों तें अगदीं नव्या नव्या सर्व अनुभवांशीं सारखें जुळत जातें; व अगदीं अडाण्यापासून शुद्ध वेदांत्यापर्यंत एकच उपदेश सर्वांस उत्तम बोध देतो. सर्व हिंदुज्ञातींमध्यें प्रेम व एकदिल जर कोणत्याही उपायानें होण्याचें शक्य असेल, जर सर्व जातींच्या आबालवृद्धांस एकच धर्मसंप्रदाय संमत होण्याची शक्यता असेल, तर तो संप्रदाय विठोबाच्या भक्तिमार्गाचा होय. इतर सर्व जातींस तो मान्य आहेच; ज्ञानबा, तुकाराम हे विठोबाचे दृष्टांती भक्त म्हणून त्यांच्या नांवांचा जयघोष होत आहेच; परंतु विठोबाचे ब्राह्मणांवर विशेष उपकार आहेत, त्यांस त्यानें परमार्थ अधिक सुलभ केला आहे, व आपल्या प्रसादाचे अलौकिक चमत्कार दाखविले आहेत. या गोष्टीचा प्रत्यय येण्यास एक **दामाजीपंताची** बखर वाचल्यास पुरे आहे. यवनी राज्यांत दुष्काळ पडून ब्राह्मणांवर मोठा गहजब गुदरला असतां दामाजीनें प्राणाची किंवा यवनी दंडाची फिकीर न बाळगून, ब्राह्मणांस धान्याचीं कोठारें लुटण्यास परवानगी दिली. त्यास या अपराधाबद्दल राजदूत पकडून नेत आहेत इतक्यांत वेदरच्या दरबारीं एक महार येऊन पोहोंचला तो पंढरीराय होता:—

अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं । तो सांवळा जगजेठी ।
काळी घोंगडी, काळी काठी । काळा दोरा कंठीं ।
वोली महाराची थेट मराठी । लावुनि लंगोटी ।
पायीं वहाणा, मोठा शहाणा । **पतितपावन** नाम जयाचें ॥

याप्रमाणें ब्राह्मणांकरितां महाराचें स्वरूप धारण करणारा, व त्या रूपानें यवनाचा जवाव दामाजीच्या गीतेच्या पोथींत घालून ठेवणारा, जो **पतितपावन** त्यानें हा ब्राह्मणांस विलक्षण चमत्कार दाखविला एवढेंच नव्हे, तर दृष्टांताच्या रूपानें एक फारच उपयोगी महत्वाचें तत्व समजावून दिलें. तें हें कीं **यवनाच्या दरबारीं जाणारानें महार होण्यास भिऊं नये,** किंवा यवनी अक्षरें पोथींत शिरल्यानें तीस विटाळ झाला असें मानूं नये. यास उदाहरण प्रत्यक्ष भगवंतांचें व दामाजीचें. या दृष्टांताचा अर्थ दामाजीसही कळेना. त्यास वाटलं,

यवन जरि माझा प्राण घेता । गर्दन मारीता ।
वरवें होतें तरि, काय चिंता । हें काय अनंता ।
अनुचित करणी चक्रपाणी । काय प्रयोजन या कर्माचें ॥

परंतु या महत्वाच्या तत्वाचा पुरता उलगडा एकामागून एक जे भिन्नजातीय साधु होत गेले त्यांनीं केला; त्यांचीं चरित्रें वाचलीं असतां तो ध्यानांत येईल. हेंच तत्व हल्लीं ब्राह्मणांनीं न जाणतां अंगिकारलेलें आहे, व तेंच पुढें जाणून बुजून ईश्वरसाक्ष अंगीकारावें. **बाह्यस्वरूप कोणत्याही प्रकारचें असलें किंवा धारण केलें तरी त्यानें धर्माचें पालन किंवा उल्लंघन होत नाहीं; अंतर्यामीं पांडुरंगाचे ठायीं बळकट श्रद्धा, भक्ति व प्रेम असेल तर तेंच श्रेष्ठ होय, तेंच मुक्तीचें कारण होय,** हा त्या तत्वाचा भावार्थ आहे.

कासया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातु खळ भावहीन ॥
भावची कारण, भावची तारण । मोक्षाचें साधन बोलीयेलें ॥
काय करिशील पंडित होऊनी । अक्षराभिमानी थोर होय ॥
काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि तों ॥
तुका ह्मणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होसी ॥

ही विठ्ठलमंदिराची कल्पना वाचून कित्येक सुधारलेली मंडळी कदाचित् नाखुष होईल. परंतु असा या कल्पनेचा परिणाम झाल्यास धर्माच्या कामीं त्यांचा किंचित् अविचार होतो, असें ह्मणावें लागेल. प्रार्थनेच्या जागीं डोळ्यांपुढें मूर्ति असली ह्मणजे त्या प्रार्थनेस कमीपणा आला असें मानणें नीट नाहीं. भक्तिभावानें अंतःकरण निर्मळ करून प्रेमळ स्वरानें विटोवासमोर कोणी अडाणी कुणवी पुढील पद्य गात असतां,

अनंत ब्रह्मांडें ज्याच्या पोटीं । तो हा सांवळा जगजेठी ॥

जर त्यास कोणीं विचारलें 'अरे हें कोणाचें वर्णन आहे,' तर तो 'पांडुरंगाचें' असें म्हणेल, परंतु 'या तुझ्या पुढच्या मूर्तीच्या पोटांतून इतकीं ब्रह्मांडें निघतील काय,' असें त्यास विचारतांच तो तेव्हांच सांगेल कीं ही पांडुरंगाची केवळ मूर्ति आहे व तो तुह्मां आह्मां सर्वांत व या मूर्तीतही आहे. तात्पर्य हें कीं जर मूर्ति आणि देव यांची सारखी व्याप्ति आहे असें कोणाच्या मनांत वागत असेल तर तो खरा मूर्तिपूजक होय, ज्यांच्या मनांत देवाची व्याप्ति मूर्तीपेक्षां फार अधिक आहे त्यांस मूर्तिपूजक म्हणणें अन्याय आहे.

कारण देव, ईश्वर, वगैरे हीं नांवें आपण सृष्टिनियंत्यास कां लावितों ? कारण तीं तोंडानें उच्चारितांच व कानानें ऐकतांच सृष्टिनियंत्याकडे आपलें लक्ष जातें, व त्याचे गुण ध्यानांत येतात. जर माणसें मुकीं व बहिरीं असतीं व त्यांस अत्यंत सुज्ञ माणसाप्रमाणेंच ईश्वराचें उत्तम ज्ञान असतें तर त्यांनीं त्याचें कोणत्या संज्ञेनें परस्परांस ज्ञान दिलें असतें? हात उंच करून, किंवा ते प्रार्थनेसारखे जोडून, किंवा विशेष आकृतीचा एखादा पदार्थ डोळ्यास दाखवून, म्हणजे मूर्तीच्या द्वारें, जर माणसें मुकीं, बहिरीं व अंधळीं असतीं, तर एका विशेष स्पर्शानें किंवा रुचीनें त्यांस ईश्वराची संज्ञा करणें भाग पडलें असतें. भिन्न इंद्रियांस ग्राह्य अशा एकाच पदार्थाच्या भिन्न संज्ञा असल्या तर त्यांत कोणत्याही प्रकारचें पातक नाहीं. जोंवर विठ्ठल, विठोवा, पांडुरंगा, इत्यादि अनेक शब्दांनीं श्रोत्रद्वारा एकाच सृष्टिनियंत्याकडे लक्ष जात आहे, देवालयांतील मूर्ति पाहून नेत्रद्वारा त्याचेंच स्मरण होत आहे, व अंधारांत त्या मूर्तीस कवटाळिलें असतांही तोच ध्यानांत येत आहे, तोंवर ईश्वराच्या स्मरणार्थ अमुक **फाजील** चिन्हांचा उपयोग केला जातो म्हणून लोकांचा उपहास करूं नये. त्या योगें वैमनस्य उत्पन्न होतें. ज्यांस आपण मूर्तिपूजक म्हणतों ते, (आपण डोळ्यांपुढें पापण्या आणून ईशप्रार्थना करितों म्हणून) आपणांस पापणीपूजक म्हणूं लागले तर आपणांस वरें वाटेल काय, असा विचार धर्मसुधारकांनीं केला पाहिजे. ईश्वरासंबंधीं कोणाच्या मनांत काय भाव आहे व ईश्वराच्या गुणधर्मांविषयीं कोणती श्रद्धा आहे, हें पाहून कोणाच्या धर्मकल्पना कशा असाव्या हें ठरविलें पाहिजे. असें केल्यास बहुधा असें दिसून येईल कीं धर्मकल्पना संप्रदायावर अवलंबून नसतात, तर व्यक्तिपरत्वें जो अनुभव व विवेक असतो त्यावर त्या अवलंबून असतात. म्हणून कोणाच्याही संप्रदायास दोष देतांना त्याच्या धर्मकल्पना अधिक उत्कृष्ट आहेत हें त्यास समजावून द्यावें व त्यांशीं तो संप्रदाय जुळत नाहीं असें दाखविण्याचा नेहमीं प्रयत्न असावा. या सर्व गोष्टींचा विचार करून आणि विठ्ठलभजनी साधुसंतांचे लेख व चरित्रें यांमधील उदात्तवृत्ति लक्षांत आणून हरतऱ्हेच्या सुधारलेल्या व न सुधारलेल्या संप्रदायांच्या हिंदु धार्मिक माणसांनीं प्रमदावनांत वारंवार प्रार्थनेस जुळावें, व पाहिजे तर संतांच्याच मोहक पद्यांच्या द्वारें आपलें प्रेम व भक्ति प्रकट करावी. पुराणांतील निवडक भागांचें पुराण तेथें व्हावें, निवडक आख्यानांचीं

भक्तिरसप्रधान कीर्तनें व्हावीं, सकाळ संध्याकाळ मुलांस व मुलींस प्रेमळ स्वरानें अभंग व श्लोक गाण्याचें शिकवावें; व प्रत्येकास आपलें प्रेम ईश्वरी आज्ञा पाळण्याचा आपला दृढ निश्चय सर्वसाक्षी प्रभूपुढें प्रकट करण्यास जो जो सात्विक मार्ग सांपडेल तो तो यानें सर्वभावें करावा. अहंकारास किंवा आपमतलबास किंवा मानसिक दुराग्रहांस विलकुल जागा देऊं नये.* येथपर्यंत प्रमदावनांचें जें वर्णन

* एतद्देशीय व परदेशीय धर्मक्रांतींचें, ह्मणजेच पुनर्धर्मसंस्थापनांचें, सामान्य स्वरूप सूक्ष्मपणें ध्यानांत आणितां एक गोष्ट लक्षांत येते ती अशी. प्रत्येक धर्मक्रांतीच्या पूर्वी कांहीं रूढ धर्माचारांपासून अत्यंत अनिष्ट व निंद्य परिणाम घडत आलेले असतात; कांहींपासून नफानुकसान कांहींच होत नसतें; व कांहींपासून चांगले उत्तम परिणाम मात्र घडत आलेले असतात. हे तिन्ही प्रकारचे परिणाम साधारण समंजस माणसास समजावून दिल्यास समजण्यासारखे असतात, ह्मणूनच धर्मक्रांति होते. धर्मसंस्थापना करणारी संतमंडळी उत्कृष्ट परिणाम करणाऱ्या रूढ आचारांस महत्व देऊन अत्यंत श्रेष्ठत्व आणिते; मध्यम आचारांबद्दल फारसा ऊहापोहच करीत नाहीं; व दुष्टपरिणामी आचारांस त्याज्य व द्वेष्य ठरविते; मग ज्यांस हे शेवटचे आचार विशेष प्रिय असतात तेही त्यांस गौण करितात. किंवा त्यांचें रूपांतर करून दुष्परिणाम टाकून दाखवितात, व आपलें समाधान करून घेतात. पूर्वरूढि सर्वच झुगारून बुद्धिकल्पित नव्या रूढि अमलांत आणणें हा धर्मक्रांतीचा मार्ग बहुजनसमाजास मान्य होत नाहीं व झालाच तर कांहीं पिढ्या तरवारीचा अंमल गाजवून मात्र व्हावयाचा.

जे **प्रार्थनासमाजी लोक येशू ख्रिस्ता**स मानीत नाहींत त्यांस, ख्रिस्ती धर्मांत सोळाव्या शतकांत व नंतर एवढी घडामोड झाली असतां तींत **ख्रिस्त** कसा कायम राहिला याविषयीं आश्चर्य वाटत नाहीं काय ? मला वाटतें त्या काळच्या **पोपांनीं** व तदनुयायी धर्माधिकाऱ्यांनीं खुद्द ईश्वराच्या नांवावर जे अगणित अनाचार आरंभिले होते, तेच त्यांनीं **ख्रिस्ता**च्या व नंतरच्या साधूंच्या नांवावर आरंभिले असते तर त्या धर्मक्रांतीस निराळें स्वरूप आलें असतें. परंतु जो अनाचार तो परंपरेनें ईश्वराकडून आलेल्या अधिकाराच्या जोरावर, व जो सदाचार तो ख्रिस्तानें दिलेल्या बोध व आश्वासनांवर, अवलंबून करायाचा अशी वहिवाट सुरू होती. यामुळें ईश्वराविषयीं कल्पना शुद्ध करणें व **ख्रिस्ता**चें चरित्र व स्वरूप जितकें मनोहर व अनुकरणीय करवेल तितकें करणें, एवढाच धर्मक्रांतीचा मुख्य उद्देश झाला.

या देशांत एका अनिवार्य धर्मसंस्थापनेंत इंद्रादि देवता गौण झाल्या व यज्ञयाग, प्राणिहिंसा, मांसाशन व सोमपान हीं ब्राह्मणांतून गेलीं; ब्रह्मयज्ञ व मधुपर्क हीं त्यांच्या ऐवजीं हल्लींच्या स्थितींत आह्मीं राखिलीं आहेत. पुढें विष्णु आणि शिव, व त्यांच्या आश्रयानें गाय आणि बैल, यांस पूज्यत्व आलें; त्यापुढें स्मृत्युक्त धर्मकृत्यें सर्वच गौण ठरून, सर्व जातींस **नामस्मरण** हा एकच मोक्षाचा भक्तिमूलक हमरस्ता

केलें व जे उद्देश सांगितले ते लक्षांत आणिल्यास गृहस्थिति सुधारण्याचा हा एक महत्वाचा उपाय होईल असें लक्षांत येईल; व तो तावडतोव अंगिकारणें अत्यंत आवश्यक झालेलें आहे. कोणत्याही प्रकारें हिंदु स्त्रियांची उणीव लोकांनीं काढलेली असुधारक माणसास आवडत नाहीं, ह्मणून त्याचा सुधारकाशीं वेवनाव होतो.

झाला. याप्रमाणें धर्मक्रांति चालू असतां कित्येक शतकांच्या अनुभवावरून जी एक गोष्ट सिद्ध झाली होती ती ही कीं, धर्मस्फूर्तीस व धर्मावेशास मूर्ति साहाय्यभूत होत आल्या. एका ईश्वराविषयीं निर्मळ कल्पना करून देणें व त्याच्या उपकारक स्वरूपाच्या द्योतक ह्मणून मूर्तीविषयीं योग्य समजूत पाडून देणें, हा धर्मक्रांतीचा अखेरीस उद्देश ठरला; व सर्व साधुसंतांनीं या उपायांनीं पुनः धर्म प्रवळ केला. खिस्ती धर्मांत व्यवहारदृष्ट्या जें खिस्ताचें महत्व आहे तेंच हिंदुधर्मांत मूर्तींचें आहे. अलीकडील हिंदुधर्म आणि खिस्तीधर्म यांची तुलना करितां असें दिसतें कीं, **प्रेम, उपकार** आणि **नम्रता** हे गुण दोन्ही धर्मांत उत्तम गणिले आहेत खरें, परंतु खिस्ती धर्मांत शेवटचे दोन अतिश्रेष्ठ समजले जातात, हिंदुधर्मांत पहिले दोन समजले जातात. ईश्वरापुढें आपली नम्रता प्रकट करण्यास ईश्वरवोधक एक चिन्हही वस्स आहे, परंतु ईश्वराविषयीं पूर्ण प्रेमभाव प्रकट करण्यास भिन्न इंद्रियांनीं ग्राह्य अशीं जितकीं ईश्वरवोधक चिन्हें असतील तितकीं इष्टच होत. खिस्तांनीं येशूस व हिंदूंनीं मूर्तिरूप ईश्वरचिन्हास सोडिल्यास, पूर्वपरंपरेनें धर्माचा वोध करून देणें उपदेशकांस दुर्घट होईल व **अल्पज्ञांस धर्मवोध करणें अशक्य होईल.** त्यामुळें आपण श्रद्धान्वित धर्म पाळीत आहों असें लोकांच्या मनांत भरवितां न येऊन असली सुधारणा करणारे उपहास पावतील. हा प्रकार येथें व परदेशांत चालू आहे. **लौकिकाचारांचा जोर अशा नवीन पंथास न आल्यानें वंधुभाव व अनुकंपा या पाशांमुळें जीं पारमार्थिक धर्मकृत्यें मनुष्याच्या हातून घडायाचीं तीं अत्यंत आकुंचित प्रमाणाचीं होतात.** ही गोष्ट नवीन पंथ काढणारे विसरतात, ह्मणजे तात्पर्यानें मूळ धर्मतत्वेंच विसरण्यासारखें हें आहे. धर्मसंप्रदायांतून जे आचार अवश्य काढून टाकिले पाहिजेत त्यांची इयत्ता येणेंप्रमाणें ठरविणें इष्ट आहेः—**जे आचार टाकायाचे त्यांपासून अनिष्ट व निंद्य परिणाम व्यवहारांत घडत असले पाहिजेत; ज्या केवळ समजुती सोडून द्यायाच्या त्या योग्यतेनुरूप अधिकाधिक संस्कारांनीं विवेकशक्तीस संमत होण्याचा संभव नसला पाहिजे.** हा मार्ग पूर्वीच्या सर्व धर्मसंस्थापकांनीं धरलेला दिसतो. एतद्देशीय विद्वानांच्या तो ध्यानांत न येऊन त्यांनीं **शुद्धबुद्धिमार्ग** व **उत्कृष्टधर्मवस्तुसंग्रह** हीं धर्मसंस्थापनेचीं साधनें केलीं आहेत. सुधारकांतल्या सुधारकांत, किंवहुना कुटुंवांतल्या कुटुंवांत, त्यामुळें धर्मैक्य राहिलेलें नाहीं, व उत्तम परमार्थकृत्यांचाही जवळ जवळ लोप होत आला आहे, हें सांगायाची जरूरच दिसत नाहीं. ज्याचें अंतःकरण त्यास साक्ष देईल.

जर स्त्रियांस त्यांच्या उणीवी न कळूं देतां, त्या आपोआप दूर होतील असे मार्ग दाखवून दिले तर वेवनावावांचून सर्व कार्य उत्तम प्रकारें सिद्धीस जाईल. ही गोष्ट मनांत आणून प्रमदावनाच्या कामीं सर्व हिंदुज्ञातींच्या सर्व संभावित कुटुंबांनीं एकदिल व्हावें, व अशीं प्रमदावनें स्थापित झाल्यावर त्यांस सर्व प्रकारें उत्तेजन द्यावें.

१२३. **जुन्यांची व नव्यांची भेट. तरुण** व **म्हातारे, नवे** आणि **जुने, सुधारक** आणि **असुधारक, सरकार** आणि **हक्केच्छु,** या अशा विरुद्ध पक्षांमध्यें हल्लीं जो तंटा आहे त्याचें यथार्थ कारण काय तें शोधूं जातां, असें दिसतें कीं तरुण नवे लोक, सुधारक व हक्केच्छु या सर्वांच्या मनाची प्रवृत्ति, आपआपल्या विषयांत, एकाच प्रकारची असते, व मध्यम वयांतील जुन्या चालीचे लोक, असुधारक आणि सरकार या सर्वांच्या मनाची त्या त्या विषयांत भिन्न प्रवृत्ति असते. वारंवार एकच मनुष्य एका विषयांत एक प्रवृत्तिमार्ग व दुसऱ्यांत दुसरा अंगिकारतो. अगदीं मुळाशीं पाहतां **आशा** व **अनुभव** यांच्या कमी अधिक प्राबल्यामुळें हा भेद उत्पन्न होतो; व म्हणूनच एकाच व्यक्तीच्या भिन्न विषयांत जसा बुद्धीचा व्यासंग असेल आणि तिची बाल्यादि अवस्था जी कोणती असेल, त्याप्रमाणें भिन्न विषयांत एक नाहीं तर दुसरी प्रवृत्ति त्याच्या मनास लागते. त्यामुळें कोणी हक्केच्छु असुधारक असतात, कोणी सुधारक हक्केच्छु नसतात, इ०. आशा व अनुभव यांसंबंधाचा हा भेद विशेष विस्तारानें सांगितल्याखेरीज तो कदाचित् ध्यानांत येणार नाहीं, म्हणून तो थोडा स्पष्ट करितों. साधारणपणें असें समजावें कीं, **जो नवीन फेरफार सुचविलेला असतो त्यापासून पुष्कळ हित होईल व त्याचा पुष्कळ लोक सदुपयोग करितील असें आशावंतांस वाटत असतें; उलट त्या फेरफारानें हितापेक्षां अहित अधिक होईल व पुष्कळ लोक त्याचा दुरुपयोग करितील, किंवा निदान त्यापासून कोणाचेंही हित होणार नाहीं, किंवा त्याचा कोणास उपयोग होणार नाहीं, अशी अनुभविक माणसाची समजूत असते. हा भेद प्रत्येकानें दुसऱ्याचा थोडा तरी गुण घेतल्याखेरीज नाहींसा व्हावयाचा नाहीं; व असें करण्याचा उभयतांचा निश्चय झाल्यास जे फेरफार हल्लीं जितक्या प्रकारें व्हावेसे वाटत आहेत, ते तितक्या प्रकारें नको आहेत, फार सौम्य प्रमाणानें पाहिजे आहेत, असें उभयतांच्या विचारें ठरून त्यांचें एक दिल होईल.** याकरितां समंजस, आशावंत व अनुभविक माणसांनीं सर्व प्रश्नांचा पुनरपि नव्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. प्रत्येक पक्ष नवीन फेरफाराच्या कामीं कसा विचार करितो, हें पुढील कांहीं संवादरूप उदाहरणांवरून लक्षांत येईल.

आशावंत:–ब्राह्मणांस समुद्रयान करून आल्यानंतर एकदम ज्ञातींत घ्यावें, त्या योगें हजारों तरुण लोक इंग्लंडास जाऊन महत्वाचें ज्ञान व कौशल्य या देशांत

आणितील. **अनुभविकः**–परत येणाऱ्या माणसास ब्राह्मण राहण्याची इच्छा आहे काय? **आ०**:–होय. **अ०**:–परत आलेल्या माणसांत ही इच्छा असलेली प्रत्यक्ष माणसें मोजून दाखवून द्या. एकजणानें या स्वातंत्र्याचा चांगला उपयोग केल्यास शंभरजण त्याचा दुरुपयोग करितील, व एकंदरीनें अहित पदरीं येईल. याकरितां परत आलेला माणूस आपल्या कुटुंबांतील व्यवस्थेंत वाह्यात्कारी तरी ब्राह्मण दिसतो, ब्राह्मणांवद्दल त्याकडून तिरस्काराचे उद्गार निघत नाहींत, ब्राह्मण जात ज्यांस शिष्ट समजते त्यांशीं तो मिळूनमिसळून असतो, आपल्या आचरणानें त्यांस दुखवीत नाहीं, व त्यांसमवेत देशहितास झटतो, असें एके वर्षाच्या अनुभवानें दिसून आल्यास त्यास जातींत घेण्यास आम्ही तयार आहों, कोण असे असतील ते दाखवावे.

आशावंतः–मुनिसिपालिट्यांतील सर्व सभासद लोकांनीं निवडलेले असावे, त्यायोगें ज्या सुधारणा लोकांस हव्या त्या होतील, नकोत त्या होणार नाहींत व लोकांस राजकीय हक्क वजावण्याचें शिक्षण लागेल. **अनुभविकः**–लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढत असतां, असें **कोठें कोठें** व **कोणत्या कोणत्या निवडलेल्या** गृहस्थांच्या ज्ञानामुळें, अनुभवामुळें, उद्योगामुळें व प्रामाणिकपणामुळें घडून आलें तें तीं माणसें मोजून दाखवून द्या.

आशावंतः–स्त्रियांस पुनर्विवाहाची परवानगी असलीच पाहिजे, त्यांस शिक्षण दिलेंच पाहिजे, त्यांचें स्वातंत्र्य वाढलेंच पाहिजे; त्यायोगें संसारांत स्त्रिया पुरुषांस उत्तम मदत करितील, गानवादनानें त्यांस आनंद देतील, मुलांस उत्तम वळण लाविलील, सर्व सामाजिक कामांस हात लावून मदत करितील; या देशाच्या उत्कर्षाच्या मुळाशीं हा प्रश्न आहे. **अनुभविकः**–शिक्षणाच्या व स्वातंत्र्याच्या प्रमाणानें हे परिणाम घडतात, असें पुनर्विवाहित किंवा शिक्षित स्त्रीच्या कुटुंबस्थितीवरून, कुटुंबांतील माणसांच्या समाधानवृत्तीवरून, मुलांच्या वळणावरून, विद्येवरून व कर्तृत्वावरून, तिची संगत करणाऱ्या इतर स्त्रियांच्या अनुभवावरून आणि तिच्या सर्व सामाजिक वागणुकीवरून, प्रत्यक्ष कुटुंबें मोजून सिद्ध करून द्या.

आशावंतः–करांच्या ओझ्यानें रयत वांकली आहे, तीवरील कर कमी करा; त्यामुळें मीठ नाहीं किंवा अन्न नाहीं म्हणून रयत अशक्त होणार नाहीं, अधिक उद्योग करील, संपत्तिमान् होईल व देशहिताच्या मार्गास लागेल. **अनुभविकः**–रयत वर्षभर जगण्याइतकें अन्न मिळविते हें ती जगते यावरूनच सिद्ध होतें. आतां वर्षांत तिनें किती दिवस उद्योग केला व त्या उद्योगानें तीस काय प्राप्ति झाली हें सांगा व राहिल्या आळसाच्या दिवसांत कमींत कमी किती प्राप्ति झाली असती तिचा अदमास करा. त्या शक्य प्राप्तीच्या कितव्या अंशावराबर कर कमी करून मागतां तें स्पष्ट आंकड्यांनीं सांगा. जेथें **योग्य** उद्योगाची सीमा झाली तरी लोक उपाशीं किंवा दरिद्री राहिलेले दिसतील, तेथें कर कमी करण्यास आज

आमची तयारी आहे. **आ०**:–वरें तर तुमच्याजवळ या बाबतींत काय माहिती आहे ती मला द्या. **अ०**:–आधीं कां मागितली नाहीं? ती प्रथम न मागण्यांत तुमचा कोणता हेतु होता?

आशावंत:–हे सर्व फेरफार **इष्ट** आहेत कीं नाहींत हें पहा; ते करितांक्षणींच कदाचित् हित होणार नाहीं, कदाचित् अहितच होईल, कदाचित् त्यांचा दुरुपयोग करणारेच फार निघतील; कदाचित् ज्यांनीं दांडगाईनें फेरफार केले त्यांस शेवटीं समाधान वाटण्यासारखें कांहीं अनुभवास आलें नसेल; तथापि हे फेरफार **विचारशक्तीस सयुक्तिक** दिसतात कीं नाहीं तें सांगा; व हट्ट न धरतां ते होऊन जाऊं द्या. **अनुभविक**:–विचारशक्तीस सयुक्तिक व इष्ट वाटण्यास योजिलेल्या फेरफारांमध्यें जे गुण लागतात तेच **आज नाहींत** असें दिसतें व **पुढें येतील** असें कोणत्या प्रमाणांवरून अनुमान करावें? कदाचित् **ज्या रीतीनें तुह्मी फेरफार सुचवितां ती रीत चुकल्यामुळेंच अनिष्ट परिणाम घडत असतील.** तेव्हां प्रत्यक्ष उदाहरणें घेऊन अनिष्ट परिणाम घडण्याचीं कारणें ठरवूं, व तीं ज्या दुर्गुणांमुळें उत्पन्न होतात ते दुर्गुण ज्यांमध्यें नाहींत अशांस मात्र या फेरफारांची आजच आवश्यकता वाटत आहे कीं नाहीं हें विचारूं. जर त्यांस ती वाटत नसेल तर व्यर्थ फेरफार करून दुर्गुणावरील चालू निर्बंध कां दूर करावा? जर त्यांस ती आवश्यकता वाटत असेल तर अशा तऱ्हेचा फेरफार करूं कीं त्यांच्या व त्यांसारख्या इतरांच्या अडचणी दूर व्हाव्या, परंतु अविचारी लोकांवरील निर्बंध कमी होऊं नये. या तुमच्या फेरफारांस असें स्वरूप द्या पाहूं.

या उदाहरणांवरून उभयपक्षांतील लोकांची विचारसरणी वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. माझ्या मतें आशावंत निवळ कल्पनांस मोहित होऊन, मनांत फेरफार येण्याचा अवकाश कीं तो गुप्तपणें किंवा दांडगाईनें करण्यास तयार होतात, व त्यामुळें विरुद्ध पक्षास चीड आणितात; इतकेंच नाहीं, तर चांगलें उदाहरण घालून देऊन अखेरीस प्रत्यक्ष फायदा दाखवायाचाच असा त्यांचा निश्चयही नसतो; व थोडा फेरफार चालू झाला कीं त्या बाबतींत ते गाढनिद्रेंत जातात. या अशा अविवेकामुळें दुही माजते व कोणी कोणास दुखावलें कीं वळ असेल तर तो सूड उगवून घेतो; मग रानटी प्रकारास आरंभ होतो, व सर्व समाजाची बेअब्रू होते. "धर, पकड, घाल ब्राह्मणास तुरुंगांत! कर शिव्यागाळी, होऊं द्या मारामारी, कोण हटतें आहे पाहूं!" असे अप्रशस्त विचार डोक्यांत येण्यास अल्पिष्ट आशावंतांचा अविचारच कारण होतो.

याकरितां आशावंतांनीं **वर दाखविलेला भेद स्वाभाविक आहे, शुद्ध हट्टाचा किंवा मूर्खपणाचा नाहीं** ही गोष्ट नित्य मनांत बाळगावी; असें त्यांनीं केल्यास त्यांस दुसऱ्या पक्षाचा बहुमान वाटेल, व त्यांचें ह्मणणें काय, अनुभव काय हें समजून घेण्याची प्रत्येक कामीं इच्छा होईल. मग, डोक्यांत येतांच

ल्या फेरफारास आरंभ, असा उताविळपणा ल्यांमध्यें दिसणार नाहीं. ज्या अनुभवाच्या गोष्टी कळतील ल्यांवरून एका फेरफाराच्या आधीं दुसरा कोणता होणें अधिक जरूर आहे हें ल्यांस कळेल, व फेरफारांस क्रम व शिस्त लागेल, ल्यांच्या शर्तीं ठरतील व ते करण्याच्या कामीं सर्व एकदिल होतील. असुधारक ब्राह्मणांस हालायास नको असें मानणें चुकीचें आहे; ते आपोआप जितके हालत आहेत तितके हालवून हालत नाहींत हें मात्र खरें. आपण जन्मलों ल्यावेळीं जी ब्राह्मणज्ञातीची स्थिति होती तीच मरतेवेळीं कायम राहील किंवा ठेवायाची अशी कोणाही सुज्ञ माणसास आशा किंवा उमेद नाहीं. ब्राह्मण सुतारकाम करीत आहेत, लोहारकाम करीत आहेत, वाण्याचीं दुकानें घालून वसले आहेत, हाटेलांत मद्यमांसांच्या खरेदीचा हिशेब ठेवीत आहेत, तमाशांत नाच्यापोऱ्याचेंही काम करून जनरंजन करण्यास मागेंपुढें पहात नाहींत. अशांचीं कुटुंबें वाळींत नाहींत, ते अपंक्त नाहींत किंवा ल्यांच्या स्नानसंध्येवद्दल कोणास फिकीर नाहीं. हा असा फेरफार अंधारांत चाललेला नाहीं, प्रसिद्धपणें शिष्ट मंडळींत व राजदरबारांत घडत आहे. वर्कशापमध्यें, महारापोरांच्या कामाच्या देखरेखीवर, स्पर्शास्पर्श न मानण्याच्या आगगाडीच्या कामांवर, वगैरे सुधारकांच्या मुलांपेक्षां असुधारकांचींच मुलें अधिक आहेत; व मातापितरांच्या सल्ल्यानें आहेत. नौकरीकरितां तींच एडनला किंवा पेशावरला जाऊन राहिलीं आहेत. याप्रकारें ब्राह्मणसमाजांत अनुभविक माणसांच्या सल्ल्यानेंच होत असलेला फेरफार किती सांगावा? ल्याचें श्रेय सुधारकांस नाहीं, तर अनुभविक जुन्या माणसांच्या दारिद्र्यास व सुज्ञतेस आहे. व जर कोणताही फेरफार समाजांत लवकर व्हावा असें सुधारकांस वाटत असेल तर तो दारिद्र्य दूर करण्याचा व निश्चित हितसाधनाचा मार्ग आहे असें ल्यांनीं असुधारक सुज्ञ मंडळीच्या अनुभवास आणून द्यावें. असें ल्यांनीं केल्यास सर्व विरोध नाहींसा होईल, सर्व वैमनस्यें मागें पडतील, व शांतपणें समाजास सुधारणेची भरती येईल. नव्या व जुन्यांच्या, आशावंत आणि अनुभविकांच्या भेटीचा व प्रेमवहुमानाचा हा एकच योग्य आणि सुलभ मार्ग आहे.

समाप्त.

पृष्ठ १९७–२६१ पर्यंत मुंबईत "निर्णयसागर" छा० छापिलें.

ग्रंथकर्त्याचे

आयुष्यांतील कर्तव्यांविषयीं उपदेश.

---

१. शाळेचा अभिमान.

२. कुटुंबाचा अभिमान.

OPINIONS.

Dr. R. G. Bhandarkar says:—

Mr. Mahadev S. Gole's Lecture on "S'âlechâ Abhimâna" is interesting and instructive. He has therein sketched a high ideal of the functions of a school, of the feelings that should be entertained towards it by teachers and pupils, and of their duties. He has also indicated the way in which one should seek to realize the ideal.

The Hon'ble Mr. Justice Ranade says:—

The higher responsibilities of the teacher's profession were never better expressed than in these noble utterances which, I hope, will not fail to produce that warmth of sympathy and fellow-feeling which are their own reward.

* * * * * *

The lecture is written in a very easy and correct style and is eloquent in the true sense of the word, because it reflects the speaker's fulness of heart and the resolve to be noble and good.

दोन्ही उपदेश एकत्र बांधलेले.

किंमत चार आणे.